म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
क्र. ३२८२

# ।। मुक्तेश्वरांची कविता ।।
# वाङ्मयीन अभ्यास

## खंड तिसरा
## ।। महाभारत ।।

।। रत्नाकर बापूराव मंचरकर ।।

मराठी संशोधन मंडळ
मुंबई

REFBK-0025645

वा. संपूर्ण निबंध वाचन
३३२०२
२५६४५
१२।७।८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

12 DEC 1992

(कृ. मा. पहा)
५०००–११–८६

# मुक्तेश्वरांची कविता

खंड तिसरा

## महाभारत

# मुक्तेश्वरांची कविता

खंड तिसरा

## महाभारत

रत्नाकर बापूराव मंचरकर

REFBK-0025645

Mukteshwaranchi Kavita
III Mahabharat.
R. B. Mancharkar

मुक्तेश्वरांची कविता
खंड तिसरा □ महाभारत

© सर्वाधिकार
सौ. शकुंतला र. मंचरकर.

प्रथमावृत्ती
१९८७

प्रकाशक :
प्रा. रमेश अ. तेंडुलकर
संचालक, मराठी संशोधन मंडळ
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग
दादर, मुंबई ४०० ०१४.

मुद्रक :
सा. रा. भंडारी
भंडारी मुद्रणालय
२७१, नारायण पेठ,
पुणे ४११०३०.

वितरक :
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई-४०० ००४

मूल्य ७० /– रुपये

सौ. शकुंतलास....

कसे निभावून गेलों कळत नाहीं, कळलें नव्हतें
तसें कांहीं जवळ नव्हतें–नुसते हातीं हात होते !

# भूमिका

प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप बहुपरिमाणात्मक आहे. त्यामुळे त्याची समीक्षाही भाषाभ्यास, संस्कृतिशोधन, तत्त्वचिंतन, संशोधन, इतिहासलेखन, साहित्यविमर्श अशा अनेक क्षेत्रांना स्पर्श करणारी झाली आहे. तथापि या वाङ्मयाचे सौंदर्य व मूल्य यांच्या यथार्थ दर्शनासाठी वाङ्मयीन मूल्ये मध्यवर्ती ठेवून त्याचा अभ्यास व्हावयास हवा. या जाणिवेने प्राचीन मराठी वाङ्मयाकडे पाहू लागलो तेव्हा दृष्टी स्थिरावली ती कविवर मुक्तेश्वरांवर ( इ. स. १७७४-१८४० ). गेल्या शंभर वर्षांत मुक्तेश्वरांच्या चरित्र-शोधनावर व तुलनाधिष्ठित अभ्यासावर भर दिला गेला. त्यामानाने त्यांच्या कवितेतील नवतेचा व सौंदर्यउन्मेषांचा विचार झाला नाही. महाभारताशिवाय त्यांची अन्य रचना काहीशी उपेक्षित राहिली. वस्तुतः काव्यविषयक जाणिवांचे सृजनशील कलावंताला असलेले सहज भान मुक्तेश्वरांच्या ठायी नांदत आहे. त्यांच्या श्रेणीच्या अन्य कविश्रेष्ठां-पेक्षा त्यांची रचना वाङ्मयबाह्य प्रेरणा-परिमाणांनी तितकीशी भारावलेली नाही. तिचे रूप अधिक काव्यनिष्ठ आहे. नवनव्या दिशांचा धांडोळा घेत ती विकसित होत राहिली. आपल्या युगातील वाङ्मयीन संक्रमणाचे ध्वनी-प्रतिध्वनी तीत उमटले आहेत. तिने पूर्वपरंपरेला वेगळ्या वाटेने वाहते केले, आणि उत्तरकालीनांवर प्रभाव गाजविला. प्राचीन मराठी काव्यपरंपरेत मुक्तेश्वरांची कविता अशी मोक्याच्या जागेवर उभी आहे. या विपुल ( ओवीसंख्या सुमारे वीस हजार ) व गुणसमृद्ध काव्यसृष्टीचे वाङ्मयीन भूमिकेवरून आकलन व मूल्यमापन करणे, हे या अभ्यासाचे उद्दिष्ट आहे.

या वाङ्मयाभ्यासात प्रमाणसंहितांच्या अनुपलब्धीचे भान ठेवले आहे आणि शक्य तेथे हस्तलिखितांचा पुरावा विचारात घेतला आहे. आवश्यक तेथे पूर्वसूरींशी स-प्रमाण संवाद-विरोध दर्शविला आहे. प्राचीन मराठी काव्याच्या ऐतिहासिक आकलनास साहाय्यक ठरणारे काही मौलिक विचार नजीकच्या काळात पूर्वाभ्यासकांनी मांडले आहेत. संस्कृत-मराठी संबंध लक्षात घेताना मधला प्राकृताचा टप्पा भाषेप्रमाणेच वाङ्मयाच्या संदर्भातही लक्षात घेतला पाहिजे; शिवकाळ शक्तिसौष्ठवाचा होता; आख्यानक काव्यपरंपरेत संक्षेप-प्रवृत्ती व विस्तारप्रवृत्ती या दोन्ही प्रवृत्तींचा आढळ होतो. महानुभावांचा " बंद वाङ्मय-व्यवहार " लक्षात घेऊन तदितर " खुल्या वाङ्मयव्यवहारा "चा विचार व्हावयास हवा; या अशा नव्या विचारांचा स्वीकार करून मुक्तेश्वरांच्या काव्यसृष्टीच्या संदर्भात मी त्यांचे विस्ताराने उपयोजन केले आहे. पूर्वाभ्यासकांशी केलेल्या संवाद-विरोधातून हे नवदर्शन आकाराला आले असल्याने त्यांच्याविषयीचा कृतज्ञ आदरभाव माझ्या मनात सदैव जागा राहिला आहे. आकलनासाठी आवश्यक ते सारे स्वीकारले आहे. मूल्यमापन

मात्र वाङ्मयीन भूमिकेवरून केले आहे. त्यामुळे मुक्तेश्वरांचे लौकिक जीवन, त्यांचा तत्त्वविचार किंवा त्यांच्या कवितेत प्रतिबिंबित झालेले संस्कृतिदर्शन यांचा स्वतंत्र विचार केलेला नाही. जेथे हे घटक त्यांच्या काव्यसृष्टीला अर्थ आणि आकार देतात तेथेच त्यांचा विचार केला आहे. कोणतेही पूर्वग्रह न बाळगता मुक्तेश्वरांच्या काव्यकृतींचा अनेकांगी विश्लेषक अभ्यास केला आहे. एकेका काव्यकृतीच्या संदर्भात अनेक संबद्ध दृष्टिकोण या वाङ्मयाभ्यासात अंतर्भूत आहेत. त्यांचे सूत्ररूप ग्रथन त्या त्या खंडाच्या संश्लेषक समारोपात व एकूण अभ्यासाच्या उपसंहारात केले आहे. प्रत्येक खंडाच्या आरंभी विस्तृत विषयानुक्रम व अखेरी त्या खंडापुरती मर्यादित अशी वर्गीकृत संदर्भ-सूची दिली आहे. संक्षेपात, नवी दृष्टी आणि जुनी शिस्त यांचा एकमेळ साधून मुक्तेश्वरी कवितेचे नवदर्शन घडविण्याचा रसिकहृदयाने पण परिश्रमपूर्वक प्रयत्न केला आहे. मुक्तेश्वरांचे काव्यकर्तृत्व व मराठी काव्यपरंपरेतील स्थान निश्चित करण्यास त्यामुळे साहाय्य होईल. प्राचीन मराठी वाङ्मयेतिहासासही तो उपकारक ठरावा.

पहिला खंड मुक्तेश्वरांच्या आख्यानक व स्फुट कवितेचा; दुसरा खंड संक्षेपरामायणाचा; तसा हा तिसरा खंड मुक्तेश्वरी महाभारताचा. या खंडाच्या पहिल्या भागात मुक्तेश्वरी भारतातील भारतकथासंक्रमण विचारात घेतले आहे, "प्रास्ताविका"त मुक्तेश्वरी भारताची पूर्णापूर्णता, रचनाक्रम, रचनाकाळ यांची निश्चिती केली आहे. भारत-स्वरूपाच्या पूर्वमतांची चिकित्सा करून पुनर्विचाराची आवश्यकता सांगितली आहे. "पुनर्विचारा"ची "दिशा" मुक्तेश्वरांच्या भारतकथासंक्रमणाच्या भूमिकेत शोधली असून "आधार" तुलनीय संहितांच्या निश्चितीने दिला आहे. नीलकंठी संहिता नाकारून, चिकित्सक भारत-प्रतीच्या साहाय्याने मुक्तेश्वरांसमोर असू शकणाऱ्या संभाव्य भारतप्रतीचा साधार शोध घेतला आहे. तौलनिक अभ्यासामागील नेमकी वाङ्मयीन दृष्टी स्पष्ट केली आहे. तुलनीय कृतींच्या साधर्म्य-वैधर्म्याची नोंद करून त्याची कारणमीमांसा वाङ्मयीन बैठकीवरून केली आहे. त्यातून मूलस्त्रोताचे उपयोजन करण्याची मुक्तेश्वरांची पद्धती ( Treatment of the source ) स्पष्ट होते. या तुलनेचा उद्देश मुक्तेश्वरी भारताचा स्वरूपवेध घेण्याचा आहे. मराठी परंपरेतील स्वैर रचनास्वातंत्र्य व वाग्जल्प टाळून मूलानुसरण करण्याचे स्वीकृत उद्दिष्ट यांचा यथायोग्य मेळ त्यांनी घातला. भारत कथेवर आशयनिष्ठ व अभिव्यक्तिनिष्ठ असे उभयविध संस्करण केले. त्यामुळे मुक्तेश्वरी भारत व्यासभारताची प्रतिकृती, अनुकृती, भाषांतर, रूपांतर, टीका होत नाही किंवा पूर्णतया स्वतंत्र कलाकृतीही होत नाही. त्याचे स्वरूप पुनर्निर्मितीचे ठरते. "परिशिष्टा"त तुलनेला साहाय्यभूत ठरणारी मुक्तेश्वरी भारत-व्यासभारत यांची संगती ( Concordance ) दिली आहे.

तिसऱ्या खंडाच्या दुसऱ्या भागात या पुनर्निर्मितीचे वाङ्मयरूप न्याहाळले आहे. आरंभी मांडलेली मुक्तेश्वरांची विकसित काव्यदृष्टी प्राचीन मराठी साहित्यविचाराच्या दृष्टीने नवी व मोलाची वाटावी. वाङ्मयांगांचे स्वरूपविवेचन करून त्या प्रकाशात

मुक्तेश्वरी भारताची वाङ्मयीन पहाणी केली आहे. "कथाबंधा"च्या विवेचनात मुक्तेश्वरी भारताचे स्वकालोचित मूल्यात्मक परिमाण प्रत्येक पर्वाच्या बंधाविशेषांसह स्पष्ट केले आहे. भविष्यकल्पना–विनोद–अद्‌भुतता–कालविपर्यास यांचा, निवेदन व रचना यांच्या विशेषांसह, विचार केला आहे. "व्यक्तिचित्रणा"त मुक्तेश्वरी व्यक्तिचित्रणाची विशिष्टता तंत्रविशेषांसह दाखविलेली आहे. याविषयीच्या पूर्वमतांचा प्रतिकार केला आहे. श्रीकृष्णाच्या आर्ष प्रतिमेचे ( Archetypal Image ) विवेचन अभिनव वाटावे. संवाद, वर्णन, अलंकार यांचे भारतसापेक्ष व तंत्रनिष्ठ विशेष सोदाहरण चर्चिले आहेत. निर्देशात्मकतेचा ( Allusiveness ) विचार नव्याने मांडला आहे. "भाषाशैली"च्या विवेचनात अनेकानेक शैलीविशेषांसह पूर्वपरंपरा व विकसनशीलता यांचा विचार केला आहे. या वाङ्मयीन पाहणीतून हाती आलेले मुक्तेश्वरी भारताचे स्वरूपविशेष नोंदविले आहेत. मुक्तेश्वरी भारत हे आर्षकाव्याचा डौल मिरविणारे व्यासभारताचे मराठी संस्करण आहे. पूर्वोत्तर भारतरचनांच्या संदर्भात त्याची पृथगात्मता व प्रभाव यांचे दिग्दर्शन केले आहे.

तिसऱ्या खंडाच्या तिसऱ्या भागात आतापर्यंतच्या त्रि–खंडात्मक अभ्यासाचा "उपसंहार" केला आहे. त्यात मुक्तेश्वरी कलाकृतींच्या विश्लेषक अभ्यासाच्या आधारे साकल्याने विचार करून हाती आलेले निष्कर्ष सूत्ररूपाने नोंदविले आहेत. मुक्तेश्वराचे लौकिक व्यक्तिमत्व व काव्यपिंडाचे धर्म, काव्यदृष्टी व काव्यसृष्टी यांतील सुसंवाद, काव्यनिर्मितीचा काळ व क्रम, मूलाधार व त्यांचे मुक्तेश्वरी रचनेशी असलेले नाते, पूर्वपरंपरेशी असलेला संवाद–विरोध, उत्तरपरंपरेवर असलेला प्रभाव–परिणाम, काव्यबंधांचे वैविध्य, प्रकृतिगत विकसनशीलता, संक्रमणकाळाचे ध्वनि–प्रतिध्वनी आणि मराठी काव्यसापेक्ष परंपरा व नवता, यांविषयी समग्र अभ्यासात विखुरलेला विचार सूत्ररूपाने ग्रथित केला आहे. नकारात्मक व होकारात्मक प्रवृत्ती आणि बीजवृत्ती व वृक्षवृत्ती या उभयविध प्रतिभाधर्मातून उद्‌भूत झालेली मुक्तेश्वरांची काव्यसृष्टी आपल्या काळातील वाङ्मयीन युगप्रवर्तनास साहाय्यभूत ठरली. महानुभावांचा वाङ्मयव्यहार "बंद" होता आणि एकनाथ वाङ्मयात निखळ कलात्मकतेचे भान उणावलेले होते, हे लक्षात घेतले की मुक्तेश्वरांच्या कवितेची महत्ता ठळकपणे जाणवते. आरंभी सविस्तर विषयानुक्रम व अखेरी महाभारता ुरती मर्यादित वर्गीकृत संदर्भसूची दिली आहे.

प्राचीन मराठी वाङ्मयाच्या सुदीर्घ अध्ययनपरंपरेत मुक्तेश्वरांचे हे साधार नवदर्शन मी नम्रतापूर्वक विचारविमर्शासाठी ठेवीत आहे.

□

पहिल्या खंडात निर्देशिलेल्या व्यक्ती आणि संस्था यांचा ऋणभार याही खंडावर आहे. या अभ्यासात मराठी संशोधन मंडळाचे साहाय्य झाले होते. आता त्यास प्रकाश लाभत आहे तोही मंडळामुळेच. ज्येष्ठ अभ्यासक श्री. गं. दे. खानोलकर, मंडळाचे पदाधिकारी

आणि विशेषत: मराठी संशोधन मंडळाचे संचालक प्रा. रमेश अ. तेंडुलकर यांचा मी ऋणी आहे. तीव्र काव्य-संवेदन असलेल्या तेंडुलकरांनी हा प्रबंध यथामूल प्रसिद्ध करण्यासाठी तयारी दाखविली आणि जिव्हाळ्याने पाठराखण केली.

स्नेहश्री डॉ. दत्तात्रय पुंडे, सौ. शकुंतला पुंडे आणि भंडारी मुद्रणालयाचे श्री. सा. रा. भंडारी व श्री. रमेश भंडारी यांचाही आवर्जून निर्देश करावा इतके त्यांचे या खंडाच्या प्रकाशन कार्यात विविधांगी साहाय्य झाले आहे.

शिवाजी विद्यापीठाने या प्रबंधास आपले पहिलेच 'डॉ. वि. रा. करंदीकर संशोधन पारितोषिक' दिले आणि मराठी संशोधन मंडळाने आपले प्रकाशन म्हणून त्यास प्रसिद्धी दिली. या दोन्ही घटनांच्या आनंदाने माझी अध्ययनशीलता जागी ठेवली.

काही हात मस्तकावर होते, काही पाठीवर होते आणि काही हातातही होते. अनेकांच्या या ऋणांचा मी कृतज्ञतेने स्वीकार करतो आणि अंतःकरणपूर्वक आभार मानतो.

**डॉ. प्रा. र. बा. मंचरकर**
मराठी विभाग प्रमुख,
पदव्युत्तर केंद्र, बोरावके महाविद्यालय,
श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर ४१३७०९.

# मुक्तेश्वरांची कविता
# खंड तिसरा

## महाभारत

॥ १ ॥

मुक्तेश्वरी भारताची वाङ्मयीन पाहणी

## अनुक्रमणिका

भूमिका (७)

**विभाग पहिला**

विषय-विवरण (१२)
अ ।। प्रास्ताविक १
ब ।। मुक्तेश्वरी भारतस्वरूपाचा पुनर्विचार : दिशा व आधार १७
क ।। भारतकथासंक्रमण ३६
ड ।। समारोप १०८
इ ।। परिशिष्ट ११०

**विभाग दुसरा**

विषय-विवरण ११८
एक ।। मुक्तेश्वरांची काव्यदृष्टी १२३
दोन ।। कथाबंध १३५
तीन ।। व्यक्तिचित्रण १७५
चार ।। संवाद योजना २०३
पाच ।। वर्णन विशेष २०७
सहा ।। अलंकार २२१
सात ।। निर्देशात्मकता २३३
आठ ।। भाषाशैली २३९
नऊ ।। मुक्तेश्वरी भारताचे स्वरूपविशेष २५९
दहा ।। महाभारत परंपरा व मुक्तेश्वरी भारत २६४
अकरा ।। समारोप २७१

**विभाग तिसरा**

विषय-विवरण २७४
उपसंहार २७५

**विभाग चौथा**

संदर्भ-सूची २८५

□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३२७२
२५६६४


# मुक्तेश्वरांची कविता

## ३ ॥ २

## मुक्तेश्वरी भारताची वाङ्मयीन पाहणी

### अ ॥ प्रास्ताविक


एक ॥ मुक्तेश्वरी भारताची पूर्णापूर्णता

दोन ॥ मुक्तेश्वरी भारताचा रचनाक्रम

तीन ॥ मुक्तेश्वरी भारताचा रचनाकाळ

चार ॥ मुक्तेश्वरी भारत : स्वरूपविचाराचा परामर्श

४·१. टीका

४·२. भाषांतर

४·३. अनुवाद

४·४. स्वतंत्र निर्मिती

४·५. आख्यानपद्धतीचे रूपांतर

४·६. पुनर्विचाराची आवश्यकता


### ब ॥ मुक्तेश्वरी भारतस्वरूपाचा पुनर्विचार : दिशा व आधार


एक ॥ भारतकथासंक्रमणाची मुक्तेश्वरांची भूमिका

दोन ॥ तुलनीय संहितांची निश्चिती

१. मुक्तेश्वरी भारताची संहिता व प्रकाशन

२. मुक्तेश्वरांपुढील संस्कृत भारतप्रतीचा शोध

तीन ॥ तुलनात्मक अभ्यासाची भूमिका

**क ॥ भारतकथासंक्रमण**

एक ॥ भारतकथासंक्रमण : संक्षेप

१. संक्षेप : स्वरूपविवेचन

२. सभापर्वातील वर्णन

२·१. पुनरुक्ती

२·२. संवाद

२·३. वर्णन

२·४. उपदेशपरता

२·५. संकीर्ण

३. सभा पर्वातील सारकथन

४. अन्यपर्वातील संक्षेप

५. संक्षेपाच्या पद्धती

६. संक्षेपाचा परिणाम

७. संक्षेप : समारोप

दोन ॥ भारतकथासंक्रमण : विस्तार

१. विस्तार : स्वरूपविवेचन

२. समकालीन वाङ्मयीन प्रवृत्ती : विस्तारशीलता

३. सभापर्व : समरुप विस्तार

४. सभापर्व : मूलसंबद्ध वृद्धिजन्य विस्तार

५. अन्य पर्वातील विस्तार

६. विस्तार : समारोप

तीन ॥ भारतकथासंक्रमण : नवनिर्मिती

१. नवनिर्मिती : स्वरूपविवेचन

२. सभापर्व : नवनिर्मिती

२·१. मूल्यात्मकतेचे परिणाम

२·२. नवप्रसंगनिर्मिती

२·३. प्रसंगचित्रण

२·४. वर्णन

२·५. संवाद

२·६. तपशील

२·७. " सांगो विसरला व्यासकवी "

२·८. " जेणे वाढे उत्कट भक्ती "

३. अन्य पर्वांतील नवनिर्मिती
४. नवनिर्मिती : समारोप

चार ॥ भारतकथासंक्रमण : बदल

१. बदल : कारणमीमांसा व स्वरूपविवेचन
२. सभापर्व : गौण बदल
३. सभापर्व : प्रधान बदल
४. अन्य पर्वांतील बदल
५. बदल : समारोप

पाच ॥ भारतकथासंक्रमण : पूर्वपरंपरेचे भान

१. प्रास्ताविक
२. पूर्वपरंपरेशी संवाद
३. पूर्वपरंपरेशी विरोध
४. परंपरासापेक्ष पृथकत्व

सहा ॥ भारतकथासंक्रमण : मूलसापेक्ष अभिव्यक्तिविशेष

६·१. मूल सामग्रीचे वेगळे उपयोजन
६·२. भिन्न व संबद्ध भागांचे उपयोजन
६·३. काव्यप्रयुक्ती : परिवर्तन
६·४. भारतकथासंक्रमण : काही नमुने
६·५. मूलसापेक्ष अभिव्यक्तिविशेष : समारोप

**ड ॥ समारोप**

**इ ॥ परिशिष्ट**

एक ॥ मुक्तेश्वरी भारत व व्यासभारत संगती


□ □ □

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
३२८२
दा. क्र. २५६४५
विषय क्रमांक
शाखा स्थळ प्रत

# अ ॥ प्रास्ताविक

## एक ॥ मुक्तेश्वरी भारताची पूर्णापूर्णता

आदि, सभा, वन, विराट व सौप्तिक एवढीच मुक्तेश्वरी भारताची पर्वे उपलब्ध आहेत. त्यांनी समग्र भारत रचिले असावे [१] की नसावे [२] या वादग्रस्त प्रश्नाचा थोडा अधिक विचार करावयास हवा.

---

१. "नवनीत", १९०७, पृ. १७२.

दा. के. ओक (संपा.), "महाराष्ट्र कविवर्य मुक्तेश्वर कृत महाभारत, विराटपर्व," दुसरी आवृत्ती, मुंबई, १९३९, उपोद्घात, पृ १०–१८.

ज रा. आजगावकर, "महाराष्ट्र-कविचरित्र, भाग–१", मुंबई, १९०७, पृ. ४९–५०.

ज. रा. आजगावकर, "प्राचीन मराठी संतकवी, खंड १", मुंबई, १९५७, पृ. ४५६–४५७.

ल. रा. पांगारकर, "कविवर्य मुक्तेश्वर : चरित्र व काव्यविवेचन", पुणे, १९२२, पृ. २४–२५.

अ. ना. देशपांडे, "प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग–४", पुणे–नागपूर, १९७७, पृ. ३२६–३३०.

२. वि. ल. भावे, "महाराष्ट्र सारस्वत", चतुर्थावृत्ती, पुणे, शके १८७६, पृ. ३५०–३५२.

वि. ल. भावे, अनंतसुत त्र्यंबक, "भा. इ. सं. मंडळ, तृतीय संमेलनवृत्त," शके १८७३, पृ. १०२–१०६.

ना. गो. नांदापूरकर, "मुक्तमयूरांची भारते", हैदराबाद, १९५६, पृ. ५–८.

अ. का. प्रियोळकर, "मुक्तेश्वरकृत महाभारत, आदिपर्व खंड १", मुंबई, १९५१, प्राक्कथन, पृ. ६–९.

द. सी. पंगु, "मुक्तेश्वरकृत महाभारत विराटपर्व", पुनर्मुद्रण, पुणे, १९६५, पृ. २०–२१.

द. वा. पोतदार, भा. इ. सं. मं. त्रैमासिक, वर्ष ११, पृ. २४.

( १ ) मुक्तेश्वरी भारतात उद्योगपर्व ( १।२०।१७३, ४।८।१२० ), सभा-उद्योग-भीष्मपर्व ( २।३।१५२ ), द्रोणपर्व ( १।४८।४६ ), स्त्रीपर्व ( १०। उप १ ), अश्वमेध पर्व ( १।४७।६६ ) असे पुढील पर्वांचे निर्देश आढळतात. हे निर्देश स्वकाव्यरचनेपेक्षा व्यासरचनेकडे अंगुलीनिर्देश करतात. हे नांदापूरकरांचे मत ( पृ. ६ ) देशपांडे यांना ( पृ. ३२६ ) अमान्य आहे. पण संकल्पित मुक्तेश्वरी रचनेचे दर्शक असे हे उल्लेख मानले तरी ते संकल्पपूर्तीचे द्योतक मानता येणार नाहीत, हे स्पष्ट आहे.

( २ ) पुढील पर्वांतर्गत अशी त्रुटित मुक्तेश्वरी आख्याने सापडतात, हा पूर्ण-पक्षाचा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. "शुकरंभासंवाद" हा शांतिपर्वाचा भाग असल्याचे दा. के. ओक ( पृ. ११ ), देशपांडे ( पृ. ३२७ ) सांगतात, ते निर्मूल आहे. "शुकरंभासंवाद" भारतांतर्गत शांतिपर्वावर आधारलेला नाही. "शतमुख रावण-वधाख्यान" हा शांतिपर्वाचा भाग असल्याचे आजगावकरांचे विधानही ( पृ. ४९ ) निराधार आहे. कारण त्या आख्यानास आनंदरामायणाचा आधार आहे. "मूर्खांची लक्षणे" या प्रकरणाचा उपक्रमोपसंहार त्याचे स्वतंत्र रूप दर्शवीत असल्याने उद्योग-पर्वांतर्गत विदुरनीतीशी त्याचा संबंध लावणे योग्य ठरणार नाही. "भगवद्गीता" मात्र उपक्रमोपसंहार नसल्याने कदाचित भीष्मपर्वाचा भाग मानता येईल. "महाराष्ट्रातील मोठमोठे ग्रंथकार अशी त्रुटित रचना करून मागाहून मधले दुवे जोडतात.." हे महिपती, मोरोपंत यांच्या उदाहरणावरून दिसते. तसाच प्रकार मुक्तेश्वरांचाही मानता येईल. तथापि पुढील रचना न झाल्याने हे प्रकरण त्रुटित राहिले असेच मानावे लागेल.

( ३ ) देवदासकृत संतमालिकेतील ( ३।१६०८ ) "भारथटीका" ( ओ. ८८ ), व "परम रसाळ भारत सुंदर" ( १।४८ ) हा नाथलीलामृत ( श. १६८३ )मधील मुक्तेश्वरी भारताचा निर्देश त्याचे पूर्णापूर्णत्व दर्शवू शकत नाही. स्वतः मुक्तेश्वरांनीही "भारतटीका" ( १।४८।८६, २।१।१४ ) असा आपल्या रचनेचा निर्देश केलेला आहेच. "मुक्तेश्वरकृत भारत आवडते विठ्ठलासि की पर्वं । सर्व श्रवणें हरितें आशा कविच्या अशेषही गर्व" ( पांडुरंगदंडक २३ ) या आर्येच्या आधारे मुक्तेश्वरी भारत पूर्ण असल्याची मोरोपंतांची समजूत होती, असे ओक ( पृ. १२ ) म्हणतात. ओकांनी या आर्येचा लावलेला अर्थ पंगूंना ( पृ. २१ ) ओढाताणीचा वाटतो. येथील "पर्व" हा शब्द श्लिष्ट मानून मोरोपंतांनाही मुक्तेश्वरी भारताची काही पर्वेच अभिप्रेत होती, असे नांदापूरकरांनी ( पृ ७ ) दाखविले आहे. ते देशपांडे ( पृ. ३२८ ) यांना अमान्य आहे. या आर्येचा अर्थ असा वादग्रस्त आहे. तरी त्यामुळे मोरोपंत व मुक्तेश्वरांच्या चारच पर्वांचा सुश्लोकलाधवात ( श्लोक ३९९ ) उल्लेख करणारे विठोबा अण्णा दप्तरदार यांच्या मधल्या पाचपंचवीस वर्षांतच मुक्तेश्वरी भारत लुप्त झाल्याचा असंभवनीय तर्क करावा लागेल. तेव्हा मोरोपंतांनी केलेला विवाद्य निर्देश निर्णायक पुरावा म्हणून स्वीकारता येणार नाही.

( ४ ) सौतिकपर्वाच्या उपलब्धीमुळे पूर्ण-पक्षाची आशा वाढलेली दिसते. तथापि मुक्तेश्वरी भारताची रचना क्रमानुसारी नाही. मुक्तेश्वरी रचनेत सौप्तिक हे प्रारंभपूर्वक असल्याने ते उपलब्ध होऊ शकले. तेवढ्यावरून तेथपर्यंतची सर्व पर्वे लिहिली असे मानता येणार नाही.

( ५ ) मुक्तेश्वरांचे अपूर्ण भारत पूर्ण करण्याचा प्रयत्न शुभानंद, चंद्रात्मज, गोपाळ, शिवाशिवा, अनंतसुत, त्र्यंबक या भारतावर रचना करणाऱ्या कवींनी केला आहे. " त्यातून प्रगट पर्वे चार । भारथसार अप्रतिम " ( महाप्रस्थानपर्व ७३ ) असा शिवाशिवाने चारच पर्वांचा उल्लेख केला आहे. अनंतसुत त्र्यंबक अधिक स्पष्टपणे म्हणतो, " असो पूर्वी मुक्तेश्वरे । ओविकाकवीच्या ईश्वरी । आरंभिले भारत सारे । भाषाधारे वर्णावया ॥ ६ ॥ परी ते न गेले समाप्ती । ऐसें तर्कूनी सर्वमती । चतुर्थानंतरे पंचमी प्रीती । उद्योगी मती संचरली ॥ ७ ॥ " ( उद्योगपर्व ). मुक्तेश्वरी भारत अपूर्ण असल्याची पारंपरिक समजूत या उद्‌गारांतून व्यक्त होते. " या कवींना मुक्तेश्वरांचे सौतिक पर्व माहीत नव्हते, याचा खुलासा काय ? " असा यावर देशपांड्यांचा ( पृ. ३२९ ) प्रश्न आहे. सौप्तिक प्रारंभपर्व म्हणून लिहिल्यानंतर योग्य त्या क्रमात समाविष्ट करण्याची पाळीच आली नाही. ते असे बाजूला पडल्यामुळे त्याचा प्रसार कमी झाला, हा वरील वस्तुस्थितीचा खुलासा देता येईल, असे वाटते.

( ६ ) मुक्तेश्वरांचे साग्र भारत पाहिल्याचे लोक सांगतात पण शोधाअंती मुक्तेश्वरी पर्वांना अन्यकवींच्या पर्वांची जोड दिल्याचे आढळते, अशी उदाहरणे का. ना. साने, वि. ल. भावे, अ. का. प्रियोळकर यांनी दिली आहेत. गंगार्पण, अस्मानी-सुलतानी, परकीय राजवटीची अवकृपा, मत्सरी लोक इत्यादी प्रकारांनी दिलेली मुक्तेश्वरी भारताच्या अनुपलब्धीची मीमांसा तितकीशी ग्राह्य वाटत नाही. अपूर्णता हीच त्याच्या अनुपलब्धीची अधिक संभाव्य मीमांसा होईल.

( ७ ) या अपूर्णतेचा मुक्तेश्वरांच्या उतरत्या प्रतिभेशी भावे यांनी कल्पिलेला संबंध ( पृ. ३५२ ) मात्र स्वीकार्य वाटत नाही. भारतीपर्वात मुक्तेश्वरी प्रतिभा क्रमशः उतरत गेली नसून वेगळ्या पद्धतीने आविष्कृत होत राहिली. देहावसानामुळेच मुक्तेश्वरी भारत अपूर्ण राहिले असावे. " मरणसमयी मुक्तेश्वरांची भारतरचनेची इच्छा पूर्ण झाली नाही "[३] ही नरहरि मालूने " भक्तिकथामृता "त दिलेली माहिती या संदर्भात लक्षणीय आहे. एतावता, मुक्तेश्वरांनी आरंभलेली भारतरचना त्यांच्या मृत्यूमुळे अपूर्ण राहिली, हा या समस्येचा योग्य उलगडा होईल असे वाटते.

---

३. वि. ल. भावे, " महाराष्ट्र–सारस्वत ", पूर्वोक्त, पृ. ६८७ तळटीप.

## दोन ॥ मुक्तेश्वरी भारताचा रचनाक्रम

मुक्तेश्वरी भारताची पहिली चार पर्वे व दहावे सौप्तिक उपलब्ध असल्याने मधला भाग गहाळ झाल्याचे समजले जाते. त्यामागे क्रमशः रचनेचे तत्त्व गृहीत आहे. तथापि मुक्तेश्वरी भारती पर्वांच्या वाङ्मयरूपांचा शोध घेतल्यावर तसे वाटत नाही.

संक्षेपरामायणानंतर मुक्तेश्वर दीर्घ रचनेकडून पुन्हा स्फुट रचनेकडे वळले. या स्फुट आख्यानात ते संक्षेपाकडून विस्ताराकडे, वृत्ताकडे ओवीकडे झुकले. अहिमहिआख्यान, सुलोचनाख्यान अशी रामायणी आख्याने, हरिश्चंद्राख्यानासारखी पौराणिक आख्याने लिहिता लिहिता द्रौपदीस्वयंवरासारख्या भारती आख्यानाकडे व भगवद्‌गीतेसारख्या भारती प्रकरणाकडे ते आकृष्ट झाले असतील. त्याची परिणती भारतरचनेच्या संकल्पात झाली असावी. भारती आख्यानांनी मुक्तेश्वरांनी भारतरचनेस प्रारंभ केला असावा. आख्यानानुसार ते अध्यायांची सरस बांधणी करतात. आख्यानाच्या शेवटी त्याचे नाव नमूद करतात. आख्यानातून भाषांतरात्मक रचनेपेक्षा त्यांचा रचना-स्वातंत्र्याकडे अधिक कल आहे, अध्यायांच्या रूपकशैलीतील उपसंहारांची कल्पना आरंभी रचलेल्या अशा आख्यानात दृगोचर होत नाही यासारखी नांदापूरकरांनी[४] दिलेली कारणे या संदर्भात स्वीकार्य आहेत.

महाभारतासारख्या महाकाय आर्ष महाकाव्याला हात घालताना अल्पविस्ताराचे सौप्तिकपर्व मुक्तेश्वरांनी वानगीदाखल रचून पाहिले असावे. भाषांतरावरील भर, भक्ति-कल्पनाविलास यांचे अविकसित रूप आणि ओवीरचनेत न आलेली सफाई ही लक्षणे सौप्तिकाची रचना प्रारंभीच्या अवस्थेतील असल्याचे दाखवितात. आत्मविश्वासाच्या डौलापेक्षा " देशांतरे दीन पामरें आरंभले " अशी महत्‌संकल्पाला हात घालणाऱ्या कविमनाची कातरताच येथे प्रकटली आहे. त्यामुळे सौप्तिक हे प्रारंभपर्व ठरते.

सौप्तिकासारख्या संहारपर्वापासून भारतरचनेस आरंभ कसा, या संभाव्य आक्षेपास गीतेनंतर सौप्तिकाची रचना झाल्याचे दाखवून नांदापूरकरांनी ( पृ. ७०८ ) समर्पक उत्तर दिले आहे.

भगवद्‌गीतेसारखी मुक्तेश्वरांची भारतपूर्वरचना आध्यात्मिक आहे. ज्ञानाकडून मुक्तेश्वर भक्तीकडे सरकत गेले. सौप्तिकात श्रीकृष्णकर्तृत्व वर्णितानाही मुक्तेश्वरी वैशिष्ट्य दाखविणारी भक्तिभावात्मक रचना नाही. या उलट आदि-सभा-वन या पर्वांत अशा प्रसंगी त्यांची भक्तिगंगा उचंबळून आली, हाही सौप्तिकाच्या प्राथम्याचा पुरावा आहे.

मुक्तेश्वरांनी भारताची यथाक्रम व सलग रचना केली असती तर आदि-सभा-वन-विराट या चारी पर्वांना उपक्रमोपसंहाराची जोड देण्याची आवश्यकता नव्हती. " पण

---

४. ना. गो. नांदापूरकर, " मुक्त–मयूरांची भारते, " हैद्राबाद, १९५६, पृ. ७०९.

यांनी प्रत्येक पर्व केव्हा तरी रचले आणि पुढील रचना अनिश्चित, म्हणून त्या त्या पर्वाच्या आद्यंती ती रचना झाली. पुढील पर्वाच्या मंगलाचरणाने ते पर्व मागील पर्वाशी जोडण्यात आले. पण सौप्तिकाच्या पूर्वीचे पर्व लिहिले नसल्यामुळे मागील पर्वाशी जोडणारे मंगलाचरण सौप्तिकासाठी रचण्यात आले नाही "[५] सौप्तिकाच्या प्रारंभरचनेची हीही साक्ष आहे.

द्रौपदीस्वयंवरासारखी काही भारती आख्याने, भगवद्गीतेसारखे भारती प्रकरण, नमुन्यादाखल रचलेले सौप्तिकपर्व या रचनेतून आलेल्या आत्मविश्वासाने मुक्तेश्वरांनी आदिपर्वापासून सलग भारतरचनेला हात घातला. आदि-सभा-वन-विराट या क्रमाने पुढील रचना केली व तीत यथास्थानी पूर्वरचनेचा समावेश केला. " आता वाक्रिया पावलें सर्व । कथा आरंभी अति अपूर्व । संमंध लावी पर्वी पर्व अनुसंधान शृंखळे ॥ " ( आदि १।९५ ) या श्रोतृविनवणीत तिची साक्ष मिळते. सुचेल तो भाग लिहिणे व नंतर त्याची यथाक्रम व्यवस्था लावून रचनेला सलगता देणे, ही पद्धती महीपती-मोरोपंत या प्राचीन व गोविंदाग्रज-पटवर्धन या अर्वाचीन कवींमध्ये दिसते. तीच मुक्तेश्वरी भारताचीही रचना-पद्धती आहे.

## तीन ॥ मुक्तेश्वरी भारताचा रचनाकाळ

( १ ) इ.स. १६०९–१० मध्ये मुक्तेश्वरांनी संक्षेपरामायण पूर्ण केले. अहिमहिआख्यान, सुलोचनाख्यान ही रामकथासंबद्ध आख्याने त्यानंतरची असावीत. हरिश्चंद्राख्यान शुकरंभासंवाद यांतून ओवीच्या सामर्थ्याचा साक्षात्कार त्यानंतरच्या काळात त्यांना घडला असावा. याच ओघात ते द्रौपदीस्वयंवरासारख्या भारती आख्यानाकडे व भगवद्गीते-सारख्या भारती प्रकरणाकडे आकृष्ट झाले असावेत. त्यांच्या लेखनातून समग्र भारतरचनेचा संकल्प त्यांच्या चित्तात स्फुरला असेल.

संक्षेपरामायणात दक्षिणेचे चुटपुटते निर्देश येतात. महाभारतात मात्र ते आधिक्याने येतात आणि त्यांना प्रत्यक्षदर्शनाचा गंध येतो. म्हणजे वरील लेखन चालू असताना त्यांची दक्षिणयात्राही घडली असेल. देशाटनाने येणारे चातुर्य, बहुश्रुतता, परकीयांचे निरीक्षण व स्वकालीन परिस्थितीचे प्रतिबिंब या साऱ्यांचे दर्शन त्यांच्या महाभारतात घडते. ते लक्षात घेता दक्षिणेबरोबरच अन्य देश-प्रदेशाची भ्रमंतीही त्यांनी केली असेल.

परिभ्रमण व लेखन, त्यातील विकसन लक्षात घेता संक्षेप रामायणसमाप्ती ( इ. स. १६१० ) व भारतरचनासंकल्प यात दहा वर्षांचे संभाव्य अंतर मानता येईल. तसे मानल्यास इ. स. १६२० मध्ये म्हणजे वयाच्या शेहेचाळीसाव्या वर्षी मुक्तेश्वर भारती आख्यानांकडे व रचनेकडे वळले असतील, असे म्हणता येते.

---

५. ना. गो. नांदापूरकर, " मुक्तमयूरांची भारतें " पूर्वोक्त, पृ. ७१०.

( २ ) या काळास काही बाह्य प्रमाणे देता येतात. इंग्रज इ. स. १६१२ मध्ये भारतात आले. त्यांचा उल्लेख मुक्तेश्वरांनी ( १।१५।९ ) केला आहे. तेव्हा मुक्तेश्वरी भारताचा काळ इ. स. १६१२ च्या पूर्वी मागे नेता येत नाही. यामुळेच वैद्यांनी[६] सुचविलेला इ. स. १६०० हा भारतरचनेचा काळ मान्य करता येत नाही. फिरंग्यांचे "क्रूर" व इंग्रजांचे "जळतस्कर, मांसाशी" ( १।१५।९ ) "विघ्नकर्ते, दंडेल, रक्तरंगी" ( २।८।१२७ ) अशा विशेषणांनी मुक्तेश्वर वर्णन करतात. या वर्णनाचा पाठपुरावा करणारे तत्कालीन इंग्रजांचे वर्णन पहा. Hindus and Mussulmans considered the English a set of cow-eaters and fire-drinkers, vile brutes, who would cheat their own fathers "[७] हे वर्णन इ.स. १६३०च्या सुमाराचे आहे. अनेकानेक परस्थांच्या संकीर्ण समूहाने गजबजलेल्या सुरतसारख्या शहरात मुक्तेश्वरांनी इंग्रजांची दंडेली पाहिली असेल. तेव्हा इ. स. १६३० मध्ये आदिपर्वलेखन चालू असणे संभाव्य दिसते.

( ३ ) महाराष्ट्र झुंजीचे वर्णन करताना "खेटक करवाळे सतेज" ( १।३१।५४ ) असे शस्त्रविशेष मुक्तेश्वर सांगतात. इ. स. १६६०च्या पुढे गलबते, तोफा, घोडे, गड, वाघनखे, या शस्त्रसाधनांच्या वापरास मराठ्यांनी आरंभ केला. याचा अर्थ मुक्तेश्वरी वर्णन तत्पूर्वीचे आहे. मावळ्यांच्या पराक्रमाचे वर्णन करण्याऐवजी मुक्तेश्वर गडवासियांची म्हणजे डोंगरी किल्ल्यावरील लोकांची गणना दुर्जनात ( १।२६।२७ ) करतात. हा काळही उपरोक्त इ. स. १६३०च्या आसपासचा मानावा लागेल.

( ४ ) या तर्काधिष्ठित बाह्य प्रमाणांना एक प्रत्यक्ष पुरावा देता येईल. मुक्तेश्वरी सभापर्वाच्या एका पोथीत आषाढमास द्वितीया असा रचनासमाप्तीचा काळ असून वार व संवत्सराचा उल्लेख कसरीने खाल्ल्यामुळे अपुरा आहे. शके १६१८ व शके १५५७ या दोन शकांचा मेळ तिथीशी बसतो. तेव्हा बाह्य प्रमाणाने शके १५५७ आषाढ वद्य द्वितीया सोमवार हा सभापर्वाचा समाप्तिकाळ भावे[८] यांनी मानला आहे. त्यामुळे इ. स. १६२० ला आरंभ करून इ. स. १६३५ पर्यंत भारती आख्याने, भगवद्गीता, सौप्तिक, आदि व सभा यांचे लेखन पूर्ण झाले असावे, हे संभाव्य वाटते.

( ५ ) वयाच्या शेहेचाळीसाव्या वर्षी आरंभिलेले भारत एकसष्टाव्या वर्षापर्यंत जेमतेम सभापर्वापर्यंत पोहोचले. तेव्हा वाढते वय व ग्रंथपूर्तीची निकड यांचा विचार करून समरूप विस्ताराचे आरंभीचे धोरण सोडून मुक्तेश्वर पुन्हा संक्षेपप्रवृत्तीकडे वळले

---

६. चिं. वि. वैद्य, "निबंध आणि भाषणे", मुंबई, १९१५, पृ. १४५.

७. फिलीप अंडर्सन, "द इंग्लीश इन वेस्टर्न इंडिया", दुसरी आवृत्ती, १८५६, पृ. ७०. ...वि. का. राजवाडे, संकीर्ण लेखसंग्रह, कोल्हापूर, पृ. ९ वरून.

८. वि. ल. भावे, "महाराष्ट्र-सारस्वत", पूर्वोक्त, पृ. ३३८ तळटीप.

असावेत. " मार्कंडेय ऋषीची समस्या। सविस्तर बोलतां कुरूनरेशा ॥ आयुष्य न पुरे तेथे आशा। कैंची पुढील कथेची " ( वन ११।७ हे वनपर्वातील उद्गार या दृष्टीने बोलके आहेत. वनविराटाची अविस्तर रचना पाहता इ. स. १६३५–१६४० या काळात ती पूर्ण झाली असावी.

( ६ ) भारतरचनेच्या काळाचा मुक्तेश्वरांच्या निर्याणकाळाशी दृढ संबंध आहे. या दोन्ही प्रश्नांचा वि. का. राजवाडे[९] यांनी केलेला चिकित्सक विचार पांगारकर, पंगू, वाटवे, भिडे, देशपांडे अशा अभ्यासकांना पथदर्शक ठरला आहे. तथापि राजवाडे यांचे विवेचन मौलिक असले तरी विसंगत आहे. पणतू मुक्तेश्वरबुवांना इ. स. १७२७ मध्ये मिळालेल्या सनदेच्या आधाराने बावीस वर्षांची पिढी धरून इ. स. १६६० मध्ये मुक्तेश्वर हयात असले पाहिजेत ( पृ. ४ ), असे ते म्हणतात. इ. स. १६०९ मध्ये जन्मलेले मुक्तेश्वर मृत्युसमयी पन्नाशीचे असल्याचे ( पृ. ५ ) त्यांनी सांगितले आहे. त्याप्रमाणे मुक्तेश्वरांचे निधन इ. स. १६५९ चे मानावे लागेल. तुकोबा इ. स. १६४९ ला स्वर्गस्थ झाले व त्यांची कीर्ती पैठणला पोहोचण्यापूर्वीच मुक्तेश्वर आटोपले होते ( पृ. १३ ), असेही ते म्हणतात. इ. स. १६६०, १६५९ किंवा १६४९ पूर्वं अशी मुक्तेश्वरांच्या निर्याणकाळाविषयी विसंगत विधाने त्यांनी केली आहेत. ५१, ५० वा ४० वर्षे अशी मुक्तेश्वरांची आयुर्मर्यादा त्यामुळे ठरते. भिडे, वाटवे[१०] राजवाड्यांना अनुसरून इ. स. १६०९ ते १६६० अशी ५१ वर्षांची आयुर्मर्यादा ठरवितात. या मर्यादेत मुक्तेश्वरांचा जीवनक्रम समाधानकारकपणे बसविता येत नाही. इ. स. १६०९ चा जन्म, साधारणतः विसाव्या वर्षी – इ. स. १६२९ – काव्यलेखनारंभ, इ. स. १६२९ – १६३५ या अवघ्या सात वर्षांत आदि–सभा इ. विस्तृत लेखन, इ. स. १६३५–१६५० या पंधरा वर्षांत वन–विराटाची अल्प रचना आणि इ. १६५०–१६६० या चाळीस ते पन्नासच्या प्रौढ वयात, महाराष्ट्राचा भाग्यरवी चढता असताना, भारतरचना अर्धवट सोडून स्वस्थ बसणे, हे सारे न पटणारे वाटते. शके १५२१ ते १५७१ ( इ. स. १५९९ –१६४९ ) हा केतकरांनी[११] सुचविलेला काळही यासाठी स्वीकारता येत नाही. पांगारकर[१२] मुक्तेश्वरांचा काव्यलेखनाकाल शके १५३०–१५५० ( इ. स. १६०८ –१६२८ ) ( पृ. २० ), भारतरचनाकाल इ. स. १६४०–१६५० ( पृ. ३२ ) व जीवितकाल शके १४९५ ते १५६० ( इ. स. १५७३–१६३८ ) ( पृ. २० ) देतात, त्यातील विसंगती उघडच आहे.

---

९. वि. का. राजवाडे, " संकीर्ण लेखसंग्रह, " पूर्वोक्त, पृ. १–१४.

१०. के. ना. वाटवे, " पंडित कवी, " पुणे, १९५२, पृ. ३.

११. श्री. व्यं. केतकर, " महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण, " पुणे, द्वितीयावृत्ती, १९६४, पृ. ९४.

१२. ल. रा. पांगारकर, पूर्वोक्त, पृ. २० व ३०–३४.

मुक्तेश्वरांच्या जीवनक्रमातील सुसंगतीसाठी अन्य प्रमाणाधारे शके १४९६ ( इ. स. १५७४ ) हा त्यांचा जन्मशक मानणे कसे आवश्यक ठरते ते मागे दाखविले आहेच.[१३] त्यांनी केलेली दीर्घरचना, परिभ्रमण व त्यांच्या कुळातील दीर्घायुष्याची परंपरा लक्षात घेता ते दीर्घायुषी असले पाहिजेत, हे लक्षात घेऊन राजवाडे यांनी दिलेल्या प्रमाणांची संगती लावूनच मुक्तेश्वरांचा निधनकाळ ठरविता येईल. इ. स. १६६८ मध्ये सुरतेत आलेल्या फ्रेंचांचा मुक्तेश्वर उल्लेख करीत नाही. शिवाजीराजांची सत्ता गोदावरी पलिकडील लोकांना गोचर झाल्याचे मुक्तेश्वरी भारतात दिसत नाही. " मुक्तेश्वराच्या ग्रंथात स्वराज्योन्मुख महाराष्ट्राचे चित्र नसून मुसलमानी सत्तेने गांजलेल्या मनःस्थितीचेच प्रतिबिंब पडले आहे."[१४] ज्ञानदेव, एकनाथ व जनार्दनस्वामींचा निर्देश करणारे मुक्तेश्वर, रामदास, त्यांच्या पुढ्यातील कवी व तुकाराम यांचा निर्देश करीत नाहीत.

" तुकोबा १६४९ साली स्वर्गस्थ झाले व त्यांची कीर्ती पैठणपर्यंत जाण्यापूर्वीच मुक्तेश्वर आटोपले होते."[१५] याच प्रमाणांच्या आधारे इ. स. १६४९ पूर्वी म्हणजे इ. स. १६४५–४६ हा मुक्तेश्वरांचा निर्याणकाळ पंगूंनी[१६] मानला आहे. तथापि इ. स. १६४५ मध्ये " तुका आकाशाएवढा " झालेला होता आणि रामदास सदोतीस वर्षांचे होते. मुक्तेश्वरासारख्या चौकसबुद्धीच्या प्रतिभावंताला अशा परिस्थितीत त्यांची माहिती असणे स्वाभाविक ठरते. तथापि मुक्तेश्वर वाङ्मयातील त्यांचा अनुल्लेख अपरिचयाचा द्योतक आहे. या वस्तुस्थितीचे स्वाभाविक स्पष्टीकरण करावयाचे तर मुक्तेश्वरांचा निधनकाळ इ. स. १६४० पर्यंत मागे ओढला पाहिजे. त्यामुळे त्यांच्या भारताच्या अपूर्णतेची सुसंगत मीमांसा करता येते. इ. स. १६४० नंतर मुक्तेश्वरांचा निधनकाळ मानणाऱ्यांनी प्रतिभा भरात असताना त्यांनी भारतरचाना अर्धवट का सोडली याचे स्पष्टीकरण केले पाहिजे. हे सर्व लक्षात घेऊन इ. स. १६४० हा मुक्तेश्वरांचा निर्याणकाळ व पर्यायाने भारतरचनाकाळाची उत्तरमर्यादा मानली पाहिजे.

इ. स. १६२० मध्ये वयाच्या शेहेचाळीसाव्या वर्षी आरंभलेले भारत इ. स. १६४० मध्ये वयाच्या सहासष्टाव्या वर्षी झालेल्या निधनामुळे अपूर्ण राहिले. असा मुक्तेश्वरी भारतरचनाकाळाचा योग्य निर्णय होईल. मुक्तेश्वरी वाङ्मयातील विकसनाचा शोध घेऊन, पूर्वसूरींच्या मतातील विसंगतीचा निरास करून आणि त्यांनी दिलेल्या प्रमाणांचा नवा अन्वय लावून मांडलेला हा निर्णय संभाव्य व निदान सुसंगत तरी वाटेल, अशी आशा आहे.

---

१३. खंड दोन मधील संबंधित भाग पहावा.

१४. द. सी. पंगू, " मुक्तेश्वरकृत महाभारत, विराटपर्व, " पूर्वोक्त, पृ. ४७.

१५. वि. का. राजवाडे, पूर्वोक्त, पृ. १३.

१६. द. सी. पंगू, " मुक्तेश्वरकृत महाभारत विराटपर्व, " पूर्वोक्त, पृ. ४५.

## चार ॥ मुक्तेश्वरी भारत : स्वरूपविचाराचा परामर्श

मुक्तेश्वरी भारत महाभारतावर आधारलेले आहे. अशा ग्रंथातील निर्मितीचे नेमके स्वरूप जाणणे त्याच्या आकलनासाठी व मूल्यमापनासाठी आवश्यक असते. अशा पूर्वप्रयत्नांचा परामर्श येथे करावयाचा आहे.

### ४.१. टीका

मराठी महाभारतकार – जसे, श्रीधर ( पांप्र १।२६७,२६८ ) – आपल्या रचनेस टीका म्हणताना दिसतात. " टीका व्यासाची मोटकी । कथा वनितांमाजीं नेटकी " ( १।४८।८६ ) किंवा " मुक्तेश्वर कवि भारत । टीका प्रांजळ व्यक्त । जेवी वेदांचा मथितार्थ । श्रुतीपुराणे बोलली " ( २।१।१४ ) असे मुक्तेश्वरांनीही आपल्या रचनेला टीका म्हटले आहे. मुक्तेश्वरी भारताचा टीका असा उल्लेख देवदासांच्या संत-मालिकेत व महीपतीच्या भक्तलीलामृतातही आढळतो.

नाथभागवत, हरिवरदासारख्या ग्रंथांत आधी संस्कृत श्लोक व नंतर त्याचे विवरण किंवा स्पष्टीकरण करणाऱ्या मराठी ओव्या असा लेखनक्रम दिसतो. भावार्थ रामायणासारख्या कथात्मक ग्रंथातही नाथांनी जागोजाग संस्कृत श्लोकांचे आधार दिले आहेत. टीकात्मक ग्रंथरचनेशी जुळणारे हे स्वरूप आहे. पुराणिकाच्या भूमिकेशीही त्याचा संबंध जोडता येईल. संस्कृत पुराणवाङ्मयाच्या श्रवणाचे आर्त असलेला पण मूळ संस्कृत ग्रंथ स्वतंत्रपणे समजून घेऊ न शकणारा असा श्रोतृवर्ग समोर असल्याने पुराणिकाला मुळातील क्लिष्ट कल्पना करणे, पारिभाषिक शब्दांची फोड करणे, श्रोत्यांची अभिरुची लक्षात घेऊन उचित संक्षेप – विस्तार करणे, संभाव्य शंकांचे निरसन करणे इकडे अवधान देणे भाग होते. याच श्रोत्यांसाठी लिहिणाऱ्या ग्रंथकारांनाही ही भूमिका स्वीकारावी लागली. त्यामुळे कथा व भाष्य यांचे मिश्रण होऊ लागले. कथाभाष्याचे हे रूप वामन पंडितांच्या स्फुटकाव्यात स्पष्टपणे प्रतिबिंबित झाले आहे. त्यांच्या लेखनातील विस्तार कथा निवेदनामुळे झालेला नसून त्या कथाप्रसंगात अनुस्यूत असलेल्या अध्यात्माच्या स्पष्टीकरणामुळे झालेला आहे.

मुक्तेश्वरी भारतातही असा भाग येतो. नारदनीती ( २।३।१–१५० ) ही अशा लेखनविशेषाचा नमुना आहे. तिच्यातील तीर्थ, स्वपक्षपंचदश अशा पारिभाषिक शब्दांची मुक्तेश्वरांनी सविस्तर उकल केली आहे. " आपपराचे बळाबळ इहीसीं चौद भेद कुशळ । बोलती हे गूढ प्रांजळ । करुनि तूतें दाविले " ( २।३।४३ ) यासारख्या उद्गारातून त्यांची अर्थविशदीकरणाची भूमिका व्यक्त होते. या भूमिकेमुळेच विवेचनाच्या ओघात आलेल्या कठीण शब्दांचे अर्थ " सावित्र म्हणिजे हस्तनक्षत्र " ( १।३१।१०६) अशा पद्धतीने स्पष्ट करणे त्यांना आवश्यक वाटते. ( जसे, १।२९।६९, १।३०।२१३, १।३५।८०, २।१।१९, २।१४।५७ ) " पर्वतप्राय विशाल रथु । यालागी नामे बृहद्रथु "

( २।६।५ ) अशी लोकप्रसिद्ध व्युत्पत्ती देण्याची लकब त्यांच्या लेखनाला स्पष्टीकरणाचे, विशदीकरणाचे म्हणजे टीकेचे रूप देऊन जाते. श्रीराम यमसभेत असल्याचे मूलानुसार सांगितल्यावर नाना कल्पनांनी श्रोत्यांचे शंका निरसन केल्याशिवाय ( २।४।५८–६३ ) त्यांना राहवत नाही. असा स्पष्टीकरणात्मक विस्तार ( जसे १।१९।११४, १।४।११८ ) टीकारूप लेखनाचा दर्शक आहे.

" विवृतपदपदार्थवाक्यार्थन्यायम् " या लक्षणावर उतरणाऱ्या काटेकोर भाष्यापेक्षा येथील टीकेची कल्पना निराळी आहे. मूळाचे विशदीकरण एवढाच अर्थ त्यांना अभिप्रेत असावा. " व्यास बोलिला गूढार्थ । म्याही न बोलता प्रगटार्थ । चतुर श्रोतियांचे चित्त । संतोषेल कैसेनि ? " ( २।३।७४ ) यावरून व्यासांचा गूढार्थ सांगण्याची त्यांची भूमिका स्पष्ट होते. प्रगटार्थाच्या या आग्रहामुळे ( १।१७।११, २।१७।१२ ) स्पष्टीकरणाचा, विवरणाचा भाग त्यांच्या भारतात येतो. निसर्ग, वास्तु, वस्त्रे, क्रीडा, भोजन, विवाह यांसारख्या वर्णनस्थलांचा व्युत्पत्तिदर्शक विस्तार, देवता–तीर्थे यांसारख्या पवित्र गोष्टींचा निर्देश आला तरी सविस्तर महिमा वर्णिणे आणि कथानुरोधाने अध्यात्म स्पष्ट करणे या टीकारूप लेखनाच्या निदर्शक प्रवृत्ती कमीअधिक प्रमाणात मुक्तेश्वरी भारतात दिसतात पण या लेखनातील तो एक त्रिमुकला प्रवाह आहे, एवढेच. त्यामुळे भाष्यात्मक काव्यकथेचा रूपबंध प्राप्त व्हावा. एवढे त्याचे बळ नाही.

## ४.२. भाषांतर

मुक्तेश्वर आपल्या भारतास टीका म्हणतात आणि त्याचा एक अर्थ " भाषांतराने केलेले अर्थविवरण " असा आहे. " व्यासवचन संस्कृत । त्याचेंचि हें प्राकृत " ( २।५।१८१ ) यात मूलानुसरणाच्या वृत्तीबरोबर भाषांतररूपाचीही जाणीव प्रकटली आहे. ( आणखी पहा, ३।१।१५९, ३।१०।२०५, ४।१।८ ).

असा भाषांतरात्मक भागही मुक्तेश्वरी भारतात आहे. ११० श्लोकांची नारदनीती १४९ श्लोकांत मुक्तेश्वर वर्णितात. त्यांतील ४८ ओव्या भाषांतरित आहेत. या उलट जेथे भाषांतरित भाग अत्यल्प आहे अशा वस्त्रहरण-प्रसंगासारख्या रसपूर्ण भागाचाही निर्देश करता येईल. वैचारिक भागात वा युक्तिवादपूर्ण संभाषणात भाषांतरसदृश भागाचे प्रमाण वाढते व भावपूर्ण भागात ते क्षीण होते, असे म्हणता येईल. शब्दशः भाषांतर मुक्तेश्वर क्वचित करतात. भाव व भाषा यांचे भान ठेवून विविध पद्धतींनी ते स्वैर भाषांतर करतात. मूलानुसरणाची भूमिका व भारतग्रंथ समोर ठेवून केलेली रचना यामुळे मुक्तेश्वरी भारतात भाषांतरित भाग आला. त्यामुळे विष्णुदास नामा किंवा कथाकल्पतरू-कार यांच्यापेक्षा मुक्तेश्वर मूलसदृश प्रत्यय अधिक प्रमाणात देतात, हेही येथे नोंदविले पाहिजे.

एकूण विस्ताराच्या तुलनेने अशा भाषांतरात्मक भागाचे प्रमाण अल्प आहे. "मुक्तेश्वरांची भारतीरचना १४०६३ ओळी आहे... याच पर्वात भारताची श्लोकसंख्या २६१५०च्या वर आहे.... ह्या संख्याभेदावरून हा निर्णय लागतो की ही भाषांतरे नव्हेत...मुक्तेश्वरी भाषांतरांचे परिगणन केल्यास ती संख्या ३१०० ओवी भरते...ही गणना अगदी थोडा सुद्धा जिला भाषांतराचा वास येतो अशा ओव्यांची आहे. वस्तुतः कित्येकांना तर ती भाषांतरेही वाटणार नाहीत...मुक्तेश्वरी भाषांतराचे प्रमाण ९:२ आहे. आता ज्या ग्रंथात $\frac{1}{5}$ भाग भाषांतरसदृश वाटतो आणि $\frac{4}{5}$ भाग स्वतंत्र आहे, त्याला भाषांतर म्हणून ठरविता येईल काय? "[१७] असा योग्य प्रश्न नांदापूरकरांनी विचारला आहे.

भाषांतरित भागातील गौणप्रधानता, अपरिहार्यता, रचनासामर्थ्याच्या अभावाने आलेला भाग, मूलसौंदर्याच्या मोहाने उतरलेला भाग आणि भाषांतर करावयाच्या हेतूने व आवडीने उतरलेला भाग यांचा विचार केला असता मुक्तेश्वरी भारतास भाषांतर म्हणता येणार नाही. भाषाभेदाशिवाय अन्य सर्व बाबतींत समकक्ष असलेल्या रचनेलाच भाषांतर म्हणता येईल. मुक्तेश्वरी भारतात अल्पप्रमाणात भाषांतरित भाग असला तरी ती व्यासभारताशी समकक्ष रचना नव्हे, म्हणून तिला भाषांतर म्हणता येणार नाही.

### ४.३. अनुवाद

मुक्तेश्वर आपल्या भारतास "भारतकथानुवाद" (२।६।१६४) असेही म्हणतात. अनुवाद या शब्दाचा अर्थ "एका ग्रंथाच्या आधारे रचलेला दुसरा ग्रंथ" हा प्रसिद्ध आहे. या स्थूलार्थाने मुक्तेश्वरी भारतास अनुवाद म्हणता आले तरी त्याच्या स्वरूपवेधास ते फारसे साहाय्यक ठरणारे नाही.

"अनुवाद आणि भाषांतर हे शब्द समानार्थक म्हणून अनेक वेळा शैथिल्याने वापरले जातात. पण अनुवाद म्हणजे भाषांतर नव्हे. संक्षेप-विस्तारांचा उपयोग करून स्वतःच्या शब्दांनी सांगितलेली मूळ कथा म्हणजे अनुवाद होय. केवळ शब्दांतर म्हणजे अनुवाद नव्हे, ते भाषांतर होईल"[१८]. याच अर्थाने मोरोपंती भारतास व अनुषंगाने मुक्तेश्वरी भारतास रा. श्री. जोगांनी अनुवाद म्हटले आहे. ते पुढे म्हणतात, "भाषांतर करणेच केव्हा अवघड असते, स्वैर अनुवाद करणे सोपे असते.... म्हणजे अधिक अवघड काम करण्याचे श्रेयही अशा कवीस मिळणार नाही ... "भाषांतऱ्ये" या आक्षेपाचा नेमका अर्थ...अशा कवीच्या ठिकाणी स्वतंत्र प्रतिभा किंवा अपूर्ववस्तु-

---

१७. ना. गो. नांदापूरकर, "मुक्तमयूरांची भारते", पूर्वोक्त, पृ. ४३५.

१८. रा. श्री. जोग, (संपा.) "मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड तिसरा," पुणे, १९७३, पृ. २४१.

निर्माणक्षमता नसते अशा सूचनेचा असतो, आणि मराठी कवी भाषांतऱ्ये नसून अनुवादकर्ते होते असे म्हटल्यानेही हा आक्षेप समूळ निरस्त होऊ शकणार नाही.... प्राचीन मराठीच्या काळातील, काव्यरचनेविषयीची कल्पना येथे विचारात घेतली पाहिजे ....पौराणिक कथांचा आधार घेऊन आपण आपल्या शब्दांनी ती कथा सांगावयाची अशीच त्यावेळची रूढ समजूत होती"[१९] नरेंद्र-भास्कर, एकनाथ-मुक्तेश्वर-मोरोपंत यांची रचना या प्रकारची आहे. असे ते सुचवितात.

इतक्या नेमकेपणे नसले तरी याच अर्थाने द. गो. दीक्षितांनी मुक्तमयूरांना, "प्रसाधक कवी" म्हटले आहे. "....प्रसाधक याचा अर्थ दुसऱ्याला सजविणारा, त्याच्या अंगावर भूषणे घालणारा असा आहे व या कवींच्या कृतीचे परीक्षण केल्यास त्यांना हीच पदवी देणे योग्य आहे असे दिसून येईल. या प्रसाधक किंवा भूषणकार कवीचे काम म्हणजे वाग्देवतेच्या अंगावर उपमा, उत्प्रेक्षा, रूपक वगैरे सुंदर अलंकार चढवायचे एवढेच होय...प्रसाधक कवींच्या काव्यात सरस वर्णने पुष्कळ आढळतील, चटकदार सुभाषिते वारंवार येतील व जोरदार भाषणांनीही आपले चांगले मनोरंजन होईल. परंतु कालिदास, शेक्सपियर, होमर किंवा मिल्टन यांच्या ग्रंथात दिसून येणाऱ्या व महाकवीला शोभणाऱ्या कित्येक गुणांचा अभाव त्यात चांगलाच भासल्यावाचून राहणार नाही."[२०] स्वभाव वर्णन प्रसंगीच्या कोमल भावना, वर्णनाच्या नाजुक छटा, औचित्यविचार, कालविपर्यासादी दोषांचा अभाव, सौंदर्यदृष्टी, पात्रांना पृथक व्यक्तिमत्व देणे हे महाकवीचे गुण प्रसाधक कवींजवळ नाहीत, असे त्यांनी म्हटले आहे[२१].

हा अवमूल्यनात्मक रोख टाळून पण हाच भाव किंचित गौरवपर उक्तींनी बनहट्टींनी व्यक्तविला आहे ते मुक्तमयूरांच्या भारतांना भाषांतरच मानतात. पण "ते भाडोत्री भाषांतर नसून वर्ण्यविषयाशी तादात्म्य होऊन स्वयंस्फूर्तीने अंतःकरणापासून निघालेले वाङ्मय होय. यास्तव मुक्तमयूरांना भाषांतरे म्हणणे योग्य नव्हे"[२४] असे ते शेवटी सांगतात.

"अनुवाद", "प्रसाधक कवी" किंवा "तादात्म्याने केलेले स्वयंस्फूर्त भाषांतर" असे हे शब्द वेगवेगळे असले व मांडणीत किंचित फरक असला तरी स्थूलमानाने या सर्व समीक्षकांची भूमिका समान वाटते.

---

१९. रा. श्री. जोग (संपा.) "मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड ३," पूर्वोक्त, पृ. २४२.

२०. द. गो. दीक्षित. "श्रीमुक्तेश्वरांचे महाभारत (आदिपर्व)." धुळे, पृ. ३७–३८.

२१. तत्रैव, पृ. ३८–४९.

२४. ना. गो. नांदापूरकर. "मराठी महाभारतांचे स्वातंत्र्य", मुंबई, १९५६, पृ. १२ वरून उद्धृत.

संक्षेप-अवक्षेप व मूलकथेचे स्वशब्दकथन हे अनुवादविशेष मुक्तेश्वरी भारतात आढळतात, हे खरे. पण त्याबरोबरच विस्तार, स्वतंत्र निर्मिती, वेगळे आविष्कारतंत्र व स्वकालोचित परिमाणाने बदललेला कथाआशय याही गोष्टी त्यात आहेत. या प्रक्रिया अनुवादाच्या कक्षेत राहणाऱ्या नसून स्वतंत्र रचनेकडे झुकलेल्या आहेत. त्या लक्षात न घेता मूळ भारतकथेवर आलंकारिक साज चढविणारे प्रसाधक कवी म्हणून त्यांचा उल्लेख योग्य वाटत नाही. मुक्तेश्वरांच्या नवनिर्मितीचे क्षेत्र केवळ अलंकारविलासापुरते मर्यादित नाही. महाभारताच्या गाभ्यावरही संस्कार करणारी ही प्रतिभा आहे. म्हणून श्रेष्ठ दर्जाचे भाषांतर म्हणूनही मुक्तेश्वरी भारताकडे पाहता येत नाही.

### ४.४. स्वतंत्र निर्मिती

"भाषांतरे" म्हणून मुक्तमयूरांच्या भारतास हिणविणाऱ्यांचा प्रतिवाद नांदापूरकरांनी[२५] समर्थपणे केला आहे. असे म्हणून त्यांनी आपला हल्ला प्रतिपक्षाच्या गोटातच नेला आहे. संस्कृतचा आशय मराठीत सांगताना "ग्रंथसंख्या" वाढते. पण मराठी महाभारतांची ग्रंथसंख्या तुलनेने कमी आहे. त्यात अध्याय, उपपर्व विभाजन स्वीकारलेले नाही. भाषांतरित भागाचे प्रमाण अधिकात अधिक एकचतुर्थांश आहे. या बाह्यांग परीक्षेवरून मुक्तमयूरांची भारते भाषांतरे नव्हेत. अंतरंग-परीक्षा केल्यास त्यांच्या स्वतंत्रत्वाच्या खुणा सापडतात. कथासूत्र महाभारतातून घेतले असले तरी ती कथा त्यांनी संक्षेपविस्ताराने व विशिष्ट गौणप्रधानभाव ठरवून सांगितली. व्यासांपेक्षा वेगळ्या भूमिकेने कथा निवेदन केले. त्यामुळे महाभारतापेक्षा मराठी महाभारतांचा वाचकमनावर भिन्न संस्कार होतो. त्यांचे व्यक्तिचित्रण भारतभिन्न व स्वकालाने रंगलेले आहे. मुळातील मानवी व ऐतिहासिक पात्रांना त्यामुळे अर्धदैवी, अर्धमानवी आणि दैवी रूप आले आहे. मुळातील वैचारिक भागाचा त्यांनी संक्षेप केला आणि स्वकालीन विचार बेमालूमपणे गुंफले. अलंकारांचा भावनिदर्शनासाठी प्राचुर्याने उपयोग करून त्यांनी मुळातील साध्या भावनांना गुंतागुंतीचे रूप दिले. मूळ महाभारताप्रमाणेच त्यावरील टीका, तत्संबद्ध संस्कृत ग्रंथ व त्यावर आधारलेले प्राकृत ग्रंथ यांचाही त्यांनी आधार घेतला आहे. "नवनिर्मितीसाठी कथानक नवेच असले पाहिजे हे म्हणणे दुराग्रहमूलक आणि अज्ञानमूलक आहे. एवंच, आमच्या मराठी काव्यात, मुक्तेश्वरांच्या भारतात आणि मोरोपंतांच्या आर्याभारतातही पृथगात्मता आहे, नवनिर्मिती आहे, वास्तवच ती स्वतंत्र कृती आहेत"[२६] असा नांदापूरकरांचा अभिप्राय आहे.

---

२५. ना. गो. नांदापूरकर, "मुक्तमयूरांची भारते" : पूर्वोक्त : उन्मेष सातवा, "भाषांतर की स्वतंत्र ?" पृ. ४३१–४५४. हीच चर्चा किंचित फेरफाराने "मराठी महाभारताचे स्वातंत्र्य" : पूर्वोक्त त्यांच्या स्वतंत्र पुस्तिकेत समाविष्ट झाली आहे.

२६. ना. गो. नांदापूरकर, "मुक्तमयूरांची भारते" पूर्वोक्त : पृ. ४५१.

मराठी महाभारतातील भक्तिप्रधान दृष्टी, कृष्णाचे केन्द्रवर्ती स्थान, अन्य ग्रंथांचा कथासजावटीसाठी घेतलेला आधार आणि सामाजिक परिस्थितीचे त्यात उमटलेले प्रतिबिंब यामुळे त्यांना स्वतंत्र कृतीचे रूप आले आहे, असे व. वि. पारखे यांना वाटते. मराठी कवींनी कथाभागात बदल केले, कधी रचनास्वातंत्र्य घेतले. व्यक्तिचित्रण " असेल तसे " पेक्षा " पाहिजे तसे " रंगविले. शांतरसप्रधान महाभारतास विविध रसांचे रूप दिले. " अतएव, या सर्व प्राकृत महाभारताविष्कारांना निःसंदिग्धपणे स्वतंत्र कलाकृती मानणेच इष्ट ठरेल, ठरावे "[२७] असे पारख्यांनी सुचविले आहे.

मराठी महाभारतांची पृथगात्मता वरील दोन्ही अभिप्रायांतून व्यक्त होत असून ती विचारार्ह आहे. तथापि त्यातील भाषांतरात्मक भाग, भाषात्म वळण, अन्य आधार, कथानकाचे स्थूल सूत्र हेही असा निष्कर्ष काढताना दृष्टिआड करण्यासारखे नाहीत या कवींनी वेगळ्या भूमिकेवरून भारत सांगितले तरी भारतकथा सांगणे आणि व्यासानुसरण करणे हाही त्या भूमिकेचाच एक भाग होता, हेही विसरता येत नाही. स्वयंपूर्ण अस्तित्व लाभावे एवढे बळ मराठी महाभारतकारांच्या निर्मितीशीलतेत नाही. कोणतीही स्वतंत्र कलाकृती स्वयंभू असते आणि तिचे आकलन स्वतंत्रपणे करून घेता येते. मराठी महाभारतांचा अभ्यास मात्र संस्कृत भारताच्या रिंगणात राहूनच करावा लागतो. त्यांना स्वतंत्र कृती मानणाऱ्या नांदापूरकर–पारख्यांनीही तो तसाच केला आहे. ही एकच गोष्ट त्यांच्या स्वतंत्रत्वाची लक्ष्मणरेषा मानणारी आहे.

### ४.५. आख्यानपद्धतीचे रूपांतर

या प्रश्नाचा समंजस विचार मांडताना भगवंत देशमुख म्हणतात, " मराठीतील प्रदीर्घ कथात्मक रचना म्हणजे रामायण, महाभारत वा अन्य आधारित ग्रंथांचे तंतोतंत भाषांतर नव्हे हे खरे. परंतु स्वतंत्र निर्मिती म्हणूनही त्यांच्याकडे पाहणे कठीण वाटते ... एकनाथांपासूनच्या या कवींनी रामायण-महाभारतासारख्या आर्ष महाकाव्यांना भक्तीच्या रंगाने रंगविण्याचा प्रयत्न केला...ही प्रवृत्ती एकनाथ व श्रीधरात अधिक, मुक्तेश्वरात तुलनेने कमी व मोरोपंतात सर्वात कमी आढळते. साहजिकच मुक्तेश्वरी वा मोरोपंती भारतात मूळ महाभारताचा ठसा अधिक जाणवतो. मात्र एकूण या प्रवाहाचा विचार केला तर पुराणकथेची ही प्रेरणा सर्वत्र आढळते असे म्हणावयास हरकत नाही. या प्रदीर्घकथात्मक रचना म्हणूनच मूळ रामायण-महाभारताचे तंतोतंत अनुवाद किंवा भाषांतरे नव्हत, तर पौराणिक भक्तिमार्गी दृष्टिकोणातून घडलेली ती रूपांतरे आहेत असे

---

२७. व. वि. पारखे, " श्रीमद्व्यासभारताचे मराठी आविष्कार ", पदवीप्रबंध ( टं. लि. ), मुंबई विद्यापीठ; १९६३, पृ. ५२०.

म्हणावेसे वाटते. "[२८] महाभारताचे वाङ्मयीन वैभव जाणून किंवा मौखिक महाकाव्य-प्रकाराच्या जाणिवेने हे कवी पुढे आले नाहीत. भक्तिभावनेनेच त्यांनी अनुवाद केले. त्यामुळे " या सर्व अनुवादांचे स्वरूप महाकाव्याचे नसून आख्यानक काव्याचे आहे "[२९] असा द. भि. कुलकर्णींचा अभिप्राय आहे. अनेक भक्तिहेतूंच्या मिश्रणामुळे या महाभारती रचनांना सुदीर्घ आख्यानांचे स्वरूप आले आहे. असा ओझरता निर्देश व. दि. कुलकर्णीही[३०] करतात.

एकूण मराठी महाभारतांच्या संदर्भात केलेली ही विधाने स्थूलमानाने स्वीकार्य आहेत. तथापि मुक्तेश्वरांच्या संदर्भात मात्र तशी नाहीत. द. भि. कुलकर्णी म्हणतात त्याप्रमाणे मुक्तेश्वरी भारत अनुवादरूप नव्हे. हे मागेच स्पष्ट केले आहे. अनुवाद व स्वतंत्र निर्मिती या दोन टोकांतील ही रचना आहे, हे देशमुखांचे म्हणणे योग्य आहे. पण ते म्हणतात तसे मुक्तेश्वरी भारत रुपांतरही नव्हे. रुपांतरातून सूचित होणारे वाङ्मयप्रकारांतर त्यात नाही. हे सर्वच समीक्षक केवळ भक्ति-हेतूमुळे त्यास आख्यानकाव्यात गणितात. तथापि वाङ्मयप्रकाराचें रुप असे निव्वळ आशयविशिष्ट मानता येणार नाही. भक्तिहेतू मुक्तेश्वरी-भारतात आहे पण त्याकडे पाहण्याची त्यांची नजर केवळ भक्तिमार्गी प्रचारकाची नाही तर अस्सल कवीची आहे. अध्यात्माचे जोखड मध्ययुगीन मराठी कवितेवर आहे, असा आजवरच्या समीक्षेचा पर्वसमज आहे. कलाकृतीवरील असे बाह्य नियंत्रण तिचा डौल बिघडून टाकते, हेही खरे आहे. पण त्याबरोबर हेही लक्षात घ्यावयास हवे की जातिवंत कवीला कोणत्याही विषया-प्रमाणे अध्यात्म वा भक्ती यांचे वावडे असत नाही. या प्राचीन मराठी कवितेनेच भक्तीला रसाची प्रतिष्ठा दिली. ज्ञानदेवीत हेच अध्यात्म कवित्वाचे लडिवाळ रूप घेऊन उभे आहे. मुक्तेश्वरांच्या कवितेतही अध्यात्म वा भक्तीला असेच वाङ्मयरूप आले आहे. विषय कोणताही असो — वीर, शृंगार वा भक्ती—त्याकडे पाहण्याची मुक्तेश्वरांची दृष्टी कवीची आहे. अन्य मराठी कवींपेक्षा मुक्तेश्वरांचे वेगळेपण यातच आहे. आर्ष महा-काव्याचे अंतःसत्व जपण्याची धडपड मुक्तेश्वरांत विशेषत्वाने दिसते. त्यामुळे केवळ भक्तिप्राधान्यामुळे मुक्तेश्वरी भारताला आख्यानात्मक वळणाचे रूपांतर म्हणता येणार नाही.

---

२८. भगवंत देशमुख, " प्रदीर्घ काव्ये ", " मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड ३," संपा. रा. श्री. जोग, पूर्वोक्त, पृ. १२४–१२५.

२९. द. भि. कुलकर्णी, " महाकाव्य : स्वरूप व समीक्षा," नागपूर, १९७५. पृ. १२५.

३०. व. दि. कुलकर्णी–वा. रा. ढवळे, " मराठी कविता : प्राचीन कालखंड," मुंबई, १९६९, निवेदन, पृ. ६.

## ४.६ पुनर्विचाराची आवश्यकता

मुक्तेश्वरी भारतात भाषात्म वळणाचा भाग आहे पण ते "भारथटीका" वा कथा-भाष्य नव्हे. त्यात भाषांतरात्मक भाग आहे पण ते भाषांतर नव्हे. पण त्याच्या घडणीत अनुवाद-रूपांतराच्या प्रक्रिया दिसतात पण ते अनुवाद वा रूपांतर नव्हे. त्यात अनेक ठिकाणी स्वतंत्र निर्मितीचा अढळ होतो पण ती स्वतंत्र रचना नव्हे. या सर्व पूर्वमतांत सत्यांश आहे पण पूर्ण सत्य नाही. त्याच्या शोधार्थ मुक्तेश्वरी भारताच्या स्वरूपाचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे.

□ □ □

# ब ॥ मुक्तेश्वरी भारतस्वरूपाचा पुनर्विचार : दिशा व आधार

## एक ॥ भारतकथासंक्रमणाची मुक्तेश्वराची भूमिका

मुक्तेश्वरी भारताच्या पुनर्विचाराची एक दिशा मुक्तेश्वरांच्या मनोगतात सापडण्याची शक्यता आहे. व्यासभारताचे आकलन व अवतरणप्रक्रियेची भूमिका प्रसंगानुरोधाने त्यांच्या भारतात प्रकटली आहे.

साठ लक्ष भारतापैकी एक लक्ष मनुष्यलोकी राहिले. हरिवंशासह सव्वालक्षांच्या या भारतात ८८०० कूट श्लोक आहेत. अठरा पर्वांत ते विभागलेले आहे. व्यासशंकराची ही कथागंगा वैशंपायन भगिरथाने आणली. व्यासांबरोबर वैशंपायन व सौती यांचा भारतास हातभार लागला. अशी महाभारताची पारंपरिक माहिती ( १।१।११३–१२० ) त्यांनी नोंदविली आहे.

" वेदशास्त्र स्मृति पुराणें । नाना इतिहास व्याकर्णे " ( १।१।८६ ) यांचा गाळीव अर्क म्हणजे महाभारत. " शब्दार्थब्रह्माची सकळार्थसिद्धि " असल्याने येथे नाही ते कोठेच नाही. महाभारताची व्यापकता व सर्वसंग्राहकता मुक्तेश्वरांना मोलाची वाटते. म्हणून ते त्यास " सर्वार्थसार " ( १।१३।१२४ ). " पंचमवेद " ( १।१।११० ) म्हणतात. " इतिहासरूपे अगस्ति " ( १।१।१९१ ) असा भारताच्या " इतिहास "-रूपाचा ते निर्देश करतात.

महाभारताचे वाङ्मयीन अंगही त्यांनी ठसठसशीतपणे वर्णिले आहे. " उन्मेषमुखाते झडाडे । व्यासघन बोळला विश्वचाडे " अशा प्रतिभेच्या अनावर वर्षावातून महाभारत अवतरले. ब्रह्मांडआगटीत व्यासमुशीतून वाहणारा भारतकनकरस उन्मेषवन्हीने झळाळत आहे ( १।४५।१६१ ). ही " स्वर्लोककल्लोलिणी कथा " ( २।७।१३८ ) म्हणजे लोकतारक चरित सांगणारा कथाक्षीरनिधीच ( १०।१।११,१३१ ) आहे. भारतकथेची ही अमृतवेल नवरसांच्या फुलांनी आणि मोक्षसुखाच्या फळांनी लगडून जाते. ( १।२८।१२४ ). नाना आख्यानांच्या चौकड्यांनी सजलेले, मऊशार सुताचे, नवरस-रंगाने ठसठशीत दिसणारे हे अठरा हाती वस्त्र ( १।१३।४४–४५ ) आहे. " ग्रंथग्रहगणी प्रभाकर । भारत साहित्यरत्नाकर " ( १।१५।१५९ ) अशी भारताची वाङ्मयीन श्रेष्ठता ते वर्णितात. " ऐकतां जे जे कामना ज्यातें । ते ते पूर्ण होय येथे " ( १।१३।४० )

असे हे "सकळ ग्रंथांचे कुळदैवत" ( १।१०।११९ ) आहे, अशा श्रद्धेने महाभारताचे महिमान त्यांनी गायिले आहे. त्यातून महाभारताची व्यापकता, सर्वसंग्राहकता, इतिहासरूप, सकलकामनाफलदायित्व, अध्यात्मस्पर्शित साहित्यरूप आणि वाङ्मयीन वैभव प्रकटले आहे. मुक्तेश्वर महाभारताकडे आकर्षित झाले ते यामुळे.

व्यासभारताचे अमृतोदक महाराष्ट्रशब्दाच्या कूपिकेत साठवण्याची ( ४।१।८ ) मुक्तेश्वरांची मनीषा आहे. संस्कृत भारत भाषाभेदाने सांगण्याची ही भूमिका आहे.[1] "कलंकरेखेस्तव चांदणे। काय चकोरी वाळिजे ?" ( २।१।२० ) असा आलंकारिक अनुनय भाषाभेदाच्या संदर्भातच त्यांनी केला आहे. देशभाषेच्या स्वीकारात कधी लीनता ( २।८।१६३–१६४ ), कधी नर्म विनोदपर उनोक्ती ( २।उप. ४. ५. ), कधी आत्मविश्वास ( २।१।२१ ) तर कधी युक्तिवाद ( १।१।८६–९३ ) यांच्या छटा येतात. तरी त्यांच्या प्राकृत पुरस्कारात भाषाभेद, सांस्कृतिक भेद यांची न्यूनपूर्ण जाणीव अधिक आहे. वस्तुतः मध्ययुगीन, प्रादेशिक संस्कृतीच्या युगप्रवृत्तीचा परिपोष लोकभाषांनी केला. ज्ञानरक्षण आणि आकलनसुलभता या दुहेरी हेतूने मराठीचा पुरस्कार मुकुंदराजापासून मोरोपंतांपर्यंतच्या मराठी कविपरंपरेने केला आहे. मुकुंदराज-ज्ञानदेवांनी तो नम्रतेने पण आत्मविश्वासपूर्वक केला. चक्रधर–नागदेवाचार्यांनी तो एका ध्येयनिष्ठेने केला. नाथांनी आपल्या जीवनात हा संघर्ष अनुभविला आणि अभिनिवेशपूर्वक रंगविला. दासोपंतांनी मराठीचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करून हा लढा प्रतिपक्षाच्या गोटात जसा नेला तसा या प्रश्नाचा औरसचौरस विचार समंजसपणे प्रकट केला. या पार्श्वभूमीवर तुलनेने मुक्तेश्वरांनी केलेला मराठीचा पुरस्कार काहीसा दबकत केल्यासारखा वाटतो.

भाषाभेदाने भारत सांगण्याचे उद्दिष्ट असल्याने "व्यासानुसरणा"ची भूमिका[2] यांनी घेतली आहे. द्विभुज नारायण, एकानन विरंची, अभाळलोचन महेश अशी त्रिमूर्ती ( १।१३।११८–११९ ) त्यांना व्यासांच्या ठायी दिसते. व्यासदेवे, कवींचा नाथ, चातुर्याचा उदधी हे त्यांनी केलेले व्यासनिर्देश आदरभावनेने भिजलेले आहेत. "व्यासवैशंपायन सौति। तिघा मुखींचे उच्छिष्ट क्षिती। सांडले ते स्वल्पमति। स्वीकारुनि अनुवादे" ( १।२०।१७६ ), "...व्यासकविता श्रीभगवती। मातृकारूपे माझी मति। पाठी चाले परिचर्ये।" ( १।१६।२२२ ), "मुक्तेश्वरकवीची वाणी।

---

१. १।१।८६–९३, २।१।१९–२३, २।५।८१, २।८।१६३–१६४
२।उप ३–५, ३।१।१५९, ४।१।८.

२. आदि. १६।२२२, १९।१९६, २०।१७६, २७।२३०, २८।४०, ३६।१५९, ३७।१०८, ४२।११५, ४९।१४८ सभा, १।१३–१४, ४।१५०–१५१, ५।१८१, ६।१६३–१६४, ७।११०, १२।२५२, १३।८०, १५।२९१, उप ८, वन १।१५९, २।९०, १०।२०५, विराट ७।१०३, सौप्तिक १।१३०, २।१३८, उप २.

व्यासाश्रयें चामके " ( ३।२।९० ), " व्यास सद्गुरू पुढारा। पाठीं चाले मुक्तेशगिरा " ( ४।७।१०३ ), "...साक्षीलागी व्यास। उभा असे जवळिके " ( ३।१०।२०५ ), असा व्यासानुसरणाचा मनोदय त्यांनी व्यक्तविला आहे. कधी पुनरुक्ती ( २।४।१५०-१५१ )वा विस्तार झाला ( २।१२।२५२ ) तर व्यासानुसरणाकडे बोट दाखवून ते मोकळे होतात ! " सांडूनि व्यासांची संगती। चालो नये आणिके पंथी " (२।१२।२५२) या भूमिकेमुळे स्वैर रचनास्वातंत्र्य घेणाऱ्या " प्राकृत कवींच्या वाग्जल्पाचा " निषेधही[३] त्यांनी केला आहे. "...व्यास वदला जैसिया रीती। मीही बोलिलो श्रोतियांप्रति। तदाधारे पंडित हो " ( १।२७।२३० ) असे आपल्या " पंडित " श्रोत्यांना ते वारंवार बजावतात. पंडूचे देहदहन वनात की हस्तिनापुरी, यासंबंधात " मूळ भारतामाजी जाण। संदेहग्रस्त निरोपण " ( १।२८।३८ ) असल्याने " असो व्यास वदला जैसें। तुम्हीही श्रवण करा तैसें। कवित्वा दूषण ठेविजे ऐसें। कारण काही असेना " ( १।२८।४० ) असा ते आवर्जून खुलासा करतात. याचा एक अर्थ, मुळावेगळे सांगणे मुक्तेश्वरांच्या श्रोत्यांना दूषणास्पद वाटत होते असा आहे. श्रोत्यांची मूलानुसरणाची अपेक्षा पुरविणाऱ्या आदि-सौतिकात ग्रंथदूषकांचा धिक्कार नाही, रचनास्वातंत्र्य घेणाऱ्या वन-विराटात तो आहे. मुक्तेश्वरी भारतावरील समकालीन टीकेचा हा एक मुद्दा लक्षात घेतला पाहिजे. व्यासानुकरणाचे व श्रोते पंडित असल्याचे निर्देश आधिक्याने आदि-सभा-सौतिकात आहेत, वन-विराटात ते विरळ आहेत. तेथील श्रोते पंडित असण्यापेक्षा संतसज्जन अधिक आहेत. कदाचित या बदलत्या श्रोतृसमूहामुळे आदि-सौतिकात व्यासानुसरण करणारे मुक्तेश्वर सभा-वन-विराट या क्रमाने रचनास्वातंत्र्याकडे झुकले असावेत. तरीही मूलानुसरणाचे हे भान मुक्तेश्वरपूर्व परंपरेत नवे आहे. कथा-कल्पतरुकारांनी त्याचा उच्चार ( ५।१३।१९-२० ) केला असला तरी आचार क्वचितच केला. मुक्तेश्वरांनीही पूर्णत्वाने मूलानुसरण केले नसले तरी पुष्कळांशाने केले व मुळाची मर्यादा संभाळून रचनास्वातंत्र्य घेतले. त्यामुळे पूर्वरचनेपेक्षा अधिक स्पष्टतेने व्यास-भारताचा ठसा त्यांच्या रचनेवर उमटला आहे.

महाभारतासारख्या बृहद्ग्रंथाचे कथन करताना त्या विषयीचे काही एक पूर्वनियोजन मुक्तेश्वरांच्या मनी जागे असलेले दिसते. सर्पजन्मप्रसंगी त्यांची नावे सांगण्याचे टाळून " तरी प्रसंगीं ग्रंथीं येतील पुढें " ( १।४।३३ ) असे आश्वासन ते देतात. पुढे शौनकाच्या प्रश्नाचे उत्तर सांगून ( १।७।१-१० ) ते पूर्ण केले आहे. " देश विदेश वदावे येथ। तरी सहज सभापर्वा आंत। बोलणें असे समयोचित। राजसूयप्रसंगी ॥१७॥ याचिलागी या अवसरा। विशाळ वक्तृत्ववाग्दोरा। सांवरुनि जवं माघारा। केला उन्मेष तुरंग " ( १।१५।१७-१८ ) असे एका भागाचे कथन करताना समग्र भारताचे भान त्यांच्या मनी जागे आहे. " पुढे दुर्योधन विषादी। पुढती चातुर्याचा उदधी। त्यास

३. १।४१।७२-७३, २।७।६१, ३।१।५८.

वदेल म्हणोनि शब्दी । संक्षेप केला ये काळी " ( २।८।१६५ ) येथे सभापर्वाच्या बाराव्या अध्यायातील दुर्योधनविषादाचा रसपूर्ण भाग विस्तारणार असल्याने आठव्या अध्यायातील दिग्विजयाचा वृत्तात्मक भाग संक्षिप्त केल्याचे ते सांगतात. हा संक्षेपविस्तार पूर्वनियोजित पण प्रमाणबद्धतेच्या दृष्टीने उचित आहे. यावरून मूळ भारतकथेचे पर्व-अध्यायातील विभाजन, त्यातील निवेदनात्मक भागाचा संक्षेप व रसपूर्ण भागाचा विस्तार हे स्थूल सूत्र आणि संक्षेपविस्तारातील प्रमाणबद्धता याविषयीचे पूर्वनियोजन मुक्तेश्वरांच्या मनात सदैव जागे असावे, असे दिसते.

व्यासानुसरणाची भूमिका घेऊनही महाभारताच्या अतिप्रचंड विस्तारामुळे ते जसेच्या तसे सांगणे शक्य नव्हते. विस्ताराने श्रोत्यांना विवर्तात पडल्यासारखे होईल. (१।१।९७), अतिप्रसंग होऊन ( १।११।३ ) त्यांना उबग येईल. ( १।१२।१६–१७ ). विस्ताराने कथासरितेस महापूर येऊन निरुपणात पायगोवा निर्माण होईल. ( २।२।९३–९५ ), असे त्यांना वाटत राहते. व्यासोक्त जितकी तीर्थे " तितकी सांगतां सविस्तर । दुजें भारत होऊ पाहे । " म्हणून " यालागी श्रेष्ठ एकदोनी " ( ३।९।२४-२५ ) सांगण्यावर भागवावे लागते. विस्तृत वर्णने आली की " वन विस्तारुनी न वदवे " ( ३।१०।३१ ) असे म्हणून ते पुढे जातात. या काव्यनिष्ठ कारणांबरोबरच " मार्कंडेय ऋषींची समस्या । सविस्तर बोलता कुरूनरेशा । आयुष्य न पुरे तेथें आशा । कैंची पुढील कथेची " ( ३।११।७ ) असा वृद्धापकाळाचा धसका त्यांच्या मनात विस्तारभय निर्माण करतो.

भारतकथा विस्तृत असल्याने " सविस्तर न ये पाल्हाळितां " आणि ती अमृतवर्षाविणी असल्याने " कथा न ये गाळितां " असा हा पेच आहे. त्यामुळे " थोडेन सांग संपादी " ( १।१।९७–९९ ) असा मार्ग मुक्तेश्वरांना चोखाळावा लागला आहे. " ऐसें कवीच्या एके बोलें । चतुर श्रोती जाणिजे " ( १।२७।२१२ ) अशी विस्तारशील पुनरुक्ती टाळण्यासाठी श्रोत्यांच्या चातुर्याची केलेली भलावण संक्षेपमहती पटल्याची खूण आहे. " थोडेन बहुत विवळे मना " ( १।१४।१६४ ) असा आपल्या कथनाचा विशेष त्यांनी आवर्जून सांगितला आहे. या " संकलित अनुवादा "मुळे ( २।२।९३–९५ ) त्यांचे भारत व्यासभारताचा " सारांश गोडु " ( २।१।१९ ) झाले आहे. विस्ताराची अव्यवहार्यता, कथेचा बांधीवपणा टिकविणे आणि संक्षेपात समग्र सार आणणे अशी निरुपणाची तीन सूत्रे त्यांनी सांगितली आहेत.

भारतकथा सांगताना मुक्तेश्वरांचा पाय कधी " आडमोहरा " ( ४।७।१०३ ) पडला आहे तर कधी " सांगता वांकडे " ( २।७।११० ) गेले आहे. त्यामुळे व्यासानुसरण, तेही संक्षेपाने, ही भूमिका असूनही मुक्तेश्वरी भारतात नवतेचे विस्तारशील उन्मेष प्रकटले आहेत. मूलाधार नसलेल्या भक्तकथांचा समावेश द्रौपदीधाव्यात ( ३।११। ५४–९४ ) करून ते वक्तृश्रोतृसंवादातून त्याचे समर्थन करतात. " कोणी म्हणती असाक्ष असें । हें कृष्णेंचि लिहविलें असें । प्रत्यक्ष वर्तलें जें विशेष । तें आवडे

वर्णितां || ९० || जें कां लोपलें पुराणीं | तें प्रकट करावया तुझी वाणी | प्राकृत बोलती ते जनीं | अभक्तपंक्ती मानावें || ( ३|११|९०–९१ ). आपण पुराणाच्या लुप्तभागातील आशय प्रकट करीत आहोत, ही मुक्तेश्वरांची भूमिका " अर्थे लोपली पुराणे " या तुकारामांच्या उद्‌गारात पुन्हा प्रकटली आहे. ग्रंथप्रामाण्याशिवाय आपल्या निर्मितीला प्रामाण्य यावे, म्हणून मुक्तेश्वर कृष्णाची साक्ष काढतात. लोकपरंपरेला ग्रांथिक परंपरेत प्रस्थापित करण्याच्या या प्रयत्नात नवनिर्मिती झाली आहे. " व्यास वाढता जगातें | ग्रास लाधला जीर्णकवीतें | त्याचे मुखीचीं उच्छिष्ट शिते | म्यां दुर्बळे वेचिली " ( २|५|१७५ ) या उद्‌गारात पूर्वकवी या पूर्वकाव्यपरंपरा यांच्या ऋणाची कबुली व नवनिर्मितीच्या विस्ताराची एक दिशा आहे. कधी भक्तीच्या भावावेशात ते स्वतंत्र विस्तार करतात. " जेणे वाढे उत्कट भक्ती | तो तो विशेष लिहिला ग्रंथी " असे प्रांजलपणे सांगून " नावडे ते स्वहस्ती | खोडूनि दूर करावे " ( २|९|१६५ ) असे स्वातंत्र्यही श्रोत्यांना देतात. कधी महाभारताच्या प्रचंड विस्तारातील निसटते धागे " सांगो विसरला व्यासकवी | परी म्यां स्मरण दीधले " ( २|१६|१३० ) अशा लडिवाळ सलगीने ते सांधून घेतात. पूर्वपरंपरा, भक्ती, उत्कटता, कथासंगती या नवविस्ताराच्या दिशा त्यांनी सुचविल्या आहेत.

भारतश्रवणसुखाच्या गंगाजीवनी मुक्तेश्वरवाणी स्नानसंकल्प सांगते ( १|३९|९९ ), अशी भारत व श्रोते यात ते मध्यस्थाची भूमिका ( १|७|१३८, १|३५|१५३ ) घेतात. स्वतःचा व व्यासांचा ते अनेकदा " कवी " म्हणून उल्लेख करतात. आपल्या महाभारताच्या संदर्भात भारताचे भावात्म व चिंतनात्म, लौकिक व अलौकिक स्वरूप ( २|१|१५–१८ ) त्यांनी वर्णिले आहे. " भारत इक्षुदंड सुरस " त्याचा " हस्तघाणा " म्हणजे मुक्तेश्वरी भारत ( ४|६|१७८–१८० ). भाषांतर ( ४|१|८ ), अनुवाद ( २ | उप ८ ), टीका ( २|१|१४ ), कथा ( २|३|१५४ ), काव्य ( २|१|१८ ) अशा निरनिराळ्या अंगांनी ते आपल्या महाभारताकडे पाहतात. त्यांच्या एकसंध मेळात मुक्तेश्वरी भारताचे स्वरूप प्रतिबिंबित झाले आहे. आपले भारत व्यासकृतीचे वाङ्मयीन संस्करण आहे, असे ते या सगळ्या उल्लेखातून सुचवितात. " भारतकथा-संक्रमणी | निरोपणरूपे तीळवणी | वाटिता म्हणतसे अवदानी | लाहाणे असो श्रोतयां " ( २|३|१५३ ) अशी त्यामागील भारतकथासंक्रमणाची प्रक्रिया ते मकरसंक्रमणाच्या गोड रूपकाने सांगतात. आणि " व्यासग्रंथगिरीचे सोने | संस्कृत खोटिये गाळूनि मने | देशभाषा घडिले लेणे | साहित्यरत्नीं सुजडित " ( २|१|२१ ) असे तिच्या फलप्राप्तीकडे संतोषाने पाहतात. ऊस लाडू, सोने-लेणे ही उपमानयोजना गुळाला अधिक गोड व सुंदर करणाऱ्या संस्करणांचे सूचन करीत आहे. या संस्करणातून मुक्तेश्वरी भारताचा स्वरूपवेध घेता येईल. त्यासाठी संस्कृत भारताच्या तुलनेने मुक्तेश्वरी भारताचे संस्कारित विशेष न्याहाळावयास हवेत.

त्याआधी तुलनीय संहितांची निश्चिती केली पाहिजे.

## दोन || तुलनीय संहितांची निश्चिती

### १. मुक्तेश्वरी भारताची संहिता व प्रकाशन

मुक्तेश्वरी महाभारत त्याच्या शुद्ध स्वरूपात आपल्याला उपलब्ध नाही. उपलब्ध प्रतींत ओव्यांचे क्रमांतर, वर्जन व आधिक्य दिसते. ओवीतील चरण-अपपाठांनी दूषित आहेत. शाब्दिक अपपाठ तर वैपुल्याने आढळतात. त्यामुळे अयुक्त अर्थ, संदर्भहीनता, दुर्बोधता यासारखे दोष निष्पन्न होतात. " ...अपपाठांनी दूषित झालेले याच्या काव्याचे विकृत स्वरूप पाहिले म्हणजे मुसलमानांनी छिन्नभिन्न केलेल्या सुंदर प्राचीन मंदिराची आठवण होते. "[४]

प्रमाणप्रतीच्या अनुपलब्धीचे भान मुक्तेश्वरी अभ्यासात असणे अवश्यक आहे. अर्थात अभ्यासाच्या सोयीच्या दृष्टीने एखादी प्रत प्रमाण मानणे भाग आहे.

१८५४ च्या नवनीताच्या पहिल्या आवृत्तीत " शकुंतलाख्यान " व " जरासंधवध " ही काव्यें प्रसिद्ध करून परशुरामपंत तात्यांनी मुक्तेश्वरी भारताचे अंश प्रथमच मुद्रितरूपात लोकांसमोर ठेवले. " सर्वसंग्रहा "तून मुक्तेश्वरी आदिपर्व क्रमशः प्रसिद्ध करणाऱ्या माधव चंद्रोबांनी १८६५ मध्ये ते स्वतंत्र ग्रंथरूपाने प्रसिद्ध केले. त्या आधारावर " काव्यसंग्रहा "त १८९० पासून ते क्रमशः प्रकाशित होऊ लागले व १८९३ मध्ये वा. दा. ओकांची संपादित आवृत्ती ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाली. सर्वसंग्रहकारांपेक्षा काव्यसंग्रहकारांना आदिपर्वाच्या आणखी एक-दोन हस्तलिखित प्रती उपलब्ध झाल्या. त्या आधारे ग्रंथाच्या शेवटी त्यांनी पाठांतरे नमूद केली आहेत. लेखनपद्धतीनुसार काव्यसंग्रहकारांनी पुष्कळच फेरफार व संस्करण केले आहे. आदिपर्वाच्या मूलस्थापनेचा एक महत्वाकांक्षी प्रयत्न प्रियोळकरांचा[५] आहे. आदिपर्वाची २९ हस्तलिखिते त्यांनी मिळविली. निर्णयसागरी प्रत " व्हलगेट " कल्पून प्रतिनिधिक व निर्दिष्टकाल अशा ११ हस्तलिखितांच्या आधारे आदिपर्वाची चिकित्सक संहिता त्यांनी सिद्ध केली. हस्तलिखितांचे संकलन, वर्गीकरण, त्यांचा वंशवृक्ष, पाठचिकित्सा आणि मुळाचे पुनर्स्थापन या पाठचिकित्साशास्त्रातील साऱ्या प्रक्रिया शास्त्र व व्यवहार यांची सांगड घालीत त्यांनी यशस्वीपणे हाताळल्या आहेत. त्यामुळे काव्यसंग्रहप्रतीतील अपपाठ व प्रक्षेप दूर होऊन दुर्बोध स्थळे कमी झाली. महाभारतापेक्षा बदल असलेल्या स्थळांची संख्याही काव्यसंग्रहप्रतीपेक्षा प्रियोळकर-प्रतीत कमी झाली आहे. त्यामुळे आदिपर्वाबाबत प्रियोळकर-प्रत प्रमाण मानली आहे.

---

४. द. वा. पोतदार, भा. इ. सं. मं. त्रैमासिक, वर्ष २३, पृ. ९४-९५.

५. " मुक्तेश्वर कृत महाभारत, आदिपर्व, खंड १-४, " संपा. अ. का प्रियोळकर, मराठी संशोधन मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई. १९५१-१९५९.

परशुराम गोडबोल्यांनी " शुद्ध " केलेले मुक्तेश्वरी सभापर्व माधव चंद्रोबांनी १८६३ मध्ये " सर्वसंग्रहा "तून प्रसिद्ध केले. सभापर्वाच्या तीन अपूर्ण व चार संपूर्ण अशा सात हस्तलिखितांच्या आधारे वा. दा. ओकांनी " काव्यसंग्रहा "तून १८९४ मध्ये " सभापर्व " प्रसिद्धिले. तीन त्रुटित आणि एक पूर्ण प्रत मिळवून द. सी. पंगूंनी " सभापर्व " १९४९ मध्ये संपादित केले. तथापि स्वीकृत हस्तलिखितांचे स्वरूप, त्यांचे प्रामाण्य, संपादनपद्धती याविषयी त्यांनी विशेष सांगितलेले नाही. पाठभेदचर्चेत संशोधकाची अनाग्रही वस्तुनिष्ठ भूमिका स्वीकारण्याऐवजी उचितानुचित व प्रस्तुताप्रस्तुत-विवेक वाङ्मयीन अंगाने प्रबळ झालेला दिसतो. त्यामुळे " पाठशुद्ध प्रत " हा त्यांचा दावा अस्वीकार्य ठरतो. सर्व संग्रह-प्रत प्रमाण मानून अन्य चार हस्तलिखितांचे पाठभेद नोंदवून वि. म. कुलकर्णींनी १९४९ मध्येच सभापर्व प्रसिद्धिले. तौलनिक सूक्ष्म अभ्यास व मुक्तेश्वरचरित्राविषयक वेधक निष्कर्ष याद्दष्टीने ते महत्वाचे आहे. तथापि स्वीकृत सर्वसंग्रहप्रतीचे अपपाठग्रस्त रूप आणि पाठभेदांचा आधार असलेल्या हस्तलिखितांचा अनिर्देश यामुळे याही प्रतीस प्रमाण मानता येत नाही. चिकित्सक प्रतीच्या अभावी ज्येष्ठता व सर्वपरिचितता यांचा विचार करून सभापर्वाची काव्यसंग्रह-प्रत ( १८९४ ) प्रमाण मानली आहे.

" वनपर्वा "ची काव्येतिहाससंग्रह-प्रत ज. बा. मोडकांनी १८७९ मध्ये प्रसिद्ध केली. " हरिश्चंद्राख्याना "च्या समावेशनामुळे या प्रतीची विश्वसनीयता धोक्यात येते. वा. दा. ओकांनी काव्यसंग्रहातून वनपर्व १८९८ मध्ये " हरिश्चंद्राख्यान " वगळून प्रसिद्ध केले. द. सी. पंगूंची वनपर्वाची प्रथमावृत्ती १९४१ मध्ये व द्वितीयावृत्ती १९४६ मध्ये प्रसिद्ध झाली. सभापर्वासंबंधी केलेले विवेचन वनपर्वाच्या आवृत्यांनाही चरितार्थ होणारे असल्याने वनपर्वाची काव्यसंग्रह-प्रतच ( १८९८ ) प्रमाण मानली आहे.

मुक्तेश्वरी " विराटपर्व " माधव चंद्रोबांनी सर्वसंग्रहातून १८६७ मध्ये प्रसिद्धिले. काव्यसंग्रहातून १८९९ त त्याची प्रथमावृत्ती व द्वितीयावृत्ती दा. के. ओकांच्या संपाद-कत्वाखाली १८३९ मध्ये प्रसिद्ध झाली. द. सी. पंगू ( १९५३, पुनर्मुद्रण १९६५ ) व भालचंद्र खांडेकर ( १९६५ ) यांनीही विराटपर्व संपादित केले आहे. काव्यसंग्रहाच्या द्वितीयावृत्तीत ( १९३९ ) दा. के. ओकांनी हस्तलिखितांच्या आधारे अपपाठांचे शुद्धिकरण करण्याचा परिश्रमपूर्वक प्रयत्न केला असल्याने तीच प्रत येथे प्रमाण मानली आहे.

मुक्तेश्वरी सौप्तिकपर्व दा. के. ओकांनी काव्यसंग्रहात " महाराष्ट्र कविवर्य मुक्तेश्वर-कृत स्फुटकाव्ये " ( १९०६ ) या ग्रंथातून ( पृ. ८०–१२८ प्रसिद्ध केले. वि. का. राजवाड्यांनी दिलेल्या दोन व वि. ल. भावे, ल. रा पांगारकर यांजकडून मिळालेल्या एक-एक अशा चार प्रतींवर ओकांचे संपादन आधारलेले आहे. सौप्तिकाचे हे एकमेव प्रकाशनच येथे प्रमाण मानले आहे.

येथील आदिपर्वाचे संदर्भ प्रियोळकरी-प्रतीप्रमाणे व सभा-वन-विराट ( द्वितीयावृत्ती १९३९ )-मौक्तिक यांचे संदर्भ काव्यसंग्रहप्रतीप्रमाणे दिले आहेत. आवश्यक तेथे पाठभेदांचा विचार हस्तलिखितांच्या आधारे करून तसे नोंदविले आहे.

## २. मुक्तेश्वरांपुढील संस्कृत भारतप्रतीचा शोध

महाभारत हा बृहद्ग्रंथ वेगवेगळ्या अवस्थांतरातून गेलेला असल्याने त्याच्या अनेकानेक प्रतींचा एकमेकांशी ताळमेळ जमत नाही. त्यामुळे मुक्तेश्वरांसमोरील भारत-प्रतींचा शोध घेणे तौलनिक अभ्यासाचे अनिवार्य पथ्य ठरते.

नांदापूरकरांनी मुक्तमयूरांच्या महाभारताची मुळाशी तुलना करताना गणपत कृष्णाजींची प्रत वापरली. ही प्रत नीलकंठी प्रतीइतकीही विश्वसनीय नाही.[६] असा सुखटणकरांचा अभिप्राय आहे.

काव्यसंग्रहकारांपासून वि. म. कुलकर्णी, द. सी. पंगू यांच्यापर्यंतच्या अभ्यासकांनी नीलकंठी-प्रतीशी मुक्तेश्वरी भारताची तुलना केली आहे. नीलकंठ हा महाभारताचा बहुश्रुत, विद्वान पण अर्वाचीन टीकाकार आहे. त्याची आदिपर्वावरील टीका शके १६०९ म्हणजे इ. स. १६८७ ची असल्याचे गोड्यांनी सांगितले आहे. नीलकंठ स्वतःच १७ व्या शतकाच्या चवथ्या चरणातील असल्याने त्याची " भारतभावदीपिका " १८ व्या शतकापूर्वी क्वचितच लिहिली गेली असावी, असे सुखटणकरांचे[८] मत आहे. मुक्तेश्वरी

---

६. " The well-known Pothi from Bombay editions ( Published by Ganapat Krishnaji in Saka 1799 and Gopal Narayan in 1913 and others ) which include Nilkantha's Scholium, are supposed to represent Nilkantha's text, but they contain many readings and lines which are not to be found in the Nilkantha's manuscripts, and are therefore not wholly reliable ". V. S. Sukthankar, " Adiparvan ", Prolegomena PP CIV.

७. P. K. Gode, " Nilkantha Chaturdhar, The Commentator of the Mahabharat—His Genealogy and Descendands " Raprinted from the Silver Jubilee Volume of the Annals of the B. O. R. I., Poona 1942 P. 146-161.

८. V. S. Sukthankar, " Adiparvan ", Prolegomena PP VI–VII.

कालाबद्दल वाद असला तरी त्यांची भारतरचना शके १५७२ ( इ. स. १६५० )च्या आधीची असल्याचे सर्वमान्य आहे. याचा अर्थ असा की, नीलकंठाची टीका अवतरण्यापूर्वी मुक्तेश्वरांचे देहावसान झाले होते. त्यामुळे मुक्तेश्वरी भारताच्या तौलनिक अभ्यासात नीलकंठ प्रत अप्रस्तुत ठरते.

मुक्तेश्वरांसमोरील भारतप्रतीचा शोध घेण्याचे एक उत्कृष्ट साधन भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिटस्टयूटने प्रसिद्ध केलेल्या महाभारताच्या चिकित्सक आवृत्तीच्या रूपाने उपलब्ध आहे. इ. स. १२००–१८४२ या काळातील हजाराहून अधिक हस्तलिखिते, देवबोध–विमलबोध–सर्वज्ञनारायण-अर्जुनमिश्र–नीलकंठ हे महाभारताचे टीकाकार, क्षेमेंद्राची भारतमंजिरी, वादिराजाचे तेलगू भाषांतर आणि जावाच्या आसपास प्रचलित असलेले भारत या साधनसंभारातून ही आवृत्ती सिद्ध झाली आहे. आपल्याला या नव्या आवृत्तीने जे दिले, ते संपादकांना मिळालेल्या सर्वांत जुन्या आवृत्तीत आढळते ते ! इ. स. १००० ला महाभारताचे जे स्वरूप होते ते संशोधित प्रतीमुळे आपल्यासमोर आले आहे. पुढील विवेचनातील महाभारताचे संदर्भ या चिकित्सक–प्रतीप्रमाणे[१] दिले आहेत. "मूळ" किंवा "महाभारत" या संज्ञेने मुख्यतः भांडारकर प्रत—तिची पुनर्स्थापित संहिता व चिकित्सक साधने—अभिप्रेत आहेत. जेथे कोठे महाभारताची वेगळी प्रत वापरली आहे तेथे तिचा स्पष्ट संदर्भ दिला आहे.

भांडारकर-प्रतीबरोबर आपण मुक्तेश्वरी भारत वाचू लागलो की काही ठिकाणी मुक्तेश्वर मुळापेक्षा वेगळे सांगत असल्याचे दिसते. हा वेगळा भाग संशोधित प्रतीत नोंदलेल्या पाठभेदात व परिशिष्टांत शोधला तर महाभारताच्या कोणत्या पाठपरंपरेशी जुळणारी प्रत मुक्तेश्वरांसमोर असावी, या प्रश्नाचा उलगडा करता येईल. असा प्रयत्न

---

१. "The Mahabharata," edited by V. S. Sukthankar ( 1925–43 ) S. K. Belvalkar, ( 1943– ), Bhandarkar Oriental Research Institute, Poona.

Vol. I Adiparvan ( 1 ) ed. V. S. Sukthankar ( 1933 )

Vol. II Sabhaparvan ( 2 ) ed. F. Edgerton ( 1944 )

Vol. III & IV Aranyakaparvan ( 3 ) ed. V. S. Sukthankar ( 1942 )

Vol. V Virataparvan ( 4 ) ed. Raghu Vira ( 1936 )

Vol. XII Sauptikaparvan ( 10 ) ed. H. D. Velankar ( 1948 )

प्रत्येक पर्वापुरता स्वतंत्रपणे करून मग त्यांचा एकमेकांशी ताळमेळ जमतो की काय ते पहायला हवे. लिपीकारांनी महाभारताचे प्रत्येक पर्व स्वतंत्र मानल्याने प्रत्येक पर्वाच्या संपादनातील अडचणी वेगळ्या असतात आणि भारती हस्तलिखितांचे संबंधही वेगळे असतात. त्यामुळे प्रत्येक पर्वाचा असा सुटा विचार केला पाहिजे. पुढील विवेचनात हस्तलिखित प्रतींची संकेताक्षरे संशोधित प्रतीप्रमाणे वापरली आहेत.

आदिपर्वाच्या संदर्भात असा एक प्रयत्न पानसे[१०] यांचा आहे. संशोधित संहितेपेक्षा वेगळा असा मुक्तेश्वरोक्त भाग कोणकोणत्या ठिकाणी आढळतो, त्याची नोंद करून त्यांनी के ४ ही मुक्तेश्वरांसमोरील भारतप्रतीच्या पाठ्यपरंपरेतील प्रत असावी असे म्हटले आहे. पानसे यांनी ४५ स्थळांपैकी ४५ टिकाणी के ४ व ४१ ठिकाणी डी ४ ही प्रत जुळत असल्याचे म्हटले आहे. तथापि त्यांनीच दिलेल्या सर्व स्थळांची काळजीपूर्वक गणना केली असता के ४ ४८ ठिकाणी व डी ४ ४७ ठिकाणी जुळत असल्याचे दिसते. त्यात केवळ डी ४ मध्येच आहेत अशी २ स्थळे आहेत. के ४ अनुपस्थित पण डी ४ सहमत असल्याची ४ स्थळे आहेत. केवळ डी ४ मध्येच आहेत अशी आणखी दोन स्थळे स्वतंत्रपणे पुढीलप्रमाणे नोंदविता येतील— अर्जुनाचा शोध घेण्यासाठी द्रुपदाने स्वयंवरात मत्स्ययंत्राचा पण लावला ( मुभा. १।३९।७९-८० मभा. १ परि १। क्र. ९४), द्रौपदी हत्तीवर बसून स्वयंवरमंडपात आली ( मुभा. १।४१।३१, मभा १। परि १ क्र. ९८ ). त्याचप्रमाणे अर्जुनाच्या यतिवेषाचा निर्देश ( मुभा १।३७।९२ मभा १। परि १ क्र. ११४ ) डी ४.५ या प्रतींतच सापडतो तो के ४ मध्ये नाही. के ४ चा काळ शके १६१६ असा मुक्तेश्वरोत्तर आहे. डी ४ चा काळ दिलेला नाही. के ४ ही काश्मिरी प्रतीशी संलग्न अशा देवनागरी लिपीतील प्रतींच्या गटातील प्रत आहे. डी ४ ही त्याशिवाय अन्य देवनागरी प्रतींच्या गटातील प्रत आहे. दोन्ही प्रतींच्या समासात अधिकच्या मजकूरांच्या भरपूर नोंदी असून त्यावर दाक्षिणात्य प्रतींचा स्पष्ट प्रभाव आहे. के ४ व डी ४ या प्रतींत किरकोळ तपशीलाशिवाय कोणताच मूलभूत भेद नाही. यावरून के ४ इतकीच किंवा अधिकच डी ४ ही मुक्तेश्वरांच्या संस्कृत भारताच्या पाठ्यपरंपरेतील प्रत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अन्य पर्वाचा विचार करता मुक्तेश्वरी संस्कृतभारत प्रत डी गटात शोधणे अधिक इष्ट ठरावे.

सभापर्वाची या दृष्टीने पाहणी करता चिकित्सक संहितेत नसलेला पण चिकित्सक साधने व परिशिष्टात सापडणारा मुक्तेश्वरी भाग पुढीलप्रमाणे नोंदविता येईल.

---

१०. M. G. Panse, " Episodical variants in Marathi versions of AdiParvan as compared with the Critical Text, " Annals of B. O. R. T. Volume XXV, 1944-45. PP. 188-216.

| मुक्तेश्वरी सभापर्व काव्यसंग्रह प्रत | महाभारत सभापर्व-संशोधित प्रत |
|---|---|
| २।२।१२०–१२७ नारदवर्णन | परि. १ क्र. २ $S_1$ $K_1$ – 3 $N_1$ सोडून सर्व प्रती |
| २।३।१३० सद्दा अनर्थ | पृ. ३४* ७७ $V_1$ $B_{1\cdot6}$ $D_4$ $G_1$ |
| २।३।१०० कोपवेग ऋषिनाम | पृ. १७ टी. १४ Dn $D_{1\cdot6}$ $K_4$ $B_{4\cdot6}$ |
| २।२।१०३ धर्मसभेतील राजे जयसेन | पृ. १८ टी २३ K ( $K_2$ OM ) D ( except $D_4$ ) $N_1$ $V_1$ B ( except $B_{2\cdot4}$ damaged ) |
| २।२।१०७ सुकर्मा | पृ. १८ टी. २३ $B_1$ Dn |
| २।२।१०७ क्रमजित | पृ. १९ टी. २५ $B_5$ $Dn_1$ $D_{3\ 5\cdot6}$. |
| २।२।१०७ सुदर्शन | पृ. १८–१९ टी. २५ $B_{3\cdot5}$ $Dn_1$ $D_{3\cdot5\cdot6}$ |
| २।२।१०३ कमट | पृ. १७ टी–१९ $K_4$ $Dn_{1-2}$ $D_{1\cdot2\cdot3\cdot5\cdot6}$ $B_{1\cdot2\cdot5}$ $N_1$ $V_1$ |
| २।५।१५४–१५६ जरासंध मथुरेत गदा फेकतो | पृ. ९७* १९७ $V_1$ B D S ( $T_1$ $G_{1-5}$ M OM. lines 1-2 $G_6$ OM. $lines_{1-3}$ |
| २।५।३९–४० पंडुचा निरोप | पृ. ६४*१४२ $V_1$ B D |
| २।६।४३–४४ जरेचे स्वकथन | पृ. ९४ * १८५ $V_1$ B D |
| २।६।९४ मागधपूर वर्णन | पृ. १०४ * २०६ S ( $G_{1-6}$ $M_{1-2}$ ) |
| २।६।१०९–११३ त्रिवर्ग–जरासंध प्रथमभेट | पृ. १०७ * २२१ Dn ( ! ) $D_{3-4}$ |
| २।७।९–१३ जरासंध भीमास निवडतो | पृ. ११६ * २४१ * २४२ $K_2$ $D_{2\cdot4}$ $B_{1-6}$. |
| २।७।१७–५९ मल्लयुद्धाचे पाचपेच | परि. १ क्र. ७ $K_1$ $V_1$ B D $G_3$ |
| २।८।१० अर्जुनाने जिंकलेले राजे–कुलिंद | पृ. १२८ टी. १४ $S_1$ N $V_1$ $B_{1-3\cdot5\cdot6}$ Dn $D_{1-5}$ |
| २।८।२० विश्वगश्व | पृ. १३१ टी–१३ $S_1$ $K_{2\cdot4}$ $D_{3\cdot5}$ |
| २।८।२४ ऋषिक | पृ. १३२ टी. २५ $N_1$ $V_1$ B $Dn_1$ $D_{1\cdot3\cdot4\cdot5}$. |
| २।८।९३-९८ नीलकन्या-अग्नी प्रणय | पृ. १४५ * २९९ $V_1$ B D |
| २।८।१०९–११४ अग्निस्तवन | परि. १ क्र. १४ $V_1$ BD |
| २।८।१४३ आक्रोश-नृपनाम | पृ. १३२ * ३१६ $V_1$ $B_8$ D ( except $D_6$ ) |

| मुक्तेश्वरी सभापर्व काव्यसंग्रह प्रत | महाभारत सभापर्व—संशोधन प्रत |
|---|---|
| २।१०।८५ शिशुपालाचे भाषण | पृ. १७३ टी. ३ $K_4$ B Dn $D_{2\cdot4\cdot5}$ |
| २।१०।८८ शिशुपालाचे भाषण | परि. १ क्र. १९ $K_4$ $V_1$ B Dn $D_{1\cdot2\cdot3\cdot5}$ |
| २।१०।९९ शिशुपालाचे भाषण | पृ. १७४ * ३५४ $K_4$ $V_1$ B D ( $D_4$ om )$G_3$ |
| २।१०।११९–१२२ नारदभाषण | पृ. १८० * ३६३ Dn $D_{1\cdot4\cdot5}$ |
| २।११।२३–२५ शिशुपाल-भाषण | परि १ क्र. २३ $V_1$ B D (except $D_4$ )G |
| २।११।५१ शतापराध झाल्याचे कृष्णोत्तर | पृ. २०३ * ४०१ $K_4$ Dn $D_{3\cdot4\cdot5}$ |
| २।१२।७–३७ व्यासांचे भविष्यकथन | परि १ क्र. ३० $K_{2-4}$ Dn $D_{4\cdot5}$ |
| २।१२।३८ धर्माची चिंता | परि १ क्र. ३० $K_{-2-4}$ Dn $D_{4\ 5}$ |
| २।१२।५४ मयसभेत दुर्योधन फजिती | पृ. २११ * ४२४ $K_4$ $V_1$ D |
| २।१२।५५ मयसभेत दुर्योधन फजिती | पृ. २११ * ४२४ $K_4$ $V_1$ D |
| २।१२।५६,१३३ भीमाचा टोमणा | पृ. २३० * ४५८ $N_1$ $V_1$ $B_4$ Dn $D_{1\cdot4}$ |
| २।१२।६० रागावलो तर शिशुपालासारखे होण्याची दुर्योधनाची भीती | पृ २२९ * ४५५ Dn $D_4$ |
| २।१२।१३४–१३६ दुर्योधनाचा मृत्यु निश्चय | पृ २३० * ४५० $T_1$ $G_{3-5}$ |
| २।१२।१४४–१४५ दुर्योधन भाषण | पृ. २४१ * ४७७ NS |
| २।१३।३–९ शकुनीचा सल्ला | पृ. २५२ * ४९४ $K_4$ Dn $D_{3\cdot6}$ |
| २।१६।४ दुःशासन भाषण | पृ. ३२७ * ५७७ $K_2$ |
| २।१६।१७ अनुद्यूतविरोधक-गौतम | पृ. ३२९ टी २५ $K_{2-3-4}$ Dn |
| २।१६।३२ कनकमृगामागे धावणाऱ्या रामाप्रमाणे पांडव सभेत येतात | पृ. ३३२ * ५८३ $K_4$Dn $D_{4\cdot5}$ |
| २।१६।१००–१०१ विदुराविषयीचा आदर | पृ. ३४२ * ५९४ $K_4$ $V_1$ B $D_{1-6}$ T |
| २।१६।१२३ कुंतीचा सहदेवासाठी विलाप | परि १ क्र. ४३ in all Mss. except $N_1$ $G_{1\cdot2}M_{6-2}$ |
| २।१६।१२५–१२६ कौरवस्त्रियांचा शोक | पृ. ३४८ * ६०० N ( except $N_1$ ) |
| २।१६।१२७ नगरजन-भीष्मद्रोण-शोक | परि १ क्र. ४३ $T_1$ $G_{3-5}$ |
| २।७।५४–५५ जरासंधाचे पाय धरून भीमाने दोन तुकडे केले | पृ. १२० * २५६ Dm $D_{4\cdot5}$ * २५७ $K_{2\cdot3}$ $D_6$ |

दक्षिणपरंपरेतील ( एस ) टी, ( ७ ) जी १ ( ७ ) जी २ ( ६ ), जी ३ ( ११ ), जी ४ ( ९ ), जी ५ ( ९ ), जी ६ ( ६ ) एम १ ( ६ ), एम २ ( ५ ) अशा प्रती फार थोड्या ठिकाणी सहमत होताना दिसतात. जरासंधवधाच्या ज्या वृत्तांताचा मुक्तेश्वरांनी निषेध केला ( २।७।६०-६१ ) तो वृत्तांत जी ३ ( २।परि. १ क्र. ८ )मध्ये सापडतो. ही दाक्षिणात्य प्रत पाहण्यात आली असती तर असे निषेधाचे सूर मुक्तेश्वरांनी काढले नसते. मुक्तेश्वरांनी सांगितलेली २७११ ही सभापर्वाची श्लोकसंख्या ( २। उप ७-८ ) दाक्षिणात्य प्रतींशी जुळत नाही. दाक्षिणात्य शास्त्रीप्रतीची श्लोकसंख्या ४५११ असून चिकित्सक सभापर्वापेक्षा ती २००० श्लोकांनी अधिक आहे. शिशुपालवधप्रसंगी भीष्मांनी गायिलेला कृष्णमहिमा १०० पृष्ठे व्यापणारा असून एकूण भागाच्या १।६ इतका आहे. दक्षिणपरंपरेतील ह्या प्रती मुक्तेश्वरांसमोर असत्या तर कृष्णचरित्र-गायनाची ही संधी त्यांनी सोडली असती काय ? हा केवळ संधी डावलण्याचा प्रश्न नाही. इतका मोठा भाग नामनिर्देश न करता गाळणे मुक्तेश्वरांच्या " व्यासानुसरणा "-च्या भूमिकेत बसणारे नाही. सभापर्वात संपूर्ण वर्जनाचा वापर मुक्तेश्वर क्वचितच करतात, हेही येथे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे दक्षिणप्रती क्वचित ठिकाणी मुक्तेश्वरी रचनेशी सहमती दाखवीत असल्या तरी त्या मुक्तेश्वरांसमोर नसाव्यात, असे सभापर्वा-बाबत तरी म्हणता येते.

उत्तर परंपरेतील ( एन ) उत्तर-पश्चिम गटातील ( डब्ल्यु = एस-१, के १-४ ) एस-१ ( ५ ) फार थोड्या ठिकाणी सहमत होते. के १ ( ५ ), के २ ( १० ) के ३ ( ८ ) यापेक्षा के ४ ( २१ ) ही प्रत अधिक सहमत होताना दिसते. ही के ४ प्रत एन व्ही बी डी या प्रतींचा पुष्कळ भाग उचलते, हे लक्षात घेतले की तो डी गटातील प्रतींचा प्रभाव मानता येईल.

उत्तर परंपरेतील ( एन ) उत्तर-पूर्व गटातील ( इ = एन १ व्ही १ बी डी ) एन १ ( ६ ) फार थोड्या ठिकाणी सहमत होते. व्ही १ ( २३ ) बी १ ( २२ ) बी २ ( १९ ), बी ३ ( २१ ), बी ४ ( १९ ), बी ५ ( २२ ), बी ६ ( २१ ) या प्रती बऱ्याच प्रमाणात सहमती दर्शवितात. बी व डी प्रतीत नियमित साम्य आहे तर व्ही १ ही स्वैरपणे कधी बी तर कधी डी प्रतींशी सहमत होते. त्यामुळे व्ही १ व बी प्रतींची सहमती हाही डी प्रतीचा प्रभाव मानता येईल. व्ही १ मैथिली व बी ही बंगाली लिपी-तील प्रत आहे. एस १ ही शारदा लिपीतील प्रत आहे. के ही काश्मिरी देवनागरी लिपीतील प्रत आहे, हेही या संदर्भात लक्षात ठेवले पाहिजे.

डी एन ( २४ ), डी १ ( २६ ), डी २ ( २२ ), डी ३ ( २७ ), डी ४ ( २९ ), डी ५ ( ३१ ), डी ६ ( २१ ) अशा डी गटातील प्रती सर्वाधिक सहमती दर्शवितात. उत्तरपरंपरेतील उत्तर-पूर्व गटातील के शिवाय अन्य देवनागरी प्रतींचा हा गट आहे. या गटातील डी एन, डी १.२ हा उपविभाग बी प्रतीशी जुळता तर डी ४.६ हा उप-विभाग एस १, के शी अधिक जुळता आहे, हे लक्षात घेतले की मुक्तेश्वरी रचना डी

प्रतीशी जुळत असताना अन्य प्रतींच्या सहमतीचा उलगडा होतो. तेव्हा या डी गटातच मुक्तेश्वरांच्या भारतप्रतीचा शोध घ्यावयास हवा.

मुक्तेश्वरांसमोरील सभापर्व प्रतीची श्लोकसंख्या "दोन सहस्र सात शतें । अकरा श्लोक आले गणितें" ( २ । उप ७ ) अशी आहे. यात "दोन सहस्र पाच शतें" असा पाठ पंगूंनी ( पृ. २३१ ) नोंदविला आहे. त्यावर २५११ या पर्वसंग्रहातील श्लोकसंख्येचा नकलकाराच्या मनावरील प्रभाव दिसतो. म्हणून ओक, वि. म. कुलकर्णी, पंगू या सभापर्वाच्या सर्व संपादकांनी स्वीकारलेल्या पाठाप्रमाणे २७११ ही मुक्तेश्वरांसमोरील सभापर्वाची श्लोकसंख्या मानणे इष्ट ठरेल.

अध्यायांच्या संदर्भात "बहुत अध्यायांचे गणित" ( २। उप ८ ) एवढेच काव्यसंग्रहप्रत सांगते. "बहुत" ऐवजी "बाहात्तर" असा पाठभेद काव्यसंग्रहकारांनी नोंदविला ( पृ. १९५ ) तरी नीलकंठी सभापर्वाचे ८१ अध्याय असल्याने स्वीकारला नाही. नीलकंठी-प्रतीप्रमाणे मुक्तेश्वरीसंहितेत फेरबदल करणे अयुक्त असल्याचे मागे दाखविले आहे. त्यामुळे "बहात्तर" हा पाठ स्वीकारण्यास हरकत नसावी. तसा तो पंगू-प्रतीत स्वीकारलेलाही आहे. तेव्हा सभापर्वाचे ७२ अध्याय व २७११ श्लोक मुक्तेश्वरांसमोर होते, असे त्यांच्या म्हणण्यावरून दिसते. ही अध्याय-श्लोकसंख्या के २ डी एन-२ डी ४·५·६ एवढ्याच प्रतींची आहे. यांपैकी के २ ( १० ) थोड्या ठिकाणी सहमत होते. डी एन-२ ही नीलकंठी प्रत आहे. डी ६ पेक्षा डी ४ (२९) व डी ५ (३१) या अधिक प्रमाणात सहमत होतात. म्हणून डी ४·५ या प्रतींवरच अधिक लक्ष केन्द्रित केले पाहिजे.

एक उदाहरण पाहू. दुःशासनाने वस्त्रहरणाचा प्रयत्न केला पण प्रत्येक वेळी दुसरे वस्त्र दिसले. वस्त्रांचा ढीग साठल्यावर तो लाजून खाली बसला, एवढेच चिकित्सक प्रत मानते. द्रौपदीचा धावा, कृष्णाने अदृश्यरूपात वस्त्रे नेसविणे हा तिला मान्य नसलेला भाग मुक्तेश्वर मात्र विस्ताराने रंगवितात. या स्वैर विस्ताराचे ( मुभा २।१५।१२०–२४३ ) मूळ असलेले सहा श्लोक ( वैद्य-प्रत, मभा ( २।६८।४१–४६ ) डीएन. डी ४ मध्ये संहितांतर्गत तर डी १ डी ५ मध्ये समासातील अधिक नोंदीत सापडतात. डीएन डी १ पूर्वोक्त कारणांनी वगळता परत आपण डी ४·५ याच प्रतीशी येऊन थांबतो. प्रस्तुत उदाहरणात डी ४ चा तो संहितांतर्गत भाग आहे तर डी ५ चा समासातील अधिकचा भाग आहे, हे लक्षात घेतले तर डी ४ कडे आपण अधिक झुकू लागतो.

डी ४ चा काळ नोंदविलेला नाही. "इदं पुस्तकं लिखितं भीमाजी त्रिमलराव परगणे वाई देशपांडे वास्तव्य काशीक्षेत्रे । श्रीसमर्थरामदासार्पणमस्तु" या तिच्या समाप्तिलेखावरून ती मुक्तेश्वरोत्तर असावी, हे स्पष्ट होते. सर्वपरिचित आवृत्तीची ( व्हल्गेट ) ती सापेक्षतेने चांगली व जुनी आवृत्ती आहे, नीलकंठी प्रतीशी मुक्तेश्वरी रचनेचा तौलनिक अभ्यास करणारांना अतितीव्र मतभेद आढळले नाहीत, याचे कारण डी ४ च्या या स्वरुपात असावे. मुक्तेश्वर, डी ४ चा नकलकार भीमाजी त्रिमल व नीलकंठ हे तिघेही महाराष्ट्रीय असून काशीला काही काळ राहिलेले दिसतात. काशीस्थ महाराष्ट्रीयांना

उपलब्ध होऊ शकणारी प्रतच काळाचे अंतर असले तरी त्यांना उपलब्ध झाली असेल. प्रत्यक्ष डी ४ ही मुक्तेश्वरांसमोरील प्रत नव्हे. एक तर ती उत्तरकालीन आहे. दुसरे म्हणजे ती सर्व ठिकाणी सहमती दर्शवीत नाही. कदाचित मुक्तेश्वरांसमोरील प्रतीची ती नक्कल असावी. निदान मुक्तेश्वरांची संस्कृत प्रत व डी ४ ह्या प्रती एकाच पाठ-परंपरेतील असाव्यात.

यापेक्षा अधिक निश्चितपणे मुक्तेश्वरांसमोरच्या भारत प्रतीविषयी काही सांगता येत नाही. जरासंधवधाची जी कथा मुक्तेश्वर भारताधारे सांगतात ( २ । ७ । ५६-५९ ) तिच्याशी सहमत होणाऱ्या हस्तलिखितांची नोंद चिकित्सक साधनात नाही. चिकित्सक प्रतीच्या ४५ व्या अध्यायाच्या अखेरी विदुर भीष्माकडे गेल्याचे वर्णन आहे पण प्रत्यक्ष भेटीचे वर्णन येत नाही. मुक्तेश्वर मात्र विदुर-भीष्म भेट ( २।११।३४-३६ ) वर्णितात. तेव्हा त्यांच्या समोरील प्रतीत तो भाग असला पाहिजे. याचा अर्थ असा की, मुक्तेश्वरांसमोरील संस्कृत महाभारताची प्रत चिकित्सक प्रतीच्या साधनग्रंथात नाही. तिच्याशी मिळतीजुळती असण्याची शक्यता असलेली डी ४ ही प्रत तेवढी आहे, असे सभापर्वाच्या संदर्भात म्हणता येते.

मुक्तेश्वरांसमोरील भारतप्रतीची निश्चिती न केल्याने त्यांच्यावर अन्यायकारक टीका झाल्याची उदाहरणे वनपर्वातही आहेत. सूर्यस्थालीचा वृत्तांत भारतात नाही ( ३।१।५८ ) या मुक्तेश्वरांच्या कथनाविरुद्ध चिं. वि. वैद्य, बा. अ. भिडे, नांदापूरकर "गृहणीष्व पिठरं ताम्र...." ( वैद्य प्रत मभा ३।३।७२ ) असा पुरावा पुढे करतात. तथापि हा श्लोक प्रक्षिप्त आहे. तो ज्यात आढळतो अशा एस, के २, डीएन, डी ३.५ ६ प्रती मुक्तेश्वरांसमोर नसल्या पाहिजेत. विदुराच्या प्रेमाबरोबर शत्रूपक्षाकडे एक मुत्सद्दी गेला, ही धृतराष्ट्राची भावना मुक्तेश्वर दाखवीत नाहीत, असा वैद्यांचा आक्षेप[११] आहे. तथापि ही जाणीव प्रक्षिप्त आहे. ती असणाऱ्या एस, जी २.३. डी १.२.५.६ प्रती मुक्तेश्वरांसमोर नसल्या पाहिजेत. मुक्तेश्वरांसमोरील भारतप्रतीचा शोध न घेता तुलना करणे कसे अन्यायकारक ठरते ते यावरून स्पष्ट होते.

चिकित्सक संहितेत नसलेला पण चिकित्सक साधनात नोंदविलेला काही भाग मुक्तेश्वरी वनपर्वातही आढळतो. अर्जुन-उर्वशी कथा ( मुभा ३।५।५२-६७ मभा ३ । परि १ क्र. ६ के-२.४ बी डीएन डी १-६ ), दुर्वास भोजन ( मुभा ३।११।११-१६२, मभा ३ । परि १ क्र. २५ डीसी डीएन डी १.२.६ ) ही ठळक उदाहरणे. याचा अर्थ असा की, दाक्षिणात्य वा काश्मिरी-बंगाली परंपरेपेक्षा डी गटातच मुक्तेश्वरांसमोरच्या संस्कृत वनपर्वाचे हस्तलिखित शोधावयास हवे.

विराटपर्वाच्या प्रतीचा शोध मात्र काहीसा कठीण आहे. त्यातील १८३४ श्लोकांपैकी फक्त ३०० श्लोकांविषयीच काय ते संपादक निःशंक आहेत. विराटपर्वाइतकी मोठी

११. चिं. वि. वैद्य, " निबंध आणि भाषणे ", पूर्वोक्त, पृ. १३८.

विभिन्नता उत्तर-दक्षिण पाठपरंपरा क्वचितच दाखवितात. संशोधित प्रतीची ही अस्थिरता मुक्तेश्वरांसमोरील विराटपर्वाच्या मूळ प्रतीच्या शोधात अडसर ठरते. पांडवांचा विराट-नगरप्रवेश ( मभा ४ । प्रस्तावना पृ. १८ ), धर्माची विराटाकडे युद्धार्थ रथ-मागणी ( मभा ४ । पृ. १३६ टी. ५५९ ), पांडव आधी प्रकट झाल्याने दुर्योधन त्यांना वनवासात पाठविण्याचा विचार करतो ( मभा ४ । परि. १ क्र. ६० ), गोग्रहणामागे पांडवशोधाचा कौरवांचा उद्देश ( मभा ४ । परि १ क्र. २७ ), यांसारखे मुक्तेश्वरांनी स्वीकारलेले तपशील दाक्षिणात्य प्रतींशी जुळते आहेत. अन्य पर्वांचा विचार करता मुक्तेश्वरांसमोर दाक्षिणात्य प्रत दिसत नाही. मग येथील दाक्षिणात्य प्रभावांचा उलगडा कसा करायचा ? एक तर, विराटपर्वाची तेवढी दाक्षिणात्य प्रत मुक्तेश्वरांसमोर होती, असे म्हणता येईल पण ते सुसंगत व संभाव्य वाटत नाही. पांडवांचा प्रवेशक्रम कन्नड कवी कुमारव्यास, चंपूभारत ( स्तबक १० ) असाच देतात. धर्माची रथ-मागणीही कुमारव्यासांनी नोंदविलेली आहे. गोग्रहणामागे कौरवांचा पांडव शोधनाचा उद्देश कुमारव्यास (संधी ५) व पंप (आश्वास ८) दाखवितात. कुमारव्यास व मुक्तेश्वर यांतील लक्षणीय साम्य आठवले की कुमारव्यासांच्या माध्यमातून झिरपलेले दाक्षिणात्य तपशील मुक्तेश्वरांनी स्वीकारले, असे म्हणता येईल. तिसरा तर्क, डी-४ च्या विशिष्ट स्वरूपावरून करता येईल. " डी-४ has not only the largest number of additions, but in readings of single words and lines it shows preponderance of individual readings. Against the whole of N, $D_4$ sometimes sides with S... But it also sides with $S_1$ and $K_1$ and forms a group with D1-3 "[१२]. याला पोषक असे एक उदाहरण नोंदविता येईल. गोग्रहणामागे पांडवशोधाचा कौरवांचा उद्देश मुक्तेश्वर ( ४।५।३५-४१ ) दाखवितात. तो परि १ क्र. २७ मधील दक्षिणप्रतीशी वा कुमारव्यास-पंप यांच्या रचनेशी जसा जुळता आहे तसा परि १ क्र. २८ या डी-४ च्य समासात नोंदलेल्या अधिकच्या भागाशीही जुळता आहे. उत्तर परंपरेतील असून दक्षिण-परंपरेचा प्रभाव असणाऱ्या डी-४ सदृश प्रतीच्या माध्यमातूनही असे तपशील मुक्ते-श्वरांना मिळाले असतील. दाक्षिणात्य प्रतीपेक्षा ठळक अशी उत्तर परंपरेतील भर दुर्गास्तवनाची (मुभा ४।१।६७-८० मभा ४ । परि १ क्र. ४) आहे. मुक्तेश्वरांनी ती स्वीकारली असून डी-४ मध्येही ती आहे. भीम-जीमूत, भीम-कीचक या मल्लयुद्धांची विस्तृत वर्णने हा औत्तरीय प्रतीचा विशेषही मुक्तेश्वरांत आहे. शमीवर शस्त्रे युधिष्ठिराने ठेवली असे दाक्षिणात्य प्रतीप्रमाणे न सांगता औत्तरीय प्रतीप्रमाणे नकुलाने ठेवल्याचे मुक्तेश्वर सांगतात. या जोडीला अन्य पर्वांचा विचार करता मुक्तेश्वरांसमोर विराट-पर्वाची दाक्षिणात्य प्रत नसावी असे वाटते. ती औत्तरीय डी गटातील डी-४ सारखी दाक्षिणात्य प्रभाव स्वीकारणारी प्रत असावी.

---

१२. " विराटपर्व "-संशोधित प्रत, संपा. रघुवीर, पूर्वोक्त, प्रस्तावना, पृ. २२.

सौप्तिकपर्वाची चिकित्सक संहिता पुष्कळच शुद्ध स्वरूपात उपलब्ध आहे, मुक्तेश्वरही येथे तपशीलवार मूलानुसरण करतात त्यामुळे प्रमाणप्रतीशी भेददर्शक असा फारच थोडा भाग येथे आला आहे. दुर्योधन मृत्युप्रसंगी गगनांगण प्राणतेजाने विजेसारखे प्रकाशले ( मुभा १०।३।३६ मभा १० । पृ. ७२*४६ के २.३ ), इंद्रगणांसह तो दिव्य विमानातून स्वर्गात गेला ( मुभा १०।३।४०–४२ मभा १० । पृ. ७३, ४८ के २.३ ), अश्वत्थाम्याचा ब्रह्मशिरोस्त्रासंबंधी द्रोणाशी संवाद (मुभा १०।४।४–६ मभा १० । पृ. ८३ *५८ के २ डी ४ ) अशा ठिकाणी मुक्तेश्वर के २ के ३ डी ४ या प्रतींना अनुसरताना दिसतात. तेथेच त्यांची सौप्तिकपर्वाची प्रत शोधावयास हवी.

मुक्तेश्वरांसमोरील भारतप्रतीची पर्वव्यवस्थाही वेगळी असावी. त्यांनी दिलेल्या पर्वानुक्रमात ( १।१।११६–११८ ) शल्यपर्वाचा भाग असलेले गदापर्व स्वतंत्र मानले आहे आणि आश्रमवासिक व मौसल या स्वतंत्र पर्वांचा " व्यासाश्रममुसलपर्व " असा एकच निर्देश आहे. मुळातील दहावे सौप्तिकपर्व त्यांच्या रचनेत अकरावे ठरते. ( याचा परिणाम होऊन मुक्तेश्वरांच्या आधुनिक समीक्षकांनीही सौप्तिकास अकरावे मानले आहे ! ) आदि–सभा-सौप्तिक या पर्वांची अध्याय व श्लोकसंख्याही मुक्तेश्वरांनी दिली आहे. त्यांची भारतप्रत उत्तरगटातील असली तरी समासातील अधिकच्या नोंदीत दाक्षिणात्य प्रभाव स्वीकारणारी असावी. तंतोतंत अशी प्रत चिकित्सक प्रतीच्या साधनग्रंथात नाही. तिच्याशी सदृश वा तिच्या पाठ्यपरंपरेतील प्रती डी या " Typical Mid-Indian Group "....मध्ये शोधता येतात, एवढेच. सर्वाधिक सहमती, देवनागरी लिपी आणि उपलब्धीची शक्यता या दृष्टीने डी गटातील, विशेषतः डी-४शी सदृश प्रत मुक्तेश्वरांसमोर असावी, असे दिसते.

या विचारानेच चिकित्सक प्रतीशी न जुळणारा पण अन्य प्रतींची सहमती असलेला मुक्तेश्वरी रचनेतील भाग नवीन किंवा बदललेला मानलेला नाही मुक्तेश्वर महाभारताची चिकित्सक प्रत सिद्ध करावयास बसलेले नव्हते. त्यांच्या समोर असलेल्या प्रतीचे आपल्या भूमिकेनुरूप त्यांनी अनुसरण केले. तेव्हा डी–४चे मुक्तेश्वरी संस्कृत भारतप्रतीशी असलेले साम्य लक्षात घेऊन पुढे तौलनिक अभ्यास मांडला आहे.

## तीन ॥ तुलनात्मक अभ्यासाची भूमिका

परंपरामान्य कथेचे निवेदन हीच प्राधान्याने प्राचीन मराठी कथाकवींची भूमिका होती. अशा संस्कारित काव्याचा घाट त्याच्या आधारभूत मूलग्रंथानेच आखून दिलेला असतो. त्यामुळे त्याच्या आकलन-आस्वाद व मूल्यमापन यांत तौलनिक अभ्यास अनिवार्य ठरतो. महाभारताच्या संदर्भात सांगावयाचे तर मोडक, ओक, भिडे, केळकर, पराडकर, पंगु, अदवंत, वि. म. कुलकर्णी, खांडेकर अशा भारतीपर्वांच्या संपादकांनी

प्रस्तावना-तळटीपातून अशा अभ्यासाची दिशा दाखविली. भावे, पांगारकर, अ. ना. देशपांडे आणि महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्या वाङ्मयेतिहासातून विषयानुसंधानाने स्फुट चर्चा आली आहे. राजवाडे, हंस, भिडे, पांगारकर, आजगावकर, दीक्षित, बनहट्टी यांच्या समीक्षालेखनातूनही ती आली आहे. " श्रीधर-चरित्र आणि काव्यविवेचन " मधून चि. नी. जोशींनी पांडवप्रतापाची अशी तौलनिक चर्चा किंचित विस्ताराने केली आहे. " विष्णुदास नाम्याच्या महाभारताचा विवेचनात्मक अभ्यास " या अप्रकाशित प्रबंधातून सरोजिनी शेंडे यांनी विष्णुदासांच्या रचनेचा तौलनिक अभ्यास मांडला आहे. मोरोपंतांच्या आर्याभारताची रसग्राही तुलना ग. रा. हवालदारांच्या " भारतामृत "मध्ये तर काटेतोल तौलनिक चिकित्सा स. वि. सहस्रबुद्धे यांच्या " मूळ महाभारत व आर्याभारत यांची तुलना " या अप्रकाशित प्रबंधातून आली आहे. " मुक्तमयूरांची भारते "-मधून नांदापूरकरांनी मुक्तेश्वर-मोरोपंतांची परस्परांशी व व्यासभारताशी सूक्ष्म, सविस्तर, अनेकांगी तुलना केली आहे. ती अभ्यासपूर्ण असली तरी मूलानुसरण या एकाच निकषाला मध्यवर्ती स्थान दिल्यामुळे कोठे ती एकांगी व अन्यायकारकही झाली आहे. " श्रीमद्व्यास महाभारताचे मराठी आविष्कार " व " माधवस्वामीची आख्यानक कविता आणि प्राकृत महाभारतातील काही आख्यानांचा तौलनिक अभ्यास " या अप्रकाशित प्रबंधातून व. वि. पारखे यांनी मुख्यतः विष्णुदास नामा, मुक्तेश्वर, माधव-स्वामी, श्रीधर व मोरोपंत यांच्या आख्यानांच्या व ऐषिक, स्त्री, मौसल, महाप्रस्थानिक व स्वर्गारोहण या पर्वांच्या संदर्भात तौलनिक अभ्यास मांडला आहे.

हा सर्व तौलनिक अभ्यास परिश्रमपूर्वक मांडण्यात आला आहे. तथापि या अभ्यासकांची भूमिका परिचायकाची किंवा आस्वादकाची व मुख्यतः तौलनिक निरीक्षकाची आहे. ती मूल्यमापनात्मक दृष्टीच्या समीक्षकाची सापेक्षतया कमी आहे.

केवळ तुलना हा प्रस्तुत ग्रंथाचा अभ्यासविषय नाही. मुक्तेश्वरी रचनेचे वाङ्मयीन आकलन व मूल्यमापन हाच त्याचा विषय आहे. त्याचा एक भाग म्हणून वाङ्मयीन मूल्ये मध्यवर्ती ठेवून केलेल्या तौलनिक विचाराचे दिग्दर्शन येथे करावयाचे आहे. बदलांच्या केवळ तौलनिक निरीक्षणापेक्षा त्यामुळे निर्माण होणाऱ्या वाङ्मयीन गुणदोषांची कारणमीमांसा करण्यावर त्यात अधिक भर दिला पाहिजे. मुक्तेश्वरी भारताचे आकलन व आस्वाद यास सहाय्यक व्हावी, अशा पद्धतीने तुलना केली पाहिजे. मुक्तेश्वरी भारताचे स्वरूपविशेष आणि मुक्तेश्वरी प्रतिभेचे विशेष स्पष्ट व्हावेत, असा या तुलनेचा उद्देश आहे. संस्कृत भारताचे अवतरण मुक्तेश्वरी भारताच्या रूपाने घडत असताना होणारी संस्करणे व स्थित्यंतरे टिपण्यावर येथे अधिक अवधान आहे. तुलनीय संहिताची निश्चिती करून, वाङ्मयीन मूल्ये मध्यवर्ती ठेवून केलेल्या अशा तुलनेतून मुक्तेश्वरांची भारतकथासंक्रमण-प्रक्रिया स्पष्ट करता येईल. मुक्तेश्वरी भारताचा स्वरूपवेध त्यातून घेता येईल, अशी अपेक्षा आहे.

महाभारतासारख्या आर्ष महाकाव्याला दोन प्रकारची सलगता असते. आदिपासून अंतापर्यंतची सर्व ग्रंथाला व्यापून राहणारी एक सलगता जशी त्यात असते तशी प्रत्येक पर्वाची एक अंतर्गत सलगताही असते. ही व्यापक सलगता अपूर्णतेमुळे मुक्तेश्वरी भारतास लाभलेली नाही. तेव्हा एखाद्या पर्वातील अंतर्गत सलगता स्पष्ट करून ही व्यापक सलगता सूचित करणे शक्य आहे. सौप्तिकाचा अविस्तार व आदिपर्वाचा अतिविस्तार, वनपर्वाची संक्षेपनिष्ठा व विराटपर्वातील रचनास्वातंत्र्य पाहता या सर्व प्रवृत्तींचा समतोल साधणारे सभापर्व सूक्ष्माभ्यासासाठी निवडले आहे. सभापर्व मध्यवर्ती कथाप्रवाहाशी बांधलेले, सुघटित, मध्यम विस्ताराचे व मुक्तेश्वरी वैशिष्ट्यांनी उजळलेले आहे त्याच्या चिकित्सक व सर्वस्पर्शी भारततुलनेच्या संदर्भात मुक्तेश्वरांनी घडविलेल्या भारतसंक्रमणाचा शोध घेता येईल. त्यातून हाती आलेल्या विशेषांचे अन्य पर्वातील पूरक संदर्भ नोंदवून पृथक् वैशिष्ट्यांचे तेवढे विस्ताराने विवेचन करता येईल. पूर्वाभ्यासाची पुनरुक्ती टाळणे आणि नवावलोकनाची दृष्टी स्पष्ट करणे, यासाठी मुक्तेश्वरी भारताच्या तौलनिक अभ्यासाची ही मांडणी स्वीकारली आहे.

या खंडाच्या परिशिष्टात मुक्तेश्वरी भारत व व्यासभारत यांची विषय–ओवी–श्लोकानुसारी संवादी संगती कोष्टकरूपाने दिली आहे. त्यामुळे तुलनीय विषयाचे समग्र चित्र डोळ्यासमोर उभे राहू शकेल.

आशय-अभिव्यक्ती व पूर्वपरंपरा यांच्या अंगाने तौलनिक विचार मांडण्यात आला आहे.

त्यातून मुक्तेश्वरी भारतातील भारतकथासंक्रमण जाणता येईल आणि त्याचा स्वरूप-वेध घेता येईल.

□ □ □

# क ॥ भारतकथासंक्रमण

## एक ॥ भारतकथासंक्रमण : संक्षेप

### १. संक्षेप : स्वरूपविवेचन

अनेक हातांनी विभिन्न काळी एका संमिश्र समाजमनाने महाभारताचे लेणे कोरले असल्याने त्याचे स्वरूप संकीर्ण झाले आहे. " unshapely mass, " " वाङ्मयीन राक्षस " असेच त्याचे वर्णन[१] केले जाते. पाल्हाळ, पुनरुक्ती, विस्कळीतपणा व विसंगती असलेल्या या महाकाय महाकाव्याचा प्रादेशिक भाषेत अवतार घडवायचा असेल तर तो संक्षेपातच घडविणे इष्ट होते. म्हणूनच मराठी महाभारतकारांनी विस्तारभीरुता दर्शवून संक्षेपनकथनाची भूमिका घेतली आहे.

विस्तृत भारतातील काही भाग गाळून मराठी कवी रचना करतात म्हणजे वर्जनाच्या अर्थाने संक्षेप साधतात. वर्जन हा दुय्यम प्रकारचा संक्षेप मानावा लागेल, कारण तेथे मूल-प्रत्ययाचा पूर्णपणे लोप होतो. अशा वेळी ज्या दृष्टीने अथवा ज्या सूत्राच्या आधारे वर्जन केले असेल ती संक्षेपित कृतीस कितपत उपकारक ठरली, हे पाहून समीक्षाकरावी लागेल.

सार, सारांश, निष्कर्ष, थोडक्यात मांडणी, थोडक्यात शक्यतो सर्वांगीण कथन असेही संक्षेपाचे अर्थ आहेत. सारगर्भ संक्षिप्त निवेदन या अर्थानेही संक्षेप करता येईल. तसे करताना काय बाजूस सारायचे आणि काय फुलवायचे ते कविप्रकृतीवर अवलंबून राहते. कवीची काव्यदृष्टी, काव्यप्रयोजन व संक्षेप करावयाचा त्या काव्याकृतीचे रूप अशा अनेक गोष्टीवर संक्षेपाचे रूप नियत होते. व्यक्तिनिष्ठ अभिरुचीला संक्षेपात वाव असला तरी मूलकृतीच्या स्वरूपाचे किमान बंधन तेथे असले पाहिजे. यथामूल नसला तरी स्थूल प्रत्यय चांगल्या संक्षेपात अभिप्रेत असतो. मूलप्रत्यय व व्यक्तिनिष्ठ अभिरुची ही संक्षेपाची दोन नियंत्रक तत्त्वे आहेत. मूलप्रत्यय मूलकृतीच्या रसिकाच्या आस्वाद-संस्काराशी संबद्ध आहे तर व्यक्तिनिष्ठ अभिरुची कविप्रकृतिनिष्ठ आहे. त्यामुळे संक्षेप-समीक्षेत कलावंताची काव्यदृष्टी, काव्यप्रेरणा व प्रयोजन कधी विसरून चालणार नाही. तसेच हे विवेचन समीक्षकाच्या आस्वादप्रत्ययाशी संबद्ध असल्याने त्याची समीक्षा वस्तुनिष्ठेकडून व्यक्तिनिष्ठेकडे झुकण्याची शक्यता आहे.

---

१. एम. विंटरनिट्झ, ( भाषांतर ) मिसेस एस. केतकर, " ए हिस्ट्री ऑफ इंडियन लिटरेचर, " कलकत्ता, १९२७, पृ. ३२६–३२७.

केवळ साररूपाने सांगण्यात कौशल्य नाही. बह्वर्थक शब्दयोजनेने सारार्थ अधिक सघन करणे, यासच खरे संक्षेपकौशल्य म्हणता येईल. अशा संक्षेपनामुळे पुनःकथन टळते, रुक्ष भागास काट देता येते आणि रसापकर्षक भाग टाळून पुढे जाता येते. संक्षेप साधला नाही तर मात्र संदिग्धता, क्लिष्टता, दुर्बोधता व अपूर्णता येते. मुख्य म्हणजे अपुष्टतेमुळे रसिकास यथार्थ प्रत्यय येत नाही.

संक्षेप चांगला साधला तरी त्यायोगे कथा-निवेदन रेखीव होईल. पण चांगल्या संक्षेपामुळे रसवृद्धी वा रसनिर्मिती होईल असे म्हणणे कठीण वाटते. कथानकाचे स्वारस्य वाढेल तेवढ्यापुरता तो रसात्मकतेस पोषक ठरेल. तथापि यापलिकडे रसात्मकतेशी त्याचा संबंध जोडता येईल असे वाटत नाही. संक्षेप हे अशा काव्यसमीक्षेचे भावात्मक ( Positive ) मूल्य मानण्याऐवजी अभावात्मक ( Negative ) मूल्य मानणे अधिक योग्य ठरेल.

## दोन || सभापर्वातील वर्जन

महाभारताचा काही भाग पूर्णपणे गाळून मुक्तेश्वरांनी संक्षेप साधला आहे.

### २·१. पुनरुक्ती

पांडवदिग्विजयाचे वर्णन प्रथम संक्षेपाने ( मभा २।२३।१–१३ ) व नंतर विस्ताराने ( मभा २।२३.११ ते अ. २९ ) येते. मुक्तेश्वरांनी पुनरुक्तीवजा भाग गाळून एकच प्रसंग दोनदा सांगण्याचे टाळले आहे. द्यूतचर्चाही आधी संक्षेपाने व मग विस्ताराने येते. मुक्तेश्वरांनी ५८ श्लोकांची संक्षेपचर्चा गाळून सलगपणे एकदाच ती वर्णिली. आवश्यक भाग दीर्घकथनात यथास्थानी गोवून पुनरुक्तीवजा भागाचे त्यांनी वर्जन केले. त्याद्वारे कथेचा ओघ अखंड व गतिमान ठेवण्यात ते यशस्वी झाले आहेत. अध्यायाच्या आरंभी वा अधूनमधून येणारे वैशंपायनाचे प्रास्ताविक उल्लेख व जनमेजयाचे आनुषंगिक प्रश्न ( जसे, मभा २।२३।११,२।४६।१–३ ) त्यांनी गाळले आहेत.

### २·२. संवाद

कथेच्या ओघात येणाऱ्या बारीकसारीक संभाषणांना मुक्तेश्वरांनी अशीच कात्री लावली आहे ( मभा २।४४।१७, २।५२।१३ ), या किरकोळ संभाषणांच्या वगळण्याने कथाभागावर वा व्यक्तिरेखांवर विशेष महत्त्वाचा परिणाम होत नाही.

प्रसंगचित्रणाचा रोख व पद्धती बदलल्याने काही संभाषणे गाळली गेली आहेत. वस्त्रहरणप्रयत्नानंतर विदुरोपदेश ( मभा २।६१।५२–८० ), द्रौपदीच्या प्रश्नास भीष्माचे उत्तर, दुर्योधनाची मानभावी सूचना, भीमाचे उत्तर ( मभा २।६२।१४–३८ ), भीमाचे

कर्णास उत्तर, विदुरविनंती ( सभा २।६३।६–१५ ), दुर्योधनाचा प्रस्ताव, अर्जुनाचे उत्तर ( सभा २।६३।२०, २१ ), भीमसंताप व अर्जुनकृत सांत्वन ( सभा ३।६४। ४–१७ ) अशी प्रसंगानुरोधाने आलेली किती तरी संभाषणे मुक्तेश्वरांनी गाळून टाकली. महाभारतात या सर्व प्रसंगात विचार व भाव यांचे संतुलन साधून गांभीर्य निर्माण केले आहे. मुक्तेश्वरांना त्यातून तीव्र भावकल्लोळ व ईश्वराचे लीलाविग्रही रूप दाखवायचे असल्याने मुळातील वस्त्रहरणानंतरची चर्चा त्यांनी गाळली. तिच्यातील योग्य वाटणारा भाग वस्त्रहरणपूर्व चर्चेशी क्रमांतराने जोडून घेतला, तेव्हा येथील वर्जनामागे संपूर्ण प्रसंगाला भावनात्मक वळण देण्याचा प्रयत्न दिसतो.

द्रौपदी सहजासहजी सभेत येणे योग्य नव्हे, हे जाणून व्यासांनी या प्रसंगाला अनेकानेक वळसे दिले आहेत. या गुंतागुंतीच्या पायऱ्या टाळून मुक्तेश्वरांनी द्रौपदीला राजसभेत आणले असल्याने मुळातील अनेक संवाद ( सभा २।६०।७–१७ ) मुक्तेश्वरी रचनेत गाळले गेले आहेत. मुळात प्रसंगाचे गांभीर्य व अनपेक्षितत्व तपशीलाशी निबद्ध आहे. तर मुक्तेश्वरांनी भावकल्लोळाशी ते संबद्ध केले आहे. त्यामुळे प्रसंगाच्या हाताळणीची पद्धती बदलली असली जरी परिणामात उणेपण आलेला नाही. स्वतंत्र कविदृष्टीमुळे मुक्तेश्वर भिन्न पद्धतीने प्रसंग मांडतात. या प्रक्रियेत काही भाग सहजच गाळला जातो.

### २.३. वर्णन

वर्णने गाळल्याची उदाहरणे सभापर्वात अपवादात्मक आहेत. राजसूयाच्या आरंभस्थानाचे वर्णन व नारदचिंता ( सभा २।३३।१–२१ ) हे असे स्थल आहे. हे वर्णन वस्तुस्थितीदर्शक व हासपरिहासाला वाव देणारे असूनही मुक्तेश्वरांनी गाळले आहे. कृष्णाच्या अग्रपूजेसारखा भक्तिरसाने भिजलेला भव्योदात्त भाग पुढे असल्याने येथे वर्जन केले असावे. व्यासांनी अग्रपूजा अतिसंक्षिप्त ( २।३३।३३ ) वर्णिली. दोन कवींच्या भिन्न आवडी-निवडी या विस्तार-संक्षेप-वर्णनातून प्रकटल्या आहेत.

### २.४. उपदेशपरता

महाभारतातील अध्यात्म व नैतिक सदाचाराचा भाग मुक्तेश्वर सहसा टाळीत नाहीत. नारदनीतीसारखी राजनीतीविवरण करणारी प्रकरणेही त्यांनी विस्तारून व समरसून लिहिली आहेत तरीही राजनीतीविषयक काही मूलसंदर्भ त्यांच्या हातातून निसटतात. द्यूतासाठी धृतराष्ट्राचे मन वळविताना दुर्योधनाने पुरस्कारिलेली राजनीती ( सभा २।५०। १०–२८ ) त्यांनी गाळली आहे. दुर्योधनाची भाषणे राजनीतीने परिपूर्ण आहेत. " लोकवृत्ताद्राजवृत्तमन्यदाह बृहस्पतिः " ( २।५०।१४ ) अशा प्रतिपादनामुळे त्याची कुटिलता बौद्धिक पातळीवर आविष्कृत होते. महाभारताचे सर्वसंग्राहक रूप लक्षात घेता अशा राजनीतीचा समावेश स्वाभाविक वाटतो. तो " हिंदूंचा प्रवृत्तीपर राजधर्मविवेक ग्रंथ " आहे. राजनीतीचे कठोर, कपटी पण वास्तव रूप त्यात प्रतिबिंबित झाले आहे. मुक्तेश्वरांनी ती गाळल्याने दुर्योधनाच्या व्यक्तिरेखेचे बळ उणावले आणि तो केवळ

चरफडणारा खलपुरुष ठरला. " असंतोषः श्रियो मूलं तस्मात्तं कामयाम्यहम् " ( २ | ५०।१८ ) यासारखी तेजाळ वचने मध्ययुगीन निष्क्रियतेचा भेद करून स्वराज्योन्मुख महाराष्ट्रापर्यंत पोहोचली नाहीत. समकाळाचे स्पंदन, भारताचे सर्वसंग्राहक रूप आणि व्यक्तिरेखेचे बौद्धिक बळ या तिन्ही दृष्टींनी असे अंश गाळले जायला नको होते. ही राजनीती समकालात प्रेरक व मार्गदर्शक ठरण्यासारखी असली तरी खलपात्राकडून तिचा पुरस्कार होत असल्याने श्रोत्यांना ती अननुकरणीय वाटण्याचा संभव होता, एवढेच काय मुक्तेश्वरांच्या बाजूने म्हणता येण्यासारखे आहे.

## २.५. संकीर्ण

धर्म मयाचे पूजन करतो ( मभा २।१।१२-१९ ), कर्णाज्ञेने दुःशासन द्रौपदीस परत नेऊ लागला ( मभा २।६१।८१-८२ ) यासारखा तपशील मुक्तेश्वरांनी गाळला आहे. प्रदीर्घकाव्यात तपशीलाचा बारकावा काटेकोरपणे संभाळणे कठीण आणि काही वेळा अनावश्यक असते. त्यामुळे मुक्तेश्वरांनी गाळलेल्या तपशीलाविषयी तक्रार करावयास फारसा वाव नाही. पद्यपंक्ती तोडून मध्येच वक्त्याचा निर्देश करणारे गद्य शब्द व वाक्य-प्रयोग गाळून वा आवश्यक तेथे त्यांना पद्यरूप देऊन मुक्तेश्वरांनी सलग पद्यबंधात प्रत्येक अध्याची मांडणी केली आहे.

## तीन || सभापर्वातील सारकथन

राजसूयमंत्रसमयी कृष्णाने दिलेली राजकुलांची माहिती ( मभा २।१३।१-६८, मुभा २।५।१२५-१६३ ) व पांडवांची त्यावरील चर्चा ( मभा २।१४।१-२०, १५।१-१६, १६।१-९, मुभा २।५।१६४-१७२ ) मुक्तेश्वरांनी संक्षेपिली आहे. महाभारत हा मूलतः इतिहासग्रंथ असल्याने त्यात अशी माहिती विस्ताराने येणे स्वाभाविक आहे. तथापि समकालीन श्रोतृमनाशी अनुबंध तुटलेले हे वृत्तांतात्मक कथन विस्ताराने देण्याचे मुक्तेश्वरांना काही कारण नव्हते. येथील शूर, राजनीतिज्ञ कृष्णापेक्षा परंपरेने सजविलेले त्याचे लीलाविग्रही रूप प्रिय असल्यानेही त्यांनी येथे संक्षेप केला असावा. पांडवांच्या प्रतिक्रियेत प्रवृत्तिप्रधान क्षात्रधर्माचा व राजधर्माचा पौरुषसहज आविष्कार आहे. मुक्तेश्वरांनी त्यातील विचार गाळला आणि त्यामागील भाव कृतीची जोड देऊन अधिक तीव्र बनविला. भावतीव्रतेच्या या प्रक्रियेत चर्चेचा संक्षेप झाला. समकालीन जीवनाशी संबंध तुटलेला आणि म्हणून श्रोत्यांना अनावश्यक वाटणारा असा तपशील मुक्तेश्वर संक्षेपितांना दिसतात. अर्जुनदिग्विजयाच्या ६३ श्लोकांचे ४५ ओव्यांत किंवा भीम-दिग्विजयाच्या ४४ श्लोकांचे २४ ओव्यांत ते सार आणतात ते याच भूमिकेने. राज-दरबारातील औपचारिक रीतीरिवाजांचाही ते संक्षिप्त निर्देश करतात. पांडवांचे हस्तिनापुरी आगमन ( मभा २।५२।१७-३७, मुभा २।१३।६८-७७ ) आणि प्रस्थान ( मभा २।६५।१-१७, मुभा २।१५।२८०-२८७ ) त्यांनी आवरते घेतले आहे. एका उत्कंठावर्धक प्रसंगाच्या महाद्वाराशी आणून सोडल्यावर किंवा एका रौद्रनाट्याची

करुणगंभीर अखेर झाल्यावर अशा तपशीलात्मक भागाशी चाळा करण्यात अर्थ नव्हता. कथेचा वाहता वेग अशा संक्षेपांनी ते टिकवितात. राजसूययज्ञाचे वर्णन ( मभा २।३०।१७–५४, २।३२।१–१८, मुभा २।९।३८–७४ ) प्रत्यक्ष यज्ञविधीपेक्षा यज्ञसमारंभावर भर देणारे आहे. यावरून समकाळात ज्याचे आवाहन श्रोतृमनाला होऊ शकणार नाही, असा धार्मिक भागही ते संक्षेपाने देतात असे दिसते.

कथेचा ओघ अखंड रहावा व वेग टिकावा म्हणून मुक्तेश्वर कधी संक्षेप करतात. दुर्योधनाची भरसभेतील फजिती त्यांनी मुळाप्रमाणे दोन वेळा ( मभा २।४३।१–१०, २।४६।२६–३५, मुभा २।१२।४३–५६, १३२–१३३ ) वर्णिली. मुक्तेश्वरांनी दुसऱ्या भागातील काही अंश पहिल्या भागात मुरवून प्रत्यक्ष प्रसंगचित्र ठसठशीतपणे मांडले आणि दुसऱ्या भागात पुनःकथन संक्षेपात केले. यामुळे प्रसंगचित्र हवे तसे गर्द झाले आणि पुनरुक्ती टळून कथेचा ओघही वाहता राहिला.

कधी एखाद्या प्रसंगास नवनिर्मित प्रसंगाची जोड देताना मूलप्रसंगाचा ते संक्षेप करतात. दुर्योधनाने द्रौपदीस मांडी दाखविल्याने भीमास क्रोध येतो ( मभा २।६३।१०–१५, मुभा २।१५।१०६–१०८ ) हा द्यूतसभेतील एक उत्क्षोभक प्रसंग. या प्रसंगास द्रौपदीच्या जळजळीत उत्तराची पुरवणी त्यांना जोडावयाची (मभा २।१५।१०९–११६) होती. त्यामुळे मूलप्रसंगाचा संक्षेप झाला आणि मूलभाव क्रमशः वाढवीत नेऊन त्याची परिणती वस्त्रहरणाच्या भीषण घटनेत दाखविणे शक्य झाले.

प्रसंगातील संमिश्र भावांपैकी एखादाच टळक करण्याच्या प्रवृत्तीमुळे काही वेळा संक्षेप झाला आहे. विदुर धर्मास निरोप देतो ( मभा २।६९।५–२०, मुभा २।१६।१०२–१०७ ) या भागात व्यासांनी अधर्माने जिंकला गेला असता कोणी पराजयाचे दुःख करीत नाही ( ७ ), या लोकी आपण तुम्हांप्रमाणे असावे असे कोण इच्छिणार नाही ! ( १० ), ऋषींना पूज्य असलेली तुझी निश्चल बुद्धी प्रशंसनीय आहे ( १५ ) या विचारसूत्रांचा सुरेख विस्तार केला आहे. मुक्तेश्वरांनी त्यातील आध्यात्मिक सूत्र तेवढे विस्तारून लिहिले आणि उर्वरित भागाचा संक्षेप केला. ही निवड वृत्तिद्योतक म्हणावयास हवी.

धर्ममुखीचे द्रौपदीवर्णन ( मभा २।५८।३२–३७, मुभा २।१४।१५८–१६४ ) मुक्तेश्वरांनी तटस्थ निवेदनशैलीत गुंफले आहे. या काव्यप्रयुक्ती बदलामुळे ते संक्षिप्त झालेले दिसते.

कथाबंधात पात्रांना किती वाव द्यायचा याकडे मुक्तेश्वर नेहमी अवधान देताना दिसतात. विदुर द्यूतविरोध अनेकदा करतो. म्हणून त्याची काही भाषणे मुक्तेश्वरांनी पूर्ण वगळली आहेत ( जसे, मभा २।६१।५२–८० ) तर काही संक्षिप्त ( जसे, मभा २।५९।१–१२, मुभा २।१५।१–४ ) केली आहेत. गांधारीच्या अनुद्यूतविरोधाचा ( मभा २।६६।२८–३५ मुभा, २।१६।१५–१६ ) अल्प अंश धृतराष्ट्रमुखी वापरून मुक्तेश्वरांनी संक्षेप केला आहे.

## चार ॥ अन्य पर्वातील संक्षेप

**आदिपर्वात** वसिष्ठांच्या आत्महत्याप्रयत्नातील अडथळे ( मभा १।१६७।१-१० ), और्वाचा राग व तो समुद्रात टाकण्याचा त्याला मिळालेला सल्ला (मभा १।१७१।१-२० ), उड्डाणापूर्वी विनितेने गरुडास आशीर्वाद दिले ( मभा १।२४।७-९ ) असे कथेचे बारकावे मुक्तेश्वर तपशीलवार सांगत नाहीत. आश्विनीकुमार ( मभा १।३।५९-७० ), नाग ( १।३।१३९-१४६ ), अग्नी ( १।२२०।२२-२९ ) यांची स्तवने गाळली आहेत. समुद्र ( १।१९।४-१७ ), हिमालय ( १।२६।१७-२५ ), पांडूची अंत्ययात्रा ( १।११८। ५-३० ), दिव्य अश्व ( १।१५८।४९-५१ ) अशी कथेच्या वाहत्या ओघाला अटकाव करणारी आणि म्हणून वाचकाचे चित्त विचलित करणारी वर्णने मुक्तेश्वर गाळताना दिसतात. अन्य पर्वांच्या तुलनेने आदिपर्वात गाळलेल्या वर्णनाची संख्या अधिक दिसते. युद्धवर्णने मात्र मुक्तेश्वर सहसा गाळताना दिसत नाहीत. आणि मांडव्य ( १।५७।७४-१०६ ), पुरूच्या पदच्युतीची कारणे ( १।८०।१२-२३ ), स्वर्गपतनप्रसंगी ययातीचे आकाशात राहणे ( १।८१।४-१२ ) यांसारख्या घटितांचे पुनःकथनत्यांनी टाळले आहे.

उत्तंकाची प्रश्नावली ( १।३।१६६-१७१ ), अग्नीचा भृगुशी युक्तिवाद ( १।७।१-११ ), शर्मिष्ठा-ययाती ( १।७७।१४-२५ ), अर्जुन-अंगारपर्ण ( १।१५९ ), वर्गा-ब्राह्मण ( १।२०९।१-२२ ), अर्जुन-वासुदेव ( १।२११।१७-२१ ) यांसारखी संवाद-स्थळे त्यांनी वगळली आहेत. निरनिराळ्या संवादांचे एकत्रीकरण केल्यामुळे वा त्यांचा आशय संक्षेपाने सुचविल्यामुळे आदिपर्वात अनेक संवाद वगळले गेले आहेत. वर्णसंकरा-विषयीचा ययातीचा मूळ प्रश्न गाळून शुक्राचे उत्तर ( १।१८।१३४ ) ठेवले. आशयातील वळसे टाळून तो सोप्या पद्धतीने मांडण्याची अशी पद्धती आदिपर्वात पुष्कळच वापरली आहे. उपाख्यानातील बारकावे, वंशावळीकथन, दरबारी रीतीरिवाज, घटनाशून्य संथ निवेदने, विस्तृत चर्चा, प्रास्ताविक भाग सारकथनाच्या[२] रूपात सांगणे मुक्तेश्वर पसंत करतात.

---

२.

| महाभारत | मुक्तेश्वर | महाभारत | मुक्तेश्वर |
|---|---|---|---|
| १।३।१७८-१९५ | १।२।१४८-१५१ | १।५।१-२६ | १।३।१-९ |
| १।७।१२-२६ | १।३।२८-३१ | १।२१।६-१७ | १।५।५७ |
| १।३३।१-३१<br>२।५८।१-५१ | १।७।३३-३८<br>१।१४।१-१७ | १।५५।१-४३<br>१।५६।१-३३ | १।१३।२१-४१ |
| १।१५४।१-२५ | १।३९।१० | १।७०।१-४६<br>१।७१।१-४ | १।१७।१-८ |
| १।१६०।१-४१<br>१।१६१।१-२०<br>१।१६२।१-१८ | १।४०।४८-६४ | १।१४५।१-४०<br>१।१४६।१-३६<br>१।१४७।१-२४ | १।३८।१-३३ |

**वनपर्व** सर्वाधिक संक्षेपनिष्ठ आहे. १६ उपपर्वे, २६९ ( वा २९९ ) अध्याय आणि ११ ते १२ सहस्र श्लोकांचा ( पर्वसंग्रहाप्रमाणे ११, ६६४ ) विस्तार असलेले वनपर्व मुक्तेश्वरांनी २७६५ ओव्यांच्या १८ अध्यायांत बसविले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर संक्षेप करताना साहजिकच संपूर्ण वर्जनावर अधिक भर दिला गेला १७५ ओव्यांच्या नवव्या अध्यायात मुळातील अ. ७९–१५३ अशा तब्बल ७५ अध्यायातील कथाभाग आलेला आहे. कालेयवध ( अ. १०१ ), ऋषभोपाख्यान ( अ. १०९ ), महेंद्राचलगमन ( अ. ११४ ), मांधात्रुपाख्यान ( अ. १२६ ), जन्तूपाख्यान ( अ. १२८ ), यमुनादर्शना ( अ. १२९ ), श्येनकपोतीय ( अ. १३०–१३१ ), अष्टावक्रीय ( अ. १३२–१३४ ), यवक्रीतोपाख्यानम् ( अ. १३५–१३९ ) अशा १६ अध्यायांतील कथाभागाचा नामनिर्देशही आलेला नाही. अर्जुनोत्कंठा ( अ. ७९ ), गययज्ञ ( अ. ९३ ), अगस्त्योपाख्यान ( अ. ९४–९७, १०१–१०२ ), वृत्रवधोपाख्यान ( अ. ९८–१०० ), सगरोपाख्यान ( अ. १०४–१०८ ), ऋष्यशृंगोपाख्यान ( अ. ११०–११३ ), जामदाग्नचरित ( अ. ११५–११७ ), कृष्ण-पांडव भेट ( अ. ११८–१२० ), सौकन्य ( अ. १२१–१२५ ), गंधमादनप्रवेश ( अ. १४०–१४३ ) अशा ३५ अध्यायांचा फक्त ८ ओव्यांत निर्देश करण्यात आलेला आहे. हाच प्रकार १५२ ओव्यांच्या ११ व्या अध्यायातही आहे. मार्कंडेयसमास्यापर्व ( अ. १८०–२२१ ) व द्रौपदी–सत्यभामा पर्व ( अ. २२२–२२४ ) अशा तब्बल ४५ अध्यायांतील कथाभाग अवघ्या १० ओव्यांत आटोपता घेतला आहे.

सारकथन तर वनपर्वात सर्वत्रच आहे. मूळ ७८ अध्यायांतील महत्त्वाचे जवळजवळ काहीही न गाळता केलेल्या उत्कृष्ट सारकथनाचे नमुने म्हणून पहिल्या ८ अध्यायांचा उल्लेख करावयास हवा. शौनकाचा ६६ श्लोकांचा उपदेश ( मभा ३।२।१४–७९ ) त्यांनी ७ ओव्यांत ( मुभा ३।१।३४–४० ) आणला आहे. पांडवांच्या द्वैतवनप्रवेशाचे ४२ श्लोक ( अ. २४ व २५ ) फक्त ५ ओव्यांत ( ३।४।१–५ ) आटोपले आहेत. दोन वेळा येणारे सौभोपाख्यान ( मभा ३।१५।१–२२, ३। अ. १६–२३ ) ते एकदाच विस्ताराने मुभा ३।३।३–९५ ) सांगतात. एकदा संक्षेपाने व नंतर विस्ताराने वर्णिण्याची महाभारतकारांची रीत मुक्तेश्वर सहसा पाळीत नाहीत.

वनपर्वात मुक्तेश्वर संक्षेपभूमिकेचा उच्चार व आचार सर्वाधिक प्रमाणात करीत आहेत. पुनरुक्ती, दूरान्वित आख्याने, विस्तृत वर्णने व बारीकसारीक तपशील ते गाळताना दिसतात. वर्णनावर त्यांनी अधिक भर दिला आहे. तसे सारकथन सर्वत्रच आहे. त्यातही दीर्घ संभाषणे संक्षिप्त करण्याकडे त्यांचा अधिक कल आहे. अशा संक्षेपामुळे मुक्तेश्वरी वनपर्वातील मध्यवर्ती कथा अधिक सुसूत्र व केन्द्रीभूत होते. त्याचा दुसरा परिणाम अनेक परिणामयुक्त कथेस एकेरी रूप लाभण्यात होतो. त्यामुळे मुक्तेश्वरी वनपर्व महाकाव्यात्म रूपाकडून आख्यानात्मक वळणाकडे झुकत जाते.

**विराटपर्व** वनपर्वासारखेच संक्षेपनिष्ठ आहे. ६७ अध्याय व १८३४ श्लोक (पर्वसंग्रहाप्रमाणे २०५०) असलेले विराटपर्व ८ अध्यायांच्या ९९१ ओव्यांत मुक्तेश्वरांनी आणले आहे. वनपर्वात संक्षेपद्दष्टीमुळे संकोचलेली नवनिर्मिती विराटपर्वात संक्षेपबंधन पाळूनही पल्लवीत झालेली आहे. ही नवनिर्मिती लक्षात घेतली तर विराटपर्वात मुक्तेश्वरांनी खूपच संक्षेप केल्याचे लक्षात येईल. जनमेजयाचे प्रास्ताविक प्रश्न (४।१।१, ४।१२।१), युधिष्ठिराने केलेले अर्जुनाचे वर्णन (४।२।९–२०), चर्चेतील युधिष्ठिराचे संवाद (४।३।१, ५, १२–१५), सुशर्म्याच्या बेतास कर्णाचे अनुमोदन व दुर्योधनाची आज्ञा (४।२९।१४–२६), युधिष्ठिर-विराट संवाद (४।६३।२९–३५), सारथ्यकर्मासाठी उत्तरेकरवी बृहन्नडेस बोलावणे (४।३५।१–९) – अशी बारीकसारीक वर्णने, तपशील व संवादस्थळे त्यांनी वर्जिली आहेत.

विराटपर्वात वर्जनापेक्षा सारकथावर[३] अधिक भर आहे. अज्ञातवासाविषयीचे पांडवांचे भावी बेत हा ६९ श्लोकांचा भाग (अ. १–३) मुक्तेश्वरांनी १८ ओव्यांत (४।१।४३–६०) आणि पांडवांच्या विराटनगरप्रवेशाचे १०१ श्लोक (अ. ६–११) ४३ ओव्यांत (४।१।८१–१२३) आणले आहेत. या संक्षेपाने भावी बेत व त्यांचे प्रत्यक्ष आचरण अशा सदृश वर्णनातील पुनरुक्ती टाळली जाते. त्यामुळे कथा अधिक गतिमान होते. तथापि अज्ञातवासातील अवदशेविषयीचे पांडवांचे दुःख व परस्परप्रीती यांचा मुळातील भावस्पर्श मुक्तेश्वरी चित्रणात राहिलेला नाही. उत्तरगोग्रहणाचे ७८८ श्लोक (अ. ३३ ते ६२) मुक्तेश्वरांनी (४।६।१–१५३) १५३ ओव्यांत आणले आहेत. त्यावरून विराटपर्वातील संक्षेपाची कल्पना यावी. या इतक्या मोठ्या संक्षेपामुळे येथील युद्ध अद्‌भुताकडे झुकले आणि वास्तवापासून दूर गेले. विराटपर्वाची एकूण कथा पुष्कळच सुसूत्र व एकेरी आहे. मुक्तेश्वरांनी काही बदल करून तिला अधिक रेखीव रूप दिले आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर संक्षेप करूनही त्याचा विपरीत परिणाम झालेला दिसत नाही.

**सौप्तिक** हे समरूप विस्ताराचे पर्व आहे. सौप्तिकाचे मुक्तेश्वरांसमोरील भारतप्रतीत ८७० श्लोक (१०। उप २–३) होते. ते त्यांनी सौप्तिकाच्या ४ अध्यायांतील ५०० श्लोकांत आणले. त्यात पूर्ण वर्जन जवळ जवळ कशाचेही नाही. आहे ते केवळ सारकथन. अश्वत्थामा–कृप चर्चा त्यांनी किंचित संक्षेपिली. अखेरचा शिवमाहात्म्याचा भागही संक्षेपिला. त्यांचे सारकथन केवळ कथानुषंगी नाही. तत्त्वज्ञान, वर्णने, देवता-

---

३.

| महाभारत | मुक्तेश्वर | महाभारत | मुक्तेश्वर |
|---|---|---|---|
| ४।४।६–४४ | ४।१।२६–४२ | ४।५।१–३१ | ४।१।६२–६६ |
| ४।अ १६–२०, २१।१–६ | ४।३।६२–८९ | ४।२४।५–२१ | ४।५।५–६ |
| ४।अ. २४–२८ | ४।५।५–३४ | ४।३३।९–२० | ४।६।१७–१८. |

स्तुती यांसारखी महाकाव्याची अन्य अंगोपांगेही त्यांनी येथे आणली आहेत. मूळ घटनाक्रम, निवेदनपद्धती, अलंकारविलास, वर्णने व तत्त्वचर्चेचा सारा भाग त्यांनी संक्षेपाने वर्णिला आहे. त्यामुळे महाभारताचा महाकाव्यात्म बाज त्यांना संभाळता आलेला आहे. येथील संक्षेप २/३ पेक्षा किंचित कमी आहे. तरी त्यामुळे मूलप्रत्यय कोठे उणावला आहे असे दिसत नाही. मुळातील विस्तृत भाग संक्षेपाने अधिक सारगर्भ व अधिक उठावदार झाल्याचा प्रत्यय येथे येतो.

## पाच || संक्षेपाच्या पद्धती

असे संक्षेप साधण्याच्या काही विशिष्ट पद्धती मुक्तेश्वरी रचनेत दिसून येतात.

कधी एकाच भागाचे अनेक ठिकाणी विखुरलेले सबंद्ध तुकडे त्यांच्या भावार्थाच्या अनुरोधाने ते एकत्र करून मांडतात राजसूयप्रसंगी राजांना दिलेल्या निवासाचे वर्णन दोनदा ( महाभारत २।३०।४७-४८ व २।३१।१८-२३ ) येते. ते मुक्तेश्वरांनी एकदाच ( मुक्तेश्वर २।९।३५-३६ ) मूळ आशय लक्षात घेऊन केले आहे.

कधी एकाच व्यक्तीची सबंद्ध भाषणेही ते एकत्र करतात. कृष्णाचे शिशुपालास प्रत्युत्तर ( महाभारत २।४२।७-१५ व पृ. २०३*४०१ मुक्तेश्वर २।११।५१-५७ ) मुळात ११ श्लोकांचे व दोन वेळा येणारे आहे. मुक्तेश्वर एकदाच पण ७ ओव्यांत किंचित नवी भर घालून त्याचा यथार्थ प्रत्यय देतात.

कधी एका व्यक्तीचे उद्‌गार ते सहेतुक दुसऱ्या व्यक्तीच्या मुखी वापरतात. भीष्माच्या उत्तरानंतर सभासद राजांचे संतप्त उद्‌गार ( महाभारत २।४१।२८ ) ते त्या राजांचा प्रतिनिधी असलेल्या शिशुपालमुखी ( मुक्तेश्वर २।११।३७-३८ ) सुसंगतपणे योजतात. एका श्लोकासाठी दोन ओव्या खर्च होऊनही हा संक्षेपच म्हणावा लागतो. मूलानुसार वक्ता बदलला असता तर आनुषंगिक निवेदनाच्या ओव्या आणखी वाढल्या असत्या. संभाव्य विस्तार टाळून संक्षेपाने येणारी सारगर्भता मुक्तेश्वरांनी येथे अचूकपणे आणली आहे.

कधी एका व्यक्तीचे दीर्घ भाषण त्यातील विचारभावाच्या टप्प्यानुसार ते वेगळे करतात. अनुद्यूतासाठी दुर्योधनाने धृतराष्ट्रास केलेले कथन असे दीर्घ ( महाभारत २।६६।७-२३ ) आहे. मुक्तेश्वरांनी ते फोडून व अंतराने ( मुक्तेश्वर २।१६।५-१२ व २।१६।१९-२० ) दिले. मुळातील दीर्घ भाषणाचे खंड पाडल्याने व तसे पाडताना केलेल्या संक्षेपामुळे त्यात सुटसुटीतपणा आला आहे.

नामावळ्यांना एक प्रकारचे ऐतिहासिक महत्त्व असल्याने मूळ आशय अविकृत ठेवून संक्षेप साधण्यासाठी ते त्यातील सजावटीचा भाग टाळतात. नमुन्यासाठी शिशुपालने सुचविलेली पूजनीय सभासदांची यादी ( महाभारत २।४१।८-१३ मुक्तेश्वर २।११।२३-२५ ) पाहण्यासारखी आहे.

मुळातील आशय साधण्यासाठी ते कधी क्रियापदे गाळतात. तरीही त्यांचा संक्षेप दुर्बोध झालेला दिसत नाही. राजसूययज्ञसमाप्तीच्या ३ श्लोकांचा (मभा २।४२।३२–३४) आशय एका ओवीत ते पुढीलप्रमाणे मांडतात—

विघ्नासी शांति सुखासी वृद्धी । अन्न दक्षिणा बहु समृद्धी
कृष्णें रक्षिला तो सिद्धी । राजसूययज्ञ पावला ॥ २।११।७३

यज्ञाची अनेकांगी वैशिष्ट्ये मोठ्या खुबीदारपणे मुक्तेश्वरांनी एकत्र आणली आहेत. श्रीकृष्णप्रयाणाच्या वर्णनात धर्मास अनुज्ञा मागणे ( मभा २।४२।४६ ), कुंतीजवळ तिच्या पुत्रांचे कौतुक करणे ( २।४२।५१–५२ ) आणि धर्मास उपदेश (२।४२।५८–५९ ) असे कृष्णाचे तीन ठिकाणचे बोलणे तीन ओव्यात ( मुभा २२।११।७७–७९ ) नेमकेपणाने आणले आहे. आटोप कसा साधावा आणि संक्षेप कसा करावा याचा हा चांगला नमुना आहे. मूलानुसारी पण यथार्थ संक्षेप मुक्तेश्वर कसा करतात, ते पहावयाचे तर भगदत्ताच्या भाषणाचा ( मभा २।२३।२०–२३ मुभा २।८।१४–१५ ) संक्षेप पहावा. विशेषणे व संबोधने यांनी मुळाचा सारा अर्थ त्यांनी ठासून भरला आहे. कृष्णनिंदा (मभा २।३८।१–४०, २।३९।१–८ मुभा २।१०।१३४–१५४) वा विदुराचा द्यूतविरोध ( मभा २।५५।१-१७, २।५६।१–१० मुभा २।१४।९४–१०९ ) हेही नेटक्या संक्षेपाचे नमुने आहेत. संक्षेपामुळे वनपर्वात त्यांच्या लेखनात सारगर्भतेने सौंदर्य अवतरते. "समंत्रबीजे मंत्रमूर्ती । मृत्युदाती वैरिया" ( ३।१७।४८ ) यातून इंद्रदत्त शक्तीचे स्वरूप मूर्त होते. "अतिशीतल आणि सुस्वाद । अमृतोपम सुवासे" ( ३।१८।१९ ) अशा ओळीतून यक्षसरोवराच्या जलाची चव जीभेवर रेंगाळू लागते. इंद्रादी देवांची रेखलेली सुबक व संक्षिप्त चित्रे ( ३।५।२–८ ) या दृष्टीने पाहण्यासारखी आहेत.

मोठ्या प्रमाणावर संक्षेप असूनही मुक्तेश्वरी वनपर्व आपली रसमयता टिकवून आहे, याचे ठळक कारण मुक्तेश्वरांच्या संक्षेपदृष्टीत व विशिष्ट संक्षेपपद्धतीत आहे. शब्दांच्या मितव्यय साधण्याकडे ते फारसे लक्ष देत नाहीत. त्यामुळे तशा सारगर्भतेने येणारी क्लिष्टता त्यांच्या लेखनात येत नाही. संक्षेप करताना ते गौण-प्राधान्याचा विवेक करतात. मुळातील ४५ अध्यायातील कथाभाग ११ व्या अध्यायाच्या पहिल्या १० ओव्यांत ते आटोपतात, आणि त्याच अध्यायात मूळ श्लोकांचे दुर्वासभोजन ( मभा, ३। परि. १ क्र. २५ ) मात्र १५२ ओव्यांत नवी भर टाकून समरूप विस्ताराने रंगवितात. कुंडलाहरणपर्वाचे ११ अध्याय ( ३। अ. २८४–२९४ ) ते १७ व्या अध्यायाच्या ६१ श्लोकात सुलभपणे बसवितात. त्यात कर्णजन्माच्या विस्तृत हकीगतीपेक्षा कर्णाची मूल्यनिष्ठा आविष्कृत करण्याकडे अधिक अवधान पुरवितात. सगळेच संक्षेपाने सांगून रुक्ष करण्याऐवजी मुक्तेश्वर काही भाग रसाळपणे व विस्ताराने रंगवितात आणि बाकीचा भाग केवळ निर्देशाने संपवितात. त्यामुळे कथेची रसवत्ता टिकवून तिच्या संक्षेप-विस्तारात ते एक प्रमाणबद्ध तोल राखू शकतात.

## सहा ॥ संक्षेपाचा परिणाम

संक्षेपाचा मूलकथनावर काही ना काही परिणाम होतोच. द्रौपदीचे कृष्णास वृत्तकथन ( मभा ३।१३।४३–११३ ) वगळल्याने " न भ्रातरो न च पिता नैव त्वं न च बान्धवाः" असे तिच्या अंतःकरणातील उमड अव्यक्तच राहिले आहेत. मुळात सुटे असलेले पंचपांडवांचे पण मुक्तेश्वरांनी एकत्र करून ( मभा २।५८।११–२८ मुभा २।१४।१४७–१५७ ) वर्णिले. पण तसे करताना " भिन्न भिन्न अनुवादे " ( २।१४।१४७ ) असे म्हणून मुळात कसे सांगितले आहे, तेही ते सुचवितात. मुळाला धक्का न लावता त्याचे अविकृत सौंदर्य खुलत्या छटांनी पांडववर्णनात आणले आहे. तथापि पंचपांडवांच्या पणात महाभारतकारांनी कापट्य, शकुनीचे डिवचणे, पांडवात फूट पाडण्याचा प्रयत्न, जुगाऱ्याच्या बेहोष नशेचे व झिंगण्याचे सूचन, असे जे धागे मिसळले आहेत ते मुक्तेश्वरांनी हे सारे पण एकत्र केल्यामुळे निसटले आहेत.

महाभारत " काव्यरसाचा ठावो " आहे. व्यासप्रतिभेची कल्पनाकुसुमे तेथे सर्वत्र उमलली आहेत. भारतकथासंक्रमणात अशा काही चांगल्या कल्पना मुक्तेश्वरांकडून वगळल्या गेल्या आहेत. २।५।२४ मधील कल्पना २।३।८८ मध्ये आली असली तरी " पण्डितो ह्यर्थकृच्छ्रेषु कुर्यान्निःश्रेयसं परम् । " हा तिचा मार्मिक उत्तरार्ध वगळला आहे. कृष्ण गेल्यावर पांडव आधी डोळ्यांनी आणि नंतर मनाने त्याच्या मागे गेले ( मभा २।२।२१ ) अशा कल्पना, सजल मेघाप्रमाणे आक्रोशणाऱ्या बाल जरासंधाचे स्वभावोक्तिपूर्ण चित्र ( २।१६।४२ ) किंवा रागावलेल्या भीमाचे रौद्र दर्शन ( २।६३।१५ ) त्यांच्या हातून सुटले आहे. दयेने, रूपसंपत्तीने आणि शीलसंपत्तीने पुरुषाला स्त्री जशी असावी असे वाटते तशी ( २।५८।३४ ), हा द्रौपदीवर्णनाचा मार्मिक तुकडा निसटला आहे. कधी भेदक विचारसूत्रेही दुर्लक्षिली गेली आहेत. मनुष्य निंदा आणि स्तुती यांची योजना करतो तीवरून त्याच्या मनाचा ओढा दुसऱ्याकडे आहे हे समजावे. तुझे मन कसे आहे हे तुझी जिव्हाच स्पष्ट करीत आहे ( २।५७।२ ). असह्य भाषणाने मनुष्य शत्रू होत असतो (२।५७।५). जो प्रथम एखाद्याशी मैत्री जोडून मागाहून त्याला दोष देतो, तोच मूर्ख ( २।५७।१४ ). या जगात गोड बोलणारा पापी पुरुष सहज सापडतो परंतु अप्रिय पण हितकारक बोलणारा आणि ते ऐकणारा दोघेही दुर्लभच ( २।५७।१७ ), यांसारखी तळहातीच्या आवळ्यासारखी लोकव्यवहाराची व्यासदर्शने मुक्तेश्वरी रचनेत गाळली गेली आहेत. अर्थात त्याची उणीव स्वतंत्र सुभाषितात्मक रचनेने भरून काढण्याची धडपडही मुक्तेश्वरांनी केली आहे, हे येथे नमूद केले पाहिजे. कल्पकता व मार्मिकता यांच्या व्यासप्रतिभेच्या अशा पाऊलखुणा मुक्तेश्वरी भारतात पूर्णत्वाने उमटू शकल्या नाहीत. व्यासांच्या विचारमंथर वाणीची चमकही कधी नजरेआड झाली आहे. मुळातील विचार–भाव–कल्पनांचा मुक्त स्वीकार करणाऱ्या मुक्तेश्वरांनी या आणि अशा कल्पना गाळावयास नको होत्या, असे रसिकाला कितीही वाटले तरी प्रदीर्घ काव्यरचनेत तसे

होणे अपरिहार्य असते हेही त्याला पटते.

संक्षेपाचे असे परिणाम स्वाभाविक व आपाततः घडणारे आहेत. तथापि कथादृष्ट्या वा काव्यरूपदृष्ट्या एखादा महत्त्वाचा भाग अनुल्लेखित राहणे हा संक्षेपाचा गंभीर परिणाम म्हणावा लागेल. धर्माने तुला हरविले. तेव्हा सभेस चल ( २।१५।८–९ ) या प्रतिकामीच्या बोलण्यावर मुक्तेश्वरांची द्रौपदी " आधी जिंकोनि धर्मरावो। मग टाकिला माझा डावो। तोही प्रमाण दिसेना " ( २।१५।१३ ) असे म्हणते. त्यास आधार काय? मुळातील प्रतिकामीच्या बोलण्यातील संबद्ध भाग वगळल्याने मुक्तेश्वरी रचनेत द्रौपदीचे बोलणे अचानक उद्भुत झाल्यासारखे वाटते. आकाशवाणीद्वारा मृत्युसूचना ( सभा २।४०।४–५ ) मिळाल्यावर शिशुपालमाता वधकाविषयी पृच्छा करते. मुक्तेश्वरी रचनेत मृत्युसूचना गाळल्याने मातेने त्याविषयी विचारावे ( २।११।८ ) हे सुसंगत वाटत नाही. अशा गाळलेल्या भागामुळे रचना वैरस्यकारक होते. "**सांगो विसरला व्यास कवी**" असे लाडिवाळ धिटाईने म्हणून मुक्तेश्वरी व्यासरचनेतील त्रुटित धागे कथासंगतीच्या दृष्टीने सावरून घेतात. पण "**सांगो विसरला मुक्तेश्वर कवी**" अशी स्थळे त्यांच्याही रचनेत आहेत. संक्षेपाचा तो एक अनुषंगिक परिणाम आहे.

अशी काही स्थळे वगळता संक्षेपामुळे मूलकथनाची हानी झाल्याचे दिसत नाही. संक्षेपामुळे त्यांच्या पर्वांना पृथक वाङ्मयरूप आले आहे. कथेला वेग-ओघ लाभला आहे. महाभारताचा कालपक्व भाग वगळल्यामुळे त्याचे रूप अधिक जिवंत राहिलेले दिसते.

## सात || संक्षेप : समारोप

पाल्हाळ, पुनरुक्ती, विसंगती या सर्वांमुळे महाभारताच्या प्रमाणबद्धतेला ढळ पोहोचला आहे. हे महाकाय महाकाव्य मराठीत आणताना माधवस्वामीसारखा एखादा अपवाद वगळता बहुंश मराठी महाभारतकारांप्रमाणे मुक्तेश्वरांनीही संक्षेप कथनाची भूमिका स्वीकारली आहे. विस्ताराची अव्यवहार्यता व कथेच्या बांधीवपणावरील कटाक्ष या जाणीवा त्यामागे दिसतात. वृत्तात्मक भागाचा संक्षेप आणि रसपूर्ण भागाचा विस्तार या विषयीचे पूर्वनियोजन त्यांच्या मनात जागे असल्याच्या खुणा त्यांच्या रचनेत दिसतात.

संक्षेपभूमिकेचा उच्चार करूनही सौतिक, आदि व सभा या पर्वांत मुक्तेश्वरांनी त्याचा फारसा आचार केलेला दिसत नाही. मुक्तेश्वरांनी आपल्या समोरच्या भारतप्रतीतील श्लोकांचे दिलेले आकडे व त्यासाठी खर्चिलेल्या ओव्या पुढीलप्रमाणे आहेत : आदिपर्व ८९८४ श्लोक ६९९२ ओव्या ( किंवा ७१२३ ), सभापर्व २७११ श्लोक २६२५ ओव्या, सौतिक ८७० श्लोक ५०० ओव्या. यावरून महाभारताचे जवळजवळ समरूप विस्ताराने कथन करण्याचा त्यांचा प्रयत्न स्पष्ट होतो. पण ११,६६४ श्लोकांचे विस्तारशील वनपर्व सामोरे येताच समरूप विस्ताराकडून संक्षेपाकडे ते वळले. वनपर्वाचा प्रचंड विस्तार, त्यातील आख्यानोपाख्यानांची दाटी, मुख्य कथासूत्रापासून दूरान्वित

अशा आख्यानात्मक व उपदेशात्मक भागाची गर्दी, “ आयुष्य न पुरे तेथें आशा। कैची पुढील कथेची ” ( ३।११।७ ) असा धसका, मराठी श्रोतृमानसाची प्रकृती व रुची अशा अनेक वाङ्मयीन व व्यावहारिक गोष्टींनी मुक्तेश्वर वनपर्वापासून संक्षेपाकडे वळलेले दिसतात. ११,६६४ श्लोकांचे वनपर्व २७६५ ओव्यांत व १८३४ (पर्वसंग्रहाप्रमाणे २०५०) श्लोकांचे विराटपर्व ९९१ ओव्यात वर्णिलेले पाहिले की मुक्तेश्वर विस्तारापासून संक्षेपाकडे कसे झुकत गेले, ते स्पष्ट होते. याचा परिणाम आदि-सभा-सौतिकात मुळाचा महाकाव्यात्म बाज संभाळणारे मुक्तेश्वरी भारत वन-विराटात आख्यानकाव्याकडे झुकण्यात झाला.

वनपर्वाचा अपवाद वगळता वर्जनाचा मार्ग मुक्तेश्वर कमी प्रमाणात वापरतात. बारीकसारीक संभाषणे, किरकोळ तपशील, प्रास्ताविक निर्देश ते वगळतात. प्रसंगाच्य गौणप्रधानतेच्या कविदृष्टीभिन्नतेने काही वर्णनप्रसंग वगळले जातात. मुळातील अध्यात्म-नैतिक कल्पनांचा ते विस्तार करतात तर राजनीतीविषयक संदर्भाचा संक्षेप करतात. पुनःकथन टाळून कथेचा ओघ वाहता ठेवणे, प्रसंगाचा रोख व चित्रणपद्धती यांत बदल करणे, त्यांतील गौणप्राधान्याचा रसानुबंधी विवेक करणे, महाभारताचा बाह्यस्वरूप-निष्ठ भाग टाळणे, दुय्यम दर्जाचा गौण तपशील गाळणे, ही त्यांनी केलेल्या वर्जनाची कारणे. ती आशयनिष्ठ असण्यापेक्षा मुक्तेश्वरांच्या निवेदनशैलीशी व काव्यदृष्टीशी संबद्ध आहेत. त्यामुळे व्यक्ती म्हणून मुक्तेश्वरांच्या आवडीनिवडीचे प्रतिबिंब त्यात पाहता येणार नाही. कवी म्हणून त्यांच्या काव्यदृष्टीचे व काव्यतंत्राचे दर्शन मात्र त्यात घडते. महाभारताचे आर्ष, संमिश्र, अनेकांगी, विविध संदर्भसमृद्ध वाङ्मयरूप त्याच्या प्राकृतिक वैशिष्ट्यांसह जपण्याचा प्रयत्न असल्याने आशयसापेक्ष वर्जन मुक्तेश्वरांनी टाळले आहे असे म्हणता येईल.

सारकथनाचा मार्ग मुक्तेश्वरांनी प्राचुर्याने वापरला आहे. भावतीव्रतेसाठी विचार-चर्चा-माहिती देणारे भाग ते संक्षेपितात. समकालीन जीवनाशी संबंध तुटलेला आणि म्हणून श्रोत्यांना आवाहक ( evocative ) होऊ न शकणारा भाग–मग तो धर्मसंबद्ध असला तरी-त्यांनी साररूपाने सांगितला आहे. संक्षेपित भागाच्या आशयाविषयी वृत्ति-निदर्शक असे आणखी काही सांगण्यासारखे नाही.

नवप्रसंगाचा समावेश करण्यासाठी मूलप्रसंगाचा यथाप्रमाण संकोच करावा, संमिश्र भावच्छटेतील एखादीच ठसठशीत करावी, मुळापेक्षा वेगळ्या काव्यप्रयुक्तींनी ( Literary device ) मूलाशयाची हाताळणी करावी, कथाबंधाच्या चित्राकृतीत पात्रांना प्रमाणबद्ध स्थान लाभावे. या प्रेरणाही संक्षेपामागे दिसतात. त्या कविदृष्टीशी व काव्यरूपाशी संबद्ध आहेत. त्याद्वारे ते कथौघ अखंडित व गतिशील ठेवतात. त्यामुळे कथाप्रसंगास भावतीव्र करण्याचे तंत्र त्यांना वापरता येते.

संबद्ध अंशभागांचे–वर्णन–संभाषणांचे–एकीकरण, दीर्घखंडाचे एकापेक्षा अधिक लघुखंडात रूपांतर करणे, मूलाशय अविकृत ठेवून सजावटीचा भाग टाळणे आणि

अगदी क्वचित शब्दांचा मितव्यय ही संक्षेपसाधने ते वापरतात. गौण भाग संक्षेपाने व प्रधान भाग विस्ताराने वर्णिल्याने रसमयता टिकवून संक्षेप–विस्तारात मुक्तेश्वर एक समतोल साधू शकतात.

मूलकथनाचे धागे निसटणे, मोहक कल्पना व भेदक विचारसूत्रे वगळणे हे संक्षेपाचे काही परिणाम होत. महत्त्वाच्या भागाच्या अनुल्लेखाने कथेत विसंगती व काव्यरूपात दुभंगलेपण येते. अशी स्थळे विरळ असली तरी मुक्तेश्वरी रचनेत सापडतात. अयशस्वी संक्षेपामुळे येणारी संदिग्धता, क्लिष्टता, दुर्बोधता आणि अपूर्णता मुक्तेश्वरी रचनेत अतिविरळ आहेत. अशी स्थळे वगळता संक्षेपामुळे मूलकथनाची हानी झालेली दिसत नाही. संक्षेप कसा करावा आणि आटोप कसा साधावा यांचे नमुने त्यांच्या भारतात विपुल आहेत. संक्षेप किंवा तद्विषयक कौशल्य यांचा संबंध रसप्रकर्षापेक्षा रसापकर्ष टाळण्याशी आहे. याबाबतीत मुक्तेश्वर यशस्वी झाले आहेत असे म्हणता येईल.

मोरोपंत संक्षेपकुशल म्हणून प्रसिद्ध आहेत. समास, संख्यांची बेरीज, अनेक कर्त्यांसाठी एकाच क्रियापदाची योजना, मूळ क्रियेचे प्रयोजक वापरणे, कर्त्याच्या हस्तकाचा उल्लेख ही मोरोपंतांची संक्षेपसाधने त्यांची वाणी मिताक्षरा बनण्याच्या प्रयत्नात कशी धडपडत होती याची निदर्शक आहेत. या शाब्दिक काटकसरीकडे मुक्तेश्वरांचे फारसे अवधान नाही. संवादातील उत्तर-प्रत्युत्तरांचे एकीकरण व दृष्टांतवापर हेच काय ते मोरोपंती संक्षेपमार्ग मुक्तेश्वरी पद्धतीशी काहीसे जुळते आहे. तत्त्वचर्चा, उपाख्याने, वर्णने, भारतकथासारकथन, नामावळी, पुनरुक्ती, स्तुती, प्रास्ताविक प्रश्नोत्तरे व फलश्रुती सांगणारे ३४००० श्लोक म्हणजे मुळाच्या दोनपंचमांश भाग[४] मोरोपंतांनी पूर्णपणे वगळला आहे. मोरोपंतांचे वर्जन असे आशयनिष्ठ आहे. त्याचप्रमाणे ज्या संक्षेपकौशल्याबद्दल पंतांची प्रसिद्धी आहे त्या संक्षेपासाठी संपूर्ण वर्जनावर त्यांनी किती भर दिला ते लक्षात घेण्यासारखे आहे. भारतकथेशी पंत अधिक प्रामाणिक असले तरी महाभारताच्य आर्ष, संमिश्र व महाकाव्यात्म रूपाला ते जपू शकलेले नाहीत. हे रूप जपण्याकडे मुक्तेश्वरांनी अधिक अवधान दिले, असे निदान सौप्तिक, आदि व सभा या पर्वांबद्दल म्हणता येईल. आर्यावृत्ताची व मराठी भाषेच्या अर्थव्यक्तीची कसोटी मोरोपंतांत तर भावशील प्रतिभावंताचा कस मुक्तेश्वरांत दिसतो. मोरोपंतांचा संक्षेप आशयनिष्ठ, कथानुवर्ती आहे तर मुक्तेश्वरांचा संक्षेप काव्यरूपनिष्ठ, रसानुवर्ती आहे. आपआपल्या परीने दोघांनीही महाभारताचे सौष्ठवपूर्ण देशिकार लेणे कोरले आहे.

---

४. गणनेसाठी पहा–स. वि. सहस्रबुद्धे, "मूळ महाभारत व आर्यभारत यांची तुलना", पदवीप्रबंध (टंलि.,) मुंबई विद्यापीठ, १९४६–४७. कोष्टक क्र. ५ पृ. ८५.

□ □ □

# दोन ॥ भारतकथासंक्रमण : विस्तार

## एक ॥ विस्तार : स्वरूपविवेचन

मुक्तेश्वरी भारत मूळ महाभारताच्या तुलनेने काही ठिकाणी विस्तारलेले दिसते. असा विस्तार गणितप्रमाणाने ठसठशीतपणे लक्षात येत असला तरी तो नेहमीच निर्णायक ठरत नाही. संख्याप्रमाणात शब्दांची बहुर्थकता आणि व्यंजकक्षमता दुर्लक्षिली जाते. छंदाचाही या संबंधात विचार केला पाहिजे. मुळातील अनुष्टुभ व मुक्तेश्वरी ओवी पुष्कळच समरूप मानता येईल

संस्कृत आणि मराठी या भाषांच्या अर्थव्यक्तीक्षमतेत फरक असल्याने तोच आशय आणताना मराठी रचना क्वचित समसंख्य आणि बहुधा कमीअधिक होते. मुळाचा सारा बाज सांभाळण्याच्या प्रयत्नात होणारा असा विस्तार भाषिक भेदामुळे होत असल्याने त्यास समरूप विस्तार म्हणता येईल.

विस्ताराविषयीच्या नांदापूरकरांच्या एका मताचा येथेच परामर्श घ्यावयास हवा. पुनरुक्ती, स्तुती, वनश्री, कालचक्र, वंशावळी, तात्त्विक चर्चा, नामावळी, पाल्हाळिक भाषणे "मराठी कवींच्या उद्देशाकडे लक्ष देता कथेच्या दृष्टीने अनावश्यक आहेत. ते भाग मराठी रचनेत समग्र वा भारताहून थोडे उणेही असले तरी ते वास्तविक मराठी वाचकांच्या दृष्टीने विस्तारातच गणले पाहिजेत"[१] नांदापूरकरांचे हे म्हणणे केवळ कथानुवर्ती संक्षेपाच्या दृष्टीने ठीक असले तरी महाभारताचे आर्ष महाकाव्यात्म रूप जपू पाहणारांना तसे वाटणार नाही. महाकाव्याच्या संमिश्र प्रकृतीचे हेही अंशभाग असतात. त्यामुळे मूलानुसारी हा भाग आला तर त्यास विस्तार मानता येणार नाही.

विस्तार शब्दाचा एक अर्थ व्याप्ती–पसारा असा आहे. मुळाच्या मराठी अवतरणात काही स्थळे फुलविली जातात. "बहुधा प्राकृत कवी मुळातील मुख्यार्थाला बाध न आणता आपली रचना सरस, प्रौढ करण्यासाठी गौणार्थाला ऊपवारित करून आपल्या पदरच्या गोष्टी घालतात. या ठिकाणी तो महत्त्वाचा भाग हाच त्यांचा वर्ण्यविषय असतो. आपल्या वर्णनशैलीने, प्रासंगिक विचारांनी, समयोचित संभाषणांनी आणि मनोरम कल्पना विलासाने कवी तो विषय सजवितात."[२] अशा ठिकाणी मूळ आशयाचा

---

१. ना. गो. नांदापूरकर, "मुक्तमयूरांची भारते", हैदराबाद, १९५६, पृ. ४००.

२. ना. गो. नांदपूरकर, "मुक्तमयूरांची भारते." पूर्वोक्त, पृ. ३९९.

व्याप वाढतो. तो अधिक विस्तृत होतो असे म्हणता येईल. मुळाची सुसंगत वाढ काव्यशैलीभेदाने व आशयरुचीने होते. त्यास वृद्धिजन्य विस्तार म्हणता येईल.

वाढ-विकास असाही विस्ताराचा एक अर्थ आहे. मुळाचा विकास साधण्यासाठी नवी व स्वतंत्र भर टाकली जाते तेथे प्रतिभाजन्य विस्तार म्हणता येईल. पण त्याचा विचार नवनिर्मितीत करणे अधिक योग्य ठरेल.

विस्तार ही संक्षेपाच्या विरोधी प्रक्रिया आहे. संक्षेपाने लाघव येते तर विस्ताराने सर्वस्पर्शित्व येते. संक्षेप बिघडला तर रसबाधक होतो आणि साधला तर रसापकर्ष टळतो. विस्तार फसला तर रसबाधक होतो आणि साधला तर रसोत्कर्ष होतो. अशाप्रकारे संक्षेप हे अभावात्मक ( negative ) तर विस्तार हे भावात्मक ( positive ) मूल्य आहे. म्हणून कविप्रतिभेची पाहणी करावयाची ती विस्तारावरून. संक्षेपात कर्त्याच्या अभिरुचीचे अभावात्मक रूप दिसते तर विस्तारात तिचे भावात्मक रूप प्रतिबिंबित होते.

संक्षेपकथनाची भूमिका आणि विस्तारभीरुतेची वृत्ती व्यक्तवूनही मराठी महाभारतकार विस्ताराकडे झुकण्याची अनेक कारणे असली तरी विस्तारात कविप्रतिभेला मिळणारा अवसर हेच त्याचे मूलकारण असले पाहिजे. विस्ताराने कवी मुळातील अव्यक्ताला व्यक्त करीत असतो. अनुक्ताला उद्‌गार देत असतो. त्यामुळे जे मुळात बीजरूपाने असते ते स्वतंत्र व समृद्ध होऊन नांदू लागते. पुनर्निर्मित ग्रंथाबाबत तरी अशा विस्तारातच कवीचा प्रतिभाविलास तपासावयास हवा. कविप्रकृती, त्याची काव्यदृष्टी, त्याचे काव्यप्रयोजन यावरच विस्ताराची दिशा ठरते. विस्ताराची प्रत कविप्रतिभेच्या वकुबावर आणि कस विस्तारित कृतीच्या रूपसौष्ठवावर ठरतो.

## दोन || समकालीन वाङ्मयीन प्रवृत्ती : विस्तारशीलता

चौदाव्या शतकात महाराष्ट्राचा स्वातंत्र्यदीप मालवला आणि मध्ययुगातील काळोख्या पर्वास प्रारंभ झाला. सार्वत्रिक भयंकर दुष्काळ आणि परक्या राजवटीचा करडा अंमल यामुळे सामाजिक संस्थांचा उच्छेद झाला आणि या "अस्मानी-सुल्तानी"खाली महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन चिरडले गेले. स्वधर्म, स्वदेश व स्वभाषा यांना उतरती कळा लागली. देवालयांचा विध्वंस झाला आणि कीर्तनासारख्या लोकाभिमुख संस्था मंदावल्या.

याचा परिणाम म्हणून कीर्तनाश्रयी वाङ्मय श्रोतृनिरपेक्षपद्धतीने घरी बसून लिहिले जाऊ लागले. ते अभंगबंधाकडून ओवीबंधाकडे आणि लघुतेकडून दीर्घतेकडे वळले. सार्वत्रिक मूल्यउद्‌ध्वस्ततेच्या कालखंडात परंपरेचे रक्षण करणे एवढेच या लेखकांना शक्य होते. ती त्यांनी जपली आणि वाहती ठेवण्याचा प्रयत्न केला. परंपरेत प्रतिष्ठा पावलेले धर्ममान्य ग्रंथ विस्तृत रूपात मराठीत आणणे ही या कवीची मुख्य प्रेरणा होती.

टीका-भाष्य ( जसे, सहजानंद-योगवासिष्ठ, एकनाथ-एकादशस्कंध ), संस्कृत पुराणे ( जसे, शिवकल्याणांचा दशमस्कंध ) संस्कृत कथात्मक वाङ्मय ( जसे, महालिंगदासांची वेताळपंचविशी) विस्तृत रूपात मराठीत आले, त्याप्रमाणे रामायण-महाभारतादी आर्ष महाकाव्यांची प्रदीर्घ संस्करणेही याच काळात अवतरली. एकनाथांचे भावार्थ रामायण, कृष्णदास मुद्‌गलाचे युद्धकांड, कृष्ण याज्ञवल्की-मधुकर यांचे कथाकल्पतरुंतर्गत महाभारत आणि विष्णुदास नामा व मुक्तेश्वर यांची भारतरचना ही विस्ताराकडे झुकलेली रचना आहे. संस्कृत भाषा व ग्रंथ यांचे महत्त्व न नाकारता मराठी समृद्ध करण्याचा समंजसपणा व सामर्थ्य या लेखकांजवळ होते. भाष्यग्रंथांच्या प्रेरणेशी संवादी असलेल्या प्रेरणेनेच आर्षकाव्यांचे अवतरण घडत होते आणि मराठी लोकसमाजाची आवश्यक गरज भागवीत होते.

विस्तारभीरुता दर्शवीत असतानाही ही सारी रचना प्रकृतीने विस्तारशील बनली याची अनेक कारणे नोंदविता येण्यासारखी आहेत. तत्त्वसूत्राची कथात्म स्पष्टीकरणे म्हणून या महाकाव्यांकडे पाहिले गेले. त्यामुळे भक्तिमाहात्म्याच्या अंगाने त्यांचा विस्तार होणे अटळ बनले. तत्त्वचर्चा, व्यावहारिक बोध आणि नैतिक उपदेश कवींनी स्वीकारलेल्या लोकशिक्षकाच्या भूमिकेमुळे समाविष्ट झाला. समकालीन जीवनाचे भरण-पोषण व उन्नयन वाङ्मयाद्वारे व्हावे अशा स्पष्टास्पष्ट प्रेरणेने त्यात समकालीन जीवनाचा संदर्भ गुंफला गेला. संस्कृत आर्षकाव्यांचें मराठी संस्करण सादर करताना पूर्वकवींचा – कालिदासादी संस्कृत व ज्ञानदेव, नामदेव, जनाबाई, नामा पाठक आदी प्राकृत कवींचा आधार घेण्यात आला. या कवींच्या भिन्नप्रकृतीलेखनातील कल्पना, भावच्छटा व कथानकातील फेरफार वाढीव भागासह पुढीलांनी स्वीकारल्या. पद्म-स्कंद-भागवतादी पुराणग्रंथातील संबद्ध अंश सामावून घेण्यात आले. एकाच कथेची विविध आविष्कारातील अनेक रूपे एकाच कथेचे अंश समजून स्वीकारण्यात आली. काहींचे ज्ञान इतके अपुरे की मूळ काय आणि उत्तरकालीन ग्रंथातील भर काय याची निवड करता न आल्याने त्यांनी पौराणिक ग्रंथावरील श्रद्धेने सारेच नमस्कारुन स्वीकारले. कधी या उलट म्हणजे पुराणग्रंथांच्या व्यासंगाचा तोरा मिरवीत अनेक संदर्भांनी कथेला समृद्ध करण्यात आले. मूल घटनेचे विलक्षण स्वरूप अन्य ठिकाणच्या वाढीव भागातून स्पष्ट करता येत असल्याने त्याचा जाणीवपूर्वक उपयोगही कधी करण्यात आला. त्यामुळे साहजिकच कथानकाचा विस्तार झाला. पूर्वकवींची भर स्वीकारताना स्वतःची भरही स्वाभाविकपणे पडत गेली. कथानकाच्या संदर्भात काटेकोर मूलानुसरणापेक्षा रचनास्वातंत्र्य घेण्याची प्रवृत्ती या विस्तारामागे दिसते. अलंकारजन्य कल्पनाविलास व व्युत्पत्तिदर्शक वर्णने यामुळेही त्यांची काव्ये विस्तारली आहेत.

प्राचीन मराठी वाङ्मयाच्या द्वितीय कालखंडाच्या उत्तरार्धात ( इ. स. १५६५–१६५० ) परंपरा-रक्षणासाठी श्रोतृमनाची सांस्कृतिक गरज भागविणारी आर्षकाव्यांची मराठी संस्करणे अवतरली. परिस्थितीजन्य प्रेरणा, पूर्वकवींचे ऋण, रचनास्वातंत्र्य,

समावेशकता, सालंकृत निवेदन आणि वर्णनाप्रियता यामुळे ती विस्तृत झाली. यादव-काळापेक्षा एकनाथकाळातील वाङ्मय विस्तारप्रवण व विस्तारशीलतेकडे अधिक झुकलेले आहे. मुक्तेश्वरी भारत हे या विस्तारप्रवृत्तीचे प्रातिनिधिक आहे.

## तीन || सभापर्व : समरूप विस्तार

सभापर्वात काही अध्याय जवळजवळ समरूप विस्ताराचे आहेत. अध्याय १६ व १७ मध्ये सभापर्वातील कळसाला पोहोचणारे रौद्रभीषण नाट्य संपते आणि क्रोध-क्रौर्य, दुःख-वेदना, शोक-हळहळ, संताप-अनुताप यांच्या भावलहरी हेलावत राहतात. हा भाग किंचित संक्षेपाकडे झुकणाऱ्या समरूप विस्ताराने मुक्तेश्वर रंगवितात. भीम-जरासंधाची सामोरी साधणारा अद्‌भुताने मंतरलेला व वीरोचित उत्साहाने नटलेला भाग मूळ १६३ श्लोकांशी समरूप अशा १६२ ओव्यात त्यांनी सांगितलेला आहे. दुर्योधनविषादाचा बारावा अध्यायही २४६ ओव्यांनी मूळातील २५४ श्लोकांची मजल जवळजवळ गाठतो. लोकपालसभाख्यानातील इंद्रसभा, यमसभा, वरुणसभा यांसारखी वास्तुवर्णने, नकुल-दिग्विजयासारखी युद्धवर्णने आणि युधिष्ठिराच्या राज्याभिषेकासारखी उत्सववर्णने मुक्तेश्वरांनी मुळाइतक्याच विस्ताराने वर्णिली. अनुद्यूतासारखे महत्त्वाचे प्रसंग वा प्रसंग-दृष्ट्या महत्त्वाचे असणारे शिशुपालाचे विरोधभाषण ( मभा २।३४।१–२३ मुभा २।१०।८१–१०१ ) ते सदृश विस्ताराने रंगवितात.

## चार || सभापर्व : मूलसंबद्ध वृद्धिजन्य विस्तार

व्यक्ती म्हणून प्रिय वाटणारा आणि कवी म्हणून लक्षणीय वाटणारा मुळातील भाग साहजिकच विस्तारला जातो. त्यामुळे अशा भागाच्या निरीक्षणातून कवीचे व्यक्तिमत्त्व व काव्यदृष्टी आविष्कृत होते. महाभारतासारख्या वस्तुनिष्ठ महाकाव्याच्या अवतरणातही मुक्तेश्वरांच्या व्यक्तिमत्त्वाचे व काव्यदृष्टीचे तरळते प्रतिबिंब पडलेले दिसते.

मानससरोवराचा केवळ निर्देश आला तरी ते त्याचे पाच ओव्यांत वर्णन करतात ( मभा २।२५।४ मुभा २।८।२९–३३ ). त्यामागे पारंपारिक हिंदु मनाची श्रद्धा असावी. या वर्णनावर स्वतंत्रपणे पसरून दिलेली अद्‌भुताची छाया त्यांच्या तद्विषयक आवडीची द्योतक आहे. भीम-जरासंध मल्लयुद्ध वर्णिताना वीरभोक्त्या मुक्तेश्वरांच्या वाणीला बहर येतो. विक्रमाबरोबर विलासाचेही त्यांना आकर्षण आहे. नीलकन्या आणि अग्नी यांचा प्रणय फुलविल्याने २७ श्लोकांचे नीलोपाख्यान ३८ ओव्यांत विस्तारले आहे. विक्रम-विलासाकडे ओढल्या जाणाऱ्या मुक्तेश्वरांच्या मनाला विरक्तीचाही ध्यास आहे. अध्यात्माची ओढ आहे आणि तत्त्वविचार प्रिय आहे. व्यासांचे भविष्यकथन ( मभा २। परि १ क्र. ३० मुभा २।१२।७–३७ ) ते अधिक विचारगांभीर्याने मांडतात.

अनुद्यूतार्थ धर्माचे प्रयाण, शकुनीकृत दुर्योधनाची समजावणी, धर्माची राजसूयविषयक पृच्छा अशा किती तरी ठिकाणी मुक्तेश्वरांनी मूळ विचार फुलविला आहे. राजनीतीही त्यांना प्रिय आहे. नारदनीतीचा ( मभा २।५।७-११६ मुभा २।३।१-१५० ) जवळ जवळ दीडपट झालेला विस्तार याद्दष्टीने बोलका आहे. मुक्तेश्वरांच्या भक्तवत्सल अंतः-करणाचे उभड त्यांच्या भारतात जागोजाग खळाळत आहेत. कृष्णागमनाच्या निवेदननिष्ठ मूलवर्णनाचा ते भक्तिस्पर्शित व आध्यात्मिक उपमानांनी आल्हाददायक विस्तार ( मभा २।१२।२८-३१ मुभा २।५।१०५-१११ ) करतात. अग्रपूजेसाठी भीष्माने सुचविलेले कृष्णाचे नाव, भक्तीने भिजलेली अग्रपूजा, द्रौपदीने केलेला करुणार्त धावा आणि दीनवत्सल भगवंताने दिलेला प्रतिसाद अशा अनेक ठिकाणी मुक्तेश्वरांची भक्तिगंगा श्रोत्यांची मनोभूमी सिंचित आहे.

मुक्तेश्वरांच्या व्यक्तिमत्वाप्रमाणे त्यांची काव्यद्दष्टीही अशा विस्तारास कारणीभूत झालेली दिसते.

कथानकाचे बारीकसारीक धागे स्पष्ट करण्यासाठी ते कधी विस्तार करतात. द्यूतसभे-तील रौद्र-भीषण नाट्याचे बीज पांडववैभवाच्या हृदयदाहक प्रदर्शनात व दुर्योधनाच्या फजितीत आहे. त्यामुळे मयसभावर्णनात तिच्यातील अभासमयतेच्या भागाचा विस्तार ( मभा २।३।३० मुभा २।२।५५-५८ ) त्यांनी नेमकेपणे केला आहे. राजसूयप्रसंगी कौरवांचे आगमन व अग्रपूजाप्रसंगी शिशुपालाबरोबर त्यांना वाटलेला गुप्त द्वेष विस्ता-राने वर्णून त्यांनी प्रतिनायकांचे चित्र ठसठशीत केले.

कधी मूळप्रसंगाकडे पाहण्याची मुक्तेश्वरांची द्दष्टी निराळी असते. त्यामुळे प्रसंगाचा रोख बदलतो. त्यानुरोधाने कधी विस्तार होताना दिसतो. धर्माचा राजसूयनिश्चय मुळातील राजधर्माऐवजी पितृप्रेमाने ठरतो. असे ते दाखवितात. त्याचा परिणाम मुळातील तीन श्लोकांची पित्राज्ञा आठ ओव्यातून सांगण्यात होतो.

कथानकातील एखाद्या गोष्टीविषयी वाचकाच्या मनात संशय निर्माण झाला तर संशययोग व संभावनाविरह अशी रसविघ्ने निर्माण होतात. अतिविस्तार व संहितेतील प्रक्षिप्त भाग यामुळे महाभारतात काही स्थळे राहून गेली आहेत. असे आवश्यक धागे सांधण्यासाठी मुक्तेश्वरांनी कधी विस्तार केला आहे. प्रतिकामी धर्माला अनुद्यूताचा निरोप सांगतो ( मभा २।६७।२, मुभा २।१६।२४-२७ ) तो सरळ कथनात्मक आहे. मुक्ते-श्वरांनी त्याच्या स्पष्टता, तीव्रता, कुटुंबनीतीस्मरण, विश्वास व समजावणी अशा अनेक भावच्छटांचे रंग भरून विस्तार केला आहे. त्यामुळे द्यूताने पोळलेल्या धर्माचे पुन्हा अनुद्यूतासाठी माघारी फिरणे अधिक संभवनीय बनले आहे.

कधी मुळापेक्षा वेगळे काव्यमार्ग वापरल्याने विस्तार होतो. जरासंध भीमाची निवड करतो ( मभा २।*२४१ पृ. ११६ मुभा २।७।९-१३ ) हा त्रयस्थ निवेदनाने सांगित-लेला भाग संवादात्मक पद्धतीने मांडल्यामुळे विस्तारला आहे.

वर्णनाची संधी मुक्तेश्वर सहसा सोडत नाहीत. राजसूयभोजनाच्या साध्या निर्देशाचा

ते भरघोस विस्तार ( मभा २।३२।१८ मुभा २।९।९६–१३९ ) करतात. मयसभेसारखी वास्तुवर्णने, नारदागमनासारखी व्यक्तिवर्णने विस्तारशील आहेत.

अलंकारजन्य विस्तार तर वृक्षशाखेवरील पानाफुलांसारखा सर्वत्रच आहे. नारदागमन, कृष्णागमन या साध्या घटनाही अलंकारशैलीने विस्तारतात.

## पाच || अन्य पर्वांतील विस्तार

**आदिपर्व** विस्तारशील प्रकृतीचे आहे. यातील आख्यानस्थळी मुक्तेश्वर रेंगाळतात. आख्यानाचा ते क्वचित संक्षेप पण बहुशः समरूप वा अधिकही विस्तार करतात. उत्तंकाख्यान ( श्लो. १११ ओ. ८२ ), समुद्रमंथन ( श्लो. ८३ ओ. १४१ ), शकुंतलोपाख्यान ( श्लो. ३०५ ओ. ३८२ ), सुभद्राहरण ( श्लो. ११४ ओ. १०६ ), पूर्वउत्तरयायात ( श्लो. ४११ ओ. ६७७ ) ही त्याची बोलकी उदाहरणे आहेत. जेथे हृदय हेलावणारा भावक्षोभ आहे, भक्तीचा अनुप्रवेश शक्य आहे, शृंगारचेष्टितांचा रमणीय विलास आहे, व्यक्तींची मनस्वी प्रकृतीं सुचविणारी जोमदार संभाषणे आहेत, व्यवहारज्ञान व विचारसूत्रे गुंफण्यास अवसर आहे आणि सालंकृत वर्णने शक्य आहेत तेथे आदिपर्वात मुक्तेश्वरी प्रतिभा पल्लवित होऊन विस्तार[3] पावताना दिसते.

**वनपर्व** संक्षेपनिष्ठ असल्याने त्यात मुळाचा विस्तार केल्याची उदाहरणे जवळ जवळ नाहीत. विस्तार म्हणावयाचाच तर मुक्तेश्वरी वनपर्वाच्या रचनाबंधात एखाद्या विभागाला अधिक जागा देण्यात म्हणावा लागेल. सौभोपाख्यान तसे गौणच पण मुक्तेश्वरांच्या कृष्णप्रीतीमुळे ते पूर्ण अध्याय अडवून बसले आहे. वनपर्वात बहुतेक आख्याने वर्जिली असली तरी नलोपाख्यान ( अ. ६, ७, ८ ), रामोपाख्यान ( अ. १५ ) व सावित्र्युपाख्यान ( अ. १६ ) स्वतंत्र अध्यायांतून सांगितली आहेत. दुर्वासभोजनाच्या ( अ. ११ ) विस्तारात भक्ती, पूर्वपरंपरेचे भान व कृष्णमाहात्म्य अशा अनेक प्रेरणा आहेत. नहुषप्रश्न, यक्षप्रश्न यांतून येणारी धर्मचर्चा वा उपदेशात्मक भाग पुरेशा गांभीर्याने व

---

३.

| महाभारत | मुक्तेश्वर | महाभारत | मुक्तेश्वर |
|---|---|---|---|
| १।९।३–५ | १।३।४५–५२ | १।१६।१४–२३ | १।४।८१–११० |
| १।४९।२८ | १।११।५९।७४ | १।५१।१–२३ | १।११।१०२–१५७ |
| १।५३।२० | १।१२।३३।३९ | १।६७।६–१८ | १।१६।१०–३२ |
| १।६८।१८–१९ | १।१६।९५–१०३ | १।६८।७३–७४ | १।१६।१४७–१५५ |
| १।७३।८–११ | १।१८।११–२१ | १।७३।१५–२४ | १।१८।२६–४० |
| १।८३।२ | १।१९।१७७।१८० | १।९४।६७ | १।२३।४७–५१ |
| १।१०२।४–१४ | १।२५।३९–७१ | १।११०।४३–४५ | १।२७।३५–५५ |
| १।१२४।९–१३ | १।३१।६–२० | १।१३३।१८–२४ | १।३५।७८–१०२. |

विस्ताराने वर्णिला आहे. कथाभागाच्या गौणप्राधान्याचा विवेक करून मुक्तेश्वर विस्तार करतात. कुंडलाहरणात कर्णपूर्ववृत्तापेक्षा त्याची मूल्यनिष्ठा विस्ताराने रंगविली आहे. अशी विस्तारस्थळे वनपर्वात दिली आहेत.

**विराटपर्व** रचनास्वातंत्र्य घेणारे असल्याने त्यात प्रतिभाजन्य विस्तार-नवनिर्मिती-अधिक आहे. मूलसंबद्ध विस्तार कमी आहे. भीम-जीमूत, भीम-कीचक अशी मल्लयुद्धे, कौरवसैन्याचे प्रयाण व गोहरण ( मभा ४।२९।२७–२८ मुभा४।५।४२–५६ ), उत्तर-गोग्रहण ( मभा ४।३३।१-५ मुभा ४।६।१-१६ ), अभिमन्युविवाह ( मभा ४।६७।१४–३८ मुभा ४।८।१–११५ ) अशा वर्णनस्थळी विस्तार झालेला दिसतो. सेवकनीती-सारखा उपदेशात्मक व दुर्गास्तवनासारखा भक्तिस्पर्शित भागही विस्तारित म्हणावयास हवा.

**सौप्तिकपर्व** संक्षेपाने वा सदृश विस्ताराने मूलानुसरण करणारे आहे. त्यामुळे मुळाचा विस्तार येथेही कमीच आहे. द्रौपदीचा भावक्षोभ ( मभा १०।११।१०–१५ मुभा १०।३।७३–८२ ) काहीशा विस्ताराने मुक्तेश्वर वर्णितात. पण अशी स्थळे येथे अल्प आहेत. सौप्तिकात वृद्धिजन्य विस्तार नसला तरी सदृश विस्ताराची धडपड सर्वत्र आहे.

## सहा ॥ विस्तार : समारोप

विस्ताराच्या सर्व तऱ्हा आदि व सभा या विस्तारशील प्रकृतीच्या पर्वात आढळतात. विस्ताराचे प्रमाण वनपर्वात सर्वांत कमी आहे. सौप्तिकात वृद्धिजन्य वा प्रतिभाजन्य विस्तार नसून केवळ सदृश विस्तार दिसतो. विराटपर्वात प्रतिभाजन्य विस्तार सर्वाधिक असून मूलसंबध विस्तार कमी आहे. मुक्तेश्वरी भारत विस्तारशीलतेकडून संक्षेपाकडे सरकत गेल्याचे यावरून स्पष्ट होते.

तरी सामग्र्याने विचार करता मुक्तेश्वरांची विस्तारप्रियता व मुक्तेश्वरी भारताची विस्तारशीलता जाणवते. भक्तिप्रधान दृष्टी, लोकशिक्षकाची भूमिका, समकालीन जीवनाचे संदर्भ गुंफणे, पूर्वकवींचे ऋण आणि नवनिर्मितीप्रेरणा यामुळे संक्षेपकथनाची भूमिका घेऊनही अन्य मराठी महाभारतकारांप्रमाणे मुक्तेश्वरही विस्तारप्रवृत्त झालेले दिसतात. रचनास्वातंत्र्याची प्रेरणा, सालंकृत निवेदन व वर्णनप्रियता हीही या विस्ताराची कारणे आहेत.

मुळाचा सारा बाज सांभाळण्याच्या प्रयत्नात होणारा विस्तार भाषाभेदामुळे होत असल्याने त्यास समरूप विस्तार म्हणता येईल. समरूप विस्तारात व्यासमुक्तेशांच्या काव्यदृष्टीची एकरूपता प्रतीत होते. वास्तु–युद्ध–उत्सव यांची वर्णने, महत्त्वपूर्ण प्रसंग–संभाषणे, अद्‌भुतरम्य स्थळे आणि तीव्र भावकल्लोळ अशा ठिकाणी मुक्तेश्वरांनी समरूप विस्तार केला आहे.

मुळाची सुसंगत वाढ काव्यशैलीभेदाने व आशयरुचीने करणारा वृद्धिजन्य विस्तार

मुक्तेश्वरी भारतात पुष्कळच आहे. विक्रम, विलास, विरक्ती व विवेक यांना अवसर देणाऱ्या भागाचा ते विस्तार करतात. भक्ती–अद्‌भुतता यांना उठाव देणारा भाग ते विस्तारतात. कथेची आवडी असल्याने उपाख्याने फुलविलेली दिसतात. कथेतील बारीकसारीक पण कथाबंधाच्यादृष्टीने महत्त्वाचे धागे ठसठशीत करणे, प्रसंगांचा रोख बदलणे, संभावना· विरह व संशययोग ही रसविघ्ने टाळण्यासाठी कथेतील रिकाम्या जागा भरणे, वास्तु–व्यक्ती–उत्सव–युद्ध–वैभव यांच्या वर्णनस्थळी रेंगाळणे, मुळाहून वेगळ्या काव्य-मार्गांनी प्रसंगचित्रण करणे आणि आलंकारिक शैलीचा वापर करणे या काव्यनिष्ठ हेतूंमुळेही विस्तार झाला.

मुक्तेश्वर विस्तारप्रिय असून त्यांचे भारत समकालीन विस्तारशील प्रवृत्तीचे प्रातिनिधिक आहे. त्यांनी केलेला विस्तार त्यांच्या विविधांगी व्यक्तित्मवाचा, प्रगल्भ काव्यदृष्टीचा व स्वतंत्र प्रतिभासामर्थ्याचा निदर्शक आहे. या विस्तारात त्यांच्या वाणीचे सौंदर्य प्रकटले आहे. म्हणून त्यांच्या श्रोत्यांच्या सुरात सूर मिळवून आपणही म्हणू—

जवं जवं हे कथावल्ली । सुरस जातसे पाल्हाळीं
तवं तवं हर्षाची आगळी । वाढी मातें होतसे —१।२१।४.

□ □ □

# तीन ॥ भारतसंक्रमण ॥ नवनिर्मिती

## एक ॥ नवनिर्मिती स्वरूपविवेचन

महाभारताचे मराठी अवतरण घडविताना मुक्तेश्वरांनी त्यास स्वतंत्र निर्मितीची जोड दिली आहे. अशी भर घालणे समर्थनीय आहे काय, याचा विचार करावयाचा तर महाभारत-संहितेच्या विचारापासून आरंभ करावयास हवा.

आर्यावर्त व दक्षिणापथ यांच्या नमुनेदार निदर्शक असलेल्या औत्तरीय व दाक्षिणात्य अशा दोन भिन्न पाठपरंपरेतून महाभारत सांगण्यात आले. स्मरणावर विसंबून भाट, चारण, सूत, यांनी देशाच्या निरनिराळ्या भागात निरनिराळ्या तऱ्हांनी त्याचे गायन केले. देशभर विखुरलेल्या उज्जैन, काशी रामेश्वरासारख्या तीर्थक्षेत्री महाभारताचे पठण–निरुपण–प्रवचन चाले. या मौखिक पारायणात काही भाग वगळला जाणे किंवा वाढणे स्वाभाविक होते. शतकानुशतके देशभरच्या विविधभाषिक व अकार्यक्षम प्रतलेखकांनी विविध लिपींत धार्मिक वाङ्मय म्हणून महाभारताच्या नकला केल्या. या विविध हस्तलिखितांच्या अभ्यासावरून असे दिसते की महाभारतसंहिता वेळोवेळी वाढविली गेली आणि तिच्यातील भरीमुळे बदलत गेली.

महाभारतातील काही पात्रांचे लैंगिक संबंध आणि अशाच अन्य गोष्टी प्रतिष्ठित समाजात महाभारताचे निरुपण करणाऱ्या पुराणिकाला अडचणीच्या वाटणाऱ्या होत्या. नैतिकतेच्या या संरक्षकांनी श्रोतृमानसाच्या श्रद्धा व आदर्श यांना अनुसरून भारतसंहितेत बदल केले. भक्ती–वीर–शृंगारपर प्रसंगाचा वर्णनविस्तार, तपशीलाचा बारकावा, वाचकाच्या कल्पनाशक्तीवर न विसंबण्याची वृत्ती, विविध पुराणग्रंथातील समांतर आख्याने, नामावळी, कथांची पुनरुक्ती व त्यांच्या प्रेरणांचा पुनरुच्चार, स्तोत्रे–स्तवने, भविष्यकथनशैली, लोकमानसाच्या नैतिक आदर्शाशी सुसंगत असे मुळाचे स्पष्टीकरण यामुळे भारतसंहितेचा विस्तार झाला व तीत भर पडली.

या वाढत्या विस्तारामागे आणखीही काही उद्दिष्टे होती. त्यांपैकी वेदान्त, सांख्य, योग, पांचरात्र, पाशुपत इत्यादी धर्ममते व संप्रदाय यांचे एकीकरण हा एक होता. विष्णुबरोबरच शिवमाहात्म्य वाढविणारा भाग आला. दुर्गा, स्कंद आदी उपास्यदेवतांची स्तुती यथास्थानी समाविष्ट झाली. राजनीती, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, भूगोल, ज्योतिष आदी अनेकानेक विषयांवरील उपलब्ध ज्ञान संग्रहित करण्यात आले. लोकव्यवहारा-बरोबरच आदर्शाचाही स्वीकार करण्यात आला. भारतासारख्या बहुजिनसी देशातील समाजाचे संमिश्र व संकीर्ण सांस्कृतिक संचित महाभारतात एकवटलेले असल्याने

महाभारताची संहिता न्यग्रोधवृक्षासारखी बहुमुखाने वाढली.

असा प्रकार वैदिक, व्याकरणिक, तात्त्विक व छंदोबद्ध अभिजात संस्कृत रचनांबाबत आढळत नाही. सर्वसमावेशक लवचिकता हे महाभारताचे एक वैशिष्ट्यपूर्ण अंग आहे. महाभारताचा छंद अनुकरणसुलभ, व्याकरण लवचिक आणि शैली अ–विशिष्ट त्यामुळे अशा ओळी कौशल्याने बनवून चतुराईने घुसडणे शक्य होते. चिकित्सक प्रतीने अशा हजारो ओळी अधिकच्या म्हणून पटटीपांत व परिशिष्टांत नोंदविल्या आहेत. पुनर्स्थापित संहिता व हा अधिकचा भाग मिळूनच महाभारताची समग्र काव्यपरंपरा सिद्ध होते, असे संपादकांनी म्हटले आहे. पुनर्स्थापित संहितेत स्वीकृत भागाविषयीची साशंकता त्यांनी लहरी रेषांनी सुचविली आहे. महाभारताची संहिता कधीही निश्चित मर्यादाबद्ध नव्हती, याचे स्मरण व प्रतीक म्हणून या लहरी रेषा जणू ग्रंथभर पसरल्या आहेत !

महाभारताच्या या आगळ्यावेगळ्या महत्तेच्या साक्षात्काराने भारावून गेलेल्या सुखटणकरांनी अत्यंत मार्मिकपणे लिहिले आहे— " When I say that the Mahabharat manuscripts contain quantities of spurious additions, I intend no disparagement or condemnation of the Text or of the manuscripts. The process is normal, inevitable and in a wider sense wholly right. If the epic is to continue to be a vital force in the life of any progressive people, **it must be a slow–changing book** ! The fact of expurgation and elaboration is only an outward indication of its being a book of inspiration and guidence in life, and not merely a book lying unsued and forgotten on a dusty book-shelf. Those are probably just the touches that have saved the Mahabharat from the fact of being consigned to the limbo of oblivion, which has befallen its sister epics like the Gilgamesh."[१]

महाभारत ही केवळ कुरुकुळाची कथा नसून अवघ्या मानवकुळाची कथा आहे. जीवनाच्या गतिशीलतेचे वाहक असल्याने ती परिवर्तनशील झाली आहे. ही परिवर्तनशीलता नवचैतन्याच्या प्रवाहीपणाचे एक रूप आहे. महाभारतासारख्या बृहत् वाङ्मयकृतीचे हे अंतःसत्व जाणून तिचे कथन-निवेदन करणाऱ्या उत्तरकालीनांनी युगमानानुसार त्यात भर घातली. महाभारताचे मराठी अवतरण घडविणाऱ्या प्राचीन मराठी कवींनी ही परंपराच पुढे चालविली. " व्यासानुसरण " ही त्या साऱ्यांचीच भूमिका होती पण ती त्यांनी तंतोतंत पाळली मात्र नाही. त्यामुळे तपशीलदृष्ट्या व्यासभारतापासून ते दूर गेले तरी अंतःसत्वाच्या बाबतीत मात्र ते अधिक जवळ आले असे म्हटले पाहिजे.

---

१. V. S. Sukthankar, " Adiparvan " Prolegomena, PP. CI.

मराठी महाभारताची ही प्रकृती लक्षात घेता "व्यासानुसरण" हा एक निकाल मानला तरी एकमेव निकष मानता येणार नाही हे स्पष्ट आहे. मूलानुसरण टाळले की उलटापालट, विरोध, विसंगती, अनौचित्य अशा दोषांची माळ भारतसापेक्षतेने कवीच्या गळ्यात अडकविणे हा मराठी महाभारत समीक्षेचा खाक्या आहे. तो सोपा असला तरी संयुक्तिक नाही. व्यासानुसरण केले नाही एवढा बोल लावून सगळा नवीन भाग त्यामुळे टाळला जातो. वस्तुतः या नवीन भागात त्या कवींची सृजनशीलता, लोकशिक्षकाची भूमिका आणि काव्यात्मदृष्टी प्रतिबिंबित झालेली असते. त्यांच्या रचनांना त्यामुळेच पृथक्त्व येते. महाभारतासारखी श्रेष्ठ वाङ्मयकृती कविमनाला कशी जाणवली याची खूण त्यातच शोधता येते. या स्वतंत्र भागाचा विचार नाकारणे म्हणजे बृहत्कृतींच्या अर्थानुवादाचा प्रत्येक पिढीतील कलावंताचा हक्कच नाकारणे होय. महाभारताच्या मराठी संस्करणात भर घालणाऱ्या प्राचीन मराठी कवींनी कलावंताच्या स्वाभाविक प्रवृत्तीनेच ती घातली. आणि तसे करताना महाभारताची जिवंत परंपरा वाहती ठेवण्याच्या श्रेयाचेही ते वाटेकरी झाले. या भूमिकेवरून मुक्तेश्वरी भारतातील स्वतंत्र निर्मितीचे निरीक्षण करून प्रकृतिविशेष शोधावयाचे आहेत.

## दोन || सभापर्व : नवनिर्मिती

### २·१. मूल्यात्मकतेचे परिमाण

अन्य मध्ययुगीन कवींप्रमाणे श्रोत्यांपुढे जीवनाची आदर्शचित्रे उभी करणे मुक्तेश्वरांना आवडते. हा भाग वैचारिक असला तरी तो चटकन लक्षात येईल अशा स्वतंत्र पद्धतीने येत नाही. मूळ विवेचनाचा आधार घेत, प्रसंगानुरोधाने व विविध व्यक्तींच्या संभाषणाच्या ओघात तो मुक्तेश्वरांनी चतुराईने गुंफला आहे. या नवनिर्मित भागाची जोड दिल्यामुळे मुक्तेश्वरी भारताला मूल्यात्मकतेचे परिमाण प्राप्त होते.

नारदनीतीत ( २ । अ ३ ) मूळ राजनीतीचा भाग यथार्थपणे सामावून घेताना प्रजापरामर्श, ब्राह्मण–यात्रेकरू–याचकांचा सांभाळ, पांथस्थांची काळजी व मंदिराचा जिर्णोद्धार, साधुपालन व दुष्टदमन या राजाच्या जबाबदाऱ्या त्यांनी आवर्जून सांगितल्या. कामाचा उरक व अन्य गुणसंपन्नता सांगून राजास आवश्यक गुणांचे वर्णन केले. राजाच्या वैयक्तिक सदाचरणाबरोबर प्रजेच्या नैतिकतेवरही भर दिला. आध्यात्मिक उन्नतीसाठी प्रयत्नशील असण्याचा आदेश देऊन या प्रवृत्तिपर राजधर्मास परमार्थाची बैठक दिली. या सगळ्या वाढीव भागात पारतंत्र्याच्या काळोख्या रात्री स्वराज्याच्या उषःकालाची स्वप्ने पाहणारे मध्ययुगाचे राजकीय मन समकालीन श्रद्धानिष्ठांसह आविष्कृत झाले आहे.

राजनीतीबरोबर गृहस्थधर्माचा विचारही ते मांडतात. संततिहीनाचा गृहस्थाश्रम व्यर्थ,

असा विचार बृहद्रथाच्या मुखी ते सहज गोवतात. धर्ममुखाने त्यांनी या संततीची–सुपुत्रकुपुत्राची चर्चा ( २।५।६९–८९ ) विस्ताराने केली आहे. अपराधाची चढती श्रेणी ( २।११।५२–५३ ), गुणश्रेणी ( २।९।१४८–१५३ ), स्त्रीची अपवित्रता ( २।१५।१०३–१०४ ), व्यासांनी केलेला नीत्युपदेश ( २।१३।५३–५४ ) त्यांनी विवरून सांगितला आहे. कथेच्या ओघात अशा तऱ्हेचे सामाजिक सदाचाराचे आदर्श मुक्तेश्वर बेमालूमपणे मिसळून देतात.

त्यांची पात्रे मूल्यनिष्ठ असल्याने विविध संवाद–प्रसंगांतून आपल्या मूल्य पुरस्काराला वैचारिकतेबरोबर भावनात्मक पातळीही ते मिळवून देतात. व्यासांनी धर्मास केलेल्या भविष्यकथनाचे ( मभा २।परि १ क्र. ३० मुभा २।१२।७–३७ ) मूळ ७ श्लोक ४ ओव्यांत सांगून नवीन २६ ओव्यांची जोड दिली आहे. यातील तत्त्वविचार फार समंजस व व्यापक दृष्टीचा आहे. धर्मासारख्या पुण्यवंतास हे कष्ट का, याचे उत्तर देण्याचा प्रयत्न त्यात आहे. अकारण भोगाव्या लागणाऱ्या दुःखावरचा उतारा कोणत्याही चिंतनशील माणसाला शोधावा लागतो. त्यानुसार अद्वैती वेदांताचे सूत्रमय विवरण येथे आले आहे. भारतीय तत्त्वज्ञानाने प्रारब्ध व अद्वैत यांची संरक्षक तटबंदी माणसाच्या दुःखाभोवती उभारली आहे. ती स्वतंत्रपणे विवरून ( २।१२।७–१७ ) मुक्तेश्वरांनी त्यावर आधारलेला आचारधर्म ( २।१२।२४–२९ ) सांगितला आहे. तो धर्मनिष्ठ नीतिमीमांसेवर आधारलेला सर्वसाधारण स्वरूपाचा आहे. अनर्थाला निमित्त व्हायचे नसेल तर कसे वागावे याचे मार्गदर्शन असल्याने तो विशिष्ट स्वरूपाचाही झाला आहे. या चर्चेमुळे सभापर्वातील शोकात्म घटनांना दैववादी वळण मिळते. कथाभागाशी एकजीव झालेली ही भर प्रयोजक ( functional ) झाली आहे.

धर्माचे अर्जुनकृत सांत्वन ( २।१२।३८–४२ ), धर्मार्जुनकृत भीमसांत्वन ( २।१५।५९–६२, ६७–७३ ) यांतून बंधुनिष्ठा, ईश्वरनिष्ठा व सत्यनिष्ठा यांचा प्रसंगोचित पुरस्कार आहे. सर्व घटना ईश्वरनियंत्रित व कर्मफलावर आधारलेल्या असतात. या मूलश्रद्धेचे अधिक ठसठशीत चित्र ( २।१२।७३–८६, २।१६।२१–२३, २८–३० ) मुक्तेश्वरी भारतात येते. भारती व्यक्तींच्या कृतीमागे ईश्वरकरणी, दैवाची अटळता आणि कर्मभोग वा स्वीकृत तत्त्वत्रयीचे मूल्यात्मक परिमाण उभे करण्यावर मुक्तेश्वरांचा भर आहे.

पात्रमुखीच्या सुभाषितात्मक रचनेतूनही वैचारिकतेचा आविष्कार होतो. (२।५।६१, २।१३।६१ इत्यादी ).

## २·२. नवप्रसंगनिर्मिती

मूळ घटनांच्या जुळणीत मुक्तेश्वरांनी अधिक प्रसंगांची भर घातली आहे. सभापर्वातील बहुचर्चित प्रसंग म्हणजे राजसूयभोजनपंक्तीतील द्रौपदीचे लज्जारक्षण (२।९।७५–

९६ ). कौरवांची कुविद्या आणि देवाची भक्तवत्सलता दाखविण्यासाठी हा प्रसंग आला आहे. भविष्यसूचकता, कौरव-कृष्ण-द्रौपदीचे स्वभावरेखन आणि अलंकारप्रचुर शैली हे त्यांच्या वाङ्मयीन अंगाचे विशेष आहेत. भक्ती–विनोद–अद्‌भुतता यांची खुलावट करणारा रसप्रपंच त्यात आहे. अनौचित्यामुळे येणाऱ्या अश्लीलतेचे गालबोट त्याला लागले असले तरी कौरवांमुळे लज्जाव्याकुळ झालेल्या द्रौपदीचे कृष्णाने केलेले येथील रक्षण म्हणजे पुढील द्रौपदीवस्त्रहरणप्रसंगाची लहानशी पण सूचक प्रतिकृती वाटू लागते. विटंबना आणि अद्‌भुताने होणारी सुटका दोन्ही प्रसंगांत असली तरी पहिल्यात ती भक्तिविनोदासह तर दुसऱ्यात रौद्र–करुणासह येते. मुक्तेश्वरांच्या अनेकानेक गुणदोषाचे प्रतिबिंब दाखविणारे हे लहानसे स्थळ त्यांच्या स्वतंत्र प्रसंगनिर्मितीकौशल्याचे गमक आहे.

भर सभेत उघडी मांडी दाखविणाऱ्या दुर्योधनास द्रौपदीची शापोक्ती स्वतंत्र आहे. मुळात यावेळी दुर्योधन वा द्रौपदी कोणीच बोलत नाही. भीम तेवढा मांडी फोडण्याची प्रतिज्ञा करतो. या मूलभागाचा संक्षेप करून ( मभा २।६३।१०-१५ मुभा २।१५।१०६–१०८ ) त्यातील भाव तीव्र करण्यासाठी मुक्तेश्वरांनी या स्वतंत्र प्रसंगाची निर्मिती ( २।१५।१०९-११६ ) केली. " हा मुळात फार पुढे असलेला संदिग्ध कथाभाग यांनी येथे अशा प्रकारे आणून औचित्य नाशिले नि द्रौपदीवस्त्रहरणाची आशा मुळाविरुद्ध दुर्योधनाकडून देवविली."[२] नांदापूरकरांच्या या आक्षेपाचा विचार करू. ते म्हणतात त्याप्रमाणे वस्त्रहरण प्रयत्नानंतरचा हा प्रसंग मुक्तेश्वरांनी त्या आधी वर्णिला हे खरेच आहे. या क्रमांतरात प्रस्तुत प्रसंगाकडे पाहण्याची मुक्तेश्वरांची दृष्टी प्रतिबिंबित झाली आहे. महाभारतातील द्रौपदी-विटंबनात रौद्र–भीषण भावकल्लोळाने कारुण्य तीव्र झाले आहे आणि त्याला तोलून धरणारा विचार–युक्तिवादही आहे. पुन्या गांभीर्याने आणि संतुलित समधातवृत्तीने महाभारतकारांनी त्याचे चित्रण केले आहे. एका स्त्रीच्या विटंबनेपेक्षा त्या विटंबनेबरोबरच व तिच्या अनुषंगाने राजदरबाराचे भीषण वास्तव उघडे करायचे आहे. या बौद्धिक भागापेक्षा मुक्तेश्वरांना वस्त्रहरणाचा भावस्फोट अधिक जिव्हारी भिडणारा वाटला. म्हणून वस्त्रहरणास उत्कर्षबिंदू मानून त्यांनी आपली रचना केली. त्यासाठी वस्त्रहरणानंतरची चर्चा त्यांनी परिवर्तित रूपात वस्त्रहरणापूर्वीच आणली आणि तशी ती आणताना तिच्यातील बौद्धिक अंश [ Intellectual content ] कमी करून भावनिक अंश [ Emotional content ] अधिक गडद केला. त्यामुळे मूळचे अनेकांगी रूप लोपले तरी समग्र प्रसंग श्रोतृमनाची तार खेचित भावनेच्या चढत्या अंगाने विकसित झाला आहे. ही हाताळणी मुळापेक्षा वेगळी असेल पण ती नीरस व औचित्यहीन नाही. तीही सारखीच परिणामकारक आणि भावशील संस्कार करणारी आहे. अनेक बीजे आपल्या गर्भात वाढविणारा उत्कट जीवनानुभव श्रेष्ठ प्रतिभावंतांना कसा वेगवेगळ्याप्रकारे जाणवू शकतो याचाच हा नमुना आहे.

---

२. ना. गो. नांदापूरकर " मुक्तमयूरांची भारते." पूर्वोक्त. पृ. ८२.

संपूर्ण प्रसंग भावतीव्र करावयाचा म्हटल्यानंतर मूलभावनेचा पीळ वाढवावा म्हणूनच मुक्तेश्वरांनी या प्रसंगाची भर घातली. त्यासाठी त्यांनी दुर्योधनास बोलावयास लाविले ( २।१५।१०९ ). भीमाच्या प्रतिज्ञेनंतरही दुर्योधनाने हे बोलणे त्यांच्या व्यक्तिरेखेला अधिक उद्दाम करते. या उद्दामपणाचा प्रतिवाद या याज्ञसेनीच्या तेजस्वी उद्‌गारांनी ( २।१५।११०-११६ ) त्यांनी केला. दुर्योधनाविषयीची चीड आणि भीमाविषयीचा विश्वास पावित्र्यप्रीती आणि पापद्वेष समयसूचकता आणि प्रत्युत्पन्नमतित्व, क्षात्राणीचा बाणेदारपणा आणि तेजस्विनीचा तडफदारपणा या द्रौपदीच्या स्वभावविशेषावर झगझगीत प्रकाश टाकीत हे उद्‌गार प्रकटतात. मुक्तेश्वरांची येथील संवादशैली, सहज, ओघवती, भावसंवाहक आणि रूपकादी अलंकारांचा आश्रय घेऊनही प्रासादिक राहिली आहे. जनाबाईची कल्पना निःसंकोचपणे स्वीकारून मुक्तेश्वरांनी येथे तिचे बावनकशी रूपांतर केले आहे. मुळातील दुर्योधनाची कृती व भीमाचा क्रोध तीव्र खरा पण मुक्तेश्वरोक्त दुर्योधनाची कृतिउक्ती आणि द्रौपदीचा हृदयस्फोट अधिक भावक्षोभक आहे. मुळाप्रमाणे कर्णमुखाने पांडवासह द्रौपदीला नग्न करण्याची आज्ञा ( महाभारत २।६१।३८ ) न देता कर्णमुखाने पांडवांना नग्न करण्याची आज्ञा ( मुक्तेश्वर २।१५।१०४ ) देऊन मुक्तेश्वरांनी प्रसंगातील भाव एका टप्पा वर नेऊन पोहोचविला. त्यानंतर द्रौपदीच्या शापोक्ति अनुवादाने दुर्योधनाला क्रोधित करून त्याच्याकडूनच द्रौपदीवस्त्रहरणाची आज्ञा ( मुक्तेश्वर २।१५।११७-११८ ) देवविली आहे. दुर्योधनाच्या संतापाचे आततायीपणात रूपांतर करण्याइतके सामर्थ्य द्रौपदीच्या या शापवाणीत आहे. त्यामुळे दुर्योधनाच्या क्रोधाचा पारा जसा चढत जातो तसा सारा प्रसंगच रौद्र-भीषण भावाच्या कड्याच्या टोकावर उभा राहतो. दुर्योधनाने मांडी दाखविल्यावरही मुळातील द्रौपदी अबोल आहे पण मुक्तेश्वरांची द्रौपदी मात्र कडाडत राहते. यात एक स्वाभाविकताही आहे. क्रमांतरामागील सहेतुकता, मनोधारणेशी सुसंगत स्वाभाविकता, टप्प्याटप्प्याने वाढत जाणारी भावशीलता, रुपकात्मक संवादशैलीचे वैभव यामुळे हा प्रसंग प्रयोजक झाला आहे. त्याच्या चित्रणात जसा मुक्तेश्वरांच्या रचनाचातुर्याचा प्रत्यय आहे तसा पूर्व-कवींच्या प्रभावाचा ठसाही आहे.

द्यूतारंभी भीमाच्या आरोळीने खोटा डाव खरा ठरून धर्मराजाची सरशी होते (२।१४।३४-४२) हा भागही स्वतंत्र आहे. महाभारताच्या लोकमानसावरील संस्काराचा उपयोग करून मुक्तेश्वरांनी परिचित प्रसंगात औत्सुक्यवर्धक नाट्य निर्मिले आणि प्रसंगाचा रोख बदलल्याने झालेल्या भावांतराशी सुसंगत असा हा स्वतंत्र प्रसंग निर्मिला. यज्ञभोजनप्रसंगी शुकागमन ( २।९।१४४-१९८ ) हे मुक्तेश्वरांच्या भक्तिप्रिय मनाचे विलसित आहेत. नारदसूचनेत ( २।११।९५-९८ ) कथानुसंधान संभाळण्यासाठी मूलसुसंगत नवप्रसंगनिर्मिती आहे.

" लपवूनि जयांचिया दृष्टी " पांडव-कृष्ण भेट झाल्याचा प्रसंग ( २।१५।२८९-२९० ) मुक्तेश्वरांनी स्वतंत्रपणे सांगितला आहे. यापूर्वी पांडव द्यूतातील मानहानीतून

गेलेले असतात आणि यानंतर अनुद्यूताच्या आपत्तीत अडकतात. याचा अर्थ ही कृष्ण-भेट पांडवांचे संकट टाळण्यास अनुपयुक्त ठरते. म्हणून तिची प्रयोजकताच धोक्यात येते. मी तेथे असतो तर "बोलो नेदितों पैजेते । पाहों नेदितों द्रौपदीते । धर्मराज वनवासातें । निवे ऐसें न घडते") (३।२।८८) असे मुक्तेश्वरांचा कृष्ण पुढे वनपर्वात सांगतो. द्यूतानंतर कृष्ण पांडवांना गुप्तपणे भेटतो तो द्यूतप्रसंगी उपस्थित असता तर त्याच्या प्रयत्नाची दिशा कोणती असती हे त्यावरून स्पष्ट होते. येथे मात्र "होईल ते पाहें दृष्टी । कौतुक माझिया लीलेचे" (२।१५।२९०) असे कृष्ण म्हणत आहे. हे केवळ विसंगतच नव्हे तर विरोधीही आहे. अकारण, अप्रयोजक आणि कृष्णव्यक्तिमत्त्वावर आघात करणारे हे प्रसंगचित्र त्यामुळेच समर्थनीय वाटत नाही.

ही नवी प्रसंगनिर्मिती स्वतंत्र प्रतिभाजन्य आहे. कधी पूर्वकवींचे ऋण तीत आहे. अपवाद वगळता ती मुक्तेश्वरांच्या स्वतंत्र प्रतिभेची व प्रसंगनिर्मिती कौशल्याची ग्वाही देत आहे.

## २.३. प्रसंगचित्रण

मूळ प्रसंगाकडे पाहण्याची मुक्तेश्वरांची दृष्टीच काही वेळा निराळी असते. त्यांच्या वेगळ्या आकलनाने त्या प्रसंगाचा रोख बदलतो. त्या अनुषंगाने वर्णने, तपशील व संभाषणे त्यांना नव्याने निर्मावे लागतात. ही प्रसंगचित्रणाच्या अनुरोधाने झालेली नवनिर्मिती म्हणता येईल.

द्यूतप्रसंगातील मुक्तेश्वरनिर्मित भागाची या दृष्टीने पाहणी करता येईल. मुळात धृतराष्ट्र विदुर व युधिष्ठिर यांना द्यूताची स्पष्ट कल्पना आहे. तरीही युधिष्ठिर द्यूतासाठी जातो. कारण तेथे व्यासभविष्य अंधुक आहे. नियतीचे अदृश्य पाश तेथे संथपणे येतात. मध्ययुगात कथाकल्पतरू, विष्णुदास नामादींच्या लेखनातून व संस्कारित होत जाणाऱ्या भविष्यपुराणासारख्या पुराणातून भविष्यकल्पनेचा पगडा वाढत गेलेला दिसतो. त्याच्या प्रभावाने मुक्तेश्वरांनी व्यासभविष्य नको इतके स्पष्ट केले. त्यामुळे धर्मराजाचे जाणे संभवनीय करण्यासाठी धृतराष्ट्राचे आमंत्रण द्यूतविषयक नाही, हे त्यांना दाखवावे लागले. त्याचा संबंध कौरवांच्या कपटीपणाशी व धृतराष्ट्राच्या दांभिकपणाशी—या उत्तरकालीन लोकश्रद्धांनी निश्चित केलेल्या व्यक्तिरेखांच्या स्थूल संस्काराशी—त्यांनी जोडला. या बैठकीमुळे मुक्तेश्वरांची रचना मुळावेगळी व स्वतंत्र झाली आहे. त्यासाठी अनेक गोष्टी त्यांना नव्याने निर्माण कराव्या लागल्या.

मुक्तेश्वरांनी द्यूताचा स्पष्ट उल्लेख धृतराष्ट्रमुखी आरंभापासून टाळला. त्यामुळे त्यांच्या विदुराने मूलानुसार द्यूतविरोधी भाषण केले. (मभा २।४५।५२, २।५१।२४ मुभा २।१३।१३–२५) तरी त्यांच्या धृतराष्ट्राला ते नाकारावे लागले आहे. त्यामुळे

धृतराष्ट्राचे भाषण ( २।१३।२६-३१ ) स्वतंत्र झाले आहे. स्वतःवरचा आरोप त्याने नाकारला, शकुनी-दुर्योधनाची ग्वाही दिली आणि विदुराविषयीच संशय घेतला. त्यामुळे धृतराष्ट्राच्या व्यक्तिरेखेत दंभाचे व कांगावखोरपणाचे रंग भरले जातात. धृतराष्ट्राचे असे कैतवपूर्ण चित्रण मराठी महाभारताचा विशेष असून ज्ञानदेवीतही ते आढळते.

मुक्तेश्वरांच्या धूर्त धृतराष्ट्राने विदुरास ताकास तूर लागू दिलेली नाही. त्यामुळे धर्म-विदुर संवाद ( २।१३।४७-६२ ) द्यूतचर्चेऐवजी व्यासभविष्यकथन, दैवनियतता व दुर्योधनस्वभाव यांवर रेंगाळून स्वतंत्र बनतो. व्यासांच्या स्पष्ट सूचनेनंतरही धर्माचे द्यूतासाठी जाणे सुसंगत दाखविण्यासाठी मुक्तेश्वरांनी पांडवांना अनुलंघ्य असलेली कुंतीची श्रेष्ठाज्ञा ( २।१३।६३-६७ ) स्वतंत्रपणे सांगितली.

हस्तिनापुरी द्यूतसभेत द्यूताच्या इष्टानिष्टतेविषयी चर्चा होऊन द्यूतारंभ होतो. नंतर भीष्म, द्रोण, धृतराष्ट्र व विदुर प्रवेशतात. ( मभा २।५३।१-२५ ). कौरवांचा निश्चय व पांडवांना असलेली कल्पना याच्याशी ते सुसंगत आहे. मुक्तेश्वरांनी कौरव हेतूची लपवाछपव करतात असे दर्शविल्याने त्यांच्या रेखाटनात पुष्कळच स्वतंत्रपणा आला आहे. दुर्योधनाची सहज सूचना उचलून शकुनीने द्यूतप्रस्ताव ( २।१४।७-१५ ) मोठ्या खुबीने केला. तो क्रमसंगत, तर्कशुद्ध व बिनतोड आहे. त्यात असलेली धर्मराजप्रशस्ती मुळाविरुद्ध असली तरी धर्माच्या उपस्थितीत त्याला द्यूतप्रवृत्त करावयाचे असल्याने मुक्तेश्वरी रचनेशी सुसंगत ठरते. कौरवांची नीती उघड्या दुष्टतेची न दाखविता दांभिक-पणाची दाखविण्यासाठी मुळात अनुपस्थित असलेल्या विदुरादींना मुक्तेश्वरांनी या द्यूत-चर्चेत उपस्थित ठेवले आहे. मुळात व येथेही विदुर द्यूतविरोधी आहे. तेव्हा द्यूतारंभी त्याचा विरोध नोंदविणे कथासंगतीच्या दृष्टीने आवश्यक होते. या स्वतंत्र विदुरविरोधाने ( २।१४।१८-१९ ) भारतभावाशी प्रामाणिकता साधून पुढील तीव्र विरोधाची पार्श्वभूमी उभारली जाते. उपस्थितीतील द्यूतचर्चेचा परिणाम म्हणून भीष्म-दुर्योधन संवाद ( २।१४।३२-३३ ) येतो. त्यामुळे पुढे वस्त्रहरणप्रसंगी संदिग्ध भूमिका घेणाऱ्या भीष्माला त्यांनी श्रोत्यांची सहानुभूती मिळवून दिली. भीष्माच्या बोलण्याचा फायदा घेऊन चतुर दुर्योधनाने धर्माची शकुनीशी गाठ घालून दिली. एकाने दुसऱ्याऐवजी खेळणे ही मुळात धर्माला चमत्कारिक वाटलेली बाब ( मभा २।५३।१६ ) मुक्तेश्वरी रचनेत सफाईदारपणे सामोरी येते. विदुरविरोधाच्या भिन्न प्रतिक्रिया नोंदवून ( २।१४।२०-२४ ) पुढील संघर्षातील भिन्न गट मुक्तेश्वर येथेच सुचवितात. " प्राप्त झालिया कळिकाळ । पुण्य निर्बळ पाप सबळ " ( २।१४।२४ ) असं म्हणून द्यूतामागे कालनियत दैव उभे असल्याची भूमिका मुक्तेश्वर पुन्हा ठसवितात.

मुळातील द्यूतात पण जिंकणे म्हणजे काय आणि " निकृति "-फसवणूक-काय होती हे कळत नाही व सांगितलेले नाही. या द्यूतसभेत जे घडत होते ते सत्प्रवृत्तींचा छळ करणारे असल्याने ईश्वरी न्यायकल्पनेशी विसंगत होते. भाविक श्रोत्यांना त्याचे सुसंगत

स्पष्टीकरण देणे आवश्यक होते. व्यासांनी ते दैवनियततेने दिले आहे. मुक्तेश्वरांनी ते स्वीकारलेच. पण त्याबरोबरच अद्‌भुत कथांवर पोसलेल्या पुराणकथांनी संस्कारित झालेल्या लोकमानसास पटेल अशा कपटपाशांची कल्पना मांडली. ती एकत्र व एकदाच सांगण्याऐवजी वेळोवेळी, प्रसंगानुसार तिचे धागे प्रसंगचित्रणात पेरले. " म्हणोनि नळा आणि रामा । अपाय घडले जाणतां " ( २।१२।९ ) असा खुबीदार संदर्भ व्यास-मुखीच्या प्रारब्धविवेचनात आधीच गोवलेला आहे. त्याचा धागा पकडून रामावतारी मायामृग, नलकाळी अक्ष आणि तेच आता अक्ष, अशी कपटपाशांची पार्श्वभूमी त्यांनी शकुनीमुखाने ( २।१२।९९–१०३ ) वर्णिली. नवीन भर टाकताना मुक्तेश्वर कसे व किती भान ठेवतात हे पाहण्यासारखे आहे. द्यूतपट मांडताना ( २।१४।१६–१७, २५–३१ ) अक्षामागील पूर्वनियोजन, रूपदर्शन, सामर्थ्य, कालनियतता आणि बुद्धिभ्रष्ट करण्याचे कसब ते सांगतात. शकुनी चिंती ते द्यावे असे धर्माला वाटे, ही कपटपाशांची करणी ( २।१४।४६ ) पुनश्च ठसविली आहे. धर्माच्या व्यक्तित्वातील न्यून झाकण्यासाठी दैवनियततेबरोबर कपटपाशांचाही चांगला उपयोग मुक्तेश्वरांनी करून घेतला आहे.

मुळात पहिले दहा डाव धर्माने पण बोलावा नि शकुनीने जिंकल्याचे सांगावे अशा संथ पद्धतीने वर्णिले आहेत ( सभा २।५३।२२–२५, २।५४।१–२९ ). मुक्तेश्वरांनी त्यात शकुनी-धर्माच्या कृती-उक्ती, क्रियाप्रतिक्रिया, सभासदांचे मौन आणि कपट-पाशांची करणी यांचे धागे अधूनमधून ( सभा २।१४।४८–९३ ) पेरले आहेत. " धर्में काढून कंठींचा मणी । दुर्योधनकंठी सूदला " ( २।१४।५१ ), " धर्म दाटला आवेशे " ( २।१४।५२ ), " हाव अद्‌भुत नावरे " ( २।१४।६० ), " पाणितळीं ठावो । सागराचा आटवे ! " ( २।१४।७२ ), " धर्म होऊनि टाके वेडें । हारि अंगा आलिया " ( २।१४।७९ ), अशी द्यूताची बेहोष झिंग, पराभवातील ईर्ष्या व बधिरता धर्माच्या कृतीउक्तीतून व अनुभाववर्णनातून साकारते. खेळणारांच्या मनावरील ताण, त्यांना सुटणारा घाम, ऐश्वर्योन्माद, ईर्ष्या, हर्षाने टाळ्या पिटणे याने त्या कुलनाशक द्यूताचा मनोमन प्रत्यय येतो. धर्माची विपरितबुद्धी अनावर ओढीने भ्रष्टतेकडे सरकणाऱ्या उपमानानी ( २।१४।८५–९० ) स्पष्ट होते. शकुनी-धर्माचे संवाद (२।१४।८०–८१), ( १३४–१३५, १४३, १५५–१५७ ) वेध घेणारे, मर्म विंधणारे, साळसूद वाटणारे पण दंभाने भरलेले आहेत. हे स्वतंत्र संवाद या चित्रणाचे लक्षणीय वैशिष्ट्य आहे. " कोण देवो आजी आम्हा ओळला " ( २।१४।९३ ) असा कौरवांचा आनंद जसा मुक्तेश्वरांनी टिपला आहे तसा सभाजनांची प्रतिक्रिया नोंदवून त्यातील विपरीतपणाही दाखविला ( २।१४।१४६ ) आहे. प्रसंगांच्या बदलत्या रोखानुसार नव्याने आलेल्या तपशीलाने, संवाद–संभाषणांनी द्यूतक्रीडेत सजीवता व चैतन्य आणले आहे. मुक्तेश्वरी रचनेत प्रसंगाचे आकलन बदलले की संवाद, व्यक्तिरेखा आणि कथासंबद्ध तपशील यात कशी व किती भर पडते ते यावरून स्पष्ट व्हावे.

## २.४. वर्णन

पुनर्निर्माणक कविप्रतिभेला वाव देणारा भाग वर्णनांचा. मुक्तेश्वर बहुधा मूळ वर्णने न टाळता विस्तारतात. यापुढे जाऊन जेथे शक्य, सुसंगत व उचित वाटेल तेथे ते स्वकृत वर्णनांची भर टाकतात. राहू, महिषासुर, काळपुरुष, व्याघ्र, होमशाळेतील अन्नाला शिवणारा कुत्रा अशा उपमानांनी दुःशासनाच्या अंतःपुरप्रवेशातील (२।१५।२३–२५) अशुभता, दुष्टावा, अटळता, भीषणता, अपवित्रता, प्रकटली आहे. द्रौपदीच्या सभाप्रवेशाच्या परिणामात ( २।२७।३६–११ ) तिच्या दाहक दुःखाच्या लाटा निसर्गजाताला आणि सत्वस्थ शक्तींना स्पर्श करुन जातात. कृती–उक्ती–आवेग यांनी नटलेले हे भाव चित्र अतिशयोक्त असले तरी कविमानसाची तीव्रता प्रकट करणारे आहे. विषादग्रस्त दुर्योधन ( २।१२।६४–६८ ), व्याकुळ द्रौपदी ( २।१५।१० ), पांडवांचा पुनर्प्रवेश (२।१६।३२–३३) अशी व्यक्तिवर्णने व लघुप्रसंग वर्णने स्वतंत्रपणे, रंगवून ते आपल्य कथाबंधाला प्रत्ययक्षमता देतात.

राजसूयभोजन ( २।९।९६–१३९ ) समृद्ध वर्णनचित्र आहे. मूळ वर्णनात "हिरे कोरोनि मत्स्याकृती। विडे भरोनि देती हाती" ( २।१०।४ ) असे नवे व कल्पक तपशील मुक्तेश्वर अनेकदा भरतात. त्याची वास्तुवर्णने, युद्धवर्णने, व्यक्तिवर्णने आणि शृंगारभक्तीसंबद्ध प्रसंगवर्णने याची साक्ष आहेत.

## २.५. संवाद

प्रसंगाचा रोख बदलल्याने, संक्षेपविस्तार केल्याने, कथौघात सुसंगती रहावी म्हणून कधी स्वकृत तर कधी मुळापेक्षा बदललेली वेगळी संभाषणे मुक्तेश्वर वापरतात. संभावनाविरह टाळण्यासाठी काही वेळा संभाषणे येतात. नारदाचे संभाषण मुळात अ. ५ ते ११ इतके दीर्घ आहे. त्यानंतर त्यास पंडूसंदेशाची आठवण होते. हा चमत्कारिकपणा टाळण्यासाठी " नारद म्हणे, कुरुनंदना। सांगता विसर पडला मना। आता ऐकोनि तुझिया प्रश्ना । आठवण मज झाली " ( २।५।३५ ) अशी स्वतंत्र ओवी रचून सुसंगती आणण्याचा प्रयत्न केला जातो. कधी मात्र अकारण संवाद येऊन विसंगती येते. अग्रपूजा झाल्यावर " आता दुसरी पूजा कोणाची ? " ( २।१०।८० ) हा धर्मराजाचा स्वतंत्र प्रश्न मुक्तेश्वर देतात. त्यावर शिशुपालाचे क्रोधयुक्त भाषण आहे. शिशुपालाला क्रोध आला तो दुसऱ्या पूजेविषयीच्या प्रश्नाने नव्हे, तर पहिल्या अग्रपूजेने, त्यामुळे हा प्रश्न अकारण आलेला व विसंगत वाटतो. नारदकृत लोकपालसभावर्णनावर मुक्तेश्वरांचा धर्म स्वाभिप्रायता प्रकट करतो. ( २।५।१, २ व १२ ). त्यात दीर्घ कथा श्रवणानंतर रसिक श्रोत्याने द्यावयास हवी अशी आवश्यक आस्वादात्मक प्रतिक्रिया आहे. साक्षी व्यक्तींच्या प्रतिक्रिया ( २।२।७७–८०, २।४।२, १८२, २।१२।३, ४८, ४९ ) स्वतंत्रपणे वर्णून प्रसंगास प्रत्यक्षता देण्याची मुक्तेश्वरी पद्धती आहे. वस्त्रहरण प्रयत्नानंतर भीष्म द्रौपदीच्या विटंबनेस विरोध करतो ( २।१५।२४४-२४६ ) हा स्वतंत्र

संवाद आहे. सत्प्रवृत्त पात्रे कौरवांच्या बाजूने असली तरी मनातून ते सत्पक्षाचे, म्हणजे पांडवांचे होते, हा लोकमानसातील महाभारताचा ठसा लक्षात घेऊन त्याची योजना झालेली दिसते. निरनिराळ्या कारणांनी येणारे हे स्वतंत्र संवाद संभाषणाचा ओघ टिकविण्यासाठीही उपयुक्त ठरतात.

## २.६. तपशील

प्रसंगानुरोधाने नवा तपशील मुक्तेश्वरी भारतात येतो. द्रौपदीवस्त्रहरणप्रसंगी निर्माण झालेली वस्त्रे गुप्त होतात ( २।१५।२४७–२४८ ). हा अद्‌भुताचा वळसा आहे. शिशुपाल ( २।९।३४ ) वा पांडव ( २।१३।६९ ) यांना होणाऱ्या अपशकुनात लोकश्रद्धेचे प्रतिबिंब असले तरी पुढील कथाभागाची सूचनाही आहे. भानुमती हे दुर्योधनाच्या पत्नीचे नाव ( २।१३।१४ ) मुळात नाही. ते स्कंदपुराणात ( नागरखंड अ. ७३, श्लोक २ ) प्रथम येते. भट्टनारायणाच्या वेणिसंहाराने ते लोकप्रिय केले आणि नामा पाठकादींच्या रचनेतून मराठी परंपरेत रुळले. अशी पात्रनामे हाही महाभारताच्या लोकमानस संस्काराचाच भाग आहे. द्यूतक्रीडेत " बेवीस " डाव खेळायचे ठरते (२।१४।४५), हेही नवीन आहे. खेळल्या गेलेल्या डावांची संख्या मोजून मुक्तेश्वरांनी ही संख्या ठरविली असावी. त्यातही अज्ञातवास व वनवास हा एकच पण असताना तो एक ( २।१६।३४ ) की दोन ( २।१४।१७० ) मानावयाचा यात त्यांचा गोंधळ झाल्याने त्यांची बेरीजही चुकली. त्यामुळे या तपशीलास विसंगत रूप आले आहे. ही तपशीलातील वाढ मुक्तेश्वरांची विस्तारप्रवृत्ती सुचविते. त्यामुळे कथानक भरघोस होते तसे क्वचित विस्कळीतही होते.

## २.७. " सांगो विसरला व्यासकवी "

वनगमनापूर्वी सुभद्रेची पाठवणी करताना मुक्तेश्वर लाडिक सलगीने म्हणतात, " सांगों विसरला व्यास कवी। परी म्यां स्मरण दीधलें " (२।१६।१३०). पण स्वतः करून दिलेली ही आठवण ते वनपर्वात विसरतात आणि तेथे मूलानुसार वनातून पुन्हा सुभद्रेला द्वारकेस धाडतात (३।३।१०१)! प्रदीर्घ रचनेत नवनिर्मिती अनवधानाने अशी विसंगत ठरते. महाभारतासारख्या अनेक हातांनी घडलेल्या प्रदीर्घ रचनेत कथावस्तुचे काही धागे क्वचित कोठे अनुत्तरित स्वरूपात लोंबकळत राहतात. मुळात धृतराष्ट्राची आज्ञा घेऊन विदुर भीष्माकडे जाण्यास निघतो ( सभा २।४५।५८ ) नंतरच्या ४६ व्या अध्यायापासून तोच भाग पुन्हा विस्ताराने सांगण्यात येतो. पण त्यात विदुर–भीष्म भेटीचा संदर्भ येत नाही. विदुर–भीष्मांचे हे जे संभाषण, " सांगो विसरला व्यास कवी " ते मुक्तेश्वर स्वतंत्रपणे व कथौघाशी सुसंगत करून ( २।१३।३४–३६ ) सांगतात. चिकित्सक प्रतीत रेंगाळत राहिलेला हा धागा विदुर-भीष्म भेटीचे वर्णन करून मुक्तेश्वरांनी बरोबर जोडला आहे. हे त्यांच्या कथन-कौशल्याचे गमक आहे. मुळात कधी संबद्ध कथाभागातील तपशीलात अंतर पडते किंवा त्यात पुनरुक्ती व शिथिलपणा येण्याच

संभव निर्माण होतो. अशा वेळीही मुक्तेश्वर त्या भिन्न तुकड्यांना एकत्र सांधून घेतात त्यामागे कथावस्तुला घाटदार व आखीवरेखीव रूप देण्याची धडपड आहे.

## २.८. "जेणें वाढे उत्कट भक्ती"

सभापर्वाच्या नवव्या अध्यायात "व्यासांची संगती" सोडून राजसूयप्रसंगी द्रौपदीचे लज्जारक्षण, भोजन व शुकागमन (२।९।७५–१५८) एवढा मोठा भक्तिप्रधान भाग नव्याने समाविष्ट झाला आहे. त्याचे स्पष्टीकरण "जेणें वाढे उत्कट भक्ती। तो तो विशेष लिहिला ग्रंथीं। नावडे ते स्वहस्तीं। खोडोनि दूर करावें" (२।९।१६५) असे दिले आहे. भक्ती हा महाभारताच्या मराठी अवतरणाचा एक हेतू त्यांनी मानल्याचे दिसते. मध्ययुगीन वाङ्मयविश्वाच्या या मध्यबिंदूपासून मुक्तेश्वरही दूर गेलेले नाहीत. भक्तिभावाला उत्कट करण्याच्या प्रयत्नात मुक्तेश्वरी भारतात नाविन्य अवतरताना दिसते.

या दृष्टीने कृष्णमहिमा हेतुपूरस्सर वाढविणारे स्वतंत्र उल्लेख (२।१।६४–७१, २।५।१०२–१११, १२८, २।१२।३९–४१, २।१३।३३, ६९, २।१६।१०२) पाहण्यासारखे आहेत. भक्तीचा आलंबन विभाव असलेल्या कृष्णदेवाभोवती केन्द्रित असणाऱ्या प्रसंगाची नवनिर्मिती ते करतात वा मूलप्रसंगाचा विस्तार करतात. अग्रपूजाप्रसंगी भीष्माने केलेले कृष्णवर्णन (मभा २।३३।२८–२९, मुभा २।१०।१२–१९) ज्ञानदृष्टीने अलौकिक चैतन्याला समूर्त करणारे असून मुक्तेश्वरांच्या आध्यात्मिक अधिकारावर प्रकाश टाकते. पुढील अग्रपूजेचा सोहळा (२।१०।३०–७३) असाच तपशीलाच्या बारकाव्याने, कल्पकतेच्या वैभवाने, अलंकारांच्या डौलाने आणि भक्तीच्या भावनेने विनटलेला आहे. प्रभुगुण–संकीर्तनासाठी मुक्तेश्वरांची रसवंती येथे कशी उल्हसित झाली आहे! विरोधभक्तीच्या निर्देशाने (२।११।६३–६५) शिशुपाळवधाच्या मूळ रौद्र–अद्‌भुतावर भक्तीचा रंग चढला आहे. ते म्हणती, "त्वां हरिलें मन। आतां स्मरणकर्ते कोण?॥ जेथे जेथे तुझे चरण। तेथे मस्तक आमुचें" (२।११।८३) अशा लडिवाळ उत्तरांनी कृष्ण पांडवांचे संबंध देवभक्त संबंधात परिणत होतात.

भक्तीचा रसोत्कर्ष द्रौपदीच्या धाव्यात (२।१५।११९–१६२) आहे. विविध पौराणिक संदर्भांनी आणि रूपकशैलीने नटलेल्या या धाव्यातून परमेश्वरी कृपेचे आणि भगवंताच्या लीलावताराचे अनेकानेक रंग आविष्कृत होतात. त्याची पतितपावनता, दुष्टदंडन, आर्तरक्षण, आधारक्षमता, सामर्थ्य, व्यापकता, पावित्र्यरक्षण अशा छटांचा बदलता खेळ त्यात आहे. भक्तीची नामनिष्ठा आणि कृपाप्रसादाचा हक्कही नम्रतेने पण आग्रहाने सांगितला आहे. कृष्णसदनाचे वर्णन (२।१५।१६५–१६९) ज्ञानोत्तर भक्तीची खूण आहे. त्यात सगुण–निर्गुण व भक्तिवेदान्त एकत्र आले आहेत. कृष्णाभोवतीच्या परिवाररूपाने (२।१५।१७०–१७९) लोकश्रद्धेने जपलेले विष्णूचे चित्र मांडून विष्णुकृष्णैक्याची लोकभावना मुक्तेश्वरांनी संभाळली आहे. "अनाथबंधु या प्रौढीं। द्रौपदीपाठीं ठाकला" (२।१५।१९५) असे कथाविषयाशी एकजीव होणारे

भक्तिसूत्र नारद-रूक्मिणी संवादातून मुक्तेश्वरांनी निर्मिले आहे. देवाचा अंबरावतारही ( २।१५।२०३–२४५ ) झगमगत्या रूपात त्यांनी चित्रिला. या स्वतंत्र विस्तारातून ( २।१५।११९–२४५ ) मुक्तेश्वरांची वाक्गंगा भावभक्तीच्या कल्लोळाने खळाळत आहे.

भक्तीला अवसर देणारी प्रसंगचित्रे मुक्तेश्वरांनी समरसून रंगविली आहेत. विदुर, भीष्म, नारद, धर्म, अर्जुन यांच्या मुखाने प्रसंगानुरोधाने ईश्वराचे माहात्म्य व त्याचे भक्तरक्षणाचे ब्रीद त्यांनी ठसविले आहे मुक्तेश्वरांच्या भक्तहृदयाचे उभड त्यातून उचंबळत आहेत. त्यांच्या समृद्ध अलंकारसृष्टीतील आध्यत्मिक उपमाने बहुंशी स्वतंत्र असून ती अनेकानेक विषयांच्या सांगाती पर्जन्यसरीसारखी कोसळत असतात. मुक्तेश्वरांच्या भक्तहृदयाच्या त्या भावमुद्राच आहेत.

## ३. अन्य पर्वातील नवनिर्मिती

**आदिपर्व** नवनिर्मितीने विस्तारलेले आहे. भृगुऋषीने अग्नीशाप देताना सत्या-सत्याच्या व्यावहारिक भूमिकेवरून केलेला विवेक ( १।३।२२–२६ ), कण्वाने वर्णिलेल्या कुलस्त्रीवरील मर्यादा ( १।१६।६९–८० ), जरत्कारूने सांगितलेली " कुश्चित संसार-रहाटी " ( १।९।५९ ५७ ), ब्राह्मणशापाचा परिणाम ( १।८।७०–७६ ), इंद्राचे गुरु व ईश्वरक्षोभाविषयीचे विवेचन ( १।१७।१७-२७ ), त्याने कचास केलेला उपदेश ( १।१७।३८-४१ ), कचाने वर्णिलेले द्वादश गुरू व गुरुस्तवन ( १।१७।१०१–१२३ ) ही प्रसंगसंदर्भात गुंफलेल्या व्यवहारधर्माची उदाहरणे आहेत. एखाद्या पात्राच्या मुखी त्याचे विचार व परिस्थिती यांच्या संदर्भात चपखल बसतील अशा पद्धतीने जीवना-दर्शीची गुंफण करून मुक्तेश्वर आपल्या भारताला मूल्यात्मक परिमाण प्राप्त करून देतात.

सर्पसत्र ( १।१०।६४–११५ ), वैशंपायन आणि त्याचे श्रोते ( १।१३।११–२० ) ययातीचे वार्धक्य ( १।१९।७४–८० ), त्याची राज्यसमृद्धी ( १।१९।११६–१३६ ) माद्री पंडु मीलन ( १।२८।१२–२४ ), कौरव-पाडवांची बाळक्रीडा, भोजन व भीमावर विषप्रयोग ( १। अ. २९ ), अंधारी रात्र ( १।३६।५३-६६ ), प्रसन्न प्रभात ( १।३६।६७-८१ ), स्वयंवरमंडप ( १।४१।८–२३ ), देवांनी संजीवनी घेऊन आलेल्या कचाचे केलेले स्वागत ( १।१७।१४८-१५१ ), यादवांनी केलेला अर्जुनाचा सत्कार ( १।४७।७५–७९ ), देव-गरुड, भीष्म-राजे, द्रुपद–पांडव, कौरव-पांडव व द्रुपद, भीम-हिडिंब, भीम-बक यांची युद्धवर्णने यांनी आदिपर्व समृद्ध आहे. ही वर्णनस्थळे मुळाचा स्वतंत्र म्हणता येईल असा विस्तार आहेत वा नवीनही आहेत. त्यांना मुक्तेश्वरी रचनेत वेगळाच घाट प्राप्त होतो. कौरवपांडवांची बाळक्रिडा व भोजनवर्णन खास मुक्तेश्वरी थाटाघाटाचे आहे. युद्धवर्णनातील शस्त्रे व परिभाषा कालविपर्यासात्मक असली तरी प्रत्ययकारी आहे. निसर्गवर्णने पूर्णतया स्वतंत्र आहेत. ही सारी वर्णने चित्रमय, जिवंत आणि प्रसंग हुबेहूब डोळयापुढे उभा करणारी आहेत.

प्रसंगानुरोधाने तपशील, संवाद-संभाषणात अनेक ठिकाणी भर पडली आहे. चौदा रत्नें ( १।४।११५–११६ ), युद्धप्रकार ( १।३०।१६०–१६४ ), शस्त्रप्रकार ( १।३१। ३७–३८ ), लोकवैचित्र्य ( १।१५।६–१३, १।४०।८५ ), भोजनपदार्थ ( १।२९।८२–९० ) अशी नामावळी देताना भर पडली आहे. त्रिंशतितीन कोटी देव ( १।४।८१ ), असे मुक्तेश्वर पारंपरिक श्रद्धेने सांगतात. धर्माची आंगठी कूपात पडणे (१।३०।१०७), भास पक्ष्याला झाडावर बसविण्यासाठी काठीचा आधार देणे ( १।३०।२१३ ) अशी भर निवेदनाच्या ओघात पडत जाते. ऋषींनी केलेली सर्पसत्रस्तुती ( १।१०।४७–५६ ), जतुगृहाचे रूप ( १।३५।१२६–१२९ ) अशा ठिकाणी येणारी उपमानांची मालिका स्वतंत्र आहे. अर्जुनाने लक्ष्यभेद केल्यावर इंद्राचे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले ( १।४१।७१ ), असा भावनेचा जिव्हाळा भरणारा स्वतंत्र तपशील ते वापरतात.

इंद्र-बळी संवादासारखे ( १।४।६८–७९ ) स्वतंत्र संवाद मुक्तेश्वर रचतात. आपला युक्तिवाद अधिक समाधानकारक करण्यासाठी त्यांची पात्रे नवी कारणे सांगतात ( १।२२।१०८ ). ययातीची मागणी नाकारताना त्याचे पुत्र “ विशेष मातृसंयोगकामा। तारुण्य मागसी पुत्रां आह्मां । देतां मात्रागमनकर्मा। पात्र आम्ही निर्धारें ” ( १।१९।९४ ) असे सांगतात. ती स्वीकारताना “ तुझें तुज द्यावया कवण। संदेह कल्पी दुरात्मा ” ( १।१९।१०५ ) असे पुरू म्हणतो. द्रुपदाची राजधानी न लुटण्याचे कारण आता ती द्रोणाची संपत्ती झाल्याचे अर्जुन सांगतो. ही तल्लख बुद्धीची, चमत्कृतिपर कारणे नवी आहेत. विवाहविनंतीच्या वेळी देवयानी-ययातीची दुसरी भेट असूनही त्यात एकमेकांना ओळखल्याची खूण नाही. ही मुळातील असंभाव्यता टाळण्यासाठी “ मीही वोळखें तुजलागूनि। तथापि सांगिजे आपुला वचनीं ” ( १।१८।११७ ) अशी स्वतंत्र ओवी मुक्तेश्वरांनी देवयानीमुखी घातली आहे. गरुडाचे अभयवचन ( १।५।३६–४४ ) किंवा विदुराच्या ध्यानावस्थेत कृष्णाने दिलेली सूचना ( १।३६।६–१४ ) या नवनिर्मितीला भक्तीचा स्पर्श आहे. स्वयंवरप्रसंगी पांडवांच्या मनातील विचारदर्शन ( १।४१।१४–१९ ) घडवून त्यांनी प्रसंगरेखाटनात नाट्य व औत्सुक्य भरले आहे. आदिपर्वात मुक्तेश्वरी प्रतिभा रसभावफुलांनी बहरली आहे. त्यामुळे नाना वाटांनी नवता येथे अवतरली आहे.

**वनपर्व** संक्षेपनिष्ठ असल्याने त्यात नवता सापेक्षतेने कमी आहे. भक्तीला उत्कट करण्यासाठी झालेल्या नवनिर्मितीचे उदाहरण म्हणजे द्रौपदीचा धावा. ज्ञात भक्तिकथांचा निर्देश व विविध अज्ञात भक्तकथांची गुंफण करून मुक्तेश्वरांनी तो रसमय केला. तद्द्वारा लोककथांना ग्रांथिक परंपरेत सुप्रतिष्ठित केले. भक्तांची तीव्र ईश्वरनिष्ठा व देवाची भक्त-वत्सलता अशा धाव्यांतून आविष्कृत करताना मुक्तेश्वरी वाणीला नेहमीच स्वतंत्रतेचा फुलोरा येतो. मधुर संबोधने, सहज अलंकारविलास, कथानिर्देश व आर्त भावशीलता यामुळे हा धावा ( ३।११।५४–९४ ) गोड झाला आहे.

पांडवांच्या तीर्थयात्रेमागे कपटपाश स्पर्शाच्या पापाचे क्षालन व्हावे; असा उद्देश ( ३।९।३८, ३९, ८१ ) मुक्तेश्वर सांगतात- अनेकानेक घटना मध्यवर्ती कथासूत्राशी अशा नव्या धाग्यादोऱ्याने ते जोडतात. निःशंकता ही मुक्तेश्वर कथनाची अट मानतात. द्रौपदीने धुतलेल्या थाळीस शाकपत्र कसे, या शंकेचे निरसन कृष्णाने " शाकपत्र स्वयें आपण । आपणालागीं निर्मिलें " ( ३।११।११२ ) असे ते करतात. " नाही भक्ताच्या प्रारब्धीं । तरी नवें निर्मुनी देतो सिद्धीं " ( ३।११।११३ ) अशा नव्या भक्तिसूत्रांचीही त्यास जोड देतात. घोषयात्रासमयीच्या विकर्णाच्या भाषणातून ( ३।१२।१६–२१ ) ईश्वरनिष्ठा, काळ, प्रयत्न व प्रारब्ध या महातत्त्वांच्या प्रकाशात माणसाचे संकल्प व त्याची परिणती मुक्तेश्वर स्पष्ट करतात. ती मुक्तेश्वरी भारताची केंद्रीय जीवनवृत्ती आहे. त्यामुळे त्यांचे भारत मूल्यगर्भ संस्कार करणारे झाले आहे. वनपर्वातील उपदेशपरतेत मध्ययुगीन मराठी संतांच्या जीवनदृष्टीचा अनुप्रवेश झाला आहे. मूळ उपदेशावर पसरलेली ही भक्तिमार्गी छटा मुक्तेश्वरी रचनेतील स्वतंत्रतेची द्योतक आहे.

**विराटपर्व** नवतेने नटलेले आहे. दुर्गास्तवनाला ( ४।१।६७–८१ ) काही प्रतीत मूलाधार असला तरी येथील बहुश्रुतता, सहिष्णुता व वृत्तीची व्यापकता खास मुक्तेश्वरी आहे. कृष्णास निमंत्रण व त्याचे आगमन ( ४।८।१–४४ ) मुक्तेश्वर भक्तहृदयाने विस्तारतात.

सुदेष्णा–सैरंध्री ( ४।२।२४–३४, ४।३।९०–९३ ) संवाद स्वभावप्रकाशक व भावी घटनांचे सूचक आहेत. सुदेष्णेचा स्वार्थमूलक शोक ( ४।४।८–१० ), विराट–अनुकीचक ( ४।४।१५–१७ ), विराट–पांडव ( ४।७।८४–९४ ), स्त्रिया–उत्तर ( ४।६।१९–२५ ) असे किती तरी स्वतंत्र संवाद येथे येतात. निराश्रित स्त्री कामिकांच्या तावडीत सापडते ( ४।३।४–६ ), परस्त्रीअभिलाषेचे परिणाम ( ४।३।३८–४१ ) असे अनेक विचार प्रसंगसंदर्भात व संवादात ते गुंफून देतात. भीम-जीमूत व भीम–कीचक ही युद्धवर्णने त्यांनी आवडीने विस्तारली आहेत. अभिमन्युविवाह व भोजन यांच्या मराठी वळणाच्या साप्रसंगीत वर्णनाने संपूर्ण आठवा अध्याय व्यापला आहे.

कथा–प्रसंगाच्या दृष्टीने विराटपर्वातील नवनिर्मिती लक्षणीय आहे. जीमूत मृत्युच्या संदर्भात कौरवचर्चा ( ४।०।८१–९६ ), उत्तर गोग्रहणाच्या पराभवानंतरची कौरवचर्चा ( ४।७।१-३३ ), अभिमन्युविवाहावर दुर्योधनाची प्रतिक्रिया ( ४।८।११६–११८ ) वर्णून त्यांनी मुळापेक्षा प्रतिनायकांचे चित्र उठावदार केले व मध्यवर्ती संघर्षाशी विराटपर्वातील घटना बद्ध केल्या. सुदेष्णेकडून द्रौपदीला तेरा दिवसांची मुदत मिळवून देण्यासाठी अर्जुनाच्या बृहन्नडारूपाचा कौशल्याने उपयोग करून नवी प्रसंगनिर्मिती ( ४।४।३६-५३ ) केली व अर्जुनाच्या अस्तित्वाला प्रयोजकता दिली. जीमूतीचे उद्धट बोलणे ऐकून त्याला खणखणीत उत्तर देणाऱ्या युधिष्ठिरास अर्जुन थांबवितो ( ४।२।५३–५७ ), क्रुद्ध भीमालाही अर्जुन युधिष्ठिराच्या जोडीने थांबवितो (४।३।५६), दक्षिणगोग्रहणप्रसंगी सहदेव ओळखू येण्याचे भय प्रकट करतो ( ४।५।९७ ), सुशर्म्यास

मारू पाहणाऱ्या भीमास नकुल धर्माज्ञेची आठवण देतो (४।५।१२०) अशासारख्या स्वतंत्र निर्देशामुळे कथेच्या चित्राकृतीत ( Pattern ) पात्रांना यथाप्रमाण स्थान लाभते व पांडवांची बंधुप्रीती ठळकपणे आविष्कृत होते. विराटाच्या मनात पांडवांविषयी येणारा संशय वर्णून (४।२।१-१२) ते परिचित प्रसंगात नाट्य व औत्सुक्य निर्मितात. अर्जुनाचा प्रकटनविचार (४।७।३४-४३) मांडून मुळात आकस्मिक वाटणाऱ्या पांडवप्रकटनाला मुक्तेश्वर स्वाभाविक बनवितात. पांडवांचा अज्ञातवास संपला की नाही या विषयीचे श्रोत्यांचे औत्सुक्य त्यामुळे पूर्ण होते आणि पुढे भीष्माने उद्योगपर्वात केलेल्या युक्तिवादाची पार्श्वभूमी सिद्ध होते. मुक्तेश्वरांनी नवनिर्मितीची जोड दिल्याने कोठे अकारण विसंगती (४।५।१२५-१२६) आली असली तरी त्यामुळे प्रायः विराटपर्वाचा कथाबंध आखीवरेखीव व सुबद्ध झाला आहे.

सौप्तिक अधिक मूलानुसारी आहे रचनास्वातंत्र्यापेक्षा मूलनिष्ठा प्रमाण मानल्याने सौप्तिकात नवनिर्मितीचा भाग अल्प आहे. मुळातील शिवमहिम्याच्या जोडीने कृष्णमाहात्म्याची जाणीवपूर्वक केलेली नोंद (१०।१।१२८) मुक्तेश्वरी भारतातील कृष्णाचे केन्द्रवर्ती स्थान सुचविणारी आहे. एरव्ही वर्णनात एखाददुसरा अधिकचा तपशील भरणे किंवा अलंकारांच्या जोडीला आणखी एखादा अलंकार वापरणे एवढेच येथील नवनिर्मितीचे क्षीण स्वरूप आहे.

## ४. नवनिर्मितीचा समारोप

मुळाचा विकास साधणारी नवी व स्वतंत्र रचना म्हणजे प्रतिभाजन्य विस्तार होय. मूळ कलाकृतीच्या रूपदर्शनात दुसऱ्या प्रतिभावंताला विकसनक्षमता जाणवत असते. मुळाची मर्यादा संभाळून मुक्तेश्वरी आदिपर्वात अशी विकासशील नवता फुलून आली आहे. सौप्तिकात मूलनिष्ठेमुळे ती अंकुरलेली नाही तर वनपर्वात संक्षेपनिष्ठेमुळे ती संकोचित झाली आहे. सभापर्वात मुळापेक्षा वेगळी अशी स्वतःची वैशिष्ट्ये तिला भावली आहेत. त्यानुरोधाने मूलानुसरणाची रुळलेली वाट ती अधूनमधून सोडीत विकास पावत आहे. विराटपर्वात आपल्या अंगभूत वैशिष्ट्यांचे तिचे भान वाढले आहे आणि आपल्या स्वतंत्र उद्दिष्टांच्या अनुषंगाने ती आपला असा रसरंग मांडू पाहत आहे. मुक्तेश्वरी भारत असे मूलानुसरणाकडून रचनास्वातंत्र्याकडे उत्तरोत्तर झुकत गेलेले दिसते.

आशयदृष्ट्या उपदेशपरता व उत्कट भक्ती यांच्या संदर्भात नवनिर्मिती दिसते. नैतिक सदाचरण, आध्यात्मिक भूमिका, कौटुंबिक नीती आणि राजनीतीसह लोकव्यवहार यांचा उचित ठिकाणी सन्निवेश करण्याकडे मुक्तेश्वरांचे अवधान आहे. मूल विचारांचा विस्तार, नवविचारांची जोड, पात्रमुखी आलेली प्रसंगोचित सुभाषिते, मूल्यनिष्ठ व्यक्तिरेखा आणि त्यांच्या कृतीउक्तीतून घडणारे भावशील मूल्यदर्शन यामुळे मुक्तेश्वरी भारतास विचारजडत्व न येता मूल्यात्मकतेचे एक परिमाण प्राप्त होताना दिसते.

" जेणे वाढे उत्कट भक्ती " (२।९।१६५) हा मुक्तेश्वरांच्या नवनिर्मितीचा एक

ठळक स्रोत आहे. या भक्तीचा आलंबनविभाव असलेल्या कृष्णाभोवती बांधलेले प्रसंग त्यामुळे अधिक नाविन्याने नटतात. देवावतारी कृष्ण केंद्र ठरून मुळातील राजपुरुषांच्या संघर्षकथेला भक्त अभक्तांच्या भक्तिकथेचे रूप येते. भक्तीला अवसर देणारी प्रसंगचित्रे, पात्रांची भक्तिशीलता, आध्यात्मिक व पौराणिक उपमाने यातून मुक्तेश्वरांचे भक्तहृदय आविष्कृत होते. मध्ययुगाच्या भक्ती या केन्द्रवर्ती जीवननिष्ठेने मुक्तेश्वरी भारत भारलेले आहे. व्यक्तिमत्व, समकालीन युगमानस व काव्यदृष्टी यातून आलेल्या भक्तिप्रधानतेने मुक्तेश्वरांनी महाभारताचे नवदर्शन घडविले आहे.

अभिव्यक्तिदृष्ट्या नवप्रसंग, प्रसंगचित्रण, वर्णन, संवाद, कथासंबद्ध तपशील आणि प्रकृतिसूचक उपमाने अशा विविध काव्यांगात भर पडलेली दिसते.

महाभारतातील रचना-मांडणी बदलणे, भिन्न तुकडे जोडणे, अत्यल्प आधार घेणे, सुसंगत विस्तार करणे यातून मुक्तेश्वर नवनिर्मिती साधतात. पूर्वकाव्यपरंपरा व लोकमानसावरील महाभारताचा संस्कार यांचा आदर केल्यानेही अशी निर्मिती झाली आहे. महाभारताचा मुक्तेश्वरांनी लाविलेला अर्थानुवाद, कथानुसंधान, संभाव्यता, संशयनिरसन, भावतीव्रता, रंजकता यासाठी त्यांनी नवनिर्मिती केली आहे. समकालीन जीवनाचा संदर्भ, नामावळी, स्पष्टीकरण यांचे बोट धरून कधी नवनिर्मिती होते. भक्तीप्रमाणेच अत्युक्ती, अद्‌भुतरम्यता आणि भविष्यकल्पना ह्या समकालीन वाङ्मयीन प्रवृत्तिविशेषांनीही ते प्रभावित होताना दिसतात. त्यांनी केलेल्या स्वतंत्र निर्मितीमागे या सर्व प्रवृत्ती कार्यकर झालेल्या दिसतात.

महाभारताच्या आपल्या आकलनाप्रमाणे मूळ घटनांची ते जुळणी करतात आणि पोषक घटनांची भरही घालतात. त्यामुळे संवाद, व्यक्तिविशेष व कथासंबद्ध तपशील यात भर पडते. वर्णने स्वतंत्रपणे रंगवून ते कथाबंधाला प्रत्ययक्षमता देतात. त्यात नवा कल्पक तपशील भरतात. आस्वादकांच्या प्रतिक्रिया स्वतंत्रपणे वर्णितात. प्रसंगाप्रमाणे व्यक्तिरेखा नव्या रंगाने रंगविणे त्यांना प्रिय आहे. संभावनाविरह टाळण्यासाठी, प्रसंगाचा रोख बदलल्याने किंवा संक्षेपविस्तारामुळे कथौघात संगती ठेवण्यासाठी ते स्वकृत वा बदललेली संभाषणे वापरतात. महाभारतातील क्वचित कोठे अनुत्तरित धागे ते जोडून घेतात. विस्कळीत, शिथिल, पुनरुक्त भागांना सांधून घेतात. पुढील कथाभागाची सूचना देणे व बाह्य गोष्टींना कथेच्या मध्यवर्ती प्रवाहाशी जोडून घेणे अशा अनेक प्रकारांनी कथाबंधाची घट्ट वीण साधण्याकडे त्यांचा कल आहे.

अप्रयोजकता, अनौचित्य, मूलविसंगती, अश्लीलता, कालविपर्यास व अतिविस्तार यामुळे कधी ही स्वतंत्र रचना डागाळलेली आहे तथापि तिच्या गुणसंपदेचा विचार करता अशी स्थळे विरळ आहेत.

मुक्तेश्वरांसारखा स्वतंत्र प्रतिभेचा कलावंत महाभारतासारख्या ग्रंथाची चौकट स्थूलमानानेच स्वीकारतो आणि त्या मर्यादेतही आपल्या अभिनव सृजनशीलतेचा प्रत्यय देतो. या नवनिर्मितीमुळे लोकजीवनाचे आदर्श चितारले जाऊन मुक्तेश्वरी भारतास मूल्यात्मकतेचे

 

परिमाण लाभले. समकालीन युगमानसाची स्पंदने टिपल्यामुळे श्रोतृमनाशी संवाद साधता आला. विचारजडत्वाकडून कथा भावशीलतेकडे झुकली आणि तिचा बंध अधिक घट्ट विणीचा बनला. या नवनिर्मितीत त्यांची सृजनशीलता, लोकशिक्षकाची भूमिका व काव्य-दृष्टी प्रतिबिंबित झाली आहे.

संमिश्र प्रवृत्तीच्या भारतासारख्या विराट देशाला शतकानुशतके मार्गदर्शन करणारा महाभारतासारखा ग्रंथ कधीच स्थिर नव्हता. बदलत्या जीवनाबरोबर तो सदैव वाढत–विकसित होत आला आहे. अशा वेळी बदलत्या काळाचे चैतन्य जाणून भारतसंहितेचे मराठी अवतरण घडविणारे मुक्तेश्वरांसारखे कवी तिचे विकसनशील रूप सादर करीत असतात. जुन्या द्रव्याची नवी जिवंत मूर्ती घडवित असतात. एका ग्रंथाच्या भाषिक अवतरणाशी निबद्ध असलेली त्याची सृजनशीलता अशा नवनिर्मित विस्तारातच मुक्त होते. या पुनर्निर्मितीत त्यांच्या कवित्वाचे खरे दर्शन शक्य असते.

त्यामुळे महाभारताची परंपरा जिवंत आणि वाहती ठेवण्याच्या श्रेयाचेही ते वाटेकरी होतात.

□ □ □

# चार ॥ भारतकथासंक्रमण : बदल

## १. बदल : कारणमीमांसा व स्वरूपविवेचन

व्यासानुसरणाची भूमिका घेऊनही मराठी महाभारते बदललेली दिसतात. व्यासभारत ज्या काळात निर्माण झाले त्यापेक्षा अगदी वेगळ्या काळात त्यांच्या मराठी अवतरणाची प्रक्रिया घडत होती. या कालांतरात अनेक बदलांचे बीज आहे.

रामायण–महाभारतादी आर्ष ग्रंथातील सांस्कृतिक संचित पुराणांनी स्वीकारले. या समावेशनक्रियेत मूलग्रंथांचे स्वरूप बदलत गेले. उत्तरकालीन जैन, शैव, वैष्णव, शाक्त आदींनी त्यांना सांप्रदायिक रूपरंग दिले. मूलग्रंथांच्या परंपरेच्या या संकीर्ण स्वरूपात मराठीकरणाने निर्माण झालेल्या परंपरेचीही दखल पुढील कवींना घ्यावी लागली. मराठी कवींसमोर असलेले श्रोतृमानस विविध संस्कारांनी युक्त अशा पारंपारिक कथांवर पोसलेले होते. त्याच्या समाराधनासाठी मूळ ग्रंथात नसलेल्या पण लोकमानसात रुजलेल्या कथा मराठी कवींना सांगाव्या लागल्या. त्यामुळे कालौघात बदलत्या गेलेल्या आर्षग्रंथांचे मराठी कथन बदलले.

बदलत्या काळाने आपला ठसा समाजजीवन, त्याला आकार देणाऱ्या जीवनविषयक वृत्तिप्रवृत्ती आणि आध्यात्मिक मूल्ये या सर्वांवरच उठविला होता. मध्ययुगीन जाणीवांच्या अनुप्रवेशामुळे मराठी भारतकथा बदलली.

धार्मिक तत्त्वज्ञानाची व्यावहारिक व्यतिकरणे म्हणून कथावाङ्मयाकडे पाहण्याची प्रवृत्ती ऋग्वेदीय सूक्ताइतकी जुनी आहे भक्ती या मध्ययुगाच्या केन्द्रीय जीवननिष्ठेने मराठी कवींनी महाभारताचे नवरूप घडविले. भक्तिमाहात्म्यामुळे भागवतातील नटनाट्य-धारी कृष्ण मराठी महाभारतातून सूत्रधार म्हणून वावरू लागला आणि कौरव-पांडव-कथेचे मूलसूत्र कायम राहिले तरी त्यास दुय्यम स्थान मिळाले. याचा परिणाम शांतरसाची जागा भक्तिरसाने घेण्यात झाला.

शांतरसाच्या निर्गमनामागे आणखी एक परिस्थितीजन्य प्रेरणा होती. महाभारताचे मराठी आविष्कार ही मराठी समाजाची वाङ्मयीन गरज होती तशी धार्मिक व सामाजिक गरजही होती. पारतंत्र्याच्या तमोयुगात प्रवृत्तिपर प्रेरणांचे जागरण घडविणे आणि इस्लाम-ख्रिश्चन या परधर्मीयांच्या आक्रमणात स्वधर्मरक्षण करणे या उभयविध प्रेरणा त्यामागे होत्या. त्यामुळे पांगारकर म्हणतात त्याप्रमाणे " धर्मप्रधान राजकारणाचे उत्कृष्ट शिक्षण देणारा हिंदुराष्ट्राचा महाग्रंथ " म्हणून महाभारताकडे मराठी कवी आकर्षित झाले. दुष्टदलन-साधुपालन व धर्मरक्षण यांचे प्रतीक असलेली कृष्णप्रतिमा त्यांनी झळाळत्या

रंगाने रंगविली. भक्तीची दृष्टी ठेवूनच मराठी महाभारतकारांनी आपल्यापरीने महाराष्ट्र-धर्म जागविला.

यासाठी भारतकथेच्या गतकालात त्यांनी समकालाचे संदर्भ चतुराईने गुंफले. प्राचीन कथा आणि नवयुगाचे चैतन्य यांना एकत्र आणण्याची धडपड केली. त्यामुळे त्यांच्या रचनेत समकालाची स्पंदने व युगमानसाचा हुंकार जाणवतो.

व्यासभारतापासून मराठी आविष्कार वेगळे झाल्याने त्यांची तुलना हा अभ्यासाचा महत्त्वाचा भाग ठरतो. कृष्ण याज्ञवल्कि, मुक्तेश्वर, माधवस्वामी, श्रीधर, यासारख्या महाभारतकारांनीही तशी चिकित्सा केली आहे. प्राचीन कवींच्या दृष्टीने हा प्रश्न सत्य-शोधनाचा होता. आधुनिक वाङ्मयाभ्यासकांच्या दृष्टीने तो वाङ्मयीन सौंदर्यसमीक्षेचा आहे. कवीने केलेल्या फेरबदलातून त्यांची स्वतंत्र प्रतिभा, औचित्यविवेक, काव्यदृष्टी, बदलत्या मनोश्रद्धा स्पष्ट होतात. वाङ्मयीन आकलनाप्रमाणे मूल्यमापनालाही असा तौलनिक अभ्यास सहायक ठरतो.

## २. सभापर्व – गौण बदल

मुक्तेश्वरी भारतातील गौण बदल अनेक असल्याने त्या सर्वांची नोंद येथे करता येणार नाही. काही प्रातिनिधिक उदाहरणांच्या साहाय्याने अशा बदलांची कारणमीमांसा करता येईल.

मुळातील दुसरा पण मुक्तेश्वरांनी तिसरा म्हणून वर्णिला ( मभा २।२४।२ मुभा २।१४।५६–६० ). विस्तृत कथा सांगताना अनवधानाने असा तपशील बदलला जाणे शक्य आहे. राजसूयाच्या अखेरी अर्जुन अभिषेकसमाप्तीनिमित्त दान देतो. पण ते राजांच्या शांतीसाठी दिल्याचे मुक्तेश्वर ( मभा २।४९।२० मुभा २।१२।२३५ ) सांगतात. येथे मुळात पुरेशी स्पष्टता नाही. त्यामुळे दोन्ही मीमांसा संभवनीय आहेत. हा बदल मानलाच तर तो संदिग्ध अर्थामुळे झाला आहे. राजाऐवजी जरेनेच जरासंध नाव ठेवले ( मभा २।१७।६ मुभा २।६।४५–४६ ). पांडव द्यूतसभेत कर्णाजिने नग्न बसतात पण ते वल्कलाजिने घालून बसल्याचे मुक्तेश्वर ( २।६७।३९ मुभा २।१५।१०५ ) सांगतात. या बदलामागे महाभारताचा लोकमानसावरील पारंपरिक ठसा जपण्याचा प्रयत्न दिसतो. वल्कलांच्या उल्लेखात तर औचित्य संभाळण्याचाही भाग आहे लोकश्रद्धेप्रमाणे लोक-व्यवहाराचेही भान कोठे दिसते. कृष्ण आल्यावर राजसूयाची आमंत्रणे देण्याऐवजी कृष्ण येण्याआधी ती दिली ( मभा २।३०।२६ मुभा २।९।४ ). ऋत्विजनियुक्ती आमंत्रितांच्या आगमनापूर्वी करण्याऐवजी आगमनानंतर केली ( २।३०।३३–३७ मुभा २।९।३८–४२ ). आमंत्रणानंतर व कार्यारंभापूर्वी पाहुण्यांचे आगमन होते. हा समकालीन लोकव्यवहार डोळ्यासमोर असल्याने हे बदल झाले असावे. अर्जुनदिग्विजयात भगदत्ताशी झालेले युद्ध आठ दिवसात संपले व ऋषिकाने अर्जुनास आठ अश्व दिले ( मभा २।२३।२०, २।२४।२६ ). मुक्तेश्वरांनी हे युद्ध तीन दिवसात संपले व ऋषिकाने आठशे घोडे

दिल्याचे ( मुभा २।८।१४, २५ ) वर्णिले. या साभिप्राय अतिशयोक्तीने अर्जुनाचा पराक्रम व पांडवांचे वैभव अधिक गडद होते.

निरनिराळ्या पात्रांना कमी-अधिक महत्त्व देताना काही बदल हेतुपुरस्सर केलेले दिसतात. तिन्ही भेरी कृष्णभीमार्जुनांनी फोडल्या असताना एकट्या भीमाने फोडल्याचे वर्णन ( मभा पृ. १०५ * २०८ मुभा २।६।९८ ), भीमप्राधान्याचे निदर्शक आहे. कृष्णाचा प्रभाव वाढविणाऱ्या फेरफारातून ( मुभा २।१।२८, २।६।१५२–१५०, २।९।६० ) कृष्णमहिमा ठसविण्याचा हेतू दिसतो. अनुद्यूतप्रसंगी भीमास धर्मार्जुन अनुसरत असता मुक्तेश्वरांनी त्यांना विरोध करावयास लावला ( मभा २।६७।५ मुभा २।१६।३१ ). प्रसंग व व्यक्तिस्वभाव यांना अनुसरून व सामान्य मानवी व्यवहाराशी सुसंगत अशा पद्धतीने बदल करून संभावनाविरह व संशययोग ही रसविघ्नें टाळण्याचा प्रयत्न मुक्तेश्वरांनी केला आहे. शिशुपाळाबरोबर कौरवांनाही अग्रपूजा आवडली नसल्याचा निर्देश करून ( मुभा २।१०।७४–७९ ) दूरान्वित संघर्ष मध्यवर्ती संघर्षाशी बांधण्याचा प्रयत्न ते करतात. मूळ द्यूतप्रसंगातील रोखठोक स्पष्टतेवर मुक्तेश्वरांनी कौरवांच्या दांभिकतेचा बुरखा टाकला आहे. मुळात द्रौपदीचे वैभव पाहून धृतराष्ट्राच्या सुनांना ईर्ष्या वाटली ( मभा २।५२।३२ ) पण त्यांनी तिचे स्वागत केल्याचे सांगून ( मुभा २।१३।७४ ) मुक्तेश्वर कौरवांची दांभिकता ठसठशीत करतात.

राजा येताना पाहून त्यास पुत्र देण्यासाठी जरा दिव्य स्त्रीरूप धारण करते ( मभा २।१६।४७ ) पण रडणाऱ्या मुलाच्या माये ती ते धारण करते ( मुभा २।६।३९ ) असे सांगून मुक्तेश्वर मूळ व्यवहारोन्मुखतेला भावशीलतेत परावर्तित करतात. पांडव द्रौपदीला नग्न करण्याची आज्ञा कर्ण-दुर्योधनात विभागून ( मुभा २।१५।१०४, ११७–११८ ) संपूर्ण प्रसंग टप्प्याटप्प्याने तीव्र करीत भावकल्लोळाकडे नेला आहे. कधी भावोत्कटतेच्या कल्पनेमुळे काही चमत्कारिक बदल होतात. पते सांगण्याऐवजी दुर्योधन शकुनीच्या पाया पडून सांगतो ( मभा २।४४।२२ मुभा २।१२।१०४ ), दुःशासनाऐवजी सर्वच कौरव वनगमनप्रसंगी भीमाची चेष्टा करतात ( मभा २।६८।१९ मुभा २।१६।६३–६४ ). भाव उत्कट करण्याच्या प्रयत्नात ते कधी भडक होत जातात, हे मुक्तेश्वर लक्षात घेत नाहीत.

सर्व पांडवांना व्यास भविष्यकथन करतात ( मभा परि. १ क्र. ३० ) त्याऐवजी ते धर्मराजास एकांती निजहितार्थी कथन करतात व तो ते फक्त भीमार्जुनांनाच सांगतो ( मुभा २।१२।७, ३८ ) हे मुक्तेश्वरांनी केलेले फेरफार व्यास-पांडव व पांडवांचे परस्परांतील भावसंबंध यावर आघात करणारे आहेत. त्यामागे अन्य प्रकारची प्रयोजकता नसल्याने ते समर्थनीय वाटत नाहीत.

जरासंध मथुरेत गदा फेकतो ती “ एकोनयोजनशते ” ( मभा २। पृ. ९७ * १९७ ) पण येथे ती “ नव्वद एक योजने दुरी ” अंतरावरून फेकली जाते ( मुभा २।५।१५५ ). अशा किरकोळ बदलांचा संबंध मुक्तेश्वरांच्या संस्कृत भाषेच्या आकलनाशी लावण्यापेक्षा

त्यांच्या समोरील भारतप्रतीकडे व मुक्तेश्वरी भारताच्या प्रमाणप्रतीच्या अनुपलब्धीकडे लावणे अधिक योग्य ठरेल.

## ३. सभापर्व : प्रधान बदल

महाभारती संविधानकाल, पात्र–प्रसंगात, संभाषण–कृतीत मुक्तेश्वरी रचनेत काही बदल दिसतात. त्यांच्या चिकित्सेतून मुक्तेश्वरी भारताची पृथगात्मता स्पष्ट होईल.

मूलभागाचा स्वीकार करताना मुक्तेश्वर त्यात कधी असा काही बदल करतात की, त्यामुळे त्यास भडक रूप येते. " पूजा घेत्या दोघे जनक । पूजा कर्तया तातपंचक । यालागी दोहींचा विवेक । यथायोग्य दिसतसे " ( २।१०।८४ ) या स्वतंत्र ओवीमुळे शिशुपालाचे भाषण मर्मभेदी, तुच्छतादर्शक व अधिक तीव्र होते. " अल्पचेताः " ( मभा २।६०।१८ ) ऐवजी " हा नपुंसक । वाहे पांडवांचा धाकू " ( २।१५।१८ ) अशा भडक रूपात दुर्योधन प्रतिकामीचा उल्लेख करतो. द्यूतानंतरच्या कर्णाच्या भाषणात (मभा २।६४।१–३ मुभा २।१५।२७०–२७३ ) द्रौपदीचे माहात्म्य जाणवल्याचा अंधुक प्रत्यय आहे आणि पांडवांना सूक्ष्म टोमणाही आहे. मुक्तेश्वरी रचनेत उपरोधाचा सूर नुसताच तीव्र नाही तर कर्कश आहे. त्यामुळे कर्णाचे अधमत्व ठसठशीत झाले आणि त्याच्या बोलण्याला भडक–बटबटीत रूप आले. " आता कोटी नमस्कार । करुनि प्रार्थितों वारंवार " ( २।१३।२२ ) ही विदुराची विनंती उत्कटतेच्या नादात अशीच अतिरेकाकडे झुकते. उत्कटतेची मुक्तेश्वरी कल्पना मूल प्रसंगांना असे भडक रूप देते. ग्रंथाचे वाचन पारायणरूपाने श्रोतृसमूहात होत असल्याने श्रोत्यांची स्थूल अभिरुची लक्षात घेऊनही अशी रचना आली असावी.

मूळ प्रसंगाला उत्कट रूप देण्यात मुक्तेश्वर कधी यशस्वी होतात. दुर्योधनाची मयसभेतील फजिती ( मभा २।४३।१–१०, २।४६।२६–३५ मुभा २।१२।४३–५६, १३२–१३३ ) मुळातील तपशील स्वीकारून अधिक तीव्र केली आहे. दुर्योधनाची क्रिया व इतरांची त्यावरील प्रतिक्रिया अशी त्यांची मांडणी आहे. व्यक्तींच्या आविर्भाव–कृतींनी त्यात सजीवता येते. " कुशल डोळसांची मती । स्तब्ध होय चालता " या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमींवर पांडवांनी केलेला उपहास दुर्योधनाला जिव्हारी झोंबावा यात नवल नाही. " तथागतं तु तं दृष्ट्वा भीमसेनो महाबलः । अर्जुनश्च यमौ चौभौ सर्वे ते प्राहसंस्तदा " किंवा " तत्र मां प्राहसत्कृष्णः पार्थेन सह सस्वनम् । द्रौपदी च सह स्त्रीभिर्व्यथयन्ती मनो मम् " यापेक्षा " भीमार्जुनांसहित सकळीं । हास्य कीजे पिटोनि टाळी । असंख्य प्रमदांसह पांचाळी । हास्य करी विनोदें " हा उल्लेख अपमानाला अधिक तीव्र करतो. " भीमसेनेन तत्रोक्तो धृतराष्ट्रात्मजेति च । संबोध्य प्रहसित्वा च इतो द्वारं नराधिप " यात सूक्ष्मता आहे, सूचक नर्म थट्टा आहे. " पुढती हांसोनि बोले भीम । शतपुत्रांत अत्युत्तम । धृतराष्ट्र पुत्र ऐसें नाम । सत्य केलें त्वां एकें " किंवा " भीम म्हणे, रे ! मंदमती । पुत्र होसी अंधाचा " या मुक्तेश्वरी उद्‌गारात त्यास प्रकट चेष्टेचे व उघड

उपहासाचे स्वरूप प्राप्त होते. यामुळे एकूण प्रसंग अधिक उत्कट व तीव्र होतो. कथेची रंगत वाढविणारा होतो. विकर्णास कर्णाचे प्रत्युत्तर ( मभा २।६१।२६-४० मुभा २।१५।९८-१०४ ) बहुंशी मूलानुसार असले तरी मूलभाव तीव्र करणे मुक्तेश्वरांना कसे प्रिय आहे तेही त्यावरून दिसते. अभाग्यवनीचे गोळांगुळ, वंध्या, विधवा, नपुंसक नरू, दरिद्रीयाचे प्रेत, क्लीब दरिद्री प्रेतासरी यासारख्या स्वतंत्र उपमानांनी दुःशासनाच्या भाषणातील ( मभा २।६८।३-१४ मुभा २।१६।४४-५५ ) उपहासाचा व तुच्छतेचा सूर अधिक धारदार बनविला आहे. दुर्योधनाने पांडवांची केलेली चेष्टा ( मभा २।६८।२३ मुभा २।१६।६७-६८ ) " चेष्टा कुचेष्टा वक्र गमन । दाखवी वाकुल्यांचे चिन्ह " अशा मूलसंबद्ध विस्ताराने समूर्त केली आहे. या दोन्ही उदाहरणात दुष्टांचा दुष्टावा ठसठशीत करण्याकडे कल आहे. त्यामागे आशयदृष्ट्या नैतिकतेची भूमिका– म्हणजे दुर्गुणांचा तिरस्कार वाटावा अशी योजना– आहे तर अभिव्यक्तिदृष्ट्या मूलभावाला उत्कट करण्याची प्रेरणा आहे.

मूलभावाची दाहकता समोरच्या श्रोतृसमूहमानसाकडे अवधान देऊन सौम्य करण्याचीही प्रवृत्ती मुक्तेश्वरात आहे. द्रौपदीचा अपमानास्पद व तुच्छतापूर्वक उल्लेख करून दुर्योधन विदुरास तिला घेऊन यावयास सांगतो (मभा. २।५९।१). त्यास " सामोपचारे आणावी " ( २।१५।१ ) असे सौम्य रूप मुक्तेश्वर देतात. या प्रसंगातील भावनाट्याचे सारे ताण क्रमशः वाढवित न्यावे म्हणूनही त्यांनी असे केले असावे. भीमप्रतिज्ञेत ( मभा २।६८।२१ ) संयुक्त वर्णांच्या वापराने येथील भीषण भावाला रौद्र-भयानकाचा स्पर्श झाला आहे. मुक्तेश्वरी रचनेत ( २।१६।६५ ) तो सौम्यतेने प्रकटतो.

युधिष्ठिरकृत शिशुपालसमजावणी ( मभा २।२५।१–५ मुभा २।१०।१०२–१०६ ) सौम्य विरोध, वस्तुस्थितिकथन आणि न्याय्य समर्थनाच्या रूपाची आहे. मुक्तेश्वरांनी त्या भागास समर्थनापेक्षा समजावणीचा सूर दिला आहे. मुळातील भावच्छटा मुक्तेश्वरी रचनेत अशा बदलल्या जातात ( जसे मभा २।५२।५–१६ मुभा २।१३।४७–६२, मभा २।०२।३२ मुभा २।१३।७४ ).

बदलत्या काळाचे ठसे मुक्तेश्वरी भारतावर उमटलेले दिसतात. दहा हजार उंट संपत्ती वाहून नेत होते (मभा २।२९।१७) याऐवजी माणसांना वेठीस धरून संपत्ती वाहिल्याचे मुक्तेश्वर ( २।८।१५९ ) सांगतात. लेखकाचा काळ त्यालाही नकळत वाङ्मयात असा प्रतिबिंबित होत असतो. " पांचाली, कृष्णे " ( मभा २।६०।२० ) अशा एकेरी संबोधनानी दुःशासन द्रौपदीला हाकारतो. भारतकालीन स्त्रीपुरुषसंबंधाच्या दृष्टीने ते योग्य आहे. मुक्तेश्वरांचा दुःशासन, " वहिनी " असे संबोधून आदरार्थी बोलतो. त्यांची द्रौपदीही " जी ! दुःशासना " असे मराठी वळणाने बोलून " ज्येष्ठबंधूची अंतुरी । तुम्हांस मान्य सर्वोपरी । स्नेहें गांधारीचिये सरी । मान दिधला पाहिजे " (२।१५।२८) अशी उत्तरकालीन संस्कृतीशी जवळीक साधणारी अपेक्षा व्यक्त करते. पात्रसंबंधात कल्पिलेला बदल आणि त्यामुळे झालेले भाषांतर हे कालविपर्यासाचेच एक निराळे रूप

आहे. कालनिष्ठ कल्पनांच्या समावेशाची प्रवृत्ती अशा बदलामागे कार्यकर झालेली आहे.

कधी महाभारताचा लोकमानसावरील जो स्थूल संस्कार आहे तो जपतानाही मुक्तेश्वर दिसतात. समकालीन श्रोतृमानसाशी संवाद साधून आपल्या रचनेला जिवंतपणा आणण्यासाठी ते आवश्यक होते. द्यूतप्रसंगी विदुराचा उपदेश ( मभा २।५७।१३–२१ मुभा २।१४।१२०–१३१ ) मुळात स्पष्ट, सडेतोड, युक्तिवादपूर्ण व मार्मिक विचार-सूत्रांनी भरलेला आहे. उपदेशाची इष्टता व उपदेशाचा हक्क त्यात ठासून सांगितला आहे. मुक्तेश्वरांनी विचारसूत्रे गाळली व त्यास अकारण पांडवप्रतिपादनाचे रूप दिले. विदुरा-प्रमाणेच भीष्मही सत्पक्षाभिमानी असल्याने मनातून पांडवांच्या बाजूचे होते असे लोक-श्रद्धा मानते. द्रौपदीवस्त्रहरण स्थगितीशी त्याचा संबंध नसतानाही मुक्तेश्वरांनी तो वर्णिला ( २।१५।२४४–२४६ ) त्यामागे हीच भावना आहे मुळात नसताना गोपी-वृंदा यांच्या उल्लेखासह कापट्य व परस्त्रीगमनाचा आरोप शिशुपाल कृष्णावर करतो ( २।११।२६–२८ ). त्यावर भारती चरित्राहून भिन्न अशा कृष्णाच्या लीलाचरित्राची छाप आहे. मराठी महाभारतात भारती कृष्णाऐवजी भागवती कृष्ण चित्रित होतो तो असा.ःस्त्रीपुरुषसंबंधात रस घेणारी मुक्तेश्वरांची विशिष्ट वृत्तीही सूचित होते.

कथाबंधाच्या चित्राकृतीत ( Pattern ) सर्व पात्रांना यथाप्रमाण स्थान देण्यासाठी एका पात्राची भाषणे दुसऱ्या पात्राच्या मुखी वापरलेली दिसतात. केवळ हातानेच भीमाचे निवारण करणाऱ्या युधिष्ठिराला ( मभा २।६४।१६–१७ ) तो प्रसंग आरंभीच घेऊन विस्तृतपणे बोलावयास लावले ( मुभा २।१५।५५-६२ ). अर्जुनाची मुळातील सांत्वनपर भाषणे ठेवली ( जसे, २।१५।६७–७३ ). आणि जोडीला कर्णाच्या टोमण्याला भीमाऐवजी अर्जुनासच उत्तर द्यावयास लावले ( २।१५।२७४–२७९ ), महाभारतात वस्त्रहरणप्रसंगी नकुलसहदेवांना नाममात्र अस्तित्व आहे. भीम क्षुब्ध आहे. अर्जुन सांत्वन करण्याइतका शांत आहे आणि युधिष्ठिर जवळजवळ भानरहित आहे. मुक्तेश्वरांनी केलेल्या बदलामुळे भीमाच्या क्षुब्धतेचा मूलप्रत्यय येतो आणि युधिष्ठिर व अर्जुनाच्या स्वभावरेखा ठसठशीत होतात.

याचा परिणाम व्यक्तिचित्रणावरही होताना दिसतो. कर्णाच्या टोमण्यावर भीम प्रति-टोला देतो तेव्हा अर्जुन, " भारता भीमा, हीन पुरुषांनी काही म्हटले किंवा न म्हटले तरी उत्तम पुरुष कठोर भाषणाने कधीच उत्तर देत नाहीत " ( मभा २।६४।८ ) असे त्याचे सांत्वन करतो. मुक्तेश्वर मात्र भीमाऐवजी अर्जुनासच प्रत्युत्तर द्यायला लावतात: त्यामुळे सौम्यप्रकृती व सभ्यतापालन करणाऱ्या अर्जुनामुखी " अर्जुन म्हणे, रे कौलिक-पुत्रा। शब्दशरे ताडिसी शस्त्रा। सर्वहि श्लाघ्यता अपवित्रा। तुजाचे साजे एकाते ॥ कुष्टी उपहासे रूपसा,। गर्भांध हिणवी डोळसा। राजहंसाते कोळसा। वायस म्हणे ज्यापरी " ( २।१५।२७४–२७५ ) अशा तीव्र व मूलप्रकृतिविरोधी ओळीही येतात: मुक्तेश्वरी भारतातील व्यक्तिचित्रण कसे व किती बदलले आहे, हे यावरूनही समजावे.

आपल्या कथेला मूल्यात्मक परिमाण देण्यासाठीही मुक्तेश्वर बदल करताना दिसतात. भीमसांत्वन करताना त्यांनी युधिष्ठिरास बोलावयास लावले ( २।१५।५५–६२ ) आहे. त्यात सत्यनिष्ठा व प्रतिज्ञापालन या मूल्यांचा उच्चार आहे आणि सत्यनिष्ठांचा रक्षण-कर्ता ईश्वर ही श्रद्धाही जागती आहे. या स्वतंत्र भाषणाने पांडवांचे सत्यप्रतिज्ञापालन, तितिक्षा व कौरवापेक्षा श्रेष्ठत्व स्पष्ट होऊन श्रोत्यांची मानसिक गरज भागते. विकर्णाच्या तर्कशुद्ध भाषणाला ( मभा २।६१।११–२५ मुभा २।१५।८७–९७ ) मुक्तेश्वरांनी श्रद्धाळु आस्तिकाच्या पातळीवर नेऊन पापभीरुता न्यायशीलता व ईश्वरनिष्ठा या मूल्यांचा त्यास आधार दिला. भीष्माची चिकित्सक भाषणेही ( मभा २।६०।४०–४२, २।६२।१४–२१ ) सत्यनिष्ठेच्या पुरस्कारामुळे श्रद्धाळू बनली आहेत. युधिष्ठिराच्या राजसूयकांक्षेचा संबंध पुत्रधर्म व पितृप्रेम याच्याशी जोडून त्यांनी कौटुंबिक नीतीचे उद्घाटन ( २।५।९२–१०१ ) केले. त्यामुळे मुळातील ऐतिहासिकता लोपली तर काव्याला आवश्यक असा भावस्पर्श मिळाला. श्रीकृष्णाने जरासंघाला दिलेल्या उत्तरात ( मभा २।१९।४५–५० मुभा २।६।१२२–१२७ ) स्नातकाच्या नियमाधारे क्षात्रधर्म आला आहे. मुक्तेश्वरांनी भेरीभंग, शृंगभंग यांचे नीतिबोधपर स्पष्टीकरण आणि पुष्पधारणाचे आध्यात्मिक महत्त्ववर्णन केल्याने हे भाषण धर्मसंबद्ध मूल्यविचाराकडे झुकते. मुळातील साधे तपशील मुक्तेश्वरी रचनेत भक्ती-नीती यांच्या अंगाने वळवून घेतले जातात ते असे.

मुळात असो-नसो मुक्तेश्वर शक्य तेथे प्रसंग–भावांना भक्तीचा भगवा रंग देतात, असे आणखीही अनेक उदाहरणांनी दाखविता येईल. राजाने अपरात्री अर्थविचार करावा ( मभा २।५।१८ ) तर त्याने अपरात्री मोक्षविचार करावा ( मुभा २।३।७५ ) असे मुक्तेश्वर बजावतात. क्षत्रियकुळाच्या ऐतिहासिक माहितीस "कृती त्रेती राक्षस असुर। तेच द्वापारी पृथ्वीधर। विष्णुद्रोही म्हणोनि वैर। सदा मजसी चालविती" ( २।५।१२८ ) असे "विनाशाय च दुष्कृताम्"चे ईश्वरी सूत्र ते जोडतात. चंडकौशि-काचे भविष्यकथन ( मभा २।१७।१२–१९ मुभा २।६।५१–५९ ) मूलानुसार पराक्रम-सूचक असले तरी त्यास ईश्वरविरोधाची मर्यादा घालण्यात आली आहे. जरासंघाच्या प्रत्युत्तरावर ( मभा २।२०।२५–२८ मुभा २।६।१५२–१६२ ) देवद्रोहाचा रंग फासण्यात आला आहे. भक्तीच्या अंगाने कथेचा अर्थानुवाद लावल्याने हा बदल झाला आहे. जरासंधाशी बोलणाऱ्या कृष्णाचे भाषण ( मभा २।२०।६–२४ मुभा २।६।१३३–१५१ ) ऐतिहासिकता, ज्ञात्याभिमान व क्षात्रधर्म या कालोचित प्रेरणांनी भारलेले आहे. मुक्तेश्वरांनी त्यास धर्मस्थापना, साधुपालन व दुष्टनिर्दालन या प्रेरणांची नव्याने जोड दिली आहे. धार्मिक समन्वयशीलता व तत्कालीन नीतिशास्त्रही त्यांनी त्यात गोविले आहे. शिशुपालवध (मभा २।४२।२१–२४ मुभा २।११।५८–६५) होताच त्याचे तेज कृष्णाशी एकरूप होते. मुक्तेश्वरी रचनेत मोक्ष मिळविला अशी गर्जना करीत शिशुपालाचे मस्तक वर जाते आणि कृष्णचरणाजवळ स्थिरावते. नंतर तेज एकरूप होते. मुळातील अद्भुत अधिक तीव्र करून भक्तिरंगाने त्यांनी ते अधिक खुलविले आहे.

भारती प्रसंगांचे मुक्तेश्वरी आकलन कधी भिन्न असते. त्यामुळे प्रसंगाचा रोखच बदलतो. त्यानुषंगाने नवनिर्मिती होत राहते. साहजिकच मूलभावापेक्षा वेगळ्याच भावाचा प्रत्यय आस्वादकाला येतो. महाभारतातील द्यूतप्रसंगात उभय पक्षांना स्पष्ट कल्पना असल्याने त्यात एक अटळता व पूर्वनियोजन आहे. मुक्तेश्वरांनी त्यात कौरवांच्या बाजूने गुप्त पूर्वनियोजन व पांडवांच्या बाजूने आकस्मिकता आणल्याने सहजसाध्या वाटणाऱ्या गोष्टी एकदम उग्र-भीषण व्हाव्या तशा झाल्या आहेत. द्यूतरंभाचे मुक्तेश्वरी चित्रण त्यातील आकस्मिकतेने वेगळे झाले आहे.

## ४. अन्य पर्वातील बदल

आदिपर्व विस्तारपूर्ण असल्याने त्यात किरकोळ फेरफारांची संख्या पुष्कळच[१] आहे. "रोहिण" ऐवजी "रोहिणेय" अशी नामांतरे, संख्याबदल, "दुःखाश्रु पुसण्या"-ऐवजी "पाण्याने तोंड धुतले", असे किरकोळ बदल त्यात आहेत. "रासभयुक्त स्यंदनेन" ( १।१३२।७ ) ऐवजी "दिव्यरथ" ( १।३५।४८ ) समकालीन श्रोत्यांना अधिक स्वाभाविक वाटणारा होता "तं शवं अब्रवीत" ( १।११२।२९ ) ऐवजी "नातरी झोटिंगमुखीची वाणी" ( १।२७।१११ ) अधिक मराठी वळणाची आहे. मुळात धृष्टद्युम्न-द्रौपदीच्या जन्मवेळी द्रुपदपत्नी ऋत्विजांनी बोलावूनही बाहेर येत नाही ( मभा १।१५५।३५ ). मुक्तेश्वरी रचनेत ( १।३९।३५ ) ती स्वतः होऊन बाहेर येते व पुत्रेच्छेने ऋषींना नमस्कार करते, असे कविकालीन संस्कृतीला अनुरूप वर्णन येते.

व्यक्तिरेखा निराळ्या रंगाने रंगविणारे बदल आदिपर्वात आहेत. भीष्माला शांतनुचे दुःख मुळात अमात्याकडून कळते ( मभा १।९४।६५-६७ ). मुक्तेश्वरांचा भीष्म शांतनुची समस्या जाणून "रायासि नाही विषयस्वार्थ। नाही स्त्रीभोगाचे आर्त। परी आमुचेचि मनोगत। गृही गृहिणी पाहिजे" ( १।२३।४० ) असे मंत्र्यांना सांगतो. भीष्म विवाहाची अशी खटपट करीत आहे, हे कळल्यावर सत्यवतीशिवाय अन्य नोवरी न करण्याचा निश्चय शांतनु बोलून दाखवितो ( १।२३।४३-४६ ). या बदलामुळे भीष्म अधिक उदात्त व शांतनु अधिक उतावळा झाला आहे. मुळात ययाती शुक्रकोपाने भयभीत

---

१.

| महाभारत | मुक्तेश्वर | महाभारत | मुक्तेश्वर |
|---|---|---|---|
| १।३।११९ | १।२।९८ | १।६।९ | १।३।१९ |
| १।२३।१०-११ | १।५।६७ | १।२५।३१ | १।५।१११ |
| १।३७।१७ | १।७।९३ | १।५९।२१ | १।१४।२९ |
| १।६०।३० | १।१४।८८ | १।६०।३२ | १।१४।९० |
| १।६०।६६ | १।१४।११६ | १।६९।४८ | १।१६।२१८ |
| १।७१।१० | १।१७।२८ | १।७१।१२ | १।१७।४२ |
| १।७३।४ | १।१८।७ | १।९०।९५ | १।२१।८४ |
| १।९६।५७ | १।२३।१६३ | १।१७२।१ | १।४०।१५२ |

झाल्याने देवयानीच्या विवाहाची इच्छा करीत नाही. मुक्तेश्वरांचा ययाती भयभीत झाला तरी आसक्त व विवाहेच्छू आहे.

कथेच्या चित्राकृतीत पात्रांना यथाप्रमाण स्थान देण्यासाठीही काही फेरफार केलेले दिसतात. हिडिंबवधाच्यां वेळीं अर्जुनाच्या जोडीला नकुलदेवही भीमाला सहाय्य करू इच्छितात ( १।३७।४८-५० ), ब्राह्मणाचा वृत्तांत सर्व पांडव विचारतात ( मभा १।१५३।५, १०-११ ). येथे अर्जुनच विचारतो ( मुभा १।३९।३ ). द्रौपदीस्वयंवर वृत्तांतात अर्जुनास असे प्राधान्य देण्याची दक्षता मुक्तेश्वरांनी घेतली आहे.

मुळात द्रुपद केवळ द्रोणवधार्थ पुत्र मागतो (मभा ३।१५५।११,२९-३०) येथे त्या जोडीने अर्जुनपत्नी होऊ शकेल अशी कन्याही मागतो ( मुभा ३।३९।२०,३७,३८ ) त्यामुळे द्रुपद-द्रोण संघर्ष कौरव-पांडव या मध्यवर्ती संघर्षाशी जोडला जातो. अर्जुनाने लक्ष्यभेद केल्यावर युधिष्ठिर नकुलसहदेवांसह निघून जातो. नंतर अर्जुन द्रौपदीसह जाण्यास निघतो (मभा १।१८०।२१,२३). हे काहीसे चमत्कारिक वाटते. तेव्हा द्रौपदीला घेऊन नकुलदेवांसह युधिष्ठिराने जावे असे मुक्तेश्वरांचा अर्जुन स्वतःच सुचवितो ( १।४१।८० ). पण मधील युद्धामुळे ते सगळे शेवटी एकत्रच जातात ( १।४२।४-५ ), असे सुसंगतपणे सांगून मुक्तेश्वरांनी संभावनाविरह टाळला आहे. द्रौपदीने स्वयंवर-प्रसंगी सूतपुत्रत्वाचा निर्देश करताच कर्ण प्रयत्न सोडून देतो. ( मभा १ पृ. ७२४ *१८२७ ). मुक्तेश्वरांनी या प्रसंगाचा विस्तार करून कर्णाला उद्धत, वाचाळ व अखेरी फजित करून अपमानित केले आहे. ( १।४१।४९-५७ ). हे चित्रण महाभारताचा लोकमानसावरील ठसा संभाळण्यासाठी केलेले दिसते. आदिपर्वात असे अनेक बदल असले तरी प्रायः मूलभावांच्या मर्यादेतच ते केलेले दिसतात.

**वनपर्वात** बारीकसारीक तपशील कधी बदललेले दिसतात. मैत्रेयोपदेशाने रागावलेला दुर्योधन उरूताडाऐवजी जानूताडन करतो ( मभा ३।११।२८ मुभा ३।२ २७ ). अशा बदलामागे विशेष कारण दिसत नाही. दमयंतीच्या भाळी असलेल्या " पिप्लुरूतमः " – तीळाच्याऐवजी " अनर्घ्यमणी " ( ३।८।४८ ) असल्याचा निर्देश करून मुक्तेश्वर कधी मूळच्या स्वभाविकतेला अद्‌भुताचा रंग देतात.

व्यक्तिरेखांचे रूपरंग बदलणारे निर्देश वनपर्वात पुष्कळ आहेत. पाताळातील दानवांची भेट दुर्योधन गुप्त ठेवतो ( मभा ३।२४०।३४ ) दुर्योधन कर्णास ती सांगते ( मुभा ३।१३।२६ ) असे वर्णन मुक्तेश्वर कर्ण-दुर्योधनांचे सख्य सुचवितात. मुळात दुर्वास पळून जातात तर मुक्तेश्वर दुर्वास सहदेवाजवळ स्पष्टीकरण करून जातात ( मभा ३।२६३।६३ मुभा ३।११।१५२-१५६ ). त्यामुळे दुर्वासांच्या व्यक्तिरेखेची प्रतिष्ठा टिकवून कथनाला संभाव्यता आली आहे. " संकटांना मर्यादा, निमित्त वा कारण असत नाही. प्रारब्धरूप जो धर्म तोच पुण्य व पाप ह्या उभयतांचे फल पुरुषाला देत असतो " (मभा ३।२९६।१ ) हे धर्माचे अरणि शोधप्रसंगीचे उद्‌गार गाळल्याने मुक्तेश्वरांचा धर्म मूलगांभीर्य व स्थिरप्रज्ञा घालवून बसतो व त्याला केवळ दुबळ्या रडवेपणाचे रूप येते.

घोषयात्रा व नंतर दुर्वासपरीक्षा ह्या मूलक्रमात बदल करून मुक्तेश्वर दुर्वास परीक्षे-नंतर घोषयात्रा वर्णितात. या क्रमांतरावर जनाबाईने सूचित केलेल्या क्रमाचा म्हणजे पूर्वकाव्यपरंपरेचा–प्रभाव आहे. द्रौपदीधावा ऐकून कृष्ण शेजारी असलेल्या रुक्मिणीला शय्येवर सोडून येतो ( मभा ३। परि १ क्र. २५. ) त्याऐवजी तो जेवते ताट कोटून निघतो ( ३।११।९५ ) असा श्रोत्यांना देवावताराविषयी अधिक उचित वाटणारा बदल मुक्तेश्वर करतात. द्वैतवनाला ( मभा ३।२५।१३ ) ते अद्वैतवन ( ३।४।१ ) म्हणतात. अद्वैतनिष्ठ भक्तिमार्गी मुक्तेश्वरांना द्वैत असे स्थलनामातही सहन होत नाही ! "काम्यकवनीं कामनातीत" ( ३।१४।१ ) असे काम्यकवनही त्यांनी अध्यात्मदृष्टीने वर्णिले आहे. कवीचा भक्तिनिष्ठ दृष्टिकोण अशा बदलांच्या मुळाशी दिसतो.

**विराटपर्व** निरनिराळ्या प्रकारच्या बदलांनी भरलेले आहे. धौम्योपदेश, परिवार पाठवणी, सेवकनीती सांगून महाभारतकारांनी पांडवांचे भावी बेत सांगितले आहेत. मुक्तेश्वरांनी भावी बेत आधी सांगून मग उरलेला भाग सांगितला. पहिल्यात गुप्ततेची दक्षता आहे. दुसऱ्यात पूर्वनियोजनाची जाणीव आहे. दोन्ही क्रम आपापल्या परीने सरस आहेत. धर्म, भीम, द्रौपदी, सहदेव, अर्जुन, नकुल ह्या क्रमाने पांडव विराटाच्या दरबारात प्रवेश करतात ( मभा ४।अ. ६ ते ११ ). त्याऐवजी धर्म, भीम, अर्जुन, नकुल, सहदेव, द्रौपदी अशा वयोज्येष्ठतेचा क्रम मुक्तेश्वर (४।१।८१–१२३) स्वीकारतात. शस्त्रे लपविताना या वनप्रदेशात सर्पादिकांची वस्ती असल्याचे अर्जुन सांगतो. ( मभा ४।५।१३ ). मुक्तेश्वरांनी मंत्रसामर्थ्यामुळे शस्त्रे दिसणार नाहीत व दिसलीच तर सर्प दिसतील अशी स्वकालानुसार अद्भुतरम्य उठावदार रचना केली. सहदेवाच्या बोलण्यातील अद्भुतता ( ४।१।१११ ) मात्र मुळाचा चुकीचा अर्थ केल्यामुळे आलेली दिसते.

कथेतील विविध धाग्यांना एकजीव करणारे बदल विराटपर्वात दिसतात. मुळात ब्रह्मोत्सवाच्या वेळी येणारा जीमूत ( मभा ४।१२।१२–१५ ) पांडवशोधनासाठी दुर्योधनाच्या प्रेरणेने आल्याचे मुक्तेश्वर दाखवितात ( ४।२।४५–५२ ). त्यामुळे हा प्रसंग केवळ भीमपराक्रमाचा निदर्शक न होता कौरव-पांडवांच्या मध्यवर्ती संघर्षाचा भाग ठरतो. गोग्रहणामागेही मुळात नसलेली पांडवशोधनाची प्रेरणा त्यांनी दाखविली ( मभा ४।२९।१–२६ मुभा ४।५।३५–४१ ) आहे. मुळातील व्यक्तिरेखाही बदलत गेलेल्या दिसतात. सुदेष्णा मुग्ध किंवा मनातून संमती असलेली पण वरकरणी तसे न दाखविणारी आहे. मुक्तेश्वरांनी तिचे स्पष्ट चित्र रेखाटले ( ४।३।९०–९३ ). नृत्यशाळेत भीमाआधी कीचकाला पाठवून ( मभा ४।२१।३८ मुभा ४।३।१३१–१३५ ) मुक्तेश्वरांनी त्याची कामोत्कंठा परिणामकारक केली आहे. विराट आपणहून पांडवांना गोग्रहणप्रसंगी युद्धार्थ रथ देतो. ( मुभा ४।३०।१९–२१ ). मुक्तेश्वरांचा कंक कृतज्ञताबुद्धीने स्वतःच ते मागून घेतो ( मुभा ४।५।६७-६८ ). नकुल, सहदेव, अर्जुन यांनाही कथेच्या चौकटीत स्थान देण्यासाठी मुक्तेश्वरांनी उचित बदल ( ४।३।५६, ४।५।९७, १२० ) केले आहेत.

काही प्रसंगांच्या चित्रणातही बदल आहेत. मुळात विराट धर्माच्या तोंडावर फासे फेकून मारतो ( मभा ४।६३।४४ ). मुक्तेश्वरांनी विराटाचा राग वर्णिला. धर्माला फासे लागून रक्त आल्याचेही सांगितले पण रागाने विराटाने फासे जमिनीवर आपटल्यावर ते " उसळोनि लागले धर्माभाळि " ( ४।६।१६८ ) असे वर्णिल्याने प्रत्यक्ष आघात चुकविलेला आहे. या बदलाने अनेक गोष्टी साध्य होतात. धर्माचे अर्जुनावरील प्रेम नि त्याच्याविषयी वाटणारा अभिमान त्यातून प्रकटला आहे. विराटाची कृतघ्नता झाकली गेली आहे आणि त्याचा क्रोध तेवढा चितारला गेला आहे. ही कल्पना विष्णुदास नामा व कथाकल्पतरुकारही मांडताना दिसतात. याच वेळी उत्तरार्जुन येतात तेव्हा धर्म द्वारपाळाच्या कानात सांगतो की एकट्या उत्तरासच आण ( मभा ४।६३.५२–५४ ) पण मुक्तेश्वरी धर्म मात्र उघडपणे सांगतो की बृहन्नडेस आणू नकोस. तिने माझे रक्त पाहिले तर आकान्त होईल ( मुभा ४।६।१७०–१७१ ). त्यामुळे विराटाच्या मनात संशयाची आणखी एक गाठ बसते. मुळात नसताना विराटाच्या मनातील संशय वेळोवेळीं फुलवून मुक्तेश्वरांनी अज्ञातवासातील नाट्य सारखे फुलवीत ठेवले आहे. त्यातील उत्कंठा व औत्सुक्य जागविले आहे.

**सौप्तिकपर्वात** फारसे बदल दिसत नाहीत. पुत्रशोकानंतर द्रौपदीचे बोलणे ( मभा १०।११।१०–१५ मुभा १०।३।७३–८२ ) जहाल उपरोधाने धारदार झाले आहे. " माझी मृत बाळे, बंधु सारे विसरून तुम्ही माझ्यासह सुखाने राज्य कराल ", असे ती युधिष्ठिरास म्हणते. मुक्तेश्वरी द्रौपदी मात्र दुःख-संतापाच्या शांतीसाठी वनात घेऊन जाण्याचा हट्ट धरते. हा बदल प्रसंगसंदर्भात अनुचित वाटणारा व द्रौपदीच्या व्यक्तिरेखेवर विपरीत परिणाम करणारा वाटतो. " या भूतसंकटातून सोडविल्यास भूतबळी अर्पण करीन " ( मभा १०।७।१२ ) या ऐवजी " कुश्चित कर्मक्षालनार्थ आत्मार्पण करीन " ( मुभा १०।२।२४ ) असे मुक्तेश्वरी अश्वत्थामा म्हणतो. मुळातील अघोरसाधनेला मुक्तेश्वरी रचनेत पापक्षालनाची निर्मलता प्राप्त होते. अश्वत्थाम्याचा मणी द्रौपदी राजास ( मभा १०।१७।३३ ) अर्पण करते. येथे " राजा " म्हणजे युधिष्ठिर असा अर्थ श्रीधर ( पांप ५३।८३ ) व मोरोपंत ( ऐषिक ३।३१ ) घेतात. मुक्तेश्वर " भीम " ( १०।४।९३ ) असा अर्थ घेतात. येथे संदिग्ध शब्दयोजनेमुळे मूलार्थाबद्दल मतभेद होणे शक्य आहे. सौप्तिकात बदलांचे प्रमाण कमी आहे. एकूणच मुक्तेश्वरांची नवनिर्माणक्षमा प्रज्ञा येथे कार्यकर झाल्याचे दिसत नाही.

## ५. बदल : समारोप

भारतसंहितेशी प्रामाणिक राहण्याची मुक्तेश्वरांची मनीषा होती. तथापि पुराणे-धर्मसंप्रदाय-लोकवाङ्मय यांनी संस्कारित झालेले महाभारत, त्याच्या मराठीकरणाची पूर्वपरंपरा, मध्ययुगीन मूल्ये, युगमानसाचा हुंकार आणि बदलता काळ यामुळे मुक्तेश्वरांच्या हातून भारतकथा जाणता अजाणता बदलत गेली. सौप्तिकात बदल कमी

व मूलनिष्ठा अधिक आहे. आदिपर्वात बदल असले तरी मुळाची मर्यादा संभाळणारे आहेत. सभापर्वात बदलाच्या नव्या व स्वयंपूर्ण उद्दिष्टांचे भान अंकुरले आहे. वनपर्वात संक्षेपामुळे ते बहरू शकले नाही. विराटपर्वात मात्र संक्षेपाच्या मर्यादेतही ते स्वयंपूर्ण उद्दिष्टांच्या रोखाने विकसित झालेले दिसते. मुक्तेश्वरी भारत असे मूलानुसरणाकडून रचनास्वातंत्र्याकडे सरकत गेलेले दिसते.

अनवधान, संदिग्ध अर्थ, संस्कृतचे आकलन, भारतसंहितेची अनिश्चितता व मुक्तेश्वरी भारताच्या प्रमाणप्रतीची अनुपलब्धी ही मुक्तेश्वरांनी केलेल्या गौण बदलांची प्राथमिक कारणे आहेत. अत्युक्तिप्रियता, अद्‌भुताचा शिडकावा, श्रोतृमानसावरील संस्कार संहितेपेक्षा प्रमाण मानणे आणि लोकश्रद्धेप्रमाणे लोकव्यवहाराचे औचित्य पाळणे यामुळेही गौण बदल झालेले दिसतात.

भाव तीव्र करणे, उत्कट करणे हे मुक्तेश्वरी आविष्काराचे खास वैशिष्ट्य आहे. सत्प्रवृत्तींचा रसप्रफुल्ल विस्तार आणि दुष्टप्रवृत्तींचा झडझडून निषेध ते करतात. मूलभाव तीव्र करण्याच्या त्यांच्या आविष्कारतंत्राचे आशयनिष्ठ अंग असे नैतिक मनोधारणेशी संबद्ध आहे. त्यामुळे मूलभावांचा प्रत्यय अधिक उत्कट होतो. उत्कटतेच्या ध्यासात मुक्तेश्वरी रचना कधी भडकपणाकडे वा अतिरेकाकडेही झुकते. श्रोतृमानसाच्या स्थूल भावनांची जपणूक करण्यासाठी मुळातील उग्र भावांना सौम्य रूप देण्याची विरोधी प्रवृत्तीही क्षीणरूपात आढळते. समकालीन श्रोतृमनाशी संवाद साधून आपल्या रचनेला सहज जिवंतपणा देण्यासाठी महाभारताचा लोकमानसावरील पारंपरिक ठसा मुक्तेश्वर जपताना दिसतात.

प्रसंग-भावांचे त्यांचे आकलन निराळे असल्याने त्यांची मांडणी व रचना बदलते. मूळ भाषणे गाळणे, अन्य पात्रमुखाने वापरणे वा नव्या भाषणांची जोड देणे यामुळे त्यांचे व्यक्तिचित्रण बदलते. कथेच्या चित्राकृतीत पात्रांना यथाप्रमाण स्थान देणे, मूळ व्यवहारोन्मुखतेला भावोन्मुख करणे, तीव्रता वाढवीत नेऊन प्रसंग भावकल्लोळाकडे नेणे, प्रसंगाचा रोख बदलणे आणि दूरान्वित संघर्षप्रसंगास मध्यवर्ती संघर्षाशी जोडणे, त्यासाठी आवश्यक तो तपशील फिरवून घेणे हे व्यक्तिचित्रण व कथा यांच्या अंगाने केलेले बदल काव्यदृष्ट्या महत्त्वाचे आहेत.

मुक्तेश्वरांची तत्त्वदृष्टी अध्यात्माने भारलेली आहे आणि जीवनदृष्टी प्रगल्भ आहे. तिच्या आविष्कारामुळे मुळातील मूल्यविचार ठसठशीतपणे विकसित होतो. त्यामुळे त्यांच्या भारतास मूल्यात्मकतेचे परिमाण लाभते. भक्ती ही मध्ययुगाची जीवननिष्ठा मुक्तेश्वरी भारताच्या रचनाबंधाला वेगळेपण देते. देवावतारी कृष्ण मध्यवर्ती राहून अन्य पात्रें भक्त-अभक्ताच्या नात्याने त्याच्याशी जोडली जातात.

महाभारताचे आकलन मुक्तेश्वर मूल्यनिष्ठ-विशेषतः भक्तिप्रधान-दृष्टीने करतात. त्यामुळे त्यांचे प्रसंगचित्रण वेगळे होते. मूल्यात्मकतेच्या परिमाणाने व्यक्तींच्या रूपरेखांना निराळा रंग येतो. आपल्या काव्यदृष्टीने महाभारतावर ते संस्करण करतात. त्यामुळे कथा– व्यक्ति-चित्राच्या अंगाने ते बदलत जाते. परंपरा व श्रोतृमानस यांच्याशी संवाद साधण्याची त्यांची धडपड असते. बदलत्या काळाचा ठसा तपशीलाच्या रूपाने जसा उमटतो, तसा कालनिष्ठ भावदर्शनातूनही जाणवतो. यांच्या जोडीला मुक्तेश्वरांची नवनिर्मिती लक्षात घेतली की महाभारत त्यांनी किती व कसे बदलले ते लक्षात येते. या बदलांनी मुक्तेश्वरी भारताला वेगळेपण दिले आणि स्वतंत्र नसले तरी पुनर्निर्मित कलाकृतीचे रूप दिले.

भारतकथेत मुक्तेश्वरांनी केलेल्या फेरबदलातून त्यांची स्वतंत्र प्रतिभा, औचित्यविवेक, काव्यदृष्टी आणि बदलत्या श्रद्धा व्यक्त होतात.

□ □ □

# पाच ॥ भारतकथासंक्रमण : पूर्वपरंपरेचे भान

## १. प्रास्ताविक

मुक्तेश्वरांपूर्वी मराठी महाभारतांचे काही अवतार झाले होते. त्यावर अधिष्ठित अशी स्फूट रचनाही झाली होती. महाभारत कृष्णचरित्राशी संबद्ध असल्याने जेथे कृष्णचरित्र आले आहे अशा अनेकानेक ठिकाणाहून ते गोळा करून मराठी कवींनी आपल्या भारताधिष्ठित रचनेत गोविले होते मौखिक परंपरेतून आलेले महाभारताचे परिवर्तित विशेषही या कवींनी स्वीकारले होते स्वभाषेतील महाभारताच्या या मराठी अवतरणाची दखल घेणे मुक्तेश्वरांना भाग होते. त्यांच्या समोरचे श्रोतृमानसही तिने संस्कारित झालेले होते. त्यामुळे महाभारत हा त्यांच्या भारताचा स्रोतग्रंथ असला तरी अन्य ग्रंथांचाही आधारग्रंथ म्हणून त्यांनी उपयोग केला. मुक्तेश्वरी भारत वाचताना ही दुहेरी परंपरा वाचकाच्या मनात जागी होते. ही पूर्वपरंपरा मुक्तेश्वरांनी केलेल्या बदलांचा व नवनिर्मितीचा एक स्रोत आहे.

## २. पूर्वपरंपरेशी संवाद

**जनाबाईचे** "हरिश्चंद्राख्यान" समोर ठेवून मुक्तेश्वरांनी आपले "हरिश्चंद्राख्यान" लिहिले. तिच्या थालीपाकाची घनदाट छाया त्यांच्या वनपर्वातील दुर्वासभोजनावर ( ३।अ. ११ ) पडलेली आहे. जनाबाईचे "वस्त्रहरणाख्यान" पूर्णपणे उपलब्ध नाही. पण त्यातील द्रौपदीशापोक्ति–अनुवाद या उपलब्ध भागाशी मुक्तेश्वरी रचनेचे शब्द–कल्पनासाम्य आढळते. या प्रभावाचे सविस्तर विवेचन करून नांदापूरकर म्हणतात, "........मुक्तेश्वरांनी ही तिन्ही आख्याने जनाबाईपासून उचलली. पण त्यांनी ह्या प्रसंगांना आपल्या कल्पनाविलासाने रंगवून, भाषावैभवाने भूषवून, भावनोत्कटतेने रसाळ करून आणि सहृदयतेने आत्मसात करून स्वातंत्र्याची योग्यता आणून दिली. त्यातून जे भारतात बसण्यासारखे होते त्यांना त्यांनी आपल्या भारतात सामावून घेतले.[१]"

**नामा पाठक**[२] आणि मुक्तेश्वर यांना साधणारे काही दृढ अनुबंध आढळतात. द्रौपदीशापोक्ति ( वस्त्रहरण पदे १४–१५ मुभा २।१५।११०–११६ ), वस्त्रहरणाची

---

१. ना. गो. नांदापूरकर "मुक्तमयूरांची भारतें," पूर्वोक्त, ७३९.

२. "प्राचीन मराठी कविता", खंड २, संपा. ज. शां. देशपांडे, मुंबई, १९६४, यातील वस्त्रहरण पदे (१–६२ पृ. ३–७), वस्त्रहरण ( ओ. १–३१३ पृ. २२–३७ ), द्रौपदीचे बीरडे ( ओ. १–३७ पृ. ६०–६२ ) या नामापाठकांच्या रचनेचे संदर्भ येथे अभिप्रेत आहेत.

आज्ञा दुर्योधनाची ( वप. १७ मुभा २।१५।११७-११८ ) व अखेरी अटकाव भीष्माज्ञेने ( वप. ४१ मुभा १२।१५।२५५-२४६ ) हे तपशील नामा पाठकांच्या वस्त्रहरण पदातून मुक्तेश्वरांनी उचललेले आहेत.

नामा पाठकांच्या वस्त्रहरणाख्यानाचाही ठसा मुक्तेश्वरी रचनेवर आहे. आप्तभेटीचा बहाणा करून त्यांचा दुर्योधन विदुराशी बोलतो ( वप. ३७-३८ ) त्याचे मुक्तेश्वरांच्या धृतराष्ट्र-विदुरसंवादाशी ( २।१३।१०-१२ ) साम्य आहे. विदुराकरवी पांडवांना बोलाविण्याची शकुनीची सूचना ( वप ३४ मुभा २।१३।६ ), विदुराने दैववादी श्रद्धेने केलला तिचा स्वीकार ( वप. ४१ मुभा २।१३।३२-३३ ), विदुर-धर्मसंवाद ( वप. ५९-७१ मुभा २।१३।४७-६२ ), कुंतीची आज्ञा ( वप. ७१ मुभा २।१३।६३-६७ ), भानुमतीने केलेले द्रौपदीचे स्वागत ( वप. ७९ मुभा २।१३।७४ ), दुर्योधनाचा द्यूतप्रस्ताव ( वप. ८७-८८ मुभा २।१४।५-६ ), द्यूतप्रसंगी धर्ममनाचे विश्लेषण ( वप. १०५ मुभा २।१४।८५-९० ), "वोहिनी" असे संबोधून दुःशासनाने द्रौपदीशी प्रथम बोलणे ( वप. १०७ मुभा २।१५।२६-२७ ) व नंतर वर्दळीवर येणे ( वप. ११७ मुभा २।१५।३१-३२ ), सभेत प्रवेशताच कौरव द्रौपदीची रूपलक्षणे एकमेकांस दाखवू लागले ( वप. १२१-१२३ मुभा २।१५।४६-४७ ), दुर्योधनाचे निर्लज्ज बोलणे व द्रौपदीचा शापोक्तिअनुवाद ( वप. १२४-१२९ मुभा २।१५।१०९-११६ ), चरणसंवाहन करणारी रुक्मिणी ( वप. १७४-१७९ मुभा २।१५।१६९-१७२ ), पाय आसडून कृष्ण निघाला ( वप. १८६ मुभा २।१५।१८२ ), गरुड त्याला गाठू शकला नाही ( वप. १८८-१९० मुभा २।१५।१८६-१८७ ) नारद-रुक्मिणी संवाद ( वप. १९१-१९५ मुभा २।१५।१९१-१९५ ), भक्ताच्या कळवळ्याने देवाने द्रौपदीच्या अंगावर पीतांबर टाकला ( वप. १९७ मुभा २।१५।१९६-१९७ ), त्याच्या प्रतिक्रिया ( वप. १९८-२०१ मुभा २।१५।१९८-२०२ ), आला गेला हे मायिक, देव हृदयस्थच असे सूत्रनिरुपण ( वप. २०३ मुभा २।१५।१८८-१८९ ), विजेसारखा तेजस्वी व सुगंधी पीतांबर ( वप. २२९ मुभा २।१५।१९७-१९८ ), वस्त्रे भांडारगृहात ठेवण्यास दुर्योधनाने सांगताच ती गुप्त झाली ( वप. २७० मुभा २।१५।२४७-२४८ ), वस्त्रहरणानंतर कृष्णभेट ( वप. २३५-२६७ मुभा २।१५।२८९-२९० ), असे किती तरी तपशील मुक्तेश्वरी रचनेशी आशयदृष्टया मिळतेजुळते आहेत.

नामा पाठकांचा भारतकथेविरुद्ध तपशील मात्र मुक्तेश्वर स्वीकारीत नाहीत. द्रौपदीस वस्त्रें का पुरविली त्याची स्पष्टीकरणात्मक कथा ( वप ४३-४६ ), द्रौपदी-दुर्योधन द्यूतकथा ( वप. ४७-५९ ), भारतकथेने जनमेजयाच्या ब्रह्महत्यापातकाचे निरसन झाले ( व. ११ ), भीष्म-द्रोणादेखत दुर्योधनाने पांडवनाशाची केलेली चर्चा ( व. १९-३४ ) दुर्योधन-धर्म द्यूत ( व. ९२-९३ ) हा भारतकथेशी व्याघाती असलेला तपशील मुक्तेश्वरांनी स्वीकारलेला नाही.

कधी नामा पाठकांनी दिलेला तपशील मुक्तेश्वर फिरवून वापरतात. धर्म–दुर्योधनाच्या द्यूतात दुर्योधन हरल्याने भीम हसतो, मग शकुनी–धर्माचा खेळ सुरू होतो ( वप. ९२–९४ ). त्याची भीमाच्या हसण्याने खोटा डाव खरा ठरून धर्म पहिले पाच डाव जिंकतो ( २।१४।३४–४२ ) अशी वेगळी मांडणी मुक्तेश्वर करतात. कपटपाशांचा केवळ निर्देश नामा पाठक ( वप. ९२ ) करतात. मुक्तेश्वरांनी त्याचा प्रयोजक वापर केला आहे. द्रौपदीचा धावा ( वप. २४–२५ व १३१–१५७ ), वस्त्रवर्णन ( वप. ३१–३७,३९,४० व २३५-२६७ ) नामा पाठकांनी विस्ताराने केले आहे. नामा पाठकांनी प्रथम हेरलेल्या या रंगतदार स्थळांचा मुक्तेश्वरांनी स्वतंत्र व आल्हाददायक विस्तार केला आहे.

राजसूयपंक्तीत द्रौपदीचे विरडे सुटले आणि कृष्णाने तिचे लज्जारक्षण केले, या मुक्तेश्वरांनी वर्णिलेल्या प्रसंगाचे ( २।९।७४–९६ ) मूळ "द्रौपदीचे विरडे" ( ओ. १–३७ ) या नामा पाठकांच्या "आरुष उत्तरी" सांगितलेल्या "अभिनव कुसरी"च्या कथेत आहे. त्यांच्या सात्त्विक कथेचे रूप मुक्तेश्वरी रचनेत बदलून गेले आहे. नामा पाठकात मुक्तेश्वरी रचनेतील अश्लीलता जशी नाही तशी या प्रसंगास द्रौपदी वस्त्रहरणाची सूचक प्रतिकृती बनविण्याची मुक्तेश्वरी कुशलताही नाही.

"**कथाकल्पतरु**"[३] मधील भारतकथेची स्पष्टास्पष्ट छाया मुक्तेश्वरी भारतावर आहे. पित्याची स्थिती पाहून भीष्म पित्यासाठी स्त्री शोधू लागला ( स्त ८ अ. १६ मुभा १।२३।३८–४१ ), द्रौपदी हत्तीवर बसून स्वयंवर मंडपात आली. ( स्त ८।२८ मुभा १।४१।३१ ), नारदाने पांडवांना घालून दिलेला द्रौपदीविषयक नियम ( स्त ८।३० मुभा २।४६।७९ अ - ८१ ), आमंत्रणानंतर कृष्णाचे राजसूयार्थ आगमन ( स्त ९।२ ), कृष्णाज्ञेने पांडव दिग्विजयास निघाले ( स्त ९।२ ), शिशुपालांची आत्मज्योती कृष्णमुखात जाऊन त्यास सायुज्यमुक्ती मिळाली ( स्त ९।२ ), वस्त्रहरणाची दुर्योधनाची आज्ञा व भीष्माज्ञेने अटकाव ( स्त ९।३ ), दुर्वासभोजन ( स्त ९।६ मुभा ३।११ ), कीचक भीमाआधी नृत्यशाळेत जातो ( स्त ९।८ ), शमीवरची शस्त्रे सर्परूपात भासणे ( स्त ९।१० ), सैरंध्री बृहन्नडेचे नाव सारथी म्हणून सुचविते ( स्त ९।९ ) असा तपशीलाचा भाग मुक्तेश्वरी रचनेशी आशयदृष्ट्या जुळणारा आहे. कथाकल्पतरुतील कौरवपांडवांच्या बाललीला ( स्त ५ अ. १० मुभा १।२९।३१) मुक्तेश्वर दशावताराच्या कल्पनेने रंगवून व विस्तारून सांगतात. पांडव इंद्रप्रस्थाला गेल्यावर कथाकल्पतरुकार लाक्षागृहाचा प्रकार वर्णितात. विदुर कौरवांचे कपट कृष्णाला कळवितो. कृष्ण विश्वकर्म्याकडून विवर करवितो ( स्त ८।२५ ). हा तपशील, कृष्णदृष्टांत होऊन विदुर खनक पाठवितो. ( मुभा १।३६।७–१५ ), अशा अधिक संभाव्य पद्धतीने

३. "कथाकल्पतरु", पूर्वार्ध ( गद्य भाषांतर ), संपा. प्रका. दा. सा. यंदे आणि मंडळी १९२४–१९२५. यातील पूर्वार्धात स्फुट भारती कथा कृष्ण याज्ञवल्कीने व उत्तरार्धात मधुकर कवीने समग्र भारत संक्षेपाने कथांतरासह सांगितले आहे.

मुक्तेश्वर वर्णितात. आपल्या महाभारताचे मध्यवर्ती रचनासूत्र ठसठशीत करणारा तपशील त्यांनी पूर्वपरंपरेतून उचलला पण महाभारताची मूलाकृती पुसून टाकणारी रचना टाळून तो गुंफला. शिशुपाल अर्जुन युद्ध ( स्त ८।३१ ), पंडुचे श्राद्ध ( स्त ८।३० ), डांगवी आख्यान ( ८।३३ ), दोन वेळा होणारे द्यूत, इंद्रप्रस्थाचे वस्त्रहरण ( ९।३ ) असा महाभारतापेक्षा खूपच वेगळा असणारा भाग त्यांनी स्वीकारलेला नाही. जयद्रथ–पराभव, दुर्योधन–चित्रांगद युद्ध, पांडवांचा विराटप्रवेश, भीम–कीचक युद्ध या सर्व प्रसंगामागे कथाकल्पतरुकारांनी ( स्त ९।अ. ६।८ ) कृष्णप्रेरणा उभी केलेली आहे. मुक्तेश्वरी भारतातही कृष्ण मध्यवर्ती असला तरी हा तपशील त्यांनी टाळला आहे. हा तपशील स्वीकारला असता तर त्यांच्या भारतातील मध्यवर्ती रचनासूत्र पुष्ट झाले असते पण मूलप्रत्यय लोपला असता. परंपरा व मूलानुसरण यात मुक्तेश्वर असा विवेक करताना दिसातात.

मुक्तेश्वरांनी विराटपर्वात परंपरागत तपशील अधिक्याने स्वीकारल्याचे दिसते. पूर्वोक्त विवेचनाच्या जोडीला आणखी काही स्थळे नोंदविता येतील. मुक्तेश्वरांनी स्वीकारलेला पांडवांचा प्रवेशक्रम कन्नडकवी **कुमारव्यास, चंपूभारत** (स्त. १०) यात आढळतो. जीमूतीच्या आगमनामागे दुर्योधनाची प्रेरणा, त्याने पांडवप्रतिमा बांधणे, भीमाची प्रतिक्रिया व वीररसाला दिलेली हास्यरसाची जोड मुक्तेश्वरांपूर्वी कथाकल्पतरुत ( स्त ९ अ. १० ) आहे. पण मधुकर, कुमारव्यास ( संधी ४ ) हा प्रसंग कीचकवधोत्तर रंगवितात. पंपाच्या "भारतम्" (आश्वास ८ ) मध्ये तो कीचकवधापूर्वी रंगविलेला असून जीमूतीऐवजी "विषखर्पर" असे वेगळे नाव त्यात आहे. गोग्रहणामागे कौरवांचा पांडवशोधनाचा उद्देश मुक्तेश्वरापूर्वी मधुकर ( स्त ९।११ ), पंप ( आश्वास ८ ) कुमारव्यास ( संधी ५ ) वर्णितात. कंकाची विराटाकडे युद्धार्थ रथ-मागणी कुमारव्यासा-प्रमाणे मुक्तेश्वरही नोंदवितात. विराटाने रागाने फासे आदळल्याने उसळून धर्माला लागले, या मुक्तेश्वरी कथनाचे मूळ **विष्णूदास नामा** ( महाराष्ट्र–सारस्वत, पृ. २८७ वरील उतारा ) व मधुकर ( स्त ९।१२।७६–८० ) यांच्या रचनेत आहे.

भारतीकथेचे मूलरूप पुसून टाकणारा पूर्वपरंपरेतील तपशील मुक्तेश्वर नाकारतात आणि तिचे सौंदर्य खुलविणारा मूलरूपाशी संवादी असा तपशील उचलतात. त्यांच्या नवनिर्मितीचा परंपरा हा एक स्रोत आहे.

## ३. पूर्वपरंपरेशी विरोध

मुक्तेश्वरपूर्व महाभारत अवतरणपरंपरा स्वैर रचनास्वातंत्र्य घेणारी परंपरा आहे. महाभारती व्यक्ती व घटनांची ढोबळ चौकट कायम ठेवून त्यांची जुळणी मात्र स्वैर कल्पकतेने तीत केलेली आढळते. संकीर्ण कथात्मक भागाची भरपूर भर, मूळ महत्त्वपूर्ण घटनांचे वर्जन, महाभरती कथाक्रमाची मोडतोड, गोंधळ व विसंगती निर्माण करणारे बदल यामुळे या रचनांचा महाभारताच्या संदर्भात विचार न करता स्वतंत्रपणे विचार

करणे इष्ट होईल. त्यातील पात्र-प्रसंग भारती असले तरी घटनांचे वैविध्य, जुळणी आणि वेगळेपण इतके मोठे आहे की मूलप्रत्यय अत्यंत क्षीण होतो.

मुक्तेश्वरांनी या स्वैर रचनास्वातंत्र्याचा निषेध केला आहे. विष्णुदास नामाचे भारत व द्रौपदीस्वयंवर, मधुकराचा कथाकल्पतरू (८।२६।७६-७८) आणि कृष्णदास दामाचे आदिपर्व या रचनांतील द्रौपदीस्वयंवराच्या पणवर्णनाचा " प्राकृत कवींचा वाग्जल्प " (१।४१।७२-७३) असा मर्मवेध त्यांनी केला आहे. जरासंधवधसमयी " खर्जुरीपर्ण " चिरून कृष्णाने भीमास दाखविलेल्या संकेताची " ग्रंथांतरीची कथा " व्यासप्रमाण देऊन (२।७।६१-६२) त्यांनी नाकारली आहे. " खर्जुरीपर्णा " चा निर्देश करणारी रचना अज्ञात दिसते. कृष्णयाज्ञवल्कीने कथाकल्पतरूत हा संकेत तृणाचा आधार घेऊन सांगितला (४।१६।९४-९८) आहे. सूर्याने थालीपात्र दिल्याचे " सर्वत्र बोलले जाणारे बोल " (३।१।५८) ते व्यासाधारे नाकारतात. जनाबाईचे थालीपाक व कथाकल्पतरू (९।६) यावर त्यांचा रोख असावा.

स्वतः मुक्तेश्वर द्रौपदीस्वयंवराचा पण (१।४१।४४-४६) मूलानुसार वर्णितात. पण " मत्छयंत्र " (१।३९।८०) " मकरयंत्र " (१।४१।७१) असे निर्देश त्यांच्याही रचनेत येतात. सूर्यस्थालीचा वृत्तांत ते नाकारतात पण तीच "थालीपाका"ची कथा ते पुढे रंगवून (३।अ. ११) सांगतात. मूलानुसरणाची भूमिका व स्वैर रचनास्वातंत्र्याची परंपरा यातील ताण [ Tension ] मुक्तेश्वरी रचनेत असा अभिव्यक्त होतो.

व्यासानुसरणाने भारतकथा सांगण्याची स्पष्ट भूमिका घेऊन मुक्तेश्वरांनी भारतरचना केल्याने व्यासभारताला समोर ठेवून लिहिलेला भाग त्याच्या रचनेत पुष्कळच आहे. महाभारताचे पर्वविभाजन ते मानतात व कथाक्रमही पाळतात. भारती व्यक्तींची संभाषणे, तपशील, प्रसंग, चित्रणदृष्टी त्यांच्या भारतात डोकावते. मुळातील वृत्तीप्रधान तपशील ते आवर्जून देतात. महाभारतकालीन वीरांची आव्हानपद्धती, धर्मश्रद्धा, प्रतिष्ठेच्या कल्पना ते जपतात. मुळातील " उत्सवसंकेत " सारखे विशिष्टार्थक शब्द कायम ठेवतात. त्यातील दृष्टांतकथांचा वापर करतात. नामावळ्या-वंशावळ्या नोंदवितात. उपाख्याने, आनुषंगिक, विचार-चर्चा, ज्ञानविज्ञान विस्तारपूर्वक स्वीकारतात. विचार, कल्पना, अलंकार यावर मुळाची छाया पसरलेली आहे. काही ठिकाणी शब्दशः आणि पुष्कळ ठिकाणी भावार्थाने भाषांतरात्मक भाग येतो. कथा भारताच्या क्रमाने व निवेदनपद्धतीने सांगितली आहे. पात्र-प्रसंगाचे स्थूल रूप संभाळले आहे. त्यामुळे मूळ महाभारताचा ठसा त्यांच्या भारतावर अधिक स्पष्टत्वाने उमटला आहे.

मनःपूत रचनास्वातंत्र्याचा निषेध करून मूलानुसरणाचे नवे भान मुक्तेश्वरांनीच या परंपरेत आणलेले दिसते. ही जाणीव कथाकल्पतरूत (५।१३।१९-२०) उच्चारली गेली तरी क्वचित पाळली गेली. मुक्तेश्वरांनी ती अधिक ठसठशीतपणे उच्चारली, तद्विरुद्ध प्रवृत्तींचा निषेध केला. आणि बऱ्याच प्रमाणात ती पाळली. ही प्रवृत्ती माधवस्वामी, नरहरी मोरेश्वर, श्रीधर, मोरोपंत यांच्या लेखनात रुजली, वाढली. माधव-

स्वामीमध्ये हे अनुसरण दक्षतापूर्वक व व्यापक आहे पण त्याला काव्यात्म उंची लाभलेली नाही. श्रीधरांनी हे सूत्र सांभाळले पण त्यांचा प्रयत्न कथानिष्ठ अधिक होता. मोरोपंतांच्या आर्याभारतात कथादृष्ट्या मूलानुसरण पुष्कळच चांगले–मराठी महाभारतांच्या संदर्भात सर्वात चांगले झाले आहे. तथापि त्या प्रयत्नात महाभारताचे विविधांगी रूप लोपले आणि आर्याभारत अनुकृतीकडे झुकले.

## ४. परंपरासापेक्ष पृथकत्व

पूर्वकालीन स्वैर रचनास्वातंत्र्य व उत्तरकालीन काटेकोर मूलानुसरण यांचा उचित समन्वय मुक्तेश्वरी भारतात आहे. व्यासकथेची मूलाकृती पुसणारा तपशील त्यांनी नाकारला पण भारतकथेत गोवता येईल असा संवादी तपशील स्वीकारून त्याची संगतवार वीण साधली. आपल्या महाभारताच्या घाटाशी जुळणारा, व्यासकथेला खुलविणारा, तिचे सौंदर्य वृद्धिंगत करणारा पूर्वपरंपरेचा भाग आपल्या समग्र रचनेत त्यांनी बेमालूमपणे मिसळला. भारती कथासूत्राला संभाळीत त्यांनी ही रंगभरणी केली. स्वैर रचनास्वातंत्र्य घेणारी पूर्वपरंपरा व वाग्जल्प टाळून व्यासानुसरण करण्याचे उद्दिष्ट यांचा यथायोग्य मेळ त्यांनी घातला. त्यामुळे पूर्वोत्तर मराठी महाभारतांपेक्षा मुक्तेश्वरी भारत वेगळे झाले आहे. व्यासानुसरणाने ते महाभारताचा आर्ष महाकाव्यात्म प्रत्यय देते आणि भारतकथासंक्रमणातील प्रक्रिया व पूर्वपरंपरेचे भान यामुळे अनुकृतीच्या रूपापासून ते दूर जाते.

□ □ □

# सहा ॥ भारतकथासंक्रमण : मूलसापेक्ष अभिव्यक्तिविशेष

## ६.१. मूल सामग्रीचे वेगळे उपयोजन

भारतकथा सांगताना मुक्तेश्वर महाभारताचे तंतोतंत अनुसरण करीत नाहीत. निव्वळ मराठी तर्जुमा करणे त्यांच्यासारख्या उन्मेषी प्रतिभेच्या कविप्रकृतीत बसणारे नाही. त्यामुळे मूळ सामग्री मुळापेक्षा पुष्कळच वेगळ्या पद्धतीने ते वापरताना दिसतात. या उपयोजनामागे त्यांची स्वतःची अशी काव्यदृष्टी आहे.

मूलसामग्री प्रसंगचित्रणात ते क्रमांतराने वापरताना दिसतात. द्रौपदी पणाला लावण्याचे धर्माचे भाषण संपताच सभास्थानीचे वृद्ध त्याचा तिरस्कार करतात. मुक्तेश्वरांनी मात्र तो पण जिंकल्यावर सभासदांना वाईट वाटल्याचे वर्णिले आहे. ( मभा २।५८।३८–४२ मुभा २।१४।१६५–१६८ ). महाभारतातील वर्णन आघातापूर्वीच्या जीवघेण्या प्रतीक्षेचे आहे. त्यामुळे सभाजन क्षुब्ध होऊन धिक्कार करतात, तर मुक्तेश्वरांचे वर्णन ताण संपल्याच्या अघाताचे व विव्हल निराशेचे आहे. त्यामुळे त्यांचे सभाजन दुःख व्यक्त करतात. क्रमांतराने होणाऱ्या भावबदलाचे हे एक उदाहरण आहे. दुःशासनाने धरल्यावर द्रौपदी त्याच्याशी क्रोधाने बोलते. हे संवाद मुक्तेश्वरांनी दुःशासनाने धरण्यापूर्वी वर्णिले आहेत. त्यामुळे त्या संवादांचा आशय कायम असला तरी ते तुलनेने सौम्य झाले आहेत. त्याचा परिणाम द्रौपदीचा शिष्टाचार प्रकट करण्यात व दुःशासनाचा अशिष्टपणा दाखविण्यात होतो. अशा प्रकारच्या क्रमांतराने मुक्तेश्वर व्यक्तिचित्रणातही हवे ते रंग कमी–अधिक, गडद वा फिके, सौम्य वा दाट करू शकतात.

कृष्ण आधी ( मभा २।३०।१४ ) व नंतर कृष्णपरिवार ( मभा २।३१।१५–१६ ) येतो. मुक्तेश्वरांनी कृष्णागमनाबरोबरच पुढील परिवाराचे आगमनही वर्णिले ( मुभा २।९।१२–२० ). कथावस्तुच्या संगतीच्या दृष्टीने योग्य असेच हे क्रमांतर आहे. राजसूयार्थ आलेली नृपनामावळी ( मभा २।३१।१–१६ ) मुक्तेश्वरांनी कौरव ( मुभा २।९।२१–२८ ), अन्य राजे ( २।९।२९–३४ ) व यादव परिवार ( २।९।१६ ) अशी फोडून व क्रमांतराने दिली आहेत. यज्ञसभेतील भावी संघर्षसमयीचे बलाबलच त्यांनी जणू या विभाजनाने दाखविले आहे. द्यूतक्रीडेतील दुसरा पण तिसरा म्हणून वर्णिण्यात (मभा २।५४।२ मुभा २।१४।५६–६०) मात्र सहेतुकतेपेक्षा अनवधान अधिक असावे.

मुळातील शब्द मुक्तेश्वरी भारतात वेगळ्या संदर्भात वापरले जातात. वैशंपायन-मुखीचा " प्रज्ञाचक्षु " ( मभा २।४५।२ ) हा शब्द मुक्तेश्वर शकुनीमुखाने संबोधना-सारखा वापरतात ( मुभा २।१२।१०७ ), त्यातून शकुनीचा धृतराष्ट्रविषयक आदर व राजगौरवाची प्रथा आविष्कृत झाली आहे.

कधी एका ठिकाणचे विचार दुसऱ्या संदर्भातही अवतरतात. दुसऱ्याची निंदा करणे अनुचित असून पांडव तसे करीत नाहीत, असे विदुर दुर्योधनाला सांगतो ( मभा २।५९।५-७, ९ ). त्यातील नीतिविचार मुक्तेश्वरांनी व्यासाज्ञेने युधिष्ठिराने स्वतःच्या वाणीवर घातलेल्या बंधनांच्या संदर्भात ( मुभा २।३१।५३-५४ ) गोवला आहे.

एका ठिकाणची कल्पना अन्यत्र वापरून मुक्तेश्वर तिचा अधिक चांगला वापर करताना कधी दिसतात. दुःशासनाने द्रौपदीचे केस ओढल्याचे सांगताना महाभारतकार म्हणतात, " जे केस राजसूय महायज्ञाच्या शेवटी अवभृथस्नानाच्या वेळी मंत्रांनी पवित्र झालेल्या उदकांनी ओले झाले होते ते द्रौपदीचे केश धृतराष्ट्राच्या पुत्राने पांडवांच्या पराक्रमाची अवज्ञा करून बलात्काराने धरले " ( मभा २।६०।२३ ). प्रसंगातील अंगभूत विरोध तीव्रतेने व्यक्त करणारी ही कल्पना मुक्तेश्वरांनी द्रौपदीने सभाजनांना विचारलेल्या प्रश्नारंभी वापरली ( मुभा २।१५।७६ ). पांडवांच्या डोळ्याआड घडणारा हा प्रसंग त्यांनी पांडवांच्या डोळ्यासमोर घडविला आहे त्यामुळे " ते पाण्डवानां परिभूय वीर्यं " या ओळीला प्रत्यक्षता येते. मूळ कल्पना पैलूदार हिऱ्यासारखी आहे. पण तिला कोंदणात बसविण्याचे चातुर्य मात्र मुक्तेश्वरांचेच आहे.

एका व्यक्तीच्या मुखी असलेले उद्गार मुक्तेश्वर काही वेळा दुसऱ्या व्यक्तीच्या मुखात वापरतात. " कृष्णकृपेची नौका " ही कल्पना पांडव कृष्णाला बोलून दाखवितात ( मभा ३ परि १ क्र. २५ ). मुक्तेश्वरांनी ती दुर्वासमुखाने ( ३।११।१५५ ) पांडव-कृष्ण संबंधाचे वर्णन करताना अधिक वेधक व अलंकृत रूपात प्रकट केली आहे. " ही अनिंदिता द्रौपदी सर्व पांडवांच्या सारख्या मालकीची आहे आणि या ( एकऱ्या ) धर्माने स्वतःला पूर्ण हरवून घेतल्यावर ( हिच्याविषयीचा ) पण केला " ( मभा २।६१। २३ ) हा विकर्णाचा तर्कशुद्ध युक्तिवाद आधीच द्रौपदीमुखाने ( मुभा २।१५।१३-१४) मुक्तेश्वर वापरतात. त्यामुळे त्यांच्या विकर्णाचे आवाहन बौद्धिकतेकडून भावनिकतेकडे झुकले आहे तर द्रौपदी मात्र अधिक बुद्धिमती ठरली आहे. अर्जुनप्रतिज्ञेचा भाग ( मभा २।६८।३०-३६ ) भीम ( मुभा २।१६।७५ ) व सहदेवमुखी ( मुभा २।१६। ८२-८४ ) ते वापरतात. कथेच्या चित्राकृतीत विविध व्यक्तींना योग्य ते स्थान देण्याचा प्रयत्न त्यात दिसतो.

## ६.२. भिन्न व संबद्ध भागांचे उपयोजन

विस्तार हा महाभारतासारख्या आर्ष महाकाव्याचा अंगभूत घटक असतो. संक्षेप-कथन व त्याचे विस्ताराने पुनःकथन ही भारती निवेदनाची लकब आहे. त्यामुळे महाभारताची जडणघडण होत असताना त्यात भर टाकणे सुलभ झाले. त्यातील

विचारचर्चाही ऐसपैसपणे पसरली आहे. या साऱ्यामुळे एकच भाग महाभारतात भिन्न स्थळी आलेला दिसतो. त्यामुळे येणारा विस्कळीतपणा टाळण्यासाठी मुक्तेश्वरांनी संबद्ध भागाचे वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेले तुकडे एकत्र आणून आपल्या कथाबंधाला बंदिस्त रूप देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

शिशुपालाच्या दोन्ही भाषणांचा ( मुभा २।४२।२-४, १८-२० मुभा २।११।४३-५० ) आशय मुक्तेश्वरांनी एकत्रच समुचितपणे दिला आहे. मुळात रुक्मिणीचा निर्देश कृष्ण आधी व शिशुपाल नंतर करतो. मुक्तेश्वरांनी शिशुपालमुखी तो आधी योजून क्रुद्ध झालेल्या श्रीकृष्णाकडून त्याचा वध करविला आहे. रुक्मिणीचा निर्देश शिशुपाल-मुखी आधी योजणे हे अधिक सुसंगत, मार्मिक, शिशुपालाच्या व्यक्तिरेखेशी जुळणारे व संक्षेपास योग्य असे वाटते. श्रीधरांनी पांडवप्रतापात शिशुपालाचे हे बोलणे मुक्तेश्वरी शब्दांचा स्वीकार करीत दिले आहे. ते त्याची मार्मिकता श्रीधरांनाही पटल्यांचे निदर्शक आहे.

ययाती व त्याचे पुत्र यात मुलांची उत्तरे व राजाचे शाप स्वतंत्र आहेत. मुक्तेश्वरांनी मुलांचे उत्तर एकत्र दिले व शाप सलगपणे ( मुभा १।१९।८९-१०१ ) दिले आहेत. कधी या उलट प्रकारही ते करतात. अनुद्यूतासाठी धृतराष्ट्राचे मन वळविणारे दुर्योधनाचे विस्तृत भाषण ( मभा २।६६।७-२३ ) मुक्तेश्वरांनी मध्ये फोडून व अंतराने ( मुभा २।१६।४-१२, १९-२० ) दिले आहे. मुळातील दीर्घ भाषणांचे असे खंड पाडल्याने सुटसुटीतपणा येतो अशा तऱ्हेची उदाहरणे मात्र अल्प आहे.

दोन ठिकाणचे संदर्भ (मभा २।६०।२३, २८ ) एकत्र करून द्रौपदीच्या दुर्दशेचे परिणामकारक चित्र ( मुभा २।१५।७४-७७ ) मुक्तेश्वर नवकल्पनांची जोड देऊन उभे करतात. स्वगत उद्‌गार, विरोधात्मकता, क्रियाशीलता, चित्रमयता, अनुप्रासात्मक रचना यामुळे वेगवेगळ्या विखुरलेल्या तुकड्यातून योग्य प्रसंगी साकारलेले हे कोरीव चित्र मोठे देखणे आहे.

भिन्न स्थळी येणाऱ्या संबद्ध भागांचे एकीकरण[१] करण्याकडे मुक्तेश्वरांचा अधिक कल आहे. त्यामुळे अनाठायी पुनरुक्ती व पाल्हाळ टाळून संक्षेप साधला जातो. श्लोक-ओवींच्या गणिताप्रमाणाने कदाचित काही अपवाद दाखविता आले तरी आशयदृष्ट्या

---

| | महाभारत | मुक्तेश्वर |
|---|---|---|
| १. | १। अ. १५३-१५५, १।१७५।५-१९ | १।३९।१-८१ |
| | २। ४२।४६, ५१-५२, ५८-५९ | २।११।७७-७९ |
| | २। ४५।३६-३८, २।५१।१-३ | २।१३।३-९ |
| | २।४१।२५, २।४१।३०-३३ | २।१०।३९-४२ |
| | २।४९।५१-५८, २।५१।२२-२६ | २।१३।१३-४२. |

त्यांस संक्षेपच म्हणावयास हवा. जेथे विस्तार दिसतो तेथे नवनिर्मितीची जोड कारणीभूत झालेली दिसते. संबद्ध भागांच्या उपाययोजनाची ही प्रक्रिया कथाबंधाच्या रेखीवपणाकडे मुक्तेश्वरांचे अवधान कसे खिळलेले असते, त्याचे निदर्शन करते.

## ६·३. काव्यप्रयुक्ती परिवर्तन

मूल घटनाप्रसंग ज्या पद्धतीने हाताळलेले असतात त्यापेक्षा वेगळ्या प्रकारांनी मुक्तेश्वर त्या घटना-प्रसंगाचे चित्र रेखाटू पाहतात. त्यातून भारतसंक्रमणातील मुक्तेश्वरी कविव्यापाराचे व काव्यदृष्टीचे दर्शन घडते.

मूळ निवेदनात्मक भाग संवादात्मक पद्धतीने मांडण्याकडे त्यांचा कल आहे. रंगगृहाची उभारणी ( मभा १।१२४।८–१२ मुभा १।३१।५–११ ) त्रयस्थ निवेदनाने वर्णिली जाते. मुक्तेश्वरांनी ती फुलवून धृतराष्ट्राच्या आज्ञेच्या रूपाने वर्णिली. निवेदनशैलीतील क्रीडागाराचे वर्णन ( मभा १।११९।२९-३० मुभा १।२९।४७-५४ ) त्यांनी दुर्योधनमुखाने केले आहे. राज्यसमृद्धी पाहून धर्म राजसूयाचा विचार करू लागतो. मुळात निवेदनाच्या रूपात येणारे राज्यसमृद्धीचे वर्णन ( मभा २।३०।१–७ मुभा २।९।१–११ ) त्यांनी धर्ममुखाने वर्णिले आहे. त्यामुळे राजसूयाच्या कालनिश्चितीचा निर्णय अधिक स्वाभाविक वाटू लागतो. जरासंध भीमाची निवड करतो ( मभा २। पृ. ११६ * २४१ ) हा भागही जरासंधमुखाने ( २।७।९–१३ ) वर्णिला आहे. शत्रूविषयीची तुच्छता व स्वबलाविषयीचा जरासंधाचा आत्मविश्वास तीव्र संबोधने व जलाल उपहास यांच्याद्वारे त्यातून यथार्थत्वाने प्रकटला आहे. कृष्णाला एकदा देवावतारी मानल्यावर जरासंधाला देवद्रोह्याच्या रूपात चितारणे कविभूमिकेवरून सुसंगत होते. त्या चित्राचे रंगही या संवादाने अधिक गडद होतात. आपल्या अर्थानुवादाप्रमाणे आशयाचा रोख बदलून ठेवण्यासाठीही मूळ निवेदनशैलीऐवजी संवादशैलीचा वापर करणे मुक्तेश्वरांना योग्य वाटले असावे.

या विरोधी प्रक्रियाही घडताना दिसते. मूळ संवादात्मक भाग कधी तटस्थ निवेदनशैलीत मांडला जातो. अनुद्यूतासाठी परत फिरताना धर्ममुखी आलेली कनकमृगामागे धावणाऱ्या रामाची कल्पना ( मभा २। पृ. ३३२ * ५८३ ) मुक्तेश्वर त्याच संदर्भात पण त्रयस्थ निवेदनात “ लटिका मायिक कनकहरिण । जाणतां भ्रमला रघुनंदन । तेवी परतोनि पांचहीजण । कौरवसभे पातले ॥ ” ( २।१६।३ ) अशी वापरतात. धर्ममुखात ही कल्पना वापरण्याने द्यूताची अनिष्टता जाणूनही तो परतला, असा ठसा उमटतो. उलट त्रयस्थपणे तिची योजना केल्याने एक प्रकारच्या भान विसरलेल्या मूढ अवस्थेत तो परतला असा ठसा उमटतो. एकूण प्रसंगाच्या संदर्भात हा दुसरा भाव अधिक मार्मिक वाटतो. निवेदन अलिप्तपणे करावयाचे, मनाचा कल स्पष्टपणे व्यक्त न करता उपमानांनी सुचवायचा ही मुक्तेश्वरी शैलीची एक लकब आहे. त्यानुसारही धर्ममुखीची कल्पना त्रयस्थ निवेदनात वापरणे त्यांना योग्य वाटले असावे. पणाला

लावतानाचे धर्ममुखाने आलेले द्रौपदीवर्णन (मभा २।५८।३२–३७ मुभा २।१४।१५८–१६४ ) मुक्तेश्वर त्रयस्थ निवेदनाच्या रूपात मांडतात. पण त्यामुळे त्याची प्रयोजकताच धोक्यात येते. त्यामुळे ते अधिक शब्दबंबाळही होताना दिसते. कदाचित पतीने पत्नीस पणास लावणे आणि तसे करताना तिचे वर्णन करणे हे मुक्तेश्वरांना व त्यांच्या संत-श्रोत्यांना रुचले नसावे. त्यामुळे हा संवादात्मक भाग निवेदनरूपात वर्णिला असावा. मुळाशी इमान राखावयाचे नि आपल्या श्रद्धाही संभाळायच्या या कसरतीतून ही तडजोड घडली. निवेदन व संवाद या माध्यमांचे बलाबल जाणूनही श्रद्धानिष्ठ औचित्यविचारातून हे घडले असावे. मुक्तेश्वरांच्या श्रद्धानिष्ठा त्यांच्या काव्यदृष्टीला असा क्वचितच अटकाव करताना दिसतात. अशा विरळ उदाहरणांपैकी हे एक.

मूळ साध्या निवेदनाला मुक्तेश्वर दृश्यात्मक स्वरूप कसे देतात ते प्रवेशद्वारी आस्तीकाने केलेल्या स्तवनारंभानेही ( मभा १।४९।२८ मुभा १।११।५९–७४ ) स्पष्ट व्हावे. " धनौघमपर्यन्तं रत्नसागरमक्षयम् । नादयन्त्रथघोषेण प्रविवेश पुरोत्तमम् " ( २।३०।१४ ) अशा साभिप्राय विशेषणांनी महाभारतकार कृष्णाने आणलेल्या संपत्तीचे वर्णन करतात " चौदा सहस्र मत्तकुंजर । पाठीं रत्नें सुवर्णभार । वस्त्रें वाजी रहंवर लक्ष अपार धेनूचे " ( २।९।१८ ) या मुक्तेश्वरी वर्णनात " अक्षय " व " अपर्यन्तं " या विशेषणांनी सूचित केलेली धनाची विपुलता चौदा सहस्र हत्तींच्या पाठीवर दिलेल्या रत्नसुवर्णभाराने गोचर केली आहे. वस्त्रें, वाजी, रहंवर, धेनु अशा भेटवस्तूंची तत्कालाशी सुसंगत अशी भरही घातली आहे. मूळ निवेदनाला दृक्रूप देण्याचा त्यांचा प्रयत्न येथे स्पष्टपणे जाणवतो.

द्रौपदीच्या प्रश्नाचे उत्तर देताना भीष्म द्रोणादी सभाजनांचे वर्णन करतो, " एते द्रोणादयश्चैव वृद्धा धर्मविदो जनाः । शून्यैः शरीरैस्तिष्ठन्ति गतासव इवानतः " ( मभा २।६२।२० ). हा आशय मुक्तेश्वर भीष्माऐवजी द्रोणमुखानेच वर्णितात, " द्रोण म्हणे, शुभकल्याणी । देहसांडिल्या पंचप्राणीं । तेथें जैशी न फुटे वाणी । तेवीं मी असें जाण पां " ( २।१५।८६ ) त्यामुळे द्रोणाची अगतिकता व असहायता अधिक ठसठशीत होते. एका व्यक्तिमुखी असलेले दुसऱ्या व्यक्तीचे वर्णन संबंधित व्यक्तीच्या मुखी वापरून मुक्तेश्वरांनी आपल्या चित्रणाला प्रत्यक्षता व जिवंतपणा यांची जोड दिली आहे.

असे काव्यप्रयुक्ती-बदल ( Changes in Literary device ) मुक्तेश्वरांच्या काव्यदृष्टीची वाट दाखवितात.

### ६·४. भारतकथासंक्रमण : काही नमुने

महाभारताचे देशिकार लेणे मुक्तेश्वर कसे घडवितात हे पाहण्यासारखे आहे. या भारतकथासंक्रमणात मूलप्रत्यय देण्यातील त्यांचे यशापयशही लक्षात घेतले पाहिजे. काही वेचक उदाहरणांनी अशी चर्चा करता येईल.

स तु तां नैष्ठिकीं बुद्धिं कृत्वा पार्थो युधिष्ठिरः
गुरुवद्भूतगुरवे प्राहिणोद्दूतमञ्जसा ॥
शीघ्रगेन रथेनाशु स दूतः प्राप्य यादवान्
द्वारकावासिनं कृष्णं द्वारवत्यां समासदत् ॥
दर्शनकांक्षिणं पार्थं दर्शनकाङ्क्षयाच्युतः
इंद्रसेनेन सहित इन्द्रप्रस्थं ययौ तदा ॥
व्यतीत्य विविधान्देशांस्त्वरावान्क्षिप्रवाहनः
इंद्रप्रस्थगतं पार्थमभ्यगच्छज्जनार्दनः ॥—मभा २।१२।२८-३१

राजसूयमंत्रासाठी युधिष्ठिराने कृष्णास बोलाविले आणि तो आला. या घटनेचे महाभारतकारांचे वर्णन हे असे आहे. धर्माचे आमंत्रण व कृष्णाचे आगमन यातील त्वरा व गती निवेदनाच्या वाहत्या वेगाने बरोबर पकडली आहे. त्यातून धर्म व कृष्ण यांची परस्परप्रीतीही सूचकतेने आविष्कृत झाली आहे. "द्वारकावासिनं कृष्णं द्वारवत्यां", "दर्शनकांक्षिणं पार्थं दर्शनकाङ्क्षयाच्युतः, इंद्रसेनेन सहित इंद्रप्रस्थं" यासारख्या रचनेत अनुप्रासाचे माधुर्य व शब्दांचा कुसरीचा वापर आढळतो. तथापि एकूण निवेदनाचे स्वरूप एका गतिमान घटनेचे गतिशील कथन असेच राहते. या भागाचे मुक्तेश्वरांनी केलेले कथन पुढीलप्रमाणे आहे—

शुद्ध भावार्थ निकटवृत्ती । बैसवूनियां निश्चयरथीं
प्रेरिला अंतर द्वारावती । शीघ्र श्रीपती आणावया ॥ १०२
मनोगती पावला दूत । निरोपीं उठविला त्रैलोक्यनाथ
म्हणे, "मज आतांहूनि आप्त । धर्मभेटी इच्छितों ॥ १०३
आतांचि केलें पाहिजे गमन । म्हणोनि उठिला करुणाघन
संगी सुवात तैसा सगुण । इंद्रसेन सांगाती ॥ १०४
जेथे वसे सात्विकगुण । तेथं वैराग्य आणि ज्ञान
टाकूनि येती, तेवीं श्रीकृष्ण । धर्मभेटी निघाला ॥ १०५
अभेदभक्ताचें दर्शन । घ्यावया शंकर नारायण
आदरें येती, तेवीं श्रीकृष्ण । पांडवभेटी चालिला ॥ १०६
रथ नेटका निर्मळभजन । चारुवारुचतुष्टय मन
एकनिष्ठेचे वरी आसन । गुढार शोभे समाधी ॥ १०७ ॥
कुशळ सारथी सुविचारु । नेमरश्मीनें आवरी वारु
समागमें विवेकचतुरू । अर्धासनीं जवळिकें ॥ १०८ ॥
शमदमाची उभयचाकें । चूर्ण करिती विकल्पखडकें
वासनासरितांचीं तटाकें । उल्लंघिती अवलीळा ॥ १०९ ॥
ऐसिये रथीं आत्मारामा । बैसका झाली पुरुषोत्तमा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

या वेगळी आगळी उपमा । काय द्यावी कवीनें ? ॥ ११० ॥
लंघोनि अनेक देशांतरें । पुरंदरप्रस्था यादवेश्वरें
पावता परिसोनि प्रेमादरें । धर्म धांवे सामोरा ॥ १११ ॥

मुभा २।५।१०२-१११.

धर्माने प्रीतीने व त्वरेने बोलाविले आणि कृष्णही तसाच आला, हा कथाभाग मुळात जसा आहे तसा येथेही आहे. धर्माने दूत पाठविणे, दूताने श्रीकृष्णाला भेटणे आणि श्रीकृष्णाने त्वरेने निघून इंद्रप्रस्थी पोहोचणे ही घटनेची अंगोपांगे रूपांतरातही आहेत. या अर्थाने मुळातील आशय मुक्तेश्वरांनी आणला, असे म्हणता येईल.

तथापि हे मूलानुसरण अनुकृतीच्या स्वरूपाचे नाही. कविभूमिका आणि प्रतिमा यामुळे त्यास निराळे रूप प्राप्त झाले आहे. चार अनुष्टुपांचा दहा ओव्यांमध्ये झालेला विस्तार ही त्या रूपाची बाह्य खूण आहे.

हा विस्तार मुख्यतः आलंकारिक कल्पनाविलासाच्या अंगाने झाला आहे. मुळात एखाद-दुसरी उपमा-अनुप्रास येत असले तरी निवेदनाचा रोख सरळ साध्या कथनाकडेच अधिक आहे. मुक्तेश्वरी रचनेत या साध्या कथनाला डौलदार व अलंकृत रूप येते. घनाला जसा वात तसा करुणाघन कृष्णासांगाती इंद्रसेन, अशी उपमा आणि तिच्यात सूचित असलेली करुणाघन शब्दावरील कोटी, कृष्णभेटीवरील मालोपमा आणि कृष्णरथावरील दीर्घ सांग रूपक या अलंकारांनी हे निवेदन भरघोस झाले आहे.

या अलंकारयोजनेत आध्यात्मिक उपमानाचा वापर करून कवीने साऱ्या वर्णनाला उदात्ताचा स्पर्श दिला आहे. स्वतःला प्रिय असलेल्या श्रद्धानिष्ठांचा उच्चार केला आहे. कृष्णाचे मुळात सूचित असलेले श्रेष्ठत्व देवत्वाच्या रंगाने रंगविले आहे. कृष्णाभोवतीच्या दैवी वलयामुळे आध्यात्मिक उपमानांची ही गजबज औचित्यपूर्ण झाली आहे. प्रपंचात परमार्थ पाहण्याची लकब दृष्टीतच अनुस्यूत असल्याने सहजपणे येणारी रूपकशैली हा एकनाथांचा वारसा मुक्तेश्वरांनी संभाळल्याचे येथे स्पष्ट दिसते. अशी दीर्घ आध्यात्मिक रूपके ते सहज लिहून जातात. पुढेही मराठी आख्यानक कवितेत आध्यात्मिक रूपके आढळतात. नाथांप्रमाणेच मुक्तेश्वरी प्रभावाचीही ती खूण आहे.

या आलंकारिक कल्पनाविलासाने मूळ कथनातील भावरंगावर वेगळ्या छटा चढल्या आहेत. मुळात चित्र आहे ते दोन राजपुरुषांच्या परस्पर जिव्हाळ्याचे. मुक्तेश्वरी कथनात त्याला देव-भक्त भेटीचे रूप येते. महाभारतासारखे वीरयुगातील आर्ष काव्य भक्तिप्रधान मध्ययुगात मराठी कवींच्या हाती बदलले ते असे.

कविभूमिकेतील भिन्नतेमुळे आलेली ही बदलती भावच्छटा सोडली तर त्या घटनेतील गती, त्वरा आणि कृती मात्र अचूकपणे रूपांतरातही पकडलेली दिसेल. मुळात नसताना कृष्णामुखी संवादाची योजना करून कवीने त्यात प्रत्यक्षता आणली आहे. एकूण प्रसंगचित्रातील कृतीगतींची चित्ररूपता पाहण्यासारखी आहे.

देव-भक्तसंबंधाचे दिलेले रूप, आध्यात्मिक उपमानांनी सूचित झालेल्या श्रद्धा-निष्ठा, मूल घटनेचे जपलेले अविकृत रूप, आलंकारिक कल्पनाविलास, तज्जन्य विस्तार, प्रसंग-चित्रणातील कृतीगतींची चित्रमयता, प्रसन्नतेची पसरलेली तकाकी, वर्णनशैलीचे परंपरेशी असलेले अनुबंध हे या उताऱ्याचे विशेष लक्षात घेतले म्हणजे मूलानुसार घटिताचे कथन करूनही मुक्तेश्वरांच्या निवेदनाचा वेगळेपणा व श्रोतृमनावर होणारा भिन्न पण वेधक संस्कार जाणवतो. आर्ष काव्यांचे मराठी अवतरण घडविताना मराठी कवींनी नेमके काय केले ते अशा ठिकाणी जाणवते.

परीक्षितमृत्यु ( मभा १।३९।२५–३३, १।४०।१–३ मुभा १।८।४८–६७ ) या प्रसंगचित्राची तौलनिक पाहणी करण्यासारखी आहे. द्विजवेषाने फल अर्पिणारे नाग गेल्यावर राजाने मंत्र्यासह फलाहारास आरंभ केला. दैवयोगाने तक्षक ज्या फळात होता तेच राजाने उचलले. त्यातून कृमिरूपाने तक्षक बाहेर आला. शापाची कालसमाप्ती झाल्याचे समजून परीक्षित शापवचन मिथ्या झाल्याच्या आनंदात कीटकरूपी तक्षक आपल्या मानेवर ठेवून काहीशा उपहासाने हसू लागतो. शापाच्या प्रेरणेने केलेल्या या कृत्यास कालप्रेरणेने मंत्री अनुमोदन देतात. तेवढ्यात तक्षक प्रकट होऊन राजाला वेटोळ्याने वेढून गर्जना करीत दंश करतो. भयाने पळून जाणाऱ्या मंत्र्यांना तक्षक आकाशात जाताना दिसतो—असे महाभारतातील चित्रण आहे. विरोध, उपहास, दैवाचे विपरित नाट्य आणि चित्रमय वर्णन यातून महाभारतकारांनी परीक्षितमृत्युतील भीषणभाव प्रतीतिदर्शक बनविले आहेत. मुक्तेश्वरांनी हा प्रसंग विस्तराने चित्रिला आहे राजाभोवतालचा कडेकोट बंदोबस्त आणि द्विजवेषधारी नागाचे स्वागत त्यांनी नव्याने विस्तारपूर्वक वर्णिले. या संपूर्ण प्रसंगात मुळातील विरोधाचे रंग त्यांनी अधिक ठसठशीत केले. राजाने केलेला बंदोबस्त आणि त्यावर होणारी मात यातील विरोध जाणून छद्मवेषधारी सर्पाच्या मुखावरील हास्य त्यांनी नेमके टिपले ( ४९-५० ) आहे. द्विजांनी दिलेला प्रसाद घेताना या सिद्धप्रसादाने दोषदुरित नाहीसे होणार ही राजाची ( नवनिर्मित ) श्रद्धा ( ५५ ) आणि नेमक्या या प्रसादातच त्याचा काळ वाट पहात असणे, यातील विरोधही लक्षणीय आहे. शापकालसमाप्तीच्या जाणिवेने प्रसन्न झालेला राजा ऋषिवचनाचा मान राखण्यासाठी फळातून निघालेली अळीच मोठ्या आत्म-विश्वासाने मानेवर ठेवतो ( ५७–६१ ) आणि ही अळीच तक्षक असते, असे विरोधाचे रंग त्यांनी सर्वत्र वापरले आहेत. “ ह्रस्वकः कृष्णनयन स्ताम्रो वर्णेन ” चे “ आंग तयाचे ताम्रवर्ण । काजळा ऐसे काळे नयन ” असे रूपांतर करून कृमिवर्णनातील चित्रमयता कायम ठेवली. तक्षक दंशाचे मूळ वर्णन

> हसन्नेव च भोगेन तक्षकेणाभिवेष्टितः
> तस्मात्फलाद्विनिष्क्रम्य यत्तद्राज्ञे निवेदितम् ॥ – मभा १।३९।३३.
> वेष्टयित्वा च भोगेन विनद्य च महास्वनम्
> अदशत्पृथिवीपालं तक्षकः पन्नगेश्वरः ॥ – मभा १। पृ. १८७*४११

असे सरळ, साधे वृत्तात्मक आहे. मुक्तेश्वरी रचनेत ते

म्हणोनि कीटक लावितां कंठीं । धुधुकारला महाफुफाटीं
काळसर्पें घातली आंठी । मृत्युपाशासारिखी ।। ६१
नासिकीं धूम्राचे कल्लोळ । मुखीं धांवती महाज्वाळ
निमिषामाजि प्रचंड व्याळ । होऊनि ग्रीवा वेढिली ।। ६२

असे रौद्ररूप धारण करते. साध्या अळीतून धुधुकार करीत फुफाटणाऱ्या, नाकातून धुम्र-कल्लोळ सोडणाऱ्या व मुखातून महाज्वाळा काढीत प्रकटणाऱ्या तक्षकाचे भेसूर रूप त्यातून प्रतीत होते. त्याला पाहून होणाऱ्या पळापळीतील गडबड, गोंधळ मुक्तेश्वरांनी अधिक बारकाव्यांनी सचित्र केला आहे. तक्षकगमनाचे वर्णन मुक्तेश्वरांनी अद्भुताच्या रंगाने रंगविलेले असले तरी " रक्तकमलप्रमाणे तांबूसवर्णाचा तो नागराज तक्षक नीलगगनाचा जणू भांग पाडीत आहे असा त्यांना दिसला " ( १।४०।२–३ ) या मूळ अलंकार-विलासातील कल्पकता व भव्यता त्यांच्या चित्रणात आली नाही—या प्रसंगचित्रणात मुक्तेश्वरांनी मूळ वर्णनातील चित्रमयता टिकविली व जरूर तेथे नवे कल्पक तपशील त्यात भरले. ब्राह्मणपुत्राचा काहीसा उपहास करणारे परिक्षिताचे व्यक्तिरेखन ब्राह्मण-माहात्म्य मानणाऱ्या श्रद्धाभावाची जोड देऊन बदलले. या प्रसंगामागील दैव, काळ व शाप या प्रेरणांपैकी शापप्रेरणा ब्राह्मणमाहात्म्याची स्वतंत्र जोड देऊन ( १।८।७० ७६) ठसठशीत केली. त्यातील " श्रोतयांते नमस्कार । वक्ता करी वारंवार । ब्राह्मण क्षोभे तो प्रकार । नाचरावा कोण्हीही " ( १।८।७६ ) ही ओवी मुक्तेश्वरांची व्यक्तिगत श्रद्धा सुचविते. समकाळाशी सुसंगत अशा वैयक्तिक श्रद्धाभावाचा अनुप्रवेश येथील भारती प्रसंगचित्रात झाला आहे. महाभारतकारांचे येथील चित्रण स्वाभाविक आहे तर मुक्तेश्वरी चित्रण अत्युक्तीमुळे अद्भुताकडे झुकले आहे. नादानुसारी शब्द, आलंकारिक कल्पना-विलास, साक्षी व्यक्तींच्या प्रतिक्रिया, तक्षकाच्या रूपाकृतीचे चित्रमय वर्णन, प्रसंगातील अद्भुतता, व भीषणता आणि सर्वत्र पेरलेला विरोधभाव यामुळे हे सर्वच चित्रण सरस उतरले आहे.

यज्ञकुंडाजवळ आलेल्या तक्षकाचे वर्णन ( मभा १। पृ. २२२ * ४४६ मुभा १।११।१२८–१३२ ) मुळात भय–असहायतेचे केवळ वृत्तात्मक निवेदन झाले आहे. मुक्तेश्वरांनी " विषोदकाच्या मेघधारा ) पडती वन्हिस्फुलिंगगारा । उर्ध्वपुच्छ अधोसीरा । करूनि आला पतनार्थ " ( १।११। ३२ । असे ते प्रतिक्षम केले आहे. नव्या तपशीलाची जोड, स्वभावोक्त चित्रमय वर्णन व अलंकारविलास यामुळे ते खुलले आहे.

बारीकसारीक गोष्टींच्या निवेदनावरही मुक्तेश्वरांचा ठसा जाणवतो. धर्माने पणाला लावलेल्या बहुमोल मण्याचे ( मभा २।५४।२२ मुभा २।१४।४८–५० ) वर्णन पहा " कनकोत्तमभूषणः " हा मुळातील तपशील मुक्तेश्वरांच्या नजरेतून निसटला आहे. हारावळीचा मध्यमणी ( मणिर्हारोत्तरः ), जो जन्मला समुद्रमथनी ( सागरावर्तसंभवः ) मोलाआगळा त्रिभुवनी ( बहुधनो ) हे तपशील मूळ तपशीलावर आधारलेले असले तरी

किंचित बदललेले आहेत. मूळ आशयाला वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न त्यात आहे. "श्रीमान्" मधून सूचित होणारी तेजाची छटा "शुक्रबृहस्पतीचें रूप। जया देखता पावे लोप। बाळसूर्याचीही ओप। जया पाहतां पारुषे" अशा व्यतिरेकाने अधिक खुलविली आहे. कौस्तुभाचा जावळा, उपमे उणा स्यमंतमणी ही मुक्तेश्वरांनी टाकलेली आलंकारिक भर आहे. भगवंताच्या मण्यांशी ही तुलना औपम्याने व व्यतिरेकाने संबंध आहे. त्यामुळे धर्माने पणास लावलेल्या मण्याभोवती दिव्यतेचे वलय निर्माण होते. मुक्तेश्वरांसमोर असलेल्या श्रोत्यांची मने पुराणकथांनी संस्कारित झालेली होती. त्यांना ही भर आकर्षक वाटली असेल.

दुःशासनाच्या चेष्टेला भीमाने दिलेले खणखणीत उत्तर (मभा २।६८।१५–१८ मुभा २।१६।५६–६२) मुक्तेश्वरांनी समरसून रंगविले आहे. मुळात दुःशासनाची निष्क्रियता व कुत्साबुद्धी यांचा निर्देश करून भीमाने युद्धातील मर्मभेदाची ग्वाही दिली आहे. शूराच्या संतापाचा हा आविष्कार त्याला शोभेलशा कठोर वर्णाद्वारे झाला आहे. मुळातील सारा आशय मुक्तेश्वरांनी बरोबर पकडला आहे. त्याला अधिक भरघोस व उत्कट करण्याचीही त्यांची धडपड आहे. "शृगालाप्रती पंचानन" तसा दुःशासनाला भीम म्हणाला, अशा उपमेने त्यांनी त्यात तुच्छतेचा सूर भरला. "शक्तीच्या अंगणी तडतडा। बस्त नाचे ज्यापरी" अशा दृष्टांताने दुःशासनाच्या आततायी थयथयाटाचे चित्र रेखले जाते. "ही श्लाघ्य विषतरूची फळे। सेवूनि अमरत्व मानिसी" असा त्याच्या मूर्खपणाचा बिनतोड उपहास केला जातो. या साऱ्याचे फळ "देखसी आणि भोगिसी" अशा नेमक्या क्रियापदांनी ठसविले जाते. या क्रियापदांच्या मागे भीम-पराक्रमाचा असलेला दाब जाणवतो. "शब्दशस्त्रांची उसणी। लोहशस्त्रें फेडीन रणी। सदंत जिव्हा छेदूनी। फळ दावीन निंदेचें॥" असे भावी सूडाचे भीषण चित्र रेखाटले जाते. "ही माझी प्रतिज्ञाखूण। लिहोनि ठेवी हृदयपत्री" यामुळे त्या प्रतिज्ञेला गोचरता प्राप्त होते. अंतःकरण फुटून बाहेर वाहणारा सूडाचा तप्त लाव्हारस या भाषणातून ओसंडून वाहत आहे. पोषक भावाची भर आणि आलंकारिक चित्रशैली यामुळे ही किमया घडली आहे.

संजयाच्या बोलण्यावर धृतराष्ट्राने प्रकट केलेले दुःख (महाभारत २।७२।४ मुक्तेश्वर २।१७।५०–५५) मुक्तेश्वरांनी विस्तारून मांडले आहे. मुळात समर्थ पांडवांशी वैर धरल्यावर शोकरहित कसे होता येईल, एवढाच भाव आहे. साध्या स्पष्ट विधानाच्या रूपाने तो व्यक्त झाला आहे. मुक्तेश्वरांनी या सरळ कथनास अधिक नाट्यमय व भाव-पूर्ण बनविले आहे. "खोचोनि बोले कौरवरावो" असा आरंभीच त्याच्या बोलण्या-मागील भाव सांगितला. "काळिजीं घालिसी कां घावो?" अशी त्याची प्रतिक्रिया वर्णिली. "पांडवांविषयीं विपरीत भावों। नाहीं मातें सर्वथा" असे घाईगडबडीने स्पष्टीकरण केले. "मी अंध चक्षुहीन। पुत्र न मानिती माझें वचन" अशी स्वतःची असहायता प्रकट केली. "ऐश्वर्यमदें मातले पूर्ण। शक्रातेंही न गणिती" अशा उन्मत्त

पुत्रांच्या पार्श्वभूमीने ती अधिक घनदाट होते. " पवित्र पांडव केले वैरी । आतां कैचें सुख संसारी ? " या ओवीतून सज्जनांचा छळ दुष्टांनाही शांती लाभू देत नाही. त्यांना हळहळ, रुखरुख, चिंता वाटावयास लावतो असा नवाच समयोचित भाव निर्मिला. " कंठी अडकलिया फांसा । तोंड पसरी गोड घासा " अशी अभिलाषेने झालेली वंचना वर्णिली आणि आता कुलनाश निश्चित या स्थिरबिंदुवर धृतराष्ट्रमनीचा हा फिरता भावलंबक स्थिर केला. धृतराष्ट्राच्या व्यक्तिरेखेचे अनेकानेक रंग त्यातून प्रकटले आहेत. भावनांचा एक नटरंगी गोफच मुक्तेश्वरांनी त्यातून सिद्ध केला आहे.

महाभारतासारख्या आर्ष मौखिक महाकाव्याचा बाज मुक्तेश्वरांना सगळ्या ठिकाणी अर्थातच संभाळता आलेला नाही. शिशुपालावर रागावलेल्या भीमाची भीष्म समजूत काढतो ( मभा २।३९।९–१५ मुभा २।१०।१५५–१५९ ) हा भाग मुळात आलंकारिक निवेदनाच्या स्वरूपात येतो. निसर्गातील उपमानांच्या मार्मिक योजनेने भीमाच्या क्षुब्धतेतील नैसर्गिकता व प्राकृतिक जोष सुचविला जातो. पुराणसंदर्भांनी या प्रसंगाला भव्यतेचे परिमाण लाभते व त्यातील रोमहर्षकता प्रत्ययकारी होते. मुक्तेश्वरांनी हा भाग संवादात्मक पद्धतीने मांडला. या काव्यप्रयुक्ती बदलाने मुळातील सौंदर्य टिकविता आले नाही.

द्रौपदीला सभेत आणण्याच्या दुर्योधनाच्या आज्ञेस विदुराने दिलेला नकार ( मभा २।५९।२–१२ मुभा २।१५।२–४ ) मुळात अतिशय तीव्र आहे. स्पष्टता, भेदक दृष्टांत, समर्पक उदाहरणे, योग्यायोग्यतेचा विचार, व्यवहारनीती असे सारे त्यात आहे, धर्म धनी नसताना त्याने द्रौपदीला पणाला लावले म्हणून ती दासी नाही, हा वस्त्रहरणप्रसंगाचा केंद्रबिंदू असलेला प्रश्न प्रथमतः विदुराला जाणवला आहे. कथेचे प्रामाण्य व विकसन या दृष्टीने महत्त्वाचा असलेला हा भाग मुक्तेश्वरांनी गाळला आहे. युक्तिवाद न करता द्रौपदी दासी नाही, असे मुक्तेश्वरांचा विदुरही म्हणतो. पण त्यासाठी " कैचें द्यूत ? कैची पैज ? " असा आततायी कांगावेखोरपणा त्याला करावा लागतो. भावस्थिती, तीव्र संबोधने, अंतर्मुख करणारे प्रश्न, क्रियाविशेषणांचा समर्पक वापर आणि कळकळीचा विवेक या साऱ्यांनी विदुराचा हृदयस्फोट भावनात्मक पातळीवर त्यांनी समूर्त केला आहे. त्यातील विचारगर्भतेकडे मात्र त्यांचे दुर्लक्ष झाले आहे.

भारतकथासंक्रमणाचे हे नमुने मुक्तेश्वरांच्या आविष्करणपद्धतीचे अनेकानेक विशेष स्पष्ट करतात आणि त्यातील यशापयशाचा आलेख उभा करतात.

## ६.५. मूलसापेक्ष अभिव्यक्तिविशेष : समारोप

संस्कृत महाभारताचे मुक्तेश्वरी भारत हे मराठी संस्करण आहे. हा भाषाभेद ही मुक्तेश्वरांनी केलेल्या भारतकथा संक्रमणाची ठळक खूण आहे. महाभारतातील अनुष्टुभत्रिष्टुभ असे छंद, अधूनमधून येणारे गद्य अंश आणि वक्त्याचा स्वतंत्रपणे नामनिर्देश करण्याची कुतुहलजनक पद्धती मुक्तेश्वरी भारतात नाही. भारती रचना पर्व–उपपर्व–अध्याय यात विभागलेली आहे. मुक्तेश्वरी रचना फक्त पर्वविभाजन मानते. अध्यायात

विभक्त असलेला ओवीबंध मुक्तेश्वरांनी वापरला आहे. अध्यायांचे विभाजन व कथाशयाची मांडणी स्वतंत्र आहे.

महाभारताच्या रूपाने समोर असणारी मूलसामग्री मुक्तेश्वर मूलानुसार वापरीत नाहीत. ते ती आपल्या कविप्रकृतिनुसार व काव्यदृष्टिनुसार वापरतात. कधी मुळातील शब्द-कल्पना-विचार वेगळ्या संदर्भात गोवून ते त्यांचे मूलसौंदर्य वृद्धिंगत करतात. कथेचा ओघ सुसंगतपणे वाहता रहावा म्हणून ते पुढचामागचा तपशील एकत्र करतात. तपशीलाचे असे क्रमांतर नेहमीच प्रायोजक असते असे नाही, कधी त्यामागे अनवधानही दिसते. क्रमांतराने आपले प्रसंगचित्र ते भिन्न भावसंस्काराने रंगवितात. त्यामुळे प्रसंगाचा रोख वा व्यक्तिचित्रांचे रंगही ते हवे तसे बदलून आपल्या अर्थानुवादाला उजाळा देतात. पात्राची मूळ संभाषणे गाळून वा अन्य पात्रमुखाने वापरून कथेच्या चित्राकृतीत ते त्यांना यथाप्रमाण स्थान देण्याचा प्रयत्न करतात व्यक्तिचित्रांच्या कडा त्यामुळे ठोसर होतात.

कथाशयाची मांडणी, विचारप्राधान्य, विस्तारित निवेदन व पुनरुक्ती यामुळे महाभारतात संबद्ध भागाचे अंश निरनिराळ्या ठिकाणी विखुरले गेले आहेत. मुक्तेश्वर त्यांचे एकीकरण करून पुनरुक्ती व पाल्हाळ टाळतात. संबद्ध पण विखुरलेल्या तपशीलाच्या एकमेळातून रेखीव प्रसंगचित्र उभे करतात. क्वचित मूळ दीर्घ खंडाचे लघुखंडात रूपांतर करून सुटसुटीतपणा आणतात. संबद्ध भागाच्या उपाययोजनाची ही प्रक्रिया संक्षेपाकडे झुकलेली आहे. कथाबंधाच्या रेखीवपणाकडे मुक्तेश्वरांचे अवधान कसे खिळलेले असते याचे ती निदर्शक आहे.

मूलशयाच्या प्रकटीकरणासाठी मुक्तेश्वर कधी मुळाहून वेगळ्या काव्यप्रयुक्तींचा ( Literary device ) वापर करतात. मूळ निवेदनास ते कधी दृकूरूप देतात. कधी आपल्या अर्थानुवादाप्रमाणे मूलाशयाचा रोख बदलून ठेवण्यासाठीही ते निवेदनात्मक भाव संवादात्मक पद्धतीने मांडतात. त्यामुळे त्यांच्या चित्रणात निकटता व प्रत्यक्षता येऊन ते जिवंत होते. कधी संवादात्मक भागही त्यांनी निवेदनाच्या रूपात मांडला आहे. निवेदन व संवाद या कथनात्मक कवितेच्या घटकांच्या बलाबलाची जाणीव मुक्तेश्वरांना सुप्तपणे का होईना पण असली पाहिजे असेच ही स्थळे दाखवितात. एका व्यक्तिमुखी असलेले दुसऱ्या व्यक्तीचे वर्णन संबंधित व्यक्तीच्या मुखी वापरून ते मूलाशयाला अधिक जिवंत व भेदक बनवितात. वेगळ्या काव्यप्रयुक्तीचे उपयोजन वेगळ्या काव्यदृष्टीतून आलेले असून बहुंश ठिकाणी ते उपकारक ठरले आहे. मात्र जेथे काव्यबाह्य श्रद्धानिष्ठा व औचित्यविचार यातून वेगळा काव्यमार्ग वापरला जातो तेथे तो अयशस्वी होताना दिसतो.

मुक्तेश्वर जेथे महाभारताचा समरूप प्रत्यय देतात तेथे अनुवादसदृश स्थळांची संख्या वाढलेली दिसते. मूळ आशयाचे सूत्र घट्ट धरून मुक्तेश्वरवाणीचा प्रवाह दिसतो त्यातील घटक कधी गाळले वा बदलले गेले तरी समतुल्य घटकांनी त्यांची जागा भरून काढण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. मुळाचे सार, त्याचे मर्म व काव्यात्म

हाताळणी याचे भान राखल्याने मूलसदृश भावप्रत्यय घडविण्यात मुक्तेश्वर यशस्वी होतात. व्यासांची संगती रसनिर्मितीच्या बाबतीतही त्यांनी सोडलेली नाही.

कधी मात्र मूलप्रत्य देण्यात ते अयशस्वी ठरतात. व्यासांसारख्या परिपूर्ण महाकवीच्या तुलनेने अन्य कवी थोडेफार थिटे पडणार हे स्वाभाविक आहे. तसे मुक्तेश्वरांचेही झाले आहे. कधी मुळापेक्षा वेगळ्या काव्यप्रयुक्तीने ते मूलाशयाची हाताळणी करू पाहतात आणि ती त्यांना नेहमीच साधते असे नाही. महाभारतात भावोत्कटतेबरोबरच बुद्धिगम्य, विचारगर्भ व चर्चात्मक अंश येऊन एकप्रकारचे संतुलन साधलेले असते. अशा वेळी मुक्तेश्वर त्यातील बौद्धिक अंश ( Intellectual element ) दुर्लक्षून भावनात्मक अंशाला ( Emotional Element ) प्राधान्य देतात. त्यामुळे व्यक्तिरेखांचे बळ उणावते व विचारगुरुत्व कमी होते. चित्रण परिपूर्ण होण्याऐवजी एकांगीपणाकडे झुकू लागते. मुक्तेश्वरांच्या भावप्रधान पिंडाचा हा परिणाम आहे.

भारतकथेवर अशी वेगवेगळी संस्करणे करून मुक्तेश्वर तिचे मराठी अवतरण घडवितात. कधी ते मुळाचा स्वैर पण प्रतीतिक्षम अनुवाद करतात. त्यातील कठीण भागाचे स्पष्टीकरणात्मक विवेचन करतात. गौण बाबींविषयीचे अवधान कधी संभाळले जात नाही. मुळातील विविध घटकांपैकी एखाद्या घटकावरच व्यक्तिविशिष्ट वृत्तिविशेषांमुळे भर देण्याची प्रवृत्ती त्यांच्यात आहे. मुळातील तपशील, घटना, भाव यांना स्थूलपणे जपण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. तद्द्वारा मूलप्रत्ययाची सदृशता ते टिकवितात. ही सदृशता समरूप भावबंध व भाषाबंध किंवा अन्य घटकांचे यथार्थ अनुसरण यामुळे मात्र आलेली नसते. त्यात कमीअधिक बदल करून समतुल्य घटकांनी ती देण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

मूळ घटनाप्रसंगांना कृतिउक्तीची जोड देणे, मुळातील सूक्ष्मता फुलवून ठसठशीत करणे, घटनाप्रसंगांना तात्त्विक परिमाण देणे, कथेचे धागे सुसूत्र ठेवणे इकडे त्यांचे अवधान असते. मूलभावनेभोवती कथाप्रवाहाला सुसंगत असा अनुषंगिक भावच्छटांचा गुच्छ उभारून मूलाशयाला उत्कट, तीव्र व भरघोस करण्याकडे त्यांचा कल असतो.

आविष्कारातील या बदलामुळे कधी अतिरेक, विसंगती, अनौचित्य, अश्लीलता व कालविपर्यास झाला आहे.

भक्तीची भावभूमिका व अध्यात्मदृष्टी यामुळे भारती भावाशयाचे रूप मुक्तेश्वरी रचनेत बदलताना दिसते.

अत्युक्तीचा वापर, अद्‌भुताची डूब, सरळसाध्या कथनाला अलंकृत करण्याची हौस, सदृश चित्रमालिकेने मूलभावाला समृद्ध व प्रत्यक्ष करण्याकडे कल, पुराणसंदर्भाचा वापर, कल्पनाविलास व तज्जन्य विस्तार हे त्यांच्या आविष्कारतंत्राचे आणखी काही विशेष.

या साऱ्यांमळे महाभारताच्या मराठी संस्करणावर मुक्तेश्वरांनी आपल्या प्रतिभेचा रूपठसा उमटविला आहे.

□ □ □

## ड ॥ समारोप

आतापर्यंतच्या अभ्यासात हाती लागलेले निष्कर्ष येथे एकत्रितपणे नोंदविल्याव पुढील अभ्यासास साहाय्यक ठरतील.

( १ ) द्रौपदीस्वयंवरासारखी भारती आख्याने, भगवद्गीतेसारखे भारती प्रकरण, नमुन्यादाखल रचलेले सौतिक हे प्रारंभपर्व या रचनेतून आलेल्या आत्मविश्वासाने मुक्तेश्वरांनी आदिपर्वापासून सलग भारतरचनेस आरंभ केला. आदि-सभा-वन-विराट या क्रमाने झालेल्या पुढील रचनेत पूर्वरचनेचा त्यांनी यथास्थानी समावेश केला असावा. इ. स. १६२० मध्ये ४६ व्या वर्षी आरंभिलेले भारत इ. स. १६४० मध्ये वयाच्या ६६ व्या वर्षी झालेल्या निधनाने बहुधा अपूर्ण राहिले असावे.

( २ ) मुक्तेश्वरी भारतात भाष्यात्म वळणाचा अंश आहे पण ते "भारथटीका" वा "कथाभाष्य" नव्हे. त्यात भाषांतरात्मक भाग आहे पण ते "भाषांतर" नव्हे. त्याच्या घडणीत अनुवाद-रूपांतराच्या प्रक्रिया दिसतात पण ते "अनुवाद" वा "रूपांतर" नव्हे. त्यात अनेक ठिकाणी स्वतंत्र निर्मितीचा आढळ होतो पण ती "स्वतंत्र" रचना नव्हे. त्यामुळे मुक्तेश्वरी भारताच्या स्वरूपाचा पुनर्विचार आवश्यक ठरतो.

( ३ ) या पुनर्विचाराची एक दिशा मुक्तेश्वरांच्या एतद्विषयक भूमिकेत आहे. महाभारताचे सर्वसंग्राहक लवचिक स्वरूप व अध्यात्मस्पर्शित वाङ्मयवैभव मुक्तेश्वरांना भारत कथासंक्रमणास प्रवृत्त करते. व्यासानुसरण करीत भाषाभेदाने भारतकथनाची भूमिका ते घेतात आणि भारतकथा व श्रोते यात आपण मध्यस्थ असल्याचे सांगतात पण ही निष्क्रिय मध्यस्थाची भूमिका नाही. महाभारताच्या संक्षेप-विस्ताराचे व रचनाबंधाचे पूर्वनियोजन त्यांच्या मनी जागे आहे. पूर्वपरंपरा, भक्ती, उत्कटता व कथासंगती या नवनिर्मितीच्या दिशा त्यांनी सूचित केल्या आहेत. मुळाला गोड व सुंदर करणाऱ्या संस्करणांनी भारतकथासंक्रमण घडविण्याची मनीषा त्यांनी स्पष्ट शब्दांनी सांगितली आहे.

( ४ ) मुक्तेश्वरी भारताची प्रमाणसंहिता अनुपलब्ध आहे. मुक्तेश्वरांसमोर संस्कृत भारताची डी ४ सदृश प्रत असावी. याचे भान ठेवून त्यांनी घडविलेले भारतकथासंक्रमण न्याहाळावयास हवे.

( ५ ) भारतकथासंक्रमण घडविताना मुक्तेश्वरांनी स्वैर रचनास्वातंत्र्य घेणारी पूर्व-परंपरा व वाग्जल्प टाळून व्यासानुसरण करण्याचे उद्दिष्ट यांचा यथायोग्य मेळ घातला. भारती कथासूत्र सांभाळीत आपल्या महाभारताच्या घाटाशी जुळणारा व व्यासकथेला खुलविणारा पूर्वपरंपरेचा संवादी अंश त्यांनी आपल्या रचनेत मुरवला. मूळकथेची रूपाकृती पुसणारा पूर्वपरंपरेचा अंश त्यांनी नाकारला आणि आर्षकाव्यांच्या मराठी

अवतरणपरंपरेत मूलानुसरणाचे नवे भान आणले. त्यामुळे पूर्वोत्तर भारत रचनेपेक्षा मुक्तेश्वरी भारतास पृथकत्व लाभले आहे.

( ६ ) महाभारताचे मूलरूप, लोकमानसावरील त्याचा ठसा, पूर्वकाव्यपरंपरा, समकालीन वास्तव व युगमानसाचा हुंकार हे घटक त्यांच्या भारतकथासंक्रमणाला घाट देतात. संस्कृतच्या श्रेष्ठत्वाची जाणीव आणि मराठी रचनेची निकड व जिद्द, रचना स्वातंत्र्याची सळसळती उर्मी आणि मूलानुसरणाची स्वीकृत निष्ठा, समकालीन वाङ्मयाची विस्तारप्रवृत्ती आणि संक्षेपरामायणासारख्या पूर्वरचनेतून स्वतःच आरंभिलेली संक्षेपप्रवृत्ती, भक्तीसारख्या केन्द्रीय जीवननिष्ठा आणि कथेला बांधीव, उत्कट व सुंदर करणाऱ्या वाङ्मयीन जाणीवांचे सृजनशील कवीला असलेलें सहज भान, असे अनेक वृत्तिविशेष या भारतकथासंक्रमणात सहभागी झाले आहेत.

( ७ ) या परस्परभिन्न प्रवृत्तिविशेषांचा दाब बदलत गेलेला दिसतो. सौतिक–आदि–सभा–जन–विराट या क्रमाने मुक्तेश्वर मूलानुसरणाकडून रचनास्वातंत्र्याकडे आणि विस्ताराकडून संक्षेपाकडे झुकलेले दिसतात. त्यामुळे त्यांच्या भारतीपर्वांना स्वतःचा असा स्वतंत्र घाट प्राप्त होताना दिसतो.

( ८ ) महाभारताचा स्थूलप्रत्यय देणारे मूलानुसरण मुक्तेश्वर करतात, त्याबरोबरच संक्षेप, विस्तार, बदल व नवनिर्मितीची जोड असे आशयनिष्ठ व काव्यमार्गादी अभिव्यक्तिनिष्ठ असे उभयविध संस्करण ते भारतकथेवर करतात. या संस्करणात आपल्या भारतकथेच्या वाङ्मयीन सौष्ठवावर त्यांचे अवधान खिळलेले दिसते. त्यामुळे त्यांचे भारत व्यासभारताची प्रतिकृती, अनुकृती वा भाषांतर होत नाही किंवा पूर्णतया स्वतंत्र कलाकृतीही होत नाही. व्यासभारताचा आर्ष डौल मिरविणाऱ्या मराठी संस्करणाचे रूप त्याला प्राप्त होते. मुक्तेश्वरी भारत ही व्यासभारताची अशी मराठी पुनर्निर्मिती आहे.

या पुनर्निर्मितीचे वाङ्मयरूप स्वतंत्रपणेच न्याहाळणे योग्य होईल.

□ □ □

# इ ॥ परिशिष्ट

## मुक्तेश्वरी भारत व महाभारत संगती

## CONCORDANCE

| मुक्तेश्वरी आदिपर्व प्रियोळकर प्रत | महाभारत आदिपर्व संशोधित प्रत |
|---|---|
| अ. १ ओ. १९३ | अनुक्रमणीपर्व अ. १ पर्वसंग्रहपर्व अ. २ |
| अ. २ ओ. १५३ | पौष्यपर्व अ. ३ |
| अ. ३ ओ. ९४ | पौलोमपर्व अ. ४–१२ |
| अ. ४ ओ. १८८ | आस्तीकपर्व अ. १३-१७।१५१ |
| अ ५ ओ. १३१ | अ. १७।१५२–२६।३४ |
| अ. ६ ओ. १२८ | अ. २६।३५-३० |
| अ. ७ ओ. १३८ | अ. ३१–३८।२६ |
| अ. ८ ओ. ९२ | अ. ३८।२७–४० |
| अ. ९ ओ. ९७ | अ. ४१–४४ |
| अ. १० ओ. १२० | अ. ४५–४७ |
| अ. ११ ओ. १७१ | अ. ४८–५१ |
| अ. १२ ओ. ४८ | अ. ५२–५३ |
| अ. १३ ओ. १२९ | आदिअंशावतरणपर्व अ. ५४–५७।७४ |
| अ. १४ ओ. १६८ | अ. ५७।७५–६१ |
| अ. १५ ओ. १५९ | संभवपर्वणि शंकुतलोपाख्यान अ. ६२-६६ |
| अ. १६ ओ. २२३ | अ. ६७–६९ |
| अ. १७ ओ. १५३ | संभवपर्वणिययात्युपाख्यानम् अ. ७०–७२ |
| अ. १८ ओ. १५० | अ. ७३–७७।३ |
| अ. १९ ओ. १९६ | अ. ७७।४–८३।५ |
| अ. २० ओ. १७८ | अ. ८३।६–८८ |
| अ. २१ ओ. ९० | संभवपर्व ८९–९० |
| अ. २२ ओ. १७९ | अ. ९१–९४।३९ |
| अ. २३ ओ. १६९ | अ. ९४।४०–९६ |
| अ. २४ ओ. ११३ | अ. ९७–१०० |
| अ. २५ ओ. १७५ | अ. १०१–१०४ |
| अ. २६ ओ. १२१ | अ. १०५–१०८ |

| मुक्तेश्वरी आदिपर्व प्रियोळकर प्रत | महाभारत आदिपर्व संशोधित प्रत |
|---|---|
| अ. २७ ओ. २३१ | अ. १०९–११५ |
| अ. २८ ओ. १२५ | अ. ११६–११९।१२ |
| अ. २९ ओ. १७३ | अ. ११९।१३- |
| अ. ३० ओ. २४५ | अ. १२०–१२३ |
| अ. ३१ ओ. १९९ | जतुगृहदाहपर्व अ. १२४–१२६ |
| अ. ३२ ओ. १०५ | अ. १२७–१२८ |
| अ. ३३ ओ. ३८ | अ. १२९ |
| अ. ३४ ओ. १०५ | परि. १ क्र. ८१ |
| अ. ३५ ओ. १५३ | अ. १३०–१३४ |
| अ. ३६ ओ. १६० | अ. १३५–१३८ |
| अ. ३७ ओ. १०८ | हिडिम्बवधपर्व अ. १३९–१४२ बकवधपर्व अ. १४३–१४४. |
| अ. ३८ ओ. १०४ | अ. १४५–१५२ |
| अ. ३९ ओ. ९९ | चैत्ररथपर्व अ. १५३–१५७. |
| अ. ४० ओ. १६९ | अ. १५८–१७३ द्रौपदी स्वयंवरपर्व अ. १७४ |
| अ. ४१ ओ. १५० | अ. १७५–१८१।२७ |
| अ. ४२ ओ. १४८ | अ. १८१।२८–१८९ |
| अ. ४३ ओ. ५२ | वैवाहिकपर्व अ. १९०–१९१ |
| अ. ४४ ओ. १२३ | परि. १ क्र. १०३ |
| अ. ४५ ओ. १६१ | विदुरागमनपर्व अ. १९२–१९८ राज्यलंभ-पर्व अ. १९९।२५ |
| अ. ४६ ओ. ८६ | अर्जुनवनवासपर्व १९९।२६–२०४ |
| अ. ४७ ओ. १४७ | अ. २०५–२१० सुभद्राहरणपर्व अ. २११–२१२. हरणहारिकपर्व अ. २१३ |
| अ. ४८ ओ. ८७ | खाण्डवदाहपर्व अ. २१३।२२–२१५. |
| अ. ४९ ओ. १४८ | अ. २१६–२१९ परि. १ क्र. ११८ |
| अ. ५० ओ. १०६ | खाण्डवदाहपर्वणि |
| उपसंहार | शार्ङ्गकोपाख्यानम् |
| ओ. १०७–११८ | अ. २२०–२२५ |

महाभारत आदिपर्व १९ उपपर्वे, २२५ अध्याय, ७१९० श्लोक ( संशोधित प्रत. )
२१८ अध्याय, ७९८४ श्लोक ( पर्वसंग्रहानुसार १।२।९६ )
२३० अध्याय, ८९८४ श्लोक ( मुक्तेश्वरांनुसार १।५०।११६–११७ )

मुक्तेश्वरी आदिपर्व अ. ५० ओ. ६९९२ ( प्रियोळकर–प्रत )
अ. ५० ओ. ७१२३ ( काव्यसंग्रहप्रत )
काव्यसंग्रहप्रतीतील १४० ओव्या प्रियोळकर प्रक्षिप्त मानतात.
तीत नसलेल्या अधिकच्या ९ ओव्या प्रियोळकरी संहितेत आहेत.

**सभापर्व : संगती**

| मुक्तेश्वरी सभापर्व – काव्यसंग्रह प्रत | | महाभारत सभापर्व – संशोधित प्रत |
|---|---|---|
| अ. १।१–७९ | सभाविन्यास-कृष्णप्रयाण | सभापर्व अ. १–३।७ श्लोक ४९ |
| अ. २।१–१३३ | सभानिर्माण व प्रवेश | सभापर्व अ. ३।८–५।६ श्लोक ६७ |
| अ. ३।१५५ | नारदनीती | सभापर्व अ. ५।७-११६ श्लोक १०९ |
| अ. ४।१–१८६ | लोकपालसभावर्णन | सभापर्व अ. ६–११।४२ श्लोक १७९ |
| अ. ५।१–१८१ | पांडुसंदेशकथन व कृष्णाशी विचारविनिमय | सभापर्व अ. ११।४३–७३<br>मंत्रपर्व अ. १२–१६।९ श्लोक १८४ |
| अ. ६।१–६४ | जरासंधपूर्ववृत्त | मंत्रपर्व अ. १६।१०–१७ |
| ६।६५–१६४ | जरासंधाची गाठ | जरासंधवधपर्व अ. १८–२० श्लोक १६३ |
| अ. ७।१–११२ | जरासंधवध | जरासंधवधपर्व अ. २१–२२ श्लोक ८३ |
| अ. ८।१–१६८ | पांडवांचा दिग्विजय | दिग्विजयपर्व अ. २३–२९ श्लोक १९१ |
| अ. ९।१–१६६ | राजसूय-समारंभ | राजसूयपर्व अ. ३०–३२ श्लोक ९७ |
| अ. १०।१–१६० | कृष्णपूजा व शिशुपालक्रोध | अर्घाभिहरणपर्व अ. ३३–३६<br>शिशुपालवधपर्व अ. ३७-३९।१५- – श्लोक १८० |
| अ. ११।१–१०१ | शिशुपालवध | शिशुपालवधपर्व अ. ३९।१६–४२ – श्लोक १२१ |
| अ. १२।१-२५३ | व्यासभविष्य कथन व कौरवांची द्यूतचर्चा | द्यूतपर्व अ. ४३-४५।३५<br>अ. ४६–५०।२८ श्लोक २५४ |
| अ. १३।१–८० | विदुरप्रेषण व युधिष्ठिर आगमन | द्यूतपर्व अ. ४५।३६–५८<br>अ. ५१–५२ श्लोक ८६ |
| अ. १४।१।१७१ | द्यूतात धर्म द्रौपदी व बंधुंसह सर्वस्व हरतो. | द्यूतपर्व अ. ५३ ते ५८ श्लोक १४५. |

| मुक्तेश्वरी सभापर्व–काव्यसंग्रह प्रत | महाभारत सभापर्व-संशोधित प्रत |
|---|---|
| अ. १५।१–२९१ वस्त्रहरणप्रसंग. | द्यूतपर्व अ. ५९ ते ६५ श्लोक २४९. |
| अ. १६।१।१४० अनुद्यूत. | अनुद्यूतपर्व अ. ६६ ते ७० । श्लोक १४९. |
| अ. १७।१–८५ धृतराष्ट्रपरिदेवनं | अनुद्यूतपर्व अ. ७१–७२ श्लोक ८३. |

महाभारत सभापर्व– ९ उपपर्वे, ७२ अध्याय, २३९० किंवा २४३२ श्लोक ( संशोधित )
७२ अध्याय, २५११ श्लोक ( पर्वसंग्रह )
७२ अध्याय, २७११ श्लोक ( मुक्तेश्वर २।उप ७-८ )

मुक्तेश्वरी सभापर्व–१७ अध्याय २६२५ ओव्या ( काव्यसंग्रह प्रत )
( यात २५१९ भारतकथा, २६ उपक्रम ६९ अध्यायान्तीचे समारोप व ११ उपसंहाराच्या अशी विभागणी आहे. )
१७ अध्याय २६१४ ओव्या ( सर्वसंग्रह व कुलकर्णी प्रत )
१७ अध्याय २६२६ ओव्या ( पंगु प्रत )

| मुक्तेश्वरी वनपर्व-काव्यसंग्रह प्रत | | महाभारत वनपर्व-संशोधित प्रत |
|---|---|---|
| अ. १।१–१६० | पांडव काम्यकारण्यात सूर्यप्रसाद, व्यासोपदेश. | आरण्यकपर्व अ. १ ते १०–१० अध्याय |
| अ. २।१–९१ | मैत्रेयशाप, किर्मीरवध व कृष्णभेट. | आरण्यकपर्व अ. ११<br>किर्मीरवधपर्व अ. १२.<br>कैरातपर्व अ. १३–१४ – ४ अध्याय |
| अ. ३।१–१०९ | शाल्वयुद्ध, कृष्णाचे आश्वासन | कैरातपर्व अ. १५–२३ – ९ अध्याय |
| अ. ४।१–१६२ | अद्वैतवनप्रवेश, द्रौपदीधर्मभीम संवाद, पाशुपत प्राप्ती. | कैरातपर्व अ. २४–४१ – १८ अध्याय. |
| अ. ५।१–१०९ | उर्वशीशाप, धृतराष्ट्र-चिंता, धर्म दुःखी | कैरातपर्व अ. ४२<br>इंद्रलोकाभिगमनपर्व अ.४३–४९– अ ८ |
| अ. ६।१–१४५ | नलदमयंती विवाह | ( नलोपाख्यान ) अ. ५०–५४– अ ५ |
| अ. ७।१–२१९ | दमयंती त्याग | ( नलोपाख्यान ) अ. ५५–६२– अ ८ |
| अ. ८।१–२२६ | नलदमयंती पुनर्मीलन | ( नलोपाख्यान ) अ. ६३–७८– अ १६ |

| | | |
|---|---|---|
| अ. ९।१–१७५ | तीर्थयात्रा, भीम-हनुमंत भेट व कमलानयन | इंद्रलोकाभिगमनपर्व अ. ७९<br>तीर्थयात्रापर्व अ. ८०–१५३– अ ७५ |
| अ. १०।१–२०५ | जटासुर वध, यक्ष-संहार, अर्जुनाचे प्रत्यागमन, नहुषप्रश्न | जटासुरवधपर्व अ. १५४ अ. २६<br>यक्षयुद्धपर्व अ. १५५–१७२ ,,<br>अजगरपर्व अ. १७३–१७८ ,,<br>मार्कण्डेयसमस्यापर्व अ. १७९ ,, |
| अ. ११।१–१० | कृष्ण–मार्कण्डेय–पांडव भेट | मार्कण्डेयसमस्यापर्व - अ. १८०–२२१<br>द्रौपदीसत्यभामापर्व अ. २२२–२२४ |
| अ. १२।११-१६२ | दुर्वासभोजन | परि. १ क्र. २५ – अ. ४५ |
| अ. १२।१–१८२ | घोषयात्रा | घोषयात्रापर्व अ. २२५–२३५–अ. ११ |
| अ. १३।१–१३० | दुर्योधनाचा वैष्णवयाग व्यासदर्शन व मुद्गलाख्यान | घोषयात्रापर्व अ. २३६–२४३ अ. १२<br>मृगस्वप्नमयपर्व अ. २४४ ,<br>व्रीहिद्रौणिक पर्व अ. २४५–२४७ ,, |
| अ. १४।१–८७ | जयद्रथविटंबना | द्रौपदीहरणपर्व अ. २४८-२५६–अ. ९ |
| अ. १५।१–२६७ | रामोपाख्यान | (रामोपाख्यान) अ. २५७–२७६ अ.२० |
| अ. १६।१–१५० | सावित्र्युपाख्यान | (सावित्र्युपाख्यान) अ. २७७–२८३ अ७ |
| अ. १७।१–६१ | कर्णकुंडलाभिहरण | कुण्डलाहरणपर्व अ. २८४–२९४-अ११ |
| अ. १८।१–११९ | अरणिहरण, यक्षप्रश्न | आरणेयपर्व अ. २९५–२९९-अ ५. |
| अ. १८।१–२ | उपसंहार. | |

महाभारत वनपर्व : १६ उपपर्वे, २९९ अध्याय, श्लोकसंख्या दिली नाही ( संशोधित प्रत ) २६९ अध्याय, ११,६६४ श्लोक ( पर्वसंग्रह )
मुक्तेश्वरांनी या पर्वाची अध्याय-श्लोकसंख्या दिली नाही.

मुक्तेश्वरी वनपर्व : १८ अध्याय, २७६५ ओव्या ( काव्यसंग्रह प्रत ) व
१८ अध्याय २७६३ ओव्या ( पंगु प्रत )
२६ अध्याय ३३७१ ओव्या ( काव्येतिहाससंग्रह प्रत )
( काव्यसंग्रहापेक्षा अधिकच्या ओव्या हरिश्चंद्राख्यानाच्या [ अ ६ ते १० ओव्या ६०४ ] समावेशनामुळे आल्या आहेत. ).

| मुक्तेश्वरी विराटपर्व काव्यसंग्रह प्रत | महाभारत विराटपर्व संशोधित प्रत |
|---|---|

**विराटपर्व : संगती**

| | |
|---|---|
| अ. १ ओ. १२९ पांडववैराटनगरप्रवेश | वैराटपर्व अ. १-११ = ११ अध्याय २५० श्लोक. |
| अ. २ ओ. १०१ जीमूतवध | वैराटपर्व अ. १२ = १ अध्याय ३२ श्लोक. |
| अ. ३ ओ. १६२ कीचकवध | कीचकवधपर्व अ. १३-२१ = ९ अध्याय २९५ श्लोक. |
| अ. ४. ओ. ५५ अनुकीचकवध | कीचकवधपर्व अ. २२-२३ = २ अध्याय ५८ श्लोक. |
| अ. ५. ओ. १३६ दक्षिणगोग्रहण | गोग्रहणपर्व अ. २४-३२ = ९ अध्याय २२२ श्लोक. |
| अ. ६ ओ. १८१ उत्तरगोग्रहण | गोग्रहणपर्व अ. ३३-६२<br>वैवाहिकपर्व अ. ६३-६४ } = ३२ अध्याय ८७९ श्लोक. |
| अ. ७ ओ. १०४ पांडवप्रकटन | वैवाहिकपर्व अ. ६५-६७।१३ = ३ अध्याय ६३ श्लोक. |
| अ. ८ ओ. १२३ अभिमन्युविवाह | वैवाहिकपर्व अ ६७।१४।३८ = १ अध्याय २५ श्लोक. |

महाभारत : विराटपर्व

४ उपपर्वे, ६७ अध्याय, १८३४ श्लोक ( संशोधित प्रत )

६७ अध्याय, २०५० श्लोक ( पर्वसंग्रहानुसार )

मुक्तेश्वर या पर्वाची अध्याय-श्लोक संख्या देत नाहीत.

मुक्तेश्वरी विराटपर्व – ८ अध्याय ९९१ ओव्या ( काव्यसंग्रह प्रत )

८ अध्याय ९८५ ओव्या ( पंगु – प्रत )

**सौप्तिक पर्व : संगती**

| मुक्तेश्वरी सौप्तिकपर्व काव्यसंग्रह प्रत | महाभारत सौप्तिकपर्व संशोधित प्रत |
|---|---|
| अ. १ ओ. १३१ अश्वत्थामा–कृप चर्चा व प्रयाण | सौप्तिकपर्व अ. १ ते ५–अ. ५ श्लोक २०५. |
| अ. २ ओ. १३९ अश्वत्थाम्याने केलेला संहार | सौप्तिकपर्व अ. ६ ते ८–अ. ३ श्लोक २५१ |

| | | | |
|---|---|---|---|
| अ. ३ ओ. ९९ | दुर्योधनमृत्यु, धर्मद्रौपदी विषाद, भीमप्रयाण | सौप्तिकपर्व अ. ९ ऐषीकपर्व अ. १०–११ | अ. ३ श्लोक ११९ |
| अ. ४ ओ. १२७ | प्रतिशोध व रुद्रमाहात्म्य. | ऐषीकपर्व अ. १२–१८ | अ. ७ श्लोक १९७. |

महाभारत सौप्तिकपर्व :

२ उपपर्वे, १८ अध्याय, ७७२ किंवा ८०० श्लोक ( संशोधित प्रत )

२ उपपर्वे, १८ अध्याय, ८७० श्लोक ( पर्वसंग्रहानुसार १।२।१८९–१९० )

१८ अध्याय, ८७० श्लोक ( मुक्तेश्वरोक्त १०।उप २–३ )

मुक्तेश्वरी सौप्तिक पर्व – ४ अध्याय ५०० ओव्या ( काव्यसंग्रह प्रत )

□ □ □

# मुक्तेश्वरांची कविता

## खंड तिसरा

महाभारत

॥ २ ॥

मुक्तेश्वरी भारताची वाङ्मयीन पाहणी

# मुक्तेश्वरांची कविता

## ३ ॥ २

### मुक्तेश्वरी भारताची वाङ्मयीन पाहणी

**एक ॥ मुक्तेश्वरांची काव्यदृष्टी**

१. भूमिका

२. मुक्तेश्वर आणि त्यांचे श्रोते

३. स्वकाव्यविषयक आत्मनिवेदन

४. काव्यस्वरूपनिष्ठ जाणिवा

५. समारोप.

**दोन ॥ कथाबंध**

१. कथाबंध : स्वरूपविवेचन.

२. मुक्तेश्वरांनी भारतकथेला दिलेले स्वकालोचित परिमाण

२.१. ईश्वरी योजनेचे सूत्र
२.२. काळ, कर्म आणि दैव यांची अटळ छाया
२.३. मूल्यात्मकतेचे परिमाण.

३. मुक्तेश्वरी भारताचा कथाबंध

३.१. व्यापक सलगता
३.२. आदिपर्व
३.३. सभापर्व

३.४. वनपर्व
३.५. विराटपर्व
३.६. सौप्तिकपर्व
३.७. समारोप.

४. मुक्तेश्वरी कथाबंधाचे काही विशेष

४.१. भविष्यकल्पनेचा वापर
४.२. विनोदाचा शिडकावा
४.३. अद्‌भुताची डूब
४.४. अश्लीलता
४.५. कालविपर्यास.

५. कथाबंधाचे काही रचनाविशेष.

६. निवेदनशैलीचे काही विशेष

६.१. संवादात्मक मांडणी
६.२. त्रयस्थ निवेदनपद्धती
६.३. स्वाभिप्राय–सूचन
६.४. अनुलोम पद्धती
६.५. " पुढां कथेची सूचना "
६.६. कथाविकासातील सूक्ष्मता
६.७. कथाविकासातील क्रमशः तीव्रता
६.८. निवेदनशैलीचे आणखी काही विशेष.

७. समारोप.

**तीन ॥ व्यक्तिचित्रण**

१. व्यक्तिचित्रण : स्वरूपविवेचन

२. मुक्तेश्वरी भारतातील व्यक्तिचित्रणाची विशिष्टता

३. नांदापूरकरांच्या मताचा परामर्श

४. श्रीकृष्ण : एक आर्ष प्रतिमा

५. आणखी काही व्यक्तिचित्रे

६. व्यक्तिचित्रण : काही विशेष

७. समारोप.

## चार ॥ संवाद

१. संवाद : स्वरूपविवेचन

२. संवादयोजनेचे भारतसापेक्ष विशेष

३. मुक्तेश्वरी भारतातील संवादयोजना

४. समारोप.

## पाच ॥ वर्णन

१. वर्णन : स्वरूपविवेचन

२. काही वर्णनस्थळांचे निरीक्षण

- भोजनवर्णन • वस्त्रवर्णन • वास्तु व स्थलवर्णन
- क्रीडा-उत्सव-महोत्सव वर्णन • आगमन-प्रयाण वर्णन
- आदर्श राज्य व समृद्धी वर्णन • व्यक्तिवर्णन
- बाहुयुद्ध व युद्धवर्णन • निसर्गवर्णन • आणखी काही वर्णने.

३. काही वर्णनविशेष

४. समारोप.

## सहा ॥ अलंकार

१. अलंकार : स्वरूपविवेचन

२. अलंकार योजनेचे भारतसापेक्ष विशेष

३. काही अलंकारबंधांची पाहणी

४. उपमानसृष्टीचे निरीक्षण

५. अलंकारयोजनेचे काही विशेष

६. समारोप.

## सात || निर्देशात्मकता

१. निर्देशात्मकता : स्वरूपविवेचन

२. प्रत्यक्ष निर्देश

३. आलंकारिक निर्देश

४. समारोप.

## आठ || भाषाशैली

१. भाषाशैली : स्वरूपविवेचन

२. पूर्वपरंपरेचा शैली व अभिव्यक्तिविशेषांवरील परिणाम

३. मुक्तेश्वरी भारतातील शब्दकळा

३.१. मुक्तेश्वरी भारतातील शब्दसंग्रह
३.२. मुक्तेश्वरी भारतातील शब्दसमरसता.

४. मुक्तेश्वरी शैलीचे काही विशेष

४.१. अनेक घटकयुक्त गतिशील चित्रणशैली
४.२. अनेक पद्धतींनी होणारे भावचित्रण
४.३. उपरोध व उपहास
४.४. चित्रशैली
४.५. साक्षी व्यक्तींच्या प्रतिक्रिया
४.६. सुभाषितात्मकता
४.७. नामावळी
४.८. संकीर्ण शैलीविशेष
४.९. अत्यल्प दुर्बोधतेची मीमांसा.

५. मुक्तेश्वरी शैलीचे द्विविध आविष्कार

५.१. मराठी वळणाचा ढंग
५.२. संस्कृतचा डौल.

६. मुक्तेश्वरी शैलीचे विकसन.

७. समारोप.

**नऊ || मुक्तेश्वरी भारताचे स्वरूपविशेष**

१. आर्ष महाकाव्याचे वळण

२. मुक्तेश्वरी भारताची जडणघडण

३. समारोप.

**दहा || महाभारत परंपरा व मुक्तेश्वरी भारत**

१. महाभारताची मराठी परंपरा

२. मुक्तेश्वरपूर्व भारतरचना

३. मुक्तेश्वरी भारताचे वेगळेपण

४. मुक्तेश्वरी भारताचा प्रभाव

५. अन्य वाङ्मयबंधावरील प्रभाव

६. समारोप.

**अकरा || समारोप.**

□ □ □

# एक ॥ मुक्तेश्वरांची काव्यदृष्टी

## १. भूमिका

कविता हा कधी न संपणारा शोध असतो. रसिकाप्रमाणे कवीही तो जन्मवरी घेत असतो. या प्रवासातील काव्यरहस्याचे ' क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास ' जाणता–अजाणता त्याच्या काव्यात सशब्द झालेले असतात. त्यांचा मागोवा घेतला तर कविता आणि कवी यांचे स्वरूप उजळते. त्याच्या काव्याला आकार देणारी काव्यदृष्टी गवसते. काव्यचर्चा हा तसा काव्यशास्त्राचा विषय. तथापि पूर्वकवींहून वेगळ्या जाणिवेने लिहिणाऱ्या कवींना तो कवितेतूनही मांडावसा वाटला आहे. मुक्तेश्वरांनीही त्यांच्या भारतात प्रसंगानुरोधाने तो तसा मांडला आहे. काव्यविषयक स्वतंत्रपणे मतप्रतिपादन करावे किंवा काव्यानुभवांना उद्‌गार द्यावा म्हणून हे लेखन झालेले नाही. ते आनुषंगिक व त्या त्या संदर्भात झालेले आहे. त्यातील पारंपरिकता, बचावात्मक समर्थन, स्फुटता, जाणीव-नेणीव, स्वतंत्रता आणि काव्यमाध्यम यांच्या मर्यादांचे भान बाळगून मुक्तेश्वरांचा काव्यविचार शोधला पाहिजे. त्यातून त्यांचा काव्यादर्श प्रतीत होईल. त्याचे त्यांच्या काव्यविश्वाशी असलेले नाते तपासता येईल.

## २. मुक्तेश्वर आणि त्यांचे श्रोते

प्राचीन मराठीतील बहुंश काव्याला श्रोता हे परिमाण लाभले आहे. ते श्रोत्यांच्या उपस्थितीत कमीअधिक प्रमाणात निर्माण झालेले दिसते. या रचनापद्धतीमुळे श्रोतृस्तवन हा प्राचीन मराठी काव्याचा एक विशेष बनलेला दिसतो. " संतसभेशी झालो स्वस्थ " ( २।१।४ ) अशी संतसभेपुढे भारतकथन करीत असल्याची भूमिका मुक्तेश्वर घेतात. गुरूवंदन करताना " एकचि भावें " ते श्रोत्यांनाही नमन करतात. या ' सभासमुद्रात ' संत-सज्जनांची, पवित्र साधुसंतांची व भाविक साधकांची गर्दी आहे.[1] त्यात ' विद्वज्जन रत्नांचे पुंज ', पंडित व बुधविबुध[2] आहेत. रसिक, गुणग्राहक, चतुर कविपंडितही[3] या

---

१. संत-सज्जन— आदि. ९।९७, १३।१२, २२।१७९, २३।१६९, २८।१२३, २७।२३१, ३१।१९८, ५०।११८. सभा. १।४, ६, ४।१८५, ५।१८१, ७।११०, ११२, ९।१६०, १४।१७१ वन. १।१५९ विराट. १।१२९, २।१००, १०१, ३।१६१, ५।१३६, ७।१०३, ८।१२२. सौप्तिक २।१३८, उम. ५.

२. विद्वान-पंडित – आदि. १।७८–८०, २।१५३, १७।१५३, १८।१५०, २७।२३०, ४४।१२३ सौप्तिक. १।२.

३. गुणग्राहक. चतुर – १।१५।१५९, २।१।७८, २।३।५४, ४।१।५.

श्रोतृवृंदात आहेत. या श्रोत्यांची भावात्मक व अभावात्मक लक्षणेही त्यांनी सांगितली आहेत. भोपळा पाण्यात धरावा तोवरच राहतो, तसे कथा संपेपर्यंतच चित्त देणारा श्रोता अनधिकारी समजावा. असे श्रोते अभिषेकपात्रासारखे गळून कोरडे होणारे व हृदयशून्य असतात ( १।१३।१५-१७ ). श्रोते चतुर, बोधप्रिय, जिज्ञासू, विद्वान, पवित्र आणि वेदशास्त्रपुराणांचे तर्काने आकलन करणारे असावेत ( १।१।७८-८० ). " स्थिरासनीं चिंतारहित । सात्विक अर्थज्ञ प्रेमभरित । कथाश्रवणी नित्यव्रतस्थ । वरी उदार सर्वस्वें " ( १।१३।११ ) असे सुजन श्रोते ग्रंथार्थ हाताने काढून हृदयात बसवितात. शिंपल्यात पडलेल्या स्वातीच्या थेंबाचा जसा मोती व्हावा किंवा जलावरील तैलबिंदू जसा विस्तारावा तसा अशा श्रोत्याच्या हृदयात अर्थ विशद होतो आणि सागरात जन्मणाऱ्या लक्ष्मीप्रमाणे बोध प्रसवतो ( १।१३।१२-१३, १८-१९ ). मुक्तेश्वरांनी कल्पिलेला श्रोतृवर्ग असा प्रगल्भ अभिरुचीचा आहे.

" कथा चाले तो बडिवार । संतसज्जनसंगतीचा " ( १०।३।९८ ) हे श्रोतृमाहात्म्य जाणून " सिकवसिकऊं बोलवा कथा । शुकसारिकेसारिखी " ( १।३१।१९९ ) अशी विनवणी ते करतात. मुक्तेश्वरांचा ' उन्मेषभृत्य ' श्रोत्यांच्या ' स्तवनसेवेसाठी आर्तवंत ' ( १।४२।१४८ ) आहे. त्यामुळी आपली वाक्पुष्पें " गुरूचरणीं अर्पूनि अर्पी श्रोतयां " ( ४।३।१६२ ). असे श्रोत्यांना सारे श्रेय[४] देऊन ते मोकळे होतात.

' कथापंथाचे सांगाती ' ( १।१४।१६७ ) असलेल्या श्रोत्यांकडून त्यांच्या काही अपेक्षा[५] आहेत. " आलस्य निद्रेतें विसरिजें । तापत्रयातें निरसिजे " (२।१।२६ ) असें निजसुखादिविवशीभाव सोडून, निर्विघ्न मनाने कथाश्रवण करून त्यांनी आपल्या वचनार्थाचे सार्थक करावे ( २।२।१३३ ). त्यांनी निश्चल मनाने ( १०।१।१३१ ), परमानंदाने ( २।१।७८ ) व मनोविनोदे ( २।१३।८० ) ऐकावे. चातकाच्या आर्तीने ( १।४०।१६८ ) व भ्रमराच्या रसिकतेने ( १।१५।३ ) कथास्वाद घ्यावा. " अवधान-कळा ते वरमाये । वक्तृत्वशक्ति ते वोहमाये । म्हणोनि क्षणक्षणा पाये । वंदावया अधिकारू " ( १।४३।५१ ) अशी अवधान देण्याविषयीची विनंती मुक्तेश्वरांनी मार्मिकपणे केली आहे. कथेचा समारंभ त्यांनी श्रवणदृष्टीने विलोकावा ( २।१२।२४७ ) म्हणजे तशी संवेदनशील कल्पकता त्यांच्या जवळ असावी. आपण आडवाटेला गेल्यास त्यांनी सुपथाला लावावे ( ४।७।१०३ ), ' आपुले झालें ते झाकावें " ( २।७।११०-१११ ), ' न्यून ते पूर्ण करावें युक्ती ' ( १।१७।१५३ ) अशीही त्यांची अपेक्षा आहे. या गुणग्राहकांनी कथा पारखून घ्यावी व कवीला आपल्या स्नेहाचा हात द्यावा ( १०।१।१३९ ), अशी त्यांची प्रार्थना आहे.

---

४. पहा, १।१।१७१, १।८।९२, १।४५।१६१, १।४७।१४६-१४७.

५. पहा, १।२३।१६९, १।४६।१४५-१४७, २।१।७८, २।८।१६४, २।९।१६०, १०।१।१२९.

मुक्तेश्वर-श्रोते, सौति-शौनक, वैशंपायन-जनमेजय यांच्या रूपाने त्यांनी वक्तृश्रोतृसंवाद गुंफला आहे. वक्त्याच्या अमृतकथेसाठी ते उत्सुक होतात ( १।१।१०३-१०५ ). त्यांची जिज्ञासा वक्त्याला आनंदित करते ( १।४।२ ). श्रोत्याची कथा ऐकविण्याची विनंती अशी रेखीव की वक्ता त्याला ' विचक्षण ' ( १।१३।४२-४६ ) म्हणतो. ही स्तुती श्रोत्यांना तृप्त करते ( १।१।९४-९६ ). " पंडितमंडळीवरमंडणा । संशयवनखंडप्रखंडणा । प्रचंडवक्तृत्वचंडकिरणा । कथापंथा प्रकाशी " ( १।२६।५९ ) अशा डौलदारपणे श्रोते कथा ऐकविण्याची विनंती करतात. कथेच्या मूलानुसरणाविषयी ते दक्ष आहेत. त्यामुळे वक्त्याला तसा निर्वाळा द्यावा लागतो ( १।२७।२३० ) किंवा त्यांची समजूत काढावी लागते ( १।२८।३८-४० ). कधी अश्लीलतेच्या सीमेवरून " बोलतां चतुरीं वारिलें " ( १।१६।३८ ) असे ते वक्त्याला परतवितात. माहिती, पूर्वकथा वा स्पष्टीकरण मागणारे प्रश्न[६] विचारून हे श्रोते कथेला वाहती ठेवतात. जनमेजयाचे प्रश्न अधिक विस्तृत, प्रगल्भ व आलंकारिक डौल असलेले आहेत. हे प्रश्न[७] दीर्घ, कथाविस्तार करणारे, कथाविकास साधणारे, वक्तृगौरव करून कथेचे रसग्रहण करणारे आहेत. मुक्तेश्वरांनी हा भाग आलंकारिक कल्पनाविलासाने व भावगर्भतेने रसमय केला आहे.

मुक्तेश्वरांच्या काव्यसृष्टीत " तुझेनि अवधानें व्यसनपिसें । वक्तृत्वातें लाविलें " ( १।२६।१२१ ) असे वक्त्याच्या वाणीला भरते येते तर " कथाव्यसनी भुललें मन " ( १।३०।६ ) असे श्रोते मुग्ध होतात. मुक्तेश्वरांचा श्रोता आध्यात्मिक बैठक असलेला विशिष्ट गुणसंपन्न रसिक आहे. निजसुखादिविवशीभावाचा त्याग, श्रवणाची आर्ती, सहानुभूती, रसिकता व कल्पक संवेदनशीलता या विशेषांनी तो संपन्न आहे. त्यानुसार त्यांनी आपले काव्यरूप घडविले आहे. अशा सुसंस्कृत, प्रगल्भ अभिरूचीचे श्रोते समाजात अल्पसंख्येनेच असणार. या अल्पसंख्यांकांनाच मुक्तेश्वर समजू शकतात. त्यांच्यातील दोष मान्य करूनही त्यांना त्यांची काव्यमूर्ती आकर्षित करते. मुक्तेश्वरी रचना श्रीधरासारखी आबालवृद्धांपर्यंत पोहोचली नाही किंवा मोरोपंतासारखी हरिदासप्रिय झाली नाही, याचे एक कारण त्यांच्या श्रोत्यांच्या या विशिष्ट प्रकृतीत आहे. " जन्मविले ते पोसावयासीं । उबगो नका सज्जन[८] हो " ( २।४।१८३ ) अशा शब्दात वक्ता-श्रोता यांचा पोष्य-पोषकभाव त्यांनी सांगितला आहे. तो त्यांच्या काव्याच्या संदर्भात महत्वाचा आहे. त्यातील मूलानुसरणाची दक्षता, भक्तिप्रधानता, अत्युक्ती,

---

६. पहा, आदि ४।४८-४९, ६।१३-१४, ९।१-५, १०।१, ११।१-२, १२।१, २५।१-२, ४९।१-२, ५०।१-२.

७. पहा, आदि १३।४२-४६, १४।१८-२०, १५।१-३. २१।१-४, २६।५५-५९, ३०।१-६.

८. काव्यसंग्रहकारांचा ( पृ. ४९ ) पाठभेद.

अद्भुतता, उत्तानता यांचा संबंध श्रोत्यांच्या अभिरूचीशी व कवीने त्यांच्या केलेल्या अनुनयाशी काही प्रमाणात जोडता येईल. निसर्गसौंदर्य, नृत्यगानमाधुर्य, राजवर्णन, राजनीती, रमणीवर्णन व संग्रामवर्णन या सऱ्या प्रापंचिक आवडीनिवडी त्यामुळे मुक्तेश्वरी भारतात फुलारून आल्या आहेत. आदि–सभा–सौतिकाच्या श्रोत्यांत विद्वज्जनांचा, गुणग्राहक चतुरांचा आधिक्याने निर्देश आहे. त्याप्रमाणात या पर्वांत मूलानुसरणाची दक्षता व आविष्काराचा पंडिती थाटघाट अधिक आहे. ' वन-विराटा 'त संत–सज्जनांचा आधिक्याने निर्देश आहे. त्याप्रमाणात ही पर्वे स्वैर रचनास्वातंत्र्याकडे व भक्तिप्रधानतेकडे झुकलेली दिसतात.

## ३. स्वकाव्यविषयक आत्मनिवेदन

बहुंश प्राचीन कवींप्रमाणेच मुक्तेश्वरांनीही आपल्या काव्यामागील दैवी[९] प्रेरणेचा निर्देश केला आहे. कुलदेवता महालक्ष्मीच्या वरप्रसादाने आपण स्वस्थ झालो असून ( २।१।४ ) कुलदेव सोनारी भैरवामुळे हा गौरव आपणास लाभल्याचे ( २।१।५ ) ते कृतज्ञतेने नमूद करतात. लीलाविश्वंभर जलधरासारखा सात्विक सरोवरात बरसतो आहे आणि आपण चातकासारखे अंतर्बाह्य निवतो आहोत ( २।१६।१३९ ), असे त्यांनी मोठ्या समाधानाने सांगितले आहे. त्यांचे हे सांगणे शांतरसाने ओळलेल्या निवृत्तीमेघाने सुखावलेल्या बापया चातकपक्षाची–ज्ञानदेवांची–आठवण करून देते. ( ज्ञानदेवी १८।१७३९–१७४१ ). या दैवी प्रेरणेच्या निर्देशाला गोचर रूप देण्यासाठी " लीलाविश्वंभर ईश्वरू "शी झालेल्या संवादाचे एक प्रसंगचित्रही ( २।१।१०–१२ ) त्यांनी सादर केले आहे. " लीलाविश्वंभर सद्गुरु । सकळ सिद्धांचा ईश्वरू । बोलवी तितुकें मुक्तेश्वरू । निरोपीत भारती " ( १।४८।८७ ) अशी सारी सूत्रें त्यांनी त्याच्या हवाली केली आहेत.

ईश्वराबरोबर गुरूकृपेचाही[१०] काव्यप्रेरणा म्हणून ते कृतज्ञतेने निर्देश करतात. व्यासमुशीतून वाहणारा भारत कनकरस गणेशमतीच्या सांडसानेही धरवेना तेथे माझ्यासारख्या प्राकृत माणसाने तो कसा स्पर्शावा ? पण ' सानुकूल जगद्गुरू ' म्हणून मी बोलतो आहे. ( १।४५।१६१ ). गुरूच्या कारुण्यवसंतवाताने मनाच्या निर्फळलतेला स्फूर्तीचे पल्लव फुटले आणि ती कवित्वाच्या फळभाराने लहडून गेली ( १।१।४२ ). " मुक्तेश्वरकवीची वाणी । पादुकारूपें श्रीगुरूचरणीं । चालतां दिसे परि गमनागमनीं । स्वतंत्र नोहे विचारा " ( १।३८।१०४ ) अशा सर्वस्वाने ते गुरूचरणाला बिलगले आहे.

---

९. आदि १।४,३०,३९,४५, ४।१८८, ८।९१, ११।१७१, १३।१२९, २६।१२२, ४६।८६, ४७।१४६–१४७. सभा ६।१६४, १३।८०, १५।२९१ इ.

१० आदि १।१९३, ९।९६, २९।१७२, ३०।२४५, ३४।१०५, ५०।११५ विराट ३।१६२, ४।५४, ८।१२२ सौतिक १।३, ४।उप २,३,५.

या पवित्रकथेच्या निरूपणाने आपण पवित्र होत आहोत ( २।१४।१७१ ), आपली जन्ममरणाची द्वंद्वे ( २।६।१६४ ) खंडित होत आहेत, असा त्यांना विश्वास होता. हा लाभ जसा कवीला तसा श्रोत्यांनाही होईल, असा निर्वाळा त्यांनी दिला आहे. " सर्व सुकृतें जोडती करीं । सर्व पातका होय बोहरी । सर्व वर्णी पुरुषनारी । सर्वी श्रवण करावें" ( १।२१।८७ ) असे साऱ्यांना येथे आमंत्रण आहे. ही कथा कलिमलनाशिनी, पुण्यदायक व धर्मैश्वर्यप्रापक आहे. या कथारूप कृष्णवेणीच्या प्रवाहपंथाने चालताना निवृत्तिसंगम दृष्टिपथात येईल ( १।२१।८९ ). या रसवाहिनी कथानर्मदेच्या तटी श्रवणार्तांना भक्तीमुक्ती स्वधर्मपत्नीसारखी सहजप्राप्य आहे ( ३।७।२१७-२१८ ). मुक्तेश्वरांनी केलेले हे फलश्रुतिकथन आध्यात्मिक स्वरूपाचे[११] आहे. त्यात श्रीधरां-प्रमाणे लौकिक सुखाचे आमिष वा भौतिक सुखाची प्रलोभने नाहीत. संसारबंधमोचन, दुःख-पापमुक्ती, पावित्र्यप्रीती, भक्तिसाधना व ब्रह्मप्राप्ती हे भारतरचनेचे उद्देश वैयक्तिक व व्यापक पातळीवर त्यांच्या फलश्रुतीत स्पष्ट होतात. त्यांच्या भारतातील कृष्णमाहात्म्य, भक्तिप्राधान्य आणि प्रगल्भ जीवनदृष्टी या उद्दिष्टांशी संबद्ध आहेत.

कवी ( १।८।९२ ), दीन पामर ( १०।१।४ ), कविकिंकर, ( २।१।७९ ), कवीश्वर ( २।६।१६३ ), मुक्तेश्वर कविनरेश ( १।५०।११८ ), सर्वज्ञ कविनायक ( २।५।१७९ ) अशी नम्रतासूचक व त्याचबरोबर श्रेष्ठतासूचक अभिधाने त्यांनी स्वतः-विषयी वापरली आहेत. कवित्वगर्वाचेनि डौलें डोलणे निंदास्पद असल्याचे लीलाविश्वंभर-मुखाने ( २।१।११ ) ते सुचवितात. शालीनता आणि प्रतिभावंताचा सहज आत्मविश्वास या दोन्हींचा मिलाफ मुक्तेश्वरांच्या कविवृत्तीत आहे.

अर्थसंपद् भारताचे ( २।१३।८० ) रसाळ निरूपण ( २।१।७८ ) श्रोत्यांनी आनंदाने मनोविनोदार्थ परिसावे, असे म्हणून त्यांनी आपल्या भारताची अर्थवत्ता व रसवत्ता सुचविली आहे. श्रोत्यांचे रंजन करण्याची क्षमताही त्यातून प्रकटते. अर्थपूर्ण, रसमय व रंजक अशी मुक्तेश्वरी भारताची वाङ्मयीन अंगे त्यातून प्रकटली आहेत. ओव्यांच्या पवित्र पुलीनातून ही कथारसवाहिनी नर्मदा वाहत आहे ( ३।७।२१७-२१८ ). या कृष्णवेणीचा प्रवाहपंथ निवृत्तिसंगमाला मिळणारा आहे. ( १।२१।८९ ). संस्कृताचा कापूस घेऊन विणलेल्या या वस्त्रात परमार्थाच्या कनकतारा ओवलेल्या आहेत ( २।१७।उप ४ ). व्यासग्रंथगिरीचे सोने गाळून देशभाषेचे हे लेणे घडविले आणि ते साहित्यरत्नांनी सुजडित केले ( २।१।२१ ). अशा किती तरी निर्देशांतून आपल्या भारताचे परतत्त्व-स्पर्शित वाङ्मयवैभव त्यांनी वर्णिले आहे. त्याची विविधांगे सांगताना ते म्हणतात —

---

११. आदि १।९६, ७।१३८, १२।४५,४६, २०।१७४, २१।८६, ५०।१०७.
सभा १।७९, ६।१६४, १०।७३,१६०, ११।१०१, १२।२५०, १४।१७१, १७।उप ६. वन ३।१०८, ६।१४६, ७।२१७-२१८, ८।२२६, १०।२०४, ११।१६१, १४।८७, १७।६१. सौप्तिक १।३, ४।उप २,३,५.

येथे राजांसाठी वीररस, विप्रवर्यांसाठी वेदसारांश आणि योगेश्वरांसाठी तत्त्वार्थबोध आहे. चतुरमंत्र्यांना तो बुद्धियुक्तीचा सागर वाटेल तर विलासीजनांना येथील शृंगार उत्तेजनक वाटेल. ज्ञात्यांना तो अमृतमधुर असून आर्तांना दोषक्षालन करणाऱ्या गंगाप्रवाहासारखा आहे ( २।१।१५-१८ ). वीर-शृंगारप्रधान रसमयता, लौकिक राजनीती व अलौकिक अध्यात्म यांच्या निर्देनाने त्यांनी आपल्या भारताचे भावात्म व चिंतनात्म रूप सुचविले आहे. " देशभाषा परी भांडार । साहित्याचं जाणि जे " ( २।११।१०० ) असे त्याचे वाङ्मयस्वरूप त्यांनी ठसठशीतपणे सांगितले आहे. " महाराष्ट्र काव्याचिये पंक्ती । गुरुत्व गौरव इये ग्रंथीं " ( ४।८।१२३ ) किंवा " महाराष्ट्रांसी काव्यगुरू । हा गौरवु ये ग्रंथीं " ( २।१।१८ ) असा आपल्या ग्रंथनिर्मितीविषयीचा आत्मविश्वास त्यांनी निःसंकोचपणे व्यक्तविला आहे. महाभारताचे आर्ष महाकाव्यात्म रूप जाणल्याचे आणि जोपासल्याचे निदर्शक असे हे निर्देश आहेत.

मुक्तेश्वर आपल्या कविभूमिकेचे प्रगटीकरण व श्रोत्यांशी हितगुज बहुधा अध्यायांच्या समारोपातून करतात. आपली वचने क्षुद्रसरितेसारखी आहेत ( १।२२।१७८–१७९ ). हे ' कांचमणीचे लेणे ' ( १।१६।२२३ ) आहे. चक्रवर्तीला तापसाश्रमात तृणधान्यभोजन करावे लागावे, तसे श्रोत्यांना हे श्रवण वाटेल (२।८।१६३-१६४). तेव्हा " कथिले कळे न कळे ऐसें । गोड कीजे सज्जनीं " ( १।५०।११८ ) एवढीच विनंती शक्य आहे. या विनयाच्या अवगुंठनाच्या आड स्वसामर्थ्याचा पुरेपूर विश्वासही[१२] त्यांनी व्यक्तविला आहे. लीलाविश्वंभराच्या चरणकमळाशी रुंजी घालतानाच ही कथा प्रकटली (२।३।१५४), असे सांगून त्यानी आपल्या देवदत्त प्रतिभेच्या आविष्कारातील सहजता सूचित केली आहे. वचनशुक्ति-मुक्तफळांची आपली वाणी ( ४।१।१२९ ) ' नवरसें सुगरणीं ' ( ४।२।१००, ४।४।५४ ) आहे. या नवरसरंगी, वरदायिनी वाग्भवानीने येथे स्वानंदगोंधळ मांडला आहे ( १।३।९४ ). परमामृतासारख्या या कथेवर (४।३।१६१) श्रवणचकोरांना जीवन देणारे अर्थचंद्रम्याचे सुधाकिरण पसरलेले आहेत. ( १।३४। १०४–१०५). व्यासांची ही मोटकी टीका कथावनितांमाजी नेटकी असल्याने त्रैलोक्यास वेध लावणारी विश्वमोहिनी झाली आहे ( १।४८।८६ ). म्हणून " भारतपात्रीं कथाजीवन । त्यावरी घटिका सभाग्यश्रवण । भरत भरतां निमज्जन । स्वानंदजळीं स्वभावें " ( १।२९।१६९ ) असा श्रोता येथे स्वानंदजळात बुडून जातो !

पण अशा कथेच्या समारंभातही ' येका अवगुणाची मासी । दावुनि सत्कविकथारसीं । अनंतगुणांचे गोड ग्रासीं । अरूची आणि भोजना " ( १।१।६८ ) असे दोषैकदृष्टी टीकाकार असतातच. अशा अभक्तांसाठी आपली ' परमार्थचंपकाची सुमने ' नाहीत (३।१६।१४९), असे मुक्तेश्वर स्वच्छपणे सांगतात. मत्सराने वा नेणतेपणाने मूढ बोलले तरी गुणग्राहक मात्र या निर्दोष ग्रंथावर प्रेम करतात (४।१।५-६). आपली वाङ्मोहिनी

---

१२. १।१८।१४९, १।३६।१६०, ३।६।१७५, ३।१०।२०५, ३।१२।१८१.

दुर्जनांना ठकवून, विकल्पराहूचे खंड-विखंड करून श्रोत्यांचे कोड पुरवील ( २।४।१८५-१८६ ). असे त्यांनी आत्मविश्वासाने सांगितले आहे. आपण निःशंक, निर्दोष व आनंदप्रद कथाकथन करू, असा त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.

मुक्तेश्वरांच्या गुणग्राहक श्रोत्यांनी त्याच्या सत्यतेची साक्ष दिली आहे. प्रास्ताविक श्रोतृविनवणी ऐकूनच " श्रोते म्हणती नवलप्रीती । आमंत्रणींच जाली तृप्ती । पुढील भोजनाची गती । अनिर्वाच्य सर्वथा " ( १।१।९४ ) आणि निरूपणाचे दिव्यमंदिर पाहून त्यांचे मनमयूर तांडव करतात ( १।५०।१११ ). त्यांचे कान निवतात आणि विश्वंभरार्पण मन करून ते परमानंदाने डोलतात ( १।२७।२३१, ४।५।१३६ ). ते प्रेमोदकाने पाझरतात ( ४।३।१६१ ). तेव्हा " संतहृदया निघती दोंदे । हें आश्चिर्य तंव नव्हे " ( १।२८।१२५, ४।४।५४ ). कथाव्यसनी भुललें मन " ( १।३०।६ ) अशी कबुली देऊन " कथापंथा प्रकाशी " ( १।२६।५९ ) अशी विनवणी ते करतात. मुक्तेश्वरी भारताच्या मानससरोवरात चतुर राजहंस श्रोते प्रेमानंदाने क्रीडा करतात आणि शब्दार्थमोत्यांचा चारा खाऊन सुखढेकरा देतात ( १।२५।१७५, ४।१।१७९ ). वक्त्याच्या मुखीच्या पीयूषपानासारख्या सुंदर गोष्टी ऐकताना " वाटे प्रत्यक्ष देखिलें दृष्टी " अशी त्यांची स्थिती होऊन जाते. ही कथावेल जसजशी फुलारते तसतशी त्यांची मने आगळ्या आनंदाने भरून जातात ( १।२१।३-४ ) आणि मग ही " चतुरचंचरीकांची मांदी " ब्रह्मानंदात रंगून " साधु साधु इहीं शब्दीं । गुंजारवें गर्जती " ( १।२०।१७८ )—श्रोत्यांच्या अशा प्रतिक्रिया अलगद टिपून मुक्तेश्वरांनी आपल्या कवितेचे एक आस्वादक संस्कारचित्र सादर केले आहे !

## ४. काव्यस्वरूपनिष्ठ जाणिवा

मुक्तेश्वर जी कथा सांगत होते ती स्वतंत्र नव्हती. ' व्यासोच्छिष्ट ' होती. हा उच्छिष्ट अनुच्छिष्टाचा प्रश्न मुक्तेश्वरकालीन वाङ्मयविश्वातील एक वादविषय होता. भा. श्री. परांजपे ' रामदासांचे साहित्यशास्त्र 'मध्ये त्याचे यथार्थ दर्शन घडवितात. " मेळवूनिया उष्टया पत्रावळी–कवित्वाची कळा मिरविली " असा तुकारामांनी अनुकरणशील कवित्वाच निषेध केला आहे. " आधारे कथन करणे ते शिजलेच शिजवणे " असे म्हणून शेखमहंमदांनी त्या सूरात सूर मिळविला आहे. " उच्छिष्टाचे अनुच्छिष्ट कैसे " याचा उलगडा करून रमावल्लभदासांनी या कवितेचे मर्म स्पष्ट केले आहे. लोकोद्धाराचा हेतू मनी बाळगून संस्कृतातील गूढार्थाचे सुलभ विवरण करावे, अशी आपली भूमिका रामीरामदासांनी या संदर्भात मांडली आहे. सारेच व्यासोच्छिष्ट आहे, या जाणिवेने सर्व ग्रंथ उच्छिष्ट आहेत, अशी नम्र भूमिका मुक्तेश्वरांनी मांडली आहे. तुकाराम–शेखमहंमदांच्या उच्छिष्ट निषेधाला शब्दप्रामाण्याधिष्ठित पांडित्यापेक्षा स्वानुभव महत्वाचा, असे अंग आहे. रमावल्लभदासांच्या विवेचनात आध्यत्मिक बैठक अनुस्यूत आहे.

रामीरामदासांच्या अभिप्रायातील संस्कृत वाङ्मयाच्या मराठी अवतरणाचे प्रयोजन मुक्तेश्वरांनाही मान्य आहे. तथापि या प्रश्नाचा त्यांनी केलेला विचार मुख्यतः आणि मूलतः वाङ्मयीन आहे (२।५।१७५-१७९). "नातळो म्हणती कविउच्छिष्टा" हा किती एकांचा आग्रह त्यांना ईश्वरकृपास्पर्शित श्रेष्ठांचा समर्थवाद वाटतो. स्वतः ते असा समर्थवाद सांगत नाहीत. व्यास आणि त्यांचा ग्रास लाधलेले जीर्णकवी यांच्या मुखीची उच्छिष्टें वेचण्यात त्यांची तृप्ती व स्फूर्ती आहे. जीर्णकवींकडून "एकएक अक्षरांची भीक" मागण्यात त्यांना कमीपणा वाटत नाही. हे ऋण ते कृतज्ञतेने व नम्रतेने नमूद करतात.

कोणत्याही ग्रंथाचा आधार न घेता रचना करण्याचा परिपाठ मुक्तेश्वरपूर्व मराठी कथाकाव्याला अपरिचित होता. त्यांच्या समोरचे अभिजात संस्कृत वाङ्मयही कमीअधिक प्रमाणात परंपरेचा आधार घेणारेच होते. या परिस्थितीत कालिदास, भारवी, माघ, हर्ष यांसारख्या संस्कृत विदग्ध महाकवींनी, ज्ञानदेव-एकनाथासारख्या भाष्यकारांनी वा (मुक्तेश्वरांना त्यावेळी कदाचित ठाऊक नसलेल्या) भास्कर-नरेंद्रासारख्या विदग्ध कवींनी आर्षग्रंथांचीच वळणे आपापल्या रूचीप्रमाणे रेखली होती. असा आधार स्वीकारून नवनिर्मिती करण्यात त्या त्या कवींच्या मगदूराप्रमाणे फेरफार जरूर पडला. तथापि आधार घेण्याची परंपरा त्यामुळे बळकटच झाली. त्यामुळे मुक्तेश्वरांना महाभारताचा आधार निःसंकोचपणे घ्यावासा वाटला. ग्रंथाधारे रचना करणे मध्ययुगीन कवींच्या काव्यशास्त्रात जणू अध्याहृतच दिसते.

कथा जर 'उच्छिष्ट' असेल तर कविकर्तृत्व कोठे प्रकट होते? कविकौशल्याला अवसर देणाऱ्या गोष्टींचा मुक्तेश्वरांनी केलेला विचार त्यांच्या रचनेचे परीक्षण करताना उपकारक ठरणार आहे.

[ १ ] "वाचाळपणें न बोले सैरा" (२।१।१०) अशी लीलाविश्वंभराची आज्ञा त्यांनी नोंदविली आहे. उत्सूत्र, स्वैर पाल्हाळाचा हा निषेध आहे. पाल्हाळ, पुनरुक्ती, स्वैरकथन व विस्कळितपणा टाळून रचनेला बांधीव रूप देण्याकडे मुक्तेश्वरांचा कल आहे. कोरीव आटोपशीर कथाबंध हे मुक्तेश्वरी रचनेचे वैशिष्ट्य आहे. हा आचार या विचारास पुष्टी देतो.

[ २ ] कथाबंधात संगती यावी व ते संभाव्य वाटावे यासाठी सूचक निर्देश त्यांना आवश्यक वाटलेले दिसतात. "सूचना कथेची पुढारी" (१।९।९५), "ऐसी सूचना अर्थकुशळ। पुढां कथेची जाणोत" (२।११।९४) हे त्यांचे उद्‌गार सूचकतेचे महत्त्व पटल्याची ग्वाही देणारे आहेत.

[ ३ ] कथाश्रवण करताना त्यातील घटना-प्रसंगांच्या शक्यतेविषयी वा एकूण जुळणीविषयी वाचकाचे मन निःशंक होईल अशी मांडणी असली पाहिजे, असे त्यांना वाटत असावे. त्यांचे श्रोते वक्त्याला "संशयवनखंडप्रखंडणा" (१।२६।५९) असें संबोधतात व "संशय फेडी" (१।५०।१) असे विनवितात. नारदाचे लोकपाल-

सभाख्यान ऐकल्यावर सुगम कथापंथाने चालताना ' आशंकेचा महाकर्दम ' एके स्थळी लागल्याचे सांगून त्या ' संशयगर्तेत ' पडलेल्या आपल्या चित्ताला बाहेर काढावे, असे धर्मराजाने विनविले आहे. संशय आणि आशंका श्रोतृचित्ताला कशा संभ्रमात पाडतात याचेच ते चित्र आहे. आणि म्हणूनच विकल्पराहूचे खंडविखंड करून आपण श्रोत्यांचे कोड पुरवू असे जाणीवपूर्वक आश्वासन ( २।४।१८६ ) मुक्तेश्वरांनी दिले आहे. राम यमसभेत कसा, या शंकेचे मुळात नसताना निरसन करून " आता भजकीं मन आपुलें । स्वस्थ केलें पाहिजे " ( २।४।६३ ) अशी विनवणी ते करतात. समुद्रमंथनापूर्वी लक्ष्मी विष्णूजवळ नव्हती असा विकल्प मनात आणू नका ( १।४।११८ ) असे आवर्जून सांगतात. कथेची निःशंकता ही कथानिवेदनाची आवश्यक अट असल्याचेमुक्तेश्वरांच्या आचार-विचारातून दिसते. प्रतीत्युपायवैकल्य स्फुटत्वाभाव या रसविघ्नांचा निरास त्यात अभिप्रेत आहे. मुक्तेश्वरांनी भारतकथेत केलेल्या कित्येक फेरफारांची संगती यातून लागते .

[ ४ ] निःशंकतेसाठीच " अप्रसिद्ध कोण सांगे ( १।१५।६० ) असे ते विचारतात आणि," अप्रसिद्ध बोलतां मनें । उबग वाटे श्रोतियां " ( १।१४।११४ ) असे त्याचे कारण देतात. त्यामागे अप्रसिद्ध, अपरिचित, गुंतागुंतीचे क्लिष्ट असे सांगू नये, अशी धारणा दिसते. किंबहुना महाभारताची कथा मुक्तेश्वरांना सांगाविशी वाटली, त्याच्या अनेक कारणांपैकी हेही एक कारण आहे. अलोकसामान्य वस्तू ग्रथित करताना कवीने लोकविदित पात्रांची योजना करावी. कारण त्यांच्या द्वारा अभिव्यक्त झालेल्या उदात्त भावांशी रसिकाचा चटकन हृदयसंवाद साधतो, असे अभिनवगुप्ताचे सांगणे आहे. त्यानुसार संभावनाविरह होऊ न देणारी महाभारतकथा मुक्तेश्वर सांगत आहेत.

[ ५ ] निःशंकतेचेच आणखी एक अंग म्हणजे प्रगटार्थाचा आग्रह. " प्रगटार्थ निरोपीं चतुरा ! " ( २।१७।१२ ) ही धृतराष्ट्राची विनवणी किंवा " कथासुधेचा विशदार्थ । रस अद्भुत निरोपी " ( १।१७।११ ) ही श्रोतृविनवणी पाहण्यासारखी आहे. " व्यास बोलिला गूढार्थ । म्यांही न बोलतां प्रगटार्थ । चतुर श्रोतियांचे चित्त । संतोषेल कैसेनि ? " ( २।३।५४ ) असा त्यांचा प्रश्न आहे. चतुर निवेदकाने गूढ बोलू नये, गूढार्थाची उकलण करणारा प्रकटार्थ सांगावा. जे गूढ असेल ते तळहातीच्या आवळ्या-सारखे आस्वादकाला दृष्टिगोचर व्हावे, असे त्यांना वाटते. मुक्तेश्वरांची ' भारतकथा ' कधी कधी ' भारथटीके 'चे वळण गिरवू लागते ते यामुळे.

[ ६ ] कवित्वात ' पांडित्य ' व ' चंडवक्तृत्व ' त्यांना अभिप्रेत ( १।२६।५९ ) आहे. महाभारतात थोड्या प्रतीत आढळणाऱ्या एका कौरवपांडवसंग्रामकथेचा परिचय " ते कथेची अभिनव गोडी " ( १।४१।१५० ) असा ते करून देतात. कथेतील अभिनवतेकडे, नवतेकडे मुक्तेश्वरांची दृष्टी आरंभापासून अशी खिळलेली आहे.

[ ७ ] शब्दांची अंगभूत समज मुक्तेश्वरांना आहे. " वर्णपंक्तीचें अबद्धाक्षर । शोधूनि खोडती अर्थज्ञ चतुर " ( १।२५।५७ ) याचे त्यांना भान आहे. अभिमन्युच्य

विवाहपत्रिकेचे वर्णन करताना " तळीं अभिप्राय सकळ । अक्षरीं गुंफिला अर्थ विमळ । जैसें पुष्प आणि परिमळ । द्वैतभाव नेणती " ( ४।८।१३ ) अशी शब्दार्थाच्या अभिन्नतेची व आशय-अभिव्यक्तीच्या अद्वैताची ग्वाही त्यांनी दिली आहे. " चातुर्थ-भरित । साहित्यशब्दीं प्रकटी अर्थ " ( १।२२।५१ ) असे गंगेच्या चतुर बोलण्याचे ते वर्णन करतात. अशा चमत्कृतिपूर्ण कल्पकतेला त्यांच्या वाङ्मयात स्थान आहे. वेचक शब्दांचा कल्पक व आशयोन्मुख वापरत ते करताना दिसतात.

[ ८ ] अलंकारविलासात व तज्जन्य कल्पनाविलासात कवितेचे सार्थक व साफल्य आहे, अशी एक जाणीव मुक्तेश्वरांनी प्रकट केली आहे. कृष्णरथ विस्तृत रूपकशैलीने वर्णून ते म्हणतात, " या वेगळी आगळी उपमा ? काय द्यावी कवीने ? " (२।५।११०) एका बाजूने हे समाधानाचे-तृप्तीचे उद्‌गार आहेत. दुसऱ्या बाजूने ' उपमे 'त–म्हणजे कल्पक अलंकारयोजनेत–काव्यकथनाची सफलता आहे, असे त्यातून ध्वनित होते. संवत्सरापर्यंत चाललेल्या राजसूयमहोत्सवाची " न्यून एकचि जो दृष्टांत द्यावया तेथें असे ना " ( २।९।१३९ ) अशी व्याजनिंदा त्यांनी केली आहे. वर्ण्यविषयाच्या आलंकारिक चित्रणाशिवाय त्याची अभिव्यक्ती पूर्ण होऊ शकत नाही, असा या व्याजनिंदेचा व्यत्ययास मांडता येण्यासारखा आहे. मुक्तेश्वरी लेखनातील अलंकारांची विविधता, वैपुल्य यादृष्टीने लक्षणीय आहे. अलंकारजन्य वर्णनविस्तार त्यात प्राचुर्याने आढळतो. दृष्टांतांच्या सरी, उपमांच्या माळा आणि रूपकांची कुसर त्यांच्या लेखनात आढळते त्यामागे अलंकार-सामर्थ्यावरील हा विश्वास असला पाहिजे.

[ ९ ] " ते कथेचा समारंभ । श्रवणदृष्टी विलोका " ( २।१२।२४७ ) " सांगता दृष्टी देखिजे चतुरीं " ( १।३१।१९७ ), " जें ऐकतां म्हणती नयन । प्रत्यक्ष आम्हीं देखिलें " ( २।४।३७ ) असे मुक्तेश्वर श्रोत्यांना सांगत असतात. त्याचे श्रोतेही " त्या म्यां प्रत्यक्ष देखिल्या नयनीं । ऐसी प्रचीती अवगमे " ( २।५।१२ ), " वाटे प्रत्यक्ष देखिलें दृष्टी " ( १।२१।३ ) अशी स्पष्ट कबुली देतात. श्रोत्यांच्या आस्वादक प्रतिक्रियांच्या द्वारे मुक्तेश्वर आपल्या कथेतील चित्रमयता निर्देशितात. श्रुतिनिष्ठ काव्य-कथेला दृश्यमूल्य देण्याचा त्यांचा मानस त्यातून स्पष्ट होतो. इंद्रियगोचरता हा काव्यकथेचा आवश्यक घटक आहे, अशी त्यांची धारणा दिसते. " अतिंद्रिय परि भोगविन इंद्रियांकरवी " ( ज्ञानदेवी ६।३६ ) ही कोणत्याही कवीची प्रतिज्ञाच असते. आणि तीच मुक्तेश्वर येथे बोलून दाखवीत आहेत. मुक्तेश्वरांची वर्णने वाचकाच्या डोळ्यापुढे हुबेहूब प्रसंगचित्रे उभी करणारी आहेत, त्याचे हे एक कारण आहे. त्यातील ऐंद्रिय उपमाने, त्यांनी येणारी संवेदनाप्रतीती, चित्रमयता आणि गोचरता यांचे बीज मुक्तेश्वरांना असलेल्या तद्विषयक जाणिवेत आहे.

[ १० ] द्रौपदीधाव्याचे " करुणातेजे अतितीक्ष्ण " व " सुशब्द राजहंसी " ( २।१५।१८१–१८२ ) असे वर्णन करून रसात्मकता व सौशब्द्य ही मूल्ये हे सुचवीत आहेत. याच्या शेजारी " जेणें वाढे उत्कट भक्ती । तो तो विशेष लिहिला ग्रंथीं "

( २।९।१६५ ) हे वचन ठेवून पाहण्यासारखे आहे. मध्ययुगीन काव्यदृष्टीत–विशेषतः ज्ञानदेवी, नामा–तुकयाची गाथा व महानुभावी वाङ्मयात—धर्ममूल्ये जाणता-अजाणता वाङ्मयीन मूल्यांशी संवादी व समांतर राहिली आहेत. त्याचेच हेही एक उदाहरण आहे. उत्कटता हे भक्तिक्षेत्रात माहात्म्य पावलेले मूल्य. पण भक्तिभावनेच्या चित्रणाचा हात धरून अन्य रसाविष्कारातही ही उत्कटता मुक्तेश्वरी कवितेत आली. उत्कटता हे केवळ भक्तिमूल्य म्हणून न राहता भावमूल्य म्हणूनही त्यांच्या वाङ्मयात प्रविष्ट झाले. तथापि उत्कटता ही मूळ अनुभवात असावी, अनुभव घेण्याच्या पद्धतीत मुद्दाम आणलेली नसावी, याचे भान मुक्तेश्वरी लेखनात सुटते. त्यामुळे पाहता पाहता त्यांच्या शृंगाराचे रूपांतर उत्तानतेत वा अश्लीलतेत होऊ लागते. वर्णनातील अतिरेक अनौचित्यात परिणत होतो आणि व्यक्तिस्वभावप्रसंग यांना तीव्र करणारा पीळ भरला जातो. पण जेव्हा हे भान सांभाळले जाते तेव्हा मुक्तेश्वरांची कविता काळजाचा ठाव घेणारा रसप्रपंच मांडते. प्रत्यक्ष आचारात कोठे असे उणे–अधिक झाले असेल पण काव्यविचारात उत्कटता–भावोत्कटता–हे मूल्य मुक्तेश्वरांना कोठे तरी जाणवले होते हे खास !

## ४. समारोप

कवीचा काव्यविषयक दृष्टिकोण त्याच्या कवितेत प्रत्यक्षाप्रत्यक्षरूपाने अभिव्यक्त झालेला असतो. त्याच्या अकलनाने त्याच्या काव्याकडे पाहण्याची एक दिशा उपलब्ध होत असते.

आपल्या कवित्वृत्तीची जाणीव मुक्तेश्वरांनी विनम्रतेने व कधी प्रतिभावंताच्या सहज आत्मविश्वासाने व्यक्त केली आहे. त्यांचे श्रोते आध्यत्मिक अधिकार असलेले चतुर आहेत. टीकाकारांचा निषेध करून या सात्विक श्रोत्यांची ते विनवणी करतात. निर्विघ्न मनाने श्रवणातुर झालेल्या या श्रोत्याने कल्पक संवेदनशीलतेने आणि सहानुभूतीने काव्य समजून घ्यावे अशी त्यांची अपेक्षा आहे. काव्य-रसिक श्रोता याचा पोष्य–पोषक भाव ते मानतात.

संसारविमोचन, भक्तिसाधना, ब्रह्मप्राप्ती, पावित्र्यप्रीती हे भारतरचनेचे उद्देश वैयक्तिक व सामाजिक पातळीवर त्यांनी ठेविले आहेत.

आपल्या भारताची अर्थघन रसमयता, निःशंक कथाकथनशैली श्रोत्यांना आनंदप्रद ठरेल असे सांगून त्यांनी आपल्या भारतरचनेचे वाङ्मयीन अंग आविष्कृत केले आहे. प्रतिभेचे देवदत्त रूप व आविष्कारातील सहजता ते सहेतुक निर्देशितात.

परंपरामान्य कथेचे कथन करावे. निःशंक पद्धतीच्या निवेदनशैलीने अर्थ प्रकट करावा. कथन स्वैर, उत्सूत्र नसावे. तर नेमके व आटोपशीर असावे. त्यात भावोत्कटता असावी. ती सौशब्द्य, अलंकारजन्य कल्पनाविलास यांच्या साहाय्याने दृष्टिगोचर होईल अशी मांडावी.

या काव्यदृष्टीने त्यांची काव्यसृष्टी काही अंशी नियत झाली आहे. त्यांचे महाभारत व्यासभारतावर आधारलेले आहे. कथेतील घटकांच्या संभाव्य व निःशंक जुळणीकडे ते अवधान पुरवितात. त्याचा कथाबंध बांधीव असतो. आलंकारिक कल्पनाविलास व चित्रवीण असलेली वर्णनशैली यामुळे त्यात उत्कट रसमयता अवतरते. उत्कटतेच्या कल्पनेने कधी अतिरेक, अनौचित्य व तीव्रता येते तर कधी रसप्रकर्ष होतो. श्रोत्यांची प्रकृती व काव्यप्रयोजन यामुळे त्यास भक्तीची बैठक मिळाली आहे. श्रोतृमानस ओळखून रचना केल्यामुळे लोकमानसावरील पारंपरिक संस्कार लक्षात घेतले जातात. अत्युक्ती, अद्‌भुतता, उत्तानता यांचा संबंध कविप्रकृतिप्रमाणे श्रोतृअनुनयाशी लाविता येईल. तथापि श्रोत्यांच्या विशिष्ट प्रकृतीमुळे त्यांची भारतरचना लोकप्रिय वळणाची होण्याऐवजी दर्जेदार झाली आहे.

मुक्तेश्वरांच्या काव्यदृष्टीचा त्यांच्या काव्यसृष्टीशी ताळा हा असा आहे.

□ □ □

# दोन ॥ कथाबंध

## १. कथाबंध : स्वरूपविवेचन

महाकाव्याच्या कथाबंधाचा फारसा विचार संस्कृत काव्यशास्त्रकारांनी केलेला नाही. रूद्रटाच्या मते ( काव्यालंकार ६।२–८ ) महाकाव्याचे कथानक उत्पाद्य म्हणजे स्वतंत्र वा कल्पित असू शकते. अनुत्पाद्य म्हणजे इतिहास–पुराणे या पारंपरिक सामग्रीवरही आधारलेले असू शकते. उत्पाद्य व अनुत्पाद्य अशीही कथानकाची संमिश्र प्रकृती त्याने वर्णिली आहे. महाकाव्याचे कथानक इतिवृत्तप्रधान असले तरी रसनिर्मितीसाठी आवश्यक वाटल्याने कवीने इतिहासात बदल करावा, असे आनंदवर्धनाचे ( ध्वन्यालोक ३।७ ) सांगणे आहे.

महाकाव्याला निश्चित कथावस्तू असते, असे पाश्चात्य समीक्षक मानतात. ही कथा पौराणिक किंवा ऐतिहासिक असावी. अशी पारंपरिक कथा राष्ट्रजीवनाच्या भूतकाळापासून वर्तमानकाळापर्यंत अखंडपणे संबद्ध असते. तीमुळे गतकाळाबरोबर वर्तमानही उजळतो. पात्रप्रसंगाच्या भव्याकृती सहजतेने साकारतात. त्यांना आपोआपच प्रतीकात्मता लाभते. सांस्कृतिक संचिताचे नवदर्शन घडते. वाचकाला अशी परंपरामान्य कथा परकी वाटत नाही आणि तिच्यातील नवार्थामुळे शिळीही वाटत नाही.

महाकाव्यातील कथानक भव्योदात्त व भारदस्त घटनांनी युक्त असते. त्यात कथोपकथांचे जाळे विणलेले असते. अनेकविध पात्र-प्रसंग, घटना, उक्ती-कृती, वृत्ती-प्रवृत्ती, खच्चून भरलेले तपशील यांना महाकाव्यात भरपूर अवसर असतो. कालतत्त्व, कार्यकारणभाव, कुतूहलनिर्मिती, आणि प्रमाणबद्धता या तत्त्वांनी त्याचा कथाबंध बांधलेला असतो. कथानकाच्या अनेकरंगी गोफामुळे त्यातील अनुभवांचे आकार अधिक भरीव व ठोसर होतात. त्यामुळे महाकाव्याची कथा हे एक मोठेच आकर्षण असते.

## २. मुक्तेश्वरांनी भारतकथेला दिलेले स्वकालोचित परिमाण

पुराणकथेचा वाच्यार्थ सर्वपरिचित असतो पण तिचा ध्वन्यर्थ मात्र वेगवेगळा संभवू शकतो. तिच्या रूपाने जेव्हा सखोल व व्यामिश्र जीवनानुभव सामोरे ठाकतात तेव्हा संवेदनशील मनाच्या तारा नाना प्रकारांनी छेडल्या जाऊन त्यातून अनेक वलये–आंदोलने निर्माण होतात. महाभारतातील अनुभवांची जात या प्रकारची असल्याने त्याच्या पहाडी प्रस्तरावर लहानमोठी शिल्पे खोदली गेली. मुक्तेश्वरी भारत हे एक असेच भव्य शिल्प आहे. पुराणप्रसिद्ध कथावस्तूच्या आधारे जन्म घेणारी अशी कलाकृती कला-

निर्मात्याची अनेक अंगांनी कसोटी पाहत असते. अंतर्भेदी जीवनदृष्टी, वैचारिक प्रगल्भता, विदग्ध रसिकता, तल्लख कल्पनाशक्ती, रचनेचा साक्षेप अशा गुणांच्या संनिवेशाशिवाय तिची रूपसिद्धी होऊ शकत नाही.

गतकालीन कथावस्तूंस स्वकालोचित नवा आशय देऊन महाकवी सांस्कृतिक संचितास उजाळा देत असतो. आपल्या युगमानसाच्या नेणिवेतील आध्यात्मिक आशयाचा स्वीकार करून तो त्यावर आपल्या अलौकिक प्रतिभेचे संस्करण करीत असतो तद्द्वारे आपल्या प्रतीत झालेल्या जीवनार्थाचे प्रतीकात्मक चित्रण तो करतो. अशा मूल्यात्मक नात्याच्या माध्यमाने पुराणकथा ललित साहित्यात अवतरत असते. गतकाळ व स्वकाळ, पुरातनाचे अभिमंत्रित सामर्थ्य व त्याला नवार्थाने उजळून टाकणारी नवता यांचा परस्परपूरक ताळमेळ साधीत मुक्तेश्वरांनी आपले भारत घडविले आहे. भारतकथेला त्यांनी दिलेले स्वकालोचित परिमाण येथे थोडक्यात स्पष्ट करावयाचे आहे.

## २.१ ईश्वरी योजनेचे सूत्र

मुक्तेश्वरांच्या जीवनदृष्टीत ईश्वर हे सर्वोच्च मूल्य आहे. " ईश्वर कर्ता " ( १।२६।९८) " ईश्वरइच्छेने घडे सकळ " ( ४।७।८ ) अशी त्यांची श्रद्धा आहे. " करूं नये तें कर्म करणें । सृष्टीवर्जित राहाटणें । तेचि तुझी अवज्ञा जाणें । वेदवचन यथार्थ " ( ४।१।७३ ) असा त्यांचा धर्मराज दुर्गास्तवन करताना म्हणतो. निसर्ग-नियमाविरुद्ध वागणे म्हणजे ईश्वराची अवज्ञा, अशी कल्पना त्यातून प्रकटली आहे. " अन्यायवर्ती तया बाधू । ईश्वराचे करी प्रयत्नें " ( ४।३।४० ) असा ईश्वर या आज्ञाभंगाचे प्रायश्चित देत असतो. म्हणून " ईश्वरइच्छेचा विचित्र खेळ । मान्यें दृष्टी पहावा " ( ४।५।३१ ) एवढेच माणसाच्या हाती आहे. माणसाचे जीवन असे ईश्वरनियंत्रित असल्याचे मुक्तेश्वर मानतात. त्यामुळे त्यांची भारतकथाही ईश्वरी लीलानाट्य ठरते.

मुक्तेश्वरी भारतात ईश्वर कृष्णरूपाने अवतरला आहे. त्यामुळे मुळातील दोन राजकुळांच्या संघर्षाची ही कथा कृष्णाभोवती केंद्रित होते. कर्तुमअकर्तुम अशा ईश्वरी शक्ती दुष्टदलनार्थ आणि साधुरक्षणार्थ कृष्णरूपाने अवतीर्ण होते. ती सत्पक्षाचा कैवार घेऊन दुर्जनांचा संहार करते असा भारतकथेचा अन्वयार्थ[1] मुक्तेश्वरांनी लाविलेला आहे.

---

१. देवाधिदेव सनातन । जो मायातीत शुद्ध चैतन्य
तो अदिपरमात्मा नारायण । श्रीकृष्णरूपें अवतरला ॥ १५५ ॥
कर्ता हर्ता भर्ता गोप्ता । सर्वी सर्वत्र जयाची सत्ता
साकारला देवकार्यार्था । यादवकुळीं कुळमणि ॥ १५६ ॥
पांडव यादव लोहकुऱ्हाडी । धरूनि स्वशक्तिसत्ता प्रौढी
कौरवअसुरतरूंच्या पेंढी । निर्मूळ केल्या भूतळीं ॥ १५७ ॥—आदि. अ. १४

या ईश्वरीसूत्रामुळे मुक्तेश्वरांच्या भारतकथेचे स्वरूप बदलते. अनुद्युताचे आमंत्रण स्वीकारताना त्यांचा धर्म उद्गारतो—

धर्मराज पावला खुणे । म्हणे, ‘ ईश्वराचें ईश्वर जाणे
ज्यालागीं मनुष्यलोका येणें । देह धरणें कुरूकुळी ॥ २८ ॥
उतरावया भूभारातें । अवतार धरिला श्रीकृष्णनाथें
ते कार्य पांडवांचेनि हातें । संपादिलें पाहिजे ॥ २९ ॥
यास कारण कपटद्यूत । वैर तुटोनि सांधलें त्वरित
नेघें म्हणतां न सुटत । जें कां विधीनें लिहिलेंसें ॥ ३० ॥—सभा अ. १६

धर्मराजाच्या या उद्गारात भारती कथासंबंधातील क्रियाप्रेरक घटकांची मुक्तेश्वरी मांडणी स्पष्ट झाली आहे. कृष्ण ईश्वरावतार. भूभार उतरविणे हे त्याचे प्रयोजन. कुरूकुळात पांडवांनी मनुष्यजन्म घेतला तो भगवंतास साहाय्य करण्यासाठी. त्या भावी संहाराचे निमित्त म्हणजे प्राप्त कपटद्यूत. ते टाळण्याचा प्रयत्न केला तरी ईश्वरी योजना तशी असल्याने या गोष्टी घडणारच. मुक्तेश्वर भारतकथेची संगती तशी लावतात.

त्यामुळे महाभारतातील कौरवपांडव-संघर्षामागे कृष्णाची ईश्वरी प्रेरणा मुक्तेश्वरांनी जागोजाग उभी केली आहे. महाभारतात ( २।७१।३० ) दुर्योधनापराध व भीमार्जुन-प्रताप ही कौरवविनाशाची कारणे निर्दिष्ट केली आहेत. मुक्तेश्वरांनी त्यामागे “ श्रीकृष्ण-मूर्तीचा साक्षेप ” ( २।१७।३० ) आवर्जून उल्लेखिला आहे. जतुगृहातून सुटका, द्रौपदी-स्वयंवर, इंद्रप्रस्थ-उभारणी, खांडवदहन या साऱ्या घटनांमागे कृष्णाची प्रेरणा असल्याचे ते दाखवितात. त्यामुळे आदिपर्वाच्या चौकटीत मुळापेक्षा किती तरी अधिक स्थान कृष्णाला लाभते. सभापर्वात तर त्याचा प्रभाव सर्वदूर आहे. मयसभासिद्धी, जरासंध–शिशुपाल वध, राजसूय व वस्त्रहरणप्रसंगी द्रौपदी लज्जारक्षण आणि अनुद्यूत या सर्व घटनांमागे कृष्णच आहे. वनपर्वात सौभोपाख्यान व दुर्वासभोजन विस्ताराने रंगवून कृष्णाला ठसठशीत करण्याचा प्रयत्न आहे. विराटात तसा वाव नसूनही भक्तांच्या कृष्णस्मरणातून व विवाहप्रसंगीच्या आगमनातून कृष्णदर्शन घडविले आहे. सौप्तिकात मूलानुसारच कृष्णाला महत्त्वपूर्ण स्थान लाभते. “ कृष्णकौतुक विलोका ” (२।१५।४१) या भावनेनेच मुक्तेश्वर भारतकथा सांगत आहेत. त्यांचे भारत म्हणजे कृष्णकौतुकच आहे.

महाभारतातील पांडवसखा कृष्ण येथे देव बनल्याने त्याच्यात व पांडवांत जे अंतर निर्माण झाले ते भरून काढण्यासाठी पांडवांना देवभक्ताच्या रूपात चितारण्यात आले आहे. त्यामुळे कृष्ण पांडवांच्या जरासंध, शिशुपाल, अश्वत्थामा, कौरवादी विरोधकांना साहजिकच देवद्रोह्याचा रंग चढला आहे. या बदलत्या जीवनदृष्टीमुळे भारतकथेला भक्त-अभक्तांच्या संघर्षाचे रूप येते व कृष्णदेवाला सर्वशक्तिमान नियंत्रकाचे स्थान प्राप्त होते. “ श्रीकृष्णमूर्तीची नाटकें । गुप्त प्रगट परियेसा ” ( २।५। १७४ ) असेच मुक्तेश्वर म्हणत आहेत. अशा प्रकारे महाभारत ही कौरव-पांडवांची संघर्षकथा येथे लीलाविग्रही भगवंताची अवतारलीला ठरली आहे.

## २·२. काळ–कर्म आणि दैव यांची अटळ छाया

मुक्तेश्वरी भारत हे कृष्णाचे ईश्वरी लीलानाट्य असल्याने त्यात एक प्रकारचे पूर्व-नियोजन येते. ईश्वरी योजनेची प्रत्यक्ष कार्यवाही यंत्रणा म्हणून दैव व काळ त्यांच्या भारतात येतात. ईश्वरी इच्छेने प्रारब्ध घडते आणि काळाप्रमाणे त्याचे फळ प्राप्त होते. काळ, कर्म आणि ईश्वर हे मानवी जीवनाला आकार देतात,[२] अशी त्यांची श्रद्धा आहे. धर्मासारख्या पुण्यवंतास कष्ट का, याचे व्यासमुखाने स्वतंत्र उत्तर देताना मुक्तेश्वर प्रारब्धाचाच हवाला देतात. "विचारे पाहता न मिळे साक्षी । म्हणोनि मिळिजे प्रारब्धपक्षीं । जैसा समुद्रीं भ्रमोनी पक्षी । नौकास्तंभीं आरूढे" (२।१२।१५) मानवी जीवनाची ही तर्कहीन, अज्ञेय पण दैवनियत गती मुक्तेश्वर महाभारतात शोधतात आणि वारंवार तिचे भान करून देतात. अकारण भोगाव्या लागणाऱ्या दुःखावरचा उतारा कोणत्याही चिंतनशील माणसाला शोधावा लागतो. मुक्तेश्वरांनी तो काळ, कर्मयोग आणि प्रारब्ध यांच्या रूपाने शोधला आहे. त्यामुळे भारती पात्र घटनांवर प्रारब्धाची अटळ छाया ते पुरेपूर गांभीर्याने पसरून देतात.

ललाटीच्या ब्रह्मलिखिता । कोण भंगी सांग पां" (१।४२।९४) या कल्पनेने पाच पतींशी द्रौपदीचा विवाह होतो. जरासंधासारख्या बलाढ्या शत्रूशी संघर्षाला उभे ठाकताना "प्रारब्धयोगे घडेल योग" (२।६।७०) असा त्यांचा कृष्णही म्हणतो. सभापर्वाच्या शोकान्त अखेरीवर प्रारब्धाची घनदाट छाया आहे. व्यासभविष्यकथनात तिची पहिली चुणूक मिळते. विषादग्रस्त दुर्योधनाच्या शकुनीकृत समजावणीत "भागधेयानि हि स्वानि पाण्डवा भुञ्जते सदा" (२।४४।१) या वाचनाचा विस्तार अदृष्टपूर्वपुण्याच्या उहापोहाने मुक्तेश्वर करतात. दैवाची दुर्निवारता भीष्म व विदुर जाणतात आणि "होईल ते पाहिजे दृष्टी" (२।१३।३६) अशी भूमिका घेतात. त्याच जाणिवेने कर्तव्य करीत असताना दैवभोगांना सामोरे जाण्याचा सल्ला कुंती पांडवांना देते. "प्राप्त झालिया कळिकाळ । पुण्य निर्बळ पाप सबळ । विदुर हेळोनि खळ । द्यूत बळें मांडिलें" (२।१४।२४) अशी द्यूतामागील कालनियतता मुक्तेश्वरांनी वर्णिली आहे. विष्णुमाया, विनाशकाळीची विषमवेळ की दुष्टकर्माचे फळ, अशी ते द्यूतकार धर्माची मनोचिकित्सा करतात. (२।१४।८७). पुत्रांना पणाला लावण्याच्या त्याच्या अधःपाताचे "विपरित काळ नव्हाळी । बळें घडवी न घडे तें" (२।१४।१४५) असे ते आश्चर्यसूचक पण दैवाधिष्ठित वर्णन करतात. "टाकूनि आलें जें कपाळें । भोगिल्यावीण सुटेना" (२।१५।३१) असा त्यांचा दुःशासन द्रौपदीला बजावतो. त्यांची द्रौपदीही आपल्या

---

२. ईश्वरप्रभूचिये घरीं । प्रारब्ध नेमिलें लेखाकरीं
काळ कृषीवळ निर्धारीं । देववील तयातें ॥ १५ ॥
जें जें घडे जियेकाळीं । तें तें मानें घेइजे मौळीं
भोगविते तिघे बळी । काळ कर्म ईश्वरू ॥ १७ ॥ — विराट. अ. ७

प्रश्नाचे स्पष्ट उत्तर द्यावे मग " पुढें होणार होतसे " अशी दैवनिर्भर होते. त्यांचा धर्मही याच दैवनिर्भरतेने अनुद्यूताला परततो. " होणार ओढवलें तें मोडे । हे अघटीत सर्वथा " ( २।१६।२२ ), " नेवें म्हणतां न सुटत । जें की विधीनें लिहिलेंसे " ( २।१६।३० ), " होणार पातले बळिवंत । तेंचि आतां होतसे " ( २।१६।३८ ) हे धर्माचे उद्‌गार त्याच्या दैवस्थित मनाचे साक्षी आहेत. उर्वशीशापाने व्याकुळ झालेल्या अर्जुनाचे इंद्र प्रारब्धकल्पनेनेच सांत्वन ( ३।५।६५-६७ ) करतो. जटासुर पळतो त्याच मार्गाने भीम येत असतो ही मुक्तेश्वरांना " विचित्र प्रारब्धाची गती " ( ३।१०।१२ ) वाटते. पांडवांसारख्या राजपुरुषांना विराटगृही सेवकभावाने रहावे लागते ही " विषमकाळाची विचित्र गती " ( ४।१।१२४ ). अशा वेळी " इच्छावें तें सहसा न घडे । न घडावें तें अंगा जडे । कर्मभोगाचें कुवाडें । कोणा नुगवे सर्वथा " ( ४।५।३२ ) हे जीवनाचे स्वरूप जाणून प्राप्तव्याचा स्वीकार करणे एवढेच हाती उरते. " जे जैसीं कर्में करिती । तैसे पावती फळभोग " ( ४।३।६० ) या विश्वासामुळे सौप्तिकातील भीषण संहारानंतर " पूर्वप्राक्तनाचे प्रवाहीं । निश्चयें विश्व बुडालें पाहीं " ( १०।१।१३ ) असा गंभीर जीवनार्थ त्यांना जाणवतो.

भारतकथेतील घटितांचे मुक्तेश्वरी आकलन दैवप्रधान आहे. त्यांची पात्रें दैवनिर्भर आहेत. दैवविश्वस्त आहेत. घडणाऱ्या घटनांची कालनियतता व कर्मभोगाची अपरिहार्यता जाणून ती शांतपणे प्राप्तव्याला सामोरी जातात. पात्र-प्रसंगांच्या चित्रणात प्रारब्धाचे घनदाट सावट मुक्तेश्वरांनी पुऱ्या गांभीर्याने पसरून दिले आहे. मानवी जीवनाला आकार देणाऱ्या काळ, कर्म व प्रारब्ध या महातत्त्वांनी त्यांच्या भारतातील जीवनचित्राला घाट दिला आहे.

वर्णाश्रमनिष्ठ समाजरचना, कृषिप्रधान समाजातील आर्थिक दौर्बल्य आणि परकीय राजवटीने कुंठित झालेला पराक्रम, अशा काळात " ठेविले अनंते तैसेचि रहावे । चित्ती असों द्यावे समाधान " एवढेच सांगणे शक्य होते. मुक्तेश्वरांचे जीवनानुभव व जीवनदृष्टी या वातावरणातच घडली. स्थितिशील जीवनाच्या मर्यादांनी बांधलेला दैववाद ही मुक्तेश्वरकालीन समाजाची मनोधारणा त्यांच्या भारतात—मुळात अस्पष्ट असतानाही—अशा ठसठशीतपणे प्रकटली आहे. ती त्यांच्या कथाबंधाला वेगळेपणा देऊन जाते.

## २.३. मूल्यात्मकतेचे परिमाण

ईश्वर, प्रारब्ध, कर्म, आणि काळ या महातत्त्वांनी माणसाच्या जीवनाचा पट आखला जात असेल तर माणसाचे संकल्प, प्रयत्न, धर्म व सदाचार यांचे या मूल्यव्यूहात कोणते स्थान आहे ? या प्रश्नाच्या उत्तरासाठी मुक्तेश्वरांनी अनेकांगी मूल्यविचार केला असून तो त्यांच्या भारतातील पात्र-प्रसंगात बेमालूमपणे गुंफला आहे. " बरवे करितां न पवे बरवे । अधर्म केल्यानें कैवीं पावें ? ( ३।२।६ ) सत्कृत्याच्या फळाची निश्चिती

नसलेल्या या जगात अधर्माने काय बरे मिळणार ? म्हणून नेहमी सद्धर्माची कास धरावी. "स्वप्नप्राय संसार क्षणिक । धर्म तोचि सत्य एक" ( ३।१७।१७ ) असा धर्म तेवढा सत्य जाणावा. हे ज्ञान संसारभ्रमाचा नाश करते ( ३।१।३८ ). ज्ञान-दंडानेच दुःखभोगामुळे होणारा मनीचा संताप दंडावा ( १०।१।११२ ). उत्तम सन्मार्गाने वर्तावे ( ३।१२।२० ), आत्मस्वरूपी स्थित रहावे ( ३।१३।१२७ ) आणि प्रारब्धाचा शांत स्वीकार करावा. पण प्रारब्ध ओढवणार म्हणून प्रयत्न टाळणे त्यांना बुद्धिमंदाचे लक्षण वाटते ( २।१२।२५ ). "अनित्य संसारीं कौतुक । करूनी जाती दादुले" ( ३।१।४० ) असे काही 'दादुले' असतातच. कर्मार्पण–चित्तशुद्धी –वैराग्यशांती–अचलज्ञान–कैवल्यनिधान हा ब्रह्मप्राप्तीचा सोपान त्यांना साध्य असतो ( ३।१३।१२३–१२४ ). सत्यनिष्ठा–ईश्वरकृपा ( ३।४।७० ) या मार्गानेही ते पूर्णकाम होतात. सुकृताने अरिष्टाचे निवारण होते ( ३।१६।३५ ). अभाग्यभाग्याची आभाळे येत जात असली तरी निश्चयाचा ध्रुव अढळ असला पाहिजे ( ३।१६।३० ). भावबळाने ईश्वरालाच आपलेसे करता येते ( १।३०।१७९ ). भक्ताच्या साहाय्यार्थ धावणारा ईश्वर "नाही भक्ताच्या प्रारब्धीं । तरी जवें निर्मुनी देतो सिद्धी" ( ३।११।११३ ). अशी ईशकृपा झाली म्हणजे प्रारब्धावरही मात करता येते. ईश्वर, प्रारब्ध, काळ, कर्म यांनी बद्ध झालेले मानवी जीवन अशा अनेक वाटांनी मुक्त होऊ शकते. या वाटांचे दिग्दर्शन आपल्या पात्रांचे जीवनचरित्र करताना मुक्तेश्वरांनी अनेकांगी मूल्यविचारांने[२] केले आहे.

---

२. नमुन्यादाखल पुढील स्थळे पहावी— **दैव-प्रयत्न** १०।अ·१. **सत्य** १।३।२२-२६, १।११।१४५–१५०, १।१६।१८२–१९१, १।२४।५–१०, २।१५।६१, ६९,७१, ३।४।९–१५,७०. **ज्ञान** ३।१।३४–४०. **विवेक - स्वयंनिर्णय** १।१६।१०–११. **दया** १।३।७५–७९. **परोपकार** १।३।६१–६९, १।३८।६१–६५, ३।१३।८६–१२७. **कृतज्ञता** १।३६।११६–१२३. **मैत्री** १।३०।८४–९२. **सत्संगती** ३।१।२२–२५. **क्रोध** १।१८।६४–६५. **पाप** १।११।२२–२६. **राजनीती** १।७।९५–१०३, १।४४।८ ४९, २।५।१६४–१६९, २।६।६९–७०, २।१६।२०, २।१२।११०–११५,१२२,१२७. क्षात्रधर्म २।५।२७–३४, ३।१३।८, १।अ·३४ ( कणिकनीती ). २।अ.३ ( नारदनीती ), ४।१।२६–४२ ( सेवकनीती ). **व्यवहारधर्म**–आदर्श संबंध १।२।५९–६८. दारिद्र्यनिषेध १।८।३५–३९. लौकिक सुख १।१६।१३०. निंदक १।१६।१६६–१७६. कुटुंबनीती १।१६।६९–८०, २।१५।३०, २।१६।९६,१००. पितृभक्ती १।२३।६७–७३. सदाचार १।७।९५–१०३, २।५।६९–९१. २।६।१०–१२. २।१२।२४–२९, २।१३।३५,५१–५४, ६१. धर्म व व्यवहार यांचा विवेक ३।४।३५–५८. **व्यवहारसूत्रें** १।४।६३–६६, १।९।२२,२३, १।११।१०८–

या सर्वांत आध्यात्म वा भक्ती अग्रस्थानी आहे. दैवदत्त दुःखभोग ईश्वरनिष्ठेच्या बळावर सोसता येतात, त्यातून उत्तीर्ण होता येते, असे मुक्तेश्वरांना वाटते, जीवित्वाभिमान मिथ्या मानून, स्वरूपी अनुसंधान ठेवून वागल्यास सुखदु खाचा वारा लागत नाही ( २।१२।१६-१७ ) असे त्यांनी व्यासमुखाने सांगितले आहे. ईश्वराचे स्वरूप, भावबळाची महती, नामस्मरणाचे महिमान, भक्ताची आर्तता आणि देवाची भक्तवत्सलता ते परोपरीने वर्णितात. हा ईश्वर कृष्णरूपाने सगुण साकार होऊन त्यांच्या भारतात अवतरत असल्याने भक्तीला आपोआपच आलंबन विभाव लाभतो. कृष्ण केंद्रवर्ती असल्याने अन्य पात्रे त्याच्याशी भक्तीच्या धाग्याने जोडली जातात. भक्तीला अवसर देणारी प्रसंगचित्रे मुक्तेश्वरांनी समरसून रंगविली आहेत. त्यातून त्यांच्या भक्तहृदयाचे उभड उचंबळत आहेत. त्यांच्या अलंकारसृष्टीत आध्यत्मिक उपमाने पुष्कळच आहेत. ती बहुंशी स्वतंत्र असून अनेकानेक विषयांच्या सांगाती पर्जन्यसरींसारखी कोसळत असतात. मुक्तेश्वरांच्या भक्तहृदयाच्या त्या भावमुद्राच आहेत. त्यांची प्रगल्भ आध्यात्मदृष्टी त्यातून आकारते. ती उचंबळून येण्याइतकी भावशील आहे, मर्म जाणण्याइतकी ज्ञानशील आहे आणि इतरांना संस्कारित करण्याइतकी देखणी आहे.

भक्तिप्रधान जीवनाच्या निमित्ताने आचारधर्माचा विचार मुक्तेश्वरी भारतात येतो. सत्य, ज्ञान, दान, दया, परोपकार, कृतज्ञता, सत्संगती, मैत्री, विवेक अशा मूल्यांचा नेमका विचार त्यात आहे. अलौकिक आणि लौकिक, व्यक्तिगत आणि सामाजिक अशा विविध पातळ्यांवर तो प्रकटला आहे. मूल्यानुरोधाने त्यांनी केलेल्या राजनीतिविचारातून स्वराज्याच्या उषःकालाची मध्ययुगाची राजकीय स्वप्ने समकालीन श्रद्धानिष्ठांसह आविष्कृत झाली आहेत. कुटुंबनीतीसह समाजिक सदाचाराचे दिग्दर्शन प्रसंगानुरोधाने त्यांनी केले आहे. अन्य मध्ययुगीन कवींप्रमाणे समोरच्या श्रोत्यांपुढे जीवनाच्या विविधांगाची आदर्श चित्रे उभी करणे मुक्तेश्वरांना आवडते.

---

१।१, १।१५।१०२, १।१७।१७–२७, १।१९।७३, १।२०।१६–१८, १।२९। ११७–१२१, १।३५।१२३–१२९, ४।३।४–६. **भक्ती अध्यात्म**-देवस्तवने –इंद्र १।२।१२५–१३३. अग्नी १।५०।५७–७६, २।८।१०७–११४ सूर्य ३।१। ४१–४९. शिव ३।४।१३४–१३९, १०।२।२२–२४. दुर्गा ४।१।६७–८१. द्रौपदी धावा २।१५।११९–१६२, ३।११।५४–९४. ब्राह्मणमहिमा १।५।७२–७७, १।८। ७०–७७, १।९।२९–३५, ३।४।१८–३०. ईशरूप १।१६।१२१, २।८।११२, २।१२।२१,३५, ३९–४१, २।१३।५७,५९, २।१५।१२१, १८८, १९३–१९५. गुरू १।१७।१७–२७, १।३०।२९–३५. भावनिष्ठा १।३०।१७९. मुमुक्षुची तगमग १।७।११९–१३४. तत्कालीन धर्मसमजुती व धर्मसाधने १।८।२१, १।अ·२० पूर्ण. इत्यादी.

हा भाग मुख्यतः वैचारिक पातळीवर आविष्कृत होतो. तथापि तो चटकन लक्षात येईल अशा स्वतंत्र पद्धतीने येत नाही. तो मुळाचा आधार घेत, प्रसंगानुरोधाने व विविध व्यक्तींच्या संभाषणाच्या ओघात चतुराईने गुंफला जातो. कधी हे आध्यात्मिक व नैतिक विचार मुक्तेश्वर सूत्ररूपाने कथा-प्रसंगात विखरून देतात. पात्रांच्या बोलण्याच्या ओघात, आशयाशी सुसंगत अशा पद्धतीने ही सुभाषितात्मक रचना येते. राजसूयमंत्र-समयी "इंद्रियभ्रष्टाचा आचार । धनलुब्धाचा तत्त्वविचार । दरिद्रियाचा अत्यादर । विश्रांती नेदी श्रांतातें" (२।५।६१) हे धर्माने मांडलेले मार्मिक निरीक्षण किंवा हस्तिनापुर भेटीचे आमंत्रण देताना "गेले हृदयीं नाठवावें। केलें मुखीं न बोलावें। सत्य सर्वथा न सांडावें। साधुवर्तन या नांवें" (२।१३।६१) हे विदुराने साधुवर्तनाचे केलेले स्पष्टीकरण, ही त्याची काही उदाहरणे. ही सुभाषिते मुक्तेश्वरांच्या विचारवैभवाची साक्ष देत असून सूत्रमयता, नेमकेपणा आणि अल्पाक्षर बह्वर्थकता या वाङ्मयगुणांचा प्रत्यय देत आहेत. ती विखुरलेली असल्याने विचारजडत्व न येता संथपणे व नकळत संस्कार मात्र होत राहतात.

मुक्तेश्वरांनी या मूल्यविचारांची ठिगळे आपल्या भारतास जोडली नसून त्यातील व्यक्तींच्या कृतीउक्तीत त्याचे धागे गोवून दिले आहेत. पित्राज्ञापालनासाठी धर्म राजसूयास प्रवृत्त होतो. पित्राज्ञा अनुल्लंघ्य म्हणून तो हस्तिनापुरी जातो व पुन्हा अनुद्यूताचे आमंत्रण स्वीकारतो. या दोन्ही प्रसंगी सत्यनिष्ठा व ईश्वरनिष्ठा यांच्या बळावर तो दैवदत्त दुःखभोगांना असीम सहनशीलतेने सामोरा जातो. म्हणून कृष्णाची ईश्वरी कृपा त्याला तारते. या साऱ्या प्रसंगात त्याचे बंधु बंधुनिष्ठेने वागतात. ज्येष्ठांची अमर्यादा केली म्हणून शिशुपाल मरतो. क्षत्रियांच्या राजनीतीचा भंग केला म्हणून जरासंधाला मरण पत्करावे लागते. कुटुंबनीतीच्या मर्यादा ओलांडून दुर्योधन कपटी राजनीतीने पांडवांचा विनाश घडवितो आणि निजपुत्राची माया धरून धर्ममार्गी चळल्यामुळे (२।१७।५६) धृतराष्ट्र त्यास संमती देतो. प्रतिनायकांचे वर्तन मूल्यभंग करणारे असल्याने विजयाच्या शिखरावरही ते विषण्ण आहेत. याउलट मूल्यनिष्ठेमुळे नायक दुःखातही ईशकृपेला पात्र ठरतात. त्यामुळे मुक्तेश्वरांचा मूल्यविचार त्यांच्या भारताचा अविभाज्य भाग ठरतो.

आपल्या भारताच्या या मूल्यगर्भ मांडणीची मुक्तेश्वरांना जाणीव आहे.[४] त्यांची सुढाळ वाणी परमार्थचंपकाच्या सुमनांनी डवरून आली आहे. कथासंदर्भात गोवलेली

---

४. अ. तैसा श्रवणीं पडतां शब्द । अर्थगर्भ वाढे विशद
प्रतिफळीं प्रसवे बोध । सिंधु जैसा लक्ष्मीतें ।। १.१३.१९.

ब. बोधसुधेचा सुधेंद्र । जीवन जिज्ञासाचकोरां ।। १.१.७८.

क. भारतकथा अमृतवल्ली । श्रवणमंडपी नवरस फुलीं
फुलोनि मोक्षसुखाचे फळीं । लवोनि आली फळभारें ।। १.२८.१२४.

चर्चा–संवादातून विकसित होणारी, तत्त्वप्रतिपादक आख्यानातून सुचविलेली प्रपंच-परमार्थाची मूल्यचर्चा मुक्तेश्वरी भारताचे वैभव आहे. ठसठशीतपणा, सुभाषितात्मकता, सूत्रमय वचने, मार्मिक निरीक्षणे, मानवी स्वभावाचे सूक्ष्म ज्ञान, मनोवगाहनकुशलता व विविध जीवनमूल्यांची अर्थपूर्ण संगती त्यातून प्रकटली आहे. बाह्यावडंबरी साधनांपेक्षा अंतःप्रमाण व चित्तशुद्धी यांच्या बाजूने मुक्तेश्वर नेहमीच उभे आहेत. मध्ययुगीन कर्त्यांचा लोकशिक्षकी बाणा म्हणून या मूल्यविचाराकडे पाहणे मर्यादित व एकांगी होईल. ही मूल्ये अनुषंगाने त्यांच्या भारतात येतात असे नसून त्यांची पात्रे विविध प्रसंगात मूल्यनिष्ठा जपण्याचा प्रयत्न करतात. त्यांचा मूल्यविचार त्यांच्या भारताच्या प्रकृतीशी एकजीव झालेला आहे. त्यामुळे त्यास वैचारिकतेबरोबर भावनात्मकतेचेही परिमाण प्राप्त होते. मुक्तेश्वरी भारताचा रसिकमनावर उमटणारा ठसा असा मूल्यविशिष्ट असतो.

या विविध मूल्यांची मुक्तेश्वरांनी आपल्या मनाशी लावलेली संगती त्यांच्या भारतातील केंद्रीय जीवनवृत्तीचे दर्शन घडविते. महाभारतकथेतील गतकाळ व स्वकाळ यांना या मूल्यात्मक नात्याने मुक्तेश्वरांनी बांधले आहे. त्यामुळे भारतकथेला नवार्थ देण्यात ते यशस्वी ठरले आहेत.

## ३. मुक्तेश्वरी भारताचा कथाबंध

### ३·१ व्यापक सलगता

समग्र महाभारत अठरा पर्वांत विभागलेले आहे. अशा पर्वांतर्गत कथेला दोन पातळ्यांवरील सलगता असते. प्रत्येक पर्वाला स्वतःची एक स्वयंपूर्णता असते. अशी सर्व पर्वे मिळून महाकाव्याची स्वयंपूर्ण, भव्य व अनेकांगी कथावस्तू आकाराला येते. एका जागेवरून दृष्टिपथात येणारे नदीचे पात्र ज्याप्रमाणे संपूर्ण नदीचा भाग असते त्याप्रमाणे प्रत्येक पर्व महाकाव्याच्या प्रदीर्घ कथाप्रवाहाचा भाग असते. त्याच्या मागच्या-पुढच्या प्रवाहाचे प्रत्यक्ष दर्शन होत नसले तरी त्याची जाणीव मात्र होते. आदिपर्वात भारतकथा सुरू होते आणि खांडववनातील अग्नि ज्वाळांजवळ थांबते. आदिपर्वाच्या अखेरी धडाडून पेटलेल्या या ज्वाला सभापर्वाच्या आरंभी विझताना दिसतात. खांडव-दहनाचे रौद्र-भीषण व वीर-करुण चित्र दोन पर्वांत विभागून महाभारतकारांनी त्यांच्यात एक सलगता निर्माण केली. सभापर्वाच्या अखेरी वनाभिगमन करणारे पांडव वनपर्वारंभी वनात वटवृक्षाखाली थांबलेले दिसतात. वनाभिगमनाचा करुण प्रसंग खंडित करून व्यासांनी सभापर्व आणि वनपर्व यांना सांधले आहे. वनपर्वाच्या अखेरी अज्ञातवासाविषयीचा पांडवांचा विचार विराटपर्वाच्या आरंभीही चालूच आहे. एक भावक्षोभक प्रसंग दोन पर्वांमध्ये विभागून नाट्य व औत्सुक्य निर्माण करीत त्यांना सांधणारी व्यापक सलगता व्यास साधताना दिसतात. याबाबतीत मूलानुसरणामुळे आदि-सभा-वन-विराट या मुक्तेश्वरी पर्वांनाही ती लाभली आहे. सौतिकाच्या सुट्या भागामुळे ती पुढे खंडित होते.

मुक्तेश्वरी पर्वांचे आरंभ-अखेरीचे धागे असे मागच्या-पुढच्या पर्वात गुंफलेले असतात. या पर्वांतर्गत कथाभागालाही एक अंतर्गत स्वयंपूर्णता असते. मुक्तेश्वरांनी ती कशी साधली ते पहावयास हवे.

## ३. २. आदिपर्व

**आदिपर्वाचे प्रकृतिविशेष व मुक्तेश्वरी आकलन.** आदिपर्व हे महाभारताचे प्रारंभपर्व आहे. कौरव–पांडवांच्या मध्यवर्ती कथेची पार्श्वभूमी त्यात विस्ताराने उभारली आहे. कौरव–पांडवांच्या संघर्षाची पहिली नांदी येथेच झडते आणि पांडवांचा भाग्यरवी चढता असतानाच ती विराम पावते. त्यातील कथा एकेरी नाही. वंशकथन व अनेक कथोपकथांनी ती समृद्ध व विविधांगी झाली आहे. समुद्रमंथन, सर्पसत्र यांसारख्या अद्‌भुत आणि दुष्यंत-शकुंतला, शंतनु-मत्स्यगंधा, ययाती-शर्मिष्ठा या प्रणयी युग्मांच्या रमणीय प्रेमकथांनी त्याचीखुलावट साधलेली आहे. इतिहास-काव्य-नीती अशा जीवनांगांना व्यापणारी महाकाव्याची व्यापकता आदिपर्वाच्या विस्तारात आहे आणि तिच्यावर रचनेच्या आरंभकालीन उत्साहाची काव्यकांती पसरली आहे. मुक्तेश्वरांनी त्याच्या अंशभागांच्या रसमयतेची नोंद ( जसे, १।७।२ ) केली आहे. "नवरसीं रसार्णव। भंगीत ग्रंथकथेचा गर्व। तें हें अपूर्वअपूर्व। आदिपर्व भारतीं" ( १।५०।१०८ ) अशी त्याच्या अनुपमेय रसमयतेची अद्वितीयता त्यांनी वर्णिली आहे.

**आदिपर्वाचा कथाबंध :** आपल्यासमोरील आदिपर्वाचे २३० अध्याय मुक्तेश्वरांनी ५० अध्यायांत बसविले आहेत. उग्रक्षुब्ध भावना, उत्तान दृश्यें, डोळे फिरविणारी भव्य वर्णने यांनी भरलेली सर्पसत्रकथा १ ते १२ अध्यायांतील मूलकथा आहे. धौमशिष्य वेद, आरुणि, उपमन्यु, उत्तंक आणि भृगुवंशीय भृगु, च्यवन, रूरू यांच्या कथा, सर्पसत्राचे मागचेपुढचे धागेदोरे सांगण्यासाठी आलेल्या समुद्रमंथन,, गरुडाख्यान या कथा, सर्पसत्राच्या कारणघटना व प्रत्यक्ष सर्पसत्रवर्णन असा त्यांचा आशय आहे. महाभारताचा आरंभ असा गुंतागुंतीचा, वळणावाकणांचा आहे. मूलकथेशी नाममात्र संबंध असणाऱ्या कथोपकथांच्या गर्दीमुळे येथील कथासूत्र खंडित शृंखलेसारखे वाटते. दुष्यंत, ययाती, शांतनु, भीष्म, चित्रांगद, विचित्रवीर्य या कुरुकुळातील राजपुरूषांच्या चरितकथा अध्याय १३ ते २५ मध्ये येतात. मानधन राजर्षी, लावण्यवती दिव्यांगना, तपोधन ऋषी यांच्या चित्रविचित्र कथांनी ती विस्तारित व अनेकांगी झाली आहे. शाप-उःशाप, अकल्पित जन्मसंभव, स्त्री-पुरुषांच्या प्रीतीच्या व परस्परसंबंधांच्या नाना तऱ्हा, कामवासनेची प्रबळता, संस्कृतीच्या मूल्यव्यूहात अवतरणारी नानाविध वृत्तिप्रवृत्तींची रंगीबेरंगी व्यक्तिचित्रे यांनी ती नटलेली आहे. प्रबळ भावनांचे उभड, अद्‌भुताचे आवरण, घटनांची चित्रमालिका, तपशीलवार वर्णने, आलंकारिक चित्रशैली यांमुळे एखाद्या चित्रकक्षाचे ( पोर्ट्रेट गॅलरी ) रूप या कथाभागास

आले आहे. साधारणतः कौरवपांडवांच्या जन्मापासून खांडवदहनापर्यंत–अध्याय २६ ते ५०–आदिपर्वातील भारतकथा अधिक केंद्रित, सुसूत्र व एकेरी होते. दुर्योधनादी कौरवांची खलकृत्ये (अ. २९, ३१, ३२, ३४, ३५, ३६, ४४, ४५) ईर्ष्या, द्वेष आणि दुबळा चडफडाट यांनी भरलेली आहेत. बालक्रीडा-विषप्रयोग (अ. २९), जतुगृहातून निर्गमन (अ. ३६), हिडिंबवध (अ. ३७), बकवध (अ. ३८) यातून अद्‌भुतरम्य व रोमहर्षक कथा भीमाला केंद्र धरून विकसित होते. धर्माचे सद्‌गुण (अ. ३३) व वारणावतप्रसंगीचे चातुर्य (अ. ३४) पांडवांचे रक्षण करतात. विद्याध्ययन, रंगपरीक्षा, द्रुपदपराभव (अ. ३०, ३१, ३२), चित्ररथपराभव, स्वयंवरातील लक्ष्यभेद, विवाह व कौरवांशी संग्राम (अ. ४०-४४), बारा वर्षांचे भ्रमण, उलुपी–चित्रांगदा–सुभद्रा यांच्याशी प्रणयक्रीडा, खांडवदहन (अ. ४७-५०) यांतून ही वीर-शृंगाराला उधाण आणणारी कथा अर्जुनाचे बोट धरून चालते. या केंद्रवर्ती पात्रांच्या मागे कृष्णाच्या नियंत्रणाची दैवी छाया धूसर रूपात मुक्तेश्वरांनी स्वतंत्रपणे उभी केली आहे. अ. ४५ पासून पांडवांच्या स्वतंत्र राज्यस्थापनेने संकटाचे सावट दूर होते आणि उत्कर्षाची वाटचाल सुरू होते. खांडवदहनाच्या रौद्र–भीषण आणि वीर-करुण प्रसंगाचा भव्य टप्पा भावी उत्कर्षाचे सूचन करीत असताना आदिपर्व विराम पावते. अनेक कथांच्या गुच्छातून एका सलग दीर्घकथेत आदिपर्वातील कथा रूपांतरित होत जाते. कौरवांचे कपट व पांडवांची मात अशा डाव-प्रतिडावांचे उत्सुकतावर्धक, रोमहर्षक, अद्‌भुतरम्य रूप तिला प्राप्त होते. तसतशी ती अधिक वेधक, गतिमान व सुसूत्र होत जाते.

**आदिपर्वाची बांधणी :** आदिपर्वाच्या बांधणीत मुक्तेश्वर फारसे स्वातंत्र्य घेताना दिसत नाहीत. मुळातील अध्यायांची आरंभअखेर सांभाळणारे २२ अध्याय आदिपर्वात (अ. १–३, ९, १०, १२, १५–१७, २१, २४–२७, ३०–३२, ३५, ३८–४०, ४३), आहेत. स्वतंत्र व स्वयंपूर्ण कथाभाग सांगणारे म्हणून नेटके झालेले ३१ अध्याय आदिपर्वात (अ. २–६, ९, १३–१६, २१–२६, २८, २९, ३१, ३२, ३५–३९, ४१–४३, ४७, ४९, ५०) आहेत. अन्य अध्यायांची रचना तितकीशी बांधेसूद नाही. त्याचे कारण आदिपर्वाच्या प्रकृतीतही आहे. मुख्य कथासूत्रास न जोडलेल्या अनेक कथा येथे संक्षेपाने सांगितल्या जातात. त्यांच्या जुळणीचा सांधा मुळातच कच्चा आहे. अशा ठिकाणी महाभारताला कथासंग्रहाचे रूप येऊ लागते. अध्यायांना एकमेकांशी जोडणारे धागे क्षीण आहेत. अशा वेळी कथा जोडून देण्यासाठी वक्ता-श्रोते प्रश्नोत्तरे एवढाच मार्ग राहतो. यामुळे मुक्तेश्वरी रचनेत अपवादभूत ठरणारे आदिपर्वातील काही अध्याय (४, ७, ९–१२) प्रश्नोत्तरांनी सुरू होतात. ही प्रश्नोत्तरे चालू कथेचा ओघ तोडतात. मूलकथेतील एखाद्या घटनेचे विस्तारपूर्ण स्पष्टीकरण प्रश्नोत्तरांच्या आधाराने देण्यात येते. ते संपल्यावर पुनश्च मूलकथा सुरू होते. अनेक उपकथायुक्त कथेसाठी

प्राचीन ग्रंथांची ही निवेदनपद्धती (जसे, पंचतंत्र, अरेबियन नाइट्स) रूळलेली आहे. तिच्यामुळे समृद्धता येते पण सलगता जाते. "पुढां जालें कथन। तें तुह्मीं मागां परिसिलें" (१।६।३३), "हें म्यां पूर्वीच कथिलेंसें" (१।७।५६) असे मूलकथेचे धागे जोडून घ्यावे लागतात. दुसऱ्या अध्यायाच्या अखेरीची दहाव्या अध्यायारंभी गाठ पडते. चौथ्या अध्यायाचा आरंभ हाच नवव्या अध्यायाचा आरंभ ठरतो. इतक्या मंदगतीने मध्यवर्ती कथा चालते. त्यामुळे वाचकाला स्मरण देण्यासाठी पुनरुक्ती[५] करणे भाग पडते. एकच कथाभाग संक्षेप-विस्ताराने पुनःकथन करण्याची महाभारतकारांची रीतही त्यास कारणीभूत ठरली आहे. एका कथेचे विविध धागे स्वयंपूर्ण आख्यानांच्या रूपात विकसित होतात. जोपर्यंत ते एकमेकांशी मिळत नाहीत तोपर्यंत बांधणी कच्ची राहते. हे मूलानुसार असले तरी रचनास्वातंत्र्य घेऊन त्यात सांधेजोड करण्याचे मुक्तेश्वरांच्या मनात आलेले दिसत नाही. आदिपर्वाची विविधांगी कथा पुढे जेव्हा एकेरी व सुसूत्र होऊ लागते तेव्हा मात्र मुक्तेश्वरी रचनाही बंदिस्त होते, हे नमूद केले पाहिजे.

## ३·३ सभापर्व

**सभापर्व-प्रकृतिविशेष.** आदिपर्वातील अनाथ पांडव सभापर्वात स्वपराक्रमाने भाग्यरवीचा माध्यान्ह अनुभवितात. ते दिग्विजयी होतात ते या पर्वात आणि रंक होऊन वनाची वाट धरतात तेही याच पर्वात. उत्कर्ष आणि अपकर्ष यांच्या विरोधरंगाने सभापर्व रंगलेले आहे. उत्कर्षातच अपकर्षाची बीजे असावीत हे नियतीचे दारुण विलसित येथेच प्रत्ययास येते. त्यामुळे सभापर्वाची बांधणी विरोधबंधाची झाली आहे. पांडवांच्या राजसूयामुळे कौरवांची राज्यतृष्णा जागी होते तर द्रौपदीच्या अपमानाने कुरूकुलाच्या संहाराची विनाशक बीजे पेरली जातात. भारती कथानकाला गती देणाऱ्या या बीजभूत प्रसंगामुळे सभापर्व महत्त्वाचे ठरते. जरासंध-शिशुपाल यांच्या वधाने श्रीकृष्ण निष्कंटक होतो तर पांडवांना मात्र नवीनच वैरी निर्माण होतात, हे एक कथासूत्रही सभापर्वाच्या विरोधबांधणीचे निदर्शक आहे. त्यातील ठळक घटनांमागे कृष्ण स्पष्टास्पष्ट रूपात उभा आहे. कृष्णप्राधान्य हे त्याचे वैशिष्ट्यच आहे. सभापर्वातील घटना मयसभा लोकपालसभा, तोरणस्फटिकासभा अशा सभास्थानी घडतात. येथील कथा अशी 'इनडोअर' अधिक आहे. 'आऊटडोअर' कमी आहे. या सभा राजसभा आहेत. हृदयक्षोभक वैभव, सत्तेची कांक्षा, उद्दाम अहंकार, तीव्र मत्सर, घातकी कपट, असंस्कृत

---

५. पहा १।४।३-१८ = १।९।६-१९-१।३०।२४१-२४२ = १।३१।१-५
१।४।१९-२३ = १।५।६-१६ १।३०।२३७-२४० = १।३३।१४-१७
१।७।१३-६१ = १।११।४३-५१-
१।७।६२-१३६ = १।८।१-६९ = १।१०।१९-३०.

छळ, प्रतिशोधाची ईर्ष्या अशा भावनांचे तांडव येथे घोंगावत आहे. बाहूंच्या नि शस्त्रांच्या सामर्थ्यावरील विश्वास, क्षात्रोचित पराक्रम आणि वीरोचित विलास येथे आहे. त्याला असणारे वैराग्याचे अधिष्ठानही ठसठशीत आहे. प्रजापालनाची आदर्श राजनीती आणि शत्रूविषयीची कपटनीती अशी राजनीतीची दोन्ही अंगे येथे प्रकटली आहेत. यानिमित्ताने लौकिक आशा-आकांक्षांचे वास्तव दर्शन घडविणारे हे पर्व आहे. अलौकिक सभांची भव्योदात्त वर्णने, बलाढ्य वीरांचे रौद्राद्‌भुत वध, प्रसंगानुरोधाने प्रकटलेली लौकिक नीती व अलौकिक तत्त्वविचार, राजपुरुषांची तडफदार संभाषणे, त्यातून प्रकटणारा भिन्नप्रकृती पात्रांचा नटरंगी गोफ, माणसाच्या स्वभावाचे ज्ञात–अज्ञात कंगोरे उजळून टाकणारे अग्रपूजा, द्यूतक्रीडा व वस्त्रहरण यांसारखे निर्णायक कसोटीचे प्रसंग — असा सभापर्वाचा भरगच्च आशय आहे. त्यामुळे सालंकृत वर्णनविलासाला, खळाळत्या रसमयतेला, भेदक जीवनदर्शनाला नि प्रगल्भ जीवनदृष्टीला आविष्कृत करण्यास येथे पुरेसा अवसर आहे. त्यामुळेच महाभारतकारांनी " सभारण्य विटंकवान "–कविविहगांचे आश्रयस्थान–असा सभापर्वाचा सार्थ उल्लेख केला आहे.

**सभापर्वाचे मुक्तेश्वरी आकलन :** हे द्वितीयपर्व भावार्थबीज असल्याने द्वितीयेच्या चंद्रासारखे माथ्यावर मिरविते, असा सभापर्वाचा आलंकारिक गौरव मुक्तेश्वरांनी केला आहे. राजसूय, द्यूत, अनुद्यूत व वस्त्रहरण या रसपूर्ण भागांचा निर्देश त्यांनी केला आहे. वस्त्रहरण हा सभापर्वाच्या गाभ्यातील मर्मप्रसंग आध्यात्मिक उपमानांनी त्यांनी नेटकेपणा टिपला आहे ( २।१।२५ ). आपल्याला जाणवलेले सभापर्वाचे सारे विशेष सांगताना ते म्हणतात–" भारतामाजी अतिनेटकें । सभापर्व रस मोटकें। श्रीकृष्णमूर्तीचीं नाटकें । गुप्त प्रगट परियेसा " ( २।५।१७४ ) अनेक आख्यानोपाख्यानांनी स्वैरपणे वाढत गेलेल्या अन्य पर्वांपेक्षा सभापर्व अधिक बंदिस्त व आटोपशीर आहे. महाभारताच्या मध्यवर्ती सूत्राशी ते अधिक संबद्ध व प्रमाणबद्ध आहे. म्हणून मुक्तेश्वरांनी त्यास ' अतिनेटके ' म्हटले आहे. रेखीव कथाबंध मुक्तेश्वरांना प्रिय आहे. त्यामुळे सभापर्वाचा हा विशेष त्यांनी आवर्जून सांगितला आहे. सभापर्वातील केंद्रवर्ती घटनांचे क्रियाप्रेरक केंद्र श्रीकृष्णच आहे. म्हणून ' श्रीकृष्णमूर्तीचीं नाटकें ' हा त्याचा दुसरा ठळक विशेष त्यांनी सांगितला आहे. नेटकेपण, कृष्णलीला आणि " आख्यानरत्न भिन्नभिन्न " यामुळे सभापर्व त्यांना " रस मोटकें " वाटते. भावार्थबीज ( २।९।१६२ ), " रस विविधें " ( २।१५।२९१ ) असा त्याचा भावात्मकतेचा व रसात्मकतेचा निर्देश त्यांनी अन्यत्रही केला आहे. त्यामुळे संकलित अनुवादाची आपली भूमिका विसरून मुक्तेश्वर सभापर्वात रंगून गेले आहेत. म्हणूनच हे पर्व " अपूर्वापर्व " असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

**सभापर्व कथाबंध :** मंगलाचरण, भूमिका, पूर्वकथानुसंधान व विषयप्रस्ताव करून पहिल्या अध्यायात मुक्तेश्वरांनी कथानकाचे सूत्र उचलले आहे. मयसभानिर्माण

व वर्णन, नारदनीती, लोकपालसभावर्णन अध्याय एक ते चार मध्ये येतात. संथ व विस्तृत प्रारंभ हे मुक्तेश्वरांच्या भारती कथाबंधाचे एक वैशिष्ट्यच म्हणावयास हवे. तत्त्वविचार व सालंकृत वर्णने ही महाकाव्याची अंगे या विस्तृत आरंभातून अभिव्यक्त झाली आहेत. सभावर्णनाच्या निमित्ताने पांडू यमसभेत तर हरिश्चंद्र इंद्रसभेत या नारदोक्त कथनात पुढील राजसूयसंकल्पाचे बीज हलकेच पेरले जाते. प्रारंभीच्या चार अध्यायांतून प्रत्यक्ष कथानकाला न मिळणारी गती ही एवढीच. त्यातून स्फुरणारा राजसूयसंकल्प व त्याची पूर्ती अध्याय पाच ते आठमध्ये येते. राजसभेतील चर्चा-विचारविनिमय, मुत्सद्यांची खलबते, हे महाकाव्याचे आणखी एक अंग त्यातून आविष्कृत होते. भीम-जरासंधाच्या बाहुयुद्धामुळे उसळलेले सातव्या अध्यायांतील वीरश्रीचे उधाण दिग्विजयाच्या आठव्या अध्यायापर्यंत पसरते. त्यातील वीर–रौद्र–अद्‌भुत चित्रणावर नीलोपाख्यानामुळे प्रीतीचे लघुचित्र रेखले जाऊन नाजूक भावनांचा शिडकावा होतो. राजसूय–योजनेतील विचारमंथर आणि त्याच्या प्रत्यक्ष कार्यवाहीतील आवेगी कृतिशील वातावरण संपून प्रत्यक्ष राजसूयाचे वर्णन अध्याय नऊ ते अकरा मध्ये येते. कृष्णाचे केंद्रवर्ती स्थान आता अधिक ठसठशीत होते. प्रतिनायकांचे या पर्वातील पहिले दर्शनही येथेच होते. शस्त्रास्त्रांच्या खणखणाटानंतर उत्सवाचे मंगल वातावरण कथेवर पसरते. भक्तीच्या मोहक छटेने ते खुलत जाते. पण याच भक्तीच्या उत्कर्षामुळे देवद्रोह्यांच्या विरोधाला धार चढून संथ वर्णनचित्रात भय, संताप, चीड यांचे रंग चढत जातात. शिशुपाल, भीष्म, भीम, कृष्ण या राजपुरुषांच्या ओजस्वी संवादातून कृष्णकेंद्रित भावनाट्य आकारते. हे वाक्‌युद्ध तीव्र होत रौद्रतेकडे झेपावत जाते. जरासंधाच्या आहुतीने राजसूय सुरू होतो आणि शिशुपालाच्या आहुतीने समाप्त होतो. पांडवांच्या भाग्यचक्राचा फेरा पूर्ण होतो आणि तिथेच त्याला कोठे तरी तडा जातो. कशाचाही अतिरेक—मग तो दुर्गुणांचा असो, वा सद्‌गुणांचा असो, दुःखाचा असो वा सुखाचा असो—दैवी चिरंतन न्यायाला तो जणू, अमान्य असतो. बाराव्या अध्यायात यज्ञाचा मंगल अग्नी विझतो आणि सूडाचे अंगार धगधगत राहतात. दुर्योधनाच्या मयसभेतील फजितीचा बीजप्रसंग येथेच घडतो आणि मग क्रुद्ध आणि ईर्ष्यावान दुर्योधनाच्या आवेगी मनोविकाराबरोबर कथानक वाहू लागते. घटनांचे केंद्र बदलल्यावर–इंद्रप्रस्थाऐवजी हस्तिनापूर—नायकही चौदाव्या अध्यायात हस्तिनापुरात येतात. आतापर्यंत ज्या दैवाचा पायरव ऐकू येतो तेच चौदाव्या अध्यायात अक्राळविक्राळ रूपात उभे राहते. सहज मनोविनोदनार्थ मांडलेल्या द्यूताचे बंधु-पत्नीसह दास करणाऱ्या भीषण द्यूतात कसे पर्यवसान होते याचा हा आलेख आहे. साधुपुरुषाच्या अधःपाताचेही ते चित्र आहे. द्रौपदी–वस्त्रहरणाचा भावक्षोभक प्रसंग पंधराव्या अध्यायात येतो. हा महाभारताचा बीजप्रसंग आणि सभापर्वाचा मर्मप्रसंग आहे. त्याच्या चित्रणात मुक्तेश्वरांचा प्रतिभासूर्य मध्यान्ही आहे. प्रतिशोधाची ईर्ष्या, कुलनाशक वैराग्नी, माणसाचे अमानुषत्व, सभ्यांचे भययुक्त मौन, सत्वस्थांची निर्भयता, स्त्रीचे सतीत्व आणि दीनरक्षणार्थ धावणारी सत्‌शक्ती यांचा एक नटरंगी गोफ येथे विणला आहे. सूड आणि

संयम, उन्मत्तपणा आणि निर्भय न्यायशीलता, भावनांचा ओसंडता उद्रेक आणि मूल्यनिष्ठ विवेक यांनी येथे एकमेकांना तोलून धरले आहे. महाभारती चित्रणात भावना-विचारांचे संतुलन आहे. मुक्तेश्वरांनी त्यातील बौद्धिक अंश वगळून अखेरच्या अद्भुताची उभारणी करणारी सश्रद्ध व मूल्यात्मक परिमाण असलेली संभाषणे योजिली आहेत. भीषण रौद्रतेने थरारणाऱ्या या साऱ्या भावक्षोभक प्रसंगावर अखेरी ईश्वरकृपेचे निर्मळ चांदणे पसरते. माणसाची अमानुषता आणि ईश्वराची अतिमानुषता यांची भिडत येथे साधली आहे. क्षणभर थांबलेले सूडचक्र सोळाव्या अध्यायातील अनुद्यूताच्या निमित्ताने पुन्हा गरगरू लागते. हातात खेळवल्या जाणाऱ्या फाशांबरोबर आयुष्याचाच खेळ होतो. अज्ञातवास व वनवास पत्करून पांडव वनाभिगमन करतात. अटळ दैव त्या मानधन पुरुषांना शेवटी असे गाठते. आणि मग मात्र सूड, उपहास, औद्धत्य आणि ईर्ष्या यांचा मुक्त आणि प्राकृतिक आविष्कार सतराव्या अध्यायापर्यंत वाहत राहतो. नायक प्रतिशोधाच्या ईर्ष्येने पेटून उठले आहेत तर प्रतिनायक त्या कल्पनेने विजयाच्या शिखरावरही अस्वस्थ होऊन बसले आहेत; असे हे सभापर्वाच्या अखेरीचे चित्र आहे.

**सभापर्वाची बांधणी :** पांडवांच्या भाग्यरेखेचा चढता उत्कर्ष आणि दारुण अपकर्ष हेच सभापर्वाचे अंतर्गत कथासूत्र आहे. नवव्या अध्यायापर्यंत ही भाग्यरेखा मुक्तेश्वर चढत्या गतीने चितारतात. दहाव्या-अकराव्या अध्यायात ती उत्कर्षबिंदूशी भिडते. आणि खाली झुकू लागते. बाराव्यापासून सतराव्या अध्यायापर्यंत ती अनावर आवेगाने कोसळते. नदीचा संथ वाहणारा प्रवाह कड्यावरून कोसळणाऱ्या प्रपातात रूपांतरित व्हावा त्याप्रमाणे सभापर्वातील हा कथाप्रवाह मुक्तेश्वरी प्रतिभेच्या पात्रातून वाहत जातो. राजसूयापर्यंतच्या पूर्वार्धास १५३१ ओव्या ( सभा, श्लोक १४२४ ) व अखेरीपर्यंतच्या उत्तरार्धास ९८८ ओव्या ( सभा, श्लोक ९६६ ) देऊन मुक्तेश्वरांनी व्यास-मांडणीशी समरूप मांडणी केली आहे. पूर्वार्धातील घटनाबहुलता, वर्णनात्मकता व तत्त्वविचार आणि उत्तरार्धातील अल्पघटनात्मकता व तीव्र भावक्षोभ लक्षात घेतला तर संख्येने चकून न जाता मुक्तेश्वरांनी दोन्ही विभागांना प्रमाणबद्ध अवसर दिल्याचे दिसून येईल. अध्याय ३, ४, ८, ९, १४, १५ व १७ या सात अध्यायांना स्वयंपूर्णता आहे. अध्याय १, २, ५, १२, १३, १६, यांत एकाहून अधिक विषय आले तरी ह्यात संबद्ध अंशाचे एकीकरण आहे. अध्याय ६ व ७ आणि १० व ११ मध्ये एकाच प्रसंगाचा विच्छेद झाल्याने स्वयंपूर्णता येऊ शकली नाही. औचित्य, कथावस्तूचा सलगपणा, बांधीवपणा, संक्षेप-कुशलता यादृष्टीने अध्याय ६, ७, १०, ११ सोडून बाकीच्या १३ अध्यायांची रचना नेटकी व निर्दोष झाली आहे. स्वयंपूर्ण आख्याने नसतानाही एका सलग कथेचे मुक्तेश्वरांनी केलेले अध्यायविभाजन असे नेमके आहे. या साऱ्या अध्यायांना आशयानुसारी वाङ्मयरूप लाभले आहे. संवादात्मक ( १, ३, ५ ), घटनाप्रधान ( ७, ८ ), चर्चाप्रधान घटनात्मक ( १०, ११, १३ ), वर्णनात्मक ( २, ४, ९ ), कथनात्मक ( ६ ), भाव-प्रधान कथनात्मक ( १२ ) भावोद्दीपक प्रसंगप्रधान ( १४, १५, १६, १७ ), असे

त्यांचे रूप आहे. चर्चा-कथन-वर्णन यांतून भावप्रधानतेकडे सभापर्व झुकत जाते, हे लक्षात घेतले की मुक्तेश्वरांनी आपल्या अध्यायाला दिलेले वाङ्मयरूप अनुरूप वाटते. त्यांच्या क्रमयोजनेत वैविध्याचा आविष्कार होतो आणि साऱ्यांच्या एकमेळातून सभापर्वाचे आशयविश्व सुघडपणे आविष्कृत होते.

## ३·४ वनपर्व

**वनपर्व–प्रकृतिविशेष :** काम्यक आणि द्वैत या वनात पांडवांनी कंठलेल्या वनवासाची कहाणी वनपर्वात येते. वनपर्व विस्तारशील आहे. त्याच्या अवाढव्य विस्ताराच्या तुलनेने प्रत्यक्ष पांडवसंबद्ध फारच थोड्या गोष्टी येथे येतात. महाभारतात अल्पकालीन वैशिष्ट्यपूर्ण घटनाकाळाचे विस्ताराने वर्णन येते. वैशिष्ट्यहीन दीर्घकालाचे मात्र त्यात ओझरते चित्रण येते. यातील विरोध वाचकाला जाणवू नये म्हणून विविध कथोपकथांनी वनपर्व भरगच्च करण्यात आले आहे. प्राचीन भारताच्या पौराणिक थाटावाटाच्या कथोपकथांनी वनपर्व समृद्ध आहे. या कथा घटनाशून्य दीर्घकाळाची पोकळी भरून काढतात आणि तीव्र भावक्षोभक कथेला शांतप्रवाहाचे रूप देतात. भारतीयुद्धाच्या अखेरची शांती व अनुशासन ही पर्वेही अशीच आहेत. संकटातही पांडवांनी सांभाळलेल्या सत्वाची कहाणी सांगणारे वनपर्व विस्तार व उपाख्यानांची दाटी यांमुळे लक्षणीय ठरते.

**वनपर्वाचे मुक्तेश्वरी आकलन :** कामधेनुजननी असलेली ही वनपर्वकथा चतुर्विध पुरुषार्थाचे सुधापान करवून जगाला संतुष्ट करीत आहे ( ३।३।१०८ ), असा मुक्तेश्वर वनपर्वाचा गौरव करतात. वनपर्वाचे पापनाशक व पुण्यप्रापक मोक्षदाते रूप त्यांना महत्वाचे वाटते. (वन ३।१०८, ६।१४६, ७।२१७–२१८; ८।२२६, १०।२०४, ११।१६१, १४।८७, १७।६१ ). त्यामुळे वनपर्वात आलेली विस्तृत धर्मचर्चा आपल्या महाभारताच्या प्रमाणात त्यांनी स्वीकारलेली आहे. प्रदीर्घ वनपर्वाविषयी विस्तारभीरुता दर्शवून मुक्तेश्वरांनी संक्षेपकथनाची भूमिका घेतली आहे. या संक्षेपदृष्टीचा मोठाच परिणाम त्यांच्या वनपर्वावर झालेला आहे.

**वनपर्वाचा कथाबंध :** सभापर्वातील करुणरमय वनगमनप्रसंगाच्या उत्तरार्धाने मुक्तेश्वरी वनपर्वाचा आरंभ होतो आणि पांडवांच्या वनवासाची बारा वर्षे संपत असताना ते विराम पावते. अपमानाने हतश्रीक झालेल्या पांडवांची अंतःकरणे सूडासाठी धगधगत आहेत. या क्षोभकारी भावनांचे तांडव मुक्तेश्वरांनी या पर्वावर पसरून दिले आहे. काम्यक आणि अ-द्वैत या वनातही कौरव–पांडवांच्या मध्यवर्ती संघर्षाचा धागा खेळता आहेच. पांडवांचे वनवासातील वृत्त, त्यावरील कौरवांच्या प्रतिक्रिया, कौरवांनी टाकलेले डाव आणि पांडवांनी दिलेली बिनतोड उत्तरे या पद्धतीने हस्तिनापूर आणि वन या घटनास्थळांवर मुक्तेश्वर आपली दृष्टी केंद्रित करतात. नायक-प्रतिनायकांच्या कृतींचे दुहेरी पेड विणून आपला कथाबंध घडवितात. घोषयात्रा, दुर्वासभोजन आणि

जयद्रथविटंबन या प्रसंगात पांडव कौरवांवर मात करतात. पाशुपतप्राप्ती आणि कुंडलाहरण यामुळे त्यांचे पारडे आणखी जड होते. या अल्पकाळात त्यांच्यावर अनेक संकटे ओढावतात. त्या त्या वेळी भीमार्जुनांचे बळ, धर्माची बुद्धी आणि द्रौपदीची समय-सूचकता पणाला लागते. संकटांच्या रसरसत्या अग्नीत पांडवांचे गुणसुवर्ण झळाळत राहते. त्यांच्या सत्वस्थ व सामर्थ्यशील मनोवृत्तीचा हा प्रकर्ष म्हणजे तत्कालीन संस्कृतीचा अनुकरणीय आविष्कार आहे. म्हणूनच कृष्णकृपेची छाया पांडवांभोवती याही पर्वात प्रत्यक्षाप्रत्यक्ष पद्धतीने वेष्टून राहिली आहे. मूळापेक्षा कृष्णकृपेचे वलय मुक्तेश्वर अधिक गडद करतात. या कृपेला पात्र ठरण्यासारखी पुण्यसाधनाही तपस्या-तीर्थयात्रा–पांडव येथे करतात. या मध्यवर्ती कथाभागात उठाव देणारा असाच उपाख्यानांचा भाग मुक्तेश्वर स्वीकारतात. धर्मशील असूनही वनवासी झालेल्या युधिष्ठिराच्या सान्त्वनासाठी नलोपाख्यान येते. रामोपाख्यान व सावित्र्युपाख्यान द्रौपदीहरणामुळे विषण्णचित्त झालेल्या युधिष्ठिराच्या मनावर सान्त्वनाची हळुवार फुंकर मारते. अशी आख्याने कथांतर्गत मध्यवर्ती वृत्तीशी संवाद साधून तिला पुष्ट करतात. प्राचीन राजर्षी, तपोधन महर्षी व व सद्‌गुणी पतिव्रता यांच्या कहाण्या, तीर्थस्थलांची धावती वर्णने, नैतिक-तात्त्विक विषयांवरील उद्‌बोधक चर्चा पुरवून मुक्तेश्वरांनी वनपर्वाचे अनेकांगी रूप सिद्ध केले आहे.

**वनपर्वाची बांधणी :** वनपर्वाचे २९९ अध्याय मुक्तेश्वरांनी १७ अध्यायांच्या चौकटीत सुबकपणे बंदिस्त केले आहेत. अध्याय ३, ६–८, ११, १२, १४–१८ असे ११ अध्याय स्वयंपूर्ण व सूत्रबद्ध असल्याने नेटके उतरले आहेत. अध्याय १, २, ४, ५, ९, १० व १३ ह्या अध्यायांची बांधणी मात्र समाधानकारक नाही. निरनिराळ्या उपपर्वांतील अनेकानेक अध्यायातील कथाभागांचे त्यांच्या अध्यायात मिश्रण होते. त्यामुळे त्यात घटनाप्रसंगाची सलगता राहिली नाही. मध्येच कोठे तरी प्रसंग संपतात आणि नवे सुरू होतात. त्यामुळे घटना सुट्यासुट्या स्वरूपात जाणवतात. प्रसंग-भावांच्या कार्यकारणापेक्षा कालक्रम एवढेच त्यांच्यातील संगतीचे रूप राहते. त्यात घटितनिष्ठ कथन आहे, विकासदर्शक कथारचना नाही. त्यामुळे हे अध्याय सुट्या तुकड्यांनी सिद्ध झालेले वाटतात. वनपर्वाची विस्तारशीलता व कथानातील संक्षेपशीलता यामुळे असे झाले आहे. महाभारतातील अध्याय तुलनेने अल्पविस्तार आहेत. त्या अनेक अध्यायांना पोटात घेणारे मुक्तेश्वरी अध्याय ओवीसंख्येने फुगले आहेत. इतके दीर्घ अध्याय त्यांच्या अन्य पर्वात दिसत नाहीत, हाही संक्षेपाचाच परिणाम होय. निवेदकांच्या अनेक जोड्या येथे असल्याने कथनास आपोआपच संवादात्मक मांडणीचा घाट आला आहे. निवेदकां-मधील प्रश्नोत्तरांच्या सहाय्याने स्थल-काल–पात्रे–घटना यांतील परिवर्तन सुचविले आहे. अनेक प्रसंग पोटात घेणाऱ्या अध्यायांना ही पद्धती वनपर्वात उपयुक्त ठरली आहे. कथोपकथा व वर्णनविस्तार यांनी भारावलेले वनपर्व मुक्तेश्वरांनी संक्षेपिल्यामुळे त्यांची कथा मध्यवर्ती सूत्राशी अधिक निबद्ध व सुटसुटीत झाली. ती अधिक वेगवती व प्रवाही बनली.

## ३.५ विराटपर्व

**विराटपर्व—प्रकृतिविशेष :** विराटपर्व पांडवांना विपत्तीच्या गडद अंधःकारातून पराक्रमाची पहाट दाखविणारे पर्व आहे, म्हणून सांप्रदायिक वाचक तेथपासूनच भारतपारायणाला आरंभ करतात. पांडवांच्या विपत्तीचा प्रारंभ करणारे सभापर्व आणि या विपत्तींचा अंत करणारे विराटपर्व अशाप्रकारे विरोधभावाने परस्परांना तोलून धरतात. वनपर्वाप्रमाणे येथेही जीमूतीआव्हान, कीचकाची अभिलाषा, दक्षिणगोग्रहण, उत्तरगोग्रहण अशा स्वाभिमानाला डिवचणाऱ्या प्रसंगांना तोंड देत पांडवांच्या संयम, शौर्य, चातुर्य व मूल्यनिष्ठा अशा अलौकिक गुणसंनिवेशाची पारख होत राहते. विराटपर्व हे पांडवकथा सुसूत्रपणे सांगणारे बंदिस्त पर्व आहे. पांडवांच्या अज्ञातवासाची कहाणी त्यात येत असल्याने ते जितके प्रसंगप्रधान तितकेच नाट्यपूर्ण झाले आहे. अज्ञातवासाचा वसा मोठा लाजिरवाणा आणि विषारी असतो. "अज्ञातवासातील सर्वात दुःखद गोष्ट स्वत्वाचा त्याग ही असते. बाहूतील बळ, हृदयातील धैर्य, मस्तकातील विवेक सारे वृक्षावर गहाण टाकायचे आणि फक्त साडेतीन हातांचा देह म्हणजे आपण असे समजून एक स्वत्वशून्य सोंग वठवायचे. अज्ञातवास म्हणजे जगाला फसविणे नव्हे, स्वतःला फसविणे, जगापासून लपणे नव्हे, स्वतःपासून लपणे. स्वतःला ओळखण्याइतकेच स्वतःला विसरणे, अनोळखी होणे कर्मकठीण. ज्याने स्वतःला आणि ओळखले आहे, ज्याने पूर्वेतिहास घडविला आहे, ज्याला वर्तमान आणि भविष्य घडविण्याची ताकद आहे, त्याला अधिक दुष्कर"[६] पांडव अज्ञातवासातील अस्मितालोप सहन करू शकणार नाहीत, हे ओळखूनच कौरवांनी अज्ञातवासाची अट लादली होती. त्यामुळे आतल्या आत गुदमरणाऱ्या भावनाट्याचे भेदक दर्शन विराटपर्वात घडते. या अज्ञातवासाने पांडवांना दोन रूपे दिली आहेत. वाचक ती पाहू शकतो पण पांडवांच्या सहवासात येणाऱ्या व्यक्ती मात्र ती जाणू शकत नाहीत. त्यामुळे येथील घटितांना दुहेरी अर्थ प्राप्त होतो. त्यामुळे विराटपर्व विलक्षण नाट्यात्म बनले आहे. मनोवगाहनकुशल कवीला येथे केवढा वाव आहे !

**विराटपर्वाचे मुक्तेश्वरी आकलन :** पांडवांच्या अज्ञातवासाचे हे मर्म मुक्तेश्वरांनी नेमके ओळखले आहे. अज्ञातवासी पांडवांबद्दल ते म्हणतात, "मार्जारपिलीया ऐसें कांखे । कुंजरबाळ कैसेंनि झांके ? । अंधकारीं पळता अर्के । लोकदृष्टी न लोपे ॥१२६ ॥ कीं लपवितां कस्तूरीपरिमळ । सर्वत्र प्रगट करी अनिळ । तेंवी यांच गुप्त खेळ । भेरीनाद जगश्रवणीं ॥" (४।१।१२६-१२७) मागे अज्ञातवासाविषयी केलेल्या विवेचनाच्या प्रकाशात या ओळी वाचल्या म्हणजे पांडव अज्ञातवासात दडून

६. द. भि. कुलकर्णी "महाकाव्य : स्वरूप व समीक्षा," नागपूर, १९७५ पृ. २८०.

राहणेच अशक्य, अशी मुक्तेश्वरांची कल्पना स्पष्ट होते. म्हणून प्रत्येक प्रसंगी पांडव उघडकीला येतील अशी परिस्थिती ते प्रभावीपणे वर्णितात आणि परिचित प्रसंगात नाट्य व औत्सुक्य निर्मितात. त्यामुळे विराटपर्वाच्या मूळ बांधणीत अनुस्यूत असलेला वास्तव ( रिॲलिटी ) आणि भास ( ॲपिअरन्स ) यांचा आदिघाट ( आर्किटाइप ) मुक्तेश्वरी रचनेत अधिक ठसठशीत होतो. " कथारूपे परमामृत ", " नवरससुधेचा सुधार्णव " असा विराटपर्वाचा गौरव करताना मुक्तेश्वरांची दृष्टी ही अशी आहे. ती लक्षात घेऊनच मुक्तेश्वरी विराटपर्वाच्या बंधरचनेचे विशेष शोधता येतील.

**विराटपर्वाचा कथाबंध व बांधणी** : प्रसंगप्राधान्य व नाट्यपूर्णता या विराटपर्वाच्या विशेषाचे भान ठेवून मुक्तेश्वरांनी त्याच्या मांडणीत योजकता प्रकट केली आहे. प्रसंगप्रधान कलाकृती स्फोटमालिकेसारख्या असतात. एकातून दुसरा, दुसऱ्यातून तिसरा अशा पक्क्या बांधणीने तिच्यातील प्रसंग आकारत असतात. विराटपर्वातील प्रसंगमालिकेचे मूळ पांडवांचा विराटनगरप्रवेश हे आहे. ते पहिल्या अध्यायात कथनपर पद्धतीने संथ गतीत मांडले आहे. अज्ञातवासासाठी पांडवांनी विचारविनिमय करणे ह्याच प्रसंगाची दुसरी बाजू त्यांच्या शोधासाठी कौरवांनी विचारविनिमय करणे, ही आहे. तिचा परिपाक म्हणून कौरवांच्या प्रेरणेने पांडवशोधासाठी जीमूतीचे आगमन व भीमाकरवी त्याचा वध या घटना दुसऱ्या अध्यायात येतात. " तेजस्वी पुरुष लपू शकत नाहीत " या पहिल्या अध्यायाच्या अखेरी आलेल्या विचाराची प्रचिती दुसऱ्या अध्यायाच्या आरंभी आलेल्या विराटाच्या स्वगतातून येते. त्यात पांडवांविषयी संशय आहे आणि भावी घटनांचे सूचन आहे. त्यामुळे पहिल्या व दुसऱ्या अध्यायाची गाठ घट्ट बांधली जाऊन पुन्हा तिसऱ्या अध्यायाची पार्श्वभूमी सिद्ध होते. द्रौपदी आणि पांडव अज्ञातवासात असताच्या नाट्यपूर्ण परिस्थितीतून कीचकाने द्रौपदीची धरलेली अभिलाषा व त्यापायी ओढवून घेतलेला मृत्यू यांचे चित्रण तिसऱ्या अध्यायात येते. या घटनेचा अपरिहार्य परिणाम अनुकीचकांच्या क्रोधात, त्यामुळे द्रौपदीवर ओढवलेल्या संकटात आणि पर्यायाने अनुकीचकांच्या वधात होतो. त्याचे चित्रण चौथ्या अध्यायात येते. विराटपर्वाच्या नाट्यपूर्णतेतून निर्माण झालेल्या या घटनांचे धागे दुर्योधनाच्या मनात जुळत जातात. कीचकवधातून अनुकीचकवध ही अंतर्गत तर गोग्रहण ही बाह्य घटना आकार घेते. विराटपर्वाच्या नाट्यपूर्णतेचा आणि प्रसंगप्रधानतेचा सांधा मुक्तेश्वर हा असा जुळवितात. दक्षिणगोग्रहण ( अ.५ ) व उत्तरगोग्रहण ( अ.६ ) ही एकाच घटनेची दोन अंगे आहेत. अशा प्रकारे, पाचव्या व सहाव्या अध्यायातील घटना तिसऱ्या व चौथ्या अध्यायातून जन्म घेताना दिसतात. सहाव्या अध्यायाच्या अखेरीचा कंक-विराट वादातून उद्‌भवलेला फाशाचा प्रसंग हा पुन्हा विराटपर्वाच्या अंगभूत नाट्यातून जन्म घेतो. पाचव्या-सहाव्या अध्यायात जीवनमूल्यांच्या रक्षणार्थ पांडव पुढे येतात आणि त्यातून ते ओळखले जाण्याची शक्यता निर्माण होते. म्हणून सातव्या अध्यायात पांडव प्रकटन ही पांडवांची धूर्त, आक्रमक पवित्रासूचक घटना वर्णिली आहे. त्याचा परिपाक

पांडव व विराट यांच्या स्नेहभावात आणि उत्तरा-अभिमन्युविवाहात होतो. अज्ञातवासातील अज्ञात भविष्याच्या हुरहुरीने अस्वस्थचित्त झालेले पांडव विराटपर्वाच्या प्रारंभी दिसतात तर विराटादी सन्मित्रांच्या बळावर अधिक सामर्थ्यशाली झालेले पांडव आपल्या लखलखत्या राजतेजासह प्रकटलेले विराटपर्वाच्या अखेरी दिसतात. प्रसंग आणि नाट्य यांच्या जुगलबंदीने सळाळणाऱ्या या स्फोटमालिकेचा प्रारंभ संथ निवेदनपर अध्यायाने होतो आणि शेवट विवाहप्रसंगाच्या घटनाशून्य पण उठावदार वर्णनपर अध्यायाने होतो. संथ गतीत आरंभ करून द्रुत, प्रक्षुब्ध लय आळवून गायकाने विश्रब्धपणे पुन्हा धीमी लय आळवावी तसे येथे झाले आहे.

महाभारतातील कौरव-पांडवांचा मध्यवर्ती संघर्ष एखाद्यासारखा मुक्तेश्वराने विराट-पर्वामागे उभा केला आहे. विराट नगरीतील पांडवांचे अज्ञातवासी जीवन हे विराटपर्वाचे अंतर्गत नाट्यपूर्ण केंद्र आहे. त्याचे साद-पडसाद कौरव-पाडवांच्या मध्यवर्ती संघर्षाला चालना देतात. हे विराटपर्वाचे बाह्य प्रसंगप्रधान केंद्र आहे. महाभारती कथानकात उचित फेरफार करून मुक्तेश्वरांनी या दोन्ही केंद्रांना निबद्ध केले आहे. आत आणि बाहेर, सूक्ष्म आणि व्यापक अशा संघर्षाच्या नाना परी रेखाटून, त्यांना सूत्रबद्ध करून मुक्तेश्वरांनी विराटपर्वाचा रेखीव पट विणला आहे. त्यातील नाट्य त्यांनी पुरते जोपासले आहे. हे नाट्य केवळ विशिष्ट परिस्थितीतच आहे असे नसून पात्रांच्या स्वभावरेखेत, घटनांच्या मनोज्ञ जुळणीत, वेधक प्रसंगचित्रात व त्यांच्या छायाप्रकाशी रचनेतही आहे. विराटपर्वातील नाट्यात्मकता व प्रसंगप्राधान्य ध्यानी घेऊन मुक्तेश्वरांनी रचना केली. विरोधभावाने तीत रंग भरले. इष्ट तेथे मुळात बदल करून स्वतंत्र धागे एकजीव केले. कथेच्या चित्राकृतीत सर्व पात्रांना यथाप्रमाण स्थान देण्याचा प्रयत्न केला. अध्यायाच्या अखेरी पुढील अध्यायांचे सूचन करून त्यांची घट्ट गाठ मारली. भावी घटनांचे बीजारोपण करून घटना-प्रसंगांना स्वाभाविक रूप दिले आणि त्यांची एक सलग साखळी गुंफली. विराटपर्वाची ही सुघटित बांधणी पाहिली की मुक्तेश्वरांची प्रतिभा उताराला लागली होती, असे कोण म्हणेल ?

## ३६ सौप्तिकपर्व

**सौप्तिकपर्व–प्रकृतिविशेष :** दुर्योधनाच्या मृत्यूने कौरव–पांडवांच्या निर्णायक संघर्षाची अखेर होते ती सौप्तिकपर्वात. सूडाचे गरगरते चक्र न्यायनीतीधर्माच्या साऱ्या सीमा उल्लंघून, आंधळ्या क्रोधाने बेभान होऊन उच्छिन्न होते ते येथे. अश्वत्थाम्याने केलेल्या रात्रिसंहारात उभयपक्षाचे अवघे दहा लोक राहून एका युगाचा अंत होतो तो येथे. या जनक्षयामागे विजेत्यांचा प्रमाद आणि अपरिहर दैवाचे सूत्र ( मभा १०।८। १४२–१४३ ) व्यासांनी उभे केले आहे. या जनक्षयात कौरव तर संपलेले आहेतच : पण विजयी झालेले पांडवही पांचालासह झालेल्या कुलक्षयाने उन्मळून पडले आहेत. सर्वसंहारक युद्धाच्या अंती जित-जेते एकाच अटळ प्रारब्धाला सामोरे गेले आहेत.

भीषण संहार, सूडाने लखलखणारे क्रौर्य, सर्वस्व हरपलेल्यांचे भेदक विलाप यांनी हे पर्व विलक्षण भावक्षोभक झाले आहे. दिव्यास्त्रांचे प्रेषण, शिवाचे महिमान व वरद रूप यांनी त्यावर दैवी अद्‌भुताचे रंग पसरले आहेत. याचा संकलित परिणाम वाचकाच्या मनात गडद विषण्णतेचा होतो. म्हणून "सौतिकं पर्व दारुणम्" असा व्यास त्याचा निर्देश करतात.

**सौप्तिकपर्वाचे मुक्तेश्वरी आकलन :** सौप्तिक हा पर्वकळस ( १०।१।५ ) असून त्याच्या श्रवणाने अंधकार नाशणारा पुण्यत्र्यंबक उदयास येतो ( १०।४।उप ३ ). असा मुक्तेश्वरांचा निर्वाळा आहे. तो एकंदर महाभारताच्या आध्यात्मिक अंगाचा निर्देश वाटतो. त्यात सौप्तिकाचे विशिष्ट आकलन दिसत नाही.

**सौप्तिकपर्वाचे कथाबंध व बांधणी :** सौप्तिक हे विस्ताराने चिमुकले पर्व आहे. युद्धाच्या अखेरच्या भयाण रात्री अश्वत्थाम्याने आंधळ्या सूडाने बेभान होऊन केलेला निर्दय संहार व नंतरच्या दिवशी पांडवांनी घेतलेला त्याचा भीषण प्रतिशोध या एकाच प्रसंगाचे सविस्तर चित्रण त्यात आहे. पांडवचरित्राच्या अल्पकालातील ठळक घटनांचे तपशीलवार वर्णन हा युद्धपर्वांचा विशेष सौप्तिकाचाही आहे. त्यामुळे अन्य मुक्तेश्वरी पर्वांपेक्षा सौप्तिकाला अधिक सुघटित रूप आले आहे. पहिला अध्याय रात्रि-युद्धाविषयीच्या अश्वत्थामा–कृप यांच्या वादचर्चेतून मांडला आहे. अश्वत्थाम्याच्या वर्तनामागील भावक्षोभ व तत्कालीन सांस्कृतिक मूल्यव्यूहात त्याच्या वर्तनाची आधारभूमी त्यातून स्पष्ट होते. दुसरा अध्याय शिवदर्शनातील अद्‌भुतता व रात्रिसंहारातील आवेशपूर्ण कृतीगतींच्या प्रत्ययकारी वर्णनातून साकारतो. तिसरा अध्याय दुर्योधनमृत्यूने व्याकूळ झालेल्या कृप-अश्वत्थाम्याच्या आणि पांचालासह पुत्रांच्या संहाराने व्यथितचित्त झालेल्या युधिष्ठिर–द्रौपदीच्या अंतःकरणातील शोकाबरोबर उचंबळून वाहत आहे. या शोकात प्रतिशोधाची आगही धडधडून पेटली आहे. तिचा परिणाम भीमाच्या अश्वत्थामाशोधनार्थ गमनात होतो. चौथ्या अध्यायात कृष्णमुखाने अश्वत्थाम्याचे पूर्ववृत्त कळून संकटाचे स्वरूप अधिक भीषण होते. कृष्णाचे प्रसंगावधान, अर्जुनाचे अस्त्रप्रभुत्व आणि व्यास-नारदांची मध्यस्थी यामुळे अश्वत्थामा जीवानिशी सुटतो पण सर्वस्व गमावून आणि माथ्यावर भीषण शाप घेऊन. मनाला बधीर करणाऱ्या तीव्र भावनाप्रसंगांची ही मालिका शिवमहिम्नाच्या उदात्त व दीर्घ कथनाने शांतगंभीर वातावरणात विराम पावते. संवादातून मनःस्थितीचे आणि वर्णनातून कृतीचे चित्रण करीत मुक्तेश्वरांनी सौप्तिकातील भावक्षोभ समूर्त केला आहे. मूलानुसरणामुळे सौप्तिकातील रौद्रता, क्रौर्य, नाट्य, अध्यात्म, भावक्षोभकारी तांडव प्रत्ययक्षम झाली आहे. त्यावर माणसांच्या प्रमादाची, देवाच्या सामर्थ्याची व दैवाच्या अटळतेची छाया पसरून देण्यात मुक्तेश्वर यशस्वी ठरले आहेत.

## ३·७ समारोप

कथाबंधाची घट्ट वीण साधण्याकडे मुक्तेश्वर कसे व किती अवधान देतात, हे मुक्तेश्वरी भारताच्या कथाबंधावरून स्पष्ट व्हावे. घटितांच्या आकलनाप्रमाणे त्यांचे संदर्भ

बदलतात. त्यांना वेगळा उठाव प्राप्त होतो व त्यांच्यात एक संगतीही येते. आपल्या विशिष्ट आकलनानुसार घटनांचा बंध बांधताना त्यांचे मागचे–पुढचे धागे कुशल कथानिवेदक जोडून जोडून घेतो. त्यामुळे कथा पसरट न होता घट्ट वीणीची होते. मुक्तेश्वर याकडे विशेष अवधान देताना दिसतात. त्यासाठी बारीकसारीक प्रसंग एका सूत्राने बांधण्याची धडपड ते करतात. तपशीलाचा बारकावा, व्यक्तींच्या क्रिया-प्रतिक्रिया मागीलपुढील घटनांचे भान यांच्या सहाय्याने ते कथौघ अखंडित ठेवतात. कधी त्यांच्या कथानिवेदनात विसंगती आली असली तरी सुसंगती साधण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. पात्र–प्रसंगात स्वाभाविकता यावी, प्रतीती उपायवैकल्य व संभावनाविरह ही रसविघ्नें टाळावीत यासाठी ते दक्षता घेताना दिसतात. कथेचे धागे नव्याने सांधून ते भावदर्शन घडवितात. परिचित प्रसंगात औत्सुक्य पेरून नाटय निर्मितात. कथाचौकटीत पात्रांना यथाप्रमाण स्थान देण्यावर त्यांचा कटाक्ष असतो. नायकाइतकेच प्रतिनायकांचेही चित्र ते ठसठशीत करतात. सुटया वा अंतर्गत संघर्षाचे धागे मध्यवर्ती संघर्षाशी स्वतंत्रपणे जोडून ते त्याला ते अधिक भरीव व उठावदार करतात. त्यामुळे अवांतर पसारा टाळून कथा सुसूत्र व वेगवती होते. नामा पाठक, विष्णूदास नामा व एकनाथ या पूर्वकवींच्या पाल्हाळिक व विस्कळीत प्रकृतीच्या कथाबंधाच्या पार्श्वभूमीवर मुक्तेश्वरी भारताचा आटोपशीर व बंदिस्त कथाबंध लक्षणीय वाटतो.

## ४. मुक्तेश्वरी कथाबंधाचे काही विशेष

### ४.१. भविष्यकल्पनेचा वापर

महाभारताच्या वाढत्या संस्करणात पुनः पुन्हा स्वीकारलेली भविष्यकल्पना मुक्तेश्वरी भारतातही दिसते. पुढे होणाऱ्या घटनांची सूचना देणारी भविष्ये कधी मूलानुसरण, कधी, मूलसंबद्ध विस्तार; तर कधी स्वतंत्र योजना करून मुक्तेश्वर नोंदवितात.[७] नारद-भविष्याचे स्पष्टीकरण करणारे व्यासभविष्यकथन ( २।१२।७–३७ ) या दृष्टीने अधिक चर्चनीय स्थळ आहे. यातील द्यूतविषयक भविष्य कृत्रिम, अद्‌भुत व औचित्यभंग करणारे आहे, असा नांदापूरकरांचा[८] अभिप्राय आहे. भविष्यपुराणादींनी भविष्यकथनास कथाकथनात प्रतिष्ठा मिळवून दिली होती. त्याचे ठसे मध्ययुगीन मराठी काव्यावर उमटत होते. विष्णुदासांच्या भारतातील किंवा कथाकल्पतरूतील ( स्त. ८ अ. ४ ) व्यासभविष्य-कथन याच वळणाचे आहे. विशेषतः मुक्तेश्वरी व्यासभविष्यकल्पनेतील उत्तरोत्तर होत जाणारा क्रियासंकोच शैलीसाम्याने कथाकल्पतरूतील भविष्यकथनशैलीशी जुळता आहे.

---

७. आदि ६।४–५, १०।७९–८०, २८।१०५–११७, ३५।८७, ८९–९५.
सभा ५।४५–४९, ११।९–१०,९६, १२।४–५, १७।२८–३०.
वन २।८०–८२, १०।७६–७७, १३।२२. विराट १।८० सौतिक ४।८०.

८. ना. गो. नांदापूकर, " मुक्तमयूरांची भारतें, " हैदराबाद, १९५६ पृ. ७७.

तेव्हा मुक्तेश्वरांचे भविष्यकथन समकालीन वाङ्मयीन प्रवृत्तीने भारलेले आहे. त्याचे समर्थन करता आले नाही तरी हे स्पष्टीकरण लक्षात घेणे आवश्यक आहे. तसा या व्यासभविष्याला मूलाधारही ( सभा २। परि. १ क्र. ३० ओळी २१-२६ पृ. ४३३ ) आहे. तथापि मुळात भविष्याचे स्थूल दर्शन आहे. मुक्तेश्वरांनी त्याला नको इतकी स्पष्टता दिली आहे. कदाचित सूचना मिळूनही प्रारब्धाप्रमाणेच कसे घडत जाते, हे त्यांना दाखवून द्यावयाचे असावे. तरी ही स्पष्टता बोचते हे खरेच आहे. तेवढ्यापुरता ( म्हणजे २।१२।७-३७ या विस्तृत कथानातील १९-२३ व ३०–३४ एवढ्याच भागापुरता ) नांदापूरकरांचा आक्षेप मान्य करावा लागेल. तेवढ्याने हे सर्वच भविष्य-कथन गैरलागू ठरते असे नाही. त्यातून संपूर्ण कथाभागाला गंभीर, तात्त्विक बैठक प्राप्त करून दिली जाते. पुढील भीषण व दैवाधीन घटनांच्या प्रतिकारासाठी प्रारब्धवाद, अद्वैत वेदान्त आणि तज्जन्य आचारधर्म यांची संरक्षक तटबंदी येथे उभारण्यात आली आहे. पुढे प्रारब्ध ओढवणार म्हणून बुद्धिमंदासारखा प्रयत्न सोडू नये, विवेकबुद्धीने ते टाळावे आणि भोगावे लागलेच तर समत्वबुद्धीने भोगावे, असा जीवनार्थ येथे अभिव्यक्त होत आहे. त्यासाठी पुढील घटना मुक्तेश्वरांना भविष्यवळणाने तपशीलवार सांगाव्याशा वाटल्या असाव्या. कधी मुळातील भविष्यकथनाला स्पष्टता व भक्तिरंग देण्याची मुक्तेश्वरांची लकब ( जसे, चंडकौशिकाचे भविष्यकथन २।६।५१-५९ ) दिसते. अशी भविष्यकथने देव, देवता व त्रिकालज्ञ तपस्वी यांच्या मुखी योजण्याचे चातुर्य त्यांनी दाखविले आहे.

भविष्यकथनाचे आणखी एक रूप म्हणजे प्रत्यक्ष कथांतर्गत पात्रांनाही पुढील घटना ज्ञात असतात,[१] हे होय. जतुगृहाविषयीची विदुराची गूढ सूचना मुक्तेश्वरी रचनेत कपटद्यूतापर्यंतच्या भविष्यात ( १।३५।८७ ) रूपांतरित होते. मुळातील सावधता येथे पुसली जाते. तसेच विदुराने न सांगितलेले पुढचे भविष्यही धर्म कुंतीस सांगतो ( १।३५।१०७–१०८ ). भावी घटना ज्ञात असल्याने येथील पात्रे अनेकदा निर्णय घेताना वा कृतिप्रवृत्त होताना दिसतात. धृतराष्ट्र ( १।२४।७९,८० ), दुर्योधन ( १।२६।८५-८७ ), द्रौपदी-धृष्टद्युम्न ( १।३९।५३-५५ ) यांच्याविषयीच्या भविष्यातून व्यक्तिदर्शनही साधलेले दिसेल. द्रौपदीहरणप्रसंगी अपशकुनांचे प्रस्थापित संकेत मुक्तेश्वरांनी भीषण भविष्याचे कलात्मक सूचन करण्यासाठी वापरले आहेत. शकुना-पशकुनावरील लोकश्रद्धा व उत्पातवर्णने यांचा भविष्यसूचक वापर मुक्तेश्वर करतात.

मध्ययुगीन पुराणांनी प्रतिष्ठित केलेली व प्राकृत ग्रंथकारांनी अनुसरलेली भविष्य-

---

१. आदि. ९।३६, १८।१२६, २२।६१, २५।१२३, २८।११९, ३७।६३, ५०।२१–२३ ९७.

सभा ६।६२–६७, १५।२३३, १६।९३, १७।३४–३७.

वन २।४९.

विराट ४।५०–५३.

कथनशैली मुक्तेश्वर स्वीकारतात. अर्थकुशळांना पुढां कथेची सूचना देणे आणि सूचना मिळूनही सारे प्रारब्धाप्रमाणेच कसे घडते हे दाखविणे, हे त्यांचे उद्देश असावेत. मुळातील भविष्यकथनस्थळे ते स्वीकारतात. त्यात सूचकतेची जागा स्पष्टतेने व बारीक-सारीक तपशीलाने घेतली जाते. त्यामुळे त्यात अद्‌भुतता येते. अद्‌भुतप्रिय, श्रद्धाळू श्रोतृमानसाच्या समाराधनाचा तो प्रयत्न असावा. त्यांच्या पात्रांना भावी घटनांचे ज्ञान असते. त्याचा व्यक्तिचित्रणावर खोल परिणाम होतो. भविष्यकल्पनेच्या वापरामुळे मुक्तेश्वर संपूर्ण कथेवर प्रारब्धाची अटळ छाया यशस्वीपणे पसरून देतात.

## ४.२ विनोदाचा शिडकावा

'विनोद' शब्दाची पुनरावृत्ती[१०] मुक्तेश्वरी रचनेत दिसते. त्यामानाने विनोदस्थळे[११] कमी आढळतात. वस्त्राचा साप करून मेडसावणे, अंगुष्ठप्राय वालखिल्यांनी लहानशा डबक्यात गटांगळ्या खाणे, वाऱ्याने मेनकेचे वस्त्र उडविणे, दुर्योधनाची मयसभेत फजिती, भीम जीमूत मल्लयुद्ध, उत्तराची रणभूमीवर उडालेली घाबरगुंडी, खादाड भोजनभाऊची अन्नलालसा व तृप्ती, अशा स्थळी विनोदाचा काहीसा रंग पसरलेला दिसतो. समूहमनाला खुसखुशीत वाटणारा, प्रायः शारीरपातळीवरील प्रसंगनिष्ठ विनोद असेच त्याचे स्वरूप आहे. त्याचे प्रमाणही कमी आहे. संक्षेपरामायणातील विनोदाची बहार मुक्तेश्वरांच्या पूर्वोत्तर रचनेत कधी अवतरलेली दिसत नाही.

## ४.३. अद्‌भुताची डूब

मुक्तेश्वरांच्या निवेदनात आवृत्त होणारे अद्‌भुतदर्शक शब्द[१२] त्यांची एतद्विषयक

---

१०. आदि ३।८३,८६,८७, ६।२१, ७।६८,८६, १५।१२०,१३५ १९।१९,१९६, ४२।११७, ४७।९१.

वन ९।१७४, ११।२८, १०।१३५.

विराट २।७०, ५।१०२, ६।५७, ८।१२.

११. पहा, १।३।८३-८४, १।६।१८-२०, १।१५।१३५, १।४७।९२, .२।२।५६, ३।११।२८, ४।५।५८, ४।६।५२-५७, ४।६।१४१-१४८.

१२. या शब्दाच्या वापरासाठी पहा,

सभा ६।३१, ४०, ९।८५, १२।६३, २३७, १४।६०, १५।४०, ४४, १७।२५

वन. १।३, ४।१५१, १२।६३, १५२.

विराट २।४४, ३।१०,१४०, ४।२५,३०, ५।२०,९०, ६।३४,४५, ७।४७, ८।१.

अद्‌भुताच्या विलासासाठी पहा,

सभा २।३४-३७, ६।१४-१७, ८।३२,३३, ३८,३९,४२, ९।८३-८६,९८-१००,१४४,१४७, १२।१५०, १६२-१६४, १७७-१७८, १८८-१८९, १५।१९६-२४३, २४७-२४८.

वन ३।६३-८५ ४।१५२-१५३, ९।१५०-१५१, १०।१२१-१२७.

सौप्तिक, अ. २ व ४.

रूची प्रकट करतात. कधी तिला मूलाधार असतो. इंद्रधनुष्यासारखे घोडे मुक्तेश्वरांनी महाभारतानुसारच उल्लेखिले आहेत. ( मभा २।४७।१५–१८ मुभा २।१२।१७७–१७८ ) केकारव करीत नाचणारे मयूर, ' चिंतिलें काज ' करणाऱ्या पुतळिया ( यंत्रमानव ! ), सजीवासारख्या हुंकारणाऱ्या सिंहमूर्ती, धन्याची आज्ञा होताच झुंजणारे रेडे–हत्ती आणि रागतालात गाणारी चित्रे ( २।२।३४–३७ ) या नवकल्पनांनी मयसभावर्णनात मुळातील अद्‌भुतरम्यता त्यांनी उठावदार केली आहे. मुक्तेश्वरांच्या स्वतंत्र प्रसंगरेखाटनात अद्‌भुतता अधिक ठसठशीतपणे येते. राजसूयभोजन, दुर्वासभोजन यादृष्टीने पाहण्यासारखे आहे. अद्‌भुताचा प्रयोजक वापर मुक्तेश्वर कसा करतात ते कपटपाशांच्या वर्णनात ( २।१२।९९–१००, २।१४।१६, २५–३१, ४६ ) दिसते. रामावतारी मायामृग तर नैषधकाळी अक्ष असलेले कपटपाश शकुनीहाती आहेत. अशी पार्श्वभूमी ते सहेतुक निर्मितात. त्यातून विश्वातील दुष्टवृत्ती सत्प्रवृत्तींना छळण्याचा प्रयत्न कसा सातत्याने करीत असतात ते त्यांनी सूचित केले आहे. द्यूतसभेत जे घडले ते ईश्वरी सत्कल्पनेविरुद्ध होते. मग ते घडले तरी कसे ? भाविक श्रोत्यांना त्याचे स्पष्टीकरण देणे आवश्यक होते. महाभारतकारांनी दैवकल्पनेच्या आधारे ते दिले आहे. मुक्तेश्वरांनी दैवाच्या जोडीला कपटपाशांच्या अद्‌भुत करणीची जोड दिली. त्यामुळे कथाप्रसंग संभाव्य झाला, धर्माचे अधःपतन सावरले गेले आणि भाविक श्रोत्यांच्या अभिरूचीचें समाराधनही झाले.

मुक्तेश्वर सांगत असलेली भारतकथा दिव्य-मानुष–कथा आहे. कथेच्या प्रकृतीतच अतींद्रिय शक्ती व दैवीलीला ( सुपर–नॅचरल एलेमेंट ) यांना अवसर आहे. मुक्तेश्वर स्वतः नाविन्याचे भोक्ते आहेत आणि वर्ण्यविषयाचा ' अतिशय ' साधण्याकडे त्यांची प्रवृत्ती आहे. त्यामुळे अद्‌भुतरम्यतेचे आकर्षण कविस्वभावत म्हटले पाहिजे. त्यांच्या समोरच्या वाचकवर्गाची अभिरूची अशा अद्‌भुतरम्य पुराणकथांवर परिपुष्ट झालेली होती. कथेची प्रकृती, कवीचा स्वभाव आणि श्रोत्यांची अभिरूची यांच्या एकमेळातून मुक्तेश्वरी भारतात अद्‌भुतरम्यता अवतरली आहे. तिच्यातून मुक्तेश्वरांच्या उत्प्रेक्षण-सामर्थ्याचे ( फॅंटसी ) दर्शन घडते. त्यांच्या कल्पनेच्या स्वैर संचाराची मुक्तक्रीडा अशा चित्रणात आहे. कथादृष्ट्या अद्‌भुताचा प्रयोजक वापर त्यांनी केला असला तरी रंजनमूल्य म्हणूनच त्याचा अधिक विलास प्रकटलेला दिसतो. कथाबंधाला डूब देण्याचा मुक्तेश्वरी प्रतिभेचा स्वभावधर्म प्रारंभिक रचनांपासून भारती रचनेपर्यंत कायम राहिला आहे. त्यांची ही अद्‌भुतप्रियता वा अतिशयप्रियता लक्षात घेतली तर त्यांच्या कवितेतील अतिरेकाची संगती लागू शकेल.

### ४.४ अश्लीलता

अश्लीलता हा मुक्तेश्वरी कथाबंधाचा उत्तरोत्तर वाढत गेलेला विशेष आहे. या संदर्भात मुक्तेश्वरांचे कामभावनेचे आकलन लक्षात घेतले पाहिजे. कामभावनेला

प्राधान्य देऊन मानवी मनोविकारांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न ते करतात. आदर्श आणि वास्तव अशी कामभावनेची दोन्ही रूपे दाखविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. दुष्यंतास पाहून स्त्रियांच्या मनात येणाऱ्या मनोविकारांचे स्वतंत्रपणे केलेले चित्रण त्यांच्या मनोवगाहनकौशल्याचे निदर्शक आहे. पाहताक्षणी अभिलाषा वाटणे हा मानवी मनाचा सहजस्वभाव त्यांनी अचूकपणे टिपला आहे. " माता कन्या अथवा भगिनी । यांचे मैथुन अंतःकरणीं । न स्मरे ऐसा कोण्ही । तोही अव्यभिचारी मनाचा ॥ " ( १।१५।४५ ) यातील धीट ( बोल्ड ) आविष्करण पाहण्यासारखे आहे. पण या निरीक्षणाचा समारोप " मनें नुपजे ज्या अभिलाषु । तोचि जाणावा ईश्वरपुरुष " ( १।१५।४६ ) अशा आदर्शसूचनाने त्यांनी केला आहे. कण्वमुखाने सांगितलेल्या कुलवंतेच्या कुलक्षणात त्यांचे मार्मिक निरीक्षण प्रकटले आहे. स्त्रीचे वर्तनचांचल्य सांगतानाच " उत्तमें वर्तिजे उत्तम राहाटी " ( १।१६।८१ ) असेही ते बजावतात. " मैथुनकाळीं विवेकी नर । होय पिशाचमति वानर । शय्यासनीं भूतसंचार । नग्न नाचवी सुरनरां " ( १।१९।२७ ) अशी कामाची नैसर्गिक प्रबळता त्यांना जाणवते. पण या कामवासनेवर जय मिळविणाऱ्या जितेंद्रियाचा ' देवाधिदेवो ' ( १।२।८१ ) असा गौरवही ते करतात. " कुलांगना लज्जातीर्थी । पवित्र होती जाण पां " ( ३।९।१८ ) किंवा " परस्त्री पाहता क्लीबत्व मना । तो जनक जाण तीर्थांचा " ( ३।९।१५ ) हे मुक्तेश्वरांचे उद्‌गार त्यांच्या उच्च नैतिकभूमिकेचे सूचन करीत आहेत.

कामभावनेच्या प्रबळतेचे वास्तव भान व तद्विषक आदर्शाची ओढ त्यांच्या शृंगार-चित्रणावर परिणाम घडविते. धर्म्य शृंगाराचे रसिकचित्रण व अधर्म्य शृंगाराचे बीभत्सचित्रण ते करताना दिसतात. " अंतुरीपणाच्या अधिकारे....भोग भोगावे " ( १।२२।७५ ) असं सांगणारे मुक्तेश्वर तो काम ' सत्य-स्वधर्म-अविरोधी नसावा ' असा सिद्धांतही ययातीच्या आख्यानात स्पष्टपणे प्रकट करतात. "[१३] अशा धर्ममान्य शृंगाराची चित्रे ते समरसून रंगवितात. देखण्या व कर्तृत्वशाली राजपुरुषांना पाहताच " मूर्ति बिंबली हृदयभुवनीं " अशी त्यांच्या " लावण्यचातुर्यभरिता " नायिकांची स्थिती होते आणि " मधुकर झेपावे चंपका " असे त्यांचे नायकही आकृष्ट होतात. " चित्तासारिखें मिळे दुसरें । तेथें सौख्याचा सागर भरे " ( १।१८।१२० ) अशा आनंदजलात मग " प्रीतिलतिका " पल्लवित होते. दुष्यंत–शकुंतला, ययाति–देवयानी, शांतनु–गंगा यांच्यासारख्या प्रणयी मिथुनांच्या कथांतील रमणींची रूपवर्णने, त्यांच्या जलक्रीडा–वनविहार, त्यांचे सखीसंवाद व प्रेमिकांचे चतुरालाप वर्णिताना त्यांनी बहार आणली आहे.

राजपुरुषांचा शृंगार उत्कटतेने रंगविणारे मुक्तेश्वर तपस्वीजनांच्या अधर्म्य शृंगाराचे मात्र चिडीने वर्णन करतात. ब्रह्में निर्मिलें जगासी । मोहावया भ्रमयंत्र " ( १।१६।८० )

१३. भा. श्री. परांजपे, " रामदासांचे साहित्यशास्त्र, " नागपूर, १९७३, पृ. ४३.

## मुक्तेश्वरांची कविता : खंड ३ : महाभारत

## ( लेखक. डॉ. रत्नाकर बापूराव मंचरकर )

### शुद्धिपत्र

०१ पहिला आकडा पृष्ठाचा; त्यापुढे बिंदूनंतरचा आकडा पंक्तीचा.

०२ पंक्ती वरून मोजल्या आहेत. तेव्हा पंक्तीच्या आकड्याला कसलीही खूण नाही.

०३ पंक्ती तळापासून मोजताना तळटीप व तिला मजकुरापासून विभागणारी रेषा सोडून त्या मोजल्या आहेत आणि तेथे ऊर्ध्वमुख बाण दाखविला आहे.

०४ गोल कंसांकित पृष्ठांक तळटीपेचा निर्देश करणारे समजावेत. जसे ( २२०-) = २२० पानावरील तळटीप.

०५ मजकुरातील बदल पुनरुक्त होत असेल तेव्हा चौकटी कंसात काही स्थळे नोंदविली आहेत.

०६ सहज ध्यानात येणारी मुद्रणदोषजन्य अशुद्धे दुर्लक्षिली आहेत.

०७ कारणे अनेक असली तरी अशुद्धांबद्दल दिलगिरी व्यक्त करणेच योग्य ठरेल. वाचकांनी शुद्धिपत्राप्रमाणे दुरुस्ती करून मगच वाचावे; अशी विनंती आहे.

| | आहे | पाहिजे |
|---|---|---|
| ↑८.१२ | मूलस्त्रोताचे | मूलस्रोताचे |
| ↑११.१ | मुक्तेश्वरी भारताची वाङ्मयीन पाहणी | मुक्तेश्वरी भारतातील भारतकथासंक्रमण. |
| १३.२ | ३॥२ | ३॥१ |
| १३.३ | मुक्तेश्वरी भारताची वाङ्मयीन पाहणी | मुक्तेश्वरी भारतातील भारतकथासंक्रमण |
| २.३ | द्रौणपर्व | द्रोणपर्व |

| | आहे | पाहिजे |
|---|---|---|
| ३.३ | प्रारंभपूर्वक | प्रारंभपर्व |
| ↑१०.९ | श्लोकांत | ओव्यांत |
| १३.१२ | " असे म्हणून "च्या आधी गळालेला मजकूर पुढीलप्रमाणे | तथापि यावरच न थांबता मुक्तमयूरांची भारते स्वतंत्र निर्मिती आहे, असे म्हणून.... |
| १३.१४ | तुललेने | तुलनेने |
| १४.१९ | मानणारी | दाखविणारी |
| ↑१५.१७ | पर्वसमज | पूर्वसमज |
| १६.४ | पण | ( हा शब्द गाळावा ) |
| २१.९ | या | व |
| ↑४५.८ | मूळ श्लोकांचे | मूळ १७४ श्लोकांचे |
| (४९) १ | आर्यभारत | आर्याभारत |
| ↑५६.१४ | मूलसंबंध | मूलसंबद्ध |
| ५९.१३.२५ | अवतरण | या अवतरणातील जाड ठसा माझा. |
| ६२.४ | त्यांच्या | त्याच्या |
| ↑६२.१४ | वास्तव उघडे | वास्तव महाभारतकारांना उघडे |
| ६३.१६ | एका | एक |
| ६५.१५ | मोठ्य | मोठ्या |
| ↑६६.९ | उपमानानी | उपमानांनी |
| ६७.१४ | हिरो | हिरे |
| ↑६७.५ | स्वाभिप्रायता | स्वाभिप्राय |
| ७८.१९ | माये | मायेने |
| ८०.१८ | वाढवित | वाढवीत |
| ↑८०.१ | भाषांतर | भावांतर |
| ↑८१.५ | अजुनामुखी | अर्जुनामुखी |
| ८२.१० | श्रदाळू | श्रद्धाळू |
| ८४.५ | नकुलदेवही | नकुल-सहदेवही |
| ८४.७ | दौपदी | द्रौपदी |
| | [ आणखी पहा ↑९५.१४, १९८.१२, १९८.१३, ↑२०८.६ ] | |
| ↑८४.८ | सांगते | सांगतो |
| ↑८४.७ | वर्णन | वर्णून |
| ↑८४.६ | मुक्तेश्वर | मुक्तेश्वरी |

| | आहे | पाहिजे |
|---|---|---|
| ८९.४ | स्फूट | स्फुट |
| ↑९२.२ | महाभरती | महाभारती |
| ९३.१० | रचना | महाभारत प्रतीची रचना त्यांना |
| ↑९५.१६ | अघाताचें | आघाताचे |
| ↑९७.४ | आहेत | आहे |
| ↑१०२.१७ | विस्तराने | विस्ताराने |
| ↑१०६.८ | प्रायोजक | प्रयोजक |
| १२८.६ | निर्देनाने | निर्देशाने |
| ↑१२९.० | कवित्वाच | कवित्वाचा |
| १३२.७ | वापरत | वापर |
| १३२ १५ | व्यत्ययास | व्यत्यास |
| ↑१३२ २ | हे | ते |
| १३३.१८ | अकलताने | आकलनाने |
| १३५ ८ | वाटल्याने | वाटल्यास |
| १३६.५ | कथावस्तूंस | कथावस्तूस |
| १३६.८ | आपल्या | आपल्याला |
| १३७ १४ | तशी | अशी |
| ↑१३८.२० | वाचनाचा | वचनाचा |
| १४०.१ | जीवनचरित्र | जीवनचित्रण |
| १४१.१ | आध्यात्म | अध्यात्म |
| | [ आणखी पहा १४१.१४ ] | |
| १४८.७ | न मिळणारी | मिळणारी |
| ↑१५० ९ | करुणरमय | करुणरम्य |
| ↑१५२.१६ | स्वतःला आणि ओळखले | स्वतःला ओळखले |
| १५४.१० | एखाद्यासारखा | एखाद्या पडद्यासारखा |
| १५९ | कविस्वभावत | कविस्वभावगत |
| ↑ १५९.७ | कथाबंधाला डूब | कथाबंधाला अद्‌भुताची डूब |
| १६६.८ | वेण्याजोगा | येण्याजोगा |
| ↑१६८.५ | वक्तृश्रोतृसंवाद | वक्तृश्रोतृसंवादात |
| १७६.१६ | प्रतिबिंब | प्रतिबिंबित |
| १९०.८ | तो | तो भीमाला |
| १९१.१३ | गौणवर्णी | गौरवर्णी |

| | आहे | पाहिजे |
|---|---|---|
| ↑१९२.११ | संयम | संयमी |
| १९४.१६ | भक्तीरसाचे | भक्तिरसाचे |
| ↑२०३.१५ | महकाव्यातील | महाकाव्यातील |
| २०४.१४ | जिवतपणा | जिवंतपणा |
| २०५.१५ | निवेदन | निवेदन |
| २०८.८ | रग | रंग |
| २०८.१९ | सदर्भातच | संदर्भातच |
| २१३.५ | भीम-जरासंधाची बाहुयुद्धे | भीम-जरासंधाचे बाहुयुद्ध. |
| २१८.५ | वर्णन | **वर्णनस्थळे** |
| २१९.१७ | जे | ते |
| (२२०).२ | " मुक्तेश्वर " | बा अ. भिडे, " मुक्तेश्वर " |
| २२२.६ | प्रकरांतर | प्रकारांतर |
| २२४.९ | " अर्थ विशेषः " | " अयं विशेषः " |
| २२७.४ | कर्दन | कदन |
| ↑२३४.३ | च्ची | रूची |
| ↑२३५.२ | कृष्कर्णनात | कृष्णवर्णनात |
| २३७.८ | योग्यांची निष्ठा | योग्यांची अचल निष्ठा |
| (२४२).१ | मीखे | मीरवे |
| २४३.७ | माहेरचा | माहेरचा वारसा |
| ↑२४३.१० | पुरोणेतिहासाचे | पुराणेतिहासाचे |
| २४६.२० | वैशेषणांना | विशेषणांना |
| २५६.४ | भीमा | भीष्मा |
| (२०६).२ | प्रति कामीच्य | विदुराचा निरोप म्हणून प्रतिकामीच्या |
| ↑२६८.३ | मुक्तेश्वरांच्या | मुक्तेश्वरांचा |
| ↑२८३.२ | पत्रलेखन | प्रतलेखन |
| २८५.१२ | सभरर्व | सभापर्व |
| २८५.१४ | सभावर्व | सभापर्व |
| ↑२८६.१३ | **प्राकशित** | प्रकाशित |
| ↑२९३.७ | कोदण्ड | कोछड |

□ □ □

अशी पारमार्थिकांशी मिळतीजुळती स्त्रीविषयक कल्पना ते मांडतात. या भ्रमयंत्रात सावडणाऱ्या तपस्व्यांच्या शृंगाराकडे ते अधःपात म्हणून पाहतात. " भंगला नियमांचा तडाग । नकळत उडाला कोपिनकाग । मेनिकाचंदनतरूचें आंग । भुजाभुजंगीं वेष्टिलें" (१।१५।१४२) अशा उग्र प्रतिमांनी तपोभ्रष्ट विश्वामित्राच्या अधःपाताचे चित्र ते रंगवितात. " राजपुरुषांचा शृंगार वर्णिताना मुक्तेश्वरांच्या आख्यानात शृंगाररस प्रत्ययाला येतो तर तपस्व्यांच्या भ्रष्ट व अधःपतित अवस्थेतील शृंगारचित्रणाला बीभत्साची कळा येते. या वर्णनविषयक भिन्न धोरणातून मुक्तेश्वरांची शिवतत्त्वाविषयीची जागरूकता स्पष्ट दिसते. "[१४]

कधी मुक्तेश्वर शृंगारचित्रणात संयम पाळताना दिसतात. " बोलता चतुरीं वारिले " (१।१६।३८) असा श्रोत्यांचा बहाणा करून शकुंतला-दुष्यंताचा मीलनप्रसंग ते आटोपता घेतात. " जगाम् तेषां सा रात्रिः पुण्या रतिविहारिणाम् " (मभा २।५२।३६) असा पांडवांच्या रतिक्रीडेचा निर्देश " सुखशयनी क्रमूनि निशीं " (२।१३।७७) अशा सौम्य रूपात त्यांनी केला आहे. मूलाधाराचा फायदा घेऊन रेंगाळणे शक्य असताना कथेची औत्सुक्यवर्धक गती रूद्ध होऊ नये म्हणून त्यांनी ते टाळलेले दिसते. म्हणजे शृंगारवर्णनाची हौस असली तरी कथाबंधाचे भानही ते ठेवताना दिसतात. अशी स्थळे अपवादात्मक आहेत.

स्वतंत्रपणे अश्लील वाटतील अशी काही स्थळे प्रसंगसंदर्भात तशी वाटत नाहीत. नग्न मेनकेचे दर्शन व विश्वामित्राची भ्रष्टता यांचे चित्रण (१।१५।१३३-१४८) उत्तान असले तरी अश्लील नव्हे. प्रसंगसंदर्भात ते प्रयोजकच आहे. त्यातील उग्र प्रतिमांनी मुक्तेश्वरांनी त्याची निषिद्धताही सुचविली आहे. पांडु-मद्री मीलन (१।२८।६-२४) उद्दीपक निसर्गाच्या पार्श्वभूमीवर, उन्मादक सौंदर्याने प्रक्षुब्ध होणाऱ्या कामभावनेचे चित्र आहे. रसभाव सांभाळीत, निषिद्धता सुचवीत प्रत्ययकारी पद्धतीने ते वर्णिले आहे. त्यातील उत्तानता बोचणारी नाही.

याचा अर्थ मुक्तेश्वरी रचनेत अश्लीलता नाही असा नाही. कमीअधिक प्रमाणात वेगवेगळ्या रूपाने ती प्रकटते. वीर्य, रेत, लिंगोदक, भगपात्र, गुह्यांग, कामागार, मैथुन यांसारख्या वाच्यशब्दांनी त्यांचा शृंगार कधी प्रकटतो आणि ग्राम्यतेस कारणीभूत होतो. " माझिया रेतोदकाचा पाट । आपुल्या वाक्यहस्तकें नीट । वाहता केला असे प्रकट । भार्गवीउदरवाफया " (१।१९।१७) अशा स्पष्टतेने त्यांचा ययाती आपली 'अडचण' शर्मिष्ठेला सांगतो. ही स्पष्टता त्यांच्या शृंगारास उघडेनागडे रूप देते. युद्धप्रसंगी शृंगारिक उपमाने वापरण्याची त्यांची लकब (१।२३।१४०-१४१, १।४४।-१०५-१०८) अनौचित्यजन्य अश्लीलतेला कारणीभूत ठरते.

---

१४. तत्रैव, पृ. ४४.

निर्विवाद अश्लील म्हणता येतील अशी मोजकी स्थळे मुक्तेश्वरी रचनेत आहेत. " कुश्चित् संसाररहाटी "च्या निमित्ताने पुरुषांच्या कामलोलुपतेचे व स्त्रियांच्या उद्धत चाळवणुकीचे जरत्कारूमुखाने आलेले वर्णन ( १।९।४५–५७ ) पहावे. त्यात एक चावट मिस्किल कल्पकता आहे. तसेच बीभत्साने उद्वेग निर्मिण्याचाही उद्देश आहे. तरीही प्रसंगसंदर्भात ते अप्रयोजक असल्याने अनुचित वाटते. विरक्तांनी सांसारिकांची केलेली अशी हेळणा प्राचीन मराठी काव्यात अनेकदा अश्लीलतेत रूपांतरित होताना दिसते. इंद्राने मेनकेस विश्वामित्राविषयी केलेले मार्गदर्शन (!) गलिच्छ व ग्राम्य कल्पनाविलासाचा नमुना ( १।१५।११८–१२० ) असून प्रसंग व्यक्तिरेखांना विशोभित करणारा आहे. राजसूय भोजनप्रसंगी कौरवांनी द्रौपदीच्या केलेल्या थट्टेत ( २।९।७८–७९ ) तिच्या पंचपतित्वाचा शृंगारिक संदर्भ अनुस्यूत आहे. शब्द-कल्पनेपेक्षा राजसूयाची पंगत, कौरवांसारखे राजे व द्रौपदीसारखी साम्राज्ञी, त्यांचे दीरभावजयीचे नाते या प्रसंगसंदर्भात ते अधिक बोचक ठरते. कीचक बहिणीकडे भाऊबीज मागतो ती " ईच्या अधरामृतपाने । पीनपयोधर आलिंगने । शरीरभोगाच्या भोजने " (४।३।११) अशा शब्दांत. या धुंदीत " चित्रविचित्र सुरतासने । अंगसंगे सुख भोगी " (४।३।२१) असे त्याने सैरंध्रीला म्हणावे यात काय नवल ? पण याहीपुढे जाऊन " मद्यपाने झांकली दृष्टी । शिश्न कवळुनी वाममुष्टीं । भगिनीस म्हणे, हे गोरटी । मज मैथुना मेळवी "[१५] असे बीभत्स वर्णन येते तेव्हा किळस वाटल्याशिवाय राहत नाही. अशा तऱ्हेची पंधराच्या[१६] आतबाहेर स्थळे असतील. एकूण रचनेचा विस्तार पाहता हे प्रमाण अल्प आहे, हेही येथे लक्षात घ्यावे.

अश्लीलतेकडे सहजपणे झुकणारी प्रकृतिगत मिस्किलता मुक्तेश्वरांमध्ये आहे. चरणास होणाऱ्या लक्ष्मीस्तनस्पर्शाने कृष्णास आनंद होतो (२।१५।१७४ ); मयसभेवर कामशास्त्राची ' चौऱ्यासी आसनें " ( २।२।५० ); चित्रिली होती, स्त्रियांना भोगवासना वाटावी असे रूप इंद्राने कर्णास दिले ( ३।१७।५३ ); अशा निर्देशातून ती प्रकटते. साध्या वर्णनातही अश्लीलतेची छटा भासमान व्हावी ( २।४।१४४, १०।१।९२ १०।४।८६,८८ ), हे मुक्तेश्वरांची प्रकृती सुचविणारे आहे.

मुक्तेश्वरांच्या अश्लील रचनेचे मूळ त्यांच्या वडिलांच्या नैतिक शिथिलपणात त्यांच्या वर्तनक्रमात व त्यांच्या पणतवाच्या गाननैपुण्यात शोधण्याचा प्रयत्न वि. ल

१५. ही ओवी ( ४।३।९६ ) विराटपर्वाच्या सर्व संपादकांनी छापण्याचे टाळले आहे. पण विराटपर्वाच्या मी पाहिलेल्या सर्व ( २९ ) हस्तलिखितांत ती आढळली. अश्लीलतेकडे पाहण्याची प्रत्येक काळाची दृष्टी वेगळी असते ती अशी !

१६. पहा, आदि ९।४५–५७, १५।११८–१२०, १६।२१–२३, १४७–१५०, २५।१७२, सभा ९।७८–७९, ५।५९,६०, १५।२७३, १७।५३, ५४. विराट २।२५–२७, ३।११,२१,९६. वन व सौतिकात निर्विवाद अश्लील म्हणता येतील अशी स्थळे नाहीत.

भावे करतात. पुरेशा पुराव्याच्या अभावी त्याची सत्यता पटत नाही. बा. अ. भिड्यांनी मुक्तेश्वरांच्या अलंकारसोसावर ठपका ठेवला आहे. तर "तिचे कारण त्यांच्या मोकळ्या वृत्तीत, शृंगारवर्णनाच्या अतिरिक्त आवडीत आणि औचित्यविचाराच्या आत्यंतिक अभावात आहे" असे नांदापूरकरांना वाटते. मुक्तेश्वरांची आध्यात्मदृष्टी, विषय-व्यावृत्तीसाठी आलेली वर्णने आणि स्त्रीकडे पाहण्याची विरक्तांची भूमिका अशीही कारणे त्यांनी लक्षिली आहेत.

यांच्या जोडीला मुक्तेश्वरांची रसिक व जीवनानंदात रमणारी वृत्ती, विपरीत सत्ये परखडपणे सांगण्याची लकब, वैराग्याचे प्रतिपादन व जनरूचीसाठी शृंगारवर्णन या दोहोंतील ओढाताण, मध्ययुगीन कवींची आविष्कारपद्धती, त्यांच्या समोरील श्रोतृ-वर्गाची अभिरूची व स्तर आणि या अश्लील वाटणाऱ्या वर्णनांचा अखेरी श्रोतृमनावर होणारा जुगुप्साकारक परिणाम अशा अनेक गोष्टी लक्षात घेऊन मुक्तेश्वरी रचनेतील अश्लीलतेचा विचार केला पाहिजे.

## ४.५. कालविपर्यास

काव्यकालीन जीवनाचे चैतन्यपूर्ण भासचित्र कवीला उभे करावयाचे असते. तो मनाने काव्यकालाशी समरस होत असतो; पण जगतो मात्र स्वकालात. स्वकाळावरून तो गतकाळाचे अनुमान करतो. त्याची जीवनधारणा व मनःपिंड त्याच्या काळाने घडविलेला असतो. त्यामुळे काव्यकाळाशी स्वकाळाची होणारी मिसळण अपरिहार्य ठरते. त्यात एक परस्परपूरक ताळमेळ साधावा लागतो. काव्यकालात स्वकालाची होणारी रंगभरणी ज्यावेळी काव्यकालाचा तोल बिघडून टाकते तेव्हा कालविपर्यास होतो. असा कालविपर्यास त्या वातावरणाची बंदिश बदलून टाकतो. काव्यगत युगजाणिवेवर आघात करतो; म्हणून त्यास काव्यदोष मानावे लागते.

मुक्तेश्वरी रचनेत कालविपर्यास वैपुल्याने असल्याने तो तिचा विशेष मानला पाहिजे; या कल्पनेच्या प्रभावाने काही वेळा टीकाकारांनी चुकीची उदाहरणेही निर्दिष्ट केली आहेत. दुर्योधन बृहस्पतिवचनाचा उल्लेख करतो, हे पंगूनी[१७] कालविपर्यासाचे उदाहरण मानले आहे. तथापि हे वचन मूलानुसार आले आहे (मभा २।६६।७–८ मुभा २।१६।१९–२०). तेव्हा भारतसंहितेचे भान ठेवूनच अशी उदाहरणे शोधली पाहिजेत. "कां म्लेंच्छाचिया महासनीं । संहारिती पशूंच्या श्रेणी" (२।५।१३७) हे पांगारकरांनी[१८] नोंदविलेले कालविपर्यासाचे उदाहरण. ते जरासंधाच्या नरमेधासाठी उपमान म्हणून आले आहे. उपमानसृष्टीवर कविकाळाचा ठसा अपरिहार्य स्वाभाविकतेने उमटतो. त्यामुळे उपमान म्हणून आलेले कविकालीन संदर्भ कालविपर्यासात गणू नयेत,

---

१७. द. सी. पंगू (संपा.), सभापर्व, पूर्वोक्त, पृ. १७४

१८. ल. रा. पांगारकर, कविवर्य मुक्तेश्वर : चरित्र आणि काव्यविवेचन, पुणे, १९२२ पृ. ३५.

निर्विवाद अश्लील म्हणता येतील अशी मोजकी स्थळे मुक्तेश्वरी रचनेत आहेत. "कुश्चित् संसाररहाटी"च्या निमित्ताने पुरुषांच्या कामलोलुपतेचे व स्त्रियांच्या उद्धत चाळवणुकीचे जरत्कारूमुखाने आलेले वर्णन (१।९।४५–५७) पहावे. त्यात एक चावट मिस्किल कल्पकता आहे. तसेच बीभत्साने उद्वेग निर्मिण्याचाही उद्देश आहे. तरीही प्रसंगसंदर्भात ते अप्रयोजक असल्याने अनुचित वाटते. विरक्तांनी सांसारिकांची केलेली अशी हेळणा प्राचीन मराठी काव्यात अनेकदा अश्लीलतेत रूपांतरित होताना दिसते. इंद्राने मेनकेस विश्वामित्राविषयी केलेले मार्गदर्शन (!) गलिच्छ व ग्राम्य कल्पनाविलासाचा नमुना (१।१५।११८–१२०) असून प्रसंग व्यक्तिरेखांना विशोभित करणारा आहे. राजसूय भोजनप्रसंगी कौरवांनी द्रौपदीच्या केलेल्या थट्टेत (२।९।७८-७९) तिच्या पंचपतित्वाचा शृंगारिक संदर्भ अनुस्यूत आहे. शब्द-कल्पनेपेक्षा राजसूयाची पंगत, कौरवांसारखे राजे व द्रौपदीसारखी साम्राज्ञी, त्यांचे दीरभावजयीचे नाते या प्रसंगसंदर्भात ते अधिक बोचक ठरते. कीचक बहिणीकडे भाऊबीज मागतो ती "ईच्या अधरामृतपाने। पीनपयोधर आलिंगने। शरीरभोगाच्या भोजने" (४।३।११) अशा शब्दांत. या धुंदीत "चित्रविचित्र सुरतासने। अंगसंगे सुख भोगी" (४।३।२१) असे त्याने सैरंध्रीला म्हणावे यात काय नवल? पण याहीपुढे जाऊन "मद्यपाने झांकली दृष्टी। शिश्न कवळुनी वाममुष्टीं। भगिनीस म्हणे, हे गोरटी। मज मैथुना मेळवी"[१५] असे बीभत्स वर्णन येते तेव्हा किळस वाटल्याशिवाय राहत नाही. अशा तऱ्हेची पंधराच्या[१६] आतबाहेर स्थळे असतील. एकूण रचनेचा विस्तार पाहता हे प्रमाण अल्प आहे, हेही येथे लक्षात घ्यावे.

अश्लीलतेकडे सहजपणे झुकणारी प्रकृतिगत मिस्किलता मुक्तेश्वरांमध्ये आहे. चरणास होणाऱ्या लक्ष्मीस्तनस्पर्शाने कृष्णास आनंद होतो (२।१५।१७४); मयसभेवर कामशास्त्राची 'चौऱ्यासी आसनें" (२।२।५०); चित्रिली होती, स्त्रियांना भोगवासना वाटावी असे रूप इंद्राने कर्णास दिले (३।१७।५३); अशा निर्देशातून ती प्रकटते. साध्या वर्णनातही अश्लीलतेची छटा भासमान व्हावी (२।४।१४४, १०।१।९२, १०।४।८६,८८), हे मुक्तेश्वरांची प्रकृती सुचविणारे आहे.

मुक्तेश्वरांच्या अश्लील रचनेचे मूळ त्यांच्या वडिलांच्या नैतिक शिथिलपणात, त्यांच्या वर्तनक्रमात व त्यांच्या पणतवाच्या गाननैपुण्यात शोधण्याचा प्रयत्न वि. ल.

---

१५. ही ओवी (४।३।९६) विराटपर्वाच्या सर्व संपादकांनी छापण्याचे टाळले आहे. पण विराटपर्वाच्या मी पाहिलेल्या सर्व (२५) हस्तलिखितांत ती आढळली. अश्लीलतेकडे पाहण्याची प्रत्येक काळाची दृष्टी वेगळी असते ती अशी!

१६. पहा, आदि ९।४५–५७, १५।११८–१२०, १६।२१–२३, १४७–१५०, २५।१७२, सभा ९।७८–७९, ५।५९,६०, १५।२७३, १७।५३, ५४. विराट २।२५–२७, ३।११,२१,९६. वन व सौतिकात निर्विवाद अश्लील म्हणता येतील अशी स्थळे नाहीत.

भावे करतात. पुरेशा पुराव्याच्या अभावी त्याची सत्यता पटत नाही. बा. अ. भिड्यांनी मुक्तेश्वरांच्या अलंकारसोसावर ठपका ठेवला आहे. तर " तिचे कारण त्यांच्या मोकळ्या वृत्तीत, शृंगारवर्णनाच्या अतिरिक्त आवडीत आणि औचित्यविचाराच्या आत्यंतिक अभावात आहे " असे नांदापूरकरांना वाटते. मुक्तेश्वरांची आध्यात्मदृष्टी, विषय-व्यावृत्तीसाठी आलेली वर्णने आणि स्त्रीकडे पाहण्याची विरक्तांची भूमिका अशीही कारणे त्यांनी लक्षिली आहेत.

यांच्या जोडीला मुक्तेश्वरांची रसिक व जीवनानंदात रमणारी वृत्ती, विपरीत सत्ये परखडपणे सांगण्याची लकब, वैराग्याचे प्रतिपादन व जनरूचीसाठी शृंगारवर्णन या दोहोंतील ओढाताण, मध्ययुगीन कवींची आविष्कारपद्धती, त्यांच्या समोरील श्रोतृ-वर्गाची अभिरूची व स्तर आणि या अश्लील वाटणाऱ्या वर्णनांचा अखेरी श्रोतृमनावर होणारा जुगुप्साकारक परिणाम अशा अनेक गोष्टी लक्षात घेऊन मुक्तेश्वरी रचनेतील अश्लीलतेचा विचार केला पाहिजे.

## ४.५. कालविपर्यास

काव्यकालीन जीवनाचे चैतन्यपूर्ण भासचित्र कवीला उभे करावयाचे असते. तो मनाने काव्यकालाशी समरस होत असतो; पण जगतो मात्र स्वकालात. स्वकाळावरून तो गतकाळाचे अनुमान करतो. त्याची जीवनधारणा व मनःपिंड त्याच्या काळाने घडविलेला असतो. त्यामुळे काव्यकाळाशी स्वकाळाची होणारी मिसळण अपरिहार्य ठरते. त्यात एक परस्परपूरक ताळमेळ साधावा लागतो. काव्यकालात स्वकालाची होणारी रंगभरणी ज्यावेळी काव्यकालाचा तोल बिघडून टाकते तेव्हा कालविपर्यास होतो. असा कालविपर्यास त्या वातावरणाची बंदिश बदलून टाकतो. काव्यगत युगजाणिवेवर आघात करतो; म्हणून त्यास काव्यदोष मानावे लागते.

मुक्तेश्वरी रचनेत कालविपर्यास वैपुल्याने असल्याने तो तिचा विशेष मानला पाहिजे; या कल्पनेच्या प्रभावाने काही वेळा टीकाकारांनी चुकीची उदाहरणेही निर्दिष्ट केली आहेत. दुर्योधन बृहस्पतिवचनाचा उल्लेख करतो, हे पंगूंनी[१७] कालविपर्यासाचे उदाहरण मानले आहे. तथापि हे वचन मूलानुसार आले आहे ( मभा २।६६।७–८ मुभा २।१६।१९–२० ). तेव्हा भारतसंहितेचे भान ठेवूनच अशी उदाहरणे शोधली पाहिजेत. " कां म्लेंच्छाचिया महासनीं । संहारिती पशूंच्या श्रेणी " ( २।५।१३७ ) हे पांगारकरांनी[१८] नोंदविलेले कालविपर्यासाचे उदाहरण. ते जरासंधाच्या नरमेधासाठी उपमान म्हणून आले आहे. उपमानसृष्टीवर कविकाळाचा ठसा अपरिहार्य स्वाभाविकतेने उमटतो. त्यामुळे उपमान म्हणून आलेले कविकालीन संदर्भ कालविपर्यासात गणू नयेत,

---

१७. द. सी. पंगू ( संपा. ), सभापर्व, पूर्वोक्त, पृ. १७४

१८. ल. रा. पांगारकर, कविवर्य मुक्तेश्वर : चरित्र आणि काव्यविवेचन, पुणे, १९२२ पृ. ३५.

असे वाटते. कालविपर्यासात्मक निर्देशांना मुक्तेश्वर कधी मुरड घालताना दिसतात. महिष्मतीतील स्वैराचार वर्णून "हा आचार अद्यापवरी । केरळ मल्याळ सिंधुपारीं । दक्षिणदेशीं सर्वनारी । स्वेच्छाचारें वर्तती" ( २।८।१०४ ) अशी टिप्पणी ते जोडतात. हे देश 'विषयबहुळ' असल्याची श्रीचक्रधरांची साक्ष लक्षात घेतली की मुक्तेश्वर स्वकालीन समजूत प्रकट करीत आहेत हे स्पष्ट होते. हे निवेदन वैशंपायनाचे मानल्यास कालविपर्यास होईल; पण 'अद्यापवरी'च्या आधारे वैशंपायनाच्या निवेदनात मुक्तेश्वरांचे निवेदन घुसले आहे, असे मानता येईल. मग त्यास कालविपर्यास म्हणता येणार नाही. समकालीन वस्तुस्थितीची गतकालीन घटनांच्या आधारे केलेली चिकित्सा असे रूप त्यास प्राप्त होते. भारत-संहिता, उपमानसृष्टी व निवेदनाचा रोख यांचे भान ठेवून कालविपर्यासाची निश्चिती केली पाहिजे.

समकालीन जीवनाशी अनुबंध तुटलेला पण काव्यकथेला मूर्त करणारा भाग मुक्तेश्वर गाळतात. राजसूयविधीचे वर्णन ( सभा २।३३।१-९ ) त्यांनी गाळले आहे. त्यामुळे कालविपर्यास होत नसला तरी कथांतर्गत कालाचा प्रत्यय उणावतो. कालविपर्यासाचे हे अभावात्मक वा अप्रत्यक्ष रूप कोणी लक्षात घेतलेले दिसत नाही.

कथेचे पौर्वापर्य लक्षात न घेता जेव्हा मागील-पुढील घटनांचे निर्देश येतात तेव्हा कथांतर्गत कालविपर्यास[१९] होतो. सत्ययुगीच्या द्युमत्सेनास द्वापारीच्या धृतराष्ट्राचा दाखला ( ३।१६।१३६ ) देणे वा युधिष्ठिराने पुंडलिकाचा दृष्टांत देणे ( २।५।६७ ) हे अशा प्रकारचे वैरस्यकारक कालविपर्यास होत.

कथाकालीन वर्णनचित्रात उत्तरकालीन तपशील गोवणे[२०] हा कालविपर्यासाचा आणखी एक प्रकार. मुक्तेश्वरांची शकुंतला मनुस्मृतीच्या आधाराने पुत्रप्रकारचर्चा करते. कौरव-पांडवांच्या बालक्रीडेत, मनोविनोदनाच्या राजक्रीडेत आणि युद्धविद्येत महाराष्ट्रीय रंग भरले आहेत. भोजनवर्णनांतून ब्राह्मणवर्गीय भोजनपदार्थांचा तपशीलवार उल्लेख येतो. त्यांच्या श्रीकृष्णाने द्रौपदीला नेसविलेली वस्त्रे महाराष्ट्रीय वाणाची व प्रसिद्ध पेठांची आहेत. "विशाळ कांचेच्या रांजणीं । सुविचित्र फळांतें" ( २।१२।१७२ ) असे समकालीन वस्तू-पदार्थांचे निर्देश नजराण्यांच्या वर्णनात विखुरलेले आहेत. समकालीन अन्न-वस्त्र-पदार्थ-शस्त्र-युद्धपद्धती-सणसमारंभ यांचे तपशील काव्यकालीन वर्णनप्रसंगी मुक्तहस्ताने पेरून देण्याचा प्रकार वैपुल्याने आढळतो. वर्णनाची आदर्शवादी चित्रणपद्धती, सूक्ष्म

---

१९. पहा, सभा, २।४९, ५।६७, ८।१३५, ९।९२,९२, १४।१००, १५।१४६-१४८, २२८. वन ११।७१, १६।१३६. विराट २।११, ४।५०-५३ ६।१२९, १३३.

२०. पहा, आदि १५।९-१०, १६।१७८-१८०, २९।३-३१. सभा २।९१,१०२, ९।९७-१३९, १४।१८-१९, १५।२०३-२४३. वन ८।११२, विराट १।७६, ४।५, ६।१५, अ-८.

निरीक्षणे नोंदविण्याची हौस, बहुश्रुतपणाचा देखावा उभी करण्याची धडपड यामुळे समकालीन तपशील गतकालीन कथेत गुंफला जाऊन कालविपर्यास झाला आहे. समकालीन श्रोतृमनाशी संवाद साधण्यास त्यामुळे मदत होते आणि वर्णने भरघोस होऊन अधिक प्रतीतिक्षम होतात, अशी वाङ्मयदृष्ट्या त्याची गुणरूपता सांगता येईल.

अशा कालविपर्यासात्मक निर्देशातून कविकालीन वर्तमानाचे दर्शन होते त्याप्रमाणे त्या समाजाच्या श्रद्धा–आकांक्षांचेही दर्शन होते. मुक्तेश्वरांचा दुष्यंत ( १।१५।९–१० ) वा सहदेव ( २।८।१२७ ) जावी, फिरंगी, इंग्रज यांनाही जिंकतात. आदर्श राजा व राज्य यांची त्यांनी केलेली वर्णने ( १।१०।१२–१८, १।११।९५–१००, १।२७।१०२-१०४ ) व नारदनीतीत प्रसंगानुरोधाने गोविलेले विचार ( २।३।३५-४०,५३-५७,७१,७२,८० ) म्हणजे मध्ययुग पाहत असलेल्या गोब्राह्मणप्रतिपालक स्वधर्मी राजाचे स्वप्नच होय. असे निर्देश पारतंत्र्यात पिचणाऱ्या मध्ययुगाने निर्मिलेल्या 'रोमँटिक' इतिहास-वारशाचे आहेत. भविष्यात असे घडावे या मनीषेने भूतकाळ येथे बदलण्यात आला आहे. हा कालविपर्यास मुक्तेश्वरांच्या वीरपूजक मनाची स्वप्नाकांक्षा दाखविणारा आहे. परिस्थितीजन्य प्रेरणांनी हा कालविपर्यास झालेला आहे.

काळ कवीला क्षणाक्षणाने आणि कणाकणाने घडवीत असतो. दहा हजार उंट संपत्ती वाहून नेत होते ( मभा २।२९।१७ ) हा मूलनिर्देश माणसांना वेठीस धरून संपत्ती वाहिली ( मुभा २।८।१५९ ), असा बदलला जातो तो काळाचा अमीट ठसा कविमनावर उमटलेला असतो म्हणूनच. समकालीन तपशीलाप्रमाणे समकालीन मूल्येही कविमनावर आपला प्रभाव गाजवितात. राजाने अर्थविचार अपरात्री करावा ( मभा २।५।१८ ) हे मूलसूत्र राजाने मोक्षविचार अपरात्री करावा ( मुभा २।३।७५ ), असे बदलते. मुळात धर्माची राजसूयविषयक भूमिका राजधर्मातून निष्पन्न झाली आहे. मुक्तेश्वरांनी त्यामागे पितृप्रेम व पुत्रधर्म ही मूल्ये उभी केली आहेत. त्यांची द्रौपदी ज्येष्ठ वहिनीच्य मानाने वागवावे, असे दुःशासनाला सांगते.

अशा मूल्यपरिवर्तनामुळे भावपरिवर्तन होते. असा भावविपर्यास हे आतापर्यंत कोणीही न लक्षिलेल्या कालविपर्यासाचे निराळे व अधिक गंभीर असे रूप आहे. महाभारत ही वीरयुगाची निर्मिती आहे. त्याची प्रकृती आर्ष आहे. त्यातील पात्रे संमिश्र प्रकृतीची आहेत. त्यांचे परस्परसंबंध प्रवृत्त समाजाला साजेसे आहेत. मुक्तेश्वरकाल वीरयुगाची पहाट आहे. पण त्याची जीवननिष्ठा भक्तीशी आहे. कालिक व सांस्कृतिक अंतराने त्यातील भारती पात्रे व त्याचे परस्परसंबंध यांवर परिणाम केला आहे. त्यातील पात्रांचे मनोभाव अस्सल महाभारतीय असण्यापेक्षा मुक्तेश्वरकाळापर्यंत चालत आलेल्या संस्कारांनी बनलेली भावचित्रे आहेत. कवीने दिलेल्या नवार्थाने व समकालीन बदलत्या मूल्यविचाराने होणारे भावांतर कलाविपर्यासात जमा होणारे आहे. तथापि सृजनशील कलावंताचा तो हक्क असल्याने असे भावांतर त्याच्या कृतीस मूलकृतीपासून पृथकत्व देते व स्वतंत्र निर्मितिमूल्याची जोड देते, असे मानले पाहिजे.

काळविपर्यास निर्देशातून कविकालीन समाजाचे चित्र रेखाटले जाते. समाजशास्त्राच्या अभ्यासकाला हे उपयुक्त असले तरी वाङ्मयाभ्यासकाने मात्र वाङ्मयीन परिणामाच्या इष्टानिष्टतेच्या संदर्भातच त्याचा विचार केला पाहिजे. कवी व काव्य यांच्या स्वरूपावर त्यातून अप्रत्यक्ष प्रकाश पडू शकतो. सूक्ष्मावलोकन, माहितीचा चौफेरपणा, बहुस्पर्शी रसज्ञता व ऐतिह्य दृष्टी हे मुक्तेश्वरांचे विशेष त्यातून प्रकटतात. मुक्तेश्वरी कवितेतील जिवंतपणा, प्रत्ययक्षमता व सहजता यांची मीमांसा करताना अशा उल्लेखामागील कविव्यापाराचा शोध घेता येण्याजोगा आहे.

कालविपर्यास ही मराठी महाभारतकारांची एक प्रवृत्तीच दिसते. मोरोपंतात ती विरल आहे तर मुक्तेश्वर-श्रीधरात विपुल. गतकालीन कथा कथन करताना तिच्यात एक कालजन्य दूरत्व राखले पाहिजे. काव्यकाल व स्वकाल यांना विभाजणारी एक अंधुक रेषा असली पाहिजे. ही रेषा ठेवूनही गतकालीन कथेत बिंब-प्रतिबिंबभावाने स्वकालीन आशय भरता येतो, याचे पुरते भान मध्ययुगीन कवींना नसावे. सुपुत्र-कुपुत्र चर्चेत 'पापयुगाची वार्ता' म्हणून मुक्तेश्वरांनी या दोन काळांतील अंतर दाखविले आहे. तथापि त्यामागे कालांतराची कलात्मक जाणीव असण्यापेक्षा द्वापारयुगाच्या नैतिकतेचा लोकमानसावरील संस्कारच दृढ दिसतो. कालविपर्यास समाजदर्शनाकरिता उपकारक असला व कवि-काव्य स्वरूपावर त्यामुळे प्रकाश पडत असला तरी ज्यावेळी कथांतर्गत कालचित्राला तडा जातो तेव्हा तो दोषरूपच ठरतो. मुक्तेश्वरी रचनेतील कथांतर्गत कालविपर्यास व काही वर्णनसंदर्भ यादृष्टीने दोषरूप आहेत. हा भाग नवीन भरीच्या स्वरूपाचा असून त्यामुळे मुळात ठळक स्वरूपाचे बदल होतात. आरंभापासून मुक्तेश्वरी रचनेत आढळणारी ही प्रवृत्ती भारतरचनेत ठळकपणे प्रकटली आहे.

## ५. कथाबंधाचे काही रचनाविशेष

महाभारत पर्व, उपपर्व व अध्याय यात विभक्त असलेल्या श्लोकबंधात रचलेले आहे. मुक्तेश्वरी भारत अध्यायात विभक्त असलेल्या ओवीबंधात आहे. आपल्या भारताच्या भागांना मुक्तेश्वरांनी भारतीपर्वांची नावे दिली आहेत. एका पर्वातील कथाभाग दुसऱ्या पर्वात घुसडण्याचा विष्णुदास नामा वा कथकल्पतरूकारांचा प्रकारही त्यांच्या रचनेत नाही. याचा अर्थ भारती पर्वविभाजन त्यांना मान्य होते, असा आहे. उपपर्वांना एक स्वयंपूर्णता आहे. महाभारतकारांचे कथाविभाजन अध्यायापेक्षा उपपर्वांच्या दृष्टीने पहावयास हवे. मुक्तेश्वर एका उपपर्वासाठी कधी एक वा अनेक अध्याय देतात तर कधी एका अध्यायात दोन उपपर्वांचाही समावेश करतात. याचा अर्थ असा की, भारती उपपर्वांना अनुसरून मुक्तेश्वर कथाबांधणी करीत नाहीत. औचित्य, स्वयंपूर्णता, प्रमाणबद्धता व कथाविकसन यादृष्टीने महाभारताची अध्याययोजना पुरेशी समाधानकारक वाटत नाही. त्यांची श्लोकसंख्याही कमी-अधिक असून प्रायः विषम वाटते. त्यामुळे मुक्तेश्वरांना ती अनुकरणीय वाटलेली दिसत नाही.

पर्व हे मुख्य विभाजक धरून आपला ओवीबंध त्यांनी अध्यायात विभागला आहे. मुळापेक्षा वेगळ्या कथाभागाचे व वृत्तसंख्येचे अध्याय त्यांनी कल्पिले. त्यामुळे अध्यायांची योजना, आरंभ-अखेर आणि एकूण कथाभागाची मांडणी त्यांच्या स्वतंत्र कल्पकतेची द्योतक झाली आहे.

महाभारतातील अध्यायांचा आरंभ संवादाने, निवेदनाने वा वर्णनाने झाला तरी निवेदकाच्या गद्य निर्देशानेच होतो. मुक्तेश्वरांनी असे निर्देश स्वतंत्र गद्यात न घेता पद्यात मुरवून आणि संभाषण असेल तरच केले आहेत; अन्यत्र केलेले नाहीत. पर्वारंभीचे अध्याय सोडले तर मुक्तेश्वरी अध्यायांना उपक्रम क्वचितच ( आदि, अ. २,८,१४ ) असतात. त्यांच्या अध्यायारंभी स्वतंत्र प्रस्ताव, पार्श्वभूमिकथन नसते. त्यांचे आरंभ वाचकांना थेट कथौघात खेचून नेणारे असतात. त्यांच्या कथानिवेदनाला एक वेग आहे आणि तो अशा आरंभातूनही जाणवतो.

त्यांच्या अध्यायाच्या आरंभी उपक्रम नसला तरी अखेरी उपसंहार असतो. जेथे कथेचा खंड स्वाभाविकपणे पडतो तेथे तो विस्तारपूर्ण असतो. जेथे कथेचा ओघ खंडित करून अध्याय संपविलेला असतो तेथे तो संक्षिप्त असतो. वाचकाचे चित्त विचलित होऊ न देण्याची, कथेवरील पकड ढिली होऊ न देण्याची ही दक्षता लक्षणीय आहे. या उपसंहारांचे स्वरूप मुख्यतः श्रोतृसंवादाचे आहे. त्यामुळे कविभूमिकेचे प्रकटीकरण व श्रोत्यांशी हितगुज त्यात येते. मुक्तेश्वरी आत्मनिवेदनातील आलंकारिक डौल आणि रसात्मकता हा एक आस्वाद्य अनुभव आहे. मुक्तेश्वरी अध्यायांच्या समारोपात वर्ण्य अध्यायाविषयीचा अभिप्राय व पुढील अध्यायांची सूचक प्रस्तावना येते. एक अध्याय संपविताना पुढील अध्यायांचे स्वरूप स्पष्ट व्हावे, चित्ताला त्याची ओढ लागावी, औत्सुक्य जागे रहावे यासाठी सूचकतेचे माहात्म्य त्यांनी जाणल्याची खूण त्यात आहे. पुढील कथाभागाचे महत्त्व सांगणे, त्याभोवतीच्या भावनांची पार्श्वभूमी सिद्ध करणे आणि श्रोत्याला श्रवणार्थ उत्कंठित करणे ही उद्दिष्टे त्यामागे असतात. त्या वा पुढील अध्यायातील संक्षेप-विस्तार, त्याचे मर्म-माहात्म्य रसमयता, व्यासभारताकडे पाहण्याची भूमिका, प्राकृतभाषेचे युक्तिवादपूर्वक समर्थन, गुरु-देव-पूर्वकवी यांविषयीचा कृतज्ञताभाव काव्यविषयक धारणा व लडिवाळ श्रोतृविनवणीही या उपसंहारात येते. या स्वतंत्र ओव्या मुक्तेश्वरांचे व्यक्तिमत्व व काव्यदृष्टी समजून घेण्यासाठी अभ्यसनीय आहेत.

आदिपर्वातील ३३ वा अध्याय ३८ ओव्यांचा आहे. तर सभापर्वातील १५ वा अध्याय २९१ ओव्यांचा आहे. असे कमीअधिक ओवीसंख्येचे अध्याय विषमरचनेचे वाटतील. तथापि आशयानुसार विस्ताराच्या दृष्टीने पाहिले तर ते प्रमाणबद्ध वाटतील. कथानुषंगाने आवश्यक असे धागे जोडून घेणाऱ्या गौण प्रसंगांचे कथन शंभराच्या आतल्या ओवीसंख्येच्या अल्पविस्तार अध्यायांनी ते करतात. सालंकृत वर्णने, स्वयंपूर्ण नीतीविचार वा वीर-शृंगाराचा रसप्रपंच मांडताना शंभर ते दोनशे ओवीसंख्या असलेले मध्यमविस्ताराचे अध्याय येतात. तीव्र भावक्षोभ आणि कथेच्या घटनेतील मर्मप्रसंग

चितारताना दोनशेहून अधिक ओवीसंख्येचे अतिविस्तृत अध्याय ते वापरतात. महाभारतातील अध्याय तुलनेने संक्षिप्त आहेत. अशा अनेक अध्यायांना पोटात घेणारे मुक्तेश्वरी अध्याय ओवीसंख्येने फुगलेले दिसतात.

औचित्य, कथावस्तूचा सलगपणा, बांधीवपणा व संक्षेपशीलता यांचे अवधान बाळगून मुक्तेश्वर अध्याय कल्पितात. शक्यतो स्वयंपूर्ण आख्यानांना स्वतंत्र अध्याय देण्याची दक्षता ते घेतात. त्यांच्या अध्यायरचनेचा विचार त्या त्या पर्वांच्या ' बांधणी 'त मागे केलेला आहेच.

## ६. कथानिवेदनाचे काही विशेष

### ६.१. संवादात्मक मांडणी

व्यास–वैशंपायन-सौती हे भारतकथेचे तीन निवेदक असून अनुक्रमे वैशंपायनादी शिष्य, जनमेजय आणि शौनकादी मुनी हे तिचे तीन श्रोते आहेत. व्यासांच्या आश्रमात गुरुशिष्यसंवादरूपाने ती प्रथम सांगण्यात आली. जनमेजयाच्या सर्पसत्रप्रसंगी व शौनकाच्या द्वादशवार्षिक यज्ञप्रसंगी तिचे पुनःकथन करण्यात आले. स्थल-प्रसंग-व्यक्ती यांत बदल झाले तरी वक्ता-श्रोता-संवाद ही भारतकथेची संवादात्मक मांडणी कायम राहिलेली दिसते. " प्रीतीने प्रश्न करितां राजा । वैशंपायन अनुवादे " ( १।१३।२१ ) अशी ही मांडणी मुक्तेश्वरांनी कायम ठेवली आहे. तिचे भान ठेवून निवेदकाच्या भाषेला ते बोलण्याचालण्याचा ढंग देताना दिसतात. मयसभेतील आपल्या उपस्थितीचा " व्यासशिष्यांमाजी रंक । मीहि एक त्या ठायीं " ( २।२।९७ ) असा हृद्य निर्देश त्यांचा वैशंपायन करतो. राजसूयाची धांदल वर्णिताना " तो संभ्रम कुरूभूषणा ! व्यास कीं एक मी जाणें " ( २।९।६६ ) असा तो जणू मनानेच त्या वातावरणात प्रविष्ट होतो. पूर्वानुभवाचे स्मरण व श्रोत्याचा निर्देश यामुळे संवादात्मक कथनाची प्रतीती येते. वक्तृश्रोतृसंवाद गुंफून त्यांनी कथेला वाहती ठेवली आहे. तिचा विकास व विस्तार साधला आहे. त्याची खरी बहार आदिपर्वात आहे. कधी या प्रश्नोत्तरांतून स्थल-काल-पात्र-प्रसंग यातील परिवर्तन सुचविले आहे. अनेक प्रसंग पोटात घेणाऱ्या अध्यायांना ही पद्धती वनपर्वात उपयुक्त ठरली आहे.

### ६.२. त्रयस्थ निवेदनपद्धती

या वक्तृश्रोतृसंवाद वक्त्याचे कथन अतिदीर्घ असून श्रोता बहुंशी मूक आहे. अशा संवादाचे प्रमाणही आदिपर्वानंतर कमी होते. त्यामुळे या संवादात्मक मांडणीच्या कथनास त्रयस्थ निवेदनाचे स्वरूप येते. भारतकथेचे निवेदक प्रत्यक्ष कथेपासून क्रमशः दूर जाणारे आहेत. त्यामुळे या निवेदनाला त्रयस्थपणाचा रंग चढत जातो. मुक्तेश्वरांनी त्याच पद्धतीचा आश्रय करून कथाकथन केले आहे. या पद्धतीत लेखक

आपल्या काव्यसृष्टीत अपरब्रह्माच असतो. तो सर्वसाक्षी सर्वज्ञाच्या भूमिकेतून कथारूप आशयाचे निवेदन करतो. कथांतर्गत व्यक्ती, घटना, त्यांचे परस्परसंबंध आणि कार्यकारणभाव यांची त्याला यथार्थ जाणीव असते. स्थलकालाची वा व्यक्ती-परिस्थितीची बंधने अशा निवेदनपद्धतीत असू शकत नाहीत. लेखक सगळीकडे उपस्थित असतो आणि सार्वत्रिक दर्शन घडवू शकतो. घटना व व्यक्ती यांचे वैचित्र्य असलेल्या महाकाव्यातील प्रदीर्घ व वस्तुनिष्ठ कथारूपाला ती निवेदनपद्धती अनुकूल व उपयुक्त ठरते. महाभारतकारांनी म्हणूनच ती वापरली व मुक्तेश्वरांनी कायम ठेवली. क्वचित रूचिवैचित्र्य म्हणून "गंधर्व निवेदी वृत्तांत" (३-१२-१६०) अशा आरंभाने येणारी पात्रमुखी निवेदनेही येतात.

## ६·३. स्वाभिप्राय-सूचन

या त्रयस्थ निवेदनातही प्रत्यक्ष कथाप्रसंगावर स्पष्ट वा सूचित भाष्य करून मुक्तेश्वर आपल्या मनाचा कल स्पष्ट करतात. अग्रपूजाप्रसंगी कौरवचैद्यांचा "कृष्णद्वेषी दुरात्मे" असा किंवा अनुद्यूतप्रसंगी द्यूतसभेचा "अधर्मसभा" असा स्पष्ट निर्देश ते करतात. पण स्पष्टतेपेक्षा स्वाभिप्रायसूचक उपमानांनी मनाचा कल प्रकट करणे त्यांना अधिक आवडते. कनकमृगाला लोभावलेल्या भ्रांतचित्त रामासारखे पांडव परत फिरले (२।१६।३२) असे अनुद्यूतासाठी परत फिरणाऱ्या पांडवांचे ते वर्णन करतात. त्याद्वारे त्या घटनेतील सारे दुर्दैवी ताण व्यक्त होऊन तिची अनिष्टताही सूचित होते. "सुग्रीव अथवा बिभीषण । झाले बंधुरवा उत्तीर्ण । तयांऐसें सुहृदपण । फळले प्रज्ञाचक्षूसी" (२।१४।११५) अशा शब्दांत दुर्योधन विदुरास विरोध करतो. विदुराला सुग्रीव-बिभीषण म्हणत असतानाच दुर्योधन स्वतःला नकळत अन्याय करणाऱ्या वाली-रावणाची भूमिका धृतराष्ट्राच्या गळयात बांधीत आहे! कथाप्रसंगांविषयीचा आपला अभिप्राय आलंकारिक सूचकतेने मुक्तेश्वर प्रकट करतात. सत्पक्षप्रीतीने त्यांचे भारत उजळलेले आहे.

## ६·४. अनुलोम पद्धती

विविध पात्रप्रसंगांनी भरलेली कथा महाभारतकारांनी कालानुक्रमाने सांगितली आहे. "जसे घडले तसे सांगितले." एवढेच सूत्र येथे पाळले आहे. अनुलोम पद्धतीचा एक विशेष म्हणजे त्यात कथानक 'वर्तमानकाळात' घडत जाते. त्यामुळे चित्रणात एक-प्रकारची निकटता व प्रत्यक्षता येते. ही दृश्यात्मक पद्धती महाभारतकारांच्या अनुसरणाने मुक्तेश्वरांनीही समर्थपणे वापरली आहे. त्यांचा भर आहे तो घटना-प्रसंगांच्या जिवंत चित्रणावर, व्यक्तिरेखांच्या अकृत्रिम विकासावर. आणि म्हणूनच जे जे घडले ते ते कसे घडत गेले हे तपशीलाचे अनेक बारकावे धरून दाखविल्याशिवाय ते राहत नाहीत.

या अनुलोम पद्धतीच्या पोटात कधी पूर्वकथनाचे तंत्र वापरले जाते. जसे, अग्रपूजाप्रसंगी खवळलेल्या शिशुपालाचा पूर्ववृत्तांत येतो. कधीं भविष्याचा वेधही घेतला जातो. जसे, व्यासभविष्यकथनात द्रौपदीस्वयंवर वा द्यूतप्रसंग अस्पष्टपणे प्रतिबिंबित झाला आहे. या पूर्वोत्तरकथनाने कालक्रमनिष्ठ निवेदनात वेगळेपणा आणण्याचा प्रयत्न महाभारतकारांप्रमाणे मुक्तेश्वरही करतात.

## ६·५. " पुढां कथेची सूचना "

कथेचे काही धागेदोरे वा त्यांची जुळणी आकस्मिक पद्धतीने करून कथानिवेदक त्यात औत्सुक्याचे रंग भरीत असतो; पण श्रोत्याला आपली कथामांडणी असंभाव्य वाटू नये म्हणून तो निरनिराळ्या पद्धतीने पुढील कथाभागाचे सूचनही करीत असतो. " ऐसी सूचना अर्थकुशळ । पुढां कथेची जाणोत ॥ " ( २।११।९४ ) अशी मुक्तेश्वरांनी कलात्मक सूचनाची आपली जाणीव प्रकट केली आहे.

अध्यायांच्या अखेरी पुढील कथाभागाचा प्रस्ताव, त्याचे मर्म, त्याची रसात्मकता यांच्या सूचना त्यांनी नोंदविल्या आहेत. पुढील कथेच्या श्रवणासाठीं श्रोत्यांची मने सजग व्हावीत व निरनिराळ्या अध्यायांत सलगता यावी या दुहेरी उद्देशाने अशा सूचना येतात. या सूचनाच खऱ्या पण त्रयस्थ निवेदनात वाच्यशब्दांनी दिल्यामुळे त्यात सूचकतेऐवजी एक प्रकारची स्पष्टता आली आहे. कधी मुक्तेश्वर पुढील कथाभागाची सूचना देणारे बीज स्वतंत्रपणे निर्मिलेल्या चिमुकल्या प्रसंगचित्रातून मांडतात. जसे, नारद-धर्म भेटीतून ( २।११।९५–९८ ) राजसूयाच्या त्रिविध उत्पातांची कल्पना त्यांनी दिली आहे. सूचकतेसाठी शकुनापशकुनावरील श्रद्धेचा कौशल्यपूर्ण वापर ते करतात. धर्माच्या राजसूयविचाराला प्रजेकडून अनुमोदन मिळताच शकुनारंभी उजवी देणाऱ्या देवाची ( २।१।१०० ) धर्माला आठवण होते त्यातून राजसूयाच्या सफलतेची ग्वाही मिळते. दुर्योधन, शिशुपाल, जरासंध यांचे जन्म; द्रौपदीवस्त्रहरण, पांडवांचे वनाभिगमन अशा प्रसंगी त्यांनी केलेली उत्पात-वर्णने सूचकतेच्या दृष्टीने पाहण्यासारखी आहेत. मानवीसृष्टीतील अमानुष घटनांची भीषणता निसर्गशक्तींच्या रौद्र क्षोभाने दर्शविली जाते. त्यातून त्या त्या घटनांच्या विपरीत परिणामांची सूचना मिळत राहते. ' पुढां कथेची सूचना ' देण्यासाठी मुक्तेश्वरांनी आधिक्याने वापरलेला मार्ग भविष्यकथनाचा आहे, हे मागे दाखविले आहेच. कथेची चित्ताला ओढ लागावी, कथेचे औत्सुक्य जागे रहावे यासाठी सूचकतेचे असलेले माहात्म्य मुक्तेश्वरांनी जाणल्याची खूण त्यांच्या विचारात व या आचारात आहे.

## ६·६. कथाविकासातील सूक्ष्मता

रचनास्वातंत्र्य घेऊन मुक्तेश्वर सूक्ष्मतेने कथाविकसन साधताना दिसतात. व्यासभविष्यकथनात " म्हणोनि नला आणि रामा । अपाय घडले जाणता " ( २।१२।९ ) असा राज्यत्याग करून वनवास भोगणाऱ्या नृपश्रेष्ठांचा निर्देश आला आहे. त्याचा धागा

पकडून शकुनीच्या कपटपाशांना रामावतारी मृग आणि नलकाली कपटपाश असल्याची पार्श्वभूमी ( २।१२।९९–१०० ) ते निर्मितात. नला–रामाचेच दुःख धर्माच्याही वाट्याला येते. कनकमृगाला लोभावणाऱ्या रामासारखाच तोही भ्रम पावून अनुद्यूतासाठी येतो ( २।१६।१२ ) आणि नलासारखा कपटपाशांनी जखडला जातो. वेदनेच्या वाटेवरचे हे टप्पे परस्परांना जोडणाऱ्या निर्देशातून मुक्तेश्वर स्वतंत्रपणे उभे करतात. पुढचे–मागचे संदर्भ ध्यानी घेऊन, जाणीवपूर्वक त्यांना एकत्र बांधीत मुक्तेश्वर कथावस्तुचे सूक्ष्म विकसन घडवितात.

## ६·७. कथाविकासातील क्रमशः तीव्रता

द्रौपदी आपल्याला हसली हा दुर्योधनाच्या मनाला सतत जाळणारा अंगार आहे. विषप्राशन करणाऱ्या शंकराच्या तितिक्षेने तो ते पचवितो पण " याचें फळ सभास्थानीं। भोगवीन अपार " ( २।१२।५९ ) असा निश्चय मनात करूनच. सूड आणि मत्सर यांनी बेभान झालेल्या दुर्योधनाला पांडव द्रौपदीसह रंक होऊन दास होतात, तेव्हाच हसू फुटते ( २।१४।१६७ ). साऱ्या अपमानाचा बदला घेण्याचा वेळ आता आलेली असते. दुर्योधनाच्या संतापाचे आततायीपणात कसे रूपांतर होते, ते मुक्तेश्वर क्रमशः दाखवितात. " सामोपचारें आणावी " असे तो आधी विदुराला सांगतो. त्याने नकार देताच " नेत्र खंडीत " प्रतिकामीला तो म्हणतो, " गृहा आणोनि बलात्कारें। दासीकामीं योजावी " तेवढ्याने भागत नाही म्हणून दुःशासनाला " केश कवळूनिया मुष्टीं। ओढून आणावी गोरटी " अशी सूचना करतो व " स्त्रीमर्यादा न धरावी " असेही बजावतो. ती आल्यावर कर्ण-शकुनीच्या हातावर टाळ्या देत निर्लज्जपणे तिचे रूपलावण्य निरखून पाहतो. कामातूर होऊन जानु दाखवितो. " येऊनि बैसें मांडीवरी " असे उन्मत्त आवाहन करतो. तिचा शापोक्तिअनुवाद ऐकताच बेभान होऊन, " म्हणे, ' जिव्हा छेदा शस्त्रें। खंडविखंड करा गात्रें। नग्न करा हिरोनि वस्त्रें। पांचही पुरुषादेखतां ' " अशी आज्ञा तो देतो. या उद्‌गारावर त्याच्या हृदयातील सूडाचे आणि संतापाचे जळते पाणी आहे. " सामोपचारें आणावी "चे पर्यवसान या आततायीपणात झाले आहे. ( २।१५।१, ५, ७, १९-२०, ४५-४७, १०६, ११७ ). भावप्रसंगांना क्रमशः तीव्र करीत नेण्याचे हे खास मुक्तेश्वरी तंत्र आहे.

## ६·८. निवेदनशैलीचे आणखी काही विशेष

मुक्तेश्वरांची निवेदनपद्धती बदलत गेलेली दिसते. सौप्तिकातील निवेदन मूलक्रम अनुसरणारे आहे. त्यामुळे कथानिवेदनात विक्षेप आणणारे धृतराष्ट्राचे मूलप्रश्नही ( जसे, १०।२।४७–४९ ) कायम ठेवलेले दिसतात. आदिपर्वात ही प्रास्ताविक प्रश्नोत्तरे कथाबांधणीसाठी रसपूर्ण विस्ताराने वापरलेली दिसतात. सभा-विराटात निवेदनाचा ओघ अखंड ठेवण्यासाठी अशी प्रश्नोत्तरे गाळण्याकडे कल आहे. नारदनीतीतील धर्माच्या मुखाचा एकुलता एक प्रश्न नारदाच्या सलग निवेदनात चतुराईने गुंफून त्यांनी

निवेदनाचा ओघ कायम ठेवला आहे. सहदेव सैन्यातील अग्निप्रलयाचे जनमेजय कारण विचारतो व मग त्यामागील कुतुहलजनक वृत्तांत येतो. नीलोपाख्यानाच्या या मांडणीत औत्सुक्यवर्धक नाट्य असल्याने मुक्तेश्वरांनी ती कायम ठेवली आहे. कथानिवेदनात "कर्मे कैसीं वोढवलीं?" किंवा "दैव कैसें उदेलें?" असे श्रोत्यांचे औत्सुक्य चाळवणारे प्रश्न मुक्तेश्वर विचारतात. सारे दैवनियत आहे या श्रद्धेने दैवाची छाया अशा घटनांवर पसरून दिल्याशिवाय त्यांना राहवत नाही. त्यांचा हा वृत्तिविशेषच कथानिवेदकाच्या सहजशैलीने श्रोत्यांना विचारलेल्या अशा प्रश्नांतून प्रकट होतो. शैली आणि वृत्ती यांचे नाते असे घट्ट असते.

एकदा संक्षेपाने तर एकदा विस्ताराने सांगण्याच्या पद्धतीने महाभारतात पुनरुक्ती आली आहे. आदिपर्वात तिचे क्वचित अनुसरण असले तरी सभापर्वापासून मुक्तेश्वरांनी ही मांडणी बदलली आहे, पुनरूक्ती गाळल्याने कथेचा ओघ गतिमान राहिला आहे. आदिपर्वाच्या कथाप्रकृतीमुळे पुनःकथन करणे त्यांना भाग पडले आहे. सलग कथेचे मधे येणाऱ्या उपकथांनी स्पष्टीकरण केल्याने इतका विस्तार होतो की मूलकथेचे धागे जोडण्यासाठी पुनःकथन करावे लागते. अन्यत्र मात्र कथेची गतिमानता टिकविण्याकडे मुक्तेश्वर अवधान देताना दिसतात.

स्थल, काल, पात्र, अन्य कथा असे वर्ण्यविषयातील बदल सुचविताना 'यावरी' किंवा 'येरीकडे' (जसे, आदि ७।६२, ९।९५, ११।३१, २९।१५१, ३६।१०४ असे शब्द मुक्तेश्वर योजतात. एक कथांश संपवून दुसऱ्या कथांशाला आरंभ करताना मुक्तेश्वर 'असो' (जसे, सभा. १२।४३; १ ।१७३, १९५ वन. २।७२, १।९२) वापरतात. विस्ताराने सांगणाऱ्या गोष्टीवेल्हाळ कथानिवेदकाचा तो सहजोद्गार आहे.

**भरघोस, प्रतीतिक्षम निवेदन** हे मुक्तेश्वरी निवेदनाचे ठळक लक्षण आहे. भीम-कीचकाचे बाहुयुद्ध असो की शिशुपालाचे वाक्‌युद्ध असो मुक्तेश्वरांची वाणी त्याच उत्साहाने खळाळत असते. दुर्वासभोजनाचा थाट असो किंवा नजराण्याचे दीर्घ वर्णन असो तिचा प्रशांत प्रवाह वाहतच राहतो. कणिकनीतीसारखा राजनीतीचा विषय असो की व्यासभविष्यकथनासारखी जीविताबगाहनी चर्चा असो ती सारख्याच ताकदीने पेलते. आस्तिकाची आशीर्वचने असोत वा प्रणयी मिथुनांचे चतुरालाप असोत ती तितक्याच प्रसन्नतेने रंगविते. महाभारताच्या मर्मप्रसंगांचा वेध घेताना तिचे सारे सामर्थ्य एकवटून येते. त्यांची वर्णने उत्कट आणि जिवंत आहेत. संवाद ओजस्वी आणि भावशील आहेत. निवेदन गतिशील व वेधक आहे. संस्कृतचा डौल आणि बोलीचा कसदारपणा यांनी त्यांच्या भाषेला बळ दिले आहे. शब्दांचा साक्षेपी व कोरीव कुसरीचा वापर तीत आहे. आस्वादकांच्या प्रतिक्रिया टिपणे, श्रेणीपद्धतीने विचारविवरण करणे आणि प्रसंगानुरोधाने सुभाषिताच्या वळणाची सूत्रमय भाषा लिहिणे या तिच्या स्वाभाविक लकबी आहेत. कोरीव शब्दचित्रे, अनेकघटकयुक्त गतिशील चित्रण, अनेकांगी आरेखन, उपरोधाचा फणकारा हे आपले सामर्थ्य ती अर्थव्यक्तीसाठी एकवटते. पुराणसंस्कारांशी

वाचकांना जोडणारी, संवेदनागर्भ व अर्थवती अशी ही भाषा आहे. ती आवेगपूर्ण व भावोद्रेकी आहे त्यांची निवेदनशैली साभिप्राय, उत्कट व विस्तारशील आहे. ती जशी वेगवती आहे. तशी वेधवतीही आहे. तिचा बाज महाकाव्यात्म आहे. त्यमुळे महाभारताची भव्योदात्त कथा तिच्यातून सुघडपणे व्यक्त झाली आहे.

## ७. समारोप

गतकाळापासून राष्ट्रजीवनाशी संबद्ध असणारी, भूतकाळाचे दर्शन घडवून भविष्याचे दिग्दर्शन घडविणारी, भव्योदात्त आदर्श उभारणारी आणि प्रतीकात्मक पातळीवर जाणरी महाभारतकथा मुक्तेश्वरांनी स्वीकारली आहे. तिची जुळणी मात्र आपल्याला भावलेल्या जीवनार्थाने त्यांनी केली आहे. माणसाचे जीवन ईश्वरनियंत्रित असल्याचे ते मानतात. हा ईश्वर त्यांच्या भारतात कृष्णरूपाने वावरत आहे. कृष्ण पांडवांच्या मुळातील स्नेहसंबंधांना येथे देव-भक्तसंबंधाचे रूप येते. साहजिकच विरोधकांवर देशद्रोह्यांचा रंग चढत जातो. या बदलत्या दृष्टीमुळे कृष्णदेवाला मध्यवर्ती स्थान प्राप्त होते. साऱ्या केंद्रवर्ती घटनांमागील क्रियाप्रेरक केंद्र तोच आहे. भारती कथा पांडवांचा विक्रम, कौरवांची खलकृत्ये व कृष्णाचे बुद्धिचातुर्य याभोवती फिरते. मुक्तेश्वरी भारतकथा मात्र कृष्णाच्या नीलप्रभेने उजळून गेली आहे. त्यामुळे साधुपालनाचे व दुष्टदंडनाचे ईश्वरी अवतारसूत्र भारतकथेमागे त्यांना सहजासहजी उभे करता आले. मुळातील राजपुरुषांची संघर्षकथा येथे अशी भगवंताची अवतारलीला ठरते.

ईश्वरी योजनेची प्रत्यक्ष कार्यवाही यंत्रणा म्हणून दैवाचे सूत्र ते सर्वत्र खेळवितात. घटिताचे मुक्तेश्वरी आकलन दैवप्रधान आहे. मानवी जीवनाची तर्कहीन, अज्ञेय पण दैवनियत गती ते महाभारतात शोधतात आणि तिची आठवण वारंवार जागवितात. काळ, कर्म व प्रारब्ध या महातत्त्वांनी त्यांच्या भारतातील जीवनचित्राला घाट दिला आहे. त्यांची पात्रे दैवनिर्भर व दैवविश्वस्त आहेत. घडणाऱ्या घटना दैवनियत आहेत या जाणिवेने ती त्यांना सामोरी जातात. या पात्रप्रसंगाच्या चित्रणात प्रारब्धाचे घनदाट सावट त्यांनी पुऱ्या गांभीर्याने भरून दिले आहे. स्थितिशील समाजाच्या साचेबंद चौकटीत जगताना मुक्तेश्वरांना महाभारतात अस्पष्ट रीतीने वावरणारी ही दैववादी धारणा ठसठशीत कराविशी वाटली. त्यामुळे त्यांच्या भारताला वेगळेपण आले आहे.

दैवनियत दुःखभोगातही मानवी मन अविचल राहते ते मूल्यनिष्ठेमुळे. त्यामुळे सत्य, ज्ञान, कृतज्ञता, भक्ती, नीती अशी मूल्ये, कुटुंबनीती, सामाजिक सदाचार आणि राजनीती असा अनेकांगी मूल्यविचार मुक्तेश्वरी भारतात आला आहे. तो केवळ लोकशिक्षकी बाण्याचा व उपरा नाही. मूल्यनिष्ठेने वागणाऱ्या व्यक्ती संकटातही तरून जातात आणि त्यांचा भंग करणाऱ्या व्यक्ती विजयातही विषण्ण होतात, असे ते दाखवितात. आपल्या आध्यात्मिक व नैतिक विचारांचे भावरूप मुक्तेश्वरांनी महाभारताधारे घडविले आहे. उचित प्रसंगांच्या विस्तारातून, पात्रमुखी संदर्भानुसार

गोविलेल्या सुभाषितांतून आणि पात्रांच्या मूल्याधिष्ठित कृतींच्या आग्रहातून मूल्यात्मकतेची प्रभा पसरलेली आहे. भक्तीचा भगवा रंग तर शक्य तिथे पसरला आहे. मुळात स्पष्टास्पष्ट रूपांनी ही मूल्ये आहेतच; पण मुक्तेश्वरी भारतात त्यांची सहेतुक जाणीव आहे. चित्रणात ठसठशीतपणा आहे. श्रोतृमानसाला संस्कारित करण्याचा धिवसा आहे. मुक्तेश्वरांची जीवनदृष्टी उचंबळून येण्याइतकी भावशील आहे, मर्म जाणण्याइतकी ज्ञानशील आहे आणि इतरांना संस्कारित करण्याइतकी देखणी आहे. मध्ययुगीन जीवनाची आणि वाङ्मयाची केंद्रवर्ती प्रेरणा असलेल्या भक्तीच्या भावभूमिकेवर भारत-कथेला अधिष्ठित करून मुक्तेश्वरांनी तिचे स्वकालोचित नवरूप घडविले आहे.

भविष्यकल्पनेचा वापर, विनोदाचा शिडकावा, अद्भुताची डूब, अतिरेकाने येणारी अश्लीलता व समकालीन जीवनाचे संदर्भ पेरीत जाणारा कालविपर्यास हे मुक्तेश्वरी कथा-बंधाचे विशेष महाभारतात अधिक गडद रूपात आले आहेत.

भारतीय पर्वांचे नेमके वाङ्मयरूप ओळखून मुक्तेश्वर त्यांचा कथाबंध घडवितात. त्या त्या पर्वातील मध्यवर्ती विशेषांभोवती ते कथा फिरती ठेवतात. कथाविकसनात सूचकता, सूक्ष्मता, क्रमशः तीव्रता आणि वेग-ओघ याकडे त्यांचे अवधान असते. प्रतीत्युपायवैकल्य व संभावनाविरह ही रसविघ्ने टाळून कथेत स्वाभाविकता व सुसंगती आणण्याची धडपड ते करतात. कथेच्या चित्राकृतीत पात्रांना यथाप्रमाण स्थान देण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. सुटे धागे मध्यवर्ती सूत्राशी जोडून ते त्याला भरीव व उठावदार करतात. त्यामुळे त्यांची कथा सुसूत्र व वेगवती होते. नामा पाठक, विष्णुदास नामा व एकनाथ या पूर्वकवींच्या सापेक्षतेने मुक्तेश्वरी कथाबंध आटोपशीर व बंदिस्त वाटतो.

भारती पर्वयोजना ते स्वीकारतात पण उपपर्व व अध्यायविभाजन नाकारतात. आपली कथा ते अध्यायात विभक्त असलेल्या ओवीबंधात सांगतात. औचित्य, संक्षेप-कुशलता, बांधीवपणा व सलगता यादृष्टीने, तुरळक अपवाद वगळता, मुक्तेश्वरांचे कथाविभाजन नेमके आहे. मुक्तेश्वरांची कथामांडणी भारताच्या कथेपेक्षा त्याच्या आर्ष काव्यरूपास सांभाळणारी आहे. महाभारतासारख्या प्रदीर्घ आणि वस्तुनिष्ठ महाकाव्याला अनुकूल असलेली संवादात्मक मांडणी व अनुलोम त्रयस्थ निवेदनपद्धती मुक्तेश्वरांनी मूलानुसार ठेवली आहे. त्यांची निवेदनशैली महाकाव्यात्म वळणाची आहे. या साभिप्राय, उत्कट व विस्तारशील निवेदनातून महाभारताची भव्योदात्त कथा सुघडपणे अभिव्यक्त झाली आहे.

□ □ □

# तीन ॥ व्यक्तिचित्रण

## १. व्यक्तिचित्रण : स्वरूपविवेचन

विशिष्ट स्वभावधर्मांच्या काही व्यक्ती विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट हेतूने वावरतात. त्यांच्या क्रियाप्रतिक्रियांमधून कथानकाचा विकास होत असतो. अशा प्रकारे घटना व्यक्तिस्वभावातून आकार घेतात, तर उलट त्या व्यक्तिस्वभावावर प्रकाशही टाकतात. घटना व व्यक्तींचे हे परस्परानुवर्तित्व अत्यंत महत्त्वाचे असते. कृती-उक्तीप्रमाणेच भाष्यातूनही कवी व्यक्तिदर्शन घडवू शकतो. हे भाष्य कधी त्या व्यक्तीच्या स्वगत आंदोलनातून, कधी इतरांच्या अभिप्रायातून तर कधी तृतीयपुरुषी निवेदनाच्या स्वरूपात व्यक्त होते.

महाकाव्यात श्रेष्ठ व्यक्तींची चरित्रकथा यावी, असा संकेत आहे. ही पात्रे उच्चपदस्थ कुलीन व वरच्या सांस्कृतिक पातळीवरील असल्याने त्या काळातील सर्वसाधारण अनुभव साकल्याने चितारणे शक्य होते. व्यक्तींच्या कृतिशील जीवनाचे चित्रण त्यात येते. या कृतीही प्रवासासारख्या बहिर्मुख किंवा युद्धासारख्या प्रक्षुब्ध घटनांशी निगडित असतात. प्रभावी व्यक्तिदर्शनामुळे जीवनाचे अनेकांगी व भव्य दर्शन घडविणे महाकवीला शक्य होते. व्यक्तिरेखांना आदर्शात्मक रूप देण्याकडे त्याचा कल असतो. व्यक्तीच्या सुखदुःखाचे आविष्करण त्यातून होते. तथापि ही सुखदुःखे केवळ वैयक्तिक नसतात. या व्यक्तींच्या रूपाने सकल समाजाचीच सुखदुःखे त्यात एकवटलेली असतात. या व्यक्तींमधून महाकवी मानवी मनाचाच वेध घेत असतो. त्यामुळे त्यातील व्यक्ती प्रातिनिधिकतेकडे, प्रतीकात्मकतेकडे झुकत जातात. याविषयी आणखीही सांगता येण्यासारखे आहे. तथापि मुक्तेश्वरकृत व्यक्तिदर्शन न्याहाळताना त्याचा आधार घेणे अधिक योग्य होईल.

## २. मुक्तेश्वरी भारतातील व्यक्तिचित्रणाची विशिष्टता

महाभारत भारतीय संस्कृतिविश्वाचा अविभाज्य घटक असलेला महाग्रंथ आहे आणि मुक्तेश्वरी भारत त्याचे मराठी संस्करण आहे. त्यामुळे मुक्तेश्वरी व्यक्तिचित्रणाला जसे बळ लाभले आहे तशी बंधनेही प्राप्त झाली आहेत.

**व्यक्तिरेखांचे मूलाकार** : महाभारती व्यक्तिचित्रांची सृष्टी विलक्षण सजीव आणि व्यामिश्र आहे. महाभारताच्या काव्यात्मकतेचे ते वैभव आहे. वास्तवता आणि प्रतीकात्मता या दोन्हींनी ती रंगलेली आहेत. या स्वभावचित्रांच्या गुंफणीतून मानवी

स्वभावचित्रण ही कथाविकासाचीच दुसरी बाजू असते, याचे प्रत्यंतर मुक्तेश्वरकृत नवप्रसंगनिर्मितीतही येते. जसे, द्यूतसमयो भीमामुळे 'कपट सपाट' होणे, अशा प्रसंगामुळे मूळ व्यक्तिरेखांचे काही विशेष ठसठशीत होतात तर काही नव्या विशेषांची जोड त्यांना मिळते. अशा वेळी केवळ भारती व्यक्तिरेखांची मूलाकृती डोळ्यासमोर ठेवून समीक्षा करणे योग्य होणार नाही.

भविष्यतत्त्वाचा आश्रय केल्याने आपल्या पात्रांना भविष्यकालीन घटना ज्ञात असतात, असे दाखविण्याकडे मुक्तेश्वरांचा कल झुकतो. त्यांचा कृष्ण त्रिकालदर्शी व सर्वज्ञानी आहे. व्यास-नारदादी मुनी व पांडवादी सत्पक्षीय यांची अशीच काहीशी स्थिती आहे. त्यामुळे त्यातील घटनाप्रसंगाप्रमाणे व्यक्तींच्या कृतिउक्तींवरही पूर्वनियोजनाची छाया पसरते. ती दैवाच्या सातत्यशील पुनरावर्तनाने अधिक घनदाट होते.

त्यामुळे व्यक्तिचित्रण वस्तुतः निर्जीव होण्याची भीती होती. पण तसे होत नाही. याचे ठळक कारण मुक्तेश्वरी व्यक्तिरेखा लौकिक व अलौकिक अशा द्विविध पातळीवर वावरतात, हे आहे. कथांतर्गत व्यक्तींनाही याची जाणीव असल्याचे मुक्तेश्वर दाखवितात. प्रचीन मराठी कथाकाव्ये बहुंशी परमेश्वराच्या लीलाख्यानाच्या घाटाची असल्याने ही प्रवृत्ती त्यातून स्पष्टत्वाने प्रतिबिंबित झाली आहे.

मुक्तेश्वरी महाभारताचे व्यासभारताधारित वाङ्मयरूप व तदंतर्गत वाङ्मयीन वृत्तिविशेष यामुळे त्यातील व्यक्तिचित्रणाला एक विशिष्टता आली आहे. या व्यक्तिरेखा पारंपरिक थाटाघाटाच्या उतरणे अपरिहार्य असले तरीही त्यांच्या चित्रणात मुक्तेश्वरांनी कौशल्य व पृथक्त्व प्रकट केले आहे.

## ३. नांदापूरकरांच्या मताचा परामर्श

महाभारत व मुक्तमयूरांच्या व्यक्तिचित्रांचे तौलनिक परीक्षण करून मुक्तेश्वरांना "....व्यक्तिदर्शन सुसंबद्धपणे करता आले नाही"[२] असा अभिप्राय नांदापूरकरांनी दिला आहे. त्यांनी आपले विवेचन तात्त्विक पातळीवर एकत्रितपणे न करता विविध व्यक्तिरेखांच्या प्रत्यक्ष अवलोकनाच्या संदर्भात केले आहे. प्रत्यक्ष तपशीलाशी संबद्ध अशा या विस्तृत विवेचनाचा[३] सविस्तर परामर्श स्थलाभावी अशक्य आहे. तथापि त्यातील हेत्वाभासाचे स्थूल दर्शन घडविणे शक्य आहे व तेवढेच येथे करावयाचे आहे.

( १ ) मुक्तेश्वरी भारतातील संदर्भ नांदापूरकरांनी काही वेळा काळजीपूर्वक लक्षात घेतलेले नाहीत. भीमाच्या संदर्भात ते लिहितात, "तो दुर्योधनाची मांडी मोडण्याची दुःशासनाचे वक्षस्थल फोडण्याची प्रतिज्ञा करतो. पण त्यातही आवेश नाही. त्या दोन्ही प्रतिज्ञा उशिरा केल्या आहेत. प्रथम द्रौपदी दुर्योधनास म्हणते, 'तुझ्या मांडीवर भीमाची गदा बसेल' आणि त्यानंतर भीम मांडी फोडण्याची प्रतिज्ञा करतो. तसेच

---

२. १. ना. गो. नांदापूरकर, मुक्तमयूरांची भारते, हैदराबाद, १९५६, पृ. ३८९.

३. २. तत्रैव, उन्मेष चवथा, व्यक्तिदर्शन, पृ. २१४–३८९.

द्रौपदी वस्त्रहरणाच्या संकटातून पार पडल्यानंतर भीम दुःशासनाचे वक्षस्थळ भेदण्याची प्रतिज्ञा करतो. या दोन्ही प्रतिज्ञा वेळेवर न केल्यामुळे अप्रयोजक आणि हास्यास्पद आहेत. मुक्तेश्वरी भीम असा विक्षिप्त आणि माथेफिरू आहे. " ( पृ. २९९ )

नांदापूरकरांचे हे लिहिणे मुक्तेश्वरी संहितेवर अन्याय करणारे आहे. दुर्योधन द्रौपदीस जानू दाखवितो ( २।१५।१०६ ) तेव्हा भीम त्याची मांडी फोडण्याची प्रतिज्ञा करतो ( २।१५।१०७–१०८ ). त्यानंतर दुर्योधनाचे पापशब्द ऐकून द्रौपदी भीमाची गदानोवरी तुला योग्य असे म्हणते ( २।१५।१०९–११६ ) असाच मुक्तेश्वरी रचनाक्रम आहे. वस्त्रहरण थांबल्यानंतर अपशकुन–कोलाहल होणे व त्याबरोबर भीमाने प्रतिज्ञा करणे ( मभा २।६१।४२–४६, मुभा २।१५।२४९–२५४ ) या घटनांचा क्रम मूलानुसारी आहे. वस्त्रहरण थांबते कसे ते महाभारतकारांपेक्षा वेगळ्या पद्धतीने मुक्तेश्वरांनी सांगितले आहे. पण वस्त्रहरण थांबल्यावर भारती भीमाप्रमाणेच त्यांचाही भीम प्रतिज्ञा करतो. यात उशीर कोठे झाला ? आणि मुक्तेश्वरांचा भीम ' विक्षिप्त व माथेफिरू ' कसा ठरतो ?

दुर्योधनाविषयी ते लिहितात, " मुक्तेश्वरांनी ह्यास लेखकाचे नि भंडाऱ्याचें काम दिले तरी हा निमूटपणे करतो. " महाभारताविरुद्ध — म्हणजे पर्यायाने दुर्योधनाच्या मूलप्रकृतिविरुद्ध—काम मुक्तेश्वरांनी त्यास स्वतंत्रपणे दिले, असे नांदापूरकर सुचवितात. " उपायनें येती भेटी । धनरत्नाचिया कोटी । दुर्योधनें पाहूनि दृष्टीं । मग भांडारीं रक्षणें " ( २।९।५८ ) या मुक्तेश्वरी वर्णनाशेजारी " दुर्योधनस्त्वर्हणानि प्रतिजग्राह सर्वशः " ( २।३२।८ ) हे भारती वर्णन ठेवले तर व्यक्तिरेखेला तडा जाणारा कोणता बदल त्यात दिसतो ?

मुक्तेश्वरी भारत व व्यासभारत यांतील तपशील दुर्लक्षून नांदापूरकर कधी विधाने करतात. तुल्य विषयांचे बिनचूक संदर्भ व नेमके स्वरूप ही तुलनेची प्राथमिक अट त्यांच्या विवेचनात काही वेळा पाळली गेली नाही.

( २ ) काही वेळा व्यासभारत व मुक्तेश्वर यांनी एकच गोष्ट सांगितल्याचे त्यांना मान्य असते; पण त्याविषयीचे त्यांचे अभिप्राय मात्र विरुद्धार्थदर्शक असतात. भारती भीमाविषयी ते लिहितात, " द्रौपदीस सभेत आणलेले पाहताच तो रागाने लाल होतो; पण शांत राहतो; पण शांतीलाही काही मर्यादा असतेच. दुःशासन द्रौपदीची विटंबना करीत आहे हे पाहून तो परमावधीचा खवळतो. " ( पृ. २९७ ). मोरोपंती भीमाविषयी ते लिहितात, " पंतांचा भीम संयमशील आहे. द्रौपदीस जिंकताच कर्ण दुर्योधनाच्या हातावर टाळी देतो तेव्हा हा उगाच बसतो; पण दुःशासन जेव्हा द्रौपदीस धरून फरफरा ओढीत आणतो ... तेव्हा तिची अनुकंपनीय अवस्था पाहून भीमाचा क्रोध उद्दीपित होतो. " मुक्तेश्वरांच्या भीमावर मात्र पुढील शेरा दिला आहे, " त्याला शत्रूच्या कृतिउक्तीने राग येत नाही, तर द्रौपदीच्या अवलोकनाने येतो, असा तो चमत्कारिक आहे. " ( पृ. २९९ ). तिघांचेही भीम अपमानित द्रौपदी पाहून संतप्त होतात, ही वस्तुस्थिती

नांदापूरकर स्वतःच सांगतात; पण महाभारतकार-मोरोपंत यांचे भीम ' संयमी ' ठरावेत आणि मुक्तेश्वरांचा भीम मात्र ' चमत्कारिक ' ठरावा ना !

नांदापूरकर मुक्तेश्वरांकडे पूर्वग्रहाने पाहतात. महाभारतकारांनी लिहिले ते चांगले; त्यानुसार मोरोपंत लिहितात म्हणून तेही चांगले वा क्वचित मूलाहून सरस आणि त्यापेक्षा वेगळे लिहितात म्हणून मुक्तेश्वर कमी प्रतीचे असे जणू सूत्र ठरवूनच ते लिहितात. सदृश प्रत्यय देणाऱ्या भागावरही त्यांनी याच पद्धतीने अभिप्राय दिले आहेत. तौलनिक निरीक्षकाजवळ अभिनिवेशरहित, पूर्वग्रहमुक्त ताटस्थ्य हवे, याचे भान काही वेळा त्यांच्या तुलनेत विसरले गेले आहे.

( ३ ) भारती व्यक्तिचित्रणात व्यासप्रतिभेचा परमोत्कर्ष आहे. सखोल व व्यापक समरसतेने आणि कलावंताच्या अलिप्ततेने त्यांनी एकेक व्यक्तिरेखा रंगविली आहे. तिच्यावर व्यासप्रतिभेच्या प्रकाशाचा अनेकरंगी फिरता झोत आहे. त्यामुळे प्रामाणिकपणे आकलन करू पाहणारास त्यांची विविध दर्शने सारख्याच उत्कटतेने भावू शकतात. मराठीतील महाभारत-समीक्षा व महाभारताधिष्ठित ललित लेखन याचीच साक्ष आहे. महाभारत व्यक्तिदर्शन समीक्षेची ही वस्तुस्थिती लक्षात घेतल्यावर व्यक्तिचित्रणाच्या तौलनिक अभ्यासात मूळ व्यक्तिरेखेचे समीक्षकाने गृहित धरलेले स्वरूपही विवाद्य ठरू शकते; हे ध्यानी येते. या दृष्टीने धर्मराजाविषयीची नांदापूरकरांची काही विधाने पाहण्यासारखी आहेत. ".. द्रौपदीस पणास लावण्यात केवळ ईर्ष्या किंवा मूर्खपणा नसून, प्रतिपक्षाच्या मूर्खपणाचा आपल्या हितासाठी उपयोग करून घेण्याची ती युक्ती होती हे दिसते." ( पृ. २२९ ) किंवा "अशा प्रकारे सभेतील मौनावरून तो प्रसंग ओळखीत नव्हता असे वाटण्याचा संभव आहे. पण तसे नसून त्याचे आचरण तेथे फारच गहन आणि धोरणाचे दिसते" ( पृ. २३१ ). अशा प्रकारे नांदापूरकरांना द्यूतप्रसंगातही धर्माच्या मुत्सद्दीपणाचा व धूर्ततेचा प्रत्यय येतो ! धर्माचा हा "राजकारणीपणा" मुक्तेश्वरी धर्मात नाही व मोरोपंती धर्मातही कमीच आहे; असा मग ते सहजीच अभिप्राय ( पृ. २३१–२३२ ) देतात.

भारती धर्माविषयीचे नांदापूरकरांचे विवेचन विवाद्य आहे. त्याचा प्रतिवाद करता येईल आणि मग स्वाभाविकच मुक्तमयूरांना त्यांनी लाविलेला बोलही परतविता येईल. अर्थात भारती व्यामिश्र व्यक्तिरेखांच्या संदर्भात कोणाही समीक्षकाच्या व्यक्तिनिष्ठ निरीक्षणांना आव्हान करता येण्यासारखे असल्याने नांदापूरकरांना एकट्यालाच दोष देणे योग्य ठरणार नाही. तथापि असा मूलप्रत्ययात्मक विवाद्य भाग त्यांच्या तौलनिक समीक्षेत अंतर्भूत आहे, एवढेच येथे नमूद करावयाचे आहे.

( ४ ) भारती पात्रे व मुक्तेश्वरी पात्रे यांची तुलना करताना त्यांच्या स्वतंत्र चित्राकृतींचे ( पॅटर्न ) भान नांदापूरकर बाळगत नाहीत, असेही कधी दिसते. धर्माविषयी ते लिहितात, द्यूत विनोदासाठी चालला आहे अशी मुक्तेश्वरांच्या धर्माची समजूत आहे. काही डाव जिंकल्यानंतर दुर्योधन त्यास सांगतो की शकुनी तुजशी खेळेल,

ते मान्य करून हा खेळतो; पण हार आल्यावर हा चिडतो, वेडा होतो, याची विचारशक्ती लोपते, यास्तव हा बंधूंना पणाला लावतो आणि शेवटी वर्दळीवर येतो. सारांश सभेतील द्यूतप्रसंग समजण्यास हा असमर्थ असतो." (पृ. २२९–२३०)

नांदापूरकरांच्या तौलनिक विवेचनात अनुस्यूत असलेले व मागे दाखविलेले दोष येथेही आहेत दुर्योधनाच्या वतीने शकुनीने खेळणे व धर्माची बेभान द्यूतकाराची मनःस्थिती महाभारतातही आहे. "एकासाठी दुसऱ्याने द्यूत खेळणे हे अयोग्य आहे, असे सांगूनही तो खेळतोच" (पृ. २२८) किंवा "इरेस पेटून संपत्तीनंतर तो बंधूंनाही पणास लावून हरवून बसतो ... या अपजयाने तो चिडलेला असतो" (पृ. २२९) ही नांदापूरकरांची भारती धर्माविषयीची विधाने पाहताना मुक्तेश्वरी रचनेतील सदृश चित्रण त्यांना पटण्यास हरकत नव्हती. तथापि पूर्वग्रह व संहितेविषयीचे अनवधान यामुळे त्यांनी मुक्तेश्वरी धर्मास बोल लावला आहे.

द्यूतप्रसंग विनोदासाठी चालल्याची धर्माची समजूत व त्यावरून प्रसंग ओळखण्याची त्यांची असमर्थता असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. "येथे भारतीयता तर दूरच पण त्यास साधा मानवव्यवहारही कळत नाही" (पृ. २२९) असा कडक अभिप्रायही त्यांनी दिला आहे.

या ठिकाणी मुक्तेश्वरी रचनेतील बांधणी त्यांनी लक्षात घेतलेली नाही. महाभारतातील द्यूत हारजितीच्या निर्णायक निकराने सुरू होते तर मुक्तेश्वरी भारतात मनोविनोदनाची राजक्रीडा म्हणून ते सुरू होते. महाभारताप्रमाणे मुक्तेश्वरी भारतातही द्यूतक्रीडेचे पूर्वनियोजन आहे. पण महाभारतात त्याला उघडी स्पष्टता आहे तर मुक्तेश्वरी भारतात ताकास तूर लागू न देणाऱ्या धूर्त मुत्सद्देगिरीचे आवरण त्यावर आहे. त्यामुळे महाभारतात जशी आहे तशी स्पष्ट कल्पना पांडवांना येथे नाही. बाटलीतून राक्षस बाहेर यावा तशी दचकून सोडणारी आकस्मिकता या साऱ्या प्रसंगात मुक्तेश्वरांनी सहजपणे पेरली आहे. त्यामुळे अंतीची भीषणता अधिक भयानक बनते. द्यूतक्रीडाचित्रणाचा हा मुक्तेश्वरी रोख लक्षात घेतला म्हणजे त्याच्याशी त्यांच्या धर्मराजाचे वागणे कसे सुसंगत आहे, ते ध्यानी येईल.

महाभारती प्रसंगचित्रण गृहित धरून मुक्तेश्वरी व्यक्तीचित्रण तपासणे योग्य नव्हे. पात्र–प्रसंग तेच असले तरी व्यासभारत व मुक्तेश्वरी यांची बंधपद्धती–जुळणी–निराळी आहे. केवळ एक घटक दोन्हीकडे आहे म्हणून सरळ उचलून त्यांची तुलना करता येणार नाही. त्या घटकाभोवतीचा दोन्ही ठिकाणचा रचनाबंध एकच आहे काय, तेही पाहिले पाहिजे. तसे नसेल तर स्थूल साम्याच्या आधारावर वेगवेगळ्या रचनाव्यूहातील गोष्टी निवडून केलेली तुलना अन्यायकारक ठरेल.

(५) मुक्तेश्वरी व्यक्तिचित्रणातील विशिष्टता लक्षात घेऊन तुलना करावयास हवी. तशी ती नांदापूरकरांनी लक्षात घेतलेली दिसत नाही.

या सर्व कारणांमुळे नांदापूरकरांचे व्यक्तिदर्शनविषयक तौलनिक विवेचन काही ठिकाणी अप्रमाण व म्हणून अस्वीकार्य झाले आहे.

### ४. श्रीकृष्ण : एक आर्ष प्रतिमा

'नमुनेवजा व अनुकरणीय कल्पना' या अन्य क्षेत्रातील अर्थापेक्षा अधिक व्यापक अर्थाने वाङ्मयसमीक्षेत आर्ष प्रतिमेची कल्पना वापरली जाते. मानवजातीला पुन्हा पुन्हा आलेल्या अनुभवांची व त्यांच्या संस्कारांची समाजाची सामुदायिक नेणीव ( कलेक्टिव्ह अन्कॉन्शन्स ) सिद्ध होते. सातत्याने पुनरावृत्त होणारे हे अनुभव प्रतिमांनी व्यक्त केले जातात. असे प्रतिमारूप अनुभव आपल्या मनातील काही अबोध संस्कार चाळवितात. आपल्या नेणिवेवर संस्कार करतात. एखादा शब्द, कल्पना ज्याप्रमाणे आर्ष प्रतिमात्मक असते, त्याप्रमाणे एखादी व्यक्तिरेखाही आर्ष प्रतिकात्मक असू शकते. श्रीकृष्ण ही अशी आर्ष प्रतिमा ( आर्किटाइपल इमेज् ) आहे, असे या अर्थाने म्हणता येईल.

महाभारत, भागवत, हरिवंश, पद्म-स्कंदादी पुराणे यांसारख्या भारतीय पुराणेतिहासातून कृष्णकथा प्रकटली. शिशुपालवधासारखी विदग्ध महाकाव्ये आणि गीतगोविंदासारखी रमणीय काव्ये तीच कथा गातात. संस्कृत वाङ्मयातून आलेला हा वारसा मध्ययुगीन मराठी कवींनी सांभाळला. त्यांनी विठ्ठलाचे कृष्णप्रतिमेशी अद्वैत कल्पून तिच्या बहुविधतेत भर घातली. ज्ञानेश्वर–एकनाथांच्या भाष्यात्मक वळणाच्या ग्रंथातून, नामदेव–तुकोबांच्या अभंगातून, महदंबा–जनाबाईच्या आख्यानातून, मुक्तेश्वर-श्रीधरांच्या भारतरचनेतून, निरंजन माधवाच्या चंपूतून, मध्वमुनी–अमृतरायांच्या पद-कटावांतून आणि रामजोशी–होनाजीच्या लावण्यातून हीच कृष्णकथा वाहत आहे. विरहिणी, गौळणी, बाळक्रीडा आणि स्वयंवरकाव्यांना आधार आहे तो याच कृष्णकथेचा. भक्तिमूल्याची प्रतिष्ठापना करणाऱ्या भागवतातील आराध्यदैवत कृष्ण असल्याने भारतभरच्या प्रादेशिक भाषांतून कृष्णकथा पुन्हापुन्हा गायिली गेली. भारतीय प्रतिभावंतांना प्राचीन काळापासून आपले अनुभव प्रकट करण्यासाठी कृष्ण या व्यक्तिरेखेचा आधार घ्यावासा वाटला आहे.

कृष्ण हे भारतीय संस्कृतीला पडलेले पूर्णत्वाचे स्वप्न आहे. तो गोकुळात रमला, रणांगणात रमला आणि गीतेतही रमला. चरमकोटीचा भोग आणि परमकोटीचा त्याग अनुभवलेला पृथ्वीच्या पाठीवरचा तो एकमेव माणूस आहे. त्याला पाहताच दुष्टांचा थरकाप होतो आणि सज्जनांच्या अंगावर रोमांच उभे राहतात. कामिनींना तो मदन वाटतो. सामान्यांना तो सवंगडी वाटतो. अंगावर शहारे आणणाऱ्या त्याच्या बासरीचे सूर अजून कानात घुमतात. सर्वदूर पसरलेल्या मानवी जीविताला कवेत घेणारे त्याचे विचार आजही पथप्रदर्शक वाटतात. विरक्ती आणि अनुरक्ती, त्याग आणि भोग, विक्रम आणि विलास, रसेली जीवनासक्ती आणि अनासक्त निष्कामता यांचा एक विलक्षण संघात त्याच्या व्यक्तिमत्वात आहे. सत् ( गुड ) आणि असत् ( इव्हील ) यांच्या सनातन संघर्षात सत्चे लोभस प्रतीक म्हणून तो भारतीयांच्या मनीमानसी नांदतो आहे.

भारतीय समाजाच्या सामुदायिक नेणिवेचे काही संस्कार सजग करण्याचे सामर्थ्य कृष्णाच्या आर्ष प्रतिमेत आहे. भारतीय वाङ्मयात सातत्याने वावरणाऱ्या या आर्ष प्रतिमेच्या काही कडा मुक्तेश्वरी भारतात ठोसरपणे प्रकटल्या आहेत.

मुक्तेश्वरी भारतात कृष्ण येतो तो देवावतार म्हणून. गीतेत व अन्यत्र[४] कृष्णाच्या अवतारित्वाची कल्पना व्यसांनीही मांडली आहे. तथापि ती अस्पष्ट व विरलत्वाने वापरलेली आहे. महाभारतातील कृष्ण अतिमानवी ( सुपरह्यूमन ) असला तरी मानवी मनात उत्पन्न होणाऱ्या आशा-आकांक्षांच्या परिघातच वावरणारा आहे. भागवतातील कृष्ण अलौकिकत्वाच्या पातळीवर गेला आहे. दैवी शक्ती आणि मानवी आचार यांच्या संगमामुळे भागवती कृष्ण परमेश्वरी पूर्णावतार असूनही पूर्ण मानवी पुरुषोत्तम झाला आहे. पूर्ववाङ्मयपरंपरेशी संवादी अशा देवावताराच्या रूपाने मुक्तेश्वरांनीही कृष्णाचे वर्णन-चित्रण केले आहे. आपण देवावतार आहोत याची जाणीव त्यांच्या कृष्णालाही आहे. " धरा करावया भारातीत । अवतार धरी मी अनंत " ( १।३६।९ ) अशा स्पष्टत्वाने त्याने ती अनेकवार[५] व्यक्तविली आहे. कृष्णाप्रमाणेच धर्म, अर्जुन, द्रौपदी, भीष्म, विदुर, कुंती यांसारख्या अन्य पात्रांनाही त्याच्या या अवतारित्वाची पुरेपूर जाणीव[६] आहे निवेदकाच्या श्रद्धेत[७] तर ती अनुस्यूतच आहे.

मुळातील पांडवसखा श्रीकृष्ण मुक्तेश्वरी रचनेत असा अलौकिक दैवी अवतार बनला आहे. त्यामुळे कृष्ण-पांडवांत किती अंतर पडते ! पण देव–माणूस यांमधील हे अनुलंघ्य अंतर मुक्तेश्वरांनी भक्तीच्या वाटेने भरून काढले आहे. या दृष्टीने कृष्ण-पांडवसंबंधांचे त्यांनी केलेले चित्रण पाहण्यासारखे आहे. " कृष्ण तो पांडवांचा प्राण । पांडव प्राण कृष्णाचे " ( २।१२।१४५ ) असे दुर्योधनाने धृतराष्ट्राला सांगितले आहे. " तू कूर्म हे अवयव । तू पादप हे पल्लव " ( २।६।७४ ) असा अंगांगिभाव धर्माने वर्णिला आहे. हा देवभक्तसंबंध ( २।७।९७–९९ ) भेदभावाच्या निषेधाने व अभेदाच्या जाणिवेने धर्माने वर्णिला आहे. कृष्णाची गमनागमनवर्णने या दृष्टीने पाहण्यासारखी आहेत. हृदयात ध्यानमूर्ती असतानाही कृष्णाची बाह्यप्रतिमा परती होताच पांडवांना वियोगखंती सांडवेनाशी होते ( २।१।६३ ). राजसूयमंत्रसमयीचे कृष्णागमन हे भक्ताच्या आध्यात्मिक साधनेने प्रसन्न झालेल्या परमेश्वराचे वर्णन ( ३।५।१०२–१११ ) आहे. " अखंड स्मरणीं असावे " असे सांगून कृष्ण निघतो

---

४. जसे, मभा, शांतिपर्व ३२६।८१-८३, मौसलपर्व ९।२८, २९.

५. पहा, आदि १४।१४८, १५५-१५७, ४१।१०७. सभा ५।१४२, ६।१४६-१४७. वन ३।१००. सौप्तिक ४।१४, १७.

६. पहा, आदि ४७।११६. सभा ५।१२३, ६।१, ९।८, १०।१३–२९, १०९-११३, १५।१३३–१५०. वन ४।१४२, ९।१४५, १६७, १४।७९. विराट ८।१४, १५.

७. आदि १४।१४८, १५५–१५७.

तेव्हा " ते म्हणती, ' त्वां हरिलें मन । आतां स्मरणकर्ते कोण ? । जेथें जेथें तुझे चरण । तेथें मस्तक आमुचें " ( २।११।८३ ) असे भक्तीने भिजलेले उत्तर पांडवांनी दिले आहे. आणि खरोखरच " व्यर्थ जाऊं नेदिती पळ । कृष्णस्मरणावेगळे " ( १।३७।९३ ) अशी त्यांची स्मरणभक्ती आहे. कृष्ण-विदुर भेटीत " कृष्णें कवळितां हृदयेंसी । प्रत्यक्ष आणि हृदयवासी । मिळतां आनंद आकाशीं । सांटवेना तयाचा " ( १।४५।८२ ) अशी भक्तीत भिजलेली कल्पना येते, कृष्ण व पांडव-पांडवपक्षीय यांचे भावसंबंध असे भक्तीने सांधलेले आहेत.[८]

कृष्णाला देवाचे आणि पांडवांना भक्ताचे रूप दिल्यामुळे कृष्ण–पांडवांच्या विरोधकांना साहजिकच देवद्रोह्यांचे स्वरूप[९] आले आहे. " कृतीं त्रेतीं राक्षस असुर । तेच द्वापारीं पृथ्वीधर । विष्णुद्रोही म्हणोनि वैर । सदा मजसीं चालविती " (२।५।१२८) असे त्यांचा कृष्णच सांगतो. शाल्व, जरासंध, शिशुपाल आणि कौरव हे अशा विष्णुद्रोही पृथ्वीश्वरांचे प्रतिनिधी. " कृष्णवर्ण कृष्णनाम । कृष्णवदन तयाचे " ( ३।३।७ ) किंवा " धिग् कृष्ण ! धिग् अर्जुन ! दुर्मति मिथ्या नाम धर्मज्ञ " ( १०।३।२१ ) असा य अभक्तांचा कृष्णद्वेष प्रकटतो. कृष्णही त्यांच्या नाशाच्या प्रतिज्ञा ( ३।२।७९ ३।३।५७,९९ ) करतो. पण नायक देव असला की प्रतिनायकांचा विनाश होत नाही, उद्धार होतो ! म्हणून येथेही जरासंध ( २।७।७१ ), शिशुपाल ( २।११।६०–६५ ) सद्गतीला जातात !

पांडव देवभक्त व त्यांचे विरोधक देवद्रोही अशा स्वरूपात चितारले गेल्यामुळे कृष्णदेवाला येथे सर्वशक्तिमान नियंत्रकाचे स्वरूप येते. " कृष्णचरणीं भावार्थ जयां । ते प्रारब्धें नेत्रियां विषम ठायीं । तेथें पावोनि संतोष जया । पूज्य होती सर्वांतें " ( १।२९।१५३ ) अशी मुक्तेश्वरांची आणि म्हणून त्यांच्या पात्रांचीही श्रद्धा आहे. " मनीं कृष्ण, वदनीं कृष्ण । भूतमात्रीं देखे कृष्ण । त्यांचीं विघ्नें होती कृष्ण । स्वये होत सुखदाता " ( ३।११।१५९ ) असा धर्म संकटकाळी कृष्णावर निर्भर आहे. कृष्णस्मरण विघ्ननाशक आणि विसावा व बळ देणारे असल्याने येथील पात्रे कृष्ण-स्मरणात दंग आहेत.[१०] सर्व पात्रांचा मोहरा भक्तीने वा द्वेषाने त्याच्याकडेच वळला

८. पहा, आदि २९।१६८, ३७।९३, ४५।८१–८२, ४८।२५. सभा १।६३, ५।१०२–१११, ६।७४, ७।९७–९९, ११।८२–८३, १२।१४५. वन ११।१५६–१५९. विराट ८।४१–४४.

९. पहा, सभा ५।१२८, ६।१३३–१५१, ७।१०, १०।७४, १२०, १५।२४६. वन ३।७, ११।१४९. सौप्तिक ३।२१.

१०. पहा, आदि २९।१४७, १५३, ३५।९३–१०१, ३६।४०, ४१।७०, ५०।३८. सभा ५।१२३, ८।११७-१२०, १३४, १३५, १२।३९–४०, १३।३३, ६४, ६७,६९. १५।१४५, १६।१०२. वन ११।१५९. विराट १।४२,६०, ३।२६, ६।३८.

आहे. म्हणून कृष्णाला मुक्तेश्वरी भारताच्या कथाचौकटीत मध्यवर्ती स्थान प्राप्त होते. त्याच्या अलौकिक सामर्थ्यामुळे तो सर्व घटनांचा नियंता[११] होतो. लाक्षागृहातून तो पांडवांना वाचवितो. द्रौपदीस्वयंवरास व इंद्रप्रस्थ उभारणीस सहायभूत होतो. जरासंधवध व राजसूय यामागे त्याची प्रेरणा व साहाय्य आहे. शिशुपालाला तर तो स्वतःच यमसदनास पाठवितो. द्यूतसभेत पांडव दास झाल्यावर आणि विदुर-भीष्म निष्प्रभ बनल्यावर द्रौपदी त्यालाच साद घालते आणि तोही जगजेठी तिच्यापाठी उभा टाकतो. " स्नेहे बुजाविली बहिणी । विटंबिलें वैरिया " ( २।१५।२३५ ) अशी ही कृष्णकृपा भारतीय मायबहिणींना सद्‌गदित करीत आली आहे. दुर्वासाच्या सत्त्वपरीक्षेत तो पांडवांच्या पाठी उभा आहे. अश्वत्थाम्यावर धावून जाणाऱ्या भीमाला वाचविण्यासाठी तो धर्मार्जुनांना प्रवृत्त करतो. अर्जुनास ब्रह्मास्त्रक्षेपणाचा सल्ला देतो, आणि अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्रापासून उत्तरेच्या गर्भाचे रक्षण करून पांडवांचा वंशही टिकवितो.

कृष्णाच्या केंद्रवर्ती व क्रियाप्रेरक रूपामुळे साधुपालन व दुष्टदंडनाचे अवतारी सूत्र[१२] मुक्तेश्वरांना भारतकथेमागे सहजासहजी उभे करता आले आहे. " आम्ही धर्मातें स्थापावें । साधुसज्जनातें प्रतिपाळावें । यत्नें दुष्टांतें दंडावें । हेंचि कर्तव्य आमुचें " ( २।६।१४६ ) असा कृष्णाने आपल्या अवतारकृत्याचा उच्चार केला आहे. या ईश्वरी सूत्रामुळे भारत-कथेचे स्वरूप बदलते. धर्मराजाच्या उद्‌गारात ( २।६।२८-३० ) भारती कथाबंधातील क्रियाप्रेरक घटकांची मुक्तेश्वरकृत मांडणी स्पष्ट होते. भूभार उतरविण्यासाठी कृष्णदेव अवतरला. त्यास साहाय्य करण्यासाठी पांडव मनुष्यलोकी कुरुकुळात अवतरले. या संहाराचे निमित्त कपटद्यूत ते टाळू म्हटल्यानेही टळणार नाही. कारण असे व्हावे, ही ईश्वरी योजनाच होती. अशी मुक्तेश्वर भारतकथेची संगती लावतात. त्यामुळे कौरव–पांडवांची संघर्षकथा लीलाविग्रही भगवंताची अवतारलीला ठरते. कृष्णासारखा अवतारी देव पांडवांच्या बाजूने आणि संसप्तक दानव कौरवांच्या बाजूने असलेले पाहिले की कौरव-पांडवांच्या आडून देव-दानवांचाच सनातन लढा महाभारतात चालल्याचे मुक्तेश्वर दाखवीत आहेत, असे वाटते. राजकुळांच्या संघर्षकथेला येथे भक्त-अभक्तांच्या संघर्षाचे रूप येते. त्यामुळे कौरव-पांडव संघर्षातील एक पवित्रा म्हणून आलेले दुर्वास-भोजन मुक्तेश्वरी भारतात भक्तकथेत परावर्तित झाले आहे. असे परावर्तन येथे पुष्कळदा होते. दुष्टांचे निर्दालन व साधूंचे परिपालन हेच कृष्णावताराचे व पांडवांचे उद्दिष्ट आहे. कृष्ण सत्पक्षाचा कृतिशील कैवारी आहे. असा कृष्ण केंद्रस्थानी कल्पून मुक्तेश्वर

---

११. ठळक घटनांमागील कृष्णप्रेरणेच्या निर्देशासाठी पहा, आदि ३६।४३, ३७।५५, ४४।१२१, ४६।५–९. सभा ५।१०१, १७३, ७।६९–७१,९०, ९।४६, १५।२३५. वन. २।७९, ३।९९, अ–११. सौप्तिक १।१२८.

१२. पहा, आदि १४।१४८, १५५–१५७. सभा ६।१४६, १६।२८–३०, १७।३०, ७२. वन ४।१४२, १४।८२.

भारतकथा सांगत आहेत. ही सत्यासत्याच्या संघर्षाची कथा त्यांनी सत्पक्षाच्या कैवाराने सांगितली आहे.

मूळ महाभारतातील कथा पांडवांच्या विक्रमाभोवती, कौरवांच्या खलकृत्यांभोवती आणि कृष्णाच्या बुद्धिचातुर्याभोवती फिरते. मुक्तेश्वरी भारतातील कथा कृष्णाच्या नीलप्रभेने तेजाळलेली आहे. पांडवांसह कौरवांच्याही मनोव्यापाराचे तो सूत्रचालन करीत आहे. आपापल्या भूमिकेवरून साऱ्या पात्रांचा मोहरा कृष्णाकडे वळलेला आहे.

कृष्णाला असे मध्यवर्ती स्थान देण्यासाठी मुक्तेश्वरांनी महाभारतात काही फेरफार जाणिवपूर्वक केलेले दिसतात. लाक्षागृह, द्रौपदीस्वयंवर, इंद्रप्रस्थ-उभारणी यामागे कृष्णाची प्रेरणा स्वतंत्रपणे उभी केली. त्यामुळे आदिपर्वात गौण स्थान असलेल्या कृष्णास मुक्तेश्वरी आदिपर्वात ठसठशीत रूप येते. सभापर्वात तर मुळातही कृष्ण मध्यवर्ती आहे. ते मध्यवर्ती स्थान अधिक दृढ करण्यासाठी मुक्तेश्वर काही बदल करतात. अर्जुनाने अग्नी व कृष्ण यांच्यापासून मयास वाचविले असताना ( मभा. २।२।२ ) कृष्णार्जुनांनी मयास वाचविल्याचे मुक्तेश्वर ( २।१।२८ ) सांगतात. कृष्णाने ओळख करून देण्याऐवजी जरासंधाने त्याला ओळखल्याचे ( मभा २।२०।२३ मुभा २।६।१५२-१५५ ) ते वर्णितात. धर्माऐवजी कृष्णाकडेच राजसूयाचे कार्यविभाजन ( मभा २।३२।३ मुभा २।९।३० ) देतात. वस्त्रहरणप्रसंगी कृष्णाचे सामर्थ्य द्रौपदीमागे उभे राहिले, हे भांडारकर-प्रतीला मान्य नसले तरी परंपरेत प्रतिष्ठित झाले आहे. मुक्तेश्वरांनी त्यापुढे जाऊन द्यूत-अनुद्यूताच्या मध्यंतरात पांडव-कृष्णाची गुप्त भेट घडवून आणली आहे. महाभारती कृष्ण द्यूतप्रसंगी उपस्थित नाही. आपण असतो तर द्यूत होऊ दिले नसते, असे तो पुढे वनपर्वात म्हणतो. भारतातील राजनीतिज्ञ कृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाशी ते सुसंगतच आहे. मुक्तेश्वरी कृष्ण मात्र "म्हणे, होईल तें पाहें दृष्टीं । कौतुक माझिये लीलेचें" ( २।१५।२८९ ) असे पांडवांना सांगतो. दुष्टसंहार करायचा तर निमित्त हवे तेव्हा पांडवांनी द्यूत खेळलेच पाहिजे. कृष्णलीलेचाच हा आविष्कार आहे. अनुद्यूतामागेही कृष्णाच्या कृतीची सार्वत्रिकता प्रकट केली आहे. सभापर्वाइतके वनपर्वाच्या मूळ बैठकीत कृष्णाला प्राधान्य नाही. पण सौभोपाख्यान व दुर्वासभोजन विस्ताराने रंगविल्याने मुक्तेश्वरी वनपर्वात मात्र त्यास ठळक स्थान प्राप्त होते. सौप्तिकातील कृष्णाचे स्थान मुक्तेश्वरांनी कायम ठेवले. महाद्‌भूताच्या शरीरातून कृष्णाच्या शेकडो-हजारो मूर्ती पसरलेल्या दिसतात ( मभा १०।६।९ ), हा शिवमाहात्म्यदर्शक भाग वगळला. कृष्णमहिमानासाठी मुक्तेश्वरांनी शिवाच्या जोडीने केशवाचा निर्देश ( १०।१।१२८ ) केला आहे.

महाभारतापेक्षा मुक्तेश्वरी भारतात कृष्णास अधिक प्राधान्य असल्याने त्याचे चित्र मुक्तेश्वरांनी ठसठशीतपणे रेखाटले आहे.

मुक्तेश्वरांचा वैशंपायन कृष्णस्मरणाने कथारंभ ( १।१३।२२ ) करतो. विदुराच्या ध्यानावस्थेत दृष्टांत देणाऱ्या सर्वज्ञ शक्तीच्या धूसर स्वरूपात तो प्रथमतः दिसतो.

द्रौपदीस्वयंवरात त्याचे प्रत्यक्ष दर्शन घडते; आणि मग सूत्रधार म्हणूनच या कथेत तो वावरू लागतो.

त्याच्या अलौकिक स्वरूपाचे वर्णन अग्रपूजासमयी भीष्ममुखाने ( २।१०।१३–२९ ) येते. विश्वचैतन्याचा स्रोत असलेल्या ईशस्वरूपाचे हे ज्ञानप्रधान व तत्त्वविवेचक वर्णन आहे विविध तत्त्वज्ञानशास्त्रांचे, धर्मसंप्रदायांचे आणि लोकश्रद्धेचे एकीकरण करण्याचा प्रयत्न त्यात आहे. याला जोडूनच अलौकिकत्वाने रंगलेले कृष्णाचे लौकिक रूप ( २।१०।३०–७३ ) विस्ताराने चितारले आहे. नीलमेघासारखा त्याचा रंग आहे. त्याच्या चरणपद्माने भूलोकीच्या कमळांना रंगगंध लाभले. लक्ष्मीच्या तळहाती अरुण–संध्यारागाचे तेज एकवटले ते कृष्णचरणाच्या संवाहनाने, चंद्रखंडासारखे त्याचे नखमणी आहेत. त्याच्या चरणाला सुशोभित करणारी सामुद्रिक चिन्हे भक्तांना अभय देतात. इंद्रानीळासारखे त्याचे गुल्फद्वय असून जानूजघन गरुडपाचूचे स्तंभ शोभतात. त्याच्या कृशकटीच्या दर्शनाने सिंहकटीलाही विरक्ती यावी! किरीट, मुकुट, बाहूभूषणे, कस्तुरी मळवट, कौस्तुभमणी, वैजयंतीमाळा आणि मकराकृती कुंडल अशा अलंकारांनी तो भूषित आहे. त्याचे कनकवर्णी पीतांबर म्हणजे अमृतघनाच्या मागेपुढे चकाकणाऱ्या तळपत्या विजा. " अधर बिंब हिरे दशन। शुकनासिक विशाळ नयन। वदन सर्वानंद-वर्धन। कोटि मदन सांडणें ( २।१०।६५ ) असे त्याचे साजरे रूप. हा कृष्णरूपी रत्नदीप पांडवांनी आपल्या हृदयमंदिरात निश्चल, निर्वात आणि अखंड ठेविला. कृष्णाची ही प्रतिमारेखा मुक्तेश्वरांनी पारंपरिक शैलीने श्रद्धा–संकेतांचा वापर करून सालंकृत डौलदारपणे उभी केली आहे. भीष्माने वर्णिलेले अलौकिक स्वरूप आणि हे लौकिक रूप या दोन्हींनी मिळून कृष्णाची पूर्णाकृती सिद्ध होते.

असा हा देवावतारी कृष्ण येथे भक्तवत्सल, भक्तकैवारी याच रूपात वावरतो. " स्मरण करितां अंतःकरणीं। मी येईन तत्क्षणीं। भक्तांचिये हृदयभुवनीं। वस्ती माझी सर्वज्ञा " ( १।४६।२७ ) असा तो भक्तहृदयातच राहतो. " आम्हीं धर्माचे अंकिले " ( २।८।१११ ) असा तो भक्ताधीन आहे. ' पार्थाचा सारथी ' ( २।९।५२ ) बनून किंवा राजसूयातील ' उच्छिष्टें ' काढून तो आपल्या भक्तांची सेवा करीत आहे. पीतांबराचे सोगे खोचून, कौस्तुभमाळ मागे टाकून लगबगीने उच्छिष्ट काढणारा कृष्ण निरहंकारतेचे आणि प्राणदात्या अन्नब्रह्माचे ( २।९।१४०–१४३ ) जणू मूर्त रूपच आहे. याच पंक्तीत द्रौपदीच्या लज्जारक्षणासाठी नि कौरवदुर्बुद्धिपापसंग धुवून काढण्यासाठी त्याची कृपागंगा लोटते. द्यूतसभेत द्रौपदीचा आर्त टाहो ऐकताच मन-गरुडाला मंदट म्हणून दूर सारून " अनाथबंधु प्रौढीं " तो द्रौपदीसाठी उभा ठाकतो. " पांडव कष्टती अरण्यवासी। आम्ही येइजे कोण्या संतोषीं ? " ( ३।१३।५४ ) अशा सहसंवेदनेने तो दुर्योधनाच्या वैष्णवयागाचे आमंत्रण नाकारतो. " अपार प्रेमाचें पिसें। न म्हणें थोर सान ऐसें। नाम स्मरतां अति आवेशें। धांवोनि जाय त्या प्रती ॥ १९३ ॥ साधुजनांचे प्रतिपाळण। सेवकांचे संरक्षण। करावया दुष्टांसी दंडण। नाना अवतार

घेतसे ॥ १९४ ॥ '' ( सभा अ. १५ ) असे रुक्मिणीने त्याच्या प्रेमस्वरूपाचे, नामस्मरणकर्त्यांच्या प्रीतीचे आणि अवतारकार्याचे वेधक वर्णन केले आहे. परमेश्वर प्रेमस्वरूप असून साधुपालन-दुष्टदंडनासाठी तो अवतार धारण करतो; त्याच्याजवळ भेदाभेद नसून नामस्मरणाने तो प्रसन्न होतो; ही साऱ्याच मराठी संतांची श्रद्धा आहे. मुक्तेश्वरांची लीलाख्याने या श्रद्धेवरच अधिष्ठित आहेत. त्यांच्या भारतालाही कृष्णप्राधान्यामुळे व त्यामागील भक्तिसूत्रामुळे लीलानाट्याचे स्वरूप आले आहे.

कृष्ण आला की पांडवांसारख्या भक्तावरील संकटे अभ्रासारखी निघून जातात आणि दुर्वासासारखे भक्तछलक फजित होतात. कृष्ण नसल्याने पांडवांना वनवास, अपमान भोगावा लागतो. आणि द्वारकावासियांनाही शाल्वाचा छळ सोसावा लागतो. त्याची उपस्थिती भक्तांना अनुकूल तर अनुपस्थिती अभक्तांना अनुकूल असते. साधूंसाठी तो मेणाहून मऊ आहे पण दुष्टांसाठी तो वज्राहून कठीण आहे. वज्राने महाशैल ताडावा तसे त्याचे चक्र शिशुपालाचा शिरच्छेद करते. भर सभेतील या धाडसी व आक्रमक कृत्याबद्दल दुर्योधन धृतराष्ट्राजवळ बोलताना म्हणतो, '' अमर्यादा करून कृष्णें । सभे शिशुपाळ घेतला प्राणें । परी त्यास वारावया वचनें । शक्ती कोणा नव्हेचि '' ( २।१२।१४४ ) प्रतिकाराची इर्ष्या दडपली जावी असेच कृष्णाचे बाहुवीर्य आहे. त्याचे कौशल्य, साहस, तडफ आणि युक्तिवादचातुर्य जरासंधवधावेळी कसोटीस लागले आहे. '' संग्राम न करितांचि जाण । पांडव कार्य साधी कृष्ण '' ( २।१२।१४५ ) असे बहुधा त्याविषयीच दुर्योधनाने म्हटले असावे. वस्त्रहरणप्रसंगी हाती धगधगीत सुदर्शन, डोळ्यात आग असलेला क्रुद्ध कृष्ण दातांनी ओठ चावत मान वाकवून कौरवांकडे पाहू लागतो ( २।१५।२४२–२४३ ) तेव्हा त्याच्या सात्विक संतापाचे खरेखुरे दर्शन होते. अश्वत्थाम्याच्या आततायी क्रोधापासून तो उत्तरेच्या गर्भाचे रक्षण करतो. नृशंस क्रौर्याला निर्भय सत्प्रवृत्तीने उत्तर देणे, हाच मुक्तेश्वरी कृष्णाचा धर्म आहे.

हा भक्तवत्सल देव सारे काही करतो पण त्याचे श्रेय मात्र घेत नाही. '' वेडी आवडीची जाती । म्हणोनि थोरी करितसां '' ( २।९।५२ ) असे तो आपल्या धर्मादी भक्तांना सांगतो. '' तुझें दैवचि साह्य तूतें '' ( २।९।५० ) असे धर्माला बजावतो. '' भीमा ! माझे आर्त । तुवां पुरविले समस्त '' ( २।७।६८ ) असे जरासंधवधासाठी भीमाचे आभार मानतो. गीताप्रतिपाद्य निष्काम कर्मयोगाचा मूर्त आविष्कार वाटावा, असेच त्याचे वागणे-बोलणे मुक्तेश्वरांनी रंगविले आहे.

मुक्तेश्वरी भारतातील कृष्ण अलौकिक देवरूपात वावरत आहे. तरी महाभारतातील त्याच्या पार्थिव व्यक्तिमत्त्वाचा वास त्यालाही लागला आहे. सभापर्वात स्वमुखाने आलेले त्याचे पूर्वचरित्र मुक्तेश्वरांनी संक्षेपात पण नेटकेपण मांडले आहे. '' धाक घेऊनि मागधाचा । आश्रय करूनि पांडवांचा । वास करूनि द्वारकेचा । यादवांसी वसतसें '' ( २।५।१६० ) हा त्याचा शेवट या पार्थिवतेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. पहिल्याच

झटक्यात जरासंधाने भीमाच्या छातीवर आपला गुडघा रोवला तेव्हा "सावध" म्हणे कृष्ण जगजेठी । 'बापा ! भीमा ! बळिष्ठा !" (२।७।२४) अशी भीमाविषयीच्या प्रेमाने त्याला सावध करणारी साद घालतो. या हाकेत मानवी हृदयाचा हुंकार आहे. त्याच्या व्यक्तित्वातील लौकिक छटांचे दर्शन जरासंध, शिशुपाल, अश्वत्थामा यांच्या विरोधभाषणातून होते. भारत-भागवतातील (जसे, १।४९।१०१-१०३, २।१०।१४०, २।११।२३) कृष्णचरित्राचा तपशील निर्देशात्मक रूपात येऊन जातो. त्यामुळे या अलौकिक कृष्णाला आकार येतो, बनता येते.

लौकिक-अलौकिक पातळीवर वावरणाऱ्या कृष्णदेवाची अनेक रूपे येथे साकार होतात "योगिता हृदयजपु । कामिनीकुळातें कंदर्पु । दुष्टदैत्या सर्पदर्पु । दळणीं स्वामी गरूडाचा (२।६।३)" साधु म्हणती, 'हा प्राणमित्रु'। दुर्जन भाविती 'काळशत्रु'। मूढ म्हणती, 'हा परतंत्रु'। परी 'स्वतंत्रु' सामर्थ्यें" (२।१०।९५) असा हा अनेकरूपांनी नटतो. मुक्तेश्वरांनी त्याच्या अनेकांगावर अनेक दिशांनी प्रकाशझोत फिरता ठेवला आहे.

कृष्ण ही मुक्तेश्वरी भारतातील मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. कथानकाला आकार देण्याचे व त्याचा घाट बदलण्याचे सामर्थ्य तीत आहे. साऱ्या पात्रांचा मोहरा या ना त्या प्रकारे त्याच्याकडेच वळलेला आहे. प्रत्यक्षपणे काही महत्त्वाच्या कृती तो करतो तर अप्रत्यक्षपणे अन्य कृतींच्या मागे तोच आहे. तो मुक्तेश्वरी भारताचा कर्ताकरविता नियंता ईश्वरावतार आहे. मुक्तेश्वर त्याचे अनेकांगी दर्शन घडवीत असले तरी सत्त्वरक्षक हेच त्याचे रूप अधिक ठसठशीतपणे मांडीत आहेत. मृत्यूच्या अटीतटीत आणि भीतीच्या भोवऱ्यात त्याचा जन्म झाला आणि त्यावरचा संजीवक उतारा म्हणून तो जगला. विपत्तींनी ग्रासलेल्या, आपत्तींनी पोळलेल्या मनाचा तो विसावा आहे. दुष्ट प्रवृत्तींना आव्हान देणाऱ्या सत्त्वस्थ मनांचा तो हुंकार आहे. उन्मत्त सत्ताधीशांना सिंहासनावरून खाली खेचणाऱ्या जनशक्तीच्या विराट सामर्थ्याचा तो आविष्कार आहे. मानवी मनाला मालिन्य आणणाऱ्या असत्प्रवृत्तींना जाळून झळाळत्या तेजाने तळपणारी ती सत्प्रवृत्ती आहे. पावित्र्यरक्षक, अनाथबंधु कृष्णाचे हे आश्वासक रूप मुक्तेश्वरी भारतात ठाशीवपणे आविष्कृत झाले आहे. व्यथाकुल मनाला आधार देणारे हे निरंजन रूप त्याच मनाच्या सत्त्वशक्तीचा सामर्थ्यशील उद्रेक असते. "कीं हृदयींच प्रगटला । पाठीराखा कैवारी", "आला गेला वाटे भक्तां । ज्ञानी म्हणती येथेंचि होता", "सर्वांतरी जया असणें । तयालागींच धांवा करणें । प्राणी राहाटे तें जाणे । सर्व करणें मनइच्छा" (२।१५।१८८-१९०) असे त्याचे मनोगम्य रूपही मुक्तेश्वरांनी रेखले आहे. या मनोमय रूपाने-असत्‌विरुद्ध झगडून सत्‌ची सुशील सुषमा उजळणाऱ्या आश्वासक सत्‌शक्तीच्या रूपाने—माणसांच्या मनामनात हा कृष्ण जगतो आहे. त्याचे दर्शन घडवून मुक्तेश्वरांनी आपल्या कृष्णचित्राला आर्ष प्रतिमेच्या पातळीवर नेले आहे.

## ५. आणखी काही व्यक्तिचित्रे

महाभारताच्या कथावस्तुचा घाट घडविणाऱ्या व्यक्तिरेखांचे आरेखन मुक्तेश्वर नेटके करतात. " दयाशीळ सत्यवाणी । पुण्यश्लोक धर्मात्मा " ( १।२७।१७१ ) या भविष्य-कथनाप्रमाणेच **धर्मराजाचा** जीवनक्रम आहे. आदिपर्वातील धर्म दयाशील, कृतज्ञ, परोपकारी आहे. भीमाच्या वियोगाने " रात्रीपासूनि हृदय फुटे। तयावीण माझें हें " ( १।२९।१४० ) अशी त्याची अवस्था होते. त्याची सर्वस्पर्शी बुद्धी वनातही बंधूंचे संरक्षण करते परचित्तपरीक्षक असल्याने तो हिडिंबेचा स्वीकार करावयास लावतो. सभापर्वात तो नीतिधर्मपालन करणारा आदर्श राजा बनला आहे. राजकीय महत्वाकांक्षे-पेक्षा त्याची पितृभक्ती त्याला राजसूयास प्रवृत्त करते. राजसूयाचे अशक्य स्वप्न प्रत्यक्षात येते तेव्हा कृष्णाविषयीच्या कृतज्ञतेने त्याचे मन भरून येते. नारद-व्यासांकडून कळलेल्या भविष्याने तो विषण्ण होतो. अटळ प्रारब्धाच्या काळपावलांचा कानोसा घेत तो मोठ्या सच्छील वृत्तीने राहतो. अशा वेळी विदुर हस्तिनापुराचे आमंत्रण घेऊन आल्यावर व्याससूचना आणि ज्येष्ठांच्या आज्ञापालनाचा पितृधर्म असा संघर्ष त्याच्यापुढे ठाकतो. अखेरी पांडवांना अनुल्लंघ्य असलेली कुंतीची " श्रेष्ठाज्ञा " स्वीकारून तो हस्तिनापुरी जातो. " नावेक रंजवावया मना । खेळ वडिलीं खेळिजे " ( २।१४।४१ ) अशा विश्रब्ध क्रीडावृत्तीने तो द्यूतप्रवृत्त होतो. आणि पाहता पाहता कपटपाशांची करणी व द्यूतकाराची अनिवार ईर्ष्या त्याला सर्वनाशाच्या डोहाकडे ओढीत नेते. मरण जवळ आल्यावर पक्षाला फाशातच वाट दिसते तसा विचार हरपून बंधुपत्नीसह तो स्वतःलाही हरवून बसतो. त्याच्या मनावरील ताण, सुटणारा घाम, ईर्ष्या आणि ऐश्वर्योन्माद यांचे चित्रमय, वास्तव आणि वेधक दर्शन मुक्तेश्वरांनी घडविले आहे. त्याचे प्रकृतिसहज अधःपतन त्याच्या उज्ज्वल सत्त्वशीलतेइतकेच भव्य वाटते. त्याच्या सत्त्वशीलतेची अंतिम कसोटी द्रौपदीच्छलनाच्या वेळी केलेल्या भीमसांत्वनात आहे. म्हणे, " क्रोध नावरे तुझिया चित्ता । तरी गदा वोपी माझीये माथां । परि असत्यदोष कुंतीसुता । स्पर्शे ऐसे न करावें " ( २।१५।५६ ). सत्यनिष्ठेचा हा अत्युच्च बिंदू. तो अतिमानवी असला तरी विलोभनीय आहे. मुक्तेश्वरांचा धर्म " बाप शांतिक्षमेचा सिंधू " आहे. अनुद्यूतामागे पित्राज्ञा, दैवनियतता, पुरुषार्थहीनत्व आणि आपल्या अस्तित्वाचे परमेश्वरी अवतारास सहायभूत असणारे प्रयोजन ( २।१६।२५, २८-३०,३८ ) अशा विविध प्रेरणा मुक्ते-श्वरांनी उभ्या केल्या आहेत. त्यामुळे धर्माच्या व्यक्तिमत्वाला लौकिक व अलौकिक अशी परिमाणे प्राप्त होतात. लौकिक पातळीवर तो क्षात्रधर्म व वृद्धाज्ञेचे पालन करतो व अलौकिक पातळीवर अवतारी कृष्णाच्या दुष्टसंहारास निमित्त पुरवितो. " आपुल्या अपराधाचेनि दोषें । बंधु शिणती अरण्यवासें " ( ३।१३।८३ ) अशी धर्मराजाची अपराध–जाणीव ( गिल्टी–कॉन्शन्स ) वनपर्वात सारखी जागी आहे. " राज्यहानी अरण्यवासू । बंधूवियोगाचे क्लेशु । मजसमान दुसरा पुरूषु । दुःखी नाही त्रिभुवनीं " ( ३।५।१०२ ) असे त्याचे दुःख वाहते आहे. वनातही धर्मकृत्यांचे यथासांग संपादन

करणारा तो हतश्रीक राजा आहे. भीमद्रौपदीच्या प्रतिशोधाच्या प्रक्षुब्ध भावनेवर विवेकाची हळुवार फुंकर मारून तो त्यांना शांतवितो. त्याचवेळी भावी संग्रामासाठी अर्जुनाला अस्त्रप्राप्त्यर्थ पाठविण्याची दूरदृष्टी त्याच्याजवळ आहे. नहुषप्रश्न, यक्षप्रश्न अशा प्रसंगी त्याचे बुद्धिसामर्थ्य पणास लागते. घोषयात्राप्रसंगी कौरवांना सोडविण्यात, जयद्रथाला जीवदान देण्यात आणि चौघा बंधूंतून नकुलाला जीवदान मागण्यात त्याची निःस्वार्थ, विवेकनिष्ठ, सहृदय धर्मबुद्धी कृतिशीलतेने उजळून निघते. व्यथित हृदयाचा उदारचरित राजपुरुष म्हणून धर्माचे येथील चित्र उदात्ततेच्या परिसीमांना स्पर्श करणारे आहे. विराटपर्वातील धर्म सश्रद्ध, समंजस, दूरदर्शी, सहनशील, कृतज्ञ आणि सावध आहे. अज्ञातवासातील लाजिरवाण्या संकटाच्या कृष्णछायेतही त्याने आपले शुद्ध सत्त्व जोपासले आहे. सौप्तिकात विजयाच्या शिखरावर असूनही तो विषण्ण आहे.

महाभारताप्रमाणे येथेही धर्मराज प्राश्निकाच्या भूमिकेत वावरतो. जिज्ञासूवृत्तीने प्रश्न विचारून श्रवण करणे त्याला आवडते. या प्रश्नांच्या उत्तराच्या निमित्ताने शास्त्रज्ञान ( जसे, नारदनीती ), विविध वर्णने ( जसे, लोकपालसभाख्यान ), आख्यानोपाख्याने ( दमयंती, सीता, सावित्री इ. ) संग्रहित करणे सोपे जाते. महाकाव्यासारख्या विस्तार-प्रवण व अनेक विषयांचा व्याप पोटात घेणाऱ्या वाङ्मयप्रकारास अशा व्यक्तिरेखा तंबूच्या मध्यवर्ती खांबासारख्या आधारभूत ठरतात. त्याच्या कृष्णभक्तीला ठसठशीत करून मुक्तेश्वरांनी भारतकथेला नवार्थ दिला आहे. त्यामुळे त्यांचा धर्म लौकिक व अलौकिक अशा दुहेरी पातळीवर वावरणारा झाला आहे. भक्ती, सत्य, दया, कृतज्ञता, दैव अशा मूल्यनिष्ठेमुळे व त्याच्या संदर्भात त्यांच्या झालेल्या पुनरुच्चारामुळे त्यास मूल्यात्मक परिमाण प्राप्त होते.

**भीम :** " रणश्रेष्ठ बळवरिष्ठ " ( १।२७।१७४ ) अशा पुत्राची पंडूची इच्छा पूर्ण होते ती भीमजन्मामुळे. अतिसुंदर, गौणवर्णी असा हा भीम धैर्यबळाचा सागर आहे. आपल्या बलदंड बाहूवर पांडवांची सारी संकटे तो तोलून धरतो. लाक्षागृहातून बाहेर पडल्यावर भीषण अरण्यातून अंधाऱ्या रात्री त्याने केलेली वाटचाल त्याच्या निर्भयतेची व बंधुप्रीतीची साक्ष आहे. विनोद, शौर्य, करुणा, औदार्य, कुटुंबप्रेम यांनी रंगलेली भीमबळाची रेखीव कथा म्हणजे बकाख्यान. हिडिंबवधाख्यानात त्याच्या वीर-शृंगाराचे अद्भुत दर्शन घडते. जरासंधाचा वध करण्याइतका तो पराक्रमी असला तरी त्याचे श्रेय कृष्णाला देण्याइतकी नम्रता व भक्ती त्याच्या अंतःकरणात आहे. पंक्तीत चहाटळपणा करणाऱ्या कौरवांना तो दरडावतो, अग्रपूजाप्रसंगी उन्मत्त शिशुपालावर धावून जाण्या-इतका तो खवळतो. घमेंडखोर दुर्योधनाची मयसभेत फजिती होताना तो हसतो व वर्मी लागेल असा टोला मारतो. त्याच्या ' गदगदाटे ' हसण्याने फासे ' गटगराट ' फिरतात. या साऱ्या निर्देशांतून भीमाचे उग्र, रगदार व प्राकृतिक चित्र उभे राहते. भारती भीमाला लोकमानसाने दिलेल्या रूपाचे प्रतिबिंब त्यात उमटले आहे. द्यूतसभेत धर्म शांत पण बधिर अवस्थेत आहे. अर्जुन सांत्वन करण्याइतका भानावर आहे पण भीम मात्र क्रोधाने

उसळत आहे. दातांनी ओठ रगडणे, वारंवार गदा पडताळणे, द्रौपदीच्या दुःखाने व्याकुळ होणे, चवताळणे, निर्भयपणे आव्हान देणे, भीषण सूडाच्या प्रतिज्ञा करणे अशा कृतीउक्तींनी भीमाचा ‘हृदयस्फोट’ समूर्त झाला आहे. अनुद्यूतसमयी भीमार्जुनांचा विरोध नोंदवून ( २।१६।३१ ) मुक्तेश्वरांनी त्या प्रसंगात अधिक संभवनीयता आणली आहे. वनातील सारी संकटे त्याच्या बलदंड बाहूवर पेलली जातात. किर्मीर, मणिमंतादी यक्ष, जटासुर यांना यमसदनाची वाट दाखविण्यात त्याच्या बळाची कसोटी लागते. प्राकृतिक प्रतिशोधाची भावना त्याच्या हृदयात धगधगत आहे. यादृष्टीने द्रौपदी व भीम अधिक मिळतेजुळते आहेत. शंभर पाकळ्यांची लालेलाल कमळे द्रौपदीला आणून देण्यात त्याची प्रीती अभिव्यक्त झाली आहे. त्याचे बोलणे तिखट, धारदार आणि उपरोधिक आहे. धर्माला विरोध करूनही त्याची बंधुनिष्ठा अविचल आहे. सूडाच्या आगीने जळणारा बलसंपन्न मानधन क्षत्रिय हे त्याचे वनपर्वातील रूप आहे. विराटपर्वातही जीमूती, कीचक–उपकीचकांशी तो प्राणघातक झुंज घेतो. त्याचा पराक्रम हाच अज्ञातवासी पांडवांचा आधार आहे. पुत्रनिधनाने शोकमग्न असतानाही अश्वत्थाम्यावर धावून जाण्याइतका तो कणखर आहे. पराक्रमी, बलदंड, चतुर असा हा वीरनायक द्रौपदीवर प्रेम करणारा आणि धर्मराजाच्या अर्ध्या वचनात वागणारा आहे. शक्ती हे ज्या युगाचे व म्हणून वाङ्मयाचे प्रधान मूल्य बनू पाहत होते अशा वीरयुगाच्या उषःकाली मुक्तेश्वरी भारत अवतरल्याने वीर्यशाली भीमाच्या पराक्रमांना उठाव मिळेल अशा पद्धतीने त्यात भीमाचे चित्रण आले आहे. युद्धकुशल भीमाचे ओजस्वी रेखाटन मुक्तेश्वरांनी ‘शक्तिसौष्ठवी’ शैलीत केले आहे. मुक्तेश्वरांचा धर्म भोवतीच्या भक्तियुगाची निर्मिती आहे तर त्यांचा भीम येणाऱ्या वीरयुगाने प्रभावित झालेला आहे.

शौर्य, औदार्य, गुरूभक्ती या विशेषांनी अर्जुन संपन्न आहे. मयाला प्राणदान दिले तरी त्याचा मोबदला घ्यायला त्याचे मन तयार नाही. तो संयमी आहे तसा इतरांना सावरणारा आहे. विषण्ण धर्मास व क्रुद्ध भीमास तो शांतवितो. महाभारतात त्याची संयम वाणी उत्क्षोभक प्रसंगातही संथपणे वाहते. हा वाक्संयम मुक्तेश्वरी अर्जुनात नाही. अस्त्रसाधना करणारा तो त्रिलोकवीर आहे. द्रौपदी, सुभद्रा, चित्रांगदा, उलूपी अशा लावण्यखनी त्याच्या पराक्रमावर लोभवतात. द्रुपद, चित्रसेन, जयद्रथ, कालकेय, निवातकवच कौरव यांचा तो लीलया पराभव करतो. या बळाला कृष्णाच्या प्रीतीची आणि शिवाच्या भक्तीची जोड आहे. कौरवांच्या दुष्टाव्याने आणि पांडवांच्या कष्टभोगाने स्वर्गातही तो अस्वस्थ आहे. बृहन्नडावेषामुळे कीचकापासून तो द्रौपदीची सुटका करू शकत नाही. जेथे शक्तीपेक्षा युक्तीचे काम आहे तेथे तो पुढे येतो आणि उत्तरेचा चतुरपणे उपयोग करून द्रौपदीला वाचवितो. अज्ञातवासाची मुदत संपताच मात्र मेघाआडच्या सूर्यासारखा त्याच्या पराक्रमाचा झळाळता प्रकाश उत्तरगोग्रहणसमयी पसरतो. उर्वशी भेटीत त्याचा मनःसंयम पणास लागला आहे. उत्तरेचा स्वीकार पत्नीऐवजी सून म्हणून करण्यात त्याच्या उज्ज्वल चारित्र्याची ग्वाही मिळते. अस्त्रांच्या

क्षेपणोपसंहारात त्याचे सचारित्र्य उजळले आहे — " द्विधा जाला इंदिरावर । येक नारायण येक नर " ( १।२७।१९७ ) अशी कृष्णहृदयाशी त्याची अभिन्नता आहे. " बाळमित्र कृष्णार्जुन । येक जीव येक प्राण । मृगया खेळ भोजन पान । येकत्र शयन सर्वदा " ( १।४८।५५ ) अशी कृष्णाची सख्यभक्ती त्याच्या व्यक्तिमत्वाला गोडवा देऊन जाते. सात्विक मनोवृत्तीचा सुसंस्कृत राजपुरुष म्हणून तो आपल्यासमोर उभा राहतो. मुळातील क्षात्रनिष्ठा, बंधुनिष्ठा यांच्या जोडीला ईश्वरनिष्ठा, सत्यनिष्ठा व भक्तिश्रद्धा या अधिक ठळकपणे रेखलेल्या मूल्यांचे , परिमाण मुक्तेश्वरांनी अर्जुनाच्या व्यक्तिरेखेला दिले आहे.

**नकुल-सहदेव** हे तिन्ही पांडवांच्या कर्तृत्वकमानीचे आधारस्तंभच आहेत. " ज्याचिया रूपा वेधोनि पुढती । देवांगना न लविती पातीं । चातुर्या लाजोनि सरस्वती । पांडुरवर्णा विवर्णा ॥ " ( १।३६।१४९ ) असे भीमाने त्यांच्या रूप-चातुर्याचे वर्णन केले आहे. नकुलाचा पराक्रम, सौंदर्य मुक्तेश्वरांनी मूलानुसार रेखाटला आहे. सहदेवाच्या व्यक्तिमत्वाला नीलाख्यानाने भक्तीचा भावस्पर्श होतो. अग्रपूजाप्रसंगी त्याचे आव्हान, अनुद्युतानंतरची भीषण प्रतिज्ञा व कुंतीचे त्याच्यावरील प्रेम मूलानुसारी रंगविले आहे. दक्षिणगोग्रहणात नकुल-सहदेवांचा पराक्रम वर्णून व धर्म-भीमाचे प्रेरक म्हणून त्यांना योग्य स्थान देण्याचा प्रयत्न मुक्तेश्वरांनी केला आहे.

**द्रौपदी** ही महाभारताची नायिका. तिची जन्मकथा आणि पंचेंद्रोपाख्यान तिच्याभोवती गूढतेचे वलय निर्मितात. इंद्रनीळकीळवर्णी, वेदीमध्या, दीर्घकेशी अशी द्रौपदी आपल्या रूपलावण्याने स्वयंवरमंडपात नृपमंडळाला वेध लावते. पाच पतींशी होणाऱ्या जगावेगळ्या विवाहात तिच्या मनाची काय स्थिती झाली ते महाभारतकारांप्रमाणे मुक्तेश्वरही सांगत नाही. पण द्रौपदी इंद्रप्रस्थाच्या राज्ञीपदाच्या साऱ्या जबाबदाऱ्या सहजतेने पेलते एवढेच आपल्याला कळते. राजसूयातील द्रौपदीलज्जारक्षणाचा प्रसंग ( २।९।७५-९६ ) स्वतंत्रपणे चितारून तिचे सतित्व, प्रसन्नता व क्रोध आणि कृष्णरक्षित रूप रंगविले आहे. परंपरेने द्रौपदीची गणना पंचपतिव्रतात केली आहे. ते तिचे सतित्व अशा निर्वाणीच्या प्रसंगातून प्रकटते. भीष्म, धृतराष्ट्र, कुंती आणि धर्म तिचा गौरव करतात. हे सतित्वच दुर्योधनाच्या हेव्याचा विषय बनते आणि कर्णासारख्या खलालाही ते अखेरी मान्य करावे लागते. तिचे खरे दर्शन घडते ते द्युतप्रसंगी. येथे ती अगतिक, बुद्धिमती, भक्तहृदयी क्षात्राणी आहे. निर्लज्ज दुःशासनाने डाव्या हाताने वेणी धरून उजवा हात निरीला घातला. पराक्रमी पती हताश होऊन पाहत बसले आणि ज्येष्ठ सभाजन गतप्राण झाल्यासारखे निस्तेज झाले ते हा तिला कोणता आधार उरला ! आणि म्हणून ' सोयरिया ' कृष्णालाच तिने साद घातली. तिची व्याकुळ आर्तता या धाव्यातून ओसंडून वाहते. अगतिकता आणि विषण्णता यांच्या भीषण डोहातून ती परमेश्वराच्या कृपामयतेकडे सरकत जाते. ही वेदनाच तिला आपले आणि त्याचे नाते

दाखविते. तद्द्वारा देव-भक्त संबंधाचे एक रम्य चित्र अम्लान सौंदर्याने आपल्यापुढे ठाकले आहे. आपल्या भावबळावर ती तरते आणि पतींनाही तारते. मयसभेतील हसण्याचे निमित्त होऊन तिच्यासारख्या तडफदार याज्ञसेनीवर केवढा प्रसंग ओढवतो. क्षुल्लक गोष्टींचे श्रेष्ठांना होणारे हे अतिरेकी शासन ईश्वरी न्यायाची अतर्क्यता दाखवून श्रोत्यांना नम्र करणारे आहे. जटासुर-जयद्रथ यांच्या संकटातून तिचे पातिव्रत्य उजळून निघते. कृष्णप्रीतीने ती दुर्वास परीक्षेला उतरते. वनातही धर्माचे मन वळवू पाहणारी, अर्जुनाचा विजय इच्छिणारी आणि भीमाचे पौरुष चेतविणारी मानधन क्षत्राणी म्हणून ती धुमसत राहते. कीचकाच्या कामांधतेतून आणि उपकीचकांच्या क्रोधातून ती चातुर्याने आणि धैर्याने सुटका करून घेते. " ते अवघेचि वाया गेले । मज ताडिता कीचके " या उद्गारातून तिच्या असहाय मनाचे सारे उभड प्रकटले आहेत. पुत्रनिधनाने ती उन्मळून पडते. पण या शोकातही प्रतिशोधाची जळती आग तिच्या मनात भडकून उठते. अशी ही याज्ञसेनी धगधगत्या अग्निज्वाळेसारखी आहे. विवेकाने मार्ग काढू पाहणारी, पराक्रमी पतींना स्फुरण देणारी, अन्यायाने धुमसणारी संतप्त व तेजस्वी अशीच ती आहे. तिच्या उद्गारातून तिचे अंतःकरण बोलके होते. मुक्तेश्वरांनी आपल्या भारतांतर्गत भक्तीरसाचे पोषण व्हावे अशा दृष्टीने द्रौपदीची व्यक्तिरेखा चितारली आहे.

**दुर्योधन** हा महाभारताचा प्रतिनायक. त्रैलोक्यीचा मद-मत्सर एकवटून हा कलि-पुरुषाचा पूर्णावतार घडला ( १।१४।१३३ ). पांडवांच्या द्वेषाने जळफळत त्यांच्या नाशाचे प्रयत्न तो आरंभापासून करतो. सूक्तासूक्ताचा विधिनिषेध त्याला नाही. " कापट्यविद्येचा सागर । दीर्घद्वेष्टा निर्दयी " (१।२६।८७ ) हेच त्याचे रूप आरंभा-पासून अखेरपर्यंत आहे. त्याच्या मयसभेतील फजितीच्या रागाची चिन्हे पांडवांना दिसत नाहीत पण " मज असेल पुरुषचिन्हा तरी मी होईन या उत्तीर्ण " ( २।१२।५८ ) अशी प्रतिज्ञा करून तो मोकळा झालेला असतो. त्याचा आवेश आणि धूर्तता यांचे चित्रण स्वगत उद्गारांनी करण्यात मुक्तेश्वरांचे कौशल्य प्रकटले आहे. पांडवांच्या वैभवदर्शनाने मत्सरग्रस्त झालेले, अपमानाने जळणारे व सूडाने धगधगणारे त्याचे मन द्यूतमंत्रसमयी मुक्तेश्वरांनी प्रभावीपणे व्यक्तविले आहे. महाभारती दुर्योधनाची राजनीती व चातुर्य मुक्तेश्वरी दुर्योधनात नाही, पण कोणतीही गोष्ट टोकाला नेण्याची ईर्ष्या आणि वीरवृत्ती आहे. सहज क्रीडेच्या मायावी पाशात तो पांडवांना खेचतो. आपला डाव साधल्यावर सूडाचा जल्लोष तो उसळत्या अवसानाने प्रकट करतो. दुर्योधनाच्या संतापाचे आततायीपणात होणारे रूपांतर हा भावविकासाचा एक नमुनाच आहे. पांडवांना वनात पाठवूनही त्याला समाधान नाही. उपदेश करणाऱ्या मैत्रेयासमोर हसण्याइतका उद्धट, पांडवरुछळासाठी दुर्वासांचा उपयोग करण्याइतका कावेबाज, वैभवदर्शनाने पांडवांना लज्जित करू पाहण्याइतका क्षुद्र बुद्धीचा पण अपमानाने प्राणत्याग करू पाहण्याइतका मनस्वी, अशा वेगवेगळ्या रंगाने वनपर्वातील दुर्योधन रंगलेला आहे. अज्ञातवासी

पांडवांना शोधण्याचा तो आटापिटा करतो. चंचल, भावनाप्रधान, कपटी आणि साशंक योद्धा ही त्याची पारंपरिक प्रतिमा अधिक काजळलेल्या स्वरूपात विराटपर्वात येते. सौप्तिकात शत्रूचा शक्य तेवढा संहार केल्याच्या आनंदात तो अखेरी शांतपणे मरणाला सामोरा जातो. ताठ कण्याचा, अभिमानी व उद्धत क्षात्रपुरुष म्हणून तो आपल्या डोळ्यासमोर उभा राहतो. महाभारतकारांनी त्याच्या व्यक्तिमत्त्वाला राजनीतीज्ञतेचे बौद्धिक परिमाण दिले आहे. मुक्तेश्वरांनी त्याच्या मुखीच्या राजनीतीचर्चा गाळल्या व संक्षेपिल्यामुळे त्यांच्या दुर्योधनाचे हे परिमाण क्षीण झाले आहे. जोडीला दुष्टांचा दुष्टावा तीव्र करण्याच्या लकबीमुळे मुक्तेश्वरांनी दुर्योधनाच्या व्यक्तिमत्वात खलत्वाचे रंग अधिक गडदपणे भरले आहेत.

**गौण व्यक्तिचित्रे :** कथाप्रसंगाच्या ओघात येणाऱ्या गौण व्यक्तींची रेखाचित्रे मुक्तेश्वर कौशल्याने काढतात. भीमाचे स्वागत करणारा, राजसूयाला येताना अपशकुनांची पर्वा न करणारा, "ऋत्विज नोहे ना आचार्य। राजा नोव्हे ना समान राया" (२।१०।९१) अशा कृष्णाची पूजा झाल्यावर धडकत्या अग्नीज्वालेसारखा संतापणारा शिशुपालही लक्षात राहणारा आहे. भरसभेत त्याची वाणी कडाडत्या विजेसारखी गर्जत राहते, खड्गमुष्टीवर हात ठेवीत वादळासारखा तो निघतो आणि अखेर वज्राने शैलशिखर ताडावे तसा कोसळून पडतो. त्याच्या आव्हानातील साहस आणि बोलण्यातील उद्दाम दर्प जाणवत राहतो. त्या संगती येणारे पूर्वचरित्र त्याच्या वर्तनाची व आकस्मिक वधाची पार्श्वभूमी सिद्ध करते. स्थितप्रज्ञ भीष्म, सत्वस्थ विदुर, बलदर्प बाळगणारा जरासंध, खलांची साथ करणारा पण मूल्यनिष्ठेने उजळून निघालेला कर्ण, कामांध कीचक, व्यथितचित्त-सूडाने जळफळणारा क्रूरकर्मा अश्वत्थामा अशी कितीतरी लहानमोठी व्यक्तिचित्रे येथे ठळकपणे रेखलेली आहेत.

शृंगारलुब्ध व रसिक नायक आणि रूपगुणयौवनचातुर्यभरिता नायिका यांच्या मधुर प्रीतीकथा मुक्तेश्वरांनी भावोत्कटतेने सांगितल्या आहेत. रुरू-प्रमद्वरा, पाराशर–मत्स्यगंधा, दुष्यंत–शकुंतला, देवयानी-कच, देवयानी-ययाती, ययाती–शर्मिष्ठा, विश्वामित्र–मेनका, शांतनु-गंगा, शांतनु–मत्स्यगंधा, पंडु-माद्री, भीम–हिडिंबा, अर्जुन–सुभद्रा, नीलकन्या–अग्नी, नल–दमयंती, राम-सीता, सत्यवान–सावित्री अशा प्रणयी दांपत्यांची रमणीय चित्रे त्यांनी रेखली आहेत. सौंदर्याच्या प्रथमदर्शनाचा प्रभाव, प्रीतीची अनिवार ओढ, प्रेमिकांचे चतुरालाप, प्रणयिनींचे जलविहार, त्यांचे सखीसंवाद, प्रेमिकांच्या क्रीडा या सगळ्यांचे उत्फुल्ल चित्रण ते करतात. रसरशीत व जोमदार प्रेमानुभव प्रकट करणाऱ्या प्रेमिकांची टवटवीत चित्रे हा मुक्तेश्वरांच्या व्यक्तिचित्रण-कौशल्याचा विशेष आहे.

गौण पण कथावस्तूत महत्त्वाचे स्थान असलेल्या व्यक्तिरेखांप्रमाणे आनुषंगिक अशा गौण व्यक्तींचेही आरेखन ते नेटकेपणाने करतात. जरासंधपिता बृहद्रथाच्या रूपाने आदर्श राजाचे चित्र येते. भारतीय संस्कृतीने जोपासलेले आदर्श, संकेत व

जीवनावस्था यांचे ते दर्शन आहे. अशी व्यक्तिचित्रे सांस्कृतिक आशयाला मूर्त करीत जातात.

## ६. व्यक्तिचित्रण : काही विशेष

जिवंत आणि रसरशीत पात्रांची एक चैतन्यपूर्ण सृष्टीच व्यासमहर्षींनी महाभारतात उभी केली आहे. मुक्तेश्वरांनी तिचे आरेखन आपल्या प्रकृतिनुसार व त्यांच्या भारताच्या रूपाकृतीनुसार केले आहे.

ही पात्रे एका विशिष्ट सामाजिक स्तरातील आहेत. ती उच्चपदस्थ व कुलीन आहेत. बाहूंच्या सामर्थ्यावर सिंहासन साभाळणारे राजपुरुष, त्यांच्या लावण्यवती स्त्रिया आणि तपोधन मुनी यांनीच ही पात्रसृष्टी घडविली आहे. त्यांचे वृद्ध आप्त, अमात्य, सेवक आणि सामान्य प्रजाजन तिच्या गौणत्वाने वावरत आहेत. ही पात्रें निरनिराळ्या वयोगटातील आहेत. केवळ निर्देश असलेली पात्रे विपुल आहेत; पण कथावस्तु घडविणारी पात्रे मोजकीच आहेत. व्यासांनी कल्पिलेल्या पात्रसृष्टीचे स्थूल स्वरूप कायम ठेवल्यामुळे आदर्शात्मकता, प्रतिकात्मता व प्रातिनिधिकता यांची परिमाणे मुक्तेश्वरी पात्रसृष्टीलाही प्राप्त होतात. भानुमती ( २।१३।७४ ) सारखा ओझरता उल्लेख सोडला तर स्वतंत्र पात्रनिर्मितीचा प्रयत्न मुक्तेश्वरांनी केलेला दिसत नाही.

मुक्तेश्वरी पात्रांना भावी घटना ज्ञात असतात. त्या जाणून त्यांची पात्रे निर्णय घेताना दिसतात. त्याप्रमाणे घडत असताना आपण निमित्तमात्र आहोत याचीही त्यांना जाणीव असते. कृष्णाच्या लीलानाटकात आपल्याला नेमून दिलेले काम जणू ती करीत असतात. प्रत्यक्ष प्रसंगाचा स्वीकार करताना मात्र त्यांच्या मानवी अंतःकरणाचा तडफडाट होतो. त्यामुळे पूर्वनियोजनाचा वास येऊ पाहणाऱ्या जीवनचित्रांना जिवंतपणाचा स्पर्श होतो. मुक्तेश्वरांच्या अन्य रचनेप्रमाणे येथेही त्यांच्या पात्रांना लौकिक व अलौकिक अशी दुहेरी रूपे प्राप्त होतात. पण येथील चित्रणाचा मोहरा लौकिकाला अधिक भिडलेला आहे आणि अलौकिकाचे धूसर आवरण केवळ काही निर्देशांतूनच जाणवते.

मुक्तेश्वरांची पात्रे विशिष्ट मूल्यांचा आग्रह धरताना दिसतात. त्यांच्या कृतिउक्तीत मूल्यगर्भता असते. त्यामुळे त्यांना मूल्यात्मकतेचे परिमाण प्राप्त होताना दिसते.

उत्कटतेच्या ध्यासातून व्यक्तिरेखांना गर्द रंग दिले जातात. त्यांची पात्रे निकराच्या क्षणी टोकाला जाऊन निर्णायक भाषा बोलतात. दुष्टांचा दुष्टावाही अशा तीव्रतेने आविष्कृत होतो. प्रेम, राग, द्वेष यांसारख्या भावनांचे मनमोकळे आविष्कार ती करतात.[१३] त्यामुळे कधी चित्रण भडक होऊन अश्लीलतेकडे झुकते तर कधी उत्कट होऊन पात्रांना मनस्वीपणाचे रंग लाभतात.

---

१३. व्यक्तिरेखांचा तीव्र पीळ वा मनस्वी पात्रे यासाठी पहा : आदि १०।३८, १५।११८–१२०, १६।२१–२३, १४७–१५०. सभा. ५।६४–६५, ९२, १६२–१६५; ९।७७–७९; १२।१०४, १३६, २४६; १३।२२; १४।४८; १५।११७,२५४,२७३; १६।२५. वन. १३।७५ इत्यादी.

मानवी स्वभावातील गुंतागुंतीचे मुक्तेश्वरांना पुरेपूर भान आहे. शत्रुपक्षीय कचाला शिष्यत्व देण्याने सुरगुरू शिष्य होईल, असा शुक्राच्या मनातला अहंकार त्यांनी नेमका टिपला आहे. द्रौपदीस्वयंवराचा पण पाहताच धीर सुटलेले राजे आपण केवळ कौतुक पाहण्यास आलो असे म्हणू लागल्याचे ते मिस्किलपणे सांगतात. दुष्यंताची मिरवणूक पाहताना पौरजनांच्या मनात उठलेले तरंग मानसवेत्याच्या कुशलतेने त्यांनी रंगविले आहेत. " दिससी विवेकाचा उदधी । ऐशियाची चळली बुद्धी । आश्चर्य मज वाटे " ( ३।१०।१८० ) असे त्यांचा धर्म शापग्रस्त नहुषास म्हणतो. व्यक्तिमनाची गुंतागुंत व त्यातील विचित्रता यांचे भान कविला असल्याची ही पुसट खूण आहे. मनातल्या खळबळीने आणि सुचलेल्या विपरीत कल्पनेने उद्दीपित झालेला अश्वत्थामा कृप, भोज यांना उठवितो पण लज्जित होऊन क्षणभर काहीच बोलत नाही (१०।१।४७) असे वर्णून मुक्तेश्वर त्याच्या मनातील उलाघाल, खळबळ व कालवाकालव टिपतात. अशा बारकाव्यांनी व्यक्तिमन सजीव होऊन आपल्यासमोर उभे राहते.

व्यक्तीचे अंतर्मन, विचार व बाह्य वर्तन एकदम चितारून त्यांतील विरोधाची, गुंतागुंतीची कल्पना देण्याचा मुक्तेश्वर प्रयत्न करतात. शकुंतला दरबारात आल्यावर जाणून नेणता झालेला दुष्यंत (१।१६।९२–९४, १४२–१४५) पाहण्यासारखा आहे. ब्राह्मणवेषाने स्वयंवरमंडपात बसलेल्या पांडवांच्या मनातील विचार दर्शवून ते नाट्य निर्मितात.

व्यक्तीच्या कृतीमागील विचार वा तत्समयीची मनःस्थिती साक्षेपाने वर्णिल्याने त्यांच्या व्यक्तिचित्रणाला भरीवपणा येतो. संजीवनी दान करण्यापूर्वी शुक्राच्या मनःस्थितीचे, विचारातील गुंतागुंतीचे वर्णन पाहण्यासारखे आहे. ब्राह्मणरक्षणाचा क्षात्रधर्म व वैयक्तिक नियमपालन यात विरोध आल्यावर परिणाम जाणूनही त्यांचा अर्जुन क्षात्रधर्माचे पालन करतो. तत्कालीन समाज, तत्वविचार यांच्या मूल्यव्यूहात व्यक्तीचे वर्तन स्पष्ट करण्याचा व्यासांचा प्रयत्न आहे. त्याचे मर्म जाणून मुक्तेश्वर तो उठावदार करतात. क्षात्रधर्म व ब्राह्मणधर्म यांच्या संघर्षात स्वधर्माला पारखया झालेल्या अश्वत्थाम्याचे चित्र याद्दष्टीने पाहण्यासारखे आहे.

वैष्णवयागाचे आमंत्रण वा घोषयात्रा या घटनांच्या धर्म–भीमाच्या भिन्न प्रतिक्रियां-मधून त्यांच्या सौम्य व परूष प्रकृतींचे दर्शन घडते. एकाच घटनेच्या भिन्न प्रतिक्रियांतून भिन्न स्वभावविशेषांचे दर्शन घडविण्याचे हे खास मुक्तेश्वरी तंत्र आहे.

शकुंतलाख्यान सांगताना कालिदासाप्रमाणे दुष्यंताचे निर्दोषत्व पटवावे, असे मुक्तेश्वरांना वाटत नाही. त्यांच्या व्यक्तिरेखांचे मनोभाव अभिजाततेपेक्षा आर्षत्वाकडे झुकतात, याच्या अशा खुणा त्यांच्या रचनेत सर्वत्र आहेत.

व्यक्तींच्या सम्यक स्वभावरेखेला मुक्तेश्वर कधी अगदी बारकाईने जपताना दिसतात. मयसभेसाठी लागणारे धन आपण बिंदुसरोवरातून आणू असे मय म्हणतो. पण पांडवांसारख्या धर्मात्म्यांना असे दुसरीकडील धन कसे चालेल ? म्हणून तो घाईघाईने खुलासा करतो, " हा भूमिनिक्षेप असल्याने राजाला तो घेण्याचा अधिकार आहे "

( २।१।५० ) या मयाचा खुलासा मुक्तेश्वरनिर्मित आहे. त्याद्वारे पांडवांच्या धर्मशीलतेवर अप्रत्यक्ष प्रकाश पडतो. व्यक्तिरेखांचे हे सम्यक् रूप कधी मात्र पुरते विस्कळीत होते. पित्राज्ञेच्या अनुषंगाने त्यांचा धर्म सुपुत्र-कुपुत्र चर्चा करतो. तीही परत पापयुगातील ! आणि त्यात परत नपुंसकलिंगाचे षोडशांगुळसारखी उपमाने बेदिक्कत वापरतो. त्यांचा जरत्कारू ' कुश्चित संसारराहाटी ' वर्णिताना असाच वहावत गेला आहे. मुक्तेश्वरांची कलाचतुर दृष्टी बारकाव्याने तपशीलाचे रंग भरीत एखादी व्यक्तिरेखा सामग्र्याने चितारीत जाते. पण त्यांची उत्कट मनोवृत्ती व अधूनमधून जागी होणारी लोकशिक्षकाची भूमिका यामुळे तिला कोठे कोठे तडे जाताना दिसतात.

मुक्तेश्वर स्वतंत्र व्यक्तिरेखा निर्माण करीत नसले तरी आपल्या अर्थानुवादानुसार व्यक्तींचे प्रभावी चित्रण करण्यासाठी स्वतंत्र प्रसंगांची योजना करतात. राजसूयभोजनवेळी द्रौपदीलज्जारक्षणाचा प्रसंग निर्मून कौरवांचा दुष्टावा, द्रौपदीची भक्ती व कृष्णाची भक्तवत्सलता ते दर्शवितात. द्रौपदीच्या शापोक्तिअनुवादातून तिच्या व्यक्तिरेखेत क्षत्राणीच्या बाणेदारपणाचे रंग भरले जातात. नवप्रसंगनिर्मितीचा उपयोग व्यक्तिरेखनासाठी करण्याची दक्षता मुक्तेश्वर घेताना दिसतात.

आपल्या पुनर्घटित कथाबंधाच्या चित्राकृतीत ( पॅटर्न ) व्यक्तींना यथाप्रमाण स्थान लाभावे यासाठी मुक्तेश्वर जागरूक असतात. त्यासाठी ते नवप्रसंग निर्मितात. संवादात फेरबदल करतात. प्रसंगानुरूप कृतिउक्तींची भर घालतात. भीमाला त्यांनी दिलेला ठळकपणा, विराटपर्वाच्या बांधणीत अर्जुनाला मिळालेले महत्त्वपूर्ण स्थान, कृष्णाची सार्वत्रिकता, नकुल-सहदेवांचे स्वतंत्र अस्तित्व यांचा असा विचार करता येण्यासारखा आहे.

पात्रांच्या भावभावना चितारूनच वाङ्मयलेखकाला भागत नाही. पात्रांच्या या मनोमय चित्रणाला त्यांच्या रूपाकृतीचा आधार देणेही आवश्यक असते. त्यांच्या बाह्य रूपाचे, शरीरप्रकृतीचे वर्णन करून पात्रांना एक घनता देणे, आकार देणे शक्य होते. त्यामुळे पात्रे श्रोत्याला केवळ जाणवत नाहीत तर ' दिसतातही '. पंडु, माद्री, भीम, घटोत्कच, द्रौपदी यांची रूपवर्णने पाहण्यासारखी आहेत. रूपवर्णने एकत्र व सलगपणे न करता प्रसंगसंदर्भात वेगवेगळ्या पद्धतीने ते करतात. भविष्य, अन्य पात्रे, त्या त्या व्यक्तीच्या कृती चित्रणातून, भविष्यकथनातून, अन्य पात्र-मुखाने, त्या व्यक्तीच्या कृतिचित्रणातून रूपनिर्देश करण्याची त्यांची लकब आहे. त्यामुळे ती सजीव व प्रतीतिक्षम झाली आहेत. इंद्र-अर्जुन भेटीचे " आवडी बसवूनी अंकी । प्रीती मुखातें अवलोकी । वारंवार म्हणे, सुखी कीं ? । पुत्रा क्षेम असशी की ? " ( ३।५।३७ ) हे वर्णन पहा. ' वारंवार 'मधील उतावीळी, अंकावर बसविण्याची वत्सल कृती, मुखावलोकनातील प्रीती, प्रश्नांची पुनरुक्ती इत्यादींनी इंद्राचे वात्सल्य मूर्त झाले आहे. भावस्पर्शित चित्रे ठायीठायी[१४] येतात.

---

१४. आदि. ९।५९, १०।४२. सभा. १०।१५५-१५६, १२।६४-६८, १५।२४३. वन. २।२६-२८, ५।३७, १०।११४, १८९, १२।३०-३३, १७४-१७८, १३।१-५.

रूपवर्णनापेक्षा आणखी एका वेगळ्या पण कलात्मक पद्धतीने मुक्तेश्वरांनी आपल्या पात्रांना शरीराकृती दिली आहे. नागांचा विचार नापसंत असणारा वासुकी "अधोवदने वारी मौळ। हस्त झाडी वेळोवेळ" (१।७।३९) असा मूर्त होतो. पवनाने थरकणाऱ्या पद्मपत्रासारखे क्रोधाने स्फुरणारे शकुंतलेचे अधर थरथरत असतात. (१।१६।१०५). दुर्योधनाने "भ्रूसंकेत दाविता नयनी" (२।१४।१७) शकुनी पट मांडतो. तो 'नेत्र भवंडीत' (२।१५।५) बोलतो. आणि 'हाते वारी दुःशासना' (२।१५।२४७) असा हात हलवून वस्त्रहरण थांबवितो. वनगमन करणाऱ्या भीमामागे "चेष्टा कुचेष्टा वक्र गमन। दाखवी वाकुल्यांचे चिन्ह" (२।१६।६८) अशा मर्कटचेष्टा करीत जातो. भीम 'गदगदाटे' हसतो तेव्ह फासे 'गरगराटे' फिरतात (२।१४।४०) द्रौपदीची दुर्दशा पाहून "रगडोनिया अधर दांत। गदामुष्टी घातला हात" (१।१५।५२) अशी त्याची स्थिती होते. सुदेष्णेने कीचकाची तरफदारी केल्यावर द्रौपदी "खेद पावोनी अंतरीं। बाह्य कृत्रिम हास्य करी" असं खोटं खोटं हसते आणि ते हसणे पाहून "सुदेष्णा टाळी पिटी करीं। मिळे विचारीं म्हणोनियां" (४।३।९२) अशी फसते. बाह्य आविर्भाव व अंतरंगचित्रण यातील विरोध द्रौपदीचे मन उघडे करतो. टाळ्या पिटणाऱ्या सुदेष्णेचा उथळपणा स्पष्टच आहे. दुःशासनाच्या तावडीत सापडलेल्या द्रौपदीच्या आविर्भावांचे असे आलंकारिक वर्णन (२।१५।३३, ३५, ४२, ११९, १२१) ते करतात की तिच्या मनाची सारी तगमग त्यातून प्रकट व्हावी.

व्यक्तींच्या आविर्भावांची ही वर्णने[१५] मुक्तेश्वरांच्या व्यक्तिचित्रकौशल्याची निदर्शक आहेत. त्यामुळे त्या त्या व्यक्ती आपण पाहत आहोत असे श्रोत्यांना वाटते. ही वर्णने अनलंकृत वा अलंकृत पण चित्रशैलीने केलेली आहेत, त्यातून व्यक्तीच्या रूपरंगाचे, कृतींचे स्वरूप स्पष्ट होते, भावसूचन होते आणि प्रसंगांना जिवंतपणा येतो. सलग मूर्तिवर्णनापेक्षा विखुरलेल्या रूपनिर्देशातून पात्रांना उभे करण्याची ही पद्धत प्रभावी व प्रतीतिदर्शक वाटते.

व्यक्तिस्वभावाचे दर्शन मुक्तेश्वर निवेदनाच्या नानापरी वापरून करतात. कधी त्यांची पात्रे स्वतःविषयी बोलतात. "शिल्पसृष्टीचा अपर ब्रह्मा। मी असुरांचा विश्वकर्मा" (२।१।४०) अशा गौरवोक्तीने मयासुर स्वतःची ओळख करून देतो. "श्रीकृष्णरायाचिया भक्ता। मी रक्षिता परी नव्हे दाहिता" (२।८।११८) असा अग्नीने आपला स्वभावविशेष सांगितला आहे. "त्रिभुवनीं। धन्य धन्य मी एक" (३।४।१६०). अशी अस्त्रप्राप्तीची धन्यता अर्जुन स्वमुखाने व्यक्तवितो.

---

१५. आदि. ७।३९, ८।२९, १६।१०४–१०५, १९२, २४।५१, ५८.
सभा. ८।१५०, १०।७४, १०१–१०२, १२।४२, १४।१७,३८,४०,५१,५२, १५।५,३३,३५,४२,५०,५२,११९,१२१,२४७, १६।६३,६८,९३,९५.
विराट ३।२५,२६,९२.

" ते अवघेचि वाया गेले । मज ताडितां कीचकें " (४।३।१६६-१७४) या द्रौपदीच्या उद्‌गारातून तिच्या अंतःकरणाचे सारे उमड आणि पांडवांच्या अज्ञातवासातील दुर्दैवाचे सारे दशावतार प्रकटतात. स्वगत उद्‌गारातूनही अप्रकट भावनेचे दर्शन मुक्तेश्वर घडवितात. केशाकर्षण होताना "... व्यथा प्राणें । साहवेना सर्वथा " (२।१५।७४) या उद्‌गारातून द्रौपदीची असहायता अधिक तीव्र होते.

अन्य पात्रमुखाने चित्रण करण्याचा मार्ग मुक्तेश्वरांनी वैपुल्याने वापरला आहे. " स्नुषांमाजी मुख्य राणी । कौरवकुलतारिणी " वा " सकळ ऐश्वर्य गुणैकराशी । तुझेंचि असे जाण पां " (२।१५।१६१-१६२) या धृतराष्ट्राच्या साखरपेरणीतून, " पर्वतकन्येहूनि विशेषी । कसा आगळी सुकुमारी " (२।१५।१६१) या धर्माच्या गौरवातून, " नित्य अनुभवी पंच पुरूष " (२।१५।१०४) या कर्णाच्या भेदक शेऱ्यातून, " जरी मिळे ऐसी भाज । तरी पुढारी आर्त नाही मज । क्षत्रियकुळीं जन्मोनी काज । सर्वही म्यां साधिलें " (३।१४।१०) या जयद्रथाच्या लालसेतून, " स्वधर्मे राहाटें वो वेल्हाळी । स्नेहें भ्रतारां सांभाळी "! (२।१६।१२१) या कुंतीच्या उपदेशातून, " चतुर इयेसमान । दुजी नाहीं सर्वथा " (३।४।५९) या भीमाच्या गौरवोक्तीतून, " पुत्रनिधनाच्या श्रवणीं । शोकाग्नीमाजीं याज्ञसेनी । देह दग्ध करील हें मनीं । मातें निश्चयें मानलें " (१०।३।६२) या धर्माच्या अंदाजातून आणि " हे संतोषलिया परममंगळ । रोषल्या प्रलयाग्नीची ज्वाळ । कृष्णकृपावल्ली सफळ । ईतें वेष्टूनि वाढली " (२।९।९४) या भीष्माने दिलेल्या इशाऱ्यातून द्रौपदीच्या व्यक्तिमत्वाची जवळजवळ सगळीच वैशिष्ट्ये आविष्कृत होतात. एका व्यक्तीच्या मुखाने दुसऱ्या व्यक्तीच्या स्वभावाचे दिग्दर्शन केल्याने तिची अंगोपांगे स्पष्ट होतात. तिच्या कृती-उक्तींचे साद-पडसाद टिपता येतात. तिच्याकडे पाहण्याचे अनेक दृष्टिकोण उपलब्ध होतात आणि ते व्यक्त करणाऱ्या व्यक्तीं-वरही प्रकाश पडतो. मुक्तेश्वरांनी ही पद्धती वैपुल्याने वापरल्याने त्यांनी केलेले व्यक्ति-चित्रण भावसंपन्न व अनेक पैलूंनी युक्त असे झाले आहे.

आपल्या पात्रांच्या कृतिउक्तीवर भाष्य करूनही मुक्तेश्वर त्यांचे दर्शन घडवितात. केवळ निवेदनपर विधानातून साकारलेली देवर्षी नारदांची (२।२।१६-१२७) भव्याकृती या दृष्टीने पाहण्यासारखी आहे. कथौघात एखाद्या निर्णायक क्षणी त्यातील मध्यवर्ती पात्रांचे मानसचित्र ते सादर करतात. त्याच्या कृतीची चिकित्सा करतात. द्यूतमद्याने भ्रमलेल्या धर्माच्या मनोऽवस्थेचा भावात्म प्रत्यय त्यांनी दिला आहे. परीक्षिताने शमिकाच्या केलेल्या विटंबनेच्या निमित्ताने ईश्वरमाया-पूर्वकर्म यामुळे विवेकीही प्रसंगी अविचार करतो, असे भाष्य (१।९।४९-५०) त्यांनी केले आहे. आपल्या पात्रांच्या कृतीच्या प्रकाशात जीवनार्थ शोधण्याचा हा प्रयत्न त्यांच्या पात्र प्रसंगांना मूल्यात्मक परिमाण देतो. आपल्या मनाचा कल उपमानयोजनेतूनही ते सुचवितात. भीम-जरासंध युद्धाच्या वर्णनात राम-रावण, इंद्र-शंबर अशी पौराणिक व मोह-विवेक, क्रोध-सात्विक अशी आध्यात्मिक उपमाने येतात. त्यातून त्या योद्ध्यांविषयीचा आपला कल, लढ्याचा

ग्रंथ संग्रहालय ठाणे
ता. क. ........

परिणाम व संघर्षाचे स्वरूप त्यांनी सुचविले आहे. पात्र-प्रसंगांच्या निरीक्षक व्यक्तींच्या प्रतिक्रिया स्वतंत्रपणे वर्णून मुक्तेश्वरांनी मोठ्या कलात्मकतेने आपले अभिप्राय सुचविले आहेत. धर्माने लावलेल्या पणावर " पवित्र म्हणती, हे विचित्र । कौतुक दृष्टीं देखतसों " ( २।१४।१४६ ) अशी सभाजनांची प्रतिक्रिया नोंदवून त्यातील वैपरित्य त्यांनी सुचविले आहे. अशा सूचकतेने आपले मनोगत व्यक्तवून त्या त्या पात्रांच्या कृति उक्तीकडे पाहण्याचा दृष्टिकोण ते श्रोत्याला देतात.

व्यक्तिविशेषांचे आविष्करण करण्यासाठी मुक्तेश्वर आपली शब्द-विधाने दक्षतेने वापरतात. " जंव जंव डाव हारीं पडे । तंव तंव आगळी हांव चढे । एकमेकां इडेपाडें । जिंकावया इच्छिती ॥ ( २।१४।१३ ) असे शकुनी द्यूतकाराच्या सर्वसाधारण मनोवृत्तीचे वर्णन करतो. " .. । हारी आली युधिष्ठिरा । हे परिसोनि कुंतीकुमारा । हांव अद्‌भुत नावरे " ( २।१४।६० ) असे हरत चाललेल्या धर्माच्या मनःस्थितीचे वर्णन करून मुक्तेश्वरांनी शकुनीच्या वचनाचा ताळा दिला आहे. व्यक्तिरेखनातील मागील-पुढील संगतीचे चांगले भान त्यांना दिसते. संबोधन-विशेषणांचाही व्यक्तिदर्शक वापर ते करतात. ' पवित्र ', ' विदुरसुमती ', ' चतुर राया ' असा धृतराष्ट्र विदुराचा उल्लेख करतो. धर्म त्यास सर्वेशराया म्हणतो तर कुंती ' विचारनिधी ' म्हणते. दुर्योधन मात्र " रे अविचारिया विदुरा " ( २।१४।१११ ) असा अधिक्षेप करतो. विदुराचे चतुर, विवेकी व पावन व्यक्तिमत्व त्यातून आविष्कृत होते. त्याच्याविषयी इतरांचा आदर व्यक्त होतो. आणि मग दुर्योधनाने केलेल्या अधिक्षेपाने दुर्योधनाचाच उद्दामपणा अधिक ठसठशीत होतो. शब्दांची छिन्नी काळजीपूर्वक चालवून मुक्तेश्वरांनी आपल्या पात्रांची प्रतिमाशिल्पे घडविली आहेत.

## ७. समारोप

पात्रांची उच्च सांस्कृतिक पातळी, भव्य कृतींशी संबद्धता, आदर्शात्मकता, प्रतीकात्मकता आणि वस्तुनिष्ठ चित्रण यामुळे महाभारतातील पात्रसृष्टी विलक्षण जिवंत, रसरशीत आणि व्यामिश्र झाली आहे. मुक्तेश्वरी भारताला ती सहजतया लाभली आहे.

महाभारती व्यक्तिरेखांचा स्थूल बाह्याकार, लोकमानसाने त्यांना दिलेला घाट आणि त्यांचे पूर्ववाङ्मयातील चित्रण लक्षात घेऊन मुक्तेश्वर व्यक्तिचित्रण करतात. त्यांची काव्यदृष्टी व महाभारताचे आकलन यामुळे भारती व्यक्तिचित्रे बदलतात. आपल्या नवार्थदर्शनानुसार भारती पात्रांचे परस्परसंबंध ते चितारतात. कथेच्या चित्राकृतीत पात्रांना यथाप्रमाण स्थान देण्यासाठी ते त्यांच्या कृती-उक्ती परिवर्तित रूपात मांडतात किंवा नवप्रसंगनिर्मिती करतात. मूल्यात्मकतेचे परिमाण, भविष्यकल्पनेचा वापर, प्रारब्धाची छाया आणि लौकिक व अलौकिक अशा द्विविध पातळीवर होणारे चित्रण यामुळे मुक्तेश्वरी व्यक्तिचित्रणास विशिष्टता आली आहे.

संहितेकडे अनवधनाने झालेले दुर्लक्ष, पूर्वग्रह, भारती व्यक्तिरेखांच्या आकलनातील व्यक्तिनिष्ठ विवाद्यता, मुक्तेश्वरी भारतातील रचनाव्यूहाचे वेगळेपण आणि मुक्तेश्वरी व्यक्तिचित्रणाची विशिष्टता यांचे भान विसरल्यामुळे पूर्वाभ्यासकांनी मुक्तेश्वरांच्या व्यक्तिचित्रणास अकारण गौण लेखले आहे. ते योग्य नव्हे.

कृष्ण ही मुक्तेश्वरी भारतातील केंद्रवर्ती व्यक्तिरेखा त्यांनी सर्वांगांनी साकार केली आहे. त्यामुळे तिला आर्ष प्रतिमेची पातळी प्राप्त झाली आहे. अन्य प्रधान पत्रांचे चित्रण मुक्तेश्वरांच्या कथामांडणीशी सुसंगत असून नेटके आहे. विशिष्ट प्रसंगातील पात्रांचे मनोभाव ते ठसठशीतपणे व उत्कटत्वाने रंगवितात पण पात्रांचे सम्यक रूप कोठे भंगलेले दिसते.

विधाने, वाक्य, शब्द, संबोधने, विशेषणे यांचा सावधपणे वापर करून मुक्तेश्वर व्यक्तिविशेषांना उद्गार देतात. कधी मात्र हा सावधपणा ते विसरलेले दिसतात. व्यक्तिरेखा तीव्र करण्याकडे त्यांचा कल असल्याने त्या कधी उत्तानतेकडे झुकतात. या तीव्रतेमुळे त्यांच्या पात्रांना मनस्वीपणाचे एक परिमाण प्राप्त होते, हेही खरे आहे. गौण व्यक्तींची उठावदार लघुचित्रणे ते करतात त्यामुळे सांस्कृतिक आशय मूर्त होतो. सलग व्यक्तिवर्णनापेक्षा भावसूचक आविर्भावांनी ते आपल्या पात्रांच्या रूपाकृती उभ्या करतात. भारती पात्रसृष्टीचे स्थूल विशेष त्यांनी कायम ठेविले आहेत. त्यांच्या पात्रांना भविष्यकालीन घटना ज्ञात असतात. ती दैवनिर्भर असतात आणि त्यांच्या कृतिशक्तीमागे मूल्यनिष्ठेचा आग्रह असतो. पात्रमुखाने, त्यांच्या स्वगत उद्गारांनी, अन्य पात्रमुखाने त्रयस्थ भाष्याने किंवा सूचक आलंकारिक निर्देशांनी ते पात्रांचे अनेकांगी चित्रण करतात. त्यामुळे त्यांच्या कृतिउक्तींचे साद-पडसाद टिपता येतात.

महाभारतातील रसरशीत व्यक्तिरेखांचे आरेखन मुक्तेश्वरांनी आपल्या प्रकृतिनुसार आणि त्यांच्या भारताच्या रूपाकृतीनुसार केले आहे. त्यांचे महाकाव्यात्म रूप त्यांनी जपले आहे. त्यांची व्यक्तिचित्रे भावसंपन्न व अनेक पैलूंनी युक्त अशी झाली आहेत.

□ □ □

# चार ॥ संवादयोजना

## १. संवाद : स्वरूपविवेचन

संवाद हे कथाशयाच्या व्यक्तिकरणाचे माध्यम आहे. काही वेळा संवादांनी कथा गतिमान होते. अशा वेळी संवाद हीच कथेतील कृती असते. प्रत्यक्ष कृतीशी साहचर्य व पूर्वोत्तर कृतींचे निवेदन असे दुहेरी कार्य संवाद साधतात. कृतीप्रमाणेच उक्तीही व्यक्तींच्या मनोभावांच्या द्योतक असतात. त्यामुळे संवाद हे प्रत्यक्ष स्वभावचित्रणाचे महत्त्वाचे अंग ठरते. घटना व व्यक्ती यांचे नाट्यपूर्ण रूप फुलवीत संवाद कथापट उलगडीत जातात. वर्ण्य व्यक्ती-प्रसंगांना उजळा देणे, त्यांना साकार करणे हेच संवादांचे प्रयोजन असते. पात्रानुसारी स्वाभाविक भाषेने नटलेले संवाद कथेला एक प्रकारची 'प्रत्यक्षता' देतात. कथा-व्यक्त-प्रसंगांना 'वर्तमान रूप' देणे संवादामुळेच शक्य होते. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर संवाद कथेला जिवंत करतात. ललित प्रकृतीचे कल्पक संवादही आपल्यापरीने एक प्रकारचे वाङ्मयीन अनुपयुक्त पण आवश्यक काम (नॉन-युटिलीटेरियन फन्क्शन) करीत असतात. वाङ्मयीन रूपबंधानुसार संवादांचे रूप-स्वरूप काहीसे बदललेले दिसते. महाकाव्यातील संवाद संभाषणापेक्षा वक्तृत्वपूर्ण भाषणांकडे अधिक झुकलेले असतात. महकाव्यातील अन्य वाङ्मयीन घटकाप्रमाणे संवादांची दीर्घता हेही एक वैशिष्ट्य म्हणावयास हवे. या दृष्टीने मुक्तेश्वरी भारतातील संवादयोजना न्याहाळावयास हवी.

## २. संवादयोजनेचे भारतसापेक्ष विशेष

संवादाचे माध्यम त्याच्या साऱ्या सामर्थ्यानिशी महाभारतकारांनी वापरले आहे. महाभारताचे हे बलस्थान मुक्तेश्वरांनी आपल्यापरीने टिकविले आहे. सौप्तिकातील संवाद बहुंशी मूलानुसारी असल्याने त्यात मुक्तेश्वरांचे स्वतंत्र वैशिष्ट्य फारच थोडे प्रकटले आहे. मुळातील भावक्षुब्धतेचा सदृश प्रत्यय देण्यात मात्र मुक्तेश्वर यशस्वी ठरले आहेत. अन्य पर्वांत मात्र संवादांची सामग्री संस्कारित करून ते वापरतात.

क्रोधाने खवळून बाहू उभारून कर्ण बोलतो (मभा. २।६१।२६ मुभा. २।१५।९८) असा कर्णाच्या बोलण्याचा भाव व आविर्भाव ते मूलानुसार वर्णितात. मुळातील विकर्ण हात चोळीत व श्वास सोडीत बोलतो (मभा २।६१।१८). मुक्तेश्वरांचा विकर्ण "गर्जून बोले कोपायमान" (मुभा २।१५।८७) असा बोलतो तेव्हा त्याला मुळाची सर येत नाही. दुर्योधनाच्या चेष्टेला उत्तर देताना भीम "संनिवृत्तार्धकायः" (मभा २।६८।२४)—अर्धे शरीर मागे वळवून-बोलतो. मुक्तेश्वरांचा भीम व्याघ्रासारखा मागे

पाहत, वर्षाकाळीच्या मेघासारखा गर्जना करीत बोलतो ( २।१६।६९ ). मुळातील कृतीचा बारकावा अलंकारनिष्ठ रसपोषक पद्धतीने मुक्तेश्वरांनी माडला आहे. वक्त्याच्या आविर्भावाचे भावसूचक वर्णन ही मुक्तश्वरांनी वैपुल्याने वापरलेली लकब आहे. त्यामुळे त्यांच्या संवाद–व्यक्तिरेखांना सूचकता, चित्रमयता व सजीवता प्राप्त होते. महाभारतात तिचा वापर विरल असून एतद्विषयक योजना अपवाद वगळता मुक्तेश्वरांनी स्वतंत्रपणे केली आहे.

कथेचा ओघ टिकविण्यासाठी बारीकसारीक व पुनरुक्तीवजा संवाद ते गाळतात. प्रसंगचित्रणाचा रोख व पद्धती बदलल्याने काही संवाद गाळले जातात. संबद्ध भाषणे गाळल्याने क्वचित कोठे विसंगती निर्माण झाली आहे. कथेच्या चित्राकृतीत सर्व पात्रांना यथाप्रमाण स्थान मिळावे म्हणून ते मूल संवादांचे वर्जन वा सारकथन करतात. त्याच कारणाने एका पात्राची संभाषणे दुसऱ्या पात्राच्या मुखी वापरली जातात. संवादाच्या संबद्ध अंशाचे एकीकरण वा दीर्घखंडाचे लघुखंडात विच्छेदन केल्याने त्यांच्या संवादयोजनेत लाघव येते. मूळ निवेदनात्मक भागाचे संवादात रूपांतर करून त्यास जिवतपणा व निकटता देण्याचा प्रयत्न असतो. निवेदन व संवाद या दोन काव्यप्रयुक्तीतील बलाबलाची कल्पना त्यांना असावी, असे त्यावरून वाटते. महत्त्वपूर्ण संभाषणाचे महत्त्व जाणून ते कधी समरूप तर मूलसंबद्ध विस्तार करतात. त्यांचा भावप्रत्यय यथार्थत्वाने देतात. अर्थात त्यास अपवादही आहेत. अनेकदा मूळ संभाषणातील भावच्छटा त्यांच्या चित्रणात बदलल्या जातात. मूळ भारती संवादात विचार-भावांचे संतुलन साधल्याने अर्थगांभीर्य आलेले असते. मुक्तेश्वरी संवाद विचारगुरुत्वापेक्षा भावशीलतेकडे अधिक झुकतात असे स्थूलमानाने म्हणता येईल.

नवप्रसंगनिर्मिती, नवार्थदर्शन, भक्तिनीती आदी प्रिय मूल्यांचे स्पष्टीकरण, प्रसंगाचा रोख व मांडणी यांतील बदल यामुळे अनेक संभाषणे त्यांनी स्वतंत्रपणे कथौघात गोविली आहेत त्यातही त्यांच्या संवादकौशल्याचा प्रत्यय येतो.

### ३. मुक्तेश्वरी महाभारतातील संवादयोजना

महाभारत त्यातील जोरदार व स्वभावप्रकाशक संवादांसाठी प्रसिद्ध आहे. संवादयोजनेच्या या चातुर्याचा प्रत्यय मुक्तेश्वरी भारतातही येतो. तीव्र भावक्षोभ व्यक्तविणारे स्वभावप्रकाशक संवाद[१], मनस्वी प्रकृतीच्या राजपुरुषांची ओजस्वी भाषणे[२], युद्धोत्साह वाढविणारे वीरांचे खणखणते आव्हानात्मक संवाद[३], भक्तहृदयाचे आर्तभावाने

१. देवयानी १।१७।८०–८३, द्रौपदी २।१५।११०–११६, ४।३।६३–७१.
२. शस्त्ररंग, आदि अ. ३१, अग्रपूजा, सभा अ. १० व ११.
३. भीष्म–राजे १।२३।११३,११५, अर्जुन–गंधर्व १।४०।११–१८, कृष्ण–जरासंध २।७।१–९, भीम–किर्मीर ३।२।४३–४६,६५, भीम–जटासुर ३।१०।१३–१६, भीम–कीचक ४।३।१४५–१४६.

खळाळणारे उभड[४], युक्तिवादांची पेचदार मांडणी असलेले वादविवाद[५], हृदयातील नाजुक मनोभाव सुचविणारे प्रणयी मिथुनांचे चतुरालाप[६], प्रसंगसंदर्भात तत्त्वविचाराची मांडणी करणारे विस्तृत संवाद[७] आणि चटपटीत व चुरचुरीत संक्षिप्त संवाद[८] त्यांच्या भारतात सर्वत्र विखुरलेले[९] आहेत.

मुक्तेश्वरी रामायणातील चमत्कृतिजनक संवादांचे शब्दलाघव येथे विरळ आहे. गंगावतरणावरील मनोहर चमत्कृतिपूर्ण कल्पनाविलासाने नटलेला गंगा–प्रतीप संवादासारखा ( १।२२।४९–५० ) एखादादुसरा अपवाद वगळता अशा शोभादायक संवादांचे प्रमाण मुक्तेश्वरी महाभारतात कमी झाले आहे. त्यातील संवाद भिन्न भाषिक पलटे घेत पात्रांच्या मनोभावांना बोलके करतात. ते युक्तिवादाला पक्के, विस्ताराला दीर्घ, भावनेला प्रवाही आणि आविष्काराला सहज बनलेले दिसतात.

महाभारताच्या संवादशैलीचे भान ठेवून आणि संवादयोजनेतील सामर्थ्य लक्षात घेऊन मुक्तेश्वरांनी प्रासंगिक संवादयोजना केली आहे. पूर्वोत्तर वृत्तकथनासाठी मुक्तेश्वरांनी संवाद वापरले आहेत. तसे ते त्यांच्या स्फुट आख्यानातही येतात. तथापि वृत्तकथनाबरोबर वृत्तिद्योतन हे संवादांचे ठळक उद्दिष्ट असल्याचे भान त्यांच्या भारती रचनेत आधिक्याने येते. बोलणारांच्या परस्परसंबंधाचे भान त्यांना असते. पण जेथे ते विसरले जाते तेथे ग्राम्यता, अश्लीलता आणि अनौचित्याची गालबोटे त्यांच्या संवादयोजनेला लागतात. तरीही पूर्वोत्तरकथन, प्रत्यक्ष कृतीचे साहचर्य आणि उक्तीलाच येणारी कृतिरूपता अशा विविध स्थळींची त्यांची संवादयोजना अनुरूप झाली आहे.

सुयोग्य संबोधने, मार्मिक विशेषणे, दृष्टांतकथांचा वापर, लवचिक भाषा, प्रश्नांचा फिरता ठेका, चरणांची पुनरुक्ती करून आशय एकलक्षी व ठसठशीत करणे, स्वगत

---

४. द्रौपदीचा धावा २।१५।११९।१६२, ३।११।९४–९४.

५. शकुंतला–दुष्यंत १।१६।८७–२१५. सत्यवती १।२४।४९.

६. शकुंतला–दुष्यंत १।१५।१०१, ययाती-देवयानी १।१८।११९.
गंगा–प्रतीप १।२२।४९–५०, शर्मिष्ठा-ययाती १।१९।१०–१५.
देवयानी १।१८।१२९-१३१.

७. कृष्ण-जरासंध २।६।१३३–१५१, धर्म-नहुष ३।१०।१४६–१८६.
धर्म-यक्ष ३।१८।३५–११७, धर्म-भीम-द्रौपदी ३।४।३५–३८.

८. कृष्ण-जरासंध २।७।१३–१४, भीम–कीचक ४।३।१३८–१३९.

९. आणखी काही लक्षणीय संवादस्थळे–आदि १८।११–२१, २४।५–१०,
२५।२५–३३, २९।१५९।१६१, ३६।१४३–१५६, ४०।७५-७९,
सभा ५।१–१४, ६।१३३–१५१, १२।११६–१२२, १३१–१४१,
१४।९४–१३१, १५।५०–७३, १६–४४–५५, १०८–१२४, १७।४५–७३.

उद्‌गारांचा वापर आणि भावसूचक कृतीची जोड यामुळे त्यांचे संवाद भावसंक्रामक होतात. त्यांच्या संवादशैलीत जसा आलंकारिक डौल आहे तसा बोलीचा सहजविन्यास आहे. संक्षिप्त आणि विस्तृत असे दोन्ही प्रकारचे संवाद ते सारख्याच ताकदीने लिहितात. पहिल्याचा चटकदारपणा आणि दुसऱ्याचा पल्लेदारपणा ते लीलया पेलतात. त्यांच्या दीर्घ संवादात महाभारतातील क्रमशुद्धतेने येणारे परिच्छेद-रचनाकौशल्य दिसते. त्यांच्या प्रासादिक वाणीला वेग, ओघ, गती व लयबद्धता असते. स्वगत उद्‌गार, शब्द तोडून केलेली संवादाची मांडणी व कृतीची दिलेली जोड यामुळे त्यांच्या संवादांचे सौंदर्य वाढते. संवादारंभी ते भावसूचक वर्णन व आविर्भाव रेखाटन करतात. संवादाच्या अखेरी असेच परिणामसूचक चित्रण येते. त्यामुळे त्यांच्या संवादांना एकप्रकारची पूर्णता येते. ते जिवंत, सूचक व चित्रमय होतात. मुक्तेश्वरी संवाद वाचताना त्या त्या व्यक्ती मनश्चक्षूसमोर दिसू लागतात आणि त्यांचे शब्द कानात घुमू लागतात.

## ४. समारोप

कथाबंध व व्यक्तिचित्रण यांच्या अंगाने महाभारतातील मूळ संवादसामग्री मुक्तेश्वर संस्कारित करून वापरतात. त्यांच्या संवादयोजनेचे तंत्र येथे पूर्णावस्थेला पोहोचले आहे. आख्याने व रामायणातून वाढतघडत आलेली मुक्तेश्वरांची संवादशैली अधिक स्वाभाविक व विकसित रूपात त्यांच्या भारतात दिसते.

□ □ □

# पाच ॥ वर्णनविशेष

## १. वर्णन : स्वरूपविवेचन

वर्णन हा महाकाव्याचा अविभाज्य भाग असल्याचे संस्कृत काव्यशास्त्राने मानले आहे. संध्या, सूर्य, चंद्र, रात्र, प्रदोष, अंधकार, दिवस, प्रातःकाल, मध्यान्ह, मृगया, पर्वत, ऋतु, वन, समुद्र, संभोग, वियोग, मुनी, स्वर्ग, नगर, यज्ञ, संग्राम, यात्रा, विवाह, मंत्र, पुत्र, अभ्युदय असा वर्णनीय घटकांचा विपुल तपशील विश्वनाथाने दिला आहे. या घटनाप्रकारांचे व वर्णनस्थळांचे कलात्मक प्रयोजन सजावट नसून रसनिर्मिती हेच असल्याचे भोज सांगतो. त्यासाठी आवश्यक तेवढेच घटक कवीने स्वीकारावेत. शास्त्रविवेच्य सर्व घटक आणण्याचा अट्टाहास करू नये, असा त्याचा इशारा आहे. महाकाव्य वर्णनप्रधान असावे, असे पाश्चात्य समीक्षकही मानतात. महाकाव्यात प्रवास, युद्ध यासारख्या बहिर्मुख कृतींच्या चित्रणामुळे वर्णनाला महत्त्व येते. महाकाव्याचा रंगफलक विस्तीर्ण असतो आणि त्यातील व्यक्ती, घटना भव्याकृती असतात. त्यामुळे परिसर व दृश्ये यांचे वैविध्य त्यात आपोआप अवतरते. महाकाव्यासारख्या निवेदनप्रधान वाङ्मयप्रकारात वर्णनांना अवसर असतो आणि ती आवश्यकही असतात.

चित्रशैली, अलंकरण व कल्पनाविलास यामुळे वर्णने प्रतीतिक्षम होतात. वर्ण्य-विषयाच्या अंगोपांगांचे ज्ञान, तल्लख संवेदनशीलता आणि नितळ शब्दकळा त्यासाठी कवीजवळ हवी असते. उत्पाद्य कथानक स्वीकारणाऱ्या कवीला आपल्या स्वतंत्र प्रतिभेची चमक वर्णनाच्या अंगाने दाखविणे शक्य असते. कविप्रतिभेचे अव्वल दर्शन घडविणारे माध्यम म्हणून काव्यांतर्गत वर्णनाकडे मध्ययुगीन कवी व रसिक पाहत आले आहेत. मुक्तेश्वरही त्यास अपवाद नाहीत. भव्य, नेत्रदीपक अंतःश्चक्षूपुढे प्रतिमा उभी करणारी विविध दृश्यांची व मनोविकारांची मनोज्ञ वर्णने हा मुक्तेश्वरी कवितेचा एक ठळक विशेष आहे.

## २. काही वर्णनस्थळांचे निरीक्षण

**भोजनवर्णने :** मुक्तेश्वर गृहस्थाश्रमी असून विविध पदार्थांचा चविष्टपणे आस्वाद घेणारे होते, असे त्यांच्या भोजनवर्णनावरून[१] म्हणता येईल.

---

१. कौरव-पांडव भोजन १।२९।५७–६४, ८०–९२. पांडवभोजन १।४२।५९–६३. राजसूयाची पंगत २।९।९७–१३९. दुर्वासभोजन ३।११।११५–१४४. अभिमन्यु विवाहभोजन ४।८।५६–९६.

ही सारी भोजनवर्णने स्वतंत्र, विस्तृत व पदार्थांच्या नामावळीने भरघोस झालेली आहेत. अन्य मराठी कवींच्या वर्णनापेक्षा येथे सर्वाधिक वैचित्र्य असून त्यातून मुख्यतः मुक्तेश्वरकालीन महाराष्ट्रीय भोजनपंक्तीचे दर्शन घडते. येथील व्युत्पत्तिजन्य वर्णनविस्तार कालविपर्यासात्मक असला तरी वर्ण्य विषयाला समृद्ध करणारा आहे. नाथांप्रमाणे भोजनवर्णनात आध्यात्मिक उपमाने वापरूनही मुक्तेश्वरांनी अनौचित्य टाळले व पावित्र्यसूचक वातावरण निर्मिले आहे. कल्पनाजन्य अलंकारविलासाने भोज्य पदार्थांचे रंग, रूप, व स्वाद त्यांनी गोचर केले आहेत देवताविडंबन व भोक्त्यांच्या प्रतिक्रियांद्वारे अप्रत्यक्षपणे पक्वान्नाची रूचकरता चितारून विनोदाचा शिडकावाही त्यांनी केला आहे. वर्णनौघात कधी भक्तिमहिमा तर कधी अन्नमहिमा वर्णून ते संपूर्ण वर्णनाला तात्त्विक परिमाण देतात.

या वर्णनांवर आक्षेप घेताना नांदापूरकर म्हणतात, " ... भोजनप्रसंगी त्यांनी कधी असा विचार केला नाही की आपला साधाभोळा मराठमोळ्याचा भाजीभाकरी, ताकभात खाणारा भुकेला अतिथी या पक्वान्नाच्या हारींना पाहूनच अगदी भांबावून जाईल."[२] वाचकाची कल्पनाशक्ती आणि त्याच्या भोवतीचे वास्तव यांच्या मर्यादेत कवीने आपला कल्पनाविलास प्रकट करावा असाच या म्हणण्याचा अर्थ आहे. वाङ्मयाची निर्मिती जरी विशिष्ट कालसंबद्ध असली तरी ते अंतिमतः स्थलकालातीत असते, हे सनातन सूत्र लक्षात घेता नांदापूरकरांचे म्हणणे मान्य करता येण्यासारखे नाही. मुक्तेश्वरकालीन देशकालपरिस्थितीच्या संदर्भातच विचार करावयाचा तर तो आणखी एका दृष्टीने करता येईल. सर्वसाधारण महाराष्ट्रीयाचा आहार साधा असला तरी सटीसामाशीं होणारी मुक्तेश्वरोक्त पक्वान्ने त्याला अगदीच अपरिचित होती – विशेषतः लग्नसमारंभ, संतर्पणे, अन्नसत्र, देवाचा सप्ताह व ब्राह्मणभोजने यांच्यामुळे—अज्ञातला भाग नाही. देव व देवभक्तांच्या संदर्भात सर्वच गोष्टी अतिप्रमाण करावयाच्या हा संकेतही या श्रोतृमानसाला ज्ञात असला पाहिजे. या दृष्टीनेही उपरोक्त आक्षेप गतार्थ ठरतो. त्याही पुढे जाऊन असे म्हणता येईल की दुष्काळग्रस्त महाराष्ट्रीय श्रोत्याला अशी वर्णने अधिक आकर्षक वाटली असतील. त्यामुळे स्वप्नरंजनात्मक घटक म्हणून या वर्णनांना विशेष महत्त्व आहे. कदाचित याच कारणामुळे मध्ययुगीन मराठी कवींनी आपल्या कथाकाव्यात त्यांचा आवर्जून समावेश केला असावा.

**वस्त्रवर्णन :** वस्त्रहरण प्रसंगी द्रौपदीच्या वस्त्रांचे चुटपुटते निर्देश महाभारतात (संशोधित २६१४, वैद्य ११।६८।४६–४८) येतात. एवढ्या अल्प आधारावर मुक्तेश्वरांच्या भक्तहृदयाने परमेश्वराचा अंबरावतार वर्णिण्याच्या मिषाने वस्त्रांचे रंगविश्व विस्ताराने ( २।१५।१९६–२४३ ) चित्रिले आहे. प्रसिद्ध वस्त्रांच्या पेठा, वस्त्रांचा पोत, वीण, सूत, काठ, रंगच्छटा, त्यावरील सजावट, चित्रकुसरी त्यांनी वास्तव व प्रतीतिदर्शक पद्धतीने वर्णिली, आहे. वस्त्रांचे तेज व गंध वर्णून अद्‌भुताचा शिडकावा केला आहे व त्यांचे

२. ना. गो. नांदापूरकर, " मुक्तमयूरांची भारतें, " पूर्वोक्त, पृ. ४०२.

दैवी स्वरूप ठसविले आहे. तपशीलाचा बारकावा, सूक्ष्म निरीक्षण यामुळे वस्त्रवर्णनात वैविध्य व वैचित्र्य आले आहे. वस्त्रांची नामावळी, त्यांचे प्रकार, त्यांचे बहुरंगी रूप व त्याजवरील रेखाटन यामुळे वर्णनास भरगच्चपणा आला आहे. रंगवर्णनासाठी नाना पुष्पयाती, रत्ने व निसर्ग यांचा उपमान म्हणून वापर करण्यात मुक्तेश्वरांची सौंदर्यदृष्टी प्रकट झाली आहे. त्यांचे निरक्षण, बहुश्रुतता व निसर्गरसिकता यांचा एकात्म प्रत्यय त्यातून प्रकटला आहे. विविध रंग, एकेका रंगांच्या सूक्ष्मच्छटा व रंगसंगती यांचे भान ठेवल्याने त्यास चित्रमयता आली आहे. त्यातून मुक्तेश्वरांचे रंगासक्त मन आविष्कृत झाले आहे. वस्त्रांवरील चित्रे मुख्यतः धर्मसंबद्ध, पावित्र्यसूचक आहेत. त्यांच्या वर्णनात मुक्तेश्वरांच्या चित्रशैलीचे वैभव प्रकटले आहे. स्पर्श, गंध, तेज या संवेदनावर्णनातून त्यांची संवेदनशीलता व वर्णनातील ऐंद्रियता प्रकटते. विविध व्यक्तींच्या भावप्रतिक्रिया टिपण्याचे सिनेतंत्र वापरून एकाच प्रसंगाचे अनेकांगी दर्शन ते घडवितात. त्यास रेखीव शब्दचित्रांची जोड मिळाली आहे आणि या साऱ्यामागे ईश्वरीकृपेची अद्‌भुतरम्यता उभी आहे. भाव, भाषा, भक्ती, चित्रणकौशल्य, व्युत्पत्ती, नामावळी, कालविपर्यास, जिवंतपणा, स्वतंत्रता व दीर्घता अशा अनेक दृष्टींनी निरीक्षणीय असे मुक्तेश्वरी प्रतिभेचे विलसित येथे प्रकटले आहे. लोकश्रुती अशी की या वर्णनावरून महाराष्ट्रातील कुशल विणकरांनी आपल्या वस्त्रांवरील सजावट सिद्ध केली. हे सत्य असो वा नसो, पण मुक्तेश्वरी वस्त्रवर्णन मराठी काव्यपरंपरेतच नव्हे तर लोकजीवनातही कसे प्रतिष्ठित झाले, याची खूण त्यात आहे.

**वास्तु व स्थल वर्णने :** क्रीडागार (२।२९।४७-५४), रंगगृह (१।३१।५-२०), जतुगृह ( १।३५।५१-५८ ), इंद्रप्रस्थरचना ( १।४६।१-१९ ) अशी वास्तुवर्णने त्रयस्थ निवेदनाबरोबरच ती बांधणाऱ्या व्यक्तींच्या आज्ञेतून आकारलेली आहेत. मयसभेचे लोकविलक्षण रूप आणि कथांतर्गत महत्त्व लक्षात घेऊन तिच्या निर्मितीचे आणि रूपाचे परिणामकारक वर्णन २।२।९-७२, ७८-८०, ८२-११५, १०।१-४, १२।४३-५६, १३।३७ ) मुक्तेश्वरांनी केले आहे. व्युत्पत्तीचा प्रयोजक वापर, क्रमबद्धता, वास्तूचा विस्तार, भव्यता, तेज-नाद-रंग-रूप यांचा प्रत्यय देणारी ऐंद्रियसंवेद्यता, अद्‌भुतरम्यतेची झूब, कल्पनाविलास, चित्रशैली, सालंकृतता अशा अनेकानेक विशेषांनी मयसभेचे हे वर्णन हृदयवेधी झाले आहे. मयसभेतील ऐश्वर्यसिंधु, आनंदोल्हास व काहीही पाहण्याची इच्छा उरू नये अशी अथांग तृप्ती या भावच्छटाही त्यांनी पकडल्या आहेत. प्रेक्षकांच्या व विपक्षीयांच्या प्रतिक्रिया वर्णून त्यांनी तिच्या सौंदर्याचे व हृदयदाहक वैभवाचे अप्रत्यक्ष चित्रण केले. कथानकाच्या बंधात मयसभेच्या वैभवाला व आभासमयतेला असलेले प्राधान्य लक्षात घेऊन त्या विशेषांना अधिक उठाव दिला आहे. वस्तू कशी आहे यापेक्षा कशी असली पाहिजे या आदर्शवादी प्रेरणेने रेखाटन झाले असल्याने ते उदात्त अलंकाराने नमुनेदार उदाहरण ठरेल. मयसभावर्णन

हे वास्तवचित्रण नाही. ती कवीच्या कल्पकतेची मुक्त झेप आहे. उदात्त व अपार्थिव वातावरणात नेणारी लोकपालसभावर्णने (२।४।११–१८२) मुळाचा समर्थ प्रत्यय देणारी असूनही भाषांतररूप झालेली नाहीत. या पंचसभांसाठी मोरोपंत १८ आर्या (सभा १।२२–४०) तर मुक्तेश्वर १७२ ओव्या देतात. महाकाव्याला आवश्यक असा वर्णन-विस्तार करण्याकडे मुक्तेश्वरांचे जितके अवधान आहे तितके मोरोपंतांचे नाही. वैभव, सुखदायकता व ईर्ष्या या पार्थिव भावनांनी द्यूतसभा (२।१३।३७–४२) रंगली आहे तर आध्यात्मिक उपमानांच्या योजनेने श्रीकृष्णसदनाला (२।१५।१६४–१७९) अलौकिकाची झळाळी चढली आहे.

वारणावत (१।३५।२९–३३), बिंदुसरोवर (२।१-४६–४९, २।१–१२), मागधपूर (२।६।८७–९४), हरिवर्ष-गंधर्वपूर (२।८।३७–४८) अशी मोजकी स्थलवर्णने येतात. केवळ निर्देश असतानाही मानससरोवराचे स्वतंत्र वर्णन (२।८।२९–३३) मुक्तेश्वरांनी केले आहे. मानससरोवरातील वैभव, जल, गंध, क्रीडा, मुक्तता, यांच प्रत्यय देणारे वर्णन अनुप्रासजन्य माधुर्याने मोहक झाले आहे. मानससरोवराविषयी, पारंपरिक श्रद्धाशील हिंदुमनाला जे आकर्षण वाटते त्याचे प्रतिबिंब या वर्णनात उमटले आहे. स्थलवर्णनात संबद्ध कथासंदर्भ गुंफणे, त्यातून परंपरेचे भान देणे व श्रोतृमनातील संस्कारांना चाळविणे ही कालिदासीय पद्धती मुक्तेश्वरांनी कौशल्याने वापरली आहे. त्यांच्या स्थलवर्णनांवर अद्‌भुताचा रंग पसरलेला दिसतो.

**क्रीडा-उत्सव-महोत्सव वर्णने :** शर्मिष्ठा-देवयानी (१।१८।२–६), कौरव-पांडव (१।२९।७१–७८) यांच्या क्रीडेची वर्णने गती-कृतीतील स्वाभाविकता जपणारी व उल्हासाचा भाव टिपणारी आहेत. यादवांचा रैवतकनिवास (१।४७।९७–१००), कृष्णार्जुनांचा वनविहार (१।४८।५९–७३) व कौरवांची घोषयात्रा (३।११।६६–७२) ही वनक्रीडांची वर्णने स्वच्छंद विहाराची विविधरंगी चित्रे रेखाटणारी आहेत. ऋत्विज, चैत्य, यज्ञमंडप, मंत्रोच्चार, अग्निज्वलन यांचे शास्त्रीय परिभाषेत तपशीलवार व ठसठशीत वर्णन करणारी यज्ञविधीची वर्णने (१।१०।६६–८८, २।९।६६–७०) मुक्तेश्वरांच्या व्यासंगाची साक्ष देतात. द्रौपदीस्वयंवर, अभिमन्युविवाह, धर्मराजाचा राज्याभिषेक अशा सोहळ्याची भरगच्च वर्णने प्रसन्नतेच्या प्रभेने आकर्षक झाली आहेत. वैभव, विलास व मंगलकारक घटना यांना साकार करण्यासाठी क्रीडा-उत्सवांची वर्णने येतात. त्या वर्णनांवर आनंदोल्हासाची छटा पसरलेली असते आणि त्याभोवती सांस्कृतिक वलय तरळत असते. या वर्णनांनी वातावरणनिर्मिती यशस्वीपणे साधली आहे.

**आगमन–प्रयाण वर्णने.** मध्यवर्ती व्यक्तिरेखांचे महत्त्वपूर्ण कृतींसाठी होणारे प्रयाण व आगमन हाही महाकाव्याचा एक वर्णनविशेष आहे. महाभारतापेक्षा अधिक

विस्ताराने मुक्तेश्वर अशा स्थळी[3] रेंगाळताना दिसतात. यात मृगयेकरिता थाटामाटाने बाहेर पडणारे राजपुरुष, विवाह वा यज्ञ समारंभासाठी सजून निघालेला नृपपरिवार, साहसी वीरांचे भ्रमण वा सैन्याचे प्रयाण यांची वर्णने येतात संख्येतील अत्युक्ती, गज-अश्वांच्या सजावटीचा बारीक, तपशील, वीरगर्जना, वाद्यध्वनी प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया यातून ही दृक्-श्राव्य संवेदनागर्भ भव्य वर्णने उभी राहतात. गमनागमन वर्णनप्रसंगी व्यक्तींच्या भेटीगाठीचे शिष्टाचार मुक्तेश्वर आवर्जून वर्णितात. त्यातून त्या त्या व्यक्तींची सभ्यता व संस्कृती आविष्कृत होते. मुक्तेश्वरांनी वर्णिलेले शिष्टाचार भारती शिष्टाचाराहून भिन्न आहेत महाभारतात कुंती--धर्म--भीम ज्येष्ठ असल्याने कृष्ण त्यांना नमस्कार करतो, समवयस्क अर्जुनास मिठी मारतो व नकुल, सहदेव, द्रौपदी या कनिष्ठांना आशीर्वाद देतो. मुक्तेश्वरी कृष्ण देवावतार असल्याने सारेच त्याला नमस्कार करतात. कृष्णाच्या देवावतारामुळेच अशा वर्णनस्थळी त्यास प्राधान्य मिळते.[४] अशा वर्णनात तपशीलापेक्षा त्यामागील भावदर्शनाला अधिक महत्त्व मिळाले आहे. गमनागमन वर्णनावरूस बारीक-गोष्टींचा वर्णनविस्तार करण्याची महाकवीची लकब मुक्तेश्वरी रचनेत भासमान होते. कधी यथार्थ मूलानुसरण, कधी प्रतिभाजन्य विस्तार तर कधी नवनिर्मिती करून मुक्तेश्वरांनी अशी स्थाने बहारीने रंगविली आहेत.

**आदर्श राज्य व समृद्धी वर्णने** दुष्यंत-ययातीसारख्या नृपश्रेष्ठांच्या आदर्श राज्याची वर्णने[५] मुक्तेश्वर आवर्जून करतात. आदर्श राजे, त्यांचे धर्मन्यायनीती पालन आणि संपन्न व धर्मनिरत प्रजा याचे चित्रण त्यातून होते या वर्णनांना एक सांस्कृतिक वलय आहे. पारतंत्र्याच्या अंधारात स्वातंत्र्याच्या उषःकालाची स्वप्ने पाहणारे हे कविमन भूतकाळाला आपल्या भविष्यकालीन स्वप्नांप्रमाणे वाकवू पाहते.

कथाविकसन व संघर्षबीज अशा दोन्ही दृष्टींनी कधी त्रयस्थ निवेदनाने, कधी प्रसंगचित्रणाने तर कधी प्रतिनायकमुखाने महाभारतकारांनी पांडववैभवाची वर्णने केली आहेत. त्यांची प्रयोजकता ओळखून मुक्तेश्वरांनीं ती फुलविली आहेत. त्यातील राजसूय-करभार-वर्णन[६] ( २।१२।१४२-११८ ) लक्षणीय आहे. भेटी देणारे विचित्र

---

३. आदि. १५।३०-४९, २६।१-२, २९।६५-७०, ३२।४-६, ४४।५१-५७, ४८।१-३३. सभा. २।११६-११९, ९।२१-२८, १७।४-२७. वन ४।८३-८६, १०।६७-७४, १२।४८-५९. विराट ५।४२-४६, ६०-७२, ८।२-५.

४. जसे, १।४८।१-३३, २।१।६३-६७, ५।१०२-१११, ६।७६-८३, ९।१२-१६, ११।८६-८७, ४।८।२३-३६ इत्यादी.

५. आदि १०।१२-१८, ११।९५-१००, १५।४-२९, १९।११५-१२६, २२।१४२-५०, १७३-१७६, २५।३९-७२, २७।१०२-१०४, ४६।२०-२५, ४८।४९-५४.

६. मोरोपंतांनी मात्र हे वर्णन फक्त तीन आर्यांतच आटोपले आहे.

लोक, त्यांचे देश, त्यांचे राजे, उपायने स्वीकारावयास लागणारा काळ, भेटीची विपुलता, अतुलनीयता, असंख्यता, अद्‌भुतता यांनी समृद्धीचे सुरेख चित्र रेखले जाते. भेटवस्तूंची विविधता, त्यातील वैचित्र्य, त्यांचे रूपरंग, स्वादगंध व आकार यांचे संवेदनागर्भ, व्युत्पत्तिदर्शक वर्णन येते. या सर्व वर्णनाला दृश्यमूल्य आहे. रंगीत, चकचकीत, भरगच्च असे हे वर्णन बारकाव्याच्या तपशीलाने येते. त्यावर अतिशयोक्तीचा रंग आहे आणि अद्‌भुताचा शिडकावा आहे. शब्दयोजनेतील साभिप्रायता, अलंकारयोजनेतील समर्पकता व संवादशैलीतील सहजता यामुळे ते नीटस झाले आहे. मानस-परिणामदर्शनाने त्यास भावस्पर्श होतो. वस्तुदर्शनासकट भावनांना कवेत घेणारे, भव्यतेचा प्रत्यय देणारे हे इंद्रियसंवेद्य वर्णन मनोमन चित्र उभे करणारे आहे. त्यात मूलानुसारी संक्षेपकुशलता आहे तशी प्रतिभावंताची नवाईही आहे.

**व्यक्तिवर्णने.** समकालीन काव्यशैलीशी संवादी वाटणारे कृष्णाचे मूर्तिवर्णन (२।१०।१३–७३) सांकेतिक वाटले तरी संकेतांना उजळून टाकणाऱ्या प्रतिभाविलासाने नटलेले आहे. त्यातून लौकिक व अलौकिक अशा दोन्ही रूपांचे वर्णन येऊन पूर्णपुरुषाचे पूर्णचित्र रेखाटले जाते. मुक्तेश्वरांची रूपवर्णने कधी केवळ आभूषणवर्णने (जसे, ३।११।९७–९८) ठरतात. कधी ती व्यक्तित्वदर्शक असण्यापेक्षा श्रेष्ठत्वसूचक व आदर्शात्मक उतरली आहेत. त्यामुळे त्यात पृथक्त्व येण्याऐवजी एकसूरीपणा येतो. दुष्यंत व नल यांची वर्णने या दृष्टीने पाहण्यासारखी आहेत. त्यांची स्त्रीवर्णने मात्र रसरशीत, शरीरनिष्ठ, कामशास्त्रीय तपशील पुरविणारी व संकेतांचा वापर करूनही सुंदर होऊ पाहणारी आहेत. अशा वेळी त्या कामिनींचे लावण्यच जणू त्यांच्या वाणीत अवतरते. सलग, आपादमस्तक व्यक्तिवर्णने[७] मुक्तेश्वरांनी केली असली तरी उत्तरोत्तर ती कमी होत गेली आहेत. रूपवर्णन एकत्र व सलगपणे न करता प्रसंगसंदर्भात वेगवेगळ्या पद्धतीने गुंफण्याची अधिक कलात्मक पद्धती त्यांनी वापरली आहे. भविष्य, जन्म, विवाह, इतरांवर होणारा परिणाम अशा संदर्भात पंडूच्या रूपवर्णनाचे वेचक निर्देश (आदि २४।९४–९५, १००, २६।५–७, १२,१५) येतात आणि त्यांतून तो सजीव व साकार होऊन डोळ्यासमोर उभा राहतो. भावसूचक आविर्भावातून आपल्या पात्रांचे रूपदर्शन घडविणे मुक्तेश्वर अधिक पसंत करतात.

---

७. मत्स्यगंधा १।१३।१०१. शकुंतला १।१५।९७–९९, १।१६।१४–२०. गंगा १।२२।४०–४२. माद्री १।२८।१६–१७. द्रौपदी १।३९।५०–५२, १।४१।२८–३२, २।१४।१५८–१६४, २।१५।४७. दमयंती ३।६।१२–१५. मोहिनी १।४।१२८–१३९. विष्णू १।४।५६–६०. कृष्ण २।१०।१३–७३, ३।११।९७–९८. दुष्यंत १।१५।२७–२९. भरत १।१६।५७–५९. व्यास १।२४।५४–५५, ७४-७५, ८८. कर्ण १।२५।१४४–१४५, १६९–१७२. भीम १।३७।१–३. हिडंब १।३७।२०–२५. घटोत्कच १।३७।७८–८१. अभिमन्यु १।४८।३४–३६, ४४-४६. अग्नी १।४८।७४–७५. नल ३।६।१–८.

**बाहुयुध्द व युध्दवर्णने**. शक्तीने भारलेल्या काळात मुक्तेश्वरी भारत अवतरले. साहजिकच बलदंड भीमाला, त्यात ठळक स्थान लाभले. त्याची बाहुयुद्धे[८] मुक्तेश्वरांनी समरसून रंगविली आहेत. पूर्वतयारी व प्रत्यक्ष द्वंद्वातील विविध कृती, उक्ती, गती, ईर्ष्या, वीरवृत्ती, तीव्रता यांच्या चित्रणाने, भीम–जरासंधाची बाहुयुद्धे ( २।७।१७-६४ ) प्रत्ययोत्पादक बनले, आहे. पुराणसंदर्भांनी योद्ध्यांची तुल्यबलता व अलौकिकत्व प्रकटते. आध्यात्मिक उपमानांनी जरासंधाविषयींची अप्रीती व अनिष्टता सूचित होते. " सर्पाऐसे फुस्कारती । सिंहाऐसे हुंकारती । वृषभाऐसे फुंफाटती । उफाती इसाळें " ( ३८ ) यासारख्या प्राणिसृष्टीतील उपमानांनी युद्धातील कृती–गतीचे चित्रण करतानाच त्यातील पाशवी बळाचे, जिद्दीचे, ईर्ष्येचे आणि उन्मादाचेही चित्रण त्यांनी केले आहे. अनुभाववर्णनाने रसोत्कर्ष होतो. विशेषणे, क्रियाविशेषणे आणि नादानुसारी शब्दयोजनेने बाहुयुद्धातील क्रिया–प्रतिक्रियांचे व कृती–गतीचे नेटके दर्शन घडते. द्वंद्वांचे अनेकांगी वास्तव–कल्पनारम्य परिणाम व प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया वर्णून बाहुयुद्धातील भावचित्रण अधिक तीव्र करण्यात आले आहे. वास्तव–अद्‌भुताच्या सीमेवरील या प्राणघातक युद्धाला त्याच्या पाशवी रगदारपणामुळे एक पार्थिव पातळी लाभली आहे. तिला अखेरी कृष्ण–भीम–संवादाने ( ६८–७१ ) एक अपार्थिव पातळी मिळते. त्यामुळे दोन राजपुरुषांच्या बाहुयुद्धाला देवभक्त–देवद्रोह्यांच्या लढतीचे रूप आले आहे. रौद्र–अद्‌भुततासंगती आलेल्या वीररसावर भक्तीचे पाणी चढते आणि प्रक्षुब्ध भावनांवर सौम्यतेच्या लाटा पसरतात. वास्तव–काल्पनिक, स्वाभाविक–अद्‌भुत, अतिशयोक्त व पार्थिव–अपार्थिव अशा भिन्न पातळीवरून हे बाहुयुद्ध मुक्तेश्वरांनी यशस्वीपणे चितारले आहे. भीमाची इतर बाहुयुद्धेही स्थूलमानाने याच विशेषांनी नटली आहेत. प्रसंगसंदर्भानुसार त्यातील वीररस रौद्र–बीभत्साने रंगून निवतो तर कधी रांगड्या विनोदाचा रंग त्यावर पसरतो, एवढेच.

भीम–जरासंधाचे " हे वर्णन मल्लयुद्धविशारदांनीही मान तुकविण्याइतके हुबेहुब आहे "[९] असा पांगारकरांचा अभिप्राय आहे तर " मुक्तेशांच्या वर्णनात आवेश आहे इतकेच नव्हे तर प्रसंग मूर्तिमंत पुढे उभा करण्यास अवश्य त्या सर्व गोष्टी आहेत; पण या ठिकाणी जी मल्लविद्येच्या ज्ञानाची आवश्यकता पाहिजे तीच नाही "[१०] अशी नांदापूरकरांची तक्रार आहे.

या दोन्ही मान्यवर अभ्यासकांनी पां. ना. कुलकर्णींनी दाखविलेल्या मल्लविद्या वा कुस्ती आणि बाहु युद्ध यांतील फरक लक्षात घेतलेला नाही. प्रतिस्पर्ध्याला मारण्यापेक्षा

---

८. भीमाची बाहुयुद्धे–हिडिंब १।३७।२०–५७, बक १।३८।६९-८८, शाल्व १।४१।१३५–१४०, जरासंध २।७।१७–६४, किर्मीर ३।२।३९–६८, जटासुर ३।१०।१२–२८, जीमूती ४।२।५३–८०, कीचक ४।३।१३८–१५८.

९. ल. रा. पांगारकर, " मुक्तेश्वर चरित्र आणि काव्यविवेचन, " पूर्वोक्त, पृ. ७८

१०. ना. गो. नांदापूरकर, " मुक्तमयूरांची भारतें, " पूर्वोक्त, पृ. ६९.

त्याची पाठ जमीनीला टेकविणे हे कुस्तीचे उद्दिष्ट असते. म्हणून त्यात डावांची मातब्बरी अधिक. याउलट बाहुयुद्ध क्रीडा नसून निःशस्त्र प्राणयुद्ध आहे. बाहूंचा शस्त्रासारखा वापर करून प्रतिस्पर्ध्याला ठार मारणे हाच त्याचा उद्देश असतो. तेथे पेचांना जितके महत्त्व आहे तितकेच सामर्थ्यालाही आहे. मुळात[११] चित्रहस्त, अशनि, पूर्णकुंभ, पृष्ठभंग, आदि बंधांचा निर्देश आला आहे. बाहुयुद्ध जसे मागे पडले तसे हे बंध अपरिचित झाले. त्यामुळे बंधनामाचा व्युत्पत्तिजन्य व समकालीन श्रोत्यांच्या दृष्टीने गतार्थ ठरलेला पसारा मुक्तेश्वरांनी गाळला असावा. या श्रोतृमानसाला परिचित असे कुस्तीतील डावपेच वापरावेत तर बाहुयुद्धाच्या संदर्भात त्यांना प्रयोजकता नव्हती. त्यामुळे जुने ज्ञान स्वीकारता येत नाही व नवे वापरता येत नाही अशी मुक्तेश्वरांची स्थिती झाली असली पाहिजे. त्याचा परिणाम म्हणून मुळात बंधनामांच्या जोडीने आलेल्या दंडमांड्या थोपटणे, करप्रहार, पादप्रहार, ओढणे, आळवणे या शारीरक्रियांवर भर देऊन त्यांनी आपले वर्णन यथार्थपणे रंगविले. "मुक्तेश्वरांच्या चित्रणात केवळ शारीरचेष्टांचे वर्णन असून आंतरिक भावनाद्योतन नाही"[१२] असेही नांदापूरकरांनी म्हटले आहे. मूळ जीवनानुभवात, त्याच्या भारती कलारूपात बाह्य संघर्षच प्रधान असल्याने मुक्तेश्वरी रचनेतही त्यास प्राधान्य मिळावे, हे उचित आहे. त्यातील कृती-गतींना प्राधान्य देऊन संघर्षजन्य ईर्ष्या, वीरश्री, रौद्रता व अद्‌भुतता या भावनांचा मुळाहूनही अधिक उठाव मुक्तेश्वरांनी साधला आहे. तेव्हा आंतरिक भावनाद्योतनाचा हा प्रसंगच नसल्याने हा आक्षेपही अप्रस्तुत ठरतो. शारीर कृती व मानस प्रतिक्रिया यांपैकी मुक्तेश्वर कशाला व किती प्राधान्य देतात ते अन्य उदाहरणांवरून ठरविले पाहिजे. प्रस्तुत वर्णनस्थल त्याचा निवाडा करण्याचे स्थल नव्हे! अनुभव संक्रमण हेच वर्णनांचे कार्य असते. ते करणाऱ्या वर्णनात काव्यशास्त्रनिष्ठ सर्वच घटकांच्या उपस्थिती-अनुपस्थितीची अपेक्षा गैरलागू ठरते. मुक्तेश्वरी वर्णनाची भाववाहकता नांदापूरकरांना मान्य आहे. तेव्हा त्यांचे अन्य आक्षेप आपोआपच गतार्थ ठरतात.

युद्धवर्णन[१३] करताना मुक्तेश्वरांच्या वाणीला असाच बहर येतो अश्वत्थाम्याने केलेला भीषण रणसंहार व अर्जुनाशी केलेले अस्त्रयुद्ध यांची वर्णने रेखीव व प्रत्ययोत्पादक आहेत.

---

११. हा भाग भांडारकर–प्रत स्वीकारीत नाही तो के$_1$, व्ही$_1$, बी, डी, जी$_3$ या प्रतीत आहे. (सभा, परि. १. क्र. ७) मुक्तेश्वरांसमोर डी गटातील प्रत असल्याने हा भाग त्यांच्यासमोर असला पाहिजे.

१२. ना. गो. नांदापूरकर, "मुक्तमयूरांची भारतें," पूर्वोक्त, ४८२.

१३. आदि. ३।६–१२, ३४–७२, २३।१५–१४७, अ. ३१,३२।३८–७८ ४१।८१–१४८, ४४।५१–११२. सभा. अ. ८. वन. ३।३–५४, ५८–९५, १०।८६–९४, ९९–१०७. विराट ५।७५–१२८, ६।१–१६,३९–४४, ९७–१४८. सौतिक अ. २ व ४.

पण ती बहुंशी मूलानुसार आहेत. मुळाची रंगत टिकविण्यात मुक्तेश्वर यशस्वी झाले आहेत, एवढेच येथे म्हणता येईल. अन्यत्र मात्र मुक्तेश्वर युद्धवर्णने स्वतंत्रपणे रंगवितात. सामर्थ्याचे दिमाखदार प्रदर्शन करीत त्यांच्या सेना रणभूमीवर येतात. वाद्यांच्या तुमुल घोषाने वातावरण भरून जाते. औद्धत्य, आत्मविश्वास, गुर्मी, तुच्छता, आव्हान यांनी भरलेले खणखणते संवाद युद्धाची खुमारी वाढवितात. नादगर्भ शब्दांनी युद्धातील कृती–गतींचा आलेख चितारला जातो. शस्त्रयुद्ध गतिशीलतेकडे तर अस्त्रयुद्ध अद्‌भुतरम्यतेकडे झुकते. दृक्‌श्राव्य संवेदनांनी त्यांची युद्धवर्णने चित्रमय होतात. त्यातील वीरोत्साह व भीषण क्रौर्याचे थरारक चित्रण भारून टाकणारे असते. "मुक्तेश्वर आपल्या वेळच्या युद्धकलेचे, शस्त्रांचे व क्वचित भारतवर्षातल्या अनेक प्रांतातल्या युद्धपद्धतींचेही इतके हुबेहूब वर्णन देतो की या बाबतीत तो सर्व मराठी कवींत खरोखरच अद्वितीय आहे."[१४] "मुक्तेश्वरांच्या भाषेतील तडफ व आवेश ठिकठिकाणच्या युद्धप्रसंगात वाचकांचे बाहू स्फुरवितात व मनोवृत्तीचे आस्फालन घडवितात. प्रत्येक शब्दाबरोबर जणू काय हत्तींच्या थडका व घोड्यांच्या टापा, वीरांचे सिंहनाद व चापांचे टणत्कार, रथांचा गडगडाट व अस्त्रांचा कडकडाट, मल्लांचा दंडस्फोट व गदांचा दणगा ही आपल्या श्रुतिरंध्रावर आदळत आहेत असाच भास होतो."[१५] अशी पूर्वाभ्यासकांनी मुक्तेश्वरी युद्धवर्णनांची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. ती यथार्थच वाटते.

**निसर्गवर्णने :** मुक्तेश्वरांची पात्रे निसर्गाच्या सहवासात सुखावताना दिसतात. दुग्धधवल प्रवाहाची "गंगा देखोनि विश्रामला। नाश झाला भवतापा" ( १।२२।३४ ) असा प्रतीप राजा गंगादर्शनाने विसावतो आणि आनंदाचा हरिजागर त्याच्या हृदयात घुमत राहतो. "स्थळे अवलोकीत नयना" ( १।३७।८८ ) किंवा "पर्वत वनें पवित्र रम्य विलोकित निघावे" ( ३।१०।२९ ) असे धर्माला वाटते आणि "अवलोकीत विचित्र वने" पांडवांचा प्रवास सुरू होतो. "नाना वनें नाना द्रुम। नाना सरितांचे संगम। नाना श्वापदें विहंगम। नाना वर्ण भासती" ( ३।१०।३२ ), "देखे दिव्यवृक्षांची दांगें। रंगली अरुण संध्यारागें। राजहंस कस्तुरीमृगें। चंपकारण्यीं क्रीडती" ( ३।९।१५९ ), "अनेक पर्वत अनेक वर्ण। गुहागुल्मलताकीर्ण" ( ३।९।१२३ ), "गगनचुंबित तरूवर माजी तुंबळ सरितापूर" किंवा "पीयूषातुल्य शीतळोदके अक्षोभ तडागे अनेक" असे निसर्गाचे रूपलावण्य त्यांच्या दृष्टीसमोर खुले होते. तेव्हा "तें कौतुक पाहतां चक्षीं। परम अल्हाद समस्तां" ( ३।४।५ ) किंवा "ब्रह्मानंद ओसंडे" ( ३।९।१६० ) असा त्यांना आनंद होतो.

निसर्गसौंदर्यदर्शनाची ही लालसा व त्यामुळे होणारा हा आल्हाद मुक्तेश्वरांच्या रसिकमनाचाच आविष्कार मानावयास हवा. स्फुटकाव्यात वा रामायणात संकोचून

१४. ल. रा. पांगारकर, "मुक्तेश्वर चरित्र आणि काव्यविवेचन," पूर्वोक्त पृ. ७४
१५. बा. अ. भिडे, "मुक्तेश्वर", मुंबई, द्वितीयावृत्ती, १९२६, पृ. ४८-४९.

बसलेली त्यांची निसर्गाभिरूची महाभारतात फुलून आली आहे. विराटपर्व वा सभापर्व बहुशः राजप्रासादात ( इन्‌डोअर ) घडते. त्यामुळे निसर्गचित्रणास फारसा अवकाश नाही. तथापि सौप्तिक-आदि या पर्वांचा बराचसा भाग व वनपर्व बाह्य परिसरात ( आऊटडोअर ) घडत असल्याने त्यांच्या बांधणीत निसर्गवर्णनांना स्वाभाविक अवसर लाभला आहे. त्यामुळे त्यांच्या भारतात निसर्गाची उग्र-कोमल रूपे[१६] प्रकटली आहेत. घनगर्द वृक्षराजीत शीतोदकांनी भरलेली शांत सरोवरे, त्यात फुललेली नानावर्णी कमळवने, त्यावर झुंकारणारे भ्रमर, जलक्रीडा करणारे हस्तियुग्म वा हंसकारंडकांचा मेळा, रंगीबेरंगी पक्षी, चित्रविचित्र पशू, ध्यानमग्न तापस यांनी त्यांची वनसरोवरे गजबजून गेली आहेत. वृष्टी झेलणारे पर्वत, त्यांच्या उतारावरील गुहागुल्मलता, गगनचुंबी तरूराजीतून फेसाळत धावणारे जलप्रवाह येथे आहेत. घनधार वर्षा, गंधित धूलि, तरारणारे अंकुर, सस्यश्यामला धरित्री आणि तृप्त सरिता हे त्यांचे आवडते दृश्य आहे. निसर्गाच्या या प्रसन्न व रमणीय रूपांबरोबरच त्याचे उग्र-भेसूर रूपही ते टिपतात. आटलेले सरोवर, वांझ वृक्ष, वीज पडून दुभंगलेला वृक्ष असे वास्तव ते पाहतात. कधी नक्षत्रांचा सडा, खचलेले पर्वत, मर्यादा सोडून पसरलेले सिंधुजळ, रक्तवर्षाव नि धूमाने झाकाळलेले ध्रुवमंडळ अशी निसर्गाची उत्पाती पण कल्पनीय चित्रे ते रेखतात.

या साऱ्या निसर्ग जातीला दिवसरात्रीच्या छायाप्रकाशाने व ऋतुचक्राच्या फेऱ्याने लाभणारे रंगरूप ते न्याहाळतात. अलंकारांची समर्पकता, कल्पनांची भव्यता आणि शब्दांची नादगर्भता पणाला लावून 'प्रबळ पंचमऋतु' असलेला वर्षाकाळ ( ३।१०।१९२-२०० ) त्यांनी सजीव केला आहे. "किं पृथ्वीखंड त्या शाळुंखा। अनेक पर्वत शिवपिंडिका । इंद्रें मांडिले अभिषेका । गगनपात्रीं बहुधारा" ( ३।१०।१९६ ) अशी भव्योदात्त चित्रे पाहताना डोळे विस्फारतात. कडाडत्या विजा, गडगडणारे ढग व ओसंडून वाहणाऱ्या सरिता यांनी आकारलेल्या कोसळत्या पावसात श्रोते भिजून चिंब होतात! प्राणिसृष्टीतील गजबज आणि मानवी विश्वातील समृद्धी टिपून वर्षाकाळातून ईश्वराचे जगत्पालकत्व ते प्रकट करतात तेव्हा या ऐंद्रियगम्य वर्णनाला अर्थगांभीर्य प्राप्त होते. रात्रिचर क्रव्यादांच्या निर्देशाने अस्वस्थ अश्वत्थाम्याची रात्र (१०।१।२४-२८ ) भयद होते. लाक्षागृहाच्या अग्निज्वालेतून बाहेर पडलेल्या

१६. दुष्यंत मृगया १।१५।५०-६१. काश्यप वन १।१५।६९-७३. रमणीक वन १।१८।२-३. पंडुप्रवास १।२७।३८-५५. गंगावर्णन १।३६।१०५-१०६. न्यग्रोधवृक्ष १।३६।१३६-१३८. मानससरोवर २।८।२९-३१. मयसभा परिसर २।२।५९-६८. तापसारण्य ३।७।१६२-१६३. महारण्य ३।९।१२२-१२४. कुबेरसरोवर ३।९।१५९-१६१. अद्वैत वन ३।४।४-५, ३।१२।७४. यक्षसरोवर ३।१८।११-१६. अश्वत्थामा प्रविष्ट वन १०।१।१९-२३.

पांडवांचा अंधाऱ्या रात्रीतील रोमहर्षक प्रवास ( १।३६।५३-८१ ) पाहण्यासारखा आहे. दीपिकांचे बंबाळ दाखवून गुप्त होणाऱ्या अप्सरा, गदारोळाने धुमकसु घालणाऱ्या यक्षिणी, प्रेतगणांचे नरमांसभक्षण, गुप्तधनाचा थरारक संचार, मण्यांच्या प्रकाशात भक्ष शोधणारे सर्पराज अशी भास-आभासांच्या पातळीवरील भयद दृश्यांची मालिका वृक्षलतांनी घनगर्द केलेल्या अंधाराच्या फलकावर त्यांनी रंगविली आहेत. दीवाभीतांचे घुंघाट, टिटव्यांची टिवटिव, पिंगळ्यांचा किलकिलाट व भालूचे भुंकणे यांनी त्यांना सूर लाभतो. दृकश्राव्यसंवेदनांनी काळपुरुषाची कांबळी पांघरलेली घोर रात्र साकार होते. त्या काळरात्री जेव्हा भीम " झडपाआड मोडी झाडें । तळ ां चूर्ण करीत धोंडे । श्वापदसर्पांची जुंबाडे । पायांतळीं रगडीत " ( १।३६।६५ ) असा चालत जातो तेव्हा आपल्या काळजाचा ठोका चुकतो ! हळूहळू कनकमराळ अरूणचंचूने गगनसमुद्रातील मुक्ताफळे वेचून घेतो. फुलत्या फुलांचा सुवास घेऊन वारा वाहू लागतो आणि पूर्वदिशेने कुंकुम रेखावे तसे सूर्यमंडळ प्रकटते. पापतापांचा अंधार संपतो आणि पुण्यकृत्यांचा प्रकाश पसरतो. प्रभातीची सारी प्रसन्नता मुक्तेश्वरांच्या या ' उषासूक्ता 'त एकवटली आहे. विविध कालभागातील सृष्टिचक्राची सचित्र वर्णने हा मुक्तेश्वरी निसर्गवर्णनाचा एक विशेष आहे. दिनमानाच्या या वर्णनांनी श्रोत्याला काव्यगत काळाचे भान येते.

मानवी भावनांचे धागे निसर्गचित्रात गुंफून त्यांना ते अधिक उठावदार रूप देतात. शस्त्ररंगातील परस्परद्वेष, भ्रष्टता व विषण्णता त्या दिवशीच्या संध्येवर ( १।३१।१८६–१९० ) पसरून देतात. वनातील वसंतमासाचे ( १।२८।६-११ ) धुंदावणारे चित्र रेखाटून ते पंडूच्या मनातील कामभाव जागवितात. भीम-हिडिंबेचा रसरशीत प्रणय ( १।३७।७०-७७ ), दमयंतीची विरहव्यथा ( ३।७।१३४–१३८, १५७-१५८ ), नलाची व्याकुळता ( ३।७।११०-११४ ), सीतेचा आक्रोश ( ३।१५।९४–९५ ) यांना निसर्गाच्या सहवासात रंग भरला आहे. उत्पातवर्णनात[१७] भावस्फोटक प्रसंगांचा क्षुब्ध निसर्गशक्तीशी सांधा जुळवून ते आंतर व बाह्य सृष्टीत संवाद साधतात.

कधी मुक्तेश्वर आपल्या विचारांना निसर्गाचे ऐंद्रिय रूप देतात तर कधी निसर्ग-रूपातून त्यांना विचारस्फुरण होते. मृत्युची सर्ववशता ( १।१।१८३ ), संकटातही धिरोदात्ताची स्थिरता ( ३।१६।३० ), योग्य व्यक्तीची संगती ( १।१८।१२०–१२२ ) यांसारखे विचारानुभव ते निसर्गरूपातून व्यक्त करतात. मुक्तेश्वरांच्या अलंकारसृष्टीत नैसर्गिक उपमाने विपुल आहेत. त्यांच्या निसर्गरसिकतेच्या त्या खुणा आहेत.

कथेशी एकजीव होऊन येणारी निसर्गाच्या रूपलावण्याची चित्रें मुक्तेश्वरी कवितेत अवतरतात. त्यावर सांकेतिकता व आदर्शवाद यांची छाप असली तरी तरल संवेदन-शीलता, तल्लख कल्पकता, भरगच्चपणा, वास्तव व कल्पनीय यांची मोहक सरमिळ

---

१७. जसे, १।२६।७९-८४, २।११।६६, २।१५।२४९–२५०, २५५-२५६, २।१६।४२–४३, २।१७।२६-२७, ३।१०।१२१–१२७.

आणि चित्रदर्शी शैली यामुळे ती वेधक झाली आहेत. ज्ञानदेव, नरेंद्र, कृष्णदास मुद्गल, रामदास यांच्या पंक्तीत सन्मानाने बसतील अशीच मुक्तेश्वरांची निसर्गचित्रें आहेत. मराठी महाभारतात तर ती केवळ अजोड आहेत.

**आणखी काही वर्णन.** कथेच्या ओघात बारीकसारीक वस्तूंचे निर्देश येतात. अशा वेळी ओव्या-दोन ओव्यांत मुक्तेश्वर त्यांची रेखीव चित्रे काढून जातात. गरुडपीस ( १।६।९७ ), कपटपाश ( २।२४।२६-३० ), धेनु ( ४।५।५५-५६ ), चित्रमय विवाहपत्रिका ( ४।८।११-१२ ), घोर उल्क ( १०।१।३७-३८ ) ही वर्णने या दृष्टीने पाहण्यासारखी आहेत.

पाहुण्यांना देण्यासाठी पांडवांनी कनकपात्रात भेटवस्तू टाकल्या तेव्हा " आच्छादोनि चित्रांबरीं । तबकें मांडिलीं एक हारीं " ( २।१०।११ ) असा त्यावरील चित्रांकित आच्छादनाचा मुक्तेश्वर निर्देश करतात. वर्ण्य वस्तूच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या अशा बारकाव्यांनी त्यांची वर्णने विशेष सौंदर्यपूर्ण झाली आहेत.

भावस्फोटक प्रसंगांच्या सांगाती सृष्टीतील उत्पातांची वर्णने मुक्तेश्वर आवर्जून करतात. एका बाजूने ती भविष्यसूचक होतात तर दुसऱ्या बाजूने बाह्यांतरसृष्टीत संवाद साधतात.

अमृतकुंडाकडे जाताना गरुडास येणारे अडथळे ( १।६।७३-८६ ), सर्पसत्र (१।१०।६६-११५), दुष्यंताची मृगया ( १।१५।६३-६८ ), ययातीचे अकालवार्धक्य ( १।१९।७४-८० ) यांसारखी काही संकीर्ण वर्णनस्थळे मुक्तेश्वरांच्या वर्णनसामर्थ्याची साक्ष देतात.

**३. काही वर्णनविशेष**

कथानकातील गतिशीलतेची उणीव महाकवी कल्पक वर्णनांनी भरून काढतो. अशा वर्णनस्थळी कवीजवळ अव्वल दर्जाची कल्पकता नसेल तर त्याचे निवेदन कंटाळवाणे, पाल्हाळिक व कृत्रिम बनते. मुक्तेश्वरांची अशी स्थिती क्वचित होते. सूक्ष्म आणि भव्य, वास्तव आणि काल्पनिक, वैपुल्य आणि वैचित्र्य अशा अनेक अंगांनी बाणभट्टाचे मनगट पकडणारी कल्पकता त्यांच्या वर्णनांना सौंदर्य प्राप्त करून देते.

महाभारतातील अशी वर्णने मुक्तेश्वर गाळीत नाहीत. ते त्यांचे समरूप वा विस्ताराने चित्रण करतात. मुळात विखुरलेल्या संबद्ध तुकड्यांच्या जोडणीतून पूर्ण वर्णनचित्र सिद्ध करतात. कथौघात वर्णनस्थळे हेरून स्वतंत्रपणे फुलविण्याचे चातुर्यही त्यांनी दाखविले आहे.

भव्य, नेत्रदीपक आणि मनोमय प्रतीती घडविणारी विविध दृश्यांची व मनोविकारांची वर्णने हा मुक्तेश्वरी कवितेचा ठळक विशेष आहे. कथादृष्ट्या महत्त्वाच्या व्यक्ती, वास्तु, वस्तु, स्थळ, उत्सव-महोत्सव, गमनागमन, युद्ध, वस्त्रभोजनादी, प्रसंग मृगयादी राजपुरुषांच्या क्रीडा, निसर्गाची रूपदर्शने यांची वर्णने ते करतात. त्यांना एक रंजन-मूल्य आहे. त्यातून कथेचा महत्त्वाचा टप्पा गाठला जातो किंवा तदंतर्गत भावसूचन होते. त्यामुळे ती प्रयोजकही झाली आहेत.

महाभारतकारांप्रमाणे मुक्तेश्वरांनीही एकाच विषयाची निरनिराळ्या ठिकाणी निर-निराळ्या प्रकारांनी वर्णने केली आहेत. त्यामुळे त्यांना त्या त्या व्यक्ती–स्थल-प्रसंगांची परिमाणे लाभतात. त्रयस्थ निवेदनाप्रमाणे व्यक्तींच्या संवादांतर्गतही ती गुंफलेली असतात. या परस्परपूरक वर्णनांतून वर्ण्य विषयाचे अनेकांगी दर्शन घडते. अशी परस्परपूरक वर्णने लक्षात घेऊनच त्यांच्या वर्णनाचे मूल्यमापन केले पाहिजे.

वर्ण्यविषयाचा मुद्देसूद, क्रमशुद्ध व एकेका घटकाचा विस्तार करीत ते वर्णने फुलवितात. वर्ण्यविषयाच्या एकेका अंगाच्या अल्पवर्णनातून संपूर्णाच्या संमिश्रतेची एकवट प्रतीती ते देतात. त्यांच्या वर्णनशैलीचा झोत अनेक घटकांवर फिरत राहतो आणि त्यातून अनेकघटकयुक्त वर्ण्यविषयाचा सम्यक प्रत्यय येतो. त्यांची वास्तव वर्णने सूक्ष्म निरीक्षण, बहुश्रुतता आणि स्वभावोक्तिपूर्ण चित्रणामुळे जिवंत होतात कधी त्यांची वर्णने म्हणजे कल्पनाशक्तीची मुक्त क्रीडा असते. अशा वेळी अत्युक्ती, अद्‌भुतरम्यता व तरल कल्पना यांनी ती नटलेली असतात. लौकिक–अलौकिक, पार्थिव–अपार्थिव अशा दोन्ही पातळ्यांवर त्यांची वर्णने कधी फिरत राहतात. त्यामुळे त्यांची सरमिसळ होऊन विषयाची सर्वांगे प्रकट होतात. या वर्णनांना ते कधी एक तात्विक परिमाण देतात व त्यांना अधिक अर्थपूर्ण करतात. बाह्य चित्रणाप्रमाणे भावदर्शनाकडेही ते अवधान पुरवितात. साक्षी वा भोक्त्या व्यक्तींच्या प्रतिक्रियांतून जे वर्ण्य विषयाची तीव्रता, माहात्म्य वाढविताना दिसतात. या अप्रत्यक्ष चित्रणामुळे श्रोतृमनावरील त्याचा परिणाम अधिक गडद होतो. अतिमानवी शक्तींच्या प्रतिक्रिया वर्णून ते कधी घटितावर दैवी न्यायाच्या मान्यतेचे शिक्कामोर्तब करताना दिसतात. विस्तृत वर्णनानंतर समारोप करताना नेमके-पणाने समुचित अर्थगौरवाने ते त्याचे सार सांगतात. अशा वेळी त्यांची शैली भारवती होते.

वर्ण्यविषय अनेकांगांनी संवेद्य करण्याचा प्रयत्न ते करतात. त्यामुळे त्यांची भाषा आपोआपच संवेदनागर्भ व आलंकारिक बनते या. ऐंद्रिय पातळीमुळे त्यांच्या वर्णनांना एक दृश्यमूल्य येते. ती भावसंग्राहक होतात. शब्दयोजनेचा साक्षेप, पौराणिक संदर्भांचा वापर, अत्युक्ती व अद्‌भुतरम्यता हेही त्यांच्या वर्णनांचे विशेष आहेत.

पूर्णतेच्या ध्यासाची आदर्शवादी प्रेरणा त्यांच्या वर्णनामागे आहे. कविसंकेत, प्रत्यक्ष वास्तव व कल्पकता यांनी ही वर्णने घडविलेली आहेत. वर्ण्य वस्तूचे सौंदर्य वाढविणारे बारकावे ते अचूक टिपतात. तपशीलाच्या बारकाव्यामुळे ती भरगच्च, वैविध्यपूर्ण होतात. जे परिचित, ज्ञात व श्रुत आहे त्याच्या मिश्रणामुळे ती जिवंत होतात. मुक्तेश्वरांची निर्देशात्मकता वर्णनांना अधिकृत रूप देते. त्यांची वर्णने कथांतर्गत जीवनाचे मूर्तिकरण करतात. त्याभोवती संस्कृतीचे वलय उभे करतात.

अतिविस्तार, प्रस्तुताप्रस्तुत व उचितानुचित विवेकाचा अभाव, ग्राम्यता, अश्लीलता, कालविपर्यास यांचे गालबोटही त्यांच्या वर्णनांना कधीकधी लागलेले दिसते.

या वर्णनांमागे मुक्तेश्वरांचे रसिक व्यक्तिमत्त्व उभे आहे. सौंदर्यदृष्टी, संवेदनशीलता, निसर्गरसिकता, रसज्ञता, सूक्ष्मावलोकन, परिभ्रमणाने व व्यासंगाने येणारी बहुश्रुतता, ऐहिकाचे आकर्षण, लौकिक आशा-आकांक्षांची चित्रे रेखाटणारी प्रवृत्तिपरता अशी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची विविधांगे त्यांच्या वर्णनांतून प्रतीत होतात.

## ४. समारोप

" प्रत्यक्ष वर्तले जे विशेष । ते आवडे वर्णिता " (३।११।९०) अशी मुक्तेश्वरांची रुची आहे. प्रत्यक्षाचे उत्कट चित्रण हा त्यांच्या कवित्वाचा मनोधर्म आहे. ऐहिक जीवनातील सौंदर्य शोधू पाहणारी आणि " वाटे प्रत्यक्ष देखिलें दृष्टी " ( १।२१।३ ) असे वाटावयास लावणारी चित्रशैलीतील रेखाटने करणारी त्यांची प्रतिभा आहे. वर्ण्यविषयाचे दृक्‌चित्र, ध्वनिचित्र आणि भावचित्र उभे करून वाचकांना त्या त्या वातावरणात नेऊन सोडणारी किती तरी रमणीय वर्णनस्थळे त्यांच्या भारतात विखुरलेली आहेत. भावसंवाहकता व यथार्थ ऐंद्रियप्रतीती ही वर्णनांची कसोटी असून मुक्तेश्वरांची गोचर, जिवंत, कल्पनाविलासात्मक चित्रशैलीतील वर्णने त्या कसोटीवर उतरतात अशी एकमुखी ग्वाही पूर्वाभ्यासकांनी[१८] दिली आहे. स्फुटकाव्य व रामायण यांतून घडणीच्या अवस्थेत असलेले त्यांचे वर्णनतंत्र येथे पूर्णत्वास गेले आहे. अशी सालंकृत व सविस्तर वर्णने हा महाकाव्याचा एक विशेष समजला जातो. मुक्तेश्वरी भारतातील त्यांचे प्रमाण, तज्जन्य विस्तार व आलंकारिक कल्पनाविलास पाहता महाभारताचे आर्ष महाकाव्यात्म रूप जपण्याचा त्यांचा प्रयत्न जाणवतो. असा प्रयत्न मोरोपंतांच्या आर्याभारतात जाणवत नाही. श्रीधरात मुक्तेश्वरांच्या अनुकृतीच्या रूपाने जाणवतो. मराठी महाभारतकारांत मुक्तेश्वरी वर्णनांनाच महाकाव्यात्म परिमाण लाभले आहे.

---

१८. पहा, वि. ल. भावे, " महाराष्ट्र-सारस्वत " पृ. ३४२, ३४५–३४६ " मुक्तेश्वर, " पृ. ८१. ल. रा. पांगारकर, " कविवर्य मुक्तेश्वर : चरित्र व काव्यविवेचन, " पृ. ५४, ८९.

□

# सहा ॥ अलंकार

## १ अलंकार : स्वरूपविवेचन

रूक्ष आणि ठरीव अभिव्यक्तिविरोधी कवींनी केलेली बंडखोरी म्हणजे आलंकारिक अभिव्यक्ती होय. आलंकारिक विधानाचा आशय मूलतः वेगळ्या जातीचा असतो. वर्णनीय वस्तूचे प्रतिभासात्मक वर्णन त्यात आलेले असते. त्यात प्रतिभाजन्य वैचित्र्य, चमत्कृती व चारुता अवतरते. ते रसापेक्षी असते. त्यासाठी कवीला उचितानुचिताची समीक्षा करावी लागते. अनुभवाचा अपरिहार्य रचनाबंध म्हणून प्रकटणारे अलंकार कविस्वभावाचेही दर्शक असतात.

चांगल्या अलंकाराने काव्यांतर्गत अनुभूतीच्या प्रवासातील एकेक टप्पा गाठला जातो. त्याद्वारे कवी आपली अनुभवप्रतीती वाचकापर्यंत पोहोचवितो. एवढेच नव्हे तर, काही वेळा अलंकारांच्या आश्रयाशिवाय ही प्रतीती व्यक्तच होऊ शकत नाही. उपमेय-उपमानांचे वेगळेपण व त्यांच्या संबंधातील विविधता यामुळे अलंकारात नाविन्य अवतरते. काव्यांतर्गत अनुभूतीला विवक्षितपणा येऊन तीत एक प्रकारचा जिवंतपणा येतो. ती अर्थपूर्ण, व्यापक, सूचक व प्रत्ययोत्पादक बनते. अलंकारामुळे ग्राम्यता टाळून, सद्‌भिरूची पाळून वर्णन करणे शक्य होते. शब्द मित व अर्थ अपरिमित होतात. अर्थाचे विभावन होते व वर्णनीय वस्तूचा अतिशय साधतो. उत्कट व सहज रसाभिव्यक्तीचा तो एक आवश्यक संस्कार आहे. वैचित्र्य, शोभाकरत्व, अनन्योपयोग, स्पष्टार्थबोधकता व रसाश्रय यामुळे अलंकृतीसह काव्य ही संज्ञा यथार्थ ठरते, असा संस्कृत काव्यशास्त्राचा निर्णय आहे.

## २. अलंकारयोजनेचे भारतसापेक्ष विशेष

महाभारतातील अलंकारसृष्टीचे उपयोजन मुक्तेश्वर वेगवेगळ्या पद्धतीने करतात. मूळ अलंकारांचा त्यांतील उपमान व त्यांची ठेवण कायम ठेवून ते कधी स्वीकार करतात. " यथा वज्री दानवशत्रुरेकः " ( मभा. २।५८।२३ )चे " दानवदलनी जैसा इंद्र " ( मुभा. २।१४।१५२ ) असा ते तंतोतंत स्वीकार करतात. " शूद्रास न मिळणारी वेदश्रुती " ( मभा. २।४२।१५ मुभा. २।११।५४ ), यात मुक्तेश्वरकालीन संस्कृतीशी सदृश कल्पना आहे. " कदलीदण्डसदृशं " ( मभा. २।६३।११ ) हे सांकेतिक उपमान असल्याने " कर्दळीस्तंभप्राय " ( २।१५।१०६ ) अशा स्वरूपात ते कायम राहते. " मध काढणारा कडा पाहत नाही. " ( मभा. २।५९।४ मुभा.

२|१४।१०५ ) हा दृष्टांत मुळात शुक्रनीतीतील म्हणून सांगितला आहे. या संदर्भ-माहात्म्यामुळे तो स्वीकारण्यात आला असावा. सहज उपलब्धी, सांकेतिकता, संस्कृतिद्योतन आणि संदर्भमाहात्म्य यामुळे मुक्तेश्वर मूळ अलंकारांचा स्वीकार करतात.[1] अशी उदाहरणे त्यांच्या समग्र अलंकारयोजनेच्या मानाने अल्प आहेत.

कधी मूळ अलंकारांचे प्रकरांतर होते. ही पांचाली द्रौपदी नौकाच झाली. ( मभा. २।६४।३ ) अशा रूपकाचे " द्रौपदी नोव्हे नौका खरी " ( २।१५।२७२ ) अशा अपह्नुतीत रूपांतर झाले आहे.

" अहीनाशीविषान्क्रुद्धादंशाय समुपस्थितान् । कृत्वा कण्ठे च पृष्ठे च कः समुत्स्रष्टुमर्हति " ( २।६६।१० ) असा दृष्टांत मुळात दुःशासनमुखी द्यूतानंतर वापरला आहे. " शस्त्रें डवंचू महाव्याळ । तोचि कंठीं सूदला " ( २।१६।३ ) असा अधिक नेमकेपणाने मुक्तेश्वर तो दुर्योधनमुखाने वापरतात. मूळ अलंकाराला अधिक स्पष्टार्थ-बोधक करण्याचा प्रयत्न त्यातून दिसतो.

मुक्तेश्वर कधी मूळ उपमाने बदलतात. हिमवत् पर्वतावरील सिंह जसे गाईच्या गोठ्याकडे येतात त्याप्रमाणे कृष्णभीमार्जुन जरासंधाकडे गेले ( मभा २।१९।५ ) ही कल्पना मुक्तेश्वर " कुंजरवनामाजी केसरी । कीं गोठणी प्रवेश की जे व्याघ्रीं " ( २।६।१०८ ) अशी मांडतात. उत्तर भारताच्या परिसरात जन्मलेल्या महाभारतात सिंहांचे उल्लेख सहजतेने येतात. महाराष्ट्रात सिंहापेक्षा वाघ जास्त ! गाईच्या गोठ्यांना उपद्रव देणारे हे वाघ तसे साऱ्यांच्याच परिचयाचे. म्हणून मुक्तेश्वरांनी प्रादेशिकतेने अधिक प्रत्ययोत्पादक झालेले उपमान वापरले असावे. सिंहाचा संबंध " कुंजरवनाशी " त्यांनी जोडला तो काव्यगत संकेतांच्या आधारावर. त्याचा उपयोग करून त्यांनी तुल्यबलता सुचविली आहे. मूळ उपमाने बदलत्या रूपात वा अन्य स्वतंत्र उपमानांसह वापरण्याकडे मुक्तेश्वरांचा कल आहे. त्यामुळे त्यांचे अलंकार विस्तारतात.

कधी मूळ उपमाने मुक्तेश्वर एकाच अर्थाने बांधून घेतात. मांडीवर घेतलेला सर्प, पोषण करणाराचा घात करणारे मांजर असे दुर्योधन विदुरास म्हणतो ( २।५७।३ ). या दोन्ही उपमानांना " विडाळे अथवा कृष्णव्याळें । भक्षिजेती आपुलीं बाळे " ( २।१४।११४ ) असे मुक्तेश्वरांनी एकत्र आणले आहे. विदुर ज्येष्ठ आणि दुर्योधन त्याला पुत्रवत, हा संबंध लक्षात घेतला तर या बदलाने त्यात अधिक भेदकता आल्याचे जाणवते.

---

१.

| महाभारत | मुक्तेश्वर | महाभारत | मुक्तेश्वर. |
|---|---|---|---|
| २।३९।१९ | २।११।१ | १०।५।३७ | १०।१।२७ |
| २।४१।२८ | २।११।३७ | १०।६।११ | १०।२।९ |
| २।६४।३ | २।१५।२७२ | १०।९।१३ | १०।३।११ |
| २।६८।१५ | २।१५।५६ | १०।११।६ | १०।३।७० |
| २।६८।१३ | २।१६।४७ | १०।१४।६ | १०।४।३१ |

कधी मूळ उपमान मुक्तेश्वर कायम ठेवतात. पण त्यांनी केलेल्या किंचित बदलाने मूलार्थ निसटलेला असतो. “ युद्धात नौकेप्रमाणे पार नेणारा ” ( २।५८।२० ) हे अर्जुनवर्णन “ शत्रुसेनामहापुरात रथनौका वीरश्रीच्या विनोदाने उभयतीरी नेणारा ” ( २।१४।१५० ) असे बदलत्या रूपात येते. येथे उपमेय-अर्जुनाऐवजी रथ-बदलले गेले आहे आणि मूलार्थाचा रोखही बदलला आहे.

“ प्रविश्य च श्वेव स सिंहगोष्ठं ” ( २।६०।३ ) ” येरु प्रवेशोनि सदनीं ” ( २।१५।८ ) असे अनलंकृत वर्णन ते करतात. मूळ अलंकारांचे वर्जन हा संक्षेपाचा प्रकार म्हणावयास हवा.

कधी-खरे म्हणजे, बऱ्याच वेळा-मुळात नसताना ते अलंकारांची स्वतंत्र योजना करताना दिसतात. द्रौपदीच्या क्रोधाचा साधा मूलनिर्देश “ जेवीं दक्षाच्या विनाशनीं । हरप्रमदा कोपली ” ( १०।३।८६ ) अशा डौलदार अलंकृतीने ते रंगवितात. सौप्तिकात तर त्यांची निर्मितिशीलता अशा स्वतंत्र अलंकारविलासातच[२] कृतार्थ होते. मुक्तेश्वरांच्या अशा स्वतंत्र अलंकारयोजनेचाच पुढे विस्ताराने विचार करावयाचा आहे.

### ३. काही अलंकारबंधांची पाहणी

डौलदार अलंकारविन्यास हा मुक्तेश्वरांच्या वाणीचा विशेष आहे. उपमा-दृष्टांत-निदर्शना या अलंकारांनी ते आपल्या कथनशैलीला सुगमता देतात. रूपक, उत्प्रेक्षा, व्यतिरेक, अतिशयोक्ती, पर्यायोक्ती, स्वभावोक्ती या अलंकारांनी ते तिला आकर्षक रूप देतात. ओवीछंदाची अट म्हणून यमक आणि श्रुतिमाधुर्यासाठी अनुप्रास ते सहजतेने साधतात. चेतनगुणोक्ती, असम, अर्थांतरन्यास, काव्यलिंग, परिवृत्ती, सार, परिकर, श्लेष, प्रतिवस्तूपमा, अपन्हुती, विभावना, व्याजस्तुती, भ्रांतिमान, ससंदेश, उदात्त, सम, प्रतीप, समाधी, विषम, अतद्गुण, अत्युक्ती, सहोक्ती, काव्यार्थापत्ती, स्मरण, दीपक, यथासंख्य यांशिवाय अन्य अलंकर त्यांच्या भारतात क्वचितच येतात. एकूण अलंकारांच्या संख्येच्या तुलनेने ते कमी आहेत. अर्थात कोणाही कवीचे काव्य म्हणजे अलंकारांच्या उदाहरणांचा कोश नव्हे ! हे लक्षात घेतले असता मुक्तेश्वरांच्या अलंकारयोजनेत प्रकारवैविध्य आहे, असे म्हटले पाहिजे.

कल्पकता आणि प्रतीतिक्षमता या दोन्ही अंगांनी त्यांची अलंकारयोजना नेटकी असते. “ वेढूनि रविरश्मि पाटोळा । समुद्रावरण कटिमेखळा । चंद्रमंडळ भांगटिळा । शेष वासुगी नेपुरें ” ( १।१३।५२ ) अशा भव्य रूपकशृंगाराने त्यांची पृथ्वी नटलेली असते. मुक्तेश्वरांच्या बौद्धिक चमत्कृतीचे, भावशील कल्पकतेचे व पल्लेदार प्रतिभेचे नमुने

---

२. सौप्तिक १।३६,१२७. २।८,५३,१२८. ३।५०,५२,६६,६७,७१,८५,८६. ४।३२,५४,७५,९४.

त्याच्या रूपकविलासात[३] विखुरलेले आहेत. अध्यायान्तीचे समारोप त्यांच्या रूपकप्रियतेची साक्ष देतात. त्यांची रूपके एका बाजूने तपशीलाच्या बारकाव्यामुळे सूक्ष्म होत गेलेली दिसतात. तर दुसऱ्या बाजूने येणाऱ्या समग्र प्रत्ययामुळे भव्य झालेली दिसतात. दीर्घता व अश्लीलतेचे कधी गालबोट लागलेले असले तरी ती वेधक व भावसंवाहक असतात. ज्ञानदेवांच्या रूपकातील सौंदर्यमयता व एकनाथांच्या रूपकातील परतत्त्वस्पर्श दोन्ही मुक्तेश्वरांच्या रूपकात एकवटली असून ती अधिक भावशील झाली आहेत.

मुक्तेश्वरांच्या उपमा[४] नेमक्या असतात. समुद्रावर भोवंडणारा पक्षी अखेरी नौकास्तंभाचा आश्रय घेतो, त्याचप्रमाणे विचाराने भ्रमलेले मन प्रारब्धाचा आश्रय घेते ( २।१२।१५ ), या उपमेत मानवी जीवनाची अज्ञेयता व मानवी मनाची प्रारब्धशरणता कशा तीव्रतेने अभिव्यक्त झाली आहे! त्यातील समर्पकता व चित्रमयता वाखाणण्यासारखी आहे. असा अलंकार कवीच्या साऱ्या जीवनानुभवाचे बळ पाठीशी बांधून प्रतिभासामर्थ्याने झळाळत राहतो.

दुःशासनाने तुला वाचविले असते तसेच भीमार्जुनादी बंधूंनी वाचविले असते, त्यात एवढे काय, अशी घोषयात्रेत फजित झालेल्या दुर्योधनाची कर्ण समजूत घालतो. तेव्हा " उभयहस्तांमाजी कोणा । संकोच वाटे उपकारें " ( ३।१३।११ ) या दृष्टांताने त्याच्या मनीचा भाव कसा बोलका होतो! मुक्तेश्वरी दृष्टांतात[५] मार्मिक निरीक्षण, समर्पकता व उपमानांची बहुविधता प्रत्ययास येते.

उत्प्रेक्षा हा मुक्तेश्वरांचा " अर्थ विशेषः " असा अलंकार असल्याची रसिकांची साक्ष आहे. आपल्या तल्लख कल्पकतेने ते असे उपमान योजतात की त्यांच्या उपमेयावरील संभावनेने रसिक चकित व्हावा. " किं पृथ्वीखंड त्या शाळुंका । अनेक शिवपिंडिका । इंद्रें मांडिलें अभिषेका । गगनपात्रीं बहुधारा " (३।१०।१८६) अशा स्वरूपोत्प्रेक्षेने कोसळत्या पावसाचे भव्य दृश्य ते उभे करतात. हस्तिनापुरापेक्षा अमरावती उंच का; या प्रश्नाचे उत्तर " उपमे तुळिता निर्जरनगर । चढे हळुवट आकाशीं " ( १।२५।७१ ) अशा हेतूत्प्रेक्षेने ते देतात. " रत्न झांकणें समुद्रीं पडिलें । कीं ब्रह्मांडकरंडां काजळ भरिलें । विश्वलोचनीं लेउनि उरलें अपरिमित दशदिशा " (१।४०।४०) अशा बहारदार उत्प्रेक्षेने गंगातीरावरील अंधारी रात्र डोळयांना ' दिसू ' लागते.

---

३. १।१।६१, १०४–१०५, १।१३।४३, १।३१।१९१, १।४३।५१, २।५।३,१४, १०७–११०. २।७।३–४, २।१५।१०९–११६, १०७–११०. १३२–१५०. ३।१३।६०–६३.

४. उपमा १।२७।५५, २।७।३८,७३,१०५, २।१२।१४१, २।१५।४२,२८०, २८८,२९०. ३।१०।१२९, ३।११।५, ४।४।१४.

५. दृष्टांत १।१३।१७, २।१।२०,३३, २।५।१३६–१३८, २।१२।११५–११६. ४।७।६४.

या अंधाऱ्या रात्री अर्जुन जेव्हा मशाल पेटवितो तेव्हा " कीं निशा नव्हे ते भद्रकाळी। पूजिती नक्षत्रमुक्ताफळीं। आरती उजळावया करतळीं। दीप अर्जुनें लाविला " (१।४०।६) अशा अपह्नुतीने ते साऱ्या गूढ वातावरणाला पावित्र्याचा स्पर्श देतात. एकचक्र म्हणून सूर्यरथाला व्यंग म्हणणारा कृष्णरथ ( २।७।८४ ) व्यतिरेकाचे कल्पक उदाहरण आहे. संवत्सरापावेतो चालणाऱ्या महोत्सवात कवीला एकच न्यून दिसते. त्याला द्यायला दृष्टांतच सापडत नाही ( २।९।१३९ ), ही व्याजनिंदा मनाला सुखवून जाते. हृदयी ध्यानमूर्ती असतानाही बाह्य प्रतिमा परती होताच वियोगाची खंती राहिना, ( २।१।६३) यातील विरोधाभास भक्तीची तीव्रता वाढविणारा आहे. " खोवोनि पीतांबराचे सोगे। कौस्तुभमाळ टाकिली मागें। उच्छिष्टें काढी लगबगें। पुढती पंक्ती बैसावया " ( २।९।१४१ ) ही स्वभावोक्ती उच्छिष्टे काढणाऱ्या भक्तवत्सल कृष्णाची रम्याकृती डोळ्यासमोर उभी करते. " किरीटकिरणीं उजळती पाय " ( २।१२।११४ ) अशा पर्यायोक्तीने धृतराष्ट्र दुर्योधनाच्या चक्रवर्तित्वाची सूचना देतो. वस्त्रहरणाच्या मानहानीतून सोडवून वरप्रदानास सिद्ध झालेल्या धृतराष्ट्राला द्रौपदी जेव्हा " कुलपालका ! कल्पद्रुमा " (२।१५।२६३ ) अशी समर्पक विशेषणे योजते तेव्हा त्या ओवीस परिकराचे सौंदर्य प्राप्त होते.

मुक्तेश्वरांची संक्षेपरामायणातील शब्दालंकारांची ओढ महाभारतात उरलेली नाही. श्लेष हा कवीच्या बुद्धिचातुर्याचा व शब्दप्रभुत्वाचा निदर्शक अलंकार आहे पण तोही मुक्तेश्वर सहजगम्य पद्धतीने वापरतात. " मधुसूदन पंचाक्षरी। स्मरतां संचरला अंतरीं ' ( २।९।८३ ). द्रौपदीला शंकेची ' झडपणी ' झाली होती ( २।९।८१ ), हे लक्षात घेतले म्हणजे ' पंचाक्षरी ' शब्दाची मार्मिकता समजेल. त्याला श्लिष्ट रूप देण्यासाठी मुक्तेश्वरांनी ' मधुसूदन ' हे पाच अक्षरी पर्यायी कृष्णनाम नेमकेपणाने वापरले आहे. या श्लेषातील सहजता व संदर्भाची सलगता पाहण्यासारखी आहे. श्लेषाप्रमाणेच शब्दच्छल करणाऱ्या कोट्याही ते वापरतात. त्या बुद्धिगम्य असल्या तरी " शल्याने निःशल्यस्नेह दृष्टीने रत्नें दिली " ( २।८।१५४ ) अशी सहजता व समर्पकताही त्यात आहे. ओवीछंदाची आवश्यक अट म्हणून मुक्तेश्वर यमकयोजना करतात. श्रुतिजन्य माधुर्यासाठी त्यांना अनुप्रास अधिक प्रिय आहे.

## ४. उपमानसृष्टीचे निरीक्षण

मुक्तेश्वरांच्या उपमानसृष्टीत भानुतेज, षण्ढतील, प्राणहीन चर्ममय मृग, वज्राने तुटणारे महाशैल अशी महाभारती उपमाने क्वचित कोठे डोकावताना दिसतात.

महाप्रलय, मेरूमंदार, कैलास, चंद्रसूर्य, अमृत, मदन, वसंतागम, कल्पवृक्ष, अशा संस्कृत वाङ्मयात रूळलेल्या सांकेतिक उपमानांची गजबज त्यात आहे. हत्तीच्या गंडस्थळातील मोती, यशाचा रंग पांढरा, पृथ्वीभार उचलणारे कूर्म–वराह–शेष अशा

सांकेतिक कल्पनाही येथे येतात. त्यातून कधी " अधर बिंब हिरे दशन । शुकनासिका विशाळ नयन । वदन सर्वानंदवर्धन । कोटि मदन सांडणे " ( २।१०।६५ ) अशा पूर्ण सांकेतिक ओळी जन्मतात.

तरीही सांकेतिक सांकेतिक म्हणून त्यांना झिडकारणे योग्य ठरणार नाही. संकेत ही काव्यपरंपरेतील सौंदर्याच्या जाणिवेची खूण असते. सततच्या वापराने त्यातील सौंदर्य व रसमयता यांचे आवाहन काहीसे बोथट झालेले असते. नवाई संपलेली असते. तरीही कोणत्याही काळातील कवी त्यांचा थोडाफार वापर करीतच असतो. सारेच संकेत एका मापाने मोजता येत नाहीत. शुकनासिकासारखे सौंदर्यवर्णनात रूळलेले पारंपरिक संकेत; वेदश्रुती न लाभणारा शूद्र असे समकालीन जीवनदर्शक संकेत आणि जोडीला सर्पफणीच्या छायेत न विसावणारा मंडूक असे कवीच्या प्रतिभापूरित किमयेने नवचैतन्य लाभलेले संकेत; यांच्या संमिश्र घडणीतून त्यांची उपमानसृष्टी आकारलेली आहे. अशा वेळी किती संकेत वापरले आहेत हे पाहण्यापेक्षा ते कसे वापरले आहेत हे पाहणे अधिक महत्त्वाचे ठरते. सूर्य–कमलाचा संकेत किती जुना; पण पुत्रप्राप्तीचा कुंती-पांडूचा आनंद व पुत्रहीनतेचे माद्रीचे दुःख मुक्तेश्वर त्यातून " पंडु आनंददिनकरदीप्ती । प्रसन्नमुखपद्मिणी कुंती । माद्री तेथे कुमुद्वती । म्लानवक्त्र परि भासे " ( १।२७।२१५ ) असे अचूकपणे उभे करतात. " तुझी तुष्टी आणि आणि रूष्टी । दोन्ही तृणप्राय माझिये दृष्टीं । जैसी निर्धनिकाची मुष्टी । झांकली उघडी समान " ( २।११।४५ ) अशा शब्दांत शिशुपाल कृष्णाविषयीची आपली बेपर्वाई व्यक्तवितो तेव्हा ' झाकल्या मुठीच्या ' जुन्या संकेतात नवी चारूचमत्कृती अवतरते. अशा जुन्याच संकेतांच्या प्रस्तारावशेषात मुक्तेश्वरांनी नूतन भावनांची लेणी कशी कोरली आहेत ते पाहण्यासारखे आहे. संकेतांचा स्थितिशील वापर निराळा आणि प्रत्ययकारी जाणिवेने त्यात ओतलेले चैतन्य निराळे.

मुक्तेश्वरांच्या उपमानसृष्टीत निसर्ग बहराला आलेला आहे. शालीवन पिकविणारे हस्तोदक, मेघांनी प्राशन करूनही पूर्ण भरलेले सिंधुजळ, चंद्रसूर्याची प्रभा, कैलासाला भेट देणारा नीलजीमूत, यमुनाजळावर धावणारे जान्हवीचे धवल जल, वाऱ्याने लोटली जाणारी अभ्रे, शुष्कतडाग, खाकरतरू अशी निसर्गाची रंगरूपे टिपणारी ही उपमाने आहेत. त्यांच्या उपयोजनेने मुक्तेश्वरी काव्यास प्रसन्नता व सुभगता लाभली आहे.

प्राणिसृष्टीतूनही त्यांनी आपली उपमाने वेचली आहेत. धेनूच्या ' फलाहारावर ' उपोषण सोडणारा व्याघ्र, मत्स्यांचे निःसंतान मांडणारे बकानुष्ठान, सहस्रवाघांच्या गर्जनेने बोथरलेली हरिणी, विशाल द्रुमाला झगटणारा मदांध द्विरद अशी ही प्राणिसृष्टी भरगच्च आहे. " सर्पा ऐसे फुस्कारती । सिंहाऐसे हुंकारती । वृषभा ऐसे फुंपाटती । उफाळती इसाळे " ( २।७।३८ ) या पशुसृष्टीतील उपमानांनी योद्ध्यांचे आविर्भाव, नाद, कृती, गती आणि पाशवी बळ यांचा समर्थ प्रत्यय येतो. प्राणसृष्टीतील उपमाने वापरताना त्यांची गती, कृती, नाद व स्वभावविशेष मुक्तेश्वरांनी लक्षात घेतलेले

आहेत. वाङ्मयीन परंपरेने त्यात घातलेली वाढ-भरही ते जमेस धरताना दिसतात.

ब्रह्मबोधाने पारूषणारे द्वैत, प्रपंचवाताने पळणारी मोक्षमुद्रा, अज्ञास न दिसणारे विश्वब्रह्म, इषणात्रय लोटून आत्मसाधन करणारा विरक्त, संसारशत्रूचे कर्दन करणारे वैराग्य–विवेक–ज्ञान अशी आध्यात्मिक प्रकृतीची उपमाने मुक्तेश्वर प्राचुर्याने वापरतात. ती त्यांच्या भगव्या मनाची साक्ष आहे. त्यातून त्यांचा तत्त्वविचार नकळत प्रतिबिंबित झाला आहे. त्यांना अभिप्रेत असलेल्या भक्तिरसाचे पोषण होऊन वर्ण्यविषयाला पावित्र्य येताना दिसते. अशा उपमानांमुळे त्यांचा साधुसज्जनांचा श्रोतृवृन्द प्रसन्न होत असला पाहिजे.

पौराणिक संदर्भ असलेली उपमाने त्यांच्या उपमानसृष्टीचे महत्त्वाचे अंग आहे. शिव, शक्ती, इंद्र, राम, यम, शिबी, दधिची, जमदग्नी अशा व्यक्तिरेखा; स्यमंतमणी, वज्र, कौस्तुभ, अशा वस्तु; मदनदहनासाठी शंकराने तृतीयनेत्र उघडला असे प्रसंग उपमान म्हणून येतात. श्रीकृष्ण जरासंधपुत्र सहदेवास म्हणतो, " म्हणे, " तू प्रल्हादा-समान । आप्त होसी मज मित्रा " ( २।७।७३ ). प्रल्हादाप्रमाणे सहदेवही शत्रुपुत्र असून त्याच्याप्रमाणेच तोही देवकृपेचा वाटेकरी होईल, असे येथे सुचविण्यात आले आहे. पौराणिक संदर्भ असलेल्या समर्पक उपमानामुळे येथील उपमा अधिक अर्थघन झाली आहे. ही उपमाने मुक्तेश्वरांच्या पुराणव्यासंगाची साक्ष देतात. अशा उप-मानांनी वर्ण्य प्रसंग–व्यक्तीला परंपरेशी जोडता येते. त्याची तुल्यबलता व पावनता चितारता येते. त्यामुळे वर्ण्य विषयास अनेक संदर्भ प्राप्त होऊन त्याला वजन व गांभीर्य येते. अशा संदर्भसमृद्ध उपमानांचा धागा धरून मुक्तेश्वरांचा मोहक कल्पनाविलास कधी अवतरतो ( जसे, १।४४।५५-५६, २।९।१२२–१२५ ). पुराणकथांनी संस्कारित झालेले श्रोतृमानस त्यामुळे सुखावत असेल.

जीवनाच्या विविधांगातून मुक्तेश्वर आपली उपमाने निवडतात. काळजाचा वण शस्त्राने छेदणे, महारोग, कडू पण उपकारक औषधे, मरण आल्यावर निरुपयोगी होणारी औषधे अशी वैद्यकीय क्षेत्रातील उपमाने ते वापरतात. राजसभेस जिंकून विद्वत्तेच्या बळावर पूजा नेणारा पंडित, मूर्खांच्या ज्ञानगोष्टी, पंडितांची न थांबणारी उत्तर–प्रत्युत्तरे अशी त्यांची अध्ययनसंबद्ध उपमाने वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यांच्या जोडीला पावकी प्रवेश करणारी सती, म्लेंच्छांच्या महासनातील पशुसंहार, पंचाक्षरी, महेंद्रजाल निर्मिणारा भ्रमक, खंड देऊनही पितापुत्रांच्या हयातीत न फिटणारे ऋण, युद्धात हरलेला सुभट, मद्यप्याचे अपवित्र पात्र, धनाला वेढा घातलेला सर्प, शकुनारंभी उजवे फूल देणारा देव, शक्तीच्या अंगणीचे बस्त, दिव्याला न उतरणारा खोटा माणूस, भुईनळा, रायविनोदी, स्त्री–पुरुषांच्या रतिक्रीडा, नटामधील नारी–नर ही उपमाने लक्षात घेतली की त्यांच्या उपमानांचा व्याप-विस्तार किती मोठा आहे ते जाणवते. मुक्तेश्वर आपले दाखले सामाजिक जीवनातून उचलतात तेव्हा त्यांच्या मर्मग्राही अवलोकनाचे स्वरूप दृष्टीस पडते. रुसून मान मागणारे आप्त, आळवूनही शब्द न देणारी दारूप्रतिमा, मूर्खसभेचे

त्यांचे दर्शन कसे झाले ते वर्णिताना मात्र दूतांसहित यमधर्माचे (२।६।१०७) नेमके उपमान त्यांनी वापरले आहे.

प्रसंग-व्यक्ती आणि भाव यांची जाणीव मुक्तेश्वर जेव्हा विसरतात तेव्हा त्यांच्या उपमानयोजनेला अनौचित्य वा अश्लीलतेचा स्पर्श होतो. मुक्तेश्वरी रचनेत काही उपमाने पुनरुक्त होतात. जसे, अग्नी हे उपमान एकट्या सभापर्वात अठरा वेळा आले आहे. ज्ञानदेवांची उपमानेही पुनरुक्त होतात पण नवनव्या उपमेयांमुळे त्यांचे बदलते सौंदर्य जाणवत राहते. प्रतिभावंताला एकच विषय अनेक अंगांनी कसा भावतो याचे ते दर्शक असते. वेगवेगळ्या संदर्भात त्याच त्या कल्पनाचित्राचा दाब (एंफसिस) बदलून नवेपणा आणण्याची ज्ञानदेवांची किमया मुक्तेश्वरी रचनेत विरळ आहे.

कथाप्रसंगाचा धावता पट उलगडताना स्पष्ट शब्दांनी भाष्य न करता स्वतःच्या मनाचा कल मुक्तेश्वर अलंकारयोजनेतून सुचवितात. पाखंडी वेदांत्यांना जिंकावयाच्या वल्गना करतात तसे गर्जत देवांनी कृष्णार्जुनांवर हल्ला चढविला (१।४९।१२२); असे जेव्हा ते म्हणतात तेव्हा त्यांचे मनोगत आपोआपच स्पष्ट होते. दुष्यंताची नकारात्मक मनोऽवस्था त्यांनी अशाच अलंकारयोजनेतून (१।१६।१४२-१४५) व्यक्तविली आहे.

निवेदनाच्या ओघात उपमानांचे भान ठेवून त्यांचा कल्पनाविलास प्रकट होताना दिसतो. "बळें सर्पाचिया सदना। मंडूक वस्ती पावला" (२।७।१३) असा जरासंध तुच्छतेने बोलतो तेव्हा "मंडूक किंवा तिथे गरूड। आताचि होईल हा निवाड" (२।७।१४) असा कृष्ण तोडीस तोड जबाब देतो. उपमान स्थिर ठेवून उपमेय बदलल्याने हा संवाद किती खटकेबाज बनला आहे! चित्रसेन व दुर्योधन युद्धाचे "जैंवी कां पंडिताची वाणी। अव्युत्पन्ना नावरे" (३।१२।९६) असे तर चित्रसेन-अर्जुन युद्धाचे "जैशीं पंडितांची वचनें। एक एकां न तुटती" (३।१२।१४४) असे वर्णन ते करतात. त्यातून त्या त्या युद्धाचे तर चित्रण होतेच पण दुर्योधन व अर्जुन यांमधील फरकही लक्षात येतो.

नित्याच्या अवलोकनातील अनुभूतींना काव्यांतर्गत स्थान देण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे. "अंतरीं भ्रताराचें सुख। बाहेरी सासुरवासाचें दुःख। न वाटे तेवीं तुम्हां हरिख। भोग माझेनि चिंतेने" (२।१२।२९०) पांडवांना दिलेले हे कृष्णाचे आश्वासन. एकत्र कुटुंबात पतीच्या चोरट्या प्रेमळ कटाक्षाच्या जोरावर सासुरवासाचे सारे कष्ट मूकपणे झेलणाऱ्या सासुरवाशिणीचे मोहक चित्र त्यातून नकळत डोळ्यासमोर उभे राहते. देव-भक्त-लौकिक जग यांतील भावसंबंध या उपमेय-उपमानसंबंधातून उजळून निघतात. होमशाळेतील अन्नास शिवणारा कुत्रा या उपमानाने द्रौपदीला स्पर्श करणाऱ्या दुःशासनाची अपवित्रता प्रत्ययकारी होते. विशिष्ट सांस्कृतिक आशयाने भारल्याने हे उपमान आवाहक होते. पथावरील महाकर्दम व गर्ता यांनी कथेतील शंकाग्रस्त भागाची बोच बरोबर जाणवते. त्यामागील प्रत्यक्षानुभवाचे बळ येथे वापरले आहे. "जिव्हा केली पुस्तकपत्र" अशा अभिनवतेने नामभक्तीची कल्पना दिली जाते.

संवेदनाशील मनाने जीवनानुभव घेणे व त्याचे काव्यात रूपांतर करणे हा श्रेष्ठ कवींचा प्रतिभाधर्म मुक्तेश्वरांच्या ठायी आहे. समर्पक उपमा, मार्मिक दृष्टांत, हृद्य अतिशयोक्ती, वर्ण्यविषय उभा करणारी भव्य रुपके, मनोविस्तार करणाऱ्या नयनवोन्मेषी उत्प्रेक्षा हेच मुक्तेश्वरांचे अतिप्रिय अलंकार आहेत.

## ५. अलंकार : समारोप

सहज उपलब्धी, सांकेतिकता, संस्कृतिद्योतन व संदर्भमाहात्म्य यामुळे महाभारतातील अलंकार मुक्तेश्वर कधी जसेच्या तसे स्वीकारतात. कधी किंचित फेरफार करून मूळ अलंकारांना अधिक नेमकेपणा दिला जातो. समकाळात आवाहन हरवून बसलेली उपमाने ते गाळतात. त्याऐवजी प्रादेशिकता, प्रत्यक्षता, कविसंकेत व संबद्धता यांचा आधार घेऊन ते पर्यायी उपमाने वापरतात. त्यामुळे मूळ अलंकारांची विस्तारशील मांडणी होते. भिन्न अर्थांनी येणाऱ्या मूळ उपमानमालिकेला ते कधी एकाच अर्थाने बांधून घेतात. अशा प्रक्रियांत कधी मूळ अलंकारांचे प्रकारांतर होते किंवा क्वचित त्यांचा मूलार्थ निसटून जातो. मुळात ज्या संदर्भात अलंकार वापरले असतील तेथे मुक्तेश्वर कधी अलंकार योजना करीत नाहीत. याउलट म्हणजे मुळात नसताना अलंकार योजनाची प्रक्रिया वैपुल्याने घडते. मुक्तेश्वरांच्या अलंकारयोजनेत भारताचा आधार अल्प असून प्रायः ती स्वतंत्र स्वरूपाची आहे.

शब्दालंकारापेक्षां अर्थालंकाराकडे-त्यातही साम्याधिष्ठित अर्थालंकाराकडे-ते अधिक आकृष्ट होतात. संस्कृत अलंकारप्रकारांच्या संख्येकडे पाहता त्यांच्या अलंकारयोजनेत प्रकारवैविध्य सापेक्षतेने कमी असल्याचे दिसते. संस्कृत अलंकारशास्त्रातील मराठीत मुरलेले अलंकार ते वापरतात असे साधारणपणे म्हणता येईल. समर्पक उपमा, मार्मिक दृष्टांत, हृद्य अतिशयोक्ती, वर्ण्यविषय उभा करणारी भव्य रूपके, मनोविस्तार करणाऱ्या नवनवोन्मेषी उत्प्रेक्षा हेच मुक्तेश्वरांचे अतिप्रिय अलंकार आहेत. अलंकारांचा वापर ते प्राचुर्याने करतात. अलंकारांच्या काव्यपोषकतेवर त्यांची नितांत श्रद्धा आहे. त्यामुळे काही वेळा त्यांची प्रसंग-भावचित्रणे पूर्णपणे आलंकारिक रूपात प्रकट होतात.

उन्मेषी प्रतिभा, स्फुरणशील कल्पकता आणि अक्षय शब्दभांडार असल्याने रसावेशात त्यांचे अलंकार सहजतेने जन्म घेतात. त्यामागील कल्पकतेचा दाब आणि भावनेचा उद्रेक कधी जबरदस्त असतो आणि त्यामुळे काटेकोर शास्त्रनियमांचे काठ ओलांडून त्यांची सालंकृत वाणी पदन्यास करीत राहते. प्रतिपाद्याचे अनेक पैलू दाखविण्यासाठी सुट्या अलंकाराऐवजी मालारूपात अलंकार योजिण्याकडे त्यांचा अधिक कल असतो. वर्ण्यविषयाच्या अनेकांगाचा एकात्म प्रत्यय देण्यासाठी ते अलंकारसंकर किंवा संसृष्टी वापरतात. त्यांच्या कल्पकतेच्या सर्वगामित्वामुळे नाना रूपचित्रांची मालिका त्यांच्या हातून सहजच गुंफली जाते. मुक्तेश्वरी भारताच्या विस्ताराचे हेही एक कारण आहे. मात्र कल्पकतेच्या प्रदर्शनापेक्षा वर्णन-निवेदनास चित्रमयता देणे व भावाशयाला परिपुष्ट करणे हेच त्यांच्या अलंकारयोजनेचे उद्दिष्ट असते.

अनुप्रासाच्या मोहाने आलेली कृत्रिमता, उपमा-रूपक-दृष्टांताच्या मोहाने आलेले अनौचित्य अशा काही दोषांचे गालबोट त्यांच्या अलंकारयोजनेला कधी लागते, नाही असे नाही. प्रसंग-व्यक्ती-भाव यांचा संदर्भ विसरून उत्कटतेसाठी ते काही वेळा ज्या उपमानांची योजना करतात त्यामुळेही अनौचित्य येताना दिसते.

अशा काही अल्पदोषांना झाकाळून टाकणारे गुणवैभवही त्यांच्या अलंकारयोजनेत आहे. त्रयस्थ निवेदनात कथाप्रसंगाविषयीचा आपला अभिप्राय वा भावप्रतिक्रिया ते स्पष्ट वाच्यशब्दांनी सांगत नाहीत. अलंकारांच्या आश्रयाने आपल्या मनाचा कल ते सूचित करतात. प्रसंग आणि भाव यांना अनुसरून भावगर्भ उपमानांची ते योजना करतात. व्यक्तिमुखी वापरलेल्या अलंकारातील उपमाने व कल्पना त्या त्या व्यक्तीच्या प्रकृतीशी सुसंवादी ठेवण्याची दक्षता ते घेतात. उपमानांचे भान ठेवून त्यांचा कल्पना-विलास अनेक ओव्यांतून प्रकटतो. त्यामुळे त्यांच्या कथनात एकप्रकारची सलगता निर्माण होते. त्यांची उपमाने कधी पुनरूक्त होताना दिसतात. एकच उपमान बदलत्या उपमेयांमुळे वेगवेगळ्या अंगांनी दर्शविण्याची किमया त्यांच्या रचनेत प्रायः विरळ आहे. समर्पक, सूक्ष्म आणि वैचित्र्यपूर्ण असणाऱ्या त्यांच्या उपमानांचा व्याप यच्चयावत् चराचर सृष्टी, लौकिक आचार, सामाजिक श्रद्धा-संकेत, नानाविध कविसंकेत, आध्यात्मिक विचारविश्व आणि पौराणिक संदर्भ या सर्वांना व्यापणारा आहे. व्यापक अवलोकन, सहस्रनेत्री बहुश्रुतता व शोधक प्रतिभा यांनी ही उपमानसृष्टी घडविली आहे. त्यांचे अलंकार प्रतिपाद्य विषयाला स्पष्टार्थबोधक रूप देतात नि त्याच वेळी सौंदर्याचा सोनेरी स्पर्शही त्यांना होत असतो. विस्तार, वैचित्र्य, योजकता व समर्पकता ही त्यांच्या अलंकार-योजनेची वैशिष्ट्ये आहेत. त्यातील कल्पनासौंदर्य, प्रतीतिक्षमता व भावाशयपोषकता यामुळे ती प्रभावी झाली आहे. एतावता, मुक्तेश्वरांची अलंकारसृष्टी प्रकारदृष्ट्या परिमित असली तरी परिणामदृष्ट्या अपरिमित झाली आहे.

□ □ □

# सात ॥ निर्देशात्मकता

## १. निर्देशात्मकता : स्वरूप :

महाकाव्याच्या अनेकांगापैकी ज्ञानसंग्रह हेही एक अंग आहे. त्यामुळे निर्देशात्मकता (ॲल्युझिव्हनेस) हा त्या अभिव्यक्तीचा एक घटक ठरतो. आपल्या काव्यगत अनुभवांचे चित्रण करताना अन्य शास्त्रे, ज्ञान, कला, वाङ्मय यांच्या निर्देशाने कवी त्याला अधिक अर्थपूर्ण करतो. निर्देशात्मकतेसाठी आवश्यक असलेल्या व्युत्पन्नतेची चर्चा संस्कृत काव्यशास्त्रकारांनीही केली आहे. लोकावेक्षण, शास्त्रावेक्षण व अन्य काव्यावेक्षण यांनी प्राप्त होणारी निपुणता हे काव्यकारणाचे आवश्यक अंग आहे, अशी त्यांची धारणा होती. कवी सत्यसृष्टीचा चित्रकार आणि मानवी जीवनाचा भाष्यकार असतो. सत्यसृष्टीचे आणि मानवी जीवनाचे त्याचे ज्ञान जितके खोल, अनुभव जितका व्यापक, तितके त्याचे काव्य प्रत्ययकारी होण्याची शक्यता अधिक.

निर्देशात्मकता हा व्युत्पत्तीच्या पुढचा टप्पा आहे. व्युत्पन्नतेचे कल्पक उपयोजन येथे अभिप्रेत आहे. ज्ञानाच्या संपादनापेक्षा त्याचा जिवंत प्रत्यय देणे तीत अधिक महत्वाचे आहे. ज्ञानविषय जेव्हा अनुभवप्रतीती म्हणून येतात तेव्हा सूक्ष्म व सूचक निर्देशात्मकता निर्माण होते. आलंकारिक उपमान, प्रतिमा आणि स्पष्ट उल्लेख अशा रूपांनी ती वाङ्मयात अवतरते. संबद्ध आशयाला भरघोस करणे, त्याला अर्थपूर्ण करणे, प्रकाशित करणे हेच अशा निर्देशात्मकतेचे उद्दिष्ट असते. तिच्यामुळे कवितेत जशी संदर्भसूचकता येते तशी दुर्बोधता येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तरीही अनुभवाला आवाहक व चित्रणाला वैशिष्ट्यपूर्ण बनविण्याचे सामर्थ्य तीत असते. तिच्यातून कवीची व्युत्पन्नता व कल्पकता आविष्कृत होते.

## २. प्रत्यक्ष निर्देश

निरनिराळ्या निर्देशांनी आपल्या पात्रांचा परिसर, त्यांची संस्कृती साकार करण्याचा मुक्तेश्वर प्रयत्न करतात.

'चतुर्दश भुवन' (२।२।४४) किंवा मेरू पृथ्वी द्वीपें खंडें। स्वर्ग पाताळ निवाडें। भूगोल सप्तांकित उदंडें (२।१५।२२९) यांसारख्या निर्देशातून मुक्तेश्वरकालीन भूगोलविषयक समजुती[1] प्रकट होतात. तेलंग, मल्याळ, सिंहल, कोशल, विदर्भ, गौड, गुर्जर, बंगाल (२।१५।२२५) यांचे भौगोलिक निर्देश मात्र वास्तवदर्शक

१. मुक्तेश्वरांच्या नलाने दमयंतीला सांगितलेला विदर्भाचा रस्ता (३।७।७७-८०) चुकल्याची नोंद चिं. वि. वैद्य ("निबंध आणि भाषणे," पृ. १४०) करतात.

आहेत. " मारवाडीं लागोनि उष्ण । प्राण जातां मागे जीवन " (१।२७।१६३) किंवा रस्त्यातील चिखलात रुतलेली गाडी यासारख्या निर्देशांतूनही वास्तवता प्रतीत होते. देश, दुर्गगड, गिरिवर, कोश, पल्ली, राजागार, खेड, खेडके, मंडप, ग्राम, पेटा, नगरे, पुरे, पाटणे, द्वीप, बंदर असा ग्रामप्रकारांचा (२।१४।१३९-१४३) वैशिष्ट्यपूर्ण तपशील ते देतात.

या 'नानादेशींच्या मनुजाकृतींचा' ते साक्षेपाने उल्लेख करतात. " ताम्रमुख श्याममुख । घोडमुख श्वानमुख । शूकरमुख वानरमुख । ऋक्षमुख मानव " (२।१२।१५२) हा परदेशी सागरी मानवांचा मिस्किल आलंकारिक निर्देश असावा काय ? एका फ्रेंच चित्रकाराने अशा लोकांच्या काढलेल्या चित्रांचा संग्रह[२] तंजावरच्या सरस्वतीमहालात असून त्यापैकी काही चित्रें प्रसिद्धही झाली आहेत. कालविपर्यास पत्करूनही जाबी, जंगी, फिरंगी, इंग्रज, मलबार, या सागरद्वीपवासी म्लेंच्छयोनींचा किंवा पल्हव, बर्बर, किरात, यवन, शक, " पारसीभासिक ताम्रमुख । आरब हुरमुज काळमुख । रूमशाम घोडमुख । नाट पाट पुलिंद " (२।८।१५६) यांचा उल्लेख केला आहे. तो कुतूहलजनक असून मुक्तेश्वरांच्या अवलोकनाची व्यापकता व बहुविधता दाखविणारा आहे.

जनजीवनाला आकार देणाऱ्या विविध संस्कारांचे स्वरूप प्रसंगसंदर्भात प्रकट करून ते त्याभोवतीची संस्कृती चितारतात. सोळा संस्कार (१।२५।७४-७६) पित्याचे सहा प्रकार (४।७।७०-७१), मनुस्मृतीच्या आधाराने येणारे पुत्रांचे प्रकार (१।१६।७८-८०, १।२७।८७-९४), द्वादश गुरू (१।१७।१००-११६), अष्टविवाह (१।१६।२४-३०, ४।८), अंत्यसंस्कार (१।२८।७७-९९) यांचा शास्त्रीय तपशील ते पुरवितात. विविध भोज्य पदार्थांच्या तपशीलाच्या समृद्धीने (१।२९।५७-६४, २।९।९७-१३९, ३।११।११५-१४४, ४।८।५६-९६) त्यांच्या पंक्तिवर्णनास प्रत्यक्षता येते. प्रसिद्ध वस्त्रांच्या पेठा, वस्त्रांचा पोत, सूत, काठ, रंगच्छटा, सजावट; तीतील चित्रकुसरी यांचे बारकावे टिपून ते वस्त्रांचे विविधरंगी विश्व (२।१५।१९६-२४३) सजीव करतात. स्त्री-पुरुषांची द्वादशभूषणे (२।१०।६,८) ते उल्लेखितात. " मेघ मच्छ सर्प हस्ती । वंश शंख वराह शुक्ती । " (२।२।१७) अशा अष्टमुक्ताफळांच्या जाती पारंपरिक समजुतीनुसार (पहा, कुमारसंभव, सर्ग १, श्लोक ६, टीका) ते वर्णितात. विविध शस्त्रे (१।३१।३७-३८, ३।१०।१८४-१८५), देशोदेशींच्या युद्धपद्धती (१।३१।५९-६०), कुस्त्यांचे पाचपेच (१।३७।२०-५७, १।३८।६९-८८, ३।२।३९-६८, ४।२।५३-८०) त्यांची एतद्विषयक रुची दर्शवितात. अशा अनेकानेक निर्देशांनी त्यांच्या पात्रांचे लौकिक जीवन समूर्त होते.

ही राजपुरुषांची कथा आहे. त्यामुळे राजपुरुषांचे गमनागमन, चर्चा-खलबते,

---

२. एस. गोपालन, " सरस्वतीमहालाचे धावते दर्शन " तंजावर, १९६० पृ. ९.

शिष्टाचार आणि क्षात्रधर्मोचित विचार मुक्तेश्वरांनी मूलाधारे यथायोग्य चित्रिले आहेत. कणिकनीती (१।३३) व नारदनीती (२।३) मधून राजनीतीचे विध्वंसक दर्शन ते घडवितात. शिक्षांचे प्रकार (१।१९।१२३-१२४, ५।७।५८) व आदर्श राज्यव्यवस्थेची वर्णने (आदि. १०।१२-१८, ११।९५-१००, १५।४-२९) यातून राज्ययंत्रणेचे रूप स्पष्ट होते.

राज्यसंस्थेप्रमाणेच धर्मसंस्थाही त्यांनी अध्यात्मविचारासह अनेकांगांनी उभी केली आहे. विविध उपासना, पंथ, तत्त्वज्ञान-शाखा यांचे त्यांच्या लकबींसह व वादविवादांचे युक्तिवादासह दर्शन ते कण्वाश्रमात (१।१५।७४-९३) घडवितात. विविध प्रदेशांतील ब्रह्मवृंदांचा त्यांच्याजवळील सामानासह ते निर्देश (३।१।२७-२८, ३।११।४७) करतात. यज्ञकुंड व ऋत्विज यांचा शास्त्रीय तपशील (१।१०।७४-७५) सांगतात. त्याबरोबरच मंत्रदैवत जागविणाऱ्या मांत्रिकांची स्थळेही (१।१०।६३-६४) लक्षितात. वैदिक, बौद्ध, शैव, शाक्त, सांख्य आदी अध्यात्म क्षेत्रातील विविध विचारधारांचा उल्लेख (४।१।६७-८०) ते करतात. विविध तत्त्वशाखा, सांप्रदायिक, देवता, तात्त्विक संकल्पना, आध्यात्मिक अवस्था यांच्या विपुल निर्देशांमुळे संपूर्ण काव्यावर अलौकिकाची छटा पसरते. त्याचे मूल्यात्मक स्वरूप आणि भक्तिप्राधान्य यांना उठाव मिळतो. कथाप्रसंगांना पावनता येते आणि नृपमुनींची पार्थिव कथा ऐकतानाही तिच्यामागची आध्यत्मिक बैठक जाणवत राहते.

वेद, शास्त्र, स्मृती, मंत्र, यंत्र, उपासनातंत्र, चौदा विद्या, उपनिषदे, पुराणेतिहास साहित्य, नाटक, संगीत, गीत, नेत्र-नाद-कर संकेत, गूढ लिपी, भाषा, शस्त्रनैपुण्य अशा शस्त्र-शास्त्र-कला ज्ञानाचा व्यापक पसारा राजपुत्रांच्या शिक्षणवर्णनात (१।२२।७६-८२) त्यांनी मांडिला आहे. विविध शास्त्रांचे, त्यातील तपशीलाचे संदर्भ त्यांच्या लेखनात पारिभाषिक शब्दांतून येतात. त्यांच्या सभावर्णनांना वास्तुशास्त्रीय बैठक असते. "ध्वज धूम शुनक वृष । खर कुंजर ध्वांक्ष मृगेश । गृहीं रक्षिजे विशेष । वास्तुविधानीं बोलिजे ॥ २१ ॥ अष्ट आय साधिले निगुतीं...." (२।२।२१-२२) यासारख्या ओळींचा अर्थ शास्त्रीय जाणकारी असल्याशिवाय कळणार नाही. चतुरस्र क्षेत्रफळास आठाने भागून शेष उरते त्यास आय म्हणतात. वास्तुनिर्माण कार्यात विषमस्थानी इष्ट आय कल्पितात.[३] मुक्तेश्वरांनी अष्ट आयांची नावे क्रमांतराने पण बरोबर दिली आहेत. या वास्तुशास्त्रीय कल्पनांनी त्यांच्या सभावर्णनांना अधिकृतता येते. कृष्णवर्णनात "ध्वज अंकुश वज्र पद्में । उर्ध्व रेखा अति उत्तमें" (२।१०।४४) अशी सामुद्रिक चिन्हे ते साक्षेपाने उल्लेखितात. 'योषितश्च मनोरमाः" (सभा २।४५।१०)

---

३. ध्वजधूमसिंहकुक्कुरवृषखरगजवायसा अष्टौ । आयास्तेषां विषमः श्रेष्ठस्तं कल्पयेदिष्टम् ॥— मुहूर्तमाला, वास्तुप्रकरण, श्लोक ७ पृ. १९५–मुक्तेश्वरकृत सभापर्व (काव्यसंग्रह-प्रत); तळटीप ३ पृ. १० वरून.

या मूलवर्णनाला ‘ पद्मिनी ’ ( २।१२।१६७ व २०५ ) अशा कामशास्त्रातील एका प्रकाराच्या उल्लेखाने ते विशिष्टता देतात. शकुंतला वर्णनात सात रक्तवर्णी व सहा उन्नत स्थाने या स्त्रीलक्षणांचे व्युत्पत्तिजन्य स्पष्टीकरण ( १।१६।१८–२० ) ते करतात. त्यामुळे त्या मनोरम योषितांच्या सौंदर्याला कामोत्तेजक आवाहन येते.” पद्मिनी जातीच्या तरुणांगी । नित्यनूतन पुरुषासंगीं । सुरतानंदीं अष्टभोगीं । स्वेच्छानंदे क्रीडती ” ( २।१२।११३) ही ओवी त्या दृष्टीने पाहण्यासारखी आहे. तिच्यातील ‘ अष्टभोगी ’ हा शब्द पारिभाषिक असून त्यातून सुगंध, वनिता, वसन, गायन, तांबूल, भोजन, शय्या, द्रव्य हे अष्टभोग सूचित होतात. अशा कामशास्त्रीय निर्देशाने शृंगार अधिक उत्तान व भोगवर्णन अधिक विलासी होते.

विविध कलांचे संदर्भ त्यांच्या लेखनात येतात. “ साहित्य नाटकें संगीत गीत ” ( १।२५।८० ) अशा ‘ कळा सकळ ’ त्यांनी राजपुत्रांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट केल्या आहेत. व्यासोच्छिष्टाचा ग्रास लाधलेल्या ‘ जीर्णकवीं ’चा ते उल्लेख करतात. मयसभेत रामायण–महाभारत, भागवत, शक्ती आख्याने यांतील चित्रे चितारल्याचे सांगून ( २।२।४९ ) त्यांनी या कवींना उपलब्ध असलेला वाङ्मयसंभार दर्शविला आहे. सप्तस्वर, सुताले नृत्य ( २।२।३४ ) असा नृत्यगायनाचा उल्लेख मयसभेतील ‘ हस्तलाघवकळेची थोरी ’ वर्णिताना येतो. धर्मराजाच्या दासी “ जाणती चतुष्षष्टी कळा । नृत्यगायनीं परमकुशळा ” २।१४।६४ ) अशा कलावती असतात. गंधर्व-अप्सरांचे मृदुंग तालावरील सुस्वर गायन ते उल्लेखितात विविध वाद्यांचा निर्देशही ( ३।१२।५८-५९ ) ते करतात. संगीतापेक्षा चित्रकलेचे संदर्भ वैपुल्याने येतात. मयसभेतील रंगसज्जा त्यांनी निरनिराळ्या चित्रांनी सजविली आहे. येथील दृश्यवर्णनात रंगसंगतीचे भान त्यांनी राखले आहे. (२।२।२७-२८,४२-५०,६३-६४) द्रौपदीवस्त्रावरील चित्रवर्णनात ( २।१५।२२७-२३४ ) आकार, आकृती, परिसर यांचे विशेष अवधान सांभाळलेले दिसते. संगीत–चित्र या कलांप्रमाणेच उत्सवप्रसंगी हटकून उपस्थित राहणाऱ्या कलावंतांचाही त्यांनी आवर्जून निर्देश केला आहे. “ मागध सूत वैतालिका । नटवे नाचती परिहासक । गायक वादक भाट कथक । इंद्रजाळ बहुरूपी ॥ ८८ ॥ वैद्य वैदिक पुराणिक । शास्त्री पंडित ज्योतिषी गणक । सिद्धांतवेत्ते तत्त्वबोधक । अहोरात्र जवळिके “ ( २।२।८८–८९ ) यातील व्यावसायिकांची व कलाकारांची विविधता पाहण्यासारखी आहे. त्यातून मयसभोत्सवाचे रंजक व उद्बोधक स्वरूप व्यक्त होते. विविध कलांचे व कलाकारांचे हे निर्देश मुक्तेश्वरांच्या कलाचतुर मनाची साक्ष असून वर्ण्यविषयाला सुसंस्कृत रूप देणारे आहेत.

## २. आलंकारिक निर्देश

उपमेय व उपमान यातील साम्य-विरोधदर्शनासाठी, बिंब-प्रतिबिंबभावासाठी, अभेदभावासाठी वा अन्य संबंध सुचविण्यासाठी मुक्तेश्वर विविध क्षेत्रीय निर्देश करतात. अशी आलंकारिक निर्देशात्मकता काहीशी स्थूल स्वरूपाची असली तरी मुक्तेश्वरांनी ती

मोठ्या प्रभावीपणे वापरली आहे. अशा निर्देशांचा काहीसा विचार त्यांच्या उपमान-सृष्टीच्या निरीक्षणात मागे केला आहे.

अशा निर्देशांचा एक गट अध्यात्मक्षेत्रीय आहे. कृष्णचरणाजवळ योग्यांची चित्ते क्षेत्रसंन्यासाने राहिल्याचे ( २।१५।१७३ ) मुक्तेश्वर सांगतात. क्षेत्रसंन्यास म्हणजे पुण्यक्षेत्री राहून हे क्षेत्र सोडून मरेपर्यंत कोठेही जायचे नाही, असा केलेला निमय हा अर्थ लक्षात घेतला म्हणजे कृष्णचरणाची तीर्थरूपता, वेध लावण्याचे सामर्थ्य आणि योग्यांची निष्ठा सूचित होऊ लागते. अशा कल्पनांनी त्यांच्या कथेला अलौकिकाचे अर्थवलय लाभते.

पौराणिक वस्तु, व्यक्ती व कथा यांचा आलंकारिक निर्देशासाठी मुक्तेश्वरांनी वैपुल्याने व रसपोषक वापर केला आहे. द्रौपदीने वस्त्रहरणप्रसंगी केलेल्या धाव्यातील पौराणिक निर्देशांचा[४] वापर जाणीवपूर्वक वाटतो. त्यामुळे भक्तहृदयाच्या भावनेने भिजलेल्या आर्त टाहोच्या पार्श्वभूमीवर सत्-असत्चा सनातन संघर्ष आणि लीलाविग्रही भगवंताच्या अवतारलीलेचे सातत्य मनात एकवटत राहते. द्रौपदीच्या व्याकुळ आर्ततेच्या सुरंगी छटा या संमिश्र भावांवर पसरत राहतात. हे सारे कथानिर्देश द्रौपदीच्या व्यथाव्याकुळ अनुभवाचे भाग बनतात. त्यांना रसमयता लाभते. शब्दांना व्यंजनक्षमता येते आणि ध्वन्यर्थाचे व्यापक आशयविश्व उलगडत राहते. त्यामुळे वस्त्रहरणप्रसंगाची आवाहकता वाढते आणि परंपरेचे गांभीर्य व वजन लाभते. मुक्तेश्वरी प्रतिभेची भव्योदात्त झेप आणि अभिजाततेचे ऐश्वर्य अशा वेळी झळाळून उठते. पौराणिक निर्देशांनी ही किमया

४. या निर्देशांचे मर्म पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

| पुराणकथानिर्देश | सूचित देवविषय | सूचित द्रौपदीविशेष |
|---|---|---|
| पिंगला वेश्या २।१५।१२६ | भावभुकेला | नामश्रद्धा |
| अहल्या २।१५।१२७ | पतितपावन | पतिता |
| महिषासुरमर्दिनी २।१५।१३२ | दुष्टदंडन | छलन |
| नक्र-गजेंद्र २।१५।१३३ | आर्तरक्षण | संकटग्रस्त |
| शंखासुर २।१५।१३६–१३७ | दुष्टदंडन | असंतोष |
| कूर्मावतार २।१५।१३८ | दृढता | अस्थिरता |
| पृथ्वी-वराह २।१५।१३९ | उद्धरणशीलता | पावित्र्यनाश |
| प्रल्हाद-नरसिंह २।१५।१४० | भक्तवत्सलता | छलन |
| बळी-वामन २।१५।१४१ | बळीबंधनक्षमता | असहायता |
| जमदग्नी-रेणुका-भार्गव २।१५।१४२ | प्रतिशोधाने दुःखमुक्ती | प्रतिशोध वांछा |
| सीता-रावण-राम २।१५।१४४ | स्त्री-पावित्र्यरक्षण | पावित्र्यनाशभय |
| कालियामर्दन-कृष्ण २।१५।१४५ | दुष्टदलन | संकटग्रस्त |
| गोवर्धन-गिरिधारी २।१५।१४९ | संरक्षकता | संकटांचा वर्षाव |

मुक्तेश्वर पुष्कळदा साधतात, हे मागे दर्शविले आहेच. राम, शिव, शक्ती या सातत्याने आवृत्त होणाऱ्या पौराणिक निर्देशांचा विचारही ' शतमुखरावणवधाख्याना 'च्या संदर्भात मागे आलाच आहे.

## ४. समारोप

ज्ञानसंग्रह हे महाकाव्याचे अंग निर्देशात्मकता या अभिव्यक्तिविशेषांतून आविष्कृत होते. वर्ण्य विषयाच्या मागे अन्य-ज्ञान-कला शास्त्रातील संदर्भ उभा करावयाचा तर कवीजवळ बहुश्रुतता हवी. तशी ती मुक्तेश्वरांजवळ होती. पुराणवाङ्मय, अभिजात संस्कृत काव्य-नाटके, न्याय-तर्क-मीमांसादी शास्त्रे आणि ज्ञानदेव-एकनाथादी ' प्राकृतकविश्वराचार्य ' त्यांना चांगलेच परिचित होते. या ज्ञानाला देशाटनाचा, मार्मिक अवलोकनाचा जिवंत स्पर्श होता. त्यामुळे आपल्या व्युत्पन्नतेचे कल्पक उपयोजन ते करू शकले.

लोकजीवनाला अनेकांगांनी साकार करणाऱ्या वस्तू, शास्त्रे, कला व सांस्कृतिक मूल्यविचार यांच्या प्रत्यक्ष निर्देशांनी त्यांचे कथन भरगच्च, जिवंत व प्रत्यक्षमय होते. त्यात वैचित्र्य, वास्तवाभिमुखता व अधिकृतता येते.

आध्यात्मिक कल्पना व पौराणिक कथासंदर्भ देणारी आलंकारिक निर्देशात्मकता अधिक प्रभावी आहे. त्यामुळे वर्ण्यविषयाला अर्थपूर्णता येऊन त्याचा व्याप वाढताना दिसतो. समतुल्य संदर्भांनी प्रसंगांची आवाहनक्षमता वाढते. भाव ठसठशीत होतात. व्यक्तिरेखांना मूल्यात्मक बळ मिळते आणि मध्यवर्ती कथासूत्र उठावदार होते. पारंपरिक पुराणकथांवर पोसलेल्या त्यांच्या श्रोतृमानसाला अशा निर्देशांचे आवाहन त्वरित होत असणार.

पारिभाषिक शब्दयोजना व अपरिचित कथासंदर्भ त्यामुळे क्वचित कोठे येणारी दुर्बोधता सोडली तर निर्देशात्मकतेने त्यांच्या भारताचे गुणवैभव वाढविले आहे. ती काहीशी स्थूल असली तरी प्रभावी आहे. तिच्या रूपाने महाभारताचे ज्ञानात्मक रूप त्यांनी जपले आहे. यादृष्टीने त्यांच्या भारतातील कालविपर्यासाची, तपशीलाच्या अतिरेकाची व पांडित्याच्या अतिरेकाची संगती लाविता येईल.

□ □ □

# आठ ॥ भाषाशैली

## १. भाषाशैली : स्वरूपविवेचन

काव्य ही शब्दानुबंधात्मक कला असल्याने भाषा हे तिचे माध्यमही पंचेंद्रियांचा प्रत्यय देणारे व भावसंवाहक असले पाहिजे. काव्याच्या भाषेविषयी काही आदर्शात्मक संकेत सांगता येत नसले तरी काव्यानुभवाची मागणी पुरविणारी ती असावी, असे आग्रहाने म्हणता येईल. लेखकाला उपलब्ध असलेल्या भाषेचे स्वरूप, त्या काळातील वाङ्मयात होणारे तिचे उपयोजन, आविष्कृत करावयाच्या अनुभवाचे स्वरूप, तो ज्यातून आविष्कृत होणार त्या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप आणि लेखकाचे व्यक्तिमत्व अशा विविध घटकांनी त्याच्या भाषेचे रूप सिद्ध होते.

एखादी साहित्यकृती ज्या रूपात आपल्या समोर येते त्या समग्र रूपाला अभिव्यक्ती म्हटले तर तिच्या काही विशेषांना शैली म्हणता येईल. पौर्वात्य ' रीती ' व पाश्चात्य ' स्टाईल 'पेक्षा ' शैली ' हा शब्द मर्यादित अर्थाने वापरला जातो. " प्रत्येक लिखाणात काही तरी आशय व्यक्त केलेला असतो. हे जे व्यक्त करणे, ही जी अभिव्यक्ती, हे जे निवेदन त्याच्या पद्धतीची अंगे-उपांगे म्हणजे शैली. शब्दांची निवडक योजना, निरनिराळ्या अलंकारांचा उपयोग इत्यादी शैलीत अंतर्भूत होणाऱ्या गोष्टी ह्या साधनात्मक असतात. लेखकाला जो आशय व्यक्त करावयाचा असतो, तो व्यक्त करण्याकरिता ह्या गोष्टींचा साधन म्हणून उपयोग केला जातो. अशा तऱ्हेच्या शैलीचे मुख्य कार्य एकच असते; ते हे की आशयाच्या किंवा अनुभवाच्या अभिव्यक्तीत इंद्रियगोचर अशी विवक्षितता यावी."[१] शैलीच्या एवढ्याच अर्थाने मुक्तेश्वरी भारताची पाहणी येथे अभिप्रेत आहे. शब्द, वाक्यरचना, अलंकार यांनीच कलाकृतीचे अवयव तयार होतात. तिचे दर्शनी रूप शब्दरूप असल्याने भाषेची चिकित्सा कवितेच्या मूल्यमापनाशी निकटत्वाने संबद्ध असते. संवाद, वर्णन, अलंकार, निर्देशात्मकता यांच्या संदर्भात मुक्तेश्वरी कवितेचा असा विचार मागे आला आहे. येथे त्याशिवाय आणखी काही शैलीविशेषांचा शोध घ्यावयाचा आहे.

## २. पूर्वपरंपरेचा शैली व अभिव्यक्तिविशेषांवरील परिणाम

मुक्तेश्वरांच्या शैलीवर पूर्वकवींचे ठसे उमटले आहेत. रसिक आणि व्युत्पन्न

---

१. बा. सी. मर्ढेकर, सौंदर्य आणि साहित्य, मुंबई, दु. आ. १९६०, पृ. ११४–११५.

प्रतिभावंताबाबत ही सहज घडणारी प्रक्रिया आहे. त्यात 'जीर्णकवीं 'कडून 'एकएक अक्षरांची भीक' मागण्यात कमीपणा न मानणाऱ्या मुक्तेश्वरांसारख्या 'सर्वज्ञ कविनायका'च्या बाबतीत तर ती अधिकच सहज आहे.

व्यासाभारत समोर असल्याने त्यातील शब्दसृष्टीचा काही अंश मुक्तेश्वरी भारतात उतरणे स्वाभाविक आहे. उत्सवसंकेत, किष्कु, निष्क, तीर्थ असे मुळातील विशिष्टार्थक व साभिप्राय वापरलेले शब्द ते कायम ठेवतात. मुळातील शब्द ते कधी वेगळ्या संदर्भात वापरतात. अक्षांच्या संदर्भात 'हृदयज्ञः' ( मभा. २।४५।३७) असा शकुनी स्वतःचा उल्लेख करतो. त्याचा ठसा 'हृदय जाणे अक्षांचे' ( २।१४।११ ) या मुक्तेश्वरी शकुनीने केलेल्या धर्मवर्णनात उमटला आहे. वैशंपायनाच्या निवेदनात धृतराष्ट्रासाठी आलेला 'प्रज्ञाचक्षु' ( मभा. २।४५।२ ) हा शब्द ते शकुनीमुखी धृतराष्ट्रास उद्देशून संबोधनासारखा ( २।१२।१०७ ) वापरतात. 'बृहस्पतीने इंद्रला जे शिकविले ते विदुराला अवगत आहे.'' ( मभा. २।४६।९-१० ) असे धृतराष्ट्र दुर्योधनास सांगतो. मुक्तेश्वरांनी तेथे त्याचा वापर केला नाही. पण पुढे 'विदुर जैसा सुरगुरू' ( २।१४।२ ) असा निर्देश केला आहे. महाभारती कल्पना हा मुक्तेश्वरी शब्दसिद्धीचा एक मार्ग आहे. भारती शब्दसृष्टी कमीअधिक प्रमाणात मुक्तेश्वरी भारतात प्रतिबिंबित झाली आहे.

संस्कृत विदग्ध काव्यनाट्यातील रमणीय शब्द-कल्पनांचा गंध[२] संक्षेपरामायणाप्रमाणे मुक्तेश्वरी भारतातही दरवळत आहे. स्थलवर्णनात पुराणकथासंदर्भ गुंफून श्रोतृमानसातील

---

२. (१) वागार्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये ।
जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ ॥ – रघुवंश १।१
अर्थ वाचा वाचेंत अर्थ । ऐसा शिवशक्ति सांगात ॥ १।४।११९

(२) पयोधरीभूत चतुःसमुद्रां जुगोप गोरूपधरामिवोर्वीम् । —रघुवंश.
धराकामधेनुचे स्तन । चहूं दिशांचे भूपाळ जाण
त्यांचे करूनिया दोहन । करभाररूपे गोरस ॥ —मुभा २।७।१०१

(३) कलिंगकन्या मथुरांगतापि गंगोर्मिसंसक्तजलेव भाति । —रघुवंश, सर्ग ६
यमुनाजळावरी जान्हवी जळ । धांवे जैसें शुद्ध धवळ ॥ -मुभा २।१०।६७

(४) अनपायिनी संश्रयद्रुमे गजभग्ने पतनाय वल्लरी । — कुमारसंभव.
जैसी उलथे कर्पूरकर्दळी । मत्त करीनें ताडितां ॥ — मुभा २।१५।३५

(५) अहो दुरंता बलवंद्विरोधिता । – कीरातार्जुनीय ( भारवी )
दाटोनि बळिष्ठासीं स्पर्धा । करितां पाविजे परम आपदा ॥
—मुभा २।१२।१२८

(६) सोन्याच्या मेरूपर्वताची खांडे करून याचकांना दिली नाहीत, अशी श्रीहर्षाच्या नलाला खंत आहे. "उभय दिशाद्वय पारडां । उत्तरमेरू

संस्कारांना चाळविण्याची कालिदास पद्धती मुक्तेश्वर वापरतात. कालिदास, भारवी, माघ आणि श्रीहर्ष हे सारेच 'व्यासांचा ग्रास लाधलेले जीर्णकवी.' त्यांच्या मुखीची उच्छिष्ट शिते वेचण्यात मुक्तेश्वर धन्य होतात. या संस्कृत विदग्ध महाकवींनाच मुक्तेश्वरांनी 'जीर्णकवी' (२।५।१७५) म्हटले असावे, असे वाटण्याइतपत साम्यस्थळे मुक्तेश्वरी रचनेत विखुरलेली आहेत. तथापि अनुकरण म्हणण्यासारखे त्यांचे स्वरूप वा प्रमाण नाही. विदग्धकाव्याच्या वाचनसंस्काराचे रसिक प्रतिभावंताच्या मनावर उमटलेले हे ठसे आपाततः लेखनात उतरलेले आहेत.

'जीर्णकवीं'बरोबर 'प्राकृतकविश्वराचार्यां'चाही ठसा त्यांच्या शैलीवर आहे. परंपरागत तपशीलाचा स्वीकार करताना जनाबाई, नामा पाठक यांची शब्दरचनाही नकळत उचलली आहे.[3] वोजा, पावास, नावेक, केणे, अळुमाळ, परौते, पाटणा, पढियंती, मांदी,

---

घातला धोंडा । संपदा जोखोनियां दडदडा । याचका उजू सांडिल्या ॥ (२।५।२३) असे मुक्तेश्वरांच्या हरिश्चंद्रानेमात्र ते करून टाकले आहे!

(७) सा निर्मिता विश्वसृजा प्रयत्नादेकस्थसौंदर्यदिदृक्षयैव । — कुमारसंभव
दमयंतीची अपर प्रतिमा । करूं भावितां कमळजन्मा
निर्मूं न शके जितें ब्रह्मा । दुजें रूप न करवे ॥ ३।६।१३.

३. (१) तुज करीन पट्ट राणी । – (जनाबाई) होई अंतुरी पट्टाची । –(मुभा २।१५।१०९)

(२) येउन बैसे जानुवरी । (नामापाठक व. १२४) येउन बैसें मांडीवरी –(मुभा २।१५।१०९)

(३) कोपे वन्ही खवळली । (नापा. व. १२४) हृदयी धडकला क्रोधाग्नी –(मुभा २।१५।११०)

(४) जळो जळो तुझी वाणी । विष्ठा भक्षिसी कां जनी ॥ – जनाबाई.
म्हणे "दुरात्मिया ही वाणी । जळो तुझी पापिष्ठा ॥ – मुभा २।१५।११०

(५) वीज कडाडोनी माथां । पडो दुष्टा तुझ्या आता ॥ – जनाबाई.
पडो वीजु न लागता वेळु । – नामा पाठक, वस्त्रहरण १२७.
प्रळयवीज माथां पडो । – मुभा २।१५।१११.

(६) दृष्टि झडो रे पापिया । – जनाबाई.
तुझे द्रुस्टी लागो रे इंगळु । – नामा पाठक, व. १२७.
दृष्टि जळोनि जिव्हा झडो । – मुभा २।१५।१११.

(७) प्राणें विघडो तुझी काया । – (जनाबाई) कायेपासोन प्राण विघडो –(मुभा २।१५।१११)

आराणूक असे ज्ञानदेवीतील कितीतरी शब्द मुक्तेश्वरी भारतात भेटतात समान शब्द-संग्रह असलेली एकच भाषा ते दोघे वापरीत होते, हे त्याचे एक कारण. तथापि ‘ दीपकलिका ’सारखा लावण्याची नव्हाळी मिरविणारा शब्द मुक्तेश्वर बरोबर उचलताना दिसतात, तेव्हा त्यात परस्परप्रभावाची साक्ष पटल्याशिवाय राहत नाही. शब्दांची निवड व समज, अलंकार मालारूपात वापरण्याकडे कल, दृष्टांत-रूपकांची आवडी, विस्ताराची गोडी, भावचित्रण पूर्ण अलंकृत करणे, परतत्त्वस्पृष्ट रसात्मकता हे ज्ञानेश–मुक्तेशांना सांधणारे काही अनुबंध. एकनाथांचा लौकिकच नव्हे तर वाङ्मयीन वारसाही मुक्तेश्वरांनी संभाळला आहे. नाथांचा तपशील, शब्द–कल्पना मुक्तेश्वर सहजतेने उचलतात. आर्षकाव्याच्या मराठीकरणाची, प्रेरणा, कथेला मिळणारे भाष्यात्म वळण, मूलग्रंथाशिवाय अन्य ग्रंथांचा आधार घेण्याची प्रवृत्ती, विस्तारप्रवृत्ती, लौकिक व अलौकिक अशा द्विविध पातळीवरील कथाविकसन व व्यक्तिचित्रण, भोजनवर्णने, कथारंभी तिच्यातील मर्मप्रसंग अध्यात्मसंकल्पनेच्या रूपात नोंदविणे आणि अध्यात्मस्पर्शित सांग रूपकांचा वापर या एकनाथी विशेषांचा संस्कार मुक्तेश्वरांवर आहे. नाथांचा प्रयत्न ‘ प्रतिपदी अध्यात्म ’ गुंफण्याचा आहे. मुक्तेश्वर असे बंधन स्वीकारीत नाहीत. त्यामुळे त्यांची रचना अध्यात्मस्पर्शित असूनही सहज मोकळी होते. रसात्मकतेशिवाय अन्य बंधन तिला प्राप्त होत नाही.

मुक्तेश्वरांनी घडविलेल्या महाभारताच्या अवतरणप्रक्रियेत संस्कृतप्राकृत परंपरेतील काही शैलीविशेषही झिरपून आले आहेत. विदग्ध संस्कृत काव्यनाट्यांचा रसिक आस्वाद आणि प्राकृत पूर्वकवींची परंपरा यांनी ती संस्कारित झाली आहे.

## ३. मुक्तेश्वरी भारतातील शब्दकळा

शब्दकळा ( डिक्शन ) हा शैलीविचाराचा एक घटक. शब्द व त्यांची रचना यांचा विचार त्यात अभिप्रेत असतो. असा अभ्यास विश्लेषणप्रधान व साहित्यकृतीच्या समग्र रूपाकडे दुर्लक्ष करणारा ठरण्याची भीती असते. त्यासाठी “...शब्दकळेचा अभ्यास हा शब्दांपुरता मर्यादित नसून शब्दाधारे साधलेल्या अर्थाच्या आकृतीशी व त्यातून

---

( ८ ) जे मीखे भीमाकरी । ते केळवली रे नोवरी ॥ – नामा पाठक, व. १२८.
भीमकरीं जे केळवली । गदानोवरी सगुणाथिली ॥ – मुभा २।१५।११२.

( ९ ) आयुष्य अंतरपाट धरी । ( जनाबाई ) आयुष्य अवधीचा अंत्रपाट
–( मुभा २।१५।११३ )

(१०) परते करुनी प्राणातें । सुखें सेवी कां एकान्त ॥ – जनाबाई.
प्राण पारखे दवडोनि दुरी । एकांतीं पहुडें कां ॥ – मुभा २।१५।११५.

(११) इतुकें ऐकुनि दुर्योधन रावी । कोपें करूनि खवळला ॥ – नापा. व १२९.
दुर्योधन चढला क्रोधा । काळ खवळे ज्यापरी ॥ - मुभा २।१५।११६.

अप्रत्यक्षपणे सुचविलेल्या वाङ्मयप्रकाराच्या प्रवृत्तीशी निगडित असतो "[४] हे या संदर्भात लक्षात घेणे आवश्यक ठरते.

## ३·१. मुक्तेश्वरी भारतातील शब्दसंग्रह

कोणत्याही कवीची शब्दकळा समकालीन शब्दसंग्रहाशी संबद्ध असते. त्यातूनच त्याला निवड करावी लागते आणि क्वचित केव्हा नवार्थप्रकटनासाठी तो नवशब्द-निर्मिती करतो. मुक्तेश्वरकालीन मराठी आपला माहेरचा म्हणून संस्कृत शब्दावली स्वीकारीत होती. कानडी, तेलगू, फार्सी यांच्या संपर्काने तिच्या शब्दसंग्रहाला संमिश्र रूप आले होते. त्यातूनच मुक्तेश्वरांची शब्दकळा आकारली आहे.

**फार्सी शब्द.** यादवकालीन मराठीत फार्सी शब्दांचे केवळ अस्तित्व जाणवते. पुढील काळात त्यांचे प्राबल्य आहे. या भाषिक परिस्थितीचा प्रभाव नामदेवांपासून जाणवायला आरंभ होतो. एकनाथांच्या काव्यात फार्सी शब्दांचे वैपुल्य आहे. सामराज, नागेश, विठ्ठल, रघुनाथपंडित यांच्या काव्यात तर ते आहेतच पण तुकाराम-रामदासांच्या काव्यातही आहेत. 'शफत'सारखा एखादा अपवादात्मक शब्द सोडला तर मुक्तेश्वरी भारतात फार्सी शब्दांचा अभाव आहे. पूर्वोत्तर कवींच्या पार्श्वभूमीवर तो कुतूहलजनक वाटणारा आहे. अर्थात एवढ्यावरून "... मुक्तेश्वर हा संकुचित संस्कृतिवादी होता"[५] असे मात्र वाटत नाही. फार्सी त्याज्य या कल्पनेने हे घडले असेलसे वाटत नाही. येथे प्रश्न संस्कृतिनिष्ठेचा नसून भाषिक अस्तित्वाचाच होता. भाषा जगविण्यासाठी धडपडणे सांस्कृतिक असहिष्णुतेत गणले जाऊ नये, असे वाटते. या भाषिक प्रेरणेबरोबरच मुक्तेश्वरी कवितेचे आशयविश्व आणि तिने जोपासलेले काव्यादर्श यांचाही वाटा या शब्दनिवडीत असला पाहिजे.

**संस्कृत शब्द.** मुक्तेश्वर संस्कृत काव्यनाट्यांचे व पुरोणेतिहासाचे व्यासंगी होते. संस्कृत भारताचे मराठी अवतरण ते घडवीत होते. त्यामुळे संस्कृत शब्द सहजतेने त्यांच्या भारतात आले. नित्याच्या व्यवहारातील वस्तू, अलंकार, वस्त्र, पात्र इत्यादी-विषयक संस्कृत शब्द एकनाथ, रामदास, सामराज, नागेश, विठ्ठल या कवींपेक्षा अधिक वैपुल्याने त्यांनी वापरले आहेत. विराटपर्वाची पहाणी करून नांदापूरकर म्हणतात, "मुक्तेश्वरात ६२२० तत्सम आणि ५९०० तद्भव शब्द आहेत तर पंतात ५८२० तत्सम आणि ५९३० तद्भव आहेत. ... मुक्तेश्वरी भाषा पंतांच्या भाषेहून अधिक संस्कृतप्रचुर आहे असेच विधान न्याय्य आणि वस्तुस्थितिदर्शक आहे."[१] रूढ शब्दांनाही तत्सम गणून त्यांनी ही परिगणना केली व निष्कर्ष काढले. एकूण भाषेच्या शब्दसंग्रहात संस्कृत शब्दांचे जे प्रमाण आहे त्यापेक्षा मुक्तमयूरांच्या काव्यातील त्यांचे

---

४. रा. ग. जाधव, वाङ्मयीन निबंध लेखन : स्वरूप आणि साधने, पुणे, १९६७ पृ. ९०–९१.

५. अ. ना. देशपांडे, "प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास," भाग चौथा, पुणे–नागपूर, १९७७ पृ. ३९६.

प्रमाण-५०.५१ टक्के-कमी असल्याने त्यांच्या भाषेला संस्कृतप्रचुर म्हणता येणार नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

नांदापूरकरांचे हे निरीक्षण संख्याप्रमाणावर आधारलेले असून त्याचा पाया भाषाशास्त्रीय आहे. संख्याप्रमाण व भाषाशास्त्र हे काव्यातील शब्दसंग्रहाचे विश्लेषण करण्यास उपयुक्त व मूलभूत दृष्टिकोण आहेत. पण त्यापुढे जाऊन शब्दांची प्रतीतिक्षमता, भाववाहकता व प्रयोजकत्व पाहणे काव्यातील शब्दकळेच्या पाहणीत अधिक महत्वाचे ठरते. शब्दांचे संख्याप्रमाण त्या शब्दांच्या अर्थव्यंजकतेच्या विचाराशिवाय निरर्थक ठरते. काव्यात शब्द कोणत्या स्तरभेदातून व भाषाभेदातून आले आहेत हे पाहण्यापेक्षा ते कसे वापरले गेले आहेत, हे पाहणे अधिक आवश्यक ठरते. या भूमिकेवरून नांदापूरकरांच्याच निरीक्षणाधारे निराळ्या निष्कर्षाप्रत जाता येईल. " रूढ असल्यामुळे त्यांचा (शब्दांचा) संस्कृतपणा काढून घेणे उचित नाही."[६] हे त्यांचे म्हणणे भाषाशास्त्राच्या दृष्टीने बरोबरच आहे. पण प्रत्यक्षात काव्याचे अर्थवाहकत्व, त्यातील रसाचा झटितिप्रत्यय शब्दांच्या या रूळतेपणावर अवलंबून असत नाही काय ! " दोघांनीही संस्कृत शब्द वापरले, पण पंतात त्यांच्या जोडीला अरूढ शब्द अधिक आहेत; तर दोघांनीही प्राकृत जुने शब्द वापरले असले तरी मुक्तेश्वरात ते फार आहेत."[७] असेही ते सांगतात. याचाच दुसरा अर्थ असा की, मोरोपंतांचा शब्दसंग्रह समकालीन श्रोत्यांना दूरचा वाटणारा आहे. तर मुक्तेश्वरांचा शब्दसंग्रह जवळचा वाटणारा आहे. लोकव्यवहारात प्रचलित असलेले शब्द लोकजीवनाच्या चैतन्याने थुईथुईणारे असतात. त्यामुळे ते आवाहक (इव्होकेटिव्ह) होतात. शुद्धता आणि चमत्कृती यांच्या नादात मोरोपंताची वाणी संस्कृतनिष्ठ बनली आणि त्याप्रमाणात बोलभाषेच्या चैतन्यापासून दुरावली. त्यामुळे भावनांचा ताजेपणा आणि निर्भरता तिने गमावली आहे. याउलट रूढ संस्कृत शब्द-मराठीने आत्मसात केलेले संस्कृत शब्द-मुक्तेश्वरांनी स्वीकारले. समकाळात रूढ असलेले प्राकृत शब्द तितक्याच प्रमाणात वापरून त्यांनी त्याचा तोल साधला. समोरच्या श्रोतृमानसाची नाडी पकडणारे आणि हृदयस्पंदने टिपणारे शब्द त्यांनी वापरले. त्यामुळे मुक्तेश्वरी कविता ऐकताना भावनेचा ओसंडता जोष आणि आवेग श्रोत्याला जाणवत राहतो. संख्याप्रमाणाने मुक्तेश्वरी कविता मोरोपंती कवितेपेक्षा अधिक संस्कृतप्रचुर आहे असे दाखविता येईलही. पण संस्कृत शब्दांचा दोघांनी जो वापर केला आहे त्यामुळे मुक्तेश्वरी कविता मोरोपंती कवितेपेक्षा अधिक प्रासादिक व भावसंक्रामक झाली आहे, हे निश्चित.

**तद्भव व देशी शब्द.** नाहो, रहवर, केउता अशी तत्सम शब्दांची मधुर तद्भव रूपे मुक्तेश्वरी रचनेत आढळतात. ढेसे, शिंगणी, नाबद यांसारखे देशी शब्दही त्यांनी वैपुल्याने वापरले आहेत. जुन्या शब्दात मराठीने आत्मसात केलेले कानडी शब्दही

६. ना. गो. नांदापूरकर, " मुक्तमयूरांची भारते, " पूर्वोक्त, पृ. ५९०-५९१
७. तत्रैव, पृ. ५८५.

आहेत. बदलत्या काळाने त्यातील काही दुर्बोध झाल्यासारखे वाटले तरी मुक्तेश्वरकाळात ते आकलनक्षम असणार. कालांतराने आज त्या शब्दांना अनोखेपणाचा सुगंध प्राप्त झाला आहे.

## ३.२. मुक्तेश्वरी भारतातील शब्दसमरसता

शब्द हे काव्यानुभूतीला सौंदर्यपूर्ण अभिव्यक्ती देणारे माध्यम आहे, अशी स्पष्ट जाणीव प्राचीन मराठी कवींपैकी फारच थोड्यांनी दाखविली आहे. ज्ञानदेव, नरेंद्र, तुकाराम, रामजोशी हे शब्दांचा जाणकारीने वापर करणारे कवी आहेत. त्यातच मुक्तेश्वरांची गणना करावयास हवी. त्यांना शब्दांची एक मार्मिक समज आहे. त्यांचे शब्द आशयाशी समरस होऊन त्याला व्यक्तता देतात.

अर्थानुसारी नादगर्भ शब्द वापरून मुक्तेश्वर योग्य तो परिणाम साधताना दिसतात. घमघमीत, फुंपाटणे, हुंकारती, सणाणी, कडीविकोडी, आडमोडे, चढोवढीं, दणदणाट, झगमग, धुंधुवात, धुधुःकारणे यासारख्या नादगर्भ शब्दांतून क्रियेच्या आघात-प्रत्याघातांची आंदोलने सूक्ष्मत्वाने प्रतीत होतात. " गगनगर्जे मंगळतुरीं। कुंजरभेटी त्राहाटिल्या " ( २।६।४८ ) येथे मांगल्यसूचक वातावरणातील गजबज आणि वाद्यध्वनी 'र'च्या पुनरूक्तीने व 'त्राहाटिल्या'सारख्या शब्दात पकडला आहे. कधी अनुप्रासजन्य माधुर्याचाही ते आशयाविष्करणासाठी उपयोग करून घेतात. " कर्पूरकर्दळीच्या काननी। कस्तुरीमृग खेळती " ( २।८।३१ ) येथे क् व र् या वर्णांच्या पुनरूक्तीने येणारे माधुर्य मानससरोवराचे सौम्य-शांत पण अद्‌भुत रूप साकार करते. वर्ण्य अनुभवाचा ध्वन्यात्मक प्रत्यय देण्याचा त्यांचा प्रयत्न युद्ध वा उत्पातवर्णनातून स्पष्टत्वाने जाणवतो.

शब्दाच्या सहेतुक पुनरूक्तीने ते कधी परिणाम साधताना दिसतात. " वंशी येक देशीं येक। जगीं येक युगीं येक। ब्रह्मकल्पीं उपजे येक। कीर्तिघोष तुज ऐसा " ( १।१०।५५ ) यातील 'येक'च्या पुनरूक्तीने विविध स्तरावरील जनमेजयाची अद्वितीयता नेमकेपणे प्रकटते. दुर्वासाच्या दुर्योधनपरीक्षेतील लगबग, गडबड पुनरुक्त शब्दांनी त्यांनी टिपली (३।११।२७-२८) आहे.

पर्यायी शब्द वापरण्याबद्दल मुक्तेश्वरांची प्रसिद्धी आहे. त्यांच्या शब्दसमृद्धीचे ते द्योतक आहे. जनेश्वर ( राजा १।८।२५ ) असे अभिनव किंवा सरितारंग ( समुद्र १०।१।६४ ) असे गोड पर्याय ते वापरतात. पर्यायी शब्दांची आवड सौप्तिकात विशेष उफाळून आली आहे. त्यांच्या शब्दसमृद्धीचे ते द्योतक आहे. तथापि हे पर्यायी शब्द केवळ कवीचे शब्दभांडार दाखविण्यासाठीच येत नाहीत. ते कवीचे निवडकौशल्य दाखविण्यासाठीही येतात. जरासंधाला प्रत्युत्तर देणाऱ्या श्रीकृष्णासाठी 'कंसारी' व 'शौरी' असे दोन शब्द ( २।७।१) वापरून कृष्ण-जरासंधाचे वैरकारण, त्यांच्या संघर्षाचे वांशिक रूप आणि कृष्णाचे सामर्थ्य ते सुचवितात. " अचळकृपेचा गोवर्धनगिरी " मजवर धर असे म्हणताना द्रौपदी त्याला 'गिरीधरा' म्हणते तेही असेच साभिप्राय

आहे. सभेत फरफटत आणलेल्या द्रौपदीचा 'याज्ञसेनी' या तेजस्वी नावाने निर्देश करून तिची अवनत अवस्था ते विरोधाने उठावदार करतात. ऋषिवर्णनात 'वेदवन्ही' (२।९।५) असा शब्द ते सहज वापरून जातात. अनुप्रास, रूपक आणि माधुर्य यांचे भान ठेवून अग्नीऐवजी 'वन्ही' हा सुयोग्य पर्याय ते वापरतात. पर्यायी शब्दांतील कोणता शब्द निवडावा याचे फार चांगले भान मुक्तेश्वरांना असते.

नेम नेमिला, क्षोभे क्षोभला, वज्रदंभोळे, तपस्वीसाधु असे जोडशब्द मुक्तेश्वर वापरतात. त्यात कधी एकच प्रतिपादक पुनरुक्त होते तर कधी समानार्थक वा पहिल्याचे वैशिष्ट्य दाखविणारे असते. प्रचारातून गेलेल्या जुन्या शब्दाला तदर्थक प्रचारातील शब्दाची जोड देऊन ते त्याला जिवंत ठेवतात. शिंगणीचापी, जाडीकांबळी, चौदंतभद्रजाती ही त्याची काही उदाहरणे. स्वभाषारक्षणाच्या प्रवृत्तीचा हाही एक आविष्कार आहे.

"सोयरिया! द्वारकाधीशा! कृष्णा! परेशा!" (२।१५।१२०) अशा आकारान्त नामांच्या मांडणीने आर्ततेचा सूरही दीर्घ होतो. "पांचाळिये! मायबहिणी! सखिये! सये! सांगातिणी! मज सांडूनि कुळतारिणी। केवी जासी वनवासा?"(२।१६।११७) या कुंतीच्या उद्‍गारातील नामांनी आणि संबोधनांनी त्यातील व्याकुळता आणि तगमग समूर्त केली आहे. त्यांच्या योजनेत तीन 'ए'कार, तीन 'ई' कार व सहा 'इ'कार आणून नादाचा एक समतोल मुक्तेश्वरांनी साधला आहे. मुक्तेश्वरांची संबोधने अशी स्व-भावांना प्रकाशित करतात.

मुक्तेश्वरांची नामे त्यांना वैशिष्ट्ये देणाऱ्या वैशेषणांना बरोबर घेऊन येतात. "जो वंशाचा भुवनमणी। नागायुतबळाची खाणी। बुद्धिसंपन्न परमगुणी। दुर्योधन प्रतापी" येथील विशेषणे सारा दुर्योधन एका निराळ्या भूमिकेवरून आपल्यासमोर उभा करतात. "पद्में खर्वें अर्बुदशंख। महाखर्वें निखर्व देख। कोटी निधीनें नव्हे लेख। समुद्रप्राय जें भरलें" अशी पावसाच्या सरीसारखी संख्याविशेषणे वापरून धर्माच्या संपत्तीची अपरिमितता ते सुचवितात. 'घंटाघोष घवघवीत' (३।१३।१०६) वा 'अचळ मौन' (२।१४।४१) ही विशेषणे जितकी अनोखी तितकी समर्पक आहेत.

"पारधी खेळावयाची हांव। श्वापद साधावयाचे भाव। सरक चवकाचें लाघव। लपणीं छपणीं धांवणीं" (१।१५।६५) येथील क्रियापदांनी शिकारीतील गती, त्वरा व हुलकावणी समूर्त होते.

मुक्तेश्वर शब्दांचा जाणकारीने वापर करतात. चंद्रकिरणांनी 'डवरलेला', असे उच्चैश्रव्याचे वर्णन ते करतात. 'अतिनिहार धूमाकार तमांध' (१।१३।११२) असे म्हणून पाराशराने निर्मिलेल्या धुक्याला गूढरम्य अद्‍भुताचा स्पर्श देतात. चंडकौशिकाच्या फलप्रसादातील आकस्मिकता व अद्‍भुतता 'नसता वायूचा झडाड' (२।६।६३) यातील 'झडाड'मुळे प्रत्ययकारी होते. या शब्दाचा नाद आणि अनोखेपण यांचा तो परिणाम आहे. 'थोर हांसे गदगदाटें। फांसे फिरती गरगराटें' (२।१४।४०) यातून

भीमाचे गदगदून हसणे आणि फाशांचे गरगरा फिरणे गोचर होते. या शब्दांना क्रियासूचक प्रतिमेचे रूप येते. नृपसागर 'डहुळला' असे जेव्हा ते म्हणतात तेव्हाही त्यांचे शब्द प्रतिमारूप होताना जाणवतात.

आपण वापरीत असलेल्या शब्दातील अंतसंगतीचे अवधान ते बाळगतात. गगनमार्गाने उसळणारे शिशुपाळाचे मस्तक घोष करीत गेले. "घोष करीत घनगर्जना" (२।११।६०) असे ते म्हणतात. गगनमार्गाने जाणारे मस्तक 'घन'गर्जना करते, हे सांगण्यात आपल्या वर्णनातल्या शब्दाशब्दाकडे मुक्तेश्वरांचे कसे आणि किती लक्ष असते ते जाणवते. अनेक शब्दांतून ते नेमका शब्द हेरतात आणि अचूकपणे वापरतात. अनुभवाचा नाद, गती आणि रूप त्यांचे शब्द अलगद झेलतात.

## ४. मुक्तेश्वरी शैलीचे काही विशेष

### ४·१. अनेक घटकयुक्त गतिशील चित्रणशैली

अनेक घटकांना कवेत घेणाऱ्या गतिशील निवेदनाने मुक्तेश्वर प्रसंगचित्रण करतात. शिशुपालवधाचे वर्णन (मभा. २।४२।२१–३१, मुभा. २।११।५८–७१) या दृष्टीने पाहण्यासारखे आहे. वज्राने महाशैल तुटावे तसे कृष्णचक्राच्या आघाताने शिशुपालाचे मस्तक तुटून गगनमार्गाने घनगर्जना करीत उसळले. कृष्णपदावर ते स्थिर झाले आणि त्यातील तेजकलिका कृष्णरूपात विलीन झाली. ही विरोधभक्तीची आगळी रीत! भरसभेतल्या या वधाने पृथ्वीतळ डळमळले, कुळाचळ आंदोळले आणि सागरजळ मर्यादा सोडून पसरू लागले. राजे हाहाकार करू लागले. कोणी हात चोळले, कोणी अधोवदनी विलाप केला. कौरवांना आपले बळ कमी पडल्याची जाणीव होते. कोणाला 'बोखटे' झाल्यासारखे वाटते तर कोणाला 'शल्य खंडल्याचा आनंद होतो'. गगनी मात्र सुरांनी देवदुंदुभी वाजवून पुष्पवर्षाव केला. भक्तांनी टाळ्या पिटून जयजयकार केला. धर्माने शिशुपालाचे दहन त्याच्या पुत्राहाती करविले व त्यास त्याचे राज्य दिले.— असे वेचक शब्द, चित्रमयता, गतिशीलता यातून शिशुपालवधाचे रौद्र चित्र उभे राहते. या अद्‌भुतावर भक्तीची स्वतंत्र रंगच्छटा पसरून दिली आहे. नैसर्गिक उत्पातांचे वर्णन संक्षिप्त व मूलाधिष्ठित असले तरी प्रत्ययोत्पादक झाले आहे. तद्द्वारा मानवी क्षोभाची सहकंपने निसर्गजातात उसळत राहतात. शिशुपालवधाविषयी राजांच्या संमिश्र प्रतिक्रियांचा मार्मिक आलेख त्यांच्या कृती-उक्तीतून रेखला जातो. त्यातील कौरवांचा निर्देश आनुषंगिक घटिताला मध्यवर्ती संघर्षप्रवाहाशी जोडतो. घटनादृष्ट्या आवश्यक अशा वृत्तात्मक निवेदनाची जोड देऊन मुक्तेश्वरांनी हे प्रसंगचित्रण पूर्ण केले आहे.— वेगवेगळ्या घटकावर कॅमेरा क्षणभर स्थिर व्हावा, व पुन्हा सारखा फिरत रहावा व त्यामुळे समग्र दृश्याची एकवट प्रतीती यावी असे हे प्रसंगचित्रण आहे. आधी रौद्र, मग अद्‌भुत आणि नंतर त्याला सौम्य व उदात्त रूप देणारे भक्तिविवेचन येते. पुन्हा या अलौकिक पातळीवरून निवेदन उतरते. विविध प्रतिक्रिया सारगर्भतेने मांडल्या जातता.

एका प्रसंगाकडे पाहण्याचे अनेकानेक दृष्टिकोण त्यातून व्यक्त होतात.

अनेक घटकयुक्त प्रसंगवर्णनास ही गतिशील निवेदनपद्धती उपयुक्त ठरते. भिन्न प्रतिक्रियांनी प्रसंगाची सारी अंगे ते एकत्र आणतात. निरनिराळ्या व्यक्तींचे भाव-आविर्भाव, कृती आणि स्वगत उद्‌गार यांनी संमिश्र भावछटांचा एक गोफच ते विणतात. विविध व्यक्तींचे विविध मनोभाव टिपताना त्यांनी नाट्यदिग्दर्शकाची प्रतिभा प्रकट केली आहे. गतिरोध न होता कॅमेरा फिरत रहावा तशी ही सिनेतंत्रपद्धतीची शैली आहे. एकेका ओवीत एकेका घटकाचे चित्र रेखायचे आणि अशा सुट्या चित्रांनी समग्र चित्र पूर्ण उभे केले जाते. सूक्ष्म चित्रांच्या अल्पवर्णनातून समग्र चित्राच्या संमिश्र रूपाची कल्पना त्यामुळे येते.

### ४·२. अनेक पद्धतीने होणारे भावचित्रण

एकाच घटनेचे निरनिराळ्या पद्धतींनी चित्रण केल्यामुळे त्यातील भाव अनेकांगांनी साकार होतो. आर्तरक्षणार्थ धावणाऱ्या कृष्णाचे त्रयस्थ निवेदनाने (२।१५।१७९–१८७) कथन केल्यावर नारद-रुक्मिणी संवादाने (२।१५।१९१–१९५) ते त्यावर मान्यतेचे शिक्कामोर्तब करतात. कृष्णाची लगबग या दुहेरी चित्रणाने मूर्त होते. त्याची आर्तरक्षणाची वृत्ती अधिक स्पष्ट होते. निर्मिती, पूर्ती, घडणारे उत्सवप्रसंग, प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया, विपक्षीयांची असूया अशा अनेक दृष्टीने व अवस्थांतून त्यांची वास्तुवर्णने साकारतात. वर्णनांप्रमाणे त्यांचे व्यक्तिचित्रणही असेच अनेकानेक पद्धतीने आकारते. अनेकांगांनी चित्रण करून वर्ण्यभावाला ठसठशीत करण्याचा प्रयत्न मुक्तेश्वरांची शैली असा करते.

### ४.३. उपरोध व उपहास

उपरोधाचा फणकारा हे मुक्तेश्वरी शैलीचे आणखी एक बलस्थान. सुभद्रेच्या रूपदर्शनाने विद्ध झालेल्या अर्जुनाची "वरिवरी तापसाचा वेश । तीर्थयात्रेचा अतिसोस । हृदई कामाचा निवास । हा परमार्थ नेटका" (१।४७।९२) अशी खुसखुशीत उपरोधाने कृष्ण चेष्टा करतो. पांडवांना छळणाऱ्या दुर्योधनाला पकडल्याबद्दल पांडवच हल्ला करू लागल्यावर चित्रसेनाची मनःस्थिती "उपकार जाणावया कुशळा तुम्हीच एक चतुर हो!" (३।१२।१५५) अशा नाट्यगर्भ उपरोधाने प्रकटते. "पूजा घेत्या दोघे जनक । पूजा कर्तया तातपंचक । यालागीं दोहींचा विवेक । यथायोग्य दिसतसे" (२।१०।८४) या शिशुपालाच्या उद्‌गारांना तीव्र उपरोधाची धार आहे. मयसभेत फजित पावणाऱ्या दुर्योधनाला उद्देशून "धृतराष्ट्र पुत्र ऐसें नाम । सत्य केलें त्वां

---

८. पहा सभा. २।८२–८९, १४।१६५–१६८, १५।३६–४७, ९६–९७, १९७-१०२, १६।४०-४३, ८८-९२, १२२-१२४. वन. १७।५४-५८. विराट. ३।५५-५६, ५।१२८, ६।४५-५१.

एकें " ( २।१२।५६ ) हा भीमाने मारलेला टोला कसा मर्मभेदक आहे । मुळातील उपहास येथे पुरता फुलला आहे. खलांचे दुष्टत्व गडद करण्यासाठी त्यांच्या मुखी उपरोधाची जहाल मात्रा मुक्तेश्वर योजतात. त्यामुळे काही वेळा त्यांच्या व्यक्तिरेखा भडक होतात. अन्यत्र मात्र ही उपहास-उपरोधशैली वर्ण्यविषयातील नाट्य फुलविते, वा मर्मवेध करते.

## ४.४. चित्रशैली

प्रसंग-भावांना गोचर करणारी, व्यक्तींना समूर्त करणारी शब्दचित्रे रेखाटण्यात मुक्तेश्वर सिद्धहस्त आहेत. " गोपी गोपाळ वत्सें धेनु । यमुना गोकुळ गोवर्धनु । वृंदावनी वाजवी वेणु । राधिकारमणु लिहिलासे " (२।१५।२३१) हे द्रौपदीवस्त्रावरील चित्राचे वर्णन यादृष्टीने पाहण्यासारखे आहे. ओवीच्या पहिल्या चरणात गोकुळातील चल, सजीव घटक व दुसऱ्या चरणात अचल, निर्जीव घटक स्पष्ट होऊन एकसंध दृक्चित्र उभे राहते. तिसऱ्या चरणातून त्या मूक चित्रात चैतन्य भरणाऱ्या वेणुध्वनींचे नादचित्र आहे. यमकानुप्रासांचा मधुर झंकार या साऱ्यामागे रूणझुणत राहतो. या साऱ्यामागील चैतन्य-स्रोत असलेल्या राधिकारमण--राधामय कृष्ण चौथ्या चरणातून प्रकट होतो. निसर्ग-रमणीयता, नादमाधुर्य, चराचराला खेव देणारे प्रेम आणि भक्तीत पर्यवसित होणारा शृंगार यांचे मुक्त वातावरण यातून प्रतीत होते. गोपीकृष्णाच्या गोकुळाचे लोकश्रद्धेने जपलेले आकर्षक चित्र त्याला ढका लागू न देता मुक्तेश्वरांनी उभे केले आहे. विशेषणे न वापरता, अर्थव्यक्तीसाठी आवश्यक तेवढीच क्रियापदे वापरून मुख्यतः नामांच्या लयबद्ध मांडणीने हे चित्रण केले आहे. त्यामुळे या चित्रातील रचना आपो-आपच मुक्त व लवचिक राहिली आहे. ' राधिकारमण 'सारखा पर्यायी शब्द ध्वनि-माधुर्याने व अर्थसंदर्भाने येथे कसा चपखल वाटतो! विषादग्रस्त दुर्योधनाचे ( २।१२।६४-६८ ) रेखाटन ते स्वतंत्रपणे करतात. तप्त लोहासारखी उष्ण गात्रे, खादिरांगारासारखे रक्तनेत्र, काळसर्पाच्या फुत्कारासारखे श्वास, डोळ्यात डळमळणारे पाणी, दातांनी चावले जाणारे अधर व मनगट आणि आक्रोश करीत कलेले हृदयपीटन यांनी दुर्योधनाची शरीरस्थिती मूर्त होते. राजसूययज्ञश्रियेचा खेद, अवमानाचा अतिविषाद आणि अग्नीसारखा हृदयात धडाडलेला क्रोध यांच्या संमिश्र भावछटांनी त्यात जिवंतपणा येतो. दिव्यान्नभोजनाचा त्याग, अंगनाभोग त्याज्य, महामौनाचा आश्रय आणि स्तंभवत् तटस्थता हे कृतिचित्रण त्या भावनांचे आविष्करण करते. " म्हणे, धिग् धिग् प्राण्या मूढा । वैरियाचा उत्कर्ष गाढा । दृष्टीं देखोनि माकडा । काय जीवसी संसारीं ? " ( ६६ ) हा त्या अवस्थेचा दर्शक असा स्वगत उद्गार आहे. त्यातील ' मूढा ', ' माकडा 'सारख्या शब्दात अत्यंततिरस्कृत वाच्यध्वनी आहे. त्यामुळे भावनेचा आवेग तीव्र होतो. शरीरस्थिती, कृतिचित्रण, भावसूचक उद्गार आणि संमिश्र भावच्छटा यांनी विषादग्रस्त दुर्योधन पूर्णपणे साकार होतो. मुक्तेश्वरांच्या भावप्रतीतिक्षम

अलंकारशैलीची ती किमया आहे. अशी किती तरी शब्दचित्रे प्रसंगाच्या ओघात मुक्तेश्वर सहजतया चितारतात. त्यांच्या चित्रशैलीची कुसर व्यक्तिप्रसंगांना व तदंतर्गत भावांना गोचर करते.

## ४.५ साक्षी व्यक्तींच्या प्रतिक्रिया

वस्तू, प्रसंग, व्यक्ती यांच्या संदर्भात साक्षी व्यक्तींच्या प्रतिक्रिया मुक्तेश्वर आवर्जून नोंदवितात. खादाड भोजनभाऊंचे वर्णन व उद्गार ( ३।११।१३७–१४४) दुर्वास-भोजनाची रुचकरता वाढवितात. मयसभेच्या प्रेक्षकांना सभादर्शनाने येणारी स्तिमितता व भ्रांती, त्यांची चकित अवस्था, आश्चर्याने अडखळणारी पावले व वारंवार निघणारे धन्योद्गार त्यांनी अचूक टिपले ( २।२।७७-८० ) आहेत. हेलावणारा शोभासमुद्र पाहताना होणारा नेत्र-मनाचा पाठलाग, खोल पोटात जाणवणाऱ्या संवेदना, भारावून बसून राहणे व बोलणे यांद्वारे आश्चर्याचा भाव पुरेपूर वठविला आहे. भावनांची हुबेहूब चित्रे चितारण्यात मुक्तेश्वर सिद्धहस्त आहेत. पण येथे महत्त्वाचे आहे ते हे की प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया चितारून त्यांनी मयसभेचे सौंदर्य कसे वाढविले ते. अप्रत्यक्ष सौंदर्यचित्रणाचा हा सुरेख नमुना आहे. साक्षी व्यक्तींच्या वा आस्वादकांच्या अशा प्रतिक्रिया मुक्तेश्वर आवर्जून वर्णितात. त्या बहुंशी स्वतंत्र आहेत. त्यामुळे वर्ण्यविषयाचे वेगळेच दर्शन घडते. कथासंगती व वर्ण्यभाव या दृष्टीनेही त्या उपयुक्त ठरतात. या प्रतिक्रिया पात्रांची संस्कृती व्यक्त करतात. कौरवांच्या प्रतिक्रियांनी प्रतिनायकांचे चित्रण ठसठशीत होते. या अप्रत्यक्ष चित्रणपद्धतीने प्रसंगास प्रत्यक्षता येऊन तो अनेकांगांनी प्रतीत होतो.

## ४.६. सुभाषितात्मकता

प्रसंग–व्यक्तींच्या अनुरोधाने नैतिक मर्म शोधण्याची वृत्ती आणि नेमकेपणाने मांडण्याचे सामर्थ्य यातून मुक्तेश्वरी कवितेत सुभाषितात्मकता अवतरते. कधी मुळातील भाग ते तशाच सूत्रमयतेने व ठसठशीतपणे मांडतात. कधी " काम नसावा परस्त्रियेचा। क्रोध नसावा सत्पुरुषाचा।... काम असावा ईश्वरभजनीं। क्रोध असावा इंद्रियदमनीं " ( २।३।१५ व १७ ) अशा विधिनिषेधात्मक विधानांनी चमत्कृती येते. " गेलें हृदयीं नाठवावें। केलें मुखीं न बोलावें। सत्य सर्वथा न सांडावें। साधुवर्तन या नांवें " ( २।१३।६१ ), यश अपेश शूराचा वाटा " ( ४।७।७ ) यासारखी संक्षिप्त, सदृश क्रिया-पदांनी बांधलेली आणि नीतिविचार गुंफणारी ही सुबक रचना आपोआपच सुभाषितांचे रूप धारण करते. अन्य मध्ययुगीन कवींप्रमाणे लोकव्यवहाराची नैतिक मीमांसा करणे वा नीत्युपदेश करणे मुक्तेश्वरांनाही प्रिय आहे. ते स्वतः गृहस्थाश्रमी असल्याने तद्विषयक आदर्शांच सूचन अशा सुभाषितांतून सहजतया होते. पण ती स्वतंत्रपणे येऊन कथाविक्षेप करीत नाहीत. प्रसंग–भावांच्या ओघात निरनिराळ्या व्यक्तींच्या मुखी मुक्तेश्वरांनी ती बेमालूमपणे गुंफली आहेत. सत्यवानाचे भविष्य कळूनही आपला अटळ निश्चय व्यक्तविताना त्यांची सावित्री म्हणते; " अभाग्यभाग्याची आभाळें। येती जाती आपुल्या

काळें । निश्चयाचा ध्रुव अचळ । चळत्व सर्वथा न पविजे " ( ३।१६।३० ) त्यामुळे तिच्या निर्णयाची बैठक स्पष्ट होते आणि मानवी जीवनाकडे पाहण्याचा एक व्यापक दृष्टिकोणही स्पष्ट होतो. कथौघात सुसंगतपणे पात्रमुखाने येणाऱ्या अशा सुभाषितांनी नीतीबोधाला भावोत्कटता येते आणि पात्रांना व कथेला मूल्यात्मकतेचे परिमाण लाभते. प्रदीर्घ कथाकाव्यात कथेशी एकजीव झालेली अशी सुभाषिते अधूनमधून भेटतात तेव्हा प्राजक्तपुष्पांची बरसात झाल्यासारखे सुखद वाटते. अर्थगंभीर आशयाला नेमक्या शब्दांनिशी कवी अशा ठिकाणी भिडलेला असतो. मुक्तेश्वरी भारताच्या वाचक-श्रोत्याला हा आनंद वैपुल्याने मिळतो. जीवनातील अक्षरसत्ये अल्पाक्षर पण बह्वर्थसूचक पदबंधात गुंफल्याने काव्यानंदाबरोबर प्रबोधनाचाही आनंद ती देतात. महाभारताचे जीवन-भाष्यात्मक स्वरूप त्यातून अभिव्यक्त होते.

## ४.७. नामावळी

व्यक्ती, वस्तू, वस्त्रे, पात्रे, अन्नपदार्थ, रत्ने, क्रीडाप्रकार, शस्त्रविशेष, युद्धपद्धती, वृक्ष-वेली यांच्या नामावळी ( कॅटलॉग्ज ) हा महाकाव्याचा अभिव्यक्तिविशेष मुक्तेश्वरी भारतातही दिसतो. ' अतिविस्तार होऊ पाहे ' अशी भीती वाटली तरी व्यक्तींच्या[९] नामावळ्या ' संकलित ' अनुवादल्याशिवाय मुक्तेश्वरांना रहावत नाही. कधी स्वतंत्र वा कालविपर्यासात्मक भर पडल्याने त्या विस्तारतातही. ओवीबंध व मराठीची प्रकृती सांभाळण्यासाठी ते नावात किरकोळ बदल वा क्रमांतर करतात. संख्यादृष्ट्या ते संक्षेप साधतात तथापि त्यासाठी नावे गाळण्याकडे त्यांची प्रवृत्ती सहसा झुकत नाही. यातून मूलवृत्तकथनास त्यांनी दिलेले प्राधान्य लक्षात यावे. व्यक्तींच्या नामावळीत विशेषणे, परिचयात्मक भाग गाळल्याने त्या कोरड्या बनताना दिसतात. मूलवृत्तनिष्ठा व अनेक-विध व्यक्तींच्या उपस्थितीने येणारे गांभीर्य एवढ्याच दृष्टीने त्या उपयुक्त ठरतात.

व्यक्तींच्या शिवाय अन्य वर्णनांच्या संदर्भात येणाऱ्या नामावळ्या[१०] अशा कोरडे-पणाने वर्णिल्या जात नाहीत. त्या प्रसंगांच्या ओघांत येतात. त्यांना वर्णनचित्राची पार्श्वभूमी असते. अन्न, वस्त्र, धन, रत्ने, शस्त्रे, क्रीडा, पशु-पक्षी, वृक्ष-वेली यांच्या नोंदी कधी मुळाचा विस्तार करीत तर कधी स्वतंत्रपणे मुक्तेश्वर करतात. त्यामुळे त्यांना वर्णनविस्ताराचे स्वरूप येते. ही वस्तूनामे विशेषणे, कल्पक अलंकार यांच्या परिवारासह यथास्थानी स्थानापन्न होतात. त्यामुळे वर्णने भरघोस होतात. तपशीलाने येणारा भर-गच्चपणा त्यात जाणवतो. त्याला एक दृश्यात्मक पातळी लाभते.

---

९. पहा, आदि. ७४-१०, ११।४-११, १२।४-१५, अ.१४, २१।५–८५, २६।१०३-११६, ४।१३-४२, सभा. २।९६-१०९, ९।१६, २१-३४, १६।१७-१८, वन. ५।३९-४२

१०. पहा, आदि. १५।५१-६१, सभा. २।१९-७२, ४।११-१८१, ८।१३४-१४०, ९।९७-१३९, १२।१४२-२१८, १४।७-१५, १५।२०३-२४३. इत्यादी.

अशा नामावळ्या काव्यगत जीवनाला अनेकांगांनी साकार करतात. कथाबंध घडविणाऱ्या पात्रांची मूल्यात्मक व क्रियात्मक माहिती आपणास काव्यातून मिळते; पण ती जे जीवन ज्या वातावरणात जगतात त्याचा परिचय त्यातून होतोच असे नाही. तो परिचय करून देणारे माध्यम म्हणून या नामावळ्यांकडे पाहिले पाहिजे. पात्रांच्या अवतीभोवतीचे विविधरंगी जीवन त्यामुळे चौअंगांनी साकार होते. काव्यगत अमूर्त जीवनधारणांना मूर्त जीवनाचे रूप लाभते. इतिहासनिष्ठेप्रमाणे सांस्कृतिक संचित व समकालीन वास्तव यांना आकळण्याचा प्रयत्न त्यात असतो.

ज्ञानसंग्रह हे आर्षकाव्याचे एक उद्दिष्ट असते. नामावळ्यांच्या रूपाने स्वकालीन ज्ञानाची भर घालून मुक्तेश्वरांनी ते जपले आहे. त्यातून त्यांचे सूक्ष्म निरीक्षण, बहुस्पर्शी अवलोकन आणि व्यासंगी व्यक्तित्व आविष्कृत झाले आहे. असा विस्तार होताना अपरिहार्यपणे कालविपर्यास झाला आहे. कोठे पांडित्याचे प्रदर्शन झाले आहे आणि तरीही समकालीन श्रोतृमनाशी संवाद साधण्यासाठी व कथेला जिवंत वातावरणाची जोड देण्यासाठी या नामावळ्या उपयुक्त ठरल्या आहेत.

अशा तऱ्हेचे निर्देश मोरोपंत वगळताना दिसतात तर मुक्तेश्वर व्यासहृदयीच्या खुणा ओळखून त्या फुलविताना दिसतात. समग्र काव्यकथेतील त्याचे स्थान लक्षात घेऊन त्याच तालात स्वतंत्र विस्तार करताना दिसतात. त्यामुळे तपशीलात्मक नसला तरी वृत्तिसाम्याने व काव्यरूपदृष्ट्या हा ' व्यासानुसरणा 'चाच भाग म्हणावयास हवा.

## ४.८. संकीर्ण शैलीविशेष

**श्रेणी-पद्धतीचे विवेचन**. विवेचनाच्या ओघात नैतिक विचार गुंफणे ही मुक्तेश्वरांची प्रकृती आहे. कधी हे विचार ते चढत्या वा उतरत्या श्रेणीच्या रूपात मांडतात. ( जसे, १।२।६४-६५, २।९।१४८–१५३, २।११।५२–५३, २।१५।१०३-१०४, २६८ ). त्यात श्रेष्ठ–कनिष्ठ–भावाने मूल्यक्रम सुचविलेला असतो. कृष्णमुखी श्रेणीपद्धतीचे विवेचन अनेकवेळा येते. त्यमुळे त्याला एक प्रकारची अधिकृतता येते.

**कथाकाळाला स्वकाळाशी जोडण्याची धडपड** विशेषतः आदि व सभापर्वात जाणवते. एकलव्याने अंगठ्याची गुरुदक्षिणा दिली "तैंपासूनि अद्यापि सृष्टी। किरात तितुके तिहीं बोटीं। सीत वोढिती हें दृष्टी। जन देखती आतांचे" ( १।३०। २०४ ). असा कथाकाल व स्वकाल यांना सांधण्यांचा[११] त्यांचा प्रयत्न असतो.

**नामव्युत्पत्तीची लकब**[१२] पूर्वरचनेप्रमाणे त्यांच्या भारतातही दिसते. हा एकनाथांचा प्रभाव मानता येईल.

---

११. पहा, आदि. ४।१८६, ६।१२१, १०।११२, १२।४३, १३।७०, १७।१२९, २४।२९, २७।१२२, ३०।२०४, सभा. ८।१०४, १२६–१२८.

१२. पहा, आदि. १३।६९, १२३, १५।१५३, १६।६४, २११, २१।३३,४०,४६, २४।९४, २५।१५२, १५३, ३०।२०, ५७, ४०।१२८–१२९.

**पुनरावर्तनाचा प्रभावी वापर** मुक्तेश्वर करतात. चरणाची पुनरूक्ती[१३] करून संवादाचा समग्र आशय एकलक्षी करण्याची त्यांची लकब आहे. शब्दावर्तनानेही[१४] ते असाच परिणाम साधतात.

**देवताविडंबन.** मुक्तेश्वरांचा श्वेतकेतु "मूर्खांचा नायक", "विवेकशून्य चौतोंडा", "कन्यागमनिया पापिष्ठा" असा ब्रह्मदेवाचा उद्धार करतो आणि सृष्टि-रचनेतील अविवेकाबद्दल त्याला बोल लावतो (१।२७।१३०-१४३). देवता-विडंबनाची[१५] अशी हौस त्यांच्या भारतात अधूनमधून उफाळून येताना दिसते.

**स्वानुकरणाचा प्रकार.** विस्तीर्ण रचनेत सदृश विचार, वर्णने सदृश शब्दांतून प्रकटणे शक्य असते. अल्प प्रमाणातील हे स्वानुकरण[१६] दोषास्पद मानावयास हवे असे नाही.

## ४.९. अत्यल्प दुर्बोधतेची मीमांसा.

मुक्तेश्वरी वाणीचा ओघ वाहता आहे. तिच्या गतिमान निवेदनशैलीबरोबर वाचक काव्यमग्न होऊन वाहत जातो. तरीही तिच्यात क्लिष्टता व दुर्बोधता मुळीच नाही, असे मात्र नाही.

मुक्तेश्वर कवितेपासून कालदृष्ट्या आपण अंतरावर उभे आहोत. त्यामुळे त्यातील काही संस्कृत शब्द वा जुने प्राकृत शब्द कळत नाहीत. वामी, ढेसे, वेव्हारा, दंभोळी, विषोल्बण, कुलिश, आपांपती, सींतर, मृड, क्ष्वेड, प्रणीतापात्र, चंचरीक, शिसाळी, वराटिका, नाबद, चामीकर, खोट, गुढार, आडाऊ, फुल्लार, वोयरणे असे अधूनमधून भेटणारे शब्द वाचकाला थांबायला लावतात.

वेदांत, न्याय, मीमांसा, तर्क, योग, समकालीन सांप्रदायिक आचार, नृत्यगीतचित्रादी कला यांचे निर्देश मुक्तेश्वरी भारतात विखुरलेले आहेत. आय, किष्कु सारखे पारिभाषिक शब्द ते वापरतात. विविध पौराणिक कथोपकथांचे संदर्भ त्यांच्या लेखनात वैपुल्याने येतात. वाचक बहुश्रुत आणि त्या त्या शास्त्रवाङ्मयाशी परिचित असेल तरच त्याला अशा निर्देशांचे मर्म समजणार. "कमला केशवा वागेश्वरी। भेटों भावी धर्मागारीं।

---

१३. पहा, आदि. १।४७-५२, १३८-१६१, २।६०-६२, ७८-८०, ३।६३-६५, १६।७३-७६, १७।२४-२७. विराट. ३।६३-७३.

१४. पहा, १।७।१४,१५, १।१०।५५,८५.

१५. पहा, आदि. १७।२२, २७।१३०-१४३, सभा. ९।११४, वन. ६।२०-२१.

१६. पहा, १।२२।४० व ४३ = १।२२।८०, १।२७।६४-७० = २।५।२८-३३, १।२६।९४-९५ = २।१४।१०३-१०४, १।२६।११-३३ (प्रक्षिप्त) = २।८।६-५१, १०।१।३० = १०।१।७०, १०।३।९५ = २।१५।१८१ इत्यादी.

कार्पण्यलोभें विघड करी । तोचि वैरी विष्णूचा ॥ " ( २।३।४० ) हा अशा अपरिचित वाटणाऱ्या निर्देशाचा नमुना.

कल्पना आणि विचार यांचा आवेगपूर्ण कल्लोळ उसळत असल्याने एक कल्पना पूर्ण होण्याच्या आतच मुक्तेश्वरी ओवीत दुसरी कल्पना धागे विणू लागते. त्यामुळे असंबद्धता व विसंगती येते. दूरान्वय आणि अर्थव्यक्तीसाठी आवश्यक शब्दांचा क्वचित होणारा लोप यामुळेही मुक्तेश्वरी रचनेत कधी क्लिष्टत्व येते.

मुक्तेश्वरी रचनेतील क्लिष्टतेचे आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप नांदापूरकरांनी सांगितले आहे. " कवीचा सर्वसाधारण भाव वाचकास कळतो, मात्र मर्म कळत नाही. पण ही फसगत आहे. हाच भाग दुसऱ्यास सांगण्याचा प्रसंग आला म्हणजे वाचकास विशिष्ट ओवीतील मर्म आपणास कळाले नाही हे कळते. "[१७] हा मुक्तेश्वरांच्या कोणाही वाचकास येणारा अनुभव आहे. पण यावर एक तोडगाही आहे. आणि तोही नांदापूरकरांनी सांगितला आहे, " मुक्तेश्वरांची एक ओवी आडली तर दुसरी तिज-पुढील ओवी वाचल्याने मागल्या ओवीची साधारण कल्पना येते. "[१८] त्यामुळे उपरोक्त क्लिष्टता काहीशी कमी होते.

शब्दमूलक क्लिष्टता मुक्तेश्वरात विरळ आहे. वाक्यरचनात्मक क्लिष्टता असली तरी स्पष्टीकरणात्मक ओव्यांनी ती कमी होते. त्यांची निर्देशात्मकता क्वचित दुर्बोध होते. पण बहुंशी ती गुणरूप आहे. मुक्तेश्वरांच्या प्रदीर्घ रचनेच्या तुलनेने क्लिष्ट भाग गौण आहे. तिची प्रासादिकता त्यामुळे कोठे उणावलेली नाही. स्पष्टीकरणात्मक ओव्या, विस्तारशील रचना, परिचित शब्दकळा, अनेकांगी चित्रण यामुळे ती प्रसादमय झालेली आहे.

## ५. मुक्तेश्वरी शैलीचे द्विविध आविष्कार.

मुक्तेश्वरी शैलीत जसा मराठीचा कसदारपणा आहे तसा संस्कृतचा डौलही आहे. तिची ही दोन्ही रूपे सारखीच रमणीय आहेत.

### ५.१. मराठी वळणाचा ढंग.

मुक्तेश्वरांच्या शैलीला एक मराठमोळा रंग आहे. ' वीरज्येष्ठ 'ऐवजी ' वीरजेठी ' असे अस्सल संस्कृतऐवजी मराठी वळणाचे तद्भव शब्द ते आधिक्याने वापरतात. धावणेकरी, काठीकर, ' धनीपणाचा शब्दु 'यांसारखे शब्द तेच वळण गिरवितात. म्हणी व वाक्प्रचार ही लोकभाषेची लेणीही त्यांच्या कवितेच्या अंगावर खुलून दिसतात. कंठी झोंबणे, पाठी रिघणे, आर्त पुरविणे, हाक वाजणे, विजय पाठीशी बांधणे, कौतुक डोळीं पडणें, शिखा स्वस्थानी साजरी, वेडी आवडीची जाती, दचक बैसणे, यांसारख्या वाक्प्रयोगांनी अभिप्रेत अर्थ ते रेखीवपणे व सारगर्भ रूपात प्रकट करतात.

---

१७. १८. ना. गो. नांदापूरकर : मुक्त–मयूरांची भारते : पूर्वोक्त : पृ. ५८७.

भावक्षोभाच्या प्रसंगात मुक्तेश्वरी शैली सहजगत्या मराठी वळणे स्वीकारते. द्रौपदीच्या आर्त-व्याकुळ धाव्यात स्त्री-सहजशैली सफाईदारपणे वापरली आहे. बहिण म्हणें मी पाठींची, परी मज येवढें भाग्य कैंचें ? मी दासी किंकरी साचें, माया माझी तुवां सांडिली, धाव पाव मायबहिणी। वेळ न लावी स्नेहाळे, एवढे निर्वाण कां मांडिले ? अहो ! कृष्णे ! जननिये !, तुझे पाय याचि डोळां। कोण्यामुखें विलोकूं ? (२।२५।१२३, १२४, १५१, १५२, १५७, १६२ ) या द्रौपदीच्या उद्‌गारातील प्रश्नात्मकता, व्याकुळ हाकांना आलेले टाहोचे स्वरूप, आप्तसंबंधातील भावबंध व सहजसाधी शब्दकळा यांना एक मराठी स्पर्श आहे. " जो ! दुःशासना " यातील ' जो 'चा वापर खास मराठी आहे. मान वाकवून कर्णाकडे पहात मिशीला पीळ देत ' आठव असू दे ' (२।१६।२७९) असे म्हणणाऱ्या अर्जुनाची आव्हानपद्धती भारती असण्यापेक्षा मराठी अधिक आहे. " बोळवीत निघाला ", " वनवास सरलिया महाराजा। पुरुषभेटी पातल्या " अशी मराठी मोडणीची शब्दावली व अभिव्यक्ती येते. " जिहीं हा रंग देखिला डोळीं। तेंचि तोही देखती " ( २।१६।८७ ) या उद्‌गारातील शुद्ध मराठी ढंग जाणवण्यासारखा आहे. तो त्यांच्या कथनाला आवाहक रूप देतो.

## ५·२. संस्कृतचा डौल

मुक्तेश्वरी भाषेवर संस्कृतिकरणाचा संस्कार झालेला आहे. रूढ असलेले संस्कृत शब्द त्यांनी प्राचुर्याने वापरले. क्वचित गीष्पति, संशितव्रती, अनुपनीत असे अपरिचयाने दुर्बोध वाटणारे शब्दही त्यात आहेत. शब्दांच्या वापरातही ते संस्कृतसरणीचा अवलंब करताना दिसतात. संस्कृत शब्दांचे समास संस्कृत नियमांनी करणे, विशेषणाला विशेष्याच्या लिंगवचनाप्रमाणे प्रत्यय लावून विभक्तिरूपे करणे, संस्कृतातील लिंग, वचन, विभक्ती, आख्यातरूप जशीच्या तशी मराठीत कायम ठेवणे, संस्कृत विशेषनामांची भाषांतरे करणे, या लकबी त्यांच्या रचनेत दिसतात. सूपकर्मा, जीमूतनामा अशी विभक्तिरूपे; कुंकुमतांबोलहीना अंगना अशी विशेषणे; पायसें अशी नपुंसकलिंगी तर मस्तक अशी पुल्लिंगी योजना; चत्वारि, अष्टौ अशी संख्याविशेषणे; मयरथा अशी आख्यानरूपे संस्कृतसरणीची आहेत. ' पाठशिवणी 'सारख्या शब्दाचे ' पृष्टि-सिवणी ' असे संस्कृतिकरण ते करतात. ' अचळग्रंथिके अचुक पाप ' असे मराठी वाक्प्रचारांना संस्कृत वळण देतात. ' कधी ' न भूतो न भविष्यति 'सारखे संस्कृत वाक्प्रचारही वापरतात. ' तयाचा धर्म क्लिक्षण ' ( ३।१८।५१ ) असे संस्कृत शब्द मध्येच येतात. तुष्टिरस्तु पुष्टिरस्तु मनोरथावाप्तिरस्तु अशी आशीर्नमस्क्रियारूप वाक्ये वा ' वा किंचित् कामप्रवेदने । ' तथैव भविष्यति ', ' सर्पापसर्प भद्रं ते । जनमेजयस्य यज्ञांते ' (२।१२।४१) असे संस्कृत वाक्यांश अधूनमधून भेटतात. चंद्र-चकोर, चंद्र-कमल, कमल–भृंग असे किती तरी संस्कृत कविसंकेत त्यांनी मुक्तहस्ताने वापरले आहेत.

संस्कृत वाङ्मयात रूळलेले शैलीचे थाटघाट मुक्तेश्वरांची मराठी वठवू पाहते. एका हस्तिनापुरासाठी गजपुर, कुंजरपूर, गजाव्हय, मातंगपूर, नागाव्हय अशा पर्यायी

शब्दांचा सडा पडतो. त्यांचा भीष्म धर्मराजास ' पुत्रपुत्रा ' म्हणतो तर धर्म त्याच ठेक्यात भीष्माला ' जनकजनका ' म्हणतो. " बाळबुद्धी वर्ते धर्मा । बुद्धिभ्रंश वृद्धा भीमा ", " करूनि पूज्यांचा अवमान । अपूज्य पूज्य सन्मान ", " निःशब्द नादब्रह्म " अशा शब्द-कल्पनांचा विरोधन्यास ते कधी साधतात. भूतदयेचा वारा देणारा पंखा ते नेमका ' अक्रूरा 'च्या हाती देतात, शेषशायी ज्या श्वेतचवाईवर आरूढ झाला ती ' शेषाकृती ' होते हे आवर्जून सांगतात आणि अर्थसंवादाची चमत्कृती दाखवितात. " द्वादशानंतरे त्रयोदशी । ग्रहभोग खंडती सायासी । गेले लाधेल चतोर्दशी । आजी सुमुहूर्त प्रयाणा "[१९] या प्रतिकामीच्या निरोपात धर्मास बारा वर्षांच्या वनवासाची, तेराव्या वर्षाच्या कष्टाची आणि चौदाव्यातील पुनःप्राप्तीची गूढ सूचना आहे. अर्थदृष्ट्य अशी कूटरचना मुक्तेश्वर जशी करतात तशी " म्हणूनि फाल्गुन वीर विचित्र । फाल्गुन मी पितृव्यपुत्र । पुढती फाल्गुनाचा मंत्र । हा फाल्गुन मी कर्ता " ( २।१७।८ ) अशी शब्दनिष्ठ कूटरचनाही ते करतात. " तिसरा जो कां आजानुबाहो । तो द्रौपदीचा तिसरा नाहो । त्रिशुद्धी करूनि खांडवदाहो । तोषविले त्रिपादा " (२।६।१५४) अशी अर्जुनाची चमत्कृतिपूर्ण ओळख ते करून देतात. त्यातील ' तीन 'ची साभिप्राय पुनरुक्ती त्यांच्या कलाचतुर मनाची साक्ष आहे. आस्तिकाने केलेली जनमेजयाची स्तुती ( १।११।६६-१०० ) हा प्रसन्नतेच्या पारिजातावरील घमघमीत वाक्यपुष्पांचा सुगंधच आहे. विविध टप्प्यात विभागलेले हे मुद्देसूद आशीर्वचन आहे. नीतिमूल्यांचा उच्चार, पुराणसंदर्भ, पुनरुक्त पदबंध, आरंभीचे वर्णन, साक्षी व्यक्तींच्या प्रतिक्रिया व परिणामदर्शक वर्णन यांमुळे या आशीर्वचनाला एक प्रकारची पूर्णता लाभलेली आहे. ज्ञानदेवांच्या वाणीतील माधुर्य, कल्पकता, गोडवा व प्रसन्नता मुक्तेश्वरी वाणीत येथे अवतरली आहे. विदग्ध संस्कृताचा डौल तिला लाभला आहे. मराठीचे सामर्थ्य, भारदस्तपणा, अर्थव्यक्तीक्षमता त्यांनी पुऱ्या सामर्थ्याने व्यक्तविली आहे. कल्पक अलंकारविन्यास, पर्यायोक्ती, वक्रोक्ती यांचाही वापर मुक्तेश्वर करतात. त्यांच्या शैलीचे पंडिती वळण यावरून स्पष्ट व्हावे.

## ६. मुक्तेश्वरी शैलीचे विकसन

मुक्तेश्वरांच्या लेखनात शैलीचे चढउतार, वळणेवाकणे दिसतात. त्यांनी काव्यलेखनाला आरंभ केला तो नाथांच्या वाङ्मयीन संस्कारात. नाथांची शैली बहुरूपी असली तरी सहज-साधी, वृत्तकथनात्मक आणि स्पष्टीकरणात्मक आख्यानशैली त्यांनी वैपुल्याने वापरली. मुक्तेश्वरांनी ' गजेंद्रमोक्षा 'सारख्या पहिल्यावहिल्या स्फुटकाव्यातून तिचेच अनुसरण केले. मध्ये ती जवळजवळ लोपली आणि अखेरीला--विशेषतः वन व विराट-

---

१९. २।१६।२७ चा नांदापूरकरांनी दिलेला ' वसु-पाठ '. ही ओवी विदुरमुखी असल्याचे त्यांनी अनवधानाने म्हटले आहे ( पृ. ७०२ ). ती प्रतिकामीच्य मुखी येते.

पर्वात--ती पुन्हा अधिक सामर्थ्यशाली होऊन साधेपणाकडे वळली. आरंभी नाथांच्या संस्काराने आणि पुढे भाषेच्या जिवंतपणाचे रूप ओळखून मुक्तेश्वरांनी आख्यानपद्धतीच्या सहजशैलीचा स्वीकार केला असे दिसते. तिचे रूप साधे, गती वेगवती आणि प्रतीती प्रत्यक्ष आहे.

नवथर लेखकाला भाषेचे--तिच्या रूपलावण्याचे, विविध विभ्रमांचे—विलक्षण आकर्षण असते. या आकर्षणाने काव्यरचनेच्या उमेदवारीच्या काळातच "शतमुखरावणवधा, ख्याना "सारख्या स्फुटकाव्यात मुक्तेश्वर पांडित्यपूर्ण व आलंकारिक शैलीकडे वळलेले दिसतात. नाथांचे भावार्थरामायण समोर असूनही त्यांच्या संक्षेपरामायणाने भाषेचे विदग्ध रूप निष्ठेने सांभाळले. त्यांची भाषा संस्कृतिकरणाने संस्कृतचा डौल आणि ऐश्वर्य मिरविणारी आहे. रूढ-अरूढ संस्कृत शब्दांचा वापर, भाषेची संस्कृत व्याकरणाधिष्ठित मोडणी आणि संस्कृत काव्यदर्शांचे अनुसरण यामुळे संस्कृतची प्रौढता मुक्तेश्वरी वाणीलाही लाभली आहे. सौप्तिक या प्रारंभपर्वातील भाषा अलंकारांनी भारावलेली, संस्कृताने जडावलेली व पंडिती वळणाचे रेंगाळते संस्कार मिरविणारी आहे. आदिपर्वातही तिचे नमुने सहज सापडतात.

सहज आख्यानशैली व पांडित्यपूर्ण थाटाघाटाची शैली या परस्परभिन्न टोकांमध्ये मुक्तेश्वरांची शैली आंदोलताना दिसते. या आंदोलनाचे ठसे त्यांच्या भारतावर अस्पष्टपणे उमटले आहेत. त्यांच्या भारतीशैलीत या दोन्ही प्रवृत्ती विघटित रूपात दिसत नाहीत. तिच्यात त्यांचा एक संश्लेष--विशेषतः सभापर्वात व साम्यग्यानेही—प्रत्ययाला येतो. साधेपणा व अलंकृती, सहजता व विभ्रमकुशलता, सुबोधता व अर्थगांभीर्य, आवेगशीलता व संथ गतीचा कल्पनाविलास, भावोद्रेक व तपशीलाचा बारकावा यांचा एक विलक्षण संघात मुक्तेश्वरी शैलीत आहे त्यामुळे शब्दालंकाराचा सोस बाळगणारी, अर्थचमत्कृतीचा हव्यास धरणारी आणि विदग्ध जनांसाठीच अवतरलेली पंडिती वळणाची कृत्रिम शैली असे रूप तिला आले नाही. त्याचप्रमाणे रंजकतेसाठी कथाकथनकेंद्रित झालेली आणि उद्बोधनासाठी स्पष्टीकरणात्मक बनलेली सहज-साधी आख्यानशैली असेही रूप तिला आले नाही. या दोन्ही शैलीविशेषांना पचवून ती वर गेली आणि तिने स्वतःचे संश्लिष्ट नवरूप घडविले. संस्कृतभाषेचा डौल आणि लोकभाषेचा कसदारपणा, सुबोधता आणि वाणीचा वाहता प्रवाह, अभिजाततेचे ऐश्वर्य आणि अनागर भावशीलता यांनी तिचे रूपलावण्य मूर्त झाले आहे. ती अर्थवती, संवेदनांची आलंकारिक चित्रे रेखाटणारी, पुराणसंस्कारांशी वाचकांना जोडणारी आणि भावोद्रेकी झाली आहे. मुक्तेश्वरांची वर्णने प्रत्यक्ष वास्तवाचा जिवंत व उत्कट प्रत्यय देणारी का; त्यांचे संवाद ओजस्वी व भावनांनी उचंबळून येणारे का आणि त्यांची कथनशैली वाचक-श्रोत्याला आपल्याबरोबर घेऊन जाण्याइतकी वेधवती का; या प्रश्नांची उत्तरे मुक्तेश्वरांच्या या भावमुग्धा शैलीतही आहेत.

संस्कृत विदग्ध काव्यनाट्यांचा व रामायण-महाभारतादी आर्ष महाकाव्यांचा व्यासंग-पूर्वकवींचे संस्कार, डोळस परिभ्रमण, सूक्ष्मावलोकन-कल्पकता-शब्दप्रभुत्व, समन्वयशील धारणा आणि उत्कट व आवेगी मनोवृत्ती या मुक्तेश्वरांच्या व्यक्तित्वविशेषांनी या शैलीचे रूपरंग घडविले आहे. तिच्यात प्राण फुंकला आहे.

## ७. समारोप

मुक्तेश्वरांची भाषा लोकजीवनाची परिचित भाषा आहे म्हणून ती लोकहृदयाचा ठाव घेणारी झाली आहे. परिचित तत्सम, मराठी वळणाचे तद्भव व अस्सल मराठी शब्दांनी तिची घडण झाली आहे. तत्कालीन समाजतील विनिमयक्षम शब्दांच्या वापराने त्यांनी काव्यांतर्गत भावनांना जिवंत रसरशीतपणा प्राप्त करून दिला. मुक्तेश्वरी काव्यातील भावनिर्भरता व आवेगशीलता या वैशिष्ट्यपूर्ण शब्दकळेने प्रतीत होते.

संस्कृत ' जीर्णकवी ' आणि ' प्राकृतकविश्वराचार्य ' या दोन्हींचे संस्कार पचवून ती आपल्या बळावर उभी आहे. शब्दांचा साक्षेपी व कोरीव कुसरीचा वापर ती करते. साक्षी व्यक्तींच्या प्रतिक्रिया टिपणे, नामावळी व नामव्युत्पत्ती देणे, श्रेणीपद्धतीने विचार-विवरण करणे आणि प्रसंगानुरोधाने सुभाषिताच्या वळणाची सूत्रमय भाषा लिहिणे या तिच्या सहज लकबी आहेत. कोरीव शब्दचित्रे, अनेक घटकयुक्त गतिशील चित्रण, अनेकांगी आरेखन, उपरोधाचा फणकारा, प्रभावी पुनरुक्ती हे आपले सामर्थ्य ती अर्थव्यक्तीसाठी एकवटते.

अतिरेक व अनौचित्य यामुळे ग्राम्यता, अश्लीलता, विसंगती, देवताविडंबन, स्वानु-करण यांसारख्या दोषांची ती कधी वाटेकरी होते. क्वचित ठिकाणी ती क्लिष्ट वाटली तरी तिची एकूण प्रसादमयता उणावलेली नाही. समग्रतेने पाहिले तर तिचे गुणवैभव प्रायः निर्मळ राहिले आहे.

मुक्तेश्वरी भाषेत मराठी वळणाचा ढंग आणि संस्कृतची प्रौढता आहे. आख्यानशैली आणि पंडितीशैली या आपल्या काळाच्या विरुद्धप्रकृती शैलींचा परिपाक तिच्यात उतरला आहे. आरंभीच्या लेखनातून बदलत गेलेले तिचे परिपूर्ण रूप अखेर त्यांच्या भारतात सिद्ध झाले आहे. हे रूप शुद्ध, प्रौढ व आशयोन्मुख मराठीचे आहे. मराठी भाषेला घडविणाऱ्या मोजक्या प्रतिभावंत शैलीकार मध्ययुगीन कवीत मुक्तेश्वरांचे स्थान मानाचे आहे.

□ □ □

# नऊ ॥ मुक्तेश्वरी भारताचे स्वरूपविशेष

आतापर्यंतच्या विश्लेषक अभ्यासात जाणवलेले मुक्तेश्वरी भारताचे स्वरूपविशेष येथे एकत्रितपणे न्याहाळावयाचे आहेत.

**आर्ष महाकाव्याचे वळण**

पूर्वेतिहास, संस्कृतिदर्शन, मौखिक परंपरा, प्रतीकात्मकता, भव्योदात्तता आणि वस्तुनिष्ठा हे आर्ष महाकाव्याचे गुणधर्म महाभारतात पुरेपूर आहेत. महाभारतकारांची विशाल मनोवृत्ती, त्यांनी घडविलेले व्यापक जीवनदर्शन व त्यावरील मर्मभेदक भाष्य, त्यांची व्यामिश्र व रसरशीत पात्रसृष्टी आणि घटनाप्रसंगात खेळविलेले नाट्यात्म काव्य यामुळे महाभारत हे भारताचे सर्वश्रेष्ठ महाकाव्य ठरते. कुरुकुलातील पुरुष व स्त्रिया यांच्या जीविताचे वर्णन करताना वेद–उपनिषदे-वेदांगे व इतर सर्व शास्त्रें यांचे रहस्य त्यात सहजपणे व्यक्त झाले आहे. त्यात भूत-भविष्य–वर्तमान हे तिन्ही काळ, जरा–व्याधी-मृत्यू–भय, पदार्थांचा भाव व अभाव यांचा सुलभ सौंदर्याने निश्चय झाला आहे. इतिहास–पुराणांचे उद्दीपन झाले आहे. सारांश, प्रवृत्तिनिवृत्तीपर धर्म आणि लोकव्यवहार यांचे काव्यात्म प्रतिपादन व्हावे अशा धोरणाने व्यासमहर्षींनी या महाकाव्याची बांधणी केली आहे. त्यामुळे हे काव्य केवळ कुरूकुळाचे न होता अवघ्या मानवकुळाचे झाले आहे.

हे व्यापक रूप जाणवल्याच्या खुणा मुक्तेश्वरांच्या उद्गारात आहेत. ' सर्वार्थसार ' ( १।१३।१२४ ), ' पंचमवेद ' (१।१।११०), ' इतिहासरूपे अगस्ति ' (१।१।१९१), ' लोकतारक चरित सांगणारा कथाक्षीरनिधी ' (१०।१।११), ' ग्रंथग्रहगणी प्रभाकर । भारत साहित्यरत्नाकर ' (१।१५।१५९), ' सकळ ग्रंथांचे कुळदैवत ' (१।१०।११९) यातून महाभारताची व्यापकता, सर्वसंग्राहकता, इतिहासरूप, सकलकामनाफलदायित्व, अध्यात्मस्पर्शित साहित्यरूप आणि वाङ्मयीन वैभव मुक्तेश्वरांना प्रतीत झालेले दिसते. महाभारताचे अनेकांगी रूप आपल्या भारताच्या संदर्भात त्यांनी विस्ताराने स्पष्ट केले आहे. राजांसाठी वीररस, विप्रवर्यांसाठी वेदसारांश आणि योगेश्वरांसाठी तत्त्वार्थबोध आहे. चतुर मंत्र्यांना तो बुद्धियुक्तीचा सागर वाटेल तर विलासीजनांना येथील शृंगार कामोद्दीपक वाटेल. शाल्यांना तो अमृतमधुर असून आर्तांना दोषक्षालन करणाऱ्या गंगाप्रवाहासारखा आहे. ( २।१।१५–१८ ). वीर–शृंगारप्रधान रसमयता, लौकिक राजनीती व अलौकिक अध्यात्म यांच्या निर्देशाने मुक्तेश्वरांनी महाभारताचे भावात्म व चिंतनात्म रूप सुचविले आहे व आपल्या भारतात ते आवर्जून जपल्याचे सांगितले आहे.

युद्ध, अन्न, वस्त्र, वास्तू, क्रीडा, गमनागमन यांची भव्योदात्त वर्णने; व्यक्तींचे प्रीतिबंध आणि लौकिक आचारविचारांचे निरूपण मुक्तेश्वरी भारतात येते ते महाभारताचे लौकिक रूप सांभाळण्यासाठी. नैतिक शिकवण, पारमार्थिक बोध आणि प्रसंगानुरोधाने आलेली तत्त्वचर्चा महाभारताचे अलौकिक रूप सांभाळण्यासाठी येते. भावात्म व चिंतनात्म, लौकिक व अलौकिक असे महाभारताचे चतुर्विध रूप मुक्तेश्वरांना अभिप्रेत असून आपल्या मराठी अवतरणात त्यांनी ते टिकविले आहे.

गतकाळापासून वर्तमानकाळापर्यंत राष्ट्रजीवनाशी व संस्कृतीशी संबद्ध असलेली भारतकथा मुक्तेश्वरांनी स्थूलमानाने स्वीकारली. त्यामुळे त्यांच्या कथावस्तूस भारती कथा-वस्तूचे महाकाव्यात्म परिमाण लाभले आहे. उपाख्यानांवरही ते रेंगाळतात आणि महाभारताचे आख्यानोपाख्यानांनी समृद्ध असलेले रूप जपू पाहतात. त्यातील प्रवृत्ति-परतेच्या आधाराने त्यांनी स्वधर्मरक्षणाचे परिस्थितीजन्य कार्य केले. भक्तीच्या स्वकालोचित आशय देऊन आपल्या सांस्कृतिक संचितास उजाळा दिला. गतकाळाचे नवार्थदर्शन घडविण व कालोचित प्रेरणेच्या सूत्रात प्राचीन कथा बांधणे या महाकवीच्या श्रेयाचे ते वाटेकरी झाले आहेत.

उच्चपदस्थ, कुलीन आदर्श, भव्योदात्त, प्रतीकात्मक अशी महाभारती पात्रसृष्टी त्यांनी स्वीकारली. कालनिष्ठ जाणिवांनी तिचे चित्रण केले व त्यातील मूल्यनिष्ठेचे सूत्र अधिक ठसठशीत केले. कालिदासादींच्या विदग्धतेपेक्षा त्यांची पात्रे भारती आर्ष वळणाची अधिक आहेत.

बहिर्मुख कृतिचित्रण, भव्योदात्त जीवनदर्शन आणि विस्तीर्ण रंगफलक यामुळे महा-काव्यात वर्णनाला व तज्जन्य विस्ताराला महत्त्व येते. कथेच्या गतिशीलतेची उणीव महाकवी अशा प्रतिभासंपन्न वर्णनांनी भरून काढतो. महाभारताचे मराठी अवतरण घडविताना स्वातंत्र्य घेण्याची संधी मुक्तेश्वरांना येथे होती आणि ती त्यांनी पुरेपूर घेतली आहे. मुक्तेश्वरी भारतातील वर्णनांचे प्रमाण, तज्जन्य विस्तार व आलंकारिक कल्पनाविलास पाहता त्यास महाकाव्यात्म परिमाण लाभले आहे.

महाभारतासारख्या प्रदीर्घ आणि वस्तुनिष्ठ महाकाव्याला अनुकूल व उपयुक्त असलेली संवादात्मक मांडणी, अनुलोम त्रयस्थ निवेदनपद्धती महाभारतकारांनी वापरली असून मुक्तेश्वरांनी कायम ठेवली आहे. त्यांचे निवेदन अलंकृत व डौलदार आहे. त्यांची शैली भरघोस, प्रतीतिक्षम, साभिप्राय, विस्तारशील व उत्कट असल्याने ती महाकाव्यात्म वळणाची झाली आहे.

वर्ण्यविषयाच्या जोडीला अन्यक्षेत्रीय संदर्भ उभा करून त्याला अधिक अर्थपूर्ण करणारी निर्देशात्मकता महाकाव्याच्या अभिव्यक्तीचे एक वैशिष्ट्य असून मुक्तेश्वरी भारतात ते उतरले आहे. या निर्देशात्मकतेच्या जोडीला कालविपर्यास पत्करूनही मुक्तेश्वर समकालीन ज्ञानसंग्रहाची आर्ष महाकाव्याची प्रवृत्ती जपतात.

महाभारताचा स्थूल साचा त्यांनी स्वीकारला. पण महाभारताचे अंतःसत्त्व, त्याची

वाङ्मयीन परंपरा आणि लोकमानसातील प्रतिमा यांचे भान राखून त्यांनी त्यावर संस्करण केले. नवी दृष्टी, नवी जुळणी आणि मूलभावांना उठाव देणारी वा त्यांचा विकास करणारी नवनिर्मिती करून त्यांनी आपल्या भारतास पुनर्निर्मितीचे स्वरूप दिले आणि तसे ते देताना त्याचे आर्ष महाकाव्यात्म रूप संभाळले. आशयसापेक्ष वर्णन टाळणे ही त्याची अभावात्मक खूण आहे.

महाभारताचे अनेक घटकयुक्त, अनेकांगी, संमिश्र, विविध संदर्भसमृद्ध असे आर्ष रूप मुक्तेश्वरी भारतात जितक्या स्पष्टत्वाने प्रतिबिंबित झाले आहे तितक्या स्पष्टत्वाने अन्य कोणत्याही मराठी महाभारतात उमटलेले नाही.

## २. मुक्तेश्वरी भारताची जडणघडण

महाभारताचे स्वरूप, समकाळाचे चैतन्य व मुक्तेश्वरांचे व्यक्तिमत्व यांच्या एकमेळातून मुक्तेश्वरी भारताची जडणघडण झाली आहे.

महाभारतात ईश्वर, धर्म, नीती ही लोकव्यवहाराचे नियमन करणारी मूल्ये आहेत. तथापि त्याही पलिकडे जीवनाचे एक रितेपण त्यात आहे. जीवनाच्या निष्ठुर, अविरत, चुराडा करीत जाणाऱ्या गतीचे त्यात भान आहे. त्यामुळे सर्व मूल्यकक्षा छेदून मानवी दुःखाचा मूलस्रोत सांगणाऱ्या आगळयावेगळया ' जय ' गाथेचे रूप महाभारताने धारण केले आहे.

मुक्तेश्वर या कक्षा ओलांडू शकत नाहीत. भक्ताची श्रद्धानिष्ठा साऱ्या जीवनालाच निदान त्यांच्यापुरते तरी अर्थपूर्ण करते. गोड करते. ईश्वरी सामर्थ्याने परिवेष्टित आणि परिरक्षित अशा त्या जगात एक ईश्वरनिष्ठा साऱ्यांतून तरून जाण्यास समर्थ आहे असे त्यांना वाटते. या जगात दुष्ट असतात. प्रसंगी ते सज्जनांना त्रास देतात. पण या साऱ्या गोष्टी दैवनियत असतात. त्या घडतात त्या कर्मविपाकामुळे. त्यामागे ' त्याचीही ' इच्छा असते. हे कळल्यावर हळहळ तरी कशासाठी ? म्हणून सुखात हुरळून जाऊ नये, दुःखात व्याकुळ होऊ नये. सुख-दुःखात समत्वभावाने स्मरण करावे ते ' त्याचे '. तो तर कृपेची साउली, अनाथांची माउली, जगन्नियंता, दुष्टदलनाचे आणि साधुपरित्राणाचे व्रत घेतलेला. भक्तांची आवडी असलेला. तुम्ही कोणीही असा — पापी-पुण्यवान, जड-मूढ –– कसेही असा. ' जीवीच्या जिव्हाळयाने ' त्याला साद घाला. तो तुमच्या-समोर उभा आहेच ! तुमच्याजवळ हवा आहे तो त्याच्याविषयीचा अंतःकरणपूर्वक जिव्हाळा, दैवनियततेचे अखंड भान आणि सुखदुःखाविषयीचे समत्व.––शेवटी मुक्तेश्वरांचा जीवनार्थ असा अद्वैत वेदान्तातून निष्पन्न होणाऱ्या जीवनपद्धतीशी संबद्ध आहे. म्हणून त्यांचे भारत धर्मनिष्ठा, ईश्वरनिष्ठा, विश्वाच्या चैतन्यमयतेच्या जाणिवेतून लोकव्यवहाराचे नियमन करणारी नीती आणि जीवनातील कठोर व तर्कहीन वास्तवाला दैवाचे नाव देऊन त्याचा केलेला स्वीकार या मूल्यांचा पुरस्कार करणारे आहे. ही मूल्यात्मकता व्यक्तींच्या संभाषणात गोविलेल्या नीतिवचनातून, उदारचरितांनी केलेल्या

उपदेशातून, भविष्यवेत्त्यांनी केलेल्या भविष्यकथनातून, ईश्वरेच्छेने घडलेल्या उग्र प्रसंगांतून, अशा प्रसंगी झालेल्या परमेश्वरी कृपेच्या शिडकाव्यातून, व्यक्तींनी मनी बाळगलेल्या श्रद्धानिष्ठांतून जागोजाग आविष्कृत झाली आहे.

हे मूल्यात्मकतेचे परिमाण मुक्तेश्वरी भारताला मिळते याची कारणे मुक्तेश्वरांच्या व्यक्तिमत्त्वात, तत्त्वश्रद्धेत, जीवननिष्ठेत, नाथांच्या संस्कारात जशी आहेत तशी मध्ययुगाच्या भक्तिप्रधानतेत व जडमूढ स्थितिशीलतेतही आहेत.

या मूल्यात्मकतेच्या परिघात जीवनाची सारी खळबळ मुक्तेश्वर प्रत्ययकारितेने चितारतात. संतांच्या प्रबोधनाचे सामाजिक अंग, समकालात मराठी वीरश्रीची फाकलेली पहाट, महाराष्ट्र महोदयाचे अग्रदूत असलेल्या नाथांचे संस्कार यांनी मुक्तेश्वरांना जीवनाभिमुख केले असेल. जोडीला प्रकृतिगत रसिकता, विक्रम-विलास यांच्याविषयीची आस्था, भोजन-वस्त्रप्रावरणे मल्लयुद्ध-रमणी अशा उपभोग्य गोष्टींची आवडी, देशप्रदेशात डोळसपणे तुडविलेली भूमी या सर्वांमुळे जीवनाची खळबळ चितारताना त्यांच्या वाणीला उत्साह येतो.

जीवन अधिक वेधक, तीव्र, उत्कट ( ही सगळी भक्तिमूल्ये त्यांच्या काव्यात काव्यमूल्ये झाली आहेत. ) करण्यासाठी ते अधिक तपशील योजतात व भारतकथेवर संस्करण करतात.

या जीवनाला मूर्त रूप देण्याइतके अलंकारवैभव, प्रत्ययकारिता, भावविनिमयक्षमता, कल्पकता, शब्दसौष्ठव व नादाची जाणीव हे सारे त्यांच्याजवळ आहे.

त्यामुळे अनुभव स्वीकारताना मुक्तेश्वर तो उत्कटत्वाने स्वीकारतात. तो साकार करताना ते सारे कसब पणाला लावतात आणि त्याचा अर्थ लावताना मात्र अध्यात्माचा स्वीकार करतात. त्यांच्या भारतातील रसरशीत जीवनचित्रे पाहताना वाचकांचे अंतःकरण वारंवार उचंबळून येते आणि अर्थसंगती लावताना त्याचे मन भगवे होत जाते. जीवनाचे हृदयस्पर्शी चित्र मूल्यनिष्ठ पद्धतीने मांडणे, हा मुक्तेश्वरी भारताचा विशेष आहे. त्यामुळे मुक्तेश्वरी भारत गुणवैभवाने समृद्ध झाले आहे.

## ३. समारोप

मुक्तेश्वरी भारताच्या वाङ्मयीन पहाणीत व भारतकथासंक्रमणाच्या प्रक्रियेच्या निरीक्षणात त्याचे स्वरूप स्पष्टत्वाने डोळ्यासमोर उभे राहते.

व्यासानुसरण कथासूत्र स्थूलपणे सांभाळण्यासाठी करावयाचे. पूर्वपरंपरा आणि लोकमानसावरील संस्कार लक्षात घेऊन रचनास्वातंत्र्य घ्यावयाचे. कथा प्रवाही व निवेदन ओघवते ठेवण्यासाठी संक्षेप-विस्तार करावयाचा. मूलभाव उठावदार करणारी वा तिचे विकसन करणारी नवनिर्मिती महाभारताच्या अंतःसत्त्वाशी सुसंवादी अशा पद्धतीने करून त्याद्वारे त्याचे चैतन्यशील व परिवर्तनशील रूप टिकवायचे. भक्तीसारख्या स्वकालीन जाणिवा कथेशी एकजीव करावयाच्या आणि नाट्य, संवाद, वर्णन या

वाङ्मयीन घटकांद्वारे कथेतील निवेदनात्मक अंश तिच्यात पुरता मुरवून टाकावयाचा असे मुक्तेश्वरांचे एकूण धोरण दिसते. महाभारताचे आर्षरूप त्यातील प्राकृतिक जोमदारपणासह, जीवनदर्शनाच्या विस्तृत आवाक्यासह आणि चिंतनाच्या व्यापकतेसह संभाळण्याच प्रयत्न ते करतात. त्याच वेळी मध्ययुगीन कवीची समाजशिक्षकाची व भक्ताची भूमिकाही ते पार पाडतात. आणि या दोन्हींच्या जोडीला दृकप्रत्यय, गतिमानता, सलगता, ओघ, नाट्यमयता, संवादात्मकता, उत्कटता या वाङ्मयीन घटकांवर अवधान केंद्रित करून आपली कथा अधिक आकर्षक व परिणामकारक करण्याचाही त्यांचा प्रयत्न आहे कधी हे हेतू एकमेकांना छेद देतात आणि मग मुक्तेश्वरी रचनेत अनौचित्य येऊन वैरस्य निर्माण होते, तर कधी त्यांच्या समुचित संघातातून एक सुश्लिष्ट लावण्यमूर्ती साकार होते.

मुक्तेश्वरांची ही रचना त्यामुळे पारंपरिक रचनेहून फुटून वेगळी निघाल्यासारखी वाटते. ती आख्यान-कवितेसारखी सरळ वळणाची साधीसुधी नाही किंवा पंडिती काव्यासारखी बाह्यरूप लावण्याने वेडावलेली शब्दमुग्धा नाही. तिच्यात नैसर्गिक भावनांचे खळाळते उद्रेक आहेत विस्तृत, चित्रमय व सजीव वर्णनांची रेलचेल आहे. आलंकारिक व कल्पनाविलासाची बहार आहे. मार्मिक व्यवहार-नैपुण्याची साक्ष आहे. गूढ तत्त्वचिंतनाचे पुसट स्पर्श आहेत. जीवनाच्या अनेकांगाचे वेधक दर्शन आहे. समकालीन युगमानसाचा हुंकार आहे. पर्जन्याच्या सरीवर सरी पडून वाढत जाणाऱ्या नैसर्गिक अरण्याच्या अंगभूत चैतन्याने, विस्ताराने, गुंतागुंतीने आणि रौद्रभव्य सौंदर्याने त्यांची काव्यसृष्टी प्रकाशमान झालेली आहे. तिची जातकुळी म्हणूनच ज्ञानदेव, नरेंद्र, भास्कर, रघुनाथ पंडित, मोरोपंत या विदग्ध वळणाच्या किंवा जनाबाई, नामा, एकनाथ, कृष्णदयार्णव, श्रीधर या आख्यानात्मक वळणाच्या किंवा कृष्णयाज्ञवल्की-मधुकर, विष्णुदास नामा या लोकवाङ्मयीन वळणाच्या कवीपेक्षा निराळी आहे. तिचा कस कमीजास्त असला तरी ती व्यासांच्या प्रतिभेचे गोत्र सांगणारी आहे.

या अर्थाने मुक्तेश्वर मराठीतील एकमेवाद्वितीयम कवी आहेत. त्यानंतर महाभारताचे मराठी अवतरण घडविणाऱ्या समस्त मराठी कविकुळावर त्यांचाच प्रभाव पसरलेला आहे.

□ □ □

# दहा ॥ महाभारत परंपरा व मुक्तेश्वरी भारत

## १. महाभारताची मराठी परंपरा

महाभारत हा व्यासप्रतिभेचा मध्यान्ह आहे. त्याचे पूर्ण, पर्वात्मक, आंशिक व संकीर्ण असे दोनशेच्या आसपासचे आविष्कार पारख्यांनी नोंदविले आहेत मान्य धर्मग्रंथाचे सर्वसाधारणासाठी लहानमोठे मराठी संस्करण करण्याची ही परंपरा आहे. त्यामागे वाङ्मयीन, सामाजिक व धार्मिक निकड होती. इस्लामी व खिश्चन यांच्या आक्रमक वादळवाऱ्यात स्वधर्मनिष्ठा जागविण्यासाठी महाभारताच्या रूपाने मराठी कवी आपले सांस्कृतिक संचित शोधीत होते. मराठ्यांच्या पराक्रमाच्या चढत्यावाढत्या काळात प्रवृत्तिप्रधान वीरयुगाच्या चैतन्याने सळसळणारे महाभारत कवींच्या आकर्षणाचा विषय बनले. कृष्णाला धर्मरक्षक व बंधमोचक देवावताराचे रूप देऊन त्यांनी पांडवप्रताप वर्णिला. त्यामुळे परिस्थितीजन्य प्रेरणा व भक्तिप्रधान युगमानस यांचा सांधा त्यांना जुळविता आला. 'व्यासानुसरणा'बरोबरच पुराणग्रंथ, लोकमानसावरील ठसा आणि स्वभाषेतील अवतरणपरंपरा यांचीही दखल त्यांनी घेतली. आपले प्रयोजन व वाङ्मयीन प्रवृत्ती यांना अनुसरून त्यांनी महाभारतावर अनेकांगी संस्करण केले. त्या प्रमाणात त्यांच्या भारतांना पृथक्त्व व कवित्वाची कळा आली.

## २. मुक्तेश्वरपूर्व भारतरचना

मुक्तेश्वरपूर्व भारतरचनेचे प्रयत्न तुरळक व अंशात्मक आहेत. जनाबाई (नामदेवकालीन) व नामा पाठक (इ. स. १४५०-१५००) यांच्या भारती रचना-पाठकांचे 'अश्वमेधपर्व' सोडून— स्फुट आख्यानात्मक आहेत. कथाकल्पतरूंतर्गत (समाप्ती इ. स. १६२३) भारत व अठरा ते वीस हजार ओव्यांत विस्तारलेले विष्णुदास नामांचे महाभारत (रचना इ. स. १५८०-१६३३) हेच काय ते पूर्णाविष्कार उपलब्ध आहेत. भारती व्यक्ती व घटना कायम ठेवून त्यांची जुळणी मात्र स्वैर कल्पकतेने—अन्य ग्रंथ व लोककथांच्या आधाराने—मुक्तेश्वरपूर्व भारतात केलेली आढळते. स्वैर रचनास्वातंत्र्यामुळे मूलप्रत्यय त्यात अस्पष्ट उमटला आहे. संक्षेपविस्ताराची नेमकी जाणीव नसल्याने कथा बांधीव वाटत नाही. असंबद्ध कथांची गुंफण झाल्यामुळे त्यांचा बंध विस्कळीत वाटतो. वृत्तकथनात्मक, स्पष्टीकरणात्मक शैलीने त्यांना काव्याची कांती क्वचितच लाभते. मुक्तेश्वरपूर्व भारतें [१] अशा प्रकारे आशयक्षय, रूपक्षय व शैलीक्षय अशा त्रिदोषाने ग्रस्त झाली होती.

---

१. पूर्वपरंपरेच्या संदर्भात मुक्तेश्वरी भारताचा संवाद-विरोध कथा, व्यक्तिदर्शन व यांच्या अंगाने मागे स्पष्ट केलाच आहे.

### ३. मुक्तेश्वरी भारताचे वेगळेपण

हे लक्षात घेतले म्हणजे मुक्तेश्वरी भारत हा संस्कृत भारत त्याच्या आर्ष डौलात सादर करण्याचा पहिला जिद्दीचा व महत्त्वाकांक्षी ( ॲम्बिशस् ) प्रयत्न असल्याचे जाणवते. महाभारताचे रूपपरिवर्तन करणारे स्वैर स्वातंत्र्य त्यांनी घेतले नाही किंवा लोकमानसात रूजलेल्या परंपरेकडे पाठ फिरवून भारतसंहितेचे काटेकोर अनुसरणही त्यांनी केले नाही. त्यामुळे त्यांचे भारत विष्णुदास नामांच्या भारतासारखे 'परिमंडलकथा' झाले नाही किंवा मोरोपंती भारताप्रमाणे मूलकथेच्या सुचक संक्षेपासारखे झाले नाही. व्यासानुसरणाने ते महाभारताचा महाकाव्यात्म प्रत्यय देते आणि परंपरेचे भान व भारतकथासंक्रमणातील प्रक्रिया यामुळे अनुकृतीपासून दूर जाते. मुक्तेश्वरी भारत पूर्वोत्तर भारती रचनेपेक्षा भिन्न झाले आहे ते असे. मुक्तेश्वरांनी विस्ताराने समग्र भारतकथा सांगण्याचा धिवसा धरला. रचनास्वातंत्र्याला मूलनिष्ठची मर्यादा आखून दिली. प्रसाद टिकवून पांडित्याचा डौल मिरविणारी भाषा वापरली. ओवीसारखे कथेच्या ओघाबरोबर वाहणारे लवचिक माध्यम स्वीकारले. रेखीव कथाबंध, उठावदार स्वभाव-चित्रण, चित्रदर्शी वर्णने, भाववाही संवाद व अलंकारमंडित विभ्रमकुशल शैली यामुळे त्यांच्या भारताला काव्यात्म उंची लाभली. आध्यात्मिकता व कथात्मकता यांचा समतोल साधीत महाभारताचा आर्ष महाकाव्यात्म घाट सांभाळण्याची त्यांनी धडपड केली. 'भावार्थरामायणा'च्या रूपाने एकनाथांनी दिलेला प्रदीर्घ कथाकाव्याचा बंध त्यांनी परिष्कृत व अधिक कलात्म रूपात आपल्या भारतात सिद्ध केला. एकनाथांनी मळलेल्या वाटेने मुक्तेश्वर पुढे गेले आणि तिच्या विविध वळणावाकणावरून दिसणारे सौंदर्य त्यांनी पुढीलांकरिता खुले केले.

### ४. मुक्तेश्वरी भारताचा प्रभाव

पुढील काळात प्रदीर्घ कथाकाव्याच्या रचनेत महाभारताला मिळालेले प्राधान्य मुक्तेश्वरी प्रभावाचे द्योतक आहे. मुक्तेश्वरी भारताच्या अनुकरणातून किंवा प्रभावातून या काळातील महाभारताचे मराठी अवतार घडत गेलेले दिसतात.

**हरि वामनाच्या** विराटपर्वात मुळाहून वेगळे असलेले तपशील मुक्तेश्वरी विराट-पर्वातून उचलेले दिसतात. **शुभानंदाच्या** उद्योगपर्वात मूलानुसरण आहे तर भीष्म-पर्वात ( रचना इ. स. १७६६ ) काहीसे रचनास्वातंत्र्य आहे. त्यांच्या कल्पनाविलासात सांकेतिकता असली तरी निवेदनात ओघ व प्रसन्नता आहे. सुभाषितात्मक रचना, उत्तान शृंगारवर्णन, कालविपर्यास, बहुश्रुतता प्रकट करण्याची हौस यातून शुभानंदाने गिरवि-लेले मुक्तेश्वरी वळण स्पष्ट होते. मुक्तेश्वरी भाषा मात्र त्यांना साधलेली दिसत नाही. **गोपाळ** हे मुक्तेश्वरांचे अवतार[२] असल्याचे नरहरि मालूने नोंदविले आहे! त्यांचे भारत ( रचना इ. स. १७६८ ) पाऊणलक्ष ओवीसंख्येचे असावे. "या गोपाळाने

---

२–३. वि. ल. भावे, महाराष्ट्र-सारस्वत, पूर्वोक्त. पृ. ६८७–६८८.

मुक्तेश्वराची चारी पर्वें पाहिली होती, हे मुक्तेश्वरी शब्द व उपमा त्याच्या ग्रंथात जागोजाग आढळतात यावरून स्पष्ट दिसते . मुक्तेश्वरी वळण होईल तितके आणतोच, व काही–काही ठिकाणी ते त्याला साधलेही आहे." [३] नरहरि मोरेश्वरांनी उद्योग–भीष्म-द्रोण–कर्ण ही चार भारती पर्वें ( रचना इ. स. १७५९ ते १७६९ ) लिहिली. समर्थसांप्रदायिक असूनही त्यांची कविता रामदासांपेक्षा मुक्तेश्वरी वळणाची अधिक आहे. कल्पकता, भाषाप्रभुत्व, पांडित्य, प्रौढता व वीररसाचा उठाव या गुणविशेषांनी त्यांची रचना विनटलेली आहे. मुक्तेश्वरांप्रमाणेच मूलानुसरण न करणाऱ्या प्राकृत कवींना ते दोष देतात व " सांगो विसरला व्यासकवी ' अशी मुक्तेश्वरांच्या शब्दांतच व्यासांना आठवण करून देण्याची धिटाई दाखवितात. पर्यायी शब्द, शब्द-वाक्यार्थांच्या पुनरुक्तीचा प्रभावी वापर, पांडित्यनिदर्शक संख्यासंकेत, शब्द–कल्पनांचे साम्य यांमुळे मुक्तेश्वरी प्रभावाची जाणीव या रचनेत होत राहते. तथापि मुक्तेश्वरी संस्कार या कवितेच्या अंगावर फुटलेले नाहीत. ते तिच्या अंगांगात मुरलेले आहेत. **मैराळाचे** विराटपर्व ( रचना इ. स. १७८३ ) १५ अध्यायांचे व २००९ ओव्यांचे आहे. मुक्तेश्वरांचे भक्तिभावपूर्वक निर्देश त्यांनी केले आहेत. मुक्तेश्वरी विराटपर्वातील सुमारे ५०० ओव्या[४] त्यांनी आपल्या विराटपर्वात सरळ समाविष्ट केल्या आहेत ! **अनंततनयांचे** सहा हजार ओव्यांचे उद्योगपर्व प्रायः मूलनिष्ठ आहे. मुक्तेश्वरी भारताच्या अपूर्णतेच्या जाणिवेतून झालेली ही रचना[५] मुक्तेश्वरी मुद्रा माथ्यावर मिरविते. **जिवाशिवा** ( जीवितकाल इ. स. १७०३ ते १८२८ ) गुरूशिष्यांचे संयुक्त नाव धारण करणाऱ्या चैतन्यसांप्रदायिक कवीने ६८ अध्यायांची व १०६१२ ओव्यांची १२ पर्वे रचिली. त्यांना मुक्तेश्वरांची आदि–सभा–वन–विराट, गोपाळांचे उद्योग व श्रीधरांचे अश्वमेध जोडून त्यानी आपले चक्री भारत पूर्ण केले. मुक्तेश्वरी पर्वानंतरची पर्वें रचून त्यांचे भारत पूर्ण करण्याचा हा सहेतुक प्रयत्न होता.

**श्रीधरांचा** पांडवप्रताप ( रचना इ. स. १७१२ ) हे या परंपरेतील लोकप्रिय ठरलेले भारतकथेचे संस्करण आहे. कुटुंबवत्सल, पुराणप्रिय, सश्रद्ध मनोवृत्तीशी संवाद साधणारे व सर्वसाधारणांच्या अभिरूचीशी मिळते–जुळते श्रीधरी लेखन नेहमीच लोकप्रिय राहिले. अतिसंकोच व अतिपाल्हाळ टाळून ६४ अध्यायांच्या १३,३९७

---

३. ४. दा. के. ओक, मुक्तेश्वरकृत महाभारतः विराटपर्व, मुंबई, द्रु. आ. १९३९. पृ. ६. सदृश अध्यायांचे कोष्टकही तेथे दिले आहे.

५. पूर्वी मुक्तेश्वरें । अनेक कवींच्या ईश्वरें
आरंभिलें भारत सारें । भाषाधारें रचावया ॥
परी तें न गेलें समाप्ती । ऐसें तर्कुनी सर्व मतीं
चतुर्थानंतरें पंचमीं प्रीती । ' उद्योगी ' मती संचारली ॥

—अनंततनय, उद्योगपर्व

ओव्यांतून (अश्वमेध वगळता १२,२४४) पांडवकथेचा सलग मथितार्थ त्यानी सांगितला आहे. अन्य ग्रंथांचे आधार, चटकदार संक्षेप, सुबोध मांडणी, वीर-करुणाचा प्रकर्ष, शर्करावगुंठित तत्त्वविचार आणि ओघवती प्रासादिक भाषा ही पांडवप्रतापाची वैशिष्ट्ये आहेत. अनुकरण, भारतीक्रमातील बदल व काही ठिकाणचा रसापकर्षक संक्षेप या काही उणीवा. मुक्तेश्वरांचा निर्देश नसला तरी त्यांचा प्रभाव ' पांडवप्रतापा 'वर पुष्कळच आहे. पांडवप्रताप मुक्तेश्वरी भारताचा ' केवळ तर्जुमा ' वा त्यांतील ' सर्व चांगल्या कल्पनांचा समावेश ' करणारा ग्रंथ नाही; असे दाखविण्याचा चिं. नि. जोशींचा प्रयत्न आहे. पण कथांतर, सुंदर वर्णने, वेचक शब्द व कल्पनाविलास यांची श्रीधरांनी मुक्तेश्वरी भारतातून मुक्तहस्ताने उचल केली आहे,[६] हे त्यांनाही मान्य करावे लागले. पांडवप्रतापाचे पहिले पस्तीस अध्याय मुक्तेश्वरी प्रभावाने झाकाळून गेले आहेत. तरीही मुक्तेश्वरी भारताच्या परंपरेला एक सुबोध लोकसंवादी रूप देण्याचा प्रयत्न त्यात आहे. कलावैदग्ध्य व पांडित्य यापेक्षा भाविकतेला महत्त्व देऊन श्रीधरांनी आपल्या कथेची मांडणी केली. मुक्तेश्वरी परंपरा मुरवून तिला अधिक लोकाभिमुख करण्याचा हा प्रयत्न होता.

मुक्तेश्वरी परंपरेतून बाहेर पडून मराठी महाभारताचा पंडिती थाटघाट घडविण्याचा प्रयत्न **मोरोपंतांच्या** आर्याभारतात ( रचना इ. स. १७७२ ते १७८२ ) ठळकपणे जाणवतो. पांडित्य, गृहस्थाश्रमी अध्यात्म, क्लृप्तिप्रचुर कारागिरी, रचनेचा आटोप, भाषेची शुद्धता व सर्वत्र साधलेला समंजस समतोल "...यासारखे शिष्टसंमत अभिरूचीचे सारे संकेत पंतकवितेत प्राचुर्याने एकवटल्यामुळे पंतकविता त्या काळच्या कवितेचा मानदंड ठरली."[७] १८ पर्वे, २२४ अध्याय व १७१३६ आर्यांचे आर्याभारत त्यांचे प्रातिनिधिक आहे. ते सत्पक्षप्रीतीने उजळलेल्या भक्तीने रंगलेले आहे. चौफेर व्यासंग, डोळे दिपविणारे शब्दशिल्प, बाह्यांगाची कलाकुसर, व्यासभारतानुसार चित्ताकर्षक संक्षेप, स्वभावचित्रांची खुलावट, समर्पक संवाद ही मोरोपंतांची गुणसंपदा आहे. यमकांचा हव्यास, दीर्घ समासयोजना यामुळे येणारी श्रुतिकटुता, क्लिष्टता व औचित्यहानी या त्यांच्या उणीवा.

मुक्तेश्वरी प्रभाव नाकारतानाही आर्याभारत पूर्णतः त्या प्रभावकक्षेबाहेर जाऊ शकले नाही. मोरोपंतांनी मुक्तेश्वरी भारताचे चांगले परिशीलन केले असले पाहिजे. आर्याभारत जेथे मुळाविरुद्ध वा मुळाहून अधिकचा भाग देते तेथे तो बहुधा मुक्तेश्वरांच्या अनुकरणाने वा प्रभावाने आलेला असतो. शब्द-कल्पनासाम्याचीही उदाहरणे[८] सापडतात. " यात कित्येक जागी मुक्तेश्वरांसारखी शब्दरचना असून पुष्कळ ठिकाणी त्याचा भावार्थ

---

६. चिं. नी. जोशी, " श्रीधर-चरित्र व काव्यविवेचन ", हैद्राबाद-पुणे, १९५१ पृ. ३८०–४१९.

७. गो. म. कुलकर्णी, " समकालीन पार्श्वभूमी, मराठी वाङ्मयाचा इतिहास. " खंड ३, संपा. रा. श्री. जोग, पुणे, १९७३ पृ. ३४.

८. ना. गो. नांदापूरकर, मुक्त-मयूरांची भारतें, पूर्वोक्त, पृ. ४५४

आहे आणि कित्येक ठिकाणी मुक्तेश्वरांनी अनुचितपणे योजिलेल्या कल्पना पंतांनी समुचितपणे योजिल्या आणि अर्धवट सोडलेल्या कल्पना पूर्ण केल्या."[९] अशी काही साम्यस्थळे सोडली तर मुक्तेश्वरी परंपरेला नवरूप देण्याची धडपड मोरोपंतात जाणवते. ओवीऐवजी आर्या, विस्ताराऐवजी संक्षेप, रचनास्वातंत्र्याऐवजी मूलनिष्ठा यांना प्राधान्य देऊन त्यांनी आपल्या भारताचा घाट घडविला. जोडीला भाषेची प्रौढता, औचित्य-पालनातील कटाक्ष व अभिरूचीतील सुसंस्कृतता यामुळे आर्याभारताला पूर्वभारतांपेक्षा वेगळे रूप आले. पंतांच्या परिणतप्रज्ञेचे फल असलेले आर्याभारत विदग्धकाव्याचा नमुना ठरले. तथापि पांडित्य व स्वाभाविक संयमवृत्तीने भावशीलता व कल्पनाशक्तीवर मर्यादा पडलेल्या दिसतात शुद्धता आणि चमत्कृती यांच्या नादात मोरोपंतांची वाणी संस्कृतप्रचुर बनली आणि त्याप्रमाणात बोलभाषेच्या चैतन्यापासून दुरावली. त्यामुळे भावनांचा ताजेपणा व निर्भरता तिने गमावली आहे.

## ५. अन्य वाङ्मयबंधावरील प्रभाव

मुक्तेश्वरी भारताशी संवाद-विरोध करीत मराठी महाभारतांची अवतरणपरंपरा वाढत-घडत होती. त्याचप्रमाणे अन्य वाङ्मयबंधावरही मुक्तेश्वरी भारताचा ठसा उमटला आहे. **रघुनाथ पंडिताचे** दमयंतीस्वयंवराख्यान ( रचना इ. स. १६८१–१६८३ ) विदग्ध संस्कृत काव्याचा नमुनेदार मराठी अवतार आहे. त्यावर मुक्तेश्वरांच्या वनपर्वातील नलोपाख्यानाची छाया[१०] आहे. **अवचितसुत काशीच्या** ओवीबद्ध द्रौपदी-स्वयंवरात ( रचना इ. स. १६९६ ) मुक्तेश्वरी आदिपर्वातील कथाभाग व शैली यांचा ठसा उमटला आहे.

मराठी चरित्रग्रंथावरही मुक्तेश्वरी भारताचा प्रभाव आहे. **महीपती ताहाराबादकर** ( इ. स. १७१५ ते १७९० ) मुक्तेश्वरांचे अनुसरण करू पाहतात. " महीपती बरेच जुने शब्द वापरतो, पण ते त्याच्या वेळेस प्रचारात होते म्हणून नव्हे, तर ते मुक्तेश्वरांच्या ग्रंथात उपयोगिले आहेत म्हणून. महीपती मुक्तेश्वरांच्या अनुसारी आहे व बऱ्याच उच्च दर्जाचा अनुसारी आहे."[११] महीपतीच्या भक्तविजय, संतलीलामृताप्रमाणेच **निरंजनमाधवाच्या** ज्ञानेश्वरविजयातही ( रचना इ. स. १७६६ ) मुक्तेश्वरी भारतातील

---

९. तत्रैव, पृ. ४४८.

१०. हे साम्य येथे प्रथमच निर्दिष्ट केले जात आहे. " औषध नैषधसंयोग आन परिहार असेना " ( मुभा ३।६।४८ ) ही मुक्तेश्वरी कल्पना " औषध नलगे मजला " ( द. १५० ) अशी श्लेषरूपाने रघुनाथ पंडित वापरतात. याद्दष्टीने पहा, मुभा. ३।६।२ = द. १, मुभा. ३।६।३५ = द. ६२, मुभा. ३।६।५०-५२ = द. १४५–१५०, मुभा. ३।६।९४ = द. २०९, मुभा. ३।६।११७ = द. २४८ इत्यादी.

११. चिं. वि. वैद्य, " निबंध व भाषणें ", मुंबई, १९१५ पृ. १४७.

शब्द, आलंकारिक कल्पनाविलास व वर्णनशैलीची झाक आढळते.[१२]

शाहीरांच्या मराठमोळ्या वाणीवरही मुक्तेश्वरी वाणीचा संस्कार आहे. " मुक्तेश्वराची ओवी, जनीचा अभंग सदाकाळ गा रे " असं **सगनभाऊ** आवर्जून सांगतो. **होनाजी** " पौराणिक आख्याने गाताना मुक्तेश्वराच्या आणि श्रीधराच्या वर्णनातील उत्तम कल्पना आपल्या कवनात जवळजवळ त्यांच्याच शब्दाने उठवून देतो.[१३] " कापडी चालले तीर्थपंथें " ( मुभा. १।३६।७९ ) सारख्या मुक्तेश्वरी ओळी होनाजीच्या सुप्रसिद्ध भूपाळीचे सहज स्मरण करून देतात.

रणझुंजार मराठ्यांच्या वीरगाथा चितारणाऱ्या बखरगद्यावरही मुक्तेश्वरांच्या वाणीचा ठसा उमटला आहे. " भाऊसाहेबांची बखर "मधील महाभारती संदर्भ, युद्धवर्णने आणि शब्दयोजना मुक्तेश्वरी भारताचे संस्कार मिरवितात.[१४]

## ६. समारोप

भाष्यकाव्यात जशी ज्ञानदेवी तसे भारत-परंपरेत मुक्तेश्वरी भारत युगनिर्माणक ठरले आहे.[१५] पूर्वपरंपरेशी संवाद-विरोध करीत मुक्तेश्वरांनी आपल्या भारताचे नवरूप घडविले. प्रदीर्घ कथाकाव्याचा एकनाथी रचनाबंध परिष्कृत व अधिक कलात्म रूपात सिद्ध करून त्यांनी पुढीलांना दिला. त्यामुळे पुढील काळातील प्रदीर्घ कथाकाव्यात महाभारतास प्राधान्य मिळाले. मुक्तेश्वरी भारताची पूर्ती करण्याच्या स्पष्टास्पष्ट जाणिवेतून उर्वरित पर्वांवर रचना करण्याचा प्रयत्न झाला. " बहुतेकांनी आपल्या रचना विशिष्ट पंथीय विचारांशी व उपासना पद्धतींशी जखडून टाकलेल्या नाहीत. मुक्तेश्वरी महाभारताच्या प्रभावाचेच हे आणखी एक गमक होय, असे वाटते.[१६] ओवी हे माध्यम, विस्ताराने कथन करण्याची प्रवृत्ती, रचनास्वातंत्र्याची मर्यादा दाखवून देणारी मूलवृत्तनिष्ठा व मुक्तेश्वरी वाङ्मयीन विशेषांच्या अनुकरणाचा यथाशक्ती प्रयत्न यातून मुक्तेश्वरी

१२. त्र्यं. ग. गायधनी, " प्राचीन मराठी चरित्रे व आत्मचरित्रे यांचा वाङ्मय-प्रकारात्मक अभ्यास, " पदवीप्रबंध ( टंलि ), मुंबई, १९६५, पृ. २०९, २३०, ५३९ पहावे.

१३. वि. ल. भावे, " महाराष्ट्र–सारस्वत ", पूर्वोक्त, पृ. ७४६.

१४. पहा, भीमराव कुलकर्णी ( सं. ), " भाऊसाहेबांची बखर, " पुणे, १९६५ पृ. १७३–१७४ व अन्य टीपा.

१५. " वेदान्तविषयाचा कोणताही चांगला ग्रंथ पाहिला तर त्यात जसे ज्ञानेश्वरीचे प्रतिबिंब दिसते तसेच प्रायः बहुतेक सर्व ओवीबद्ध भारतात मुक्तेश्वरांच्या भारताचे प्रतिबिंब उमटलेले नजरेस पडते. "—वि. ल. भावे, " महाराष्ट्र–सारस्वत ", पूर्वोक्त, पृ. ६८८.

१६. भगवंत देशमुख, " प्रदीर्घ कथाकाव्ये ", " मराठी वाङ्मयाचा इतिहास ", रा. श्री. जोग ( सं. ), पूर्वोक्त, पृ. १३८.

भारताचा प्रभाव जाणवतो. महाभारत परंपरेप्रमाणे आख्यानक, चरित्रात्मक व शाहिरी कवितेवरही तो जाणवतो. या परंपरेला एका बाजूने सुबोध व लोकसंवादी करण्याचा प्रयत्न श्रीधरांच्या पांडवप्रतापात आहे. दुसऱ्या बाजूने मुक्तेश्वरी परंपरेला प्रौढ व पंडिती वळण देण्याचा प्रयत्न मोरोपंतांच्या आर्याभारतात आहे.

महाभारताचे लोकसाहित्यप्रवृत्तीने कथन हे विष्णुदास नामांचे वैशिष्ट्य आहे. सविस्तर व्यासानुसरणात माधवस्वामींचे वैशिष्ट्य आहे. रसाळ भक्तिप्रधान कथानिवेदनात श्रीधरांचे वैशिष्ट्य आहे. व्यासभारताच्या मूलसौंदर्याला ढका न लाविता त्याचा सुबक संक्षेप साधण्यात मोरोपंतांचे वैशिष्ट्य आहे. अध्यात्म, कथा व काव्य यांचा समतोल साधून महाभारताचा आर्ष महाकाव्यात्म प्रत्यय देण्यात मुक्तेश्वरांचे वैशिष्ट्य आहे. महाभारताच्या अवतरण परंपरेला त्यांनी खऱ्या अर्थाने आरंभ केला व त्याला प्रतिष्ठाही मिळवून दिली. त्यामुळे रघुनाथ पंडित–अवचित सुत काशीसारख्या पंडित कवींना, महीपती-निरंजनमाधवासारख्या चरित्रकारांना व सगन–होनाजीसारख्या शाहीरांना व बखरकारांना आशय-अभिव्यक्तीची वळणे गवसली. हरि वामन, शुभानंद, गोपाळ, नरहरि मोरेश्वर, अनंततनय, मैराळ, जिवाशिवा या महाभारतकारांना स्फूर्ती मिळाली व अनुकरणीय आदर्श सापडला, श्रीधर आणि मोरोपंतांसारख्या श्रेष्ठ महाभारतकारांनाही मुक्तेश्वरी भारताचा प्रभाव नाकारता आला नाही, यातच मराठी महाभारतकारांतील मुक्तेश्वरांचे अनन्यसाधारण स्थान स्पष्ट होते.

□ □ □

# अकरा ॥ समारोप

या खंडातील अभ्यासातून हाती आलेल्या ठळक निष्कर्षांची नोंद पुढीलप्रमाणे करता येईल.

[ १ ] अनुत्पाद्य कथावस्तूला आकार देणारी मुक्तेश्वरांची काव्यदृष्टी प्रगल्भ श्रोते व पिंडगत रसिकता यांनी संस्कारित झालेली असून त्यांची भारतरचना तिच्याशी संवादी राहिलेली दिसते.

[ २ ] मुक्तेश्वर जातिवंत कवी असल्याने त्यांचे जीवनचित्रण जिवंत व रसरशीत असते. ते बहुश्रुत व देशाटन केलेले असल्याने त्यात व्यापक वास्तव, तपशीलाचे बारकावे, अन्य कवींचे साद-पडसाद व त्यांची समीक्षा आली आहे. त्यांच्या अंगभूत चिंतनशीलतेला ग्रंथ व संतसहवास यामुळे तत्त्वदृष्टीचा पारंपरिक वारसा लाभलेला आहे. त्यामुळे काव्यांतर्गत जीवनाचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी ते आपल्या काळाची व स्वतःची अध्यात्मनिष्ठा वापरतात. मुक्तेश्वरांचे व्यक्तिमत्त्व व समकालीन युगधर्म यांनी त्यांच्या भारताची अशी जडणघडण केली आहे. त्यामुळे ते गुणवैभवाने समृद्ध झाले आहे.

[ ३ ] मुक्तेश्वरी भारत हे व्यासभारताचा आर्ष डौल मिरविणारे मराठी संस्करण आहे. महाभारताचे अनेकघटकयुक्त, संदर्भसमृद्ध व संमिश्र असे आर्ष रूप मुक्तेश्वरी भारतात पूर्णतः नसले तरी जितक्या स्पष्टत्वाने प्रतिबिंबित झाले तितक्या स्पष्टत्वाने अन्य कोणत्याही मराठी महाभारतात उमटलेले नाही.

[ ४ ] मुक्तेश्वरी प्रतिभेच्या विकसनाच्या खुणा महाभारतातही दिसतात. स्थूलमानाने समरूप विस्तार, मूलानुसरणाचा कटाक्ष व पक्व, पंडिती भाषा या वृत्तिप्रवृत्तींची प्रारंभिक अवस्था सौप्तिकात दिसते. त्यांचे प्रगल्भ, सफाईदार आविष्करण आदिपर्वात आहे. संक्षेपनिष्ठा, रचनास्वातंत्र्याकडे कल व मराठी वळणाची वाहती शैली या वृत्तिप्रवृत्ती वनपर्वात आहेत. विराटपर्वात त्यांची पुढची पातळी दिसते. सभापर्वामध्ये पूर्वविशेषांचा डौलदार व आकर्षक आविष्कार व नवविशेषांचे अंकुर यांचा समतोल साधला आहे. या पर्वातील मूलकथाही अधिक केंद्रिय आहे. आदिपर्वात मुक्तेश्वरी प्रतिभेचे काही नेत्रदीपक आविष्कार असले तरी सामग्र्याने पाहता समतोल रचनेचे प्रमाणबद्ध सभापर्व मुक्तेश्वरी प्रतिभेचा रेखीव प्रातिनिधिक आविष्कार ठरते. यादृष्टीने मुक्तेश्वरी प्रतिभा क्रमाने उतरत गेली अशा निष्कर्षापेक्षा ती भिन्न पद्धतीने आविष्कृत होत राहिली, अशा अर्थपूर्ण निष्कर्षाजवळ आपण येऊन पोहोचतो.

[ ५ ] कालविपर्यास, अश्लीलता यासारख्या आरंभापासून मुक्तेश्वरी रचनेत असलेल्या दोषांचे प्रमाण येथे वाढलेले दिसते. वृत्तात्मकता, संक्षेप, विनोद व विदग्ध

वळण अनुसरणारे संक्षेप रामायणातील वृत्तिविशेष भारतीय रचनेत क्षीण वा लोपलेले दिसतात. तरीही कथाबंध, व्यक्तिदर्शन, संवाद, वर्णन, अलंकार, निर्देशात्मकता व भाषा या वाङ्मयीन घटकांचे मुक्तेश्वरी रचनेच्या सापेक्षतेने सर्वाधिक विकसित रूप भारतात दिसते. म्हणून महाभारत ही मुक्तेश्वरांची सर्वश्रेष्ठ कृती ठरते.

[ ६ ] प्राचीन मराठी काव्यप्रवाहात मुक्तेश्वरी भारत संक्रमणाच्या टप्प्यावर उभे आहे. त्यामुळे पूर्वकाळातील प्रेरणा–वृत्तिविशेषांचे परिणत रूप त्यात जसे दिसते तसे पुढील प्रेरणा–वृत्तिविशेषांचे बीजारोपणही त्यात आहे. स्वीकृत आर्षमहाकाव्याच्या घाटात आख्यानाचे काही विशेष एकजीव झालेले दिसतात. अक्षरगणवृत्तांचा त्याग करून ओवीच्या वाहत्या माध्यमाचा पुनःस्वीकार त्यात आहे. विस्ताराने कथन करण्याची त्यातील प्रवृत्ती अखेरी संक्षेपाकडे झुकलेली दिसते. स्वैर रचनास्वातंत्र्य घेणाऱ्या पूर्वपरंपरेत मूलानुसरणाचे भान रुजविण्याची धडपड त्यात आहे. लौकिकाचे ऐश्वर्य मिरविणारा वीर–शृंगार आणि त्याला अलौकिकाची बैठक देणारी भक्ती ह्या दोन्ही रसविशेषांना त्यात उधाण आले आहे. साधीसरळ आख्यानशैली आणि रूपविभ्रमा पंडिती शैली यांचे बळ पचवून त्यातील आवाहक, जोमदार व भावनिर्भर शैली सिद्ध झाली आहे. भारतपूर्व मुक्तेश्वरी वाङ्मयात या प्रवृत्ती पृथक रूपात दिसतात. त्यांचा संश्लेष त्यांच्या भारतात आहे.

[ ७ ] पूर्वपरंपरेशी संवाद–विरोध करीत मुक्तेश्वरांनी आपल्या भारताचे नवरूप घडविले. प्रदीर्घ कथाकाव्याचा एकनाथी रचनाबंध परिष्कृत व अधिक कलात्म रूपात सिद्ध करून त्यांनी पुढीलांना दिला. त्यामुळे पुढील काळातील महाभारतांवर मुक्तेश्वरांचा ठसा उमटलेला दिसतो. ओवी हे माध्यम, विस्ताराने कथन करण्याची प्रवृत्ती, रचना-स्वातंत्र्याची मर्यादा दाखवून देणारी मूलानुसरणाची दक्षता, सांप्रदायिकतेपासून मुक्तता व मुक्तेश्वरी वाङ्मयीन विशेषांचे अनुकरण या त्याच्या खुणा आहेत. त्या महाभारत–परंपरेप्रमाणे आख्यानक, चरित्रात्मक व शाहीरी कवितेवरही स्पष्टास्पष्ट उमटल्या आहेत. मुक्तेश्वरी भारतपरंपरेला लोकसंवादी करण्याचा प्रयत्न श्रीधरात आहे तर तिला प्रौढ व पंडिती वळण देण्याचा प्रयत्न मोरोपंतात आहे मुक्तेश्वरी भारताचे अनन्यसाधारणत्व परंपरेवर गाजविलेल्या या प्रभावातून पुरेसे स्पष्ट होते.

□ □ □

# मुक्तेश्वरांची कविता : वाङ्मयीन अभ्यास

॥ ३ ॥

## उपसंहार

## मुक्तेश्वरांची कविता

## वाङ्मयीन अभ्यास

## उपसंहार

१. मुक्तेश्वरांचे लौकिक व्यक्तिमत्त्व व काव्यपिंडाचे धर्म
२. काव्यदृष्टी आणि काव्यसृष्टी यातील सुसंवाद
३. काव्यनिर्मितीचा काळ व क्रम
४. संस्कृत व मौखिक स्रोतपरंपरेशी नाते
५. मराठी पूर्वपरंपरेशी संवाद-विरोध
६. काव्यबंधांची विविधता
७. विकासशील कविता
८. संक्रमणकाळाचे ध्वनी-प्रतिध्वनी
९. मुक्तेश्वरांची कविता-परंपरा आणि नवता

# उपसंहार

आतापर्यंतच्या सर्व अभ्यासाचा पूर्वसंदर्भ मनी बाळगून मुक्तेश्वरी काव्याचा सामग्र्याने विचार करताना हाती आलेले केवळ ठळक असेच निष्कर्ष येथे नोंदवायचे आहेत.

## १. मुक्तेश्वरांचे लौकिक व्यक्तिमत्त्व व काव्यपिंडाचे धर्म :

मुक्तेश्वरांची कविता प्राधान्याने कथात्मक कविता आहे. कथाकथन करीतच ती काव्यात्म होण्याचा प्रयत्न करते. कवीच्या व्यक्तिमत्त्वाचे सौंदर्य प्रकट करीत अवतरणाऱ्या आत्माविष्कारी कवितेच्या कुळीतील कविता ही नव्हे. ती बहुंशी बहिर्मुख, कथानिष्ठ, नाट्यगर्भ व वस्तुनिष्ठ कविता आहे. अशा कवितेत कवीचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व साधारणतः साधनात्मक राहते. ज्या लौकिक व्यक्तिमत्त्वाशी सहकार्याचे किंवा तटस्थतेचे संबंध प्रस्थापित करून मुक्तेश्वरांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व प्रगट होत असते, ते त्यांचे लौकिक व्यक्तिमत्त्व अज्ञाताच्या धुक्यात गुरफटलेले आहे. मुक्तेश्वरांच्या 'चरित्रमंदिरातील नकारघंटा' अजून थांबलेली नाही. तथापि पैठणचा नाथसहवासाचा संस्कारक्षम काळ, काशीचा विद्याध्ययनातील नवतीचा व नवतेच्या सोसाचा काळ, गुरुकृपेने गांभीर्याकडे वळलेले गृहस्थजीवन, पैठणचे पुनरागमन व नंतरची दक्षिणोत्तर भ्रमंती, कुलस्वामी भैरवाची सोनारीं केलेली सेवा आणि अखेरी दत्तक्षेत्राजवळील – नरसोबाची वाडी – तेरवाडचे वास्तव्य व अखेर; हा त्यांच्या भ्रमणशील आयुष्याचा चित्रपट अनुमानिता येण्यासारखा आहे. अस्थिर आयुष्य व दारिद्र्य यातही त्यांची प्रतिभा अम्लान काव्य-कुसुमांनी फुलतच राहिली. त्यांचे लौकिक व्यक्तिमत्त्व बहुंशी अप्रकट राहिले आहे. क्वचित सोसलेल्या दारिद्र्याच्या निर्देशातून[१], तुडविलेल्या भूमीच्या उल्लेखातून, लौकिकात रस घेणाऱ्या वर्णनांतून आणि मनाला भगवे करणाऱ्या अलौकिकाच्या कथा-वस्तूला दिलेल्या परिमाणातून त्याची चाहूल लागते. एखाद्या 'मूर्खलक्षणात'त ती अधिक स्पष्ट होते. आध्यात्मिक ओढ, वैदिक धर्माविषयीचा आदरभाव, निखळ ज्ञान-साधना आणि व्यवहाराची मार्मिक जाण हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू आहेत. अर्थव्यवहारातील सावधगिरी व काटेकोरपणा, प्रवासातील दक्षता, आहारविषयक पथ्ये,

१. शुकरंभासंवाद १३, २७७, ३६५ हरिश्चंद्राख्यान २।७–१०. संक्षेपरामायण १।३, ८.
महाभारत १।१।३७, १।३०।६०-६५, २।१।३.

स्वच्छतेवरील कटाक्ष, सामाजिक शिष्टाचारांचा आग्रह, स्वामि–सेवक संबंधातील मर्यादा, स्त्रीविषयक निर्मळ, नैतिक दृष्टी यातून मुक्तेश्वरांची मूर्ती डोळ्यासमोर उभी राहते. प्रेम, सत्यनिष्ठा, कृतज्ञता आणि आस्तिक्यभाव आदी मूल्ये प्रमाण मानून त्यांनी समंजसपणे व समतोल पद्धतीने आपले जीवन व्यतीत केले असावे.

त्यांच्या लौकिक व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्या वाङ्मयाशी असलेला संबंध तटस्थतेचा, सहकार्याचा व क्वचित अभिव्यक्तीचा राहिला आहे. कालविपर्यासात्मक निर्देशातून व वर्णनांतून त्यांची सौंदर्यदृष्टी, संगीत-चित्र-निसर्ग-यांतील बहुस्पर्शी रसज्ञता, तरल संवेदनशीलता, मार्मिक अवलोकन, व्यासंगी बहुश्रुतता, ऐहिकाचे आकर्षण, लौकिक आशा-आकांक्षांची चित्रे रेखाटणारी प्रवृत्तिपरता अशा अनेकानेक विशेषांचे दर्शन घडते. संस्कृत विदग्ध काव्यनाट्यांचा व आर्ष महाकाव्यांचा रसिक व्यासंग, पूर्वकवींचा संस्कार, डोळस परिभ्रमण, सूक्ष्मावलोकन, कल्पकता, शब्दप्रभुत्व, समन्वयशील धारणा आणि उत्कट व आवेगी मनोवृत्ती या मुक्तेश्वराच्या व्यक्तिमत्त्वविशेषांनी त्यांच्या शैलीचे रूपरंग घडविले आहे. पूर्णतः आध्यात्मिक अशी गीतारचनाच काय ती त्यांनी केली व तीही भाषांतरित आहे. यावरून त्यांच्या कविप्रकृतीचा अंदाज यावा. ते असे प्रकृतीने कविवृत्तीचे असल्याने त्यांचे जीवनचित्रण जिवंत व रसरशीत असते. व्यासंग व परिभ्रमण यामुळे त्यात व्यापक वास्तव, तपशीलाचे बारकावे, अन्य कवींचे साद-पडसाद व त्यांची समीक्षा येते. त्यांच्या अंगभूत चिंतनशीलतेला ग्रंथ व्यासंग व संतसहवास यामुळे तत्त्वदृष्टीचा व संप्रदायविशेषांचा पारंपरिक वारसा लाभला आहे. त्यामुळे काव्यगत जीवनार्थासाठी ते आपल्या काळाची व स्वतःची अध्यात्मनिष्ठा वापरतात. आंतरगुणांना महत्त्व देणारी त्यांची प्रगल्भ जीवनदृष्टी त्यांच्या काव्याला अर्थघनता देते. निवृत्तिप्रधान वातावरणात गुदमरलेली रसिक जीवनासक्ती व संस्कारांनी घडवलेला आध्यात्मिक वळणाचा पिंड या मुक्तेश्वरांच्या द्विप्रकृतिक व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार "शुकरंभासंवादा"त होतो. जीवनाच्या रसरशीत लौकिक रूपात रस घेणारे पण त्यामागील अलौकिक अध्यात्मविश्वावर श्रद्धा ठेवणारे त्यांचे व्यक्तिमत्व त्यांच्या साऱ्याच कवितेला व्यापक परिमाण देते. भव्यता, उदात्तता व उत्कटता यांचे अनावर आकर्षण त्यांच्या वृत्तीत व वाङ्मयात आहे. विदग्ध वाङ्मयाला आवश्यक असे संयत व सौम्यप्रकृती व्यक्तिमत्त्व त्यांचे नाही याची प्रतीती 'संक्षेपरामायण'वरून येते. जिवंत आणि उत्कट भावना, त्यांचा आवेगी आणि उद्रेकी आविष्कार आणि खळाळणारी अनावर वाणी हाच त्यांचा अंगभूत प्रतिभाधर्म आहे. त्यामुळे त्यांच्या भारताला काव्यात्म वैभव लाभले आहे. काव्यविषयक जाणिवांचे त्यांचे भान सहज व निर्मळ आहे. परंपरेतील वैविध्य समंजसपणे स्वीकारण्याची समावेशकता त्यांच्यामध्ये आहे. नवनव्या वाटांचा धांडोळा घेऊन स्वतःला घडवीत जाणारी प्रयोगशीलता त्यांच्याजवळ आहे. मुक्तेश्वरी काव्यपिंड समावेशक, प्रयोगशील, महाकाव्यात्मक प्रकृतीचा, बहुपेडी व बहुपिंडी आहे.

## २. काव्यदृष्टी आणि काव्यसृष्टी यातील सुसंवाद

स्फुटकाव्यात मुक्तेश्वरांची काव्यदृष्टी स्पष्ट शब्दांत प्रकटलेली नाही. संक्षेपरामायणातून ती अस्फुटतेने व्यक्त होते. महाभारतातून मात्र ती अंगभूत रसिकता व प्रगल्भ श्रोतृवर्ग यांनी संस्कारित होऊन आत्मविश्वासाने व स्पष्टतेने अवतरते. तीत पारंपरिक संस्कृत काव्यशास्त्रीय मूल्यांचा व मराठी परंपरेतील भक्तिमूल्यांचा स्वीकार असला तर 'उच्छिष्ट' कथावस्तूची पुनर्निर्मिती कशी करावी या रोखाने त्यांचे विचार वाढत गेलेले दिसतात. या काव्यदृष्टीशी संवादी अशीच त्यांची काव्यसृष्टी आहे.

## ३. काव्यनिर्मितीचा काळ व क्रम

इ. १५७४–१६४० हा मुक्तेश्वरांचा जीवितकाल मानला तर स्थूलमानाने इ. स. १५९०–१६४० हा त्यांचा काव्यलेखनकाल मानता येईल. त्यांच्या वाङ्मयीन विशेषांतील स्थित्यंतरांच्या आधारे संक्षेपरामायणपूर्व आख्याने (इ. स. १५९०–१५९८), संक्षेपरामायण (इ. स. १५९८–१६१०), संक्षेपरामायणोत्तर व भारतपूर्व आख्याने (इ. स. १६१०-१६२०) आणि महाभारत असा त्यांच्या रचनेचा क्रम व काळ ठरविता येईल. त्यांची स्फुट व रचना या सर्व काळात अधूनमधून झालेली दिसते.

## ४. संस्कृत व मौखिक स्रोतपरंपरेशी नाते

मुक्तेश्वरांची काव्यरचना 'अनुत्पाद्य' आख्यानवस्तू स्वीकारणारी आहे. पद्मपुराण स्कंदपुराण, भागवत, आनंदरामायण या संस्कृत रचनांचा आधार त्यांच्या स्फुट आख्यानांना आहे. संक्षेपरामायणात वाल्मीकी रामायण, अध्यात्मरामायण, आनंद-रामायण, जैमिनी अश्वमेध, भारती रामोपाख्यान यातून भक्ती–अद्भुताचे पोषण करणारे तपशील ते वेचतात. हनुमन्नाटक, मुरारीचे अनर्घराघव, जयदेवाचे प्रसन्नराघव, भवभूतीचे महावीरचरित, कालिदासाचे विक्रमोर्वशीय, कुमारसंभव, रघुवंश, बाणभट्टाची कादंबरी, भर्तृहरीची शतके, जगन्नाथाचे भामिनीविलास या संस्कृत काव्यनाट्यातून आलंकारिक कल्पनाविलास व अभिव्यक्तीचे तंत्रविशेष यांनी आत्मसात केलेले दिसतात. त्यांचे भारत मुख्यतः व्यासभारत व गौणतः भारतमंजरी, कथासरित्सागर, जैमिनी अश्वमेध, उपरोक्त पुराणे यांच्या आधाराने अवतरते. कालीदास, भारवी, माघ, श्रीहर्ष या 'जीर्ण-कवीं'चे संस्कारही त्यांच्या कवितेवर आहेत. मूलाधारांच्या बाबतीत संस्कृत आणि मराठी, ग्रांथिक आणि मौखिक अशा उभयविध परंपरा ते लक्षात घेतात. मान्य ग्रंथाचा आधार नसलेल्या त्यांच्या काही आख्यानांतून लोककथेच्या बाटाची व लोकमानसाच्या प्रकृतीची अनेक वैशिष्ट्ये जाणवतात. लोकवाङ्मयातील सत्त्व शोषून ग्रांथिक परंपरेत बद्ध झालेल्या संस्कृत-निर्मितीला छेद देण्याचा प्रयत्न पूर्वकवींप्रमाणे मुक्तेश्वरांतही दिसतो. त्यामुळे मूलनिष्ठा व रचनास्वतंत्र्य यांत त्यांची काव्यरचना आंदोलताना दिसते. मुक्तेश्वरी रचना परंपरामान्य इतिवृत्ताचा आधार स्वीकारीत असली तरी तिचे बव्हंश स्वरूप पुनर्निर्मितीचे आहे.

## ५. मराठी पूर्वपरंपरेशी संवाद-विरोध

संस्कृत परंपरेप्रमाणे मराठी परंपरेचाही प्रभाव मुक्तेश्वरांवर आहे. त्यांच्या स्फुट आख्यानांवर ज्ञानदेव, नामदेव, जनाबाई, नामा पाठक, कृष्ण याज्ञवल्की, गावबा यांची सौम्य छाया आहे. विष्णुदास नामा व एकनाथ यांचा प्रभाव अधिक घनदाट आहे. संक्षेपरामायणात एकनाथी प्रभाव अधिक गडद होतो. (त्यांच्या महाभारतावर पंप व कुमारव्यास या कन्नड कवींचा प्रभाव असावा, असे अनुमानिता येते. पण कानडी-मराठी आविष्कारांच्या साधार तुलनेनेच याविषयी काही सांगता येईल.) ज्ञानदेव, नामदेव, जनाबाई, नामा पाठक, विष्णुदास नामा, मधुकर, एकनाथ यांच्या रचनांतून भारती व्यक्तिरेखांचे बदलत गेलेले रूप ते लक्षात घेतात व भारती व्यक्तिरेखांची प्रतिष्ठा कायम ठेवून त्यांचे चित्रण करतात. जनाबाई, नामा पाठक यांचा क्षीण ठसा त्यांच्या शब्द-कळेवर आहे. ज्ञानदेव-एकनाथांचे शैलीविशेष पचवून त्यांनी आत्मसात केलेले दिसतात. जनाबाई, नामा पाठक यांच्या अंशात्मक भारती रचना, विष्णुदास नामांचे भारत, कथाकल्पतरूंतर्गत मधुकराची महाभारतकथा यातील आपल्या महाभारताच्या घाटाशी सुसंगत असाच तपशील ते स्वीकारतात. भारतकथेची मूल रूपाकृती पुसून टाकणारा तपशील ते नाकारतात. मनःपूत रचनास्वातंत्र्य घेणारी पूर्वपरंपरा व 'वाग्जल्प' टाळून व्यासानुसरण करण्याचे उद्दिष्ट यांचा सुयोग्य मेळ ते घालतात. परंपरेतील संवादी विशेष फुलवीत व विरोधी विशेष नाकारीत त्यांची कविता वाढत–घडत गेली.

## ६. काव्यबंधांची विविधता

मुक्तेश्वरांची कविता विविध काव्यबंधातून आविष्कृत होते. त्यांची कीर्तनोपयोगी आख्याने लवचिक रचनाबंधातील आहेत तर कीर्तनाश्रयी आख्यानांना साहित्यिक डौल आहे, कारुण्य, गांभीर्य, विनोद व नाट्य यांचे संमिश्रण असलेल्या त्यांच्या आख्यानांना अनेक वेळा अद्‌भुतकथेचे रूप येताना दिसते. संवादात्मक आख्यानांतून त्यांनी प्रत्यक्षता, जिवंतपणा व नाट्य जोपासले. 'शुकरंभासंवाद' ही या प्रकारातील लक्षणीय निर्मिती. तिच्या भाष्यात्म वळणातून त्यांनी मूलनिष्ठेचे भान रुजविले. खंडकाव्य व रूपकाख्यान हे विष्णुदास नामांनी वापरलेले काव्यबंध त्यांनी अधिक सफाईने हाताळले. त्यांचे सुबद्ध खंडकाव्य पंडिती थाटामाटाचे आहे. नृत्याभिनयगर्भ रूपकात्मक द्वंद्व-गीताचा घाट त्यांनी बारकाव्याने जपला. नाथवळणाचे भारूड लिहून पाहिले. चरिताख्यानातून नाथांच्या पारंपरिक चरितकथेची सामग्री प्रथमच संकलित केली. गीता–भाषांतराने त्यांनी समओवी भाषांतराच्या परंपरेचे उज्जीवन केले. उपदेशात्मक प्रकरणांचा बंध त्यांनी रामदासांच्या आधी घडविला. पारंपरिक ठशापेक्षा वेगळ्या पद्धतीने भूपाळी बांधली. सतराव्या शतकातील समृद्ध आरतीच्या वाटा त्यांच्या आरतीने उजळून ठेवल्या. पदांतून विषयवैविध्य व रचनाचमत्कृती यांची नवोनव वळणे–वाकणे रेखली. त्यांची रचना लावणीकारांना दिशादर्शक ठरली असावी. संस्कृतला पर्याय

म्हणून सर्व क्षेत्रात मराठीला उभी करण्याच्या ईर्ष्येने महाकाव्यनुकूल प्रतिभेच्या मुक्तेश्वरांनी संक्षेपरामायणास विदग्ध महाकाव्यसदृश घाट दिला. मुक्तेश्वरी भारत हे व्यासभारताचे आर्ष महाकाव्यात्म वळण गिरविणारे मराठी संस्करण आहे. त्यामुळे आर्षकाव्याच्या मराठीकरणाच्या परंपरेप्रमाणेच आख्यानक, चरित्रात्मक व शाहिरी कविताही प्रभावित झालेली दिसते. मुक्तेश्वरांनी काव्याचे असे विविध रूपबंध जाणकारीने हाताळले, त्यात लक्षणीय रचना केली व उत्तरकालीन आविष्कांवर आपला ठसा उमटविला

## ७. विकासशील कविता

मुक्तेश्वरांची कविता ही एक सतत विकसित होत जाणारी कविता आहे. संक्षेपरामायणपूर्व एकनाथी वळणाची आख्याने व पंडिती परंपरा रूजविणारे, विदग्ध वळणाचे संक्षेपनिष्ठ संक्षेपरामायण यातून तिच्या आरंभावस्थेची दोन रूपे दिसतात. या दोन्हींचा समतोल साधू पाहणाऱ्या तंत्रविकसित व विस्तारशील अशा संक्षेपरामायणोत्तर आख्यानांतून तिची मध्य अवस्था दिसते. या अवस्थेचे परिणत स्वरूप आर्ष वळणाच्या, पक्व व विस्तारशील भारतात दिसते. ते उत्कर्ष अवस्थेचे द्योतक आहे. त्यांची अन्य स्फुटरचना या वेगवेगळ्या अवस्थांचे आलेख दाखविणारी प्रयोगशील धडपड आहे. कथाबंध, व्यक्तिरेखन, संवाद, वर्णन, शैली हे वाङ्मयीन घटक क्रमशः विकसित होत गेलेले दिसतात. औचित्यहानी, अतिरेक, अश्लीलता, कालविपर्यास ही या कवितेची गालबोटेही अधिक ठळक होत गेलेली दिसतात. मुक्तेश्वरी प्रतिभा क्रमाने उतरत गेली नसून भिन्नभिन्न पद्धतीने आविष्कृत होत राहिली. नवनव्या वाटांचा धांडोळा घेत मुक्तेश्वरांनी आपल्या मर्यादेतील पूर्णता भारती-रचनेत गाठली.

## ८. संक्रमणकाळाचे ध्वनि-प्रतिध्वनी

प्राचीन मराठी काव्यप्रवाहात मुक्तेश्वरांचे काव्य संक्रमणाच्या टप्प्यावर उभे आहे. यादवकाळातून आलेल्या वाङ्मयप्रवृत्तींना उजाळा देऊन नववाङ्मयीन प्रवृत्तींना एकनाथकाळात आरंभ झालेला दिसतो. त्यांचा फुलोरा शिवकालात फुलून आला आहे. यादवकाळ व शिवकाळ यांच्या संमिश्र साहित्य प्रवृत्तीचे चित्र नाथकाळात उमटलेले दिसते. अशा संक्रमणकाळात वाङ्मयरचनेच्या विविध शक्यता कलावंताला आवाहन करीत असतात. तरल संवेदनशीलता व मुक्त प्रतिभा असलेला मुक्तेश्वरांसारखा कलावंत त्या सगळ्या शक्यता अजमावून पाहून स्वतःचा शोध घेत असतो. त्यामुळे त्याच्या वाङ्मयात तत्कालीन संक्रमणाचे आपोआपच आलेखन होत असते. आपल्या काळाच्या मागील व पुढील प्रेरणांचा व वृत्तिविशेषांचा संघात मुक्तेश्वरी रचनेत दिसतो. संस्कृतच्या श्रेष्ठतेची जाणीव व मराठीच्या अस्मितेच्या जागरणाची निकड व जिद्द हा झगडा पूर्वोत्तर कवींप्रमाणे त्यांच्याही रचनेत अनुस्यूत आहे. पूर्वकवींनी वापरलेली ओवी व उत्तरकवींनी प्राचुर्याने वापरलेली वृत्ते, दोन्ही यांच्या कवितेची वाहने आहेत. स्फुट, आख्यान,

विदग्ध व आर्ष अशा विविध काव्यसंबंधात त्यांची रचना अवतरते. स्वैर रचना-स्वातंत्र्याची पूर्वप्रवृत्ती व काटेकोर मूलानुसरणाची उत्तरकालीन प्रवृत्ती यांचा उचित समन्वय त्यांच्या काव्यात आहे. पूर्वकवींची मौखिक परंपराभिमुखता व उत्तरकवींची ग्रंथनिष्ठा दोन्ही त्यांच्या ठायी आहे. समकालीन विस्तारप्रवृत्तीचे प्रातिनिधिक असे भारत ते लिहितात आणि संक्षेपरामायण लिहून उत्तरकालीन संक्षेपप्रवृत्तीचे बीजारोपण करतात. पूर्वकवींची साधी-सरळ आख्यानशैली व उत्तरकवींची रूपविभ्रमा पंडिती शैली, यांची वळणे त्यांच्या कवितेत आहेत. त्यातूनच त्यांची आवाहक व भावनिर्भर शैली आकारली आहे. पूर्वकाव्यातील अलौकिकाचा आधार असणारी भक्ती व उत्तरकाव्यातील लौकिकाचे ऐश्वर्य मिरविणारा वीर-शृंगार, या दोन्ही रसविशेषांना त्यांच्या काव्यात उधाण आले आहे. अशा परस्परभिन्न प्रवृत्तिविशेषांच्या ताणातून आणि समन्वयातून मुक्तेश्वरांची रचना आकाराला आलेली आहे. या परस्परविरुद्ध वृत्तिविशेषांचा दाब तीत बदलत गेलेला दिसतो. भारतपूर्व मुक्तेश्वरी वाङ्मयात या प्रवृत्ती पृथक रूपात दिसतात. त्यांचा संश्लेष त्यांच्या भारतात आहे. म्हणून मुक्तेश्वरी भारत ही एक बृहत्कृती ठरते. एकनाथ-काळात महाराष्ट्रमहोदयाचा उत्तररंग सुरू झाला. या प्रबोधनकाळातील कलावंतांचे व्यक्तिमत्त्व बहुपेडी असलेले दिसते. मुक्तेश्वरी रचना अशा बहुपेडी व बहुपिंडी व्यक्तिमत्त्वाचेच आविष्कार आहेत.

## ९. मुक्तेश्वरांची कविता : परंपरा आणि नवता

एकनाथांच्या बरोबरीने मुक्तेश्वरही या संक्रमणकाळातील युगप्रवर्तनात सहभागी आहेत. कोणत्याही वाङ्मयीन क्रांतीच्या केंद्रस्थानी नवतेची कल्पना स्वभावतः अंतर्भूत असते. वाङ्मयीन परंपरा ही मानवसंबद्ध गतिशील चैतन्यावस्था असून ती एकात्म व मूल्यगर्भ असते. "परंपरांतर्गत घटकांच्या मूल्यमापनात बदल घडवून आणणारा व आपले विशिष्ट कार्य संपत असतानाच परंपरेशी एकरूप होऊन तिला समृद्ध करणारा अनिवार्य उन्मेष म्हणजे नवता."[२] तिच्या पाठीमागे व्यक्तिगत प्रतिभाधर्म व वस्तुनिष्ठ सामाजिक परिस्थिती यांचा ताण व समन्वय असतो. मुक्तेश्वरी कवितेतील नवतेचे स्वरूप निरपेक्ष नसून परंपरासापेक्ष आहे. ते परंपरेच्या पार्श्वभूमीवर थोडक्यात स्पष्ट करता येईल.

(अ) सर्वव्यापी दुष्काळ, परकीय सत्तेचा अंमल व समाजसंस्थांचा उच्छेद यामुळे महाराष्ट्राला अंधार वेढून होता तो एकनाथकाळात काहीसा फिकट होऊ लागला. परकीयांच्या परस्परांतील सत्तासंघर्षातून एतद्देशीयांना पुन्हा महत्त्व येऊ लागले. नैसर्गिक गुणांना व कर्तृत्वाला वाव मिळू लागताच धर्मग्लानीच्या काळातील औदासीन्य नाहीसे झाले. भौतिक जीवनातील या प्रगतीचे पडसाद जीवनाच्या सर्वच क्षेत्रांप्रमाणे साहित्याच्या क्षेत्रातही उमटले. या नव्या वास्तवाशी सहकंप होणारा आशय, घाट व

२. गो. वि. करंदीकर, परंपरा आणि नवता, मुंबई, १९६७ पृ. ५.

शैली मुक्तेश्वरी वाङ्मयात दिसतात. प्रवृत्तिप्रधान महाभारताकडे त्यांनी वळवलेला मोहरा याची ठसठशीत खूण आहे. शिवकालीन भावविश्वाचा निर्भर वारा पिऊन मुक्तेश्वरांचे काव्य पोसले आहे. ऐहिकाकडे रसडोळसपणे पाहणारे, आपल्या काळाचे प्रतिबिंब टिपणारे मुक्तेश्वर कालविपर्यासाचा दोष पत्करूनही शिवकालीन भावसृष्टीला सन्मुख राहतात. निरनिराळ्या आकृती व सूचनासंकेतांनी भोवतालच्या परिसराची दुर्गमता त्यांच्या काव्यात प्रकटली आहे. शिवकालीन श्रद्धा व व्यवहार त्यात उमटला आहे. रणरागिणीचे चित्र रेखाटणाऱ्या त्यांच्या शतमुखरावणवधाख्यानाचा थाट शक्तिकेंद्रित आहे. त्यांच्या काव्यातून ' वीर मारुती, प्रताप मारुती 'ची प्रतिमा उजळली आहे. त्यांच्या भारतात बलदंड भीमाला प्राधान्य लाभले आहे. मुक्तेश्वरी वाङ्मयातील वीर-शृंगाराचे उधाण याहष्टीने पाहण्यासारखे आहे. शक्ती व चैतन्य हे शिवकालीन भावसृष्टीचे केंद्र मुक्तेश्वरी वाङ्मयातून अभिव्यक्त होते. त्यातील सौंदर्याचे ते नियंत्रणही करते. गतिमानता, धीटपणा, स्पष्टपणा, नेमकेपणा, अविस्तार, दैन्य-भावविवशतेचा अभाव हे " शक्तिसौष्ठवशैली "चे विशेष त्यात आहेत. संत-पंडित-शाहीर या क्रमाने मराठी कविता अलौकिकाकडून लौकिकाकडे सरकत गेली. जीवनलुब्ध मुक्तेश्वरांची कविता हा त्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

( ब ) महानुभावांचा वाङ्मयव्यवहार सांकेतिक लिपीत बंद झालेला होता. हे लक्षात घेतले तर नाथ–मुक्तेश्वरपूर्व आख्यानक कविता व आर्षकाव्यांची मराठी संस्करणें आशयक्षय, रूपक्षय व शैलीक्षय या त्रिदोषांनी ग्रस्त झालेली दिसतात. अशा वेळी मुक्तेश्वरांसारखा कवी भारतरचनेस प्रवृत्त झालेला पाहून " लाभवेळा आजिची " ( मुभा. १।१।१०३ ) असे त्यांच्या श्रोत्यांना वाटले असेल आणि सौतीच्या श्रोत्यांच्या सुरात सूर मिळवून तेही म्हणाले असतील, " सत्कथेच्या आवर्षणीं । भरूनि अमृतसिंधूचें पाणी । मेघ धाडिले कृपेकरूनी । जगदेश्वरें या ठायां ॥ १०४ ॥ तुझिया वक्तृत्वलक्षणपीयूषा । सकळीं सादरतेनें देखा । वोडविल्या कर्णकुपिका । परमरस ह्मणोनि " मुभा १।१।१०४ –१०५ ) मुक्तेश्वरपूर्व आख्यानक काव्य आशयदृष्ट्या आवर्तात सापडले होते. मूल रूपाकृती पुसून टाकणाऱ्या रचनास्वातंत्र्याची ओढ त्यात होती. मुक्तेश्वरांनी महाभारताची निवड करून या आवर्ताला छेद दिला मूलानुसरणाचे परंपरासापेक्ष वाढते भान प्रकट केले. त्याच वेळी मौखिक परंपरेतील सत्त्व शोषून ग्रांथिक परंपरा साचेबंद होणार नाही, याचीही त्यांनी दक्षता घेतली. पुढील काळात मूलनिष्ठा रुजली पण लोकमानसाचे भान तीत राहिले नाही. पूर्ववाङ्मयातील भक्तीचा अनुप्रवेश काहीसा भाबडेपणाचा व रसबाधक स्वरूपात प्रकटणारा होता. मुक्तेश्वरी रचनेत त्यातील अतिरेक जाऊन त्यास वाजवी स्थान मिळाले. बाह्य घटना व त्यामागील मनोव्यापार यांना मानवी जीवनाच्या संदर्भात व्यापक मूल्यांचे अधिष्ठान देऊन व्यक्तविण्याची ते प्रयत्न करतात. त्यामुळे त्यांचा आशय अधिक कसदारपणे प्रकट होतो पूर्व आख्यानक कविता रचनादृष्ट्या ओवी–अभंगांच्या आवर्तात सापडलेली होती. मुक्तेश्वरांनी वृत्तबद्ध संक्षेपरामायणाचा

संक्षेपनिष्ठ घाट प्रथम सिद्ध केला व पंडिती परंपरेची पाऊलवाट रुजविली. पाल्हाळ, विसंगती, विस्तार व कथोपकथांचा स्वैर समावेश यामुळे पूर्व आख्यानक काव्याचा घाटही पसरट झालेला होता. सूचकता, सूक्ष्म विकसनशीलता, एकात्मता, विविध घटकांचे परस्परानुवर्तीत्व यातून मुक्तेश्वरांनी बंदिस्त, सारगर्भ व सुघटित बंध निर्मिले. पूर्व आख्यानक काव्याची शैली बाळबोध, स्पष्टीकरणात्मक व विस्तारशील होती. मुक्तेश्वरांनी आपल्या आरंभावस्थेत कधी तिच्याशी संवादी तर कधी विरोधी प्रकृतीची पंडिती शैली वापरली. त्यातूनच त्यांची महाभारताचे महाकाव्यत्व पेलणारी प्रौढ, सालंकृत व संपृक्त आणि तरीही जिवंत व रसरशीत शैली सिद्ध झाली. ही मुक्तेश्वरी शैली श्रीधरात सुबोधतेकडे तर मोरोपंतात प्रौढतेकडे व दुर्बोधतेकडे झुकताना दिसते.

अशा तऱ्हेने पूर्वाख्यानक कविता मुक्तेश्वरांनी अधिक कलात्मक व लौकिकाभिमुख केली. आधारग्रंथांचे मूलरूप, लोकमानसावरील त्याचा ठसा, पूर्वकाव्यपरंपरा, समकालीन वास्तव व युगमानसाचा हुंकार हे घटक त्यांच्या रचनेला आकार देतात. मराठी रचनेची निकड व जिद्द, रचनास्वातंत्र्याची सळसळती ऊर्मी आणि मूलानुसरणाची स्वीकृत निष्ठा, समकालीन वाङ्मयाची विस्तारप्रवृत्ती आणि स्वतः आरंभिलेली संक्षेपप्रवृत्ती, भक्तीसारख्या केंद्रीय जीवननिष्ठा आणि कथेला बांधीव, काव्यात्म, उत्कट व सुंदर करणाऱ्या वाङ्मयीन जाणीवांचे सृजनशील कवीला असलेले सहज भान असे अनेक वृत्तिविशेष त्यांच्या लेखनप्रक्रियेत सहभागी होताना दिसतात. अनुभव कोणताही असो त्याकडे पाहण्याची त्यांची दृष्टी कवीचीच राहिली. आपल्या कवितेचा कस टिकवून उत्तरकालीन कवितेला दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले. रघुनाथपंडित, कचेश्वर, शंकर, अमृतराय यांच्या सदृश रचनेवर मुक्तेश्वरांच्या स्फुटकाव्याचा कमीअधिक ठसा आहे. रामदास, रंगनाथस्वामी निगडीकर, अनंत, श्रीधर, बहिणाबाई, अमृतराव ओक यांची सदृश रचना मुक्तेश्वरांच्या प्रभावकक्षेत वावरणारी आहे. रामदास, रंगनाथस्वामी निगडीकर, विठ्ठल बीडकर, श्रीधर यांच्या रामायणपट रचनेवर संक्षेपरामायणाची छाया आहे. संक्षेपप्रवृत्ती, वृत्तबद्धता व विदग्धता या संक्षेपरामायणाच्या ठळक विशेषांनी अन्य मराठी रामकथा कमीअधिक प्रमाणात प्रभावित झालेली दिसते. प्रदीर्घ कथाकाव्याचा एकनाथी रचनाबंध आपल्या महाभारतातून त्यांनी अधिक कलात्मक व परिष्कृत रूपात सिद्ध केला. त्यामुळे हरि वामन, शुभानंद, गोपाळ, नरहरी मोरेश्वर, अनंततनय, मैराळ, जिवाशिवा या महाभारतकारांना आपली वाट गवसली असावी. श्रीधर आणि मोरोपंत यांच्यासारख्या श्रेष्ठ महाभारतकारांनाही मुक्तेश्वरी भारताचा प्रभाव नाकारता आलेला नाही. रघुनाथ पंडित–अवचितसुत काशीसारख्या पंडित कवींना, महीपती–निरंजन माधवासारख्या चरित्रकारांना, सगन-होनाजीसारख्या शाहिरांना व बखरकारांनाही त्यातील आशय–अभिव्यक्तीची नवनवी वळणे गिरवावीशी वाटली. आर्ष काव्याच्या मराठीकरणाच्या परंपरेबाहेरही मुक्तेश्वरी भारताचा प्रभाव असा दूरवर पसरला आहे. मुक्तेश्वरी कवितेच्या प्रभावाची ही व्यापकता लक्षात घेऊन एकनाथकाळातील युग-

प्रवर्तनात मुक्तेश्वरांचाही सहभाग मानावा लागतो.

( क ) वाङ्मयीन युगप्रवर्तनाच्या संदर्भात लेखकाचा प्रतिभाधर्मही महत्त्वाचा ठरतो. नकारात्मक प्रवृत्तीचे लेखक क्रांतिपूर्वपरंपरेतील कल्पना नाकारतात तर होकारात्मक प्रवृत्तीचे लेखक नव्या कल्पना साकार करतात. मुक्तेश्वरांमध्ये या दोन्ही प्रवृत्ती क्रियाशील असल्याचे दिसते. त्यामुळे त्यांचा सहभाग अधिक अर्थपूर्ण व अनेक परिमाण-युक्त ठरतो. क्रांतिकालातील लेखकांत बीजवृत्तीचे लेखक व वृक्षवृत्तीचे लेखक दिसतात. हा भेद महत्त्वसूचक नसून प्रतिभाधर्म सुचविणारा आहे. " बीजकवी आणि बृहत्कवी या दोन्ही पिंडधर्मातून सामान्य किंवा असामान्य असें दोन्ही प्रकारचे काव्य निर्माण होऊ शकते; एवढेच नव्हे तर एकच कवी दोन्ही पद्धतींनी वेगवेगळ्या कलाकृतींमध्ये काव्यप्रवण होऊ शकतात. "[३] बीजकवी जाणिवेची अज्ञातक्षेत्रे काव्यपरंपरेत आणीत असतात व नवे लिहिले जाण्याची शक्यता निर्माण करतात. त्यातून त्यांच्या काव्याचा घाट व शैली यात पृथगात्मता येते. वृक्षवृत्तीचे त्यांच्यामागून येतात आणि बीजकवींनी दाखविलेल्या शक्यतांचे प्रत्यक्षात रूपांतर करतात. या दोन्ही प्रकारचे लेखक क्रियाशील झाल्यानेच क्रांती यशस्वी होते आणि परंपरा समृद्ध होते. प्रस्तुत संदर्भात एकनाथ हे हे बीजवृत्तीचे (germinal) कवी आहेत. तर मुक्तेश्वर वृक्षवृत्तीचे कवी आहेत असे म्हणता येईल. एकनाथांनी निर्मिलेला प्रदीर्घ कथाकाव्याचा बंध महाभारताच्या रूपाने त्यांनी अधिक कलात्मक व परिष्कृत केला व परंपरेला संस्कारित केले. एकनाथांनी दाखविलेल्या दिशांचा धांडोळा घेऊन संक्षेपरामायणाच्या रूपाने नवी क्षितिजेही त्यांनी दृष्टिपथात आणली. बृहत्कवी व बीजकवी या दोन्हींचेही धर्म त्यांच्या ठायी एकवटले आहेत. महानुभावांचा वाङ्मय व्यवहार ' बंद ' होता आणि एकनाथ-वाङ्मयात निखळ कलात्मक भान उणावलेले होते, हे लक्षात घेतले तर संमिश्र प्रकृतीच्या मुक्तेश्वरी कवितेचे मोल ठळकपणे जाणवते.

लौकिक व अलौकिक यांचा सारख्याच समरसतेने विचार व चित्रण करणारी ही कविता लौकिकाचे राजस ऐश्वर्य आणि अलौकिकाचे विरागी आकर्षण यांची धुंद मिळणी तिच्या अंगांगात झाली आहे. कवीबरोबर श्रोत्यांनाही रसकल्लोळात बुडवून तिने कृतार्थ केले आहे. इ. स. १८४२ पासून निरनिराळ्या निमित्ताने ती प्रसिद्ध होत राहिली. त्याआधीही उत्तरेत काशीपासून दक्षिणेत सुदूर कुंभकोणमपर्यंत आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात हस्तलिखितांच्या माध्यमाने ती प्रसारित होत राहिली. मठामठांतून-विशेषतः रामदासी-ती संगृहीत करण्यात आली. तिचे रसात्मक अंश साक्षेपाने पत्रलेखन करून रसिकांनी आपल्याजवळ बाळगले. पोटासाठी गरज म्हणून ते जेव्हा गहाण टाकावे लागले, तेव्हा

३. गो. वि. करंदीकर, परंपरा आणि नवता, मुंबई, १९६७ पृ. २००. बीजकवी वृक्षवृत्तीचे कवी, बृहत्कवी या संज्ञांचे करंदीकरांनी स्पष्ट केलेले अर्थ मला येथे अभिप्रेत आहेत.

त्यांचा जीव तीळतीळ तुटला. पण तारण म्हणून ते स्वीकारताना सावरकरांना मात्र आल्हाद वाटला. व्रतबंध झालेल्या आपल्या मुलासाठी कोणी तिचा संस्कारक्षम अंश लिहून काढला. संस्कृतातील ज्ञानभांडार मराठीत भाषांतररूपाने आणण्याचा तिचा प्रयत्न कोणाच्या मनी कृतज्ञतेचा तरंग उमटवून गेला. तिच्यातील वर्णनकुसरी पाहून कारागिरांनी वस्त्रांवर नक्षी रेखली. ती दुर्गादुर्गावर वाचली गेली. कीर्तनातून घोळविली गेली. धर्मोत्सवात तिने रंग भरला. तिचे वर्णन करताना " साधु साधु " म्हणत रसिक-जनांची " चतुरचंचरीकांची मांदी " गर्जून उठली. उत्तरकवींना तिने नव्या रसविश्वाची दारे उघडून दिली. नव्या-जुन्या कवींनी तिला मानाचे मुजरे केले. समीक्षकांनी तिची स्तोत्रे गायिली. चांगल्या कवितेचे भाग्य तिच्याही भाळी रेखले गेले.

मुक्तेश्वरांची कविता ऐन बहरातल्या विराट वृक्षासारखी आहे. भूमीतील जीवनरस शोषून तो त्याच्या अंगभर पसरलेला असतो आणि पानापानांत न मावल्याने फुला-फुलांतून ओसंडत असतो. सुगंध होऊन वाऱ्याबरोबर दरवळत असतो. त्याच्या देखण्या बांध्याची जाणीव होण्याआधीच त्याच्यातील जीवनशक्तीची व सजीवतेची चाहूल लागते. मुक्तेश्वरांची कविता अशा वृक्षासारखी आपल्याला वेढून व गुरफटून टाकते. आजही तिच्यातील जोमदार चैतन्याचे स्पंदन उत्कटतेने जाणवते. गेले अर्ध तप तिच्याशी सुसंवाद करताना जो उत्कट आनंद लाभला, त्याविषयी मनोमनी अपार कृतज्ञता आहे.

□ □ □

# ४ ॥ संदर्भ-सूची

## अ ॥ साधनग्रंथ

### १. प्रकाशित मुक्तेश्वरी रचना


१. " महाभारत-आदिपर्व ", ( सं. ) परशुराम गोडबोले, माधव चंद्रोबा, मुंबई, १८६५ ( सर्वसंग्रह-प्रत )

२. " महाभारत-आदिपर्व ", ( सं. ) वा. दा. ओक, तुकाराम जावजी, निर्णयसागर, मुंबई, १८९३ ( काव्यसंग्रह-प्रत )

३. " महाभारत-आदिपर्व ", खंड १-४, ( सं. ) अ. का. प्रियोळकर, मराठी संशोधन मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९५१-१९५९.

४. " महाभारत-सभापर्व ", ( सं. ) परशराम गोडबोले यांच्या साहाय्याने माधव चंद्रोबा, शिळाछाप, मुंबई, १८६३.

५. " महाभारत-सभपर्व ", ( सं. ) वा. दा. ओक, तुकाराम जावजी, निर्णयसागर, मुंबई, १८९४.

६. " महाभारत-सभावर्व ", ( सं. ) वि. म. कुलकर्णी, स. कृ. पाध्ये, व्हीनस बुक स्टॉल, पुणे, १९४९.

७. " महाभारत-सभापर्व ", ( सं. ) द. सी. पंगु, सिद्धेश्वर, कोल्हापूर, १९४९.

८. " महाभारत-सभापर्व ", सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर-पुणे, काळ नाही.

९. " महाभारत-वनपर्व ", ( सं. ) ज. बा. मोडक, पुणे, १८७९, ( काव्येतिहास-संग्रह-प्रत )

१०. " महाभारत-वनपर्व ", ( सं. ) वा. दा. ओक, मुंबई, १८९८.

११. " महाभारत-वनपर्व ", ( सं. ) द. सी. पंगु, रॉयल, कोल्हापूर, दु. आ. १९४६, ( प. आ. १९४१ )

१२. " महाभारत-विराटपर्व ", ( सं. ) माधव चंद्रोबा, १८६७.

१३. महाभारत-विराटपर्व ", ( सं. ) दा. के. ओक, निर्णयसागर, मुंबई, दु. आ. १९३९, ( वा. दा. ओक ( सं. ), प. आ. १८९९ )

१४. " महाभारत-विराटपर्व ", ( सं. ) द. सी. पंगु, स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, पुनर्मुद्रण १९६५ ( प्रथम प्रकाशन १९५३ )

१५. " महाभारत – विराटपर्व, " (सं.) भालचंद्र खांडेकर, सिटी बुक स्टॉल, पुणे, १९६५.

१६. " महाभारत-सौप्तिकपर्व ", स्फुटकाव्ये, (सं.) दा. के. ओक, परिशुद्धि ना. चिं. केळकर–वा. अ. भिडे, तुकाराम जावजी, निर्णयसागर, मुंबई, १९०६ (सौप्तिकपर्व पृ. ८०–१२८)

१७. " (कौतुहल नाटक) रामायण ", (सं.) माधव चंद्रोबा, मुंबई, १८६४.

१८. " रामायण ", (सं.) ज. बा. मोडक, वा. दा. ओक, निर्णयसागर, मुंबई, १८९१.

१९. " रामायण ", (सं.) भा. श्री. परांजपे, सुविचार प्रकाशन, नागपूर–पुणे, १९६९.

२०. " हरिश्चंद्राख्यान ", (सं.) रामदास डांगे, नाग-विदर्भ प्रकाशन, अमरावती-नागपूर, १९६३.

२१. " हरिश्चंद्राख्यान ", (सं.) गोरे-ओक, गोदा प्रकाशन, औरंगाबाद, शके १८९९.

## ब ॥ सहाय्यक ग्रंथ

### २. हस्तलिखित प्राचीन मराठी कविता

२२. विष्णुदास नामा, " आदिपर्व, " सरस्वती–महाल, तंजावर, क्र. १३८६ अरा ६३.

### ३. प्रकाशित प्राचीन मराठी वाङ्मय

२३. " अनेककविकृत कविता ", भाग २ (सं.) ज. बा. मोडक, काव्येतिहाससंग्रह, पुणे, १८८६.

२४. " अनेककविकृत लघुकाव्यमाला ", (सं.) वा. दा. ओक, तुकाराम जावजी, निर्णयसागर, मुंबई, भाग १ (१८९५), भाग २ (१८९६), भाग ३, (सं.) ना. चिं. केळकर (१९०२)

२५. अनंत, " कवितासंग्रह ", (सं.) वा. दा. ओक, तुकाराम जावजी, निर्णयसागर, मुंबई, १८९६.

२६. " अमृतराय, " कवितासंग्रह, " (सं.) वा. दा. ओक, तुकाराम जावजी, निर्णयसागर, मुंबई, १८८६.

२७. अवचितसुत काशी, " द्रौपदी–स्वयंवर ", (सं.) वा. दा. गोखले, म. सा. प., पुणे.

२८. एकनाथ, " भागवत ", शासकीय प्रत, मुंबई, १९७१.

२९. एकनाथ, " भावार्थ-रामायण ", (सं.) न. वि. पणशीकर, अ. स. वैद्य, यशवंत प्रकाशन, पुणे, १९६८.

३०. एकनाथ, " रुक्मिणी-स्वयंवर ", पोथी.

३१. कृष्ण याज्ञवल्की-मधुकर, " कथाकल्पतरू ", (सं.) दा. सा. यंदे, दा. सा. आणि मंडळी, पूर्वार्ध १९२५ (तिसरी आवृत्ती), १९६२ (सहावी आवृत्ती), उत्तरार्ध १९२४ (दुसरी आवृत्ती), १९५५ (पाचवी आवृत्ती).

३२. " गाथापंचक " भाग १, य. ह. आवटे, पुणे, शके १८३०.

३३. जनाबाई, " संत जनाबाई : चरित्र व काव्य ", (सं.) चिटणीस व कार्यकारिणी श्रीसंत जनाबाई शिक्षण संस्था, गंगाखेड, जि. परभणी, मो. द. नांदुरकर, अनमोल प्रकाशन, पुणे, १९७९.

३४. तुकाराम, " अभंगाची गाथा ", (१) (सं.) देशमुख-दांडेकर, दा. त्र्यं. जोशी, चित्रशाळा, पुणे, १९५४, (२) संचालक, शासकीय मुद्रण आणि लेखनसामग्री, मुंबई, पुनर्मुद्रण, १९७३.

३५. " नवनीत अथवा मराठी कवितांचे वेचे ", (सं.) परशुराम गोडबोले, ना. वा. गोडबोले, गव्हर्नमेंट सेंट्रल बुक डेपो, मुंबई, आवृत्ती पाचवी (नवी), १९०७, (प. आ. १८५४)

३६. नामदेव, " अभंगाची गाथा ", (सं.) वि. न. जोग, दा. त्र्यं. जोशी, चित्रशाळा, पुणे, पुनर्मुद्रण ४, १९५७.

३७. नामा (विष्णुदास व अन्य), " नामदेवांची स्फुट आख्याने : प्राचीन मराठी कविता " खंड ५, (सं.) ज. शां. देशपांडे, वा. वि. भट, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, अलिबाग-मुंबई, १९६६.

३८. नामा पाठक, " नामा पाठकांचे स्फुटकाव्य : प्राचीन मराठी कविता ", खंड २, (सं.) ज. शां. देशपांडे, वा. वि. भट, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९६४.

३९. निळोबा, " अभंगांची गाथा ", तपासणी तु. रा. वडापूरकर, दि. ह. तेलंग, नवजीवन, पंढरपूर, नवीन आवृत्ती, १९५३.

४०. " प्राचीन मराठी काव्य ", (सं.) कुलकर्णी व. दि. ढवळे, वा. रा., मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, १९६९.

४१. बहिणाबाई, " गाथा ", (सं.) वि. ना. कोल्हारकर, शं. न. जोशी, चित्रशाळा, पुणे, शके १८४८.

४२. " भाऊसाहेबांची बखर ", (सं.) भीमराव कुलकर्णी, एस. जी. कुलकर्णी, सिटी बुक स्टॉल, पुणे, १९६५.

४३. माधवस्वामी, " आख्यानक कविता ", (सं.) व. वि. पारखे, सुधा पारखे, सुनीता प्रकाशन, अलिबाग-कुलाबा-डोंबिवली, १९७४.

४४. मुकुंदराज, " विवेकसिंधु ", ( सं. ) कृ. पां. कुलकर्णी, र. वा. आंद्रे, श्री लेखन वाचन-भांडार, आनंद, पुणे, १९५७.
४५. मोरोपंत, " आर्याभारत ", ( सं. ) रा. द. पराडकर, १९१२-१६.
४६. मोरोपंत, " मंत्रभागवत ", (सं.) वा. दा. ओक, तुकाराम जावजी, निर्णयसागर, मुंबई, प्रथम माला ( स्कंध-१ ते ९ ) १८९६.
४७. मोरोपंत, " स्फुट प्रकरणे, " भाग ४ (सं.) बा. अ. भिडे, तुकाराम जावजी, मुंबई, १९०७.
४८. रघुनाथ पंडित, " (१) नळ-दमयंती-स्वयंवराख्यान, ( २ ) रामदास-वर्णन, (३) गजेंद्रमोक्ष " ( सं. ) ह. त्रिं. बापट, पुणे, १९०९.
४९. रंगनाथस्वामी निगडीकर, " कवितासंग्रह ", ( सं. ) वि. ल भावे, " महाराष्ट्र-कवी ", मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे, शके १८२७.
५०. रामदास, " समग्र ग्रंथ, " चित्रशाळा, द्वितीय संस्करण, पुणे, १९३२.
५१. वामन पंडित, " कवितासंग्रह ", भाग १, ( सं. ) वा. दा. ओक, तुकारम जावजी निर्णयसागर, मुंबई, दु. आ. १९१०.
५२. वामन पंडित, " यथार्थदीपिका ", भाग ३, ( सं. ) बा. अ. भिडे, तुकाराम जावजी, निर्णयसागर, मुंबई, दु. आ. १९११.
५३. विठ्ठल, " कवितासंग्रह ", ( सं. ) वा. दा. ओक, पांडुरंग जावजी, निर्णयसागर, मुंबई, दु. आ. १९२४.
५४. शेख महंमद, " कवितासंग्रह ", ( सं. ) बा. सी. बेंद्रे, पी. पी. एच. बुक स्टॉल, मुंबई, भाग १, ( १९५९ ), भाग २ ( १९६१ )
५५. श्रीधर, " पांडवप्रताप " ( सं. ) वि. के. फडके, यशवंत प्रकाशन, पुणे, १९७५.
५६. श्रीधर, " रामविजय " पोथी.
५७. श्रीधर, " हरिविजय " पोथी.
५८. " श्रीचक्रधर निरूपित श्रीकृष्णचरित्र ", ( सं. ) पारखे व वि. -गोपिराज महानुभाव, सुधा पारखे, सुनीता प्रकाशन, अलिबाग-कुलाबा-डोंबिवली, १९७३.
५९. ज्ञानदेव, " ज्ञानेश्वरी ", ( सं. ) दांडेकर-प्रियोळकर आदी, महाराष्ट्र राज्य शिक्षण खाते.
६०. ज्ञानदेव, " अभंग गाथा, " (सं.) प्र. न. जोशी, श्या. श्री. बनहट्टी, सुविचार, पुणे.

## ४. आधुनिक मराठी ग्रंथ

६१. आजगावकर ज. रा., " महाराष्ट्र कविचरित्र ", भाग १, दा. सा. आणि मंडळी, मुंबई, १९०७.

६२. आजगावकर ज. रा., " प्राचीन मराठी संतकवी ", खंड १, सौ. क. भा. आजगावकर, मुंबई, १९५७.
६३. करंदीकर गो. वि., " परंपरा आणि नवता ", ग. रा. भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६७.
६४. काळे त्र्यं. गु., " पुराण–निरीक्षण ", शं. न. जोशी, चित्रशाळा, पुणे, काळ नाही.
६५. कुलकर्णी द. भि., " महाकाव्य स्वरूप आणि समीक्षा ", जयश्री उपाध्याय, विजय प्रकाशन, नागपूर, १९७५.
६६. कुलकर्णी पां. ना., " संशोधन–धारा ", स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६७.
६७. केतकर श्री. व्यं., " महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण ", स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, पुणे, दु. आ. १९६४.
६८. गोडसे द. ग., " शक्तिसौष्ठव ", ग. रा. भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, पुणे–मुंबई, १९७२.
६९. गोपालन एस्., " सरस्वती महालाचे धावते दर्शन ", तंजावर, १९६०.
७०. जाधव रा. ग. " वाङ्मयीन निबंधलेखन : स्वरूप आणि साधने ", अ. अं. कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९६७.
७१. जोग रा. श्री., " मराठी वाङ्मयाभिरूचीचे विहंगमावलोकन ", व. ह. गोळे, पुणे विद्यापीठ, पुणे, १९५९.
७२. जोग रा. श्री., (सं.), " मराठी वाङ्मयाचा इतिहास ", खंड तिसरा, भीमराव कुलकर्णी, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९७३.
७३. जोशी चिं. नी., " श्रीधर : चरित्र आणि काव्यविवेचन ", मे. चिं. जोशी, पुणे–हैद्राबाद, १९५१.
७४. दीक्षित द. गो., " मुक्तेश्वरांचे महाभारत (आदिपर्व) ", द. गो. दीक्षित, धुळे, १९३०.
७५. देशपाण्डे अ. ना., " प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास ", भाग चौथा, स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, पुणे–नागपूर, १९७७.
७६. नांदापूरकर ना. गो., " मुक्त–मयूरांची भारतें ", रा. ब. माढेकर, मराठवाडा साहित्य परिषद, हैद्राबाद, १९५६.
७७. नांदापूरकर ना. गो., " मराठी महाभारताचे स्वातंत्र्य ", वा. वि. भट, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९५६.
७८. परांजपे भा. श्री., " रामदासांचे साहित्यशास्त्र ", छाया परांजपे, पद्मश्री प्रकाशन, नागपूर, १९७३.
७९. पंगु द. सी., " प्राचीन मराठी कविपंचक ", दा. ना. मोघे, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९४४.

८०. पांगारकर ल. रा., "कविवर्य मुक्तेश्वर : चरित्र आणि काव्यविवेचन", ल. रा. पांगारकर, पुणे, १९२२

८१. पांगारकर ल. रा., "मराठी वाङ्मयाचा इतिहास", खंड २, अ. ज. प्रभू, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे, दु. आ. १९७२ (प. आ. १९३५).

८२. भावे वि. ल., "महाराष्ट्र-सारस्वत", भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, दु. आ. १९१९ (प. आ. १८९९), शं. गो. तुळपुळे यांच्या पुरवणीसह चौथी आवृत्ती, वि. ग. माटे, पुणे, शके १८७६.

८३. भावे वि. ल., "बारसा", (सं.) रा. चिं. ढेरे, सौ. मालती माटे, विश्वकर्मा साहित्यालय, पुणे, १९७१.

८४. भिडे बा. अ., "मुक्तेश्वर", के. भि. ढवळे, मुंबई, दु. आ. १९२६ (प. आ. म. के काळे, तत्त्वविवेचक, मुंबई, शके १८२८)

८५. मढेंकर बा. सी., "सौंदर्य आणि साहित्य", वा. पु. भागवत, मौज प्रकाशन, मुंबई, दु. आ. १९६०.

८६. मालशे स. गं., "आवड-निवड", केशव कोटावळे, मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे-मुंबई. १९५९.

८७. राजवाडे वि. का., "संकीर्ण लेख-संग्रह", वि. गो. विजापूरकर, कोल्हापूर, काळ नाही.

८८. वाटवे के. ना., "पंडित कवी", न. शं. कुलकर्णी, दि टीचर्स आयडियल पब्लिशिंग हाऊस लि., पुणे, १९५२.

८९. वैद्य चिं. वि., "निबंध आणि भाषणे", अ. आ. मोरमकर, मुंबई, दु. आ. १९२७ (प. आ. १९१५).

९०. सबनीस पां. जि., "श्री. ह. भ. प. ल. रा. पांगारकर आणि कविराज मुक्तेश्वर", पांगारकर स्मारक मंडळ, पुणे-नाशिक, शके १८७०, (समाविष्ट, "श्री पांगारकर स्मारक ग्रंथ" भाग १, य. खु. देशपांडे-बगदे, (सं) पुणे-नाशिक, १९४९).

## ५. टंकलिखित पदवी प्रबंध

९१. कुलकर्णी वि. ना., "मराठी ललित साहित्यातील निसर्ग", शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७२.

९२. गउळकर शिवाजी अ., "प्राचीन मराठी आख्यानक कवितेच्या विकासाचा चिकित्सक अभ्यास", मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९६९.

९३. गायधनी त्र्यं. ग., "प्राचीन मराठी चरित्रे व आत्मचरित्रे यांचा वाङ्मय-प्रकारात्मक अभ्यास", मुंबई विद्यापीठ, मुंबई, १९६५.

९४. पारखे व. वि., " श्रीमद्व्यास–महाभारताचे मराठी आविष्कार ", मुंबई विद्यापीठ मुंबई, १९६३.

९५. शेंडे सरोजिनी ना., " विष्णुदासनाम्याच्या महाभारताचा विवेचनात्मक अभ्यास, मुंबई विद्यापीठ, मुंबई, १९६०.

९६. सहस्रबुद्धे स. वि., " मूळ संस्कृत महाभारत व कवी मोरोपंत यांचे मराठी आर्याभारत यांचा तौलनिक अभ्यास ", मुंबई, १९४६–४७.

## ६. नियतकालिके

९७. ॲनल्स ऑफ द भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिटयूट, सिल्व्हर ज्युबिली व्हॉल्यूम, पुणे, १९४२ ( पी. के. गोडे, " नीलकंठ चतुर्धर..." पृ. १४६–१६१ )

९८. ॲनल्स ऑफ द भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिटयूट, व्हॉल्यूम २५, पुणे, १९४४–४५, ( एम. जी. पानसे, " एपिसोडिकल व्हेरिएन्टस इन मराठी व्हर्शन्स ऑफ आदिपर्व ॲज कम्पेअर्ड वुइथ द क्रिटिकल टेक्स्ट " पृ. १८८–२१६. )

९९. द फर्ग्युसन कॉलेज मॅगेझिन, व्हॉल्यूम ९ क्र. ४, पुणे, १९१९ ( वा. ब. पटवर्धन " मुक्तेश्वर ", पृ. १३३–१३९ )

१००. नवभारत, जुलै १९५८, ( पाटील ना. ध., " मराठी महाभारतकार कृष्णदास दामा " )

१०१. प्रतिष्ठान, नोव्हेंबर १९५३, ( नांदापूरकर ना. गो., " मुक्तेश्वरी संहितेचा अभ्यास ", पृ. १७–२०, २२ )

१०२. प्रतिष्ठान, ऑगस्ट १९५४, ( कात्यायन, प्रियोळकर संपादित आदिपर्व, खंड २ चे परीक्षण )

१०३. भारत इतिहास संशोधक मंडळ इतिवृत्त, शके १८३६ ( राजवाडे वि. का., " मुक्तेश्वरी भारताची एक जुनी त्रुटित प्रत " )

१०४. भा. इ. सं. मं., त्रैमासिक, वर्ष ११, अंक १, ज्येष्ठ शके १८५२. ( पोतदार द. वा., " जिवाशिवाचे महाभारत ", पृ. २१ व ५१ )

१०५. भा. इ. सं. मं., त्रैमासिक वर्ष २३, अंक ४, एप्रिल १९४३ ( पोतदार द. वा., " मुक्तेश्वर व हंपी विरुपाक्ष ", पृ ९४–९५ )

१०६. भा. इ. सं. मं. पत्रिका, त्रैमासिक, ऑक्टोबर १९४० ( ओक दा. के., कविवर्य मुक्तेश्वरांची पुण्यतिथी ", पृ. ५५–५६ )

१०७. भा. इ. सं. मं. तृतीय संमेलन वृत्त, शके १८७३ ( भावे वि. ल., " अनंतसुत त्र्यंबक " )

१०८. भा. इ. सं. मं., त्रैमासिक, वर्ष १९ अंक १ ( कर्वे चिं. ग., पृ. ११ )

१०९. महाराष्ट्र-साहित्य पत्रिका, जुऑस १९५३ ( तुळपुळे शं. गो., प्रियोळकर संपादित आदिपर्व खंड १ चे परीक्षण )
११०. मुमुक्षु, ऑगस्ट १९२१ ( पांगारकर ल. रा., "मुक्तेश्वर नीतिरत्नमाला" पृ. १०–१३ )
१११. लोकसत्ता, दि. ३१।८।१९५२ ( वामन नीलकंठ इनामदार–मुक्तेश्वरांचे वंशज यांचे पत्र )
११२. विविधज्ञानविस्तार, वर्ष ११, मुंबई १८७९ ( ओक वि. कों., "मुक्तेश्वर आणि मोरोपंत", २४८–२५६ )
११३. सह्याद्री, जून १९६६ ( बर्वे चंद्रशेखर, "मुक्तेश्वरांच्या बंडखोरीचे मूळ", पृ. १५-२० )

## ७. संस्कृत ग्रथ

११४. "अग्निपुराणम्", आनंदाश्रमस्थपण्डितैः संशोधितम्, ह. ना आपटे, आनंदाश्रम, पुणे, १९००.
११५. कालिदास, "कुमारसंभव"
११६. कालिदास, "रघुवंश"
११७. कालिदास, "विक्रमोर्वशीय"
११८. "जैमिनी अश्वमेध", ( सं. ) वि वा. बापट, वाई, १९१३.
११९. "देवी भागवत", पोथी.
१२०. "पद्मपुराणम्" ( षष्ठमुत्तरखण्डम्पूर्वार्द्धम् ) चतुर्थो भाग, ( सं. ) त्रिवेदी–मिश्र, मनसुखराय मोर, गोपाल, कलकत्ता, १९५९.
१२१. भर्तृहरी, "शतकत्रय"
१२२. भवभूती, "महावीरचरित"
१२३. "भविष्यपुराण", खेमराज श्रीकृष्णदास, वेंकटेश्वर प्रेस, मुंबई, भाग २ ( स्कंध ४–६ ) १९२७, भाग ३ ( स्कंध ७–९ ) १९२७.
१२४. मम्मट, "काव्यप्रकाश", (सं.) अर्जुनवाडकर-मंगरूळकर, रा. ज. देशमुख, देशमुख प्रकाशन, पुणे, १९६२.
१२५. "महाभारत", ( सं. ) व्ही. एस. सुखटणकर ( १९२५–४३ ), एस. के. बेलवलकर (१९४३—), भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई–पुणे.
खंड १-आदिपर्व ( सं. ) व्ही. एस. सुखटणकर, १९३३.
खंड २-सभापर्व ( सं. ) एफ. एड. जर्टन, १९४४.
खंड ३ व ४-आरण्यकपर्व ( सं. ) व्ही. एस. सुखटणकर, १९४३.
खंड ५-विराटपर्व ( सं. ) रघुवीर, १९३६.
खंड १२-सौप्तिकपर्व ( सं. ) ह. दा. वेलणकर, १९४८.

१२६. " ( सार्थ सटीप ) महाभारत ", ( सं. ) चिं. वि. वैद्य, दा. सा. यंदे आणि मंडळी, बडोदे-मुंबई. आदिपर्व भाग १ व २ ( १९३१ ), सभापर्व ( १९३३ )

१२७. " महाभारत–वनपर्व ", ( सं. ) का. वा. लेले, वाईकर, मोदवृत्त, वाई, भाग १ ( शके १८२० ), भाग २ ( श. १८२१ )

१२८. " ( श्रीमन् ) महाभारत या ग्रंथाचे मराठी सुरस भाषांतर ", पुस्तक पाचवे, कर्ण-शल्य-सौप्तिक-स्त्री पर्व, ( भाषां. ) रा. भि. दातार-कृ. नी. द्रवीड–य. ग. फफे, तपासनीस बाळकृष्णशास्त्री उपासनी, ग. वि. चिपळूणकर आणि मंडळी, जगद्धितेच्छु, पुणे, दु. आ. शके १८३२ ( प. आ. १८२९ )

१२९. राजशेखर, " काव्यमीमांसा ", गायकवाड ओरिएंटल सिरीज, बडोदा, १९१६.

१३०. " महामुनी आदिकवी वाल्मीकिप्रणीत रामायण " बालकांड–उत्तरकांड, (सं.) श्री. दा. सातवळेकर, वि. दा. पंडित, स्वाध्यायमंडल, पारडी, दु. आ. १९६५.

१३१. विश्वनाथ, " साहित्यदर्पण ", निर्णयसागर, मुंबई, १९०२.

१३२. " स्कंदमहापुराणम् ", वैष्णवखण्डात्मकः द्वितीयो भागः, ( सं. ) त्रिवेदी–मिश्र, मनसुखराय मोर, गोपाल, कलकत्ता, १९६०.

१३३. " सुभाषित रत्नाकर ", ( सं. ( कृष्णशास्त्री भाटवडेकर, परिवर्द्धित द्वितीयावृत्ती उद्धवशास्त्री ऐनापुरे, मुंबई, १८८८.

## ८. प्राकृत ग्रंथ

१३४. " कथासरित्सागर ", (भाषां. ) वि. वा. बापट, र. दा. यंदे, दा. सा. आणि कं. पुणे, भाग १, दु. आ. १९५७, भाग–२-४, आवृत्ती चौथी १९६२–१९६६.

## ९. हिंदी ग्रंथ

१३५. कोदण्ड हरिश्चंद्र, अपभ्रं साहित्य ", भारतीय साहित्य मंदिर, दिल्ली, सं. २०१३.

१३६. सिंह शंभूनाथ, " हिंदी महाकाव्य का स्वरूपविकास ", हिंदी प्रचारक पुस्तकालय, वाराणसी, १९५६.

## १०. इंग्रजी ग्रंथ

१३७. ॲबरक्रॉम्बी लेस्ली, " द एपिक–ॲन एसे " लंडन, १९२२.

१३८. इलियट टी. एस., " द सेक्रेड वूड, " मेथ्युएन ॲंड कं. लि., लंडन, रिप्रिंटेड १९५३.

१३९. पुसाळकर ए. डी., स्टडीज़ इन एपिक्स अँड पुराणाज़ ऑफ इंडिया ”, के. एम. मुन्शी–अय्यर, भारतीय विद्याभवन, मुंबई, १९५५.
१४०. विंटरनिट्झ् एम., “ ए हिस्ट्री ऑफ इंडियन लिट्रेचर ”, खंड १ ( भाषां. ) मिसेस एस. केतकर, कलकत्ता, १९२७.

□ □ □

REFBK-0025645

१३९. पुसाळकर ए. डी., स्टडीज़ इन एपिक्स अँड पुराणाज़् ऑफ इंडिया ", के. एम. मुन्शी–अय्यर, भारतीय विद्याभवन, मुंबई, १९५५.

१४०. विंटरनिट्झ् एम., " ए हिस्ट्री ऑफ इंडियन लिट्रेचर ", खंड १ ( भाषां. ) मिसेस एस. केतकर, कलकत्ता, १९२७.

□ □ □

REFBK-0025645

# मुक्तेश्वरांची कविता

## मुक्तेश्वरांच्या कवितेचा वाङ्मयीन अभ्यास

[ वि. रा. करंदीकर संशोधन-पारितोषिकप्राप्त पीएच. डी. प्रबंध
महाराष्ट्र राज्य ग्रंथ पुरस्कार प्राप्त खंड १ व २ ]

खंड १ ला :
**आख्यानक व स्फुट कविता**
मूल्य रुपये ३५/-

खंड २ रा :
**संक्षेप रामायण**
मूल्य रुपये २५ -

खंड ३ रा :
**महाभारत**
मूल्य रुपये ७०/-

**लेखक : डॉ. र. बा. मंचरकर**

**तीन खंडांचे एकत्रित मूल्य १०० रुपये फक्त.**

संशोधनाची बैठक पक्की राखून आस्वादक सौंदर्यदृष्टीने मुक्तेश्वरी प्रतिभेचे सर्वांगीण दर्शन घडविणारा, प्राचीन साहित्यविषयक समीक्षेत संशोधन आणि रसास्वाद अशा दोन्ही अंगांनी मोलाची भर घालणारा कसदार प्रबंध.